MAHIS 2.1 M

# एम. ए. इतिहास

## सत्र - II

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

# समकालीन भारताचा इतिहास (इ. स. १९४७ ते इ. स. २०००)

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक व संपादक** : **डॉ. व्हिन्सेंट कैतान डिमेलो**
प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
सेंट जोसेफ कला व वाणिज्य महाविद्यालय, विरार, जि-पालघर.

**लेखक** : **प्रा. तुळशीदास मोकल**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
को. ए. सो. डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व
सौ. के. जि. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा-रायगड-४०२१०९.

: **डॉ. गणेश वाघ**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
स्व. बाबूरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा,
ता. सिल्लोड, जि., संभाजीनगर - ४३११७७.

: **प्रा. सिद्धार्थ दवणे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
ॲमिटी विद्यापीठ, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश.

**एप्रील २०२५, प्रथम मुद्रण, ISBN : 978-93-6728-146-8**

**प्रकाशक**
संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई), मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय, सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | भारताची फाळणी | ०१ |
| २. | भारतीय संस्थानांचे विलीनीकरण आणि राज्यांची पुनर्रचना | १६ |
| ३. | भारताच्या राज्यघटनेच्या इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका, भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये | ३४ |
| ४. | जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता, फुटीरतावादी चळवळी | ५५ |
| ५. | पंचवार्षिक योजना | ७७ |
| ६. | शेती सुधारणा आणि कृषी विकास | ९८ |
| ७. | बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि औद्योगिक विकास | ११५ |
| ८. | उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण | १३२ |
| ९. | मंडल आयोग आणि आरक्षणाचा मुद्दा | १६६ |
| १०. | हिंदू कोड बिल आणि महिला चळवळ | १८३ |
| ११. | सामाजिक परिवर्तनासाठीची आंबेडकरी चळवळ (इ. स. १९५७ - इ. स. २०००) | २०८ |
| १२. | कामगार चळवळी आणि आदिवासींच्या चळवळी: समस्या | २२४ |
| १३. | पंचशील आणि अलिप्ततावादी चळवळ | २५२ |
| १४. | भारताचे पाकिस्तान, चीन आणि श्रीलंका बरोबर सबंध | २६८ |
| १५. | भारत आणि आंतरराष्ट्रीय सबंध (अमेरिका आणि रशिया) | २८२ |


*****

| | |
|---|---|
| **Programme Name: M.A. Sem- II** | **Core course: 51111 Contemporary Indian History (1947 CE – 2000 CE)** |
| **Total Credits: 04** | **Total Marks: 100** |
| **Semester End Assessment: 50** | **Internal Continuous Assessment: 50** |

**Course Outcome:**

a) To analyze the political, economic, social and culturaltransformation and development of the Contemporary India that took place from the 1947 to till the end 2000 CE.
b) To understand the issues and challenges of Communalism and Secularism.
c) To evaluate the importance of the Nationalization of Banks and its significanceprocesses and the Era of Globalization.

**MODULE I: (2 Credits)**

**Unit 1: Political Scenario and Developments**

a) Partition, Integration and Reorganization of States

b) Dr. Ambedkar's role in the Constitutional history of India, Features of Indian Constitution

c) Communalism and Secularism, Separatist Movements

**Unit 2: Economic Development and Transformations**

a) Five Year Plans and Land and Agrarian Reforms

b) Nationalization of Banks and Industrial Development

c) Liberalization, Privatation and Globalization, Mandal Commission and Issue of Reservation

**MODULE II: (2 Credits)**

**Unit 3: Social-Cultural Transformations**

a) Hindu Code Bill and the Women's Movement

b) Ambedkarite Movement for Social change

c)Labour Movements and Tribal Movements: Issues and Challenges

**Unit 4: India and the World**

a) Panchsheel and Non Alignment Movement

b) India's relations with Pakistan, China and Sri Lanka

c) India and International relations (USA and USSR)

**References:**


Amdedkar B. R., *Federation versus Freedom*, Thakkar & Co, Mumbai, 1939.

Bandyopadhyay , J, *The Making of the India's Foreign Policy*, Allied Publishers, New Delhi, 1970.

Bhole, Bhaskar and Kishor Bedkihal, *Shatakantachya Valanavar*, Dr. Babasaheb Ambedkar Acadamy, Satara, 2006 (Marathi)

Brass, Paul, R. (ed.), *The New Cambridge History of India: The Politics of India since Independence*, Cambridge University Press, Cambridge. 1990.

Chandra, Bipan, et.al., *India after Independence*, 1947-2000, Penguin Books, New Delhi, 1999.

Chatterjee, Partha (ed.), *State and Politics in India*, Oxford University Press, New Delhi, 1997.

Chausalkar, Ashok, *Adhunik Bharatiya Rajkiya Vichar: Pravahaani Antapravahi*, Pratima Prakashan, (Marathi) Dietmar Rothermund, *India : The Rise of an Asia Giant*, Stanza, New Delhi, 2008.

Dietmar, Rothermund, *Contemporary India: Political*, Economic & Social Development, Palgrave, Delhi, 2013

Dr. Anwar Alam (Eds.), "*Oil, Democracy and Terrorism: An Inevitable Nexus in the Gulf", in Contemporary West Asia:* Politics and Development, New Century Publications, New Delhi, July 2010.

Dreze, Jean and ,Amartya Sen, *India: Economic Development and Social Opportunity*, Clarendon, Oxford University Press, Oxford, 1998.

Dutt, V.P, *India's Foreign Policy*, Vikas Publishing House, New Delhi, 1984.

Forbes, Geraldine, *Women in Modern India*, Cambridge University Press, Cambridge, 1996.

Forbes, Geraldine, *The New Cambridge History of India: Women in Modern India*, IV 2 Cambridge University Press, Cambridge. 1996.

Francine, Frankel, *R; India's Political Economy, 1947-1977*. The Gradual Revolution, Oxford University Press, New Delhi, 1978.

Godbole, Madhav , Trans, GodboleSujata, *Bharatachya Sansadiya Lokshahichi Agnipariksha*, Rajhansa Publication, Pune (Marathi)

Godbole, Madhav, Phalniche Hatyakand – *Ek Uttar Chikitsa*, *RajhansaPrakashan*, Pune (Marathi) GokhaleKaruna, Nehru Navbharatache Shilpakar, Rajhansa Prakashan, (Marathi)

Guha, Ramchandra, *India after Gandhi: The History of the World's Largest Democracy*, picador, London, 2007. Gupta Dipankar (ed.), Social Stratification, OUP, New Delhi, 1991.

Jain, Ashok, Indira – *Antim Parva*, *Rajhansa Prakashan*, Pune (Marathi) Kamble Narayan, Ambedkari Chalavaliche Badalte Sandarbha, Chnmaya Prakashan (Marathi)

Kumar Dharma (ed.), *The Cambridge Economic History of India*, Vol. II, c. 1757- 2003, Orient Longman in association with Cambridge University press, New Delhi, 2005.

Kumar, Radha, *The History of Doing,Zubaan,* New Delhi, 2007.

Mohanty, Manoranjan, (ed.), *Class, Caste and Gender: Readings in Indian Government and Politics*-5, Sage Publications, New Delhi, 2004.

Sekhar, Bandyopadhyay, *From Plassey to Partition, A History of Modern India*, Orient Longman, New Delhi, 2004

Sen, Sukomal, *Working Class of India: History of Emergence and Movement*, 1830- 1970. K.P.Bagchi and Company, Calcutta, 1977.

Shah, Ganshyam (ed.), *Caste and Democratic Politics in India,* Permanent Black, Delhi. 2002.

Tomlinson, B.R. (ed.),*The New Cambridge History of India: The Economy of Modern India,* 1860-1970, Cambridge University Press, Cambridge, 1993.

# १

# भारताची फाळणी

**घटक रचना**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ फाळणीची पार्श्वभूमी

१.४ द्विराष्ट्र सिद्धांत आणि पाकिस्तान संकल्पनेचा उदय

१.५ भारताच्या स्वातंत्र्याची प्रगती आणि पाकिस्तानची निर्मिती

१.६ भारताच्या फाळणीला जबाबदार कोण ?

१.७ निवडक विचार

१.८ सारांश

१.९ प्रश्न

१.१० संदर्भ

## १.१ उद्दिष्ट्ये

१) भारताच्या फाळणीची पार्श्वभूमी समजून घेणे.

२) फाळणीला जबाबदार असणाऱ्या घटकांची चर्चा करणे.

३) जातियवाद आणि लोकशाही यांचा परस्पर संबंध समजून घेणे .

४) स्वातंत्र्य आणि फाळणी यांचा संबंध प्रस्थापित करणे .

५) फाळणी टाळता आली असती का यावर चर्चा करणे.

## १.२ प्रस्तावना

भारतामध्ये ब्रिटिशांनी "फोडा आणि राज्य करा " (Divide and Rule) या नीतीचा अवलंब करून आपले साम्राज्यवादी धोरण राबवले. १८५७ च्या उठावामध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या प्रदर्शनामुळे हा उठाव मोडून काढताना इंग्रजांची दमछाक झाली. त्यांना कळून चुकले की भारतामध्ये आपले शासन टिकवायचे असेल तर हिंदू आणि मुसलमानांना एकत्र येऊ देणे धोक्याचे आहे. १८५७ च्या उठावानंतर भारतीय जनतेचे नेतृत्व पारंपारिक

सरंजामशाही शासक वर्गाकडून आधुनिक शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांकडे आले. या वर्गाने भारतीय जनतेमध्ये ब्रिटीशांच्या शोषण व्यवस्थेविरुद्ध जनजागृती करून भारतीय राष्ट्रवादाची मुहूर्तमेढ रोवली. हा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिशांनी भारतीयांना शासन व्यवस्थेमध्ये प्रतिनिधित्व देण्याची योजना आखली. त्यातूनच स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय झाला. या आधुनिक लोकशाही संस्थांमध्ये 'एक व्यक्ती एक मत' हे महत्त्वाचे तत्त्व असून लोकशाहीमध्ये बहुमत असणाऱ्या वर्गाची सत्ता चालत असते. भारतामध्ये हिंदू बहुसंख्य आणि मुस्लिम अल्पसंख्य असल्यामुळे अल्पसंख्य मुसलमानांना बहुसंख्य हिंदूंच्या भविष्यकालीन वर्चस्ववादाची भीती वाटायला लागली. यातूनच फुटीरतावादी प्रवृत्ती निर्माण झाल्या व मुसलमानांचे हितसंवर्धन करण्यासाठी मुस्लिम लीगची स्थापना झाली तर हिंदूंचे हितसंवर्धन करण्यासाठी हिंदू महासभेची स्थापना झाली. १९०९ च्या कायद्याने मुसलमानांना व १९१९ च्या कायद्याने शिखांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन या फुटीरतावादाला ब्रिटिशांनी खतपाणी घालण्याचे काम केले. काँग्रेसनेही मुसलमानांना राष्ट्रीय चळवळीत सामावून घेण्यासाठी त्यांच्या मागण्या वेळोवेळी मान्य केल्या. त्यातूनच पाकिस्तानची बीजे रोवल्या गेली. कवी मोहम्मद इक्बाल यांनी स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची संकल्पना मांडली तर रहमत अली याने या संकल्पनेला मूर्तरूप देण्याचे काम केले. याचाच आधार घेऊन पुढे बॅरिस्टर जीना यांनी द्विराष्ट्र सिद्धांत मांडून पाकिस्तानची मागणी लावून धरली. शेवटी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला आपली मागणी मान्य होत नाही म्हणून जीनांनी प्रत्यक्ष कृती करून जातीय दंगलीसारख्या हिंसाचाराचा आधार घेतला. ब्रिटिशांनी हा हिंसाचार थांबवण्यासाठी विषेश प्रयत्न केले नाही तर काँग्रेसने हा हिंसाचार थांबून स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा व्हावा म्हणून भारताच्या फाळणीला संमती दिली. शेवटी १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळून भारत आणि पाकिस्तान या स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांची निर्मिती झाली.

## १.३ फाळणीची पार्श्वभूमी

भारताच्या फाळणीचे मूळ हे ब्रिटिशांच्या फोडा आणि राज्य करा या नीतीमध्ये दिसून येते. मुंबईचा गव्हर्नर एलफिस्टन याने म्हंटले होते की “विभाजित करा व राज्य करा ही प्राचीन काळातील रोमन म्हण होती आणि ती आता आमची असायला पाहिजे.” प्रशासकीय अधिकारी असलेल्या जॉन स्ट्रेची याने असे लिहिले होते की, “भारतातील भिन्नभिन्न तत्त्वांमध्ये विरोध असणे आमच्या राजकीय स्थितीच्या दृष्टीने चांगले आहे.” १८५७च्या उठावात बहादुरशहा जफरला पुन्हा सम्राट बनवण्याचा प्रयत्न झाल्याने मुसलमानांबद्दल इंग्रजांच्या मनात कटू भावना होती. वहाबी आंदोलनाने ती अधिकच तीव्र बनली. त्यामुळे इंग्रजांनी मुसलमानांना दडपून टाकण्याचे धोरण अवलंबिले. परंतु हिंदूंमध्ये जशीजशी राजकीय जागृती निर्माण झाली आणि त्यांनी राजकीय अधिकारांची मागणी सुरू केली तसे तसे इंग्रजांचे धोरण बदलत गेले. १९८०च्या सुमारास हे स्पष्ट झाले की राजकीय, आर्थिक आणि शिक्षणक्षेत्रात मागासलेल्या मुसलमानांपेक्षा हिंदू ब्रिटिश साम्राज्याकरता अधिक धोकादायक वाटू लागले. परिणामी दोन्ही धर्माबद्दल इंग्रजांचे धोरण विशिष्ट आकार घेऊ लागले.

### १.३.१. सर सय्यद अहमद खान आणि अलिगड चळवळ :

सुरुवातीच्या काळात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे कट्टर समर्थक असलेले सर सय्यद अहमद खान पुढे काँग्रेसचे कट्टर विरोधक आणि ब्रिटिश साम्राज्याचे समर्थक बनले. सुरुवातीच्या काळात त्यांनी हिंदू व मुसलमानांना सुंदर वधूचे दोन डोळे अशी उपमा दिली. १८८४ मधील एका भाषणात अहमद खान म्हणाले होते की ”तुम्ही एकाच देशाचे रहिवासी आहात, हिंदू व मुसलमान यामध्ये फक्त धर्माची भिन्नता आहे अन्यथा सर्व लोक हिंदू, मुसलमान अथवा ख्रिश्चन एकाच राष्ट्राशी संलग्न आहेत.” पंजाब मधील हिंदू समोर बोलताना ते म्हणाले की, “आम्ही मनाने आणि हृदयाने एक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे;कार्यही एकत्र केले पाहिजे; जर आम्ही एक झालो तर परस्परांचा आधार बनू शकतो आणि असे न करता एकमेकांना विरोध करत राहिलो तर आम्हा दोघांचाही नाश होईल “

मात्र हळूहळू सर सय्यद अहमद खान यांच्या विचारांमध्ये बदल होऊ लागला. १६मार्च १९८८ रोजी मीरत येथे केलेल्या भाषणात ते म्हणाले की, “हिंदू व मुसलमान दोन राष्ट्र आहेत एवढेच नाही तर ते विरोधी राष्ट्र आहेत.” त्यांच्या ध्येयधोरणात असा अचानक बदल झाला कारण स्थानिक मंडळे तयार करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया सुरू होताच स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यात आली. रिपनच्या स्थानिक स्वराज्य विधेयकावर केंद्रीय कायदे मंडळात बोलताना त्यांनी दोन्ही जमाती व धर्मातील महत्त्वाच्या भेदाविषयी व दोन्ही धर्मियांनी अंगिकारलेल्या शिक्षणाच्या दर्जाविषयी विचार व्यक्त केले व स्पष्ट केले की, “सर्वसाधारण निवडणूक पद्धतीचा अवलंब केल्यास मोठी जमात लहान लहान जमातीकडे दुर्लक्ष करेल”. आता अहमद खान पूर्णत: मुसलमानांचे पक्षपाती बनले. आपली जमात राजकारण व शिक्षण क्षेत्रात पूर्णत: मागासलेली आहेत याची त्यांना जाणीव होती. आपल्या जमातीला पुरेसे प्रतिनिधित्व मिळणार नाही हे लक्षात येताच ते या निष्कर्षावर आले की, “प्रातिनिधिक व जबाबदार प्रकारच्या पश्चिमेकडील राजकीय संस्थांसाठी अजून भारतीय परिपक्व झाले नाहीत”. अहमद खानच्या या विचारांनी हिंदू बद्दल भयगंड निर्माण होऊन मुसलमान वेगळ्या मार्गाने विचार करू लागले. परिस्थितीचा अचूक फायदा घेऊन ब्रिटिश प्रशासकांनी हिंदू व मुसलमान यांमधील भेदाला खतपाणी घातले. अलिगड कॉलेजच्या आरंभीचे तीन प्रिन्सिपॉल - बेक, मॉरिसन, आर्चबोल्ड यांनी अलिगड चळवळीला इंग्रज समर्थक व हिंदू विरोधाचे रूप दिले. अलिगड चळवळीने मुसलमानांच्या मनात ब्रिटीश राजपदाविषयी निष्ठेची भावना निर्माण केली आणि भारताच्या राजकीय जीवनापासून दूर राहण्याची प्रेरणा दिली. ऑगस्ट १८८८ मध्ये सय्यद अहमद खान यांनी संयुक्त भारतीय राजनिष्ठ सभा (United Indian Patriotic Association) स्थापना केली. त्यामागील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे, भारतातील इंग्रजी राजवटीचे समर्थन करणे व मुसलमानांना राजकीय प्रवाहापासून दूर ठेवणे हे होते. (आधुनिक भारताचा इतिहास : ग्रोवर, बेलेकर;४९६)

### १.३.२ भारतीय इतिहास लेखनाचा प्रभाव:

भारतीय इतिहासाच्या काही इंग्रज इतिहासकारांनी हिंदु-मुसलमानांन प्रश्न डोळ्यासमोर ठेवून भारतीय संस्कृतीच्या विकासाच्या घटनाक्रम लिहिला आणि अप्रत्यक्षरीत्या साम्राज्यवादाला चालना दिली. त्यांचे अनुकरण करून काही भारतीय इतिहासकारांनी तसेच प्रतिपादन केले. प्राचीन भारताच्या इतिहासाला हिंदूयुग व मध्ययुगीन इतिहासाला

मुस्लिमयुग असे संबोधून इतिहास कालखंडाचा आधार धर्म ठरविला. आपल्या राजकीय आणि आर्थिक उद्दिष्ट पूर्तीसाठी राजा आणि प्रजा दोघांनीही धर्माचा आधार घेतला हे खरे आहे. परंतु सर्व मुसलमान शासक होते व हिंदु शासित होते असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होईल. मुस्लिम सत्तेच्या काळात हिंदूंचे शोषण झाले तसे आणि तेवढे  नसले तरी सामान्य मुसलमानांचे ही शोषण झाले. पण अशा प्रकारे सत्याकडे पाठ करून केवळ जातीय दृष्टीकोनातून लिहिल्या गेलेल्या इतिहासामुळे १९व्या शतकाचा शेवटच्या कालखंडात आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय राजकारणाला प्रभावित केले.

### १.३.३ धर्मसुधारणा चळवळीचा प्रभाव:

१९व्या शतकात झालेल्या हिंदू व मुसलमान धार्मिक सुधारणा चळवळीत काही परस्परविरोधी तत्वे होती. आपल्या धर्मातील जुन्या टाकाऊ प्रथा-परंपरा बाजूला सारून धर्माला उजाळा देणे हा या चळवळीचा उद्देश होता. परंतु त्यातून काही अनिष्ट तत्त्वे निर्माण झाली. वहाबी आंदोलनाने सर्व बिगर मुसलमान जनतेप्रती जिहाद पुकारणे आणि देशाला दारुल इस्लाम बनण्याची स्वप्ने पाहणे हिंदूंसाठी अमान्य अशीच गोष्ट होती. त्याच न्यायाने या देशाला आर्यावर्त बनवण्याच्या काही हिंदू सुधारकांचा प्रयत्न आणि शुद्धि आंदोलनाद्वारे मुसलमानांना हिंदू धर्मात परत येण्याचे आवाहन करणे मुसलमानांना अमान्य असेच होते. विवेकानंदांनी प्राचीन भारताच्या गौरवशाली परंपराचा उल्लेख केल्यामुळे काही मुसलमान नाराज होते आणि ते आपल्या परंपरासाठी पश्चिम आशियाच्या इतिहासाकडे पाहू लागले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी जहालवाद्यांनी महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज व गुरुगोविंद सिंग यांना राष्ट्रपुरुष मानून त्यांच्या वीरगाथा जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न केले. मरगळ आलेल्या हिंदू समाजाला देशभक्तीने भारून टाकने, इंग्रजांविरुद्ध लढा देण्यास तयार करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकवणे, यासाठी वरील आदर्श समोर ठेवण्यात आले. दृष्टी राष्ट्रवादाची होती पण तसे करताना जाणते - अजाणतेपणे अकबर, शहाजान, औरंगजेब इत्यादी मुस्लिम सम्राटांना परकीय संबोधल्यामुळे मुसलमान अस्वस्थ झाले. त्याला खतपाणी घालण्याचे कार्य मुसलमान पुढाऱ्यांनी केले व त्यातून जातीयवाद बोकाळला. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष व नंतरच्या काळात महात्मा गांधी हे सर्व हिंदू-मुसलमान ऐक्याचे समर्थक होते. आपल्या भाषणांमधून जनतेला प्रबोधित करताना त्यांना समजण्यासाठी काही उदाहरणे देत, स्वाभाविकच ती हिंदू संस्कृती, परंपरांशी निगडित अशी होती. आदर्श राज्याची कल्पना करतांना गांधीनी स्वाभाविक रित्या रामराज्य शब्दाचा वापर केला ते एक उदाहरण होते. वास्तविक त्यात जातीयता औषधालाही नव्हती परंतु इंग्रजांनी राईचा पर्वत केला आणि त्याला जातीयवादाचा रंग दिला. मुस्लिम पुढाऱ्यांनी ते उचलून धरले, परिणामी रामराज्य शब्दही मुसलमानांना खटकू लागला. जातीयवादाचे विष हळूहळू इतके पसरले की  तिरंगी झेंडा समोर नतमस्तक होण्यास मुस्लिम लीगने आक्षेप घेतला. वरील वैचारिक तत्वज्ञानातून फुटीरतावादास चालना मिळाली.

### १.३.४ शिमला शिष्टमंडळ :

भारत सचिवा पासून जिल्ह्याच्या प्रशासनापर्यंत सर्व पदाधिकाऱ्यांचे या बाबतीत एकमत होते की भारतात इंग्रज सत्ता टिकवून ठेवायची असेल तर काँग्रेसच्या वाढत्या शक्तीला काहीतरी प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. असाच एक प्रतिबंध होता जातीय मतदारसंघ, म्हणजेच मुसलमानांसाठी स्वतंत्र जागांचे आरक्षण ज्यात फक्त मुसलमान मतदारच भाग घेतील. १९०९च्या घटनात्मक सुधारणांचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे वरील विचाराला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. अलिगड कॉलेजचे प्रिन्सिपल आर्चबोल्ड यांच्या सूचनेवरून आगाखान एक शिष्टमंडळ घेऊन ऑक्टोंबर १९०६ मध्ये व्हाईसराय लॉर्ड मिंटोला सिमला येथे भेटले. निवेदन स्वतः प्रिन्सिपल आर्चबोल्डने तयार केले होते. शिष्टमंडळाने ब्रिटीश राजपदाप्रती निष्ठा व्यक्त केली व त्यांच्या सुधारणांची स्तुती केली. त्याचबरोबर संयुक्त निवडणूक पद्धती त्यांच्या हितासाठी योग्य नाही हेही स्पष्ट केले. मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या आधारावर नव्हे तर त्यांचे राजकीय महत्त्व आणि साम्राज्याच्या रक्षणासाठी त्यांनी केलेल्या सेवेचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांना जागा मिळाल्या पाहिजे अशी विनंती केली. ही विनंती लॉर्ड मिंटोने लगेच मान्य केली. त्यावर भारत सचिव लॉर्ड मोरलेने व्हाईसराय लॉर्ड मिंटोला शाबासकी देत, ५ ऑक्टोंबर १९०६ रोजी लिहिले की, "ज्या कुशलतेने तुम्ही परिस्थिती हाताळली त्याबद्दल येथे वृत्तपत्रे आणि जनता प्रसंशा करीत आहे"

### १.३.५ मुस्लिम लीगची स्थापना १९०६:

शिमला शिष्टमंडळाच्या वेळी मुसलमान नेत्यांनी एक केंद्रीय मुस्लिम संघटना स्थापन करण्याचे ठरवले होते. मुसलमानी हिताचे रक्षण करणे त्यामागील उद्देश होता. त्याप्रमाणे ३० डिसेंबर १९०६ रोजी मुस्लिम लीगची स्थापना ढाका येथे करण्यात आली. तिचे उद्देश खालीलप्रमाणे होते.

(१) भारतीय मुसलमानांमध्ये इंग्रज सरकार प्रती राजनिष्ठेची भावना वृद्धिंगत करणे आणि सरकारच्या काही कार्याबाबत गैरसमज निर्माण झाल्यास तो दूर करणे.

(२) भारतीय मुसलमानांच्या राजकीय व इतर हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या आकांक्षा व गरजा संयमपूर्ण शब्दात सरकार समोर ठेवणे.

अशाप्रकारे प्रारंभापासूनच मुस्लिम लीग एक जातीयवादी संस्था होती. तिचा उद्देश केवळ मुसलमानांचा राजकीय व इतर हितांचे रक्षण करणे हा होता . मुस्लिम लीगचे हेच रूप १९४७ पर्यंत तसेच होते. नवाब वकार-ऊल-मुल्कने अलिगडला केलेल्या भाषणावरून लीगचा राजकीय उद्देश स्पष्ट होतो. त्या भाषणात म्हटले होते की, "अल्लाच्या कृपेने असे होऊ नये की भारतातून इंग्रज सत्ता समाप्त झाल्यावर हिंदू आमच्यावर राज्य करतील आणि आमच्या जिविताला, संपत्तीला व धर्माला धोका निर्माण होईल. या धोक्यापासून वाचण्याचा एकच मार्ग मुसलमानांसाठी आहे तो म्हणजे इंग्रज सत्ता कायम राहण्यास साहाय्यभूत ठरणे. जर मुसलमान मनापासून इंग्रजांच्या पाठीशी राहिले तर त्यांचे राज्य यथास्थित चालेल. मुसलमानांनी स्वतःला इंग्रज सैन्य मानले पाहिजे. ते ब्रिटीश राज पदासाठी आपले रक्त सांडण्यास व जीव अर्पण करण्यास तयार आहे." १९१३ नंतर जवळ जवळ एक दशक

मुस्लीम लीगवर मौलाना मोहम्मद अली, मौलाना मजर उल-हक, सय्यद वजीर हुसेन, हजरत इमाम आणि महंमद अली जिना यांच्या सारख्या सुधारक नेत्यांचा प्रभाव होता. १९२० ते १९२३ पर्यंत मुस्लीम लीगचे विशेष असे कार्य दिसत नाही. परंतु सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदांमुळे मुस्लिम लीगमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण झाले.या वेळेपर्यंत पूर्ण जातीयवादी बनलेल्या जिनाकडे आता लीगचे सर्वमान्य आणि एकमेव नेतृत्व आले. १९३२ च्या जातीय निवाड्याने हिंदु-मुसलमानात असलेली तेढ अधिकच वाढवण्याचे कार्य केले.

### १.३.६ हिंदू महासभा:

भारतात जातीय समजल्या गेलेल्या संस्था निर्माण व विकसित होण्यासाठी ब्रिटिशांचे साम्राज्यवादी धोरण कारणीभूत ठरले. विशिष्ट जमातीच्या रक्षणासाठी स्थापन केलेल्या अशा संस्था वैयक्तिकरित्या त्यांच्या नेत्यांच्या आकांक्षापूर्ती करीत असताना अप्रत्यक्षपणे ब्रिटिश साम्राज्याला सहाय्यभूत ठरत होत्या. हिंदू महासभा, मुस्लिम लीग व दलित जाती संघटना त्याला अपवाद नव्हत्या. हिंदू महासभेच्या स्थापनेची नेमकी माहिती नाही. परंतु १९१० मध्ये अलाहाबादच्या प्रमुख हिंदूंनी अखिल भारतीय हिंदू महासभा स्थापन करण्याचा निश्चय केला. १९११ मध्ये पंजाब हिंदू महासभेने अमृतसर येथे हिंदु अधिवेशन आयोजित केले. हिंदू महासभेचे कार्यालय हरिद्वार येथे ठेवण्यात आले आणि महत्त्वाच्या हिंदू मेळयांच्या प्रसंगी अधिवेशने घ्यावी असे ठरवण्यात आले. १९२२ मध्ये असहकार चळवळ थांबल्यानंतर मलबार आणि मुलतान मध्ये व्यापक प्रमाणावर जातीय दंगली होऊन त्यात प्रचंड प्रमाणात हिंदूंच्या जीविताचे व मालमत्तेचे नुकसान झाले. हिंदूंना स्वसंरक्षणासाठी संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. हिंदू महासभेची स्थापना करताना त्याचे महत्त्व प्रतिपादित करीत पंडित मदन मोहन मालवीय म्हणाले, "मुसलमान आणि ख्रिश्चन अनेक शतकांपासून आपल्या धर्मप्रसाराचे कार्य करीत आहे. भारतातील बहुसंख्य मुसलमान धर्म परिवर्तित हिंदू आहेत हे थांबवण्यासाठी एक हिंदू मिशन स्थापन करणे आवश्यक आहेत." त्याचप्रमाणे स्थानिक मंडळामध्ये जास्त प्रतिनिधित्व मिळण्याच्या मुस्लीम लीगच्या मागणीला अडवून धरण्यासाठी हिंदू संघटनेचे महत्त्व मालवीय यांनी स्पष्ट केले. प्रारंभीच्या काळात शुद्धी व संघटन हिंदुमहासभेचे उद्दिष्ट होते. त्याचप्रमाणे मालवीय यांनी या चळवळीच्या आर्थिक, सामाजिक उद्देशावरही भर दिला. कॉंग्रेसचे कार्य प्रामुख्याने राजकीय क्षेत्रात असल्याने सामाजिक, सांस्कृतिक आणि बिगर राजकीय क्षेत्रात फारसे कार्य नव्हते. म्हणून हिंदू समाजातील जातीप्रथा, बालविवाह, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक अनिष्ट प्रथा दूर करण्याकरता हिंदुमहासभेचे संघटन करण्यात आले. पंडित मदन मोहन मालवीय यांनी ही बाब स्पष्ट केली की, "हिंदू महासभा कॉंग्रेसची प्रतिस्पर्धी नसून कॉंग्रेसच्या कार्याला पूरक ठरेल व कॉंग्रेस सुदृढ बनेल यासाठी स्थापन करण्यात आली आहे".

त्यावेळी एक धारणा अशी होती की मुस्लिम लीग, अकाली दल व इतर जातीय संस्थानप्रमाणे प्रमाणे हिंदुमहासभा एक होती आणि तिचा सामाजिक व सांस्कृतिक उत्थानाचा दावा पोकळ होता. १९३८ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदू महासभेचे अध्यक्ष निवडले गेले व त्या पदावर अनेक वर्षे राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली सभेने एक राजकीय कार्यक्रम तयार केला होता. कॉंग्रेसच्या मुसलमानांना खुष ठेवण्याचा धोरणामुळे नाराज झालेल्या सावरकरांनी हिंदू राष्ट्राची गर्जना केली. सावरकरांचे असे म्हणणे होते की, "या

देशाला मातृभूमी मानतात त्यांचा हा देश आहे. मुसलमान तसेच इतर अल्पसंख्याकांनी अल्पसंख्यांकासारखेच राहायला हवे. लोकशाहीच्या तत्त्वानुसार बहुसंख्यांकांची भाषा राष्ट्रभाषा असावी". अर्थात भारत हिंदूंचा देश असला तरी इतरांना येथे न्याय मिळेल त्यासाठी त्यांनी एक व्यक्ती एक मत या सिद्धांताचा पुरस्कार केला. हिंदू महासभेने भारतात हिंदू जमात, हिंदू संस्कृती, हिंदू राष्ट्र अशी केलेली मागणी पाहून मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी अधिकाअधिक जोर धरू लागली. (आधुनिक भारताचा इतिहास : ग्रोवर, बेलेकर;५०१)

## १.४ द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत आणि पाकिस्तान संकल्पनेचा उदय

### १.४.१. कवी महंमद इक्बाल :

सारे जहासे अच्छा हिंदोस्ता हमारा या गीताचे कवी व राजकीय विचारवंत असलेल्या महंमद इक्बाल हे मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तान मागणीच्या विचाराचे जनक मानले जातात. १९३०च्या मुस्लिम लीगच्या आलाहाबाद अधिवेशनात इक्बाल म्हणाले की, "जर हा सिद्धांत मान्य केल्या जात असेल की, भारतातील जातीय समस्येचे कायम स्वरूपाचे उत्तर भारतीय मुसलमानांना आपला देश भारतात आपली संस्कृती व प्रथा परंपरांचा पूर्ण रूपाने व स्वतंत्रपणे विकास करण्याचा अधिकार देण्यात येत आहे, तर माझी अशी तीव्र इच्छा आहे की पंजाब, वायव्य सीमाप्रांत आणि बलुचिस्तान यांचे एक राज्य निर्माण केले जावे. ब्रिटिश साम्राज्य अंतर्गत अथवा बाहेर. भारताच्या वायव्य सीमेवर एक स्वतंत्र मुस्लीम राज्य निर्माण करणे सध्या त्या प्रदेशातील मुसलमानांचे अंतिम ध्येय आहे."

### १.४.२. रहमत अली:

मुसलमानांसाठी स्वतःचा देश असण्याची कल्पना इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठामध्ये शिकत असलेल्या रहिमत अलीची होय. पंजाब, वायव्य सीमा प्रांत, काश्मीर आणि बलुचिस्तान यांचे मिळून एक स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र व्हावे असा विचार त्याच्या समोर होता आणि त्याने त्याला पाकिस्तान असे नाव दिले होते. पंजाब-P, वायव्य सीमा प्रांत अर्थात अफगाणिस्तान-A, काश्मीर-K आणि सिंध-S बलुचिस्तान- THAN वरील प्रांतांच्या आद्य अक्षरावरून आणि शेवटच्या प्रांताच्या शेवटच्या शब्दावरून त्याने PAKISTHAN हे नाव तयार केले. त्याचे असे स्पष्टीकरण होते की, "हिंदू व मुसलमान मूलतः स्वतंत्र व वेगळ्या जमाती आणि राष्ट्र आहेत. तो लिहितो आमचा धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा, साहित्य, अर्थ पद्धती, वंश नियम, वारसा आणि विवाह पूर्णपणे हिंदूंपेक्षा वेगळे आहे. छोट्या छोट्या गोष्टींमध्येही ते वेगळेपण दिसून येते. आम्ही मुसलमान व हिंदू एकत्र भोजन घेत नाही व परस्पर विवाह संबंध नाही. आमचे राष्ट्रीय रीतीरिवाज, पंचांग, खाणेपिणे, पोशाख सर्व काही वेगळे आहे". (आधुनिक भारत; साहेबराव गाठाळ;२८५)

### १.४.३ मुहम्मद अली जीना:

हिंदू व मुसलमान स्वतंत्र जमाती आहेत अशी स्पष्ट घोषणा जीनाने मुस्लिम लिगच्या १९४०च्या लाहोर अधिवेशनात केली. त्या अधिवेशनात जिना म्हणाले "हिंदू व मुसलमान हे शब्द केवळ धर्म दर्शवीत नाहीत तर स्वतंत्र व वेगळी सामाजिक व्यवस्था दर्शवतात. हिंदू

व मुसलमानांचे एक राष्ट्र बनेल हे केवळ स्वप्नरंजन होय. या दोघांचे धार्मिक तत्त्वज्ञान, सामाजिक रीतीरिवाज, साहित्य सर्व काही वेगळे आहे. अशा दोन जमातींना एका राज्यसूत्रात बांधणे ज्यात एक अल्पसंख्यांक आहे आणि दुसरा बहुसंख्यांक, म्हणजे असंतोष वाढवणे आणि अंती राष्ट्राचा विनाश होय". अशाप्रकारे वरील वैचारिक पार्श्वभूमीच्या आधारे भारताच्या फाळणीची मागणी करताना मुस्लिम लीगने पुढील ठराव संमत केला, "मुस्लिम लीगचे हे अधिवेशन असा दृढ निर्णय घेते की, या देशाची कोणतीही घटनात्मक योजना सफल होणार नाही तसेच मुसलमानांना मान्य होणार नाही जी खालील तत्त्वांवर आधारित नसेल. भौगोलिकदृष्ट्या एकमेकांना लागून असलेल्या प्रदेशांच्या आवश्यक बदलांसह अशाप्रकारे संघटन केल्या जावे जेणेकरून मुस्लीम बहुसंख्याक प्रदेश एकत्र येऊन एक स्वतंत्र सार्वभौम राज्य बनवणे शक्य होईल". मात्र त्या ठरावात प्रदेशांचे विवरण दिले नव्हते. पुढे १९४२ मध्ये जिनांनी कुपलँड यांना दिलेल्या स्पष्टीकरणात असे म्हटले की, "पाकिस्तान एक मुस्लिम राज्य राहील आणि भारताच्या एका बाजूला वायव्य सीमा प्रांत, पंजाब व सिंध असतील आणि दुसऱ्या बाजूला बंगाल". त्यात बलुचिस्तानचा व आसामचा उल्लेख नव्हता तसेच काश्मीर व हैदराबादचे नाव नव्हते. मात्र १२ मार्च १९४६ रोजी मुस्लिम लीगने कॅबिनेट मिशनला दिलेल्या मागणी पत्रात पंजाब, वायव्य सीमा प्रांत, बलुचिस्तान, सिंध, बंगाल आणि आसाम या सहा प्रांतांचा उल्लेख व समावेश केला होता. अशाप्रकारे मुस्लीम लीगच्या १९४०च्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तानची छाया दिसून आली. यानंतरच्या काळात पाकिस्तानची मागणी भारतीय मुसलमानांसाठी कुरानाप्रमाणे श्रद्धेची बाब झाली.

**आपली प्रगती तपासा**

१) द्विराष्ट्रवाद सिद्धांत स्पष्ट करा.

## १.५ भारताच्या स्वातंत्र्याची प्रगती आणि पाकिस्तानची निर्मिती

### १.५.१. काँग्रेसची मंत्रिमंडळे आणि मुस्लीम लीगचा मुक्तिदिन (१९३७ ते ३९):

१९३५च्या कायद्यानुसार पहिल्या निवडणुका १९३७ मध्ये झाल्या. मुस्लिम लीगने त्यात भाग घेऊन काही अंशी यश प्राप्त केले. मुसलमानांसाठी आरक्षित असलेल्या ४८५ जागांपैकी मुस्लिम लीगला फक्त ११० जागा मिळवता आल्या. वायव्य सीमा प्रांत, पंजाब, सिंध, बंगाल सारख्या मुस्लिम बहुल प्रांतातही इतर मुस्लिम पक्षाने लीगला मागे टाकले. काँग्रेसने मुंबई ,मद्रास,संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा व मध्यप्रांतात पूर्ण बहुमत मिळवले आणि वायव्य सीमा प्रांतात सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेस समोर आली. जुलै १९३७ मध्ये काँग्रेसने सरकार बनवण्याचा निर्णय घेतला. मुस्लिम लीगने बंगाल, आसाम आणि पंजाब मध्ये काँग्रेसबरोबर संमिश्रे सरकार बनवण्याची इच्छा प्रगट केली व आशा व्यक्त केले की संयुक्त प्रांत व बिहारमध्ये लीगच्या सदस्यांना मंत्रिमंडळात घेतले जाईल. पण जातीयवादाला विरोध करणाऱ्या काँग्रेसने ही सूचना फेटाळून लावली आणि स्पष्ट केले की मुस्लिम लीगच्या सदस्यांना मंत्री बनवायचे असेल तर त्यांना काँग्रेसच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करावी लागेल. काँग्रेसची ही सूचना त्यांना मान्य होणे शक्यच नव्हते. जीनांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठवून असे म्हटले की, काँग्रेस म्हणजे हिंदू संघटना आहे आणि ती

अल्पसंख्यांकांना चिरडू पाहात आहे. काँग्रेसकडून मुसलमानांसाठी न्यायाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. १९३८ मध्ये मुस्लिम लीगने हिंदू काँग्रेसी प्रांतात मुसलमानांवर होत असलेल्या अन्यायाची व अत्याचाराची चौकशी करण्यासाठी पीरपूरच्या राजाच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त केली. समितीने आपल्या अहवालात मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचाराचा पाढा वाचला. त्यात म्हटले होते, "काँग्रेस व हिंदू महासभेचा उद्देश एक आहे. जरी काँग्रेस स्वतःला जातीवादी मानत नाही आणि काही काँग्रेसी खरोखर राष्ट्रवादी धर्माप्रमाणे आचरण करतात, परंतु अधिकांश काँग्रेसी हिंदू आहेत आणि अनेक शतकांचा मुस्लिम व इंग्रज राजवटीनंतर शुद्ध हिंदू राज्य निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे." सर्वसाधारण मुसलमानी जनमत त्यामुळे वेगळ्या विचारांनी प्रभावित होत होते. म्हणूनच १९३९ मध्ये द्वितीय महायुद्ध सुरू होताच काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले त्यावेळी मुस्लिम लीगने 'मुक्ती दिन' साजरा केला.

### १.५.२ १९४०चा ऑगस्ट प्रस्ताव:

युद्धानंतर ताबडतोब स्वातंत्र्य मिळावे आणि आता अंतरिम राष्ट्रीय सरकारची स्थापना व्हावी तरच युद्धात पूर्ण सहकार्य मिळेल या काँग्रेसच्या मागणीवर व्हाईसराय लीन लिथगोने ऑगस्ट १९४० चा प्रस्ताव ठेवला. ज्यात युद्धानंतर घटना समिती स्थापन करण्याबाबत म्हटले होते; पण त्याचबरोबर अल्पसंख्याकांना आश्वासन देण्यात आले की, 'इंग्रज सरकार कोणत्याही अशा राज्यपद्धतीचे समर्थन करणार नाही ज्यात त्यातील सरकारचा अधिकार देशातील एक प्रमुख जमात मान्य करणार नाही'. या आश्वासनाचे स्वागत करून मुस्लीम लीगने एक ठराव संमत केला जात म्हटले होते, "भारताच्या भावी संविधानाच्या कठीण प्रश्नाचे एकच उत्तर आहे, ते म्हणजे फाळणी."

### १.५.३ १९४२चे क्रिप्स मिशन आणि फुटीर शक्तींना चालना:

मुस्लिम लीगच्या भारताच्या फाळणीच्या मागणीला क्रिप्स योजनेने अधिक चालना दिली. सरकारने जाहीर केलेल्या प्रस्तावात हे स्पष्ट केले की युद्धानंतर बनवल्या गेलेल्या घटनेला खालील अटीवर स्वीकृत केले जाईल.

(१) ब्रिटिश भारतातील कोणताही प्रांत संविधान न स्वीकारता आपली स्थिती कायम ठेवू इच्छित असेल तर त्याला तसे स्वतंत्र आहे आणि कालांतराने इच्छा झाल्यास त्याला भारतीय संघराज्यात विलीन होता येईल.

(२) अशा विलीन होणाऱ्या प्रांतांची इच्छा असल्यास इंग्रज सरकार त्यांच्या करता नव्या संविधानाला मान्यता देईल आणि त्याला भारतीय संघराज्याच्या बरोबरीचा दर्जा असेल.

परंतु यामध्ये पाकिस्तानचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे मुस्लीम लीगने क्रिप्स योजना फेटाळून लावली आणि पाकिस्तानच्या योजनेचा पुनरुच्चार केला.

### **१.५.४. वेव्हेल योजना १९४५ :**

१४ जून १९४५ रोजी भारत सचिव एमरीने कॉमन सभागृहात घोषणा केली की मार्च १९४२चा प्रस्ताव कोणताही बदल न करता कायम आहे आणि मुख्य सेनापती वगळता गव्हर्नर जनरलच्या कौन्सिल सदस्यांची नियुक्ती भारतीय राजकीय नेत्यांमधून केली जाऊ शकते. त्यात हिंदू व मुसलमानांचे समान प्रतिनिधी राहतील. त्यासाठी लॉर्ड वेव्हेलने सिमला येथे जुलै १९४५ मध्ये एक संमेलन बोलवले जेणेकरून काँग्रेस व लीग मधील मतभेद दूर होऊ शकतील. काँग्रेसने आपल्याकडून दोन काँग्रेसी मुसलमान नियुक्त करण्याचा प्रस्ताव ठेवला. पण त्यावर जिनाने अशी भूमिका घेतली की, सर्व मुसलमान सदस्य लिगकडूनच मनोनित केले जावे. अशा प्रकारे गतिरोध निर्माण झाल्याने वेव्हेलने संमेलन समाप्त केले आणि दाखवून दिले की, भारताची घटनात्मक प्रगती रोखण्याचा अधिकार जणूकाही जिनाला आहे.

### **१.५.५. त्रिमंत्री योजना १९४६ :**

१९४५-४६ च्या निवडणुकांमध्ये मुस्लिम लीगने वायव्य सीमा प्रांत वगळता उर्वरित सर्व मुस्लीम बहुसंख्य प्रांतात खूप जास्त जागी विजय संपादन केला. मुस्लिम लीगला मुसलमानांची ७५ टक्के मते मिळाली. सर्व हिंदुबहुल प्रांतात आणि वायव्य सीमा प्रांतात काँग्रेसने मंत्रिमंडळ बनवली तर लीगचे मंत्रिमंडळ बंगाल व सिंधमध्ये आली. पंजाब मध्ये सर्वात मोठा पक्ष मुस्लिम लीग असला तरी मंत्रिमंडळ मात्र युनियनिस्ट पक्षाने इतर पक्षांच्या सहाय्याने बनवले. एकूण चित्र असे होते की, लीग एक मजबूत राजकीय पक्ष आहे.

मार्च १९४६ मध्ये भारत सचिव पेथिक लॉरेन्स, व्यापार मंडळाचा अध्यक्ष स्टेफर्ड क्रिप्स आणि नौदलातील ए. व्ही. अलेक्झांडर यांचा समावेश असले त्रिमंत्री मंडळ भारतात पोहोचले. इंग्लंडचे पंतप्रधान लॉर्ड ॲटलीने हे स्पष्ट केले होते की, अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांच्या प्रगतीतील अडथळा बनू दिला जाणार नाही. म्हणून त्रिमंत्री मंडळाने पाकिस्तानची मागणी नामंजूर करून एक केंद्र सरकार असावे आणि त्याच्या नियंत्रणाखाली संरक्षण, परराष्ट्र संबंध व संचार व्यवस्था असावी अशी सूचना केली. पण त्याचबरोबर लीगची मागणी अंशतः स्वीकारली आणि प्रांतांना तीन भागात वाटण्याची सूचना केली.

- मद्रास, मुंबई, मध्यप्रांत,संयुक्त प्रांत, बिहार व ओरिसा हे हिंदुबहुल प्रांत अ गटात.
- पंजाब, वायव्य सीमा प्रांत आणि सिंध हे मुस्लिम बहुल प्रांत ब गटात
- आणि बंगाल व आसाम क गटात अशी व्यवस्था होती.

प्रांतांना पूर्ण स्वायत्तता देणे आणि गट बनवण्याचे स्वातंत्र्य होते. त्यातून मुस्लिम लीगला पाकिस्तानचे सार मिळाले. याशिवाय या योजनेत घटना समिती निवडण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आणि त्यानुसार झालेल्या निवडणुकीत सर्वसामान्य २१० जागांपैकी १९९ जागा काँग्रेसला मिळाल्या आणि मुसलमानांसाठी असलेल्या ७८ जागांपैकी ७३ जागा मुस्लिम लीगला मिळाल्या. ज्यावेळी वस्तुस्थिती जीनाच्या लक्षात आले की, एकूण २९६ जागांपैकी काँग्रेसला २११ चे समर्थन मिळेल आणि मुस्लीम लीग

अल्पमतात जाईल. त्यावेळी दोन घटना समितीची मागणी पुढे केली एक भारतासाठी व दुसरी पाकिस्तानसाठी.

### १.५.६ प्रत्यक्ष कार्यवाही आणि जातीय दंगली १९४६-४७:

घटना समितीतील अल्पमताला घाबरून त्रिमंत्री योजनेला दिलेली मंजुरी फेटाळून लावत मुस्लीम लीगने १६ ऑगस्ट १९४७ हा प्रत्यक्ष कार्यवाही दिवस म्हणून साजरा केला. यामागील उद्देश पाकिस्तानसाठी इंग्रजांवर नव्हे तर हिंदूंवर दबाव आणणे हा होता. बंगाल, संयुक्तप्रांत, मुंबई, पंजाब आणि सिंध प्रांतात लीगने जातीय दंगली घडवून आणल्या. २ सप्टेंबर १९४६ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार बनवण्यात आले. तो दिवस मुस्लिम लीगने शोकदिन म्हणून पाळला. अंतरिम सरकारमध्ये सामील होण्यास सुरुवातीला लीगने नकार दिला पण नंतर २६ ऑक्टोंबर १९४६ ला सहभागी झाली. त्यामागील हेतू अंतरिम सरकार यशस्वी बनवण्याचा नसून आतून तोडण्याचा होता. तसेच घटना समितीत येण्यासही लीगने नकार दिला.

### १.५.७ पंतप्रधान अँटली यांची घोषणा २० फेब्रुवारी १९४७:

कॉमन सभागृहात केलेल्या एका घोषनेद्वारे पंतप्रधान अँटली यांनी स्पष्ट केले की जून १९४८ पूर्वी सार्वभौम सत्ता भारतीयांकडे सोपवण्याचा सरकारचा निश्चय आहे. जर मुस्लिम लीग सहकार्य देणार नसेल तर ब्रिटिश सरकारला विचार करावा लागेल की," इंग्रज प्रदेशांची केंद्रीय सत्ता ठरवलेल्या तारखेपर्यंत कोणाकडे सोपवायची. संपूर्ण सत्ता कोणत्यातरी केंद्र सरकारकडे किंवा इतर प्रदेशातील प्रांतीय सरकारकडे किंवा इतर मार्ग जो योग्य असेल व भारतीयांचा हिताचा असेल." अशाप्रकारे भारताचे ऐक्य कायम राखण्याचा इंग्रजांच्या मनोवृत्तीत बदल झालेला दिसतो.

### १.५.८ माउंटबॅटन योजना- (३ जून १९४७) व भारताची फाळणी :

१९४८ च्या जूनपूर्वी भारत सोडण्याचा ब्रिटिशांचा निर्धार असल्याचे पंतप्रधान अटली यांनी १९४७च्या फेब्रुवारीत घोषित केले. या घोषणेने उत्तेजित होऊन लीगने प्रत्यक्ष कृतीचा मार्ग स्वीकारला. परिणामतः पंजाबमध्ये भीषण दंगली उसळल्या. त्यामुळे भारतातील सत्तांतराचे कार्य लवकर उरकण्यासाठी ब्रिटिश सरकारने लॉर्ड माउंटबॅटन यांची नवीन व्हाइसरॉय म्हणून नेमणूक केली. ते मार्च महिन्यात भारतात आले. त्यांनी राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांच्या नेत्यांशी देशातील राजकीय पेच प्रसंगाबद्दल प्रदीर्घ वाटाघाटी केल्या. परंतु बॅरिस्टर जीनांना देशाच्या फाळणीच्या विचारापासून परावृत्त करण्यास ते अपयशी ठरले. भारतीय नेत्यांशी झालेल्या वाटाघाटी व देशातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे लॉर्ड माऊंटबॅटन यांनी भारताच्या फाळणीची योजना तयार केली. ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन त्यांनी ३ जून १९४७ रोजी भारताच्या फाळणीची योजना जाहीर केली.

त्यानुसार वायव्य सीमा प्रांतात लोकमताद्वारे भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्यासंबंधी निर्णय घ्यायचा होता. त्याच पद्धतीने आसाम मधील बहुसंख्यांक मुस्लिम सिल्हट जिल्ह्याला निर्णय घ्यायचा होता. मुस्लिमबहुल प्रदेशांचे प्रतिनिधी व इतर प्रदेशांच्या प्रतिनिधींनी आपल्या प्रांतांची फाळणी करायची अथवा नाही हे ठरवायचे होते.

अपेक्षेप्रमाणे या दोन्ही प्रांतांच्या हिंदुबहुल प्रदेशांच्या प्रतिनिधींनी प्रांतांच्या फाळणीच्या बाजूने कौल दिला. पूर्व बंगाल आणि पश्चिम पंजाबने पाकिस्तानात तर पश्चिम बंगाल व पूर्व पंजाब ते भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला. सिल्हट जिल्हा आणि वायव्य सीमा प्रांतातील जनतेने पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला.

मुस्लिम लीगने पंजाब व बंगालच्या फाळणीस मान्यता देऊन माउंटबॅटन योजना स्वीकारली. काँग्रेसच्या नेत्यांना देशाच्या फाळणीची तरतूद असलेली माउंटबॅटन योजना नाईलाजाने स्वीकारावी लागली. त्यांनी सुरुवातीपासूनच स्वातंत्र्याबरोबरच अखंड भारताचे स्वप्न उराशी बाळगले होते. महात्मा गांधींनी पूर्व पाकिस्तानच्या कल्पनेस विरोध करताना म्हटले होते की, “माझ्या मूर्त शरीरावरच पाकिस्तान बनवावा लागेल”. परंतु पाकिस्तानच्या निर्मितीबाबत बॅरिस्टर जीनांनी स्वीकारलेली दुराग्रही भूमिका, देशात भीषण जातीय दंगलीचा भडकलेला वणवा, हंगामी सरकारच्या कामकाजात वारंवार निर्माण होणारे पेच प्रसंग यामुळे महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आदी सभेच्या नेत्यांनी शेवटी निरुपायाने देशाच्या फाळणीस व पाकिस्तानच्या निर्मितीस संमती दिली.

अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्याचा कायदा इंग्लडच्या संसदेत १८ जुलै १९४७ मध्ये संमत करण्यात आला आणि त्याप्रमाणे १४ऑगस्ट १९४७ रोजी सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत , पूर्व बंगाल व पश्चिम पंजाब यांचे मिळून बनलेले पाकिस्तान आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी उर्वरित भारत असे स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र भारतीय उपखंडात उदयास आले.

## १.६ भारताच्या फाळणीला जबाबदार कोण ?

भारताच्या फाळणीला जबाबदार कोण याची निश्चिती करणे अवघड काम आहे. या प्रश्नाचे उत्तर लेखक कोण भारतीय, पाकिस्तानी किंवा इंग्रज यावर अवलंबून आहे. इतिहासकारांनी काँग्रेस, मुस्लिम लिग आणि ब्रिटिश यांना वेगवेगळ्या दृष्टीने जबाबदार ठरवले आहे. भारताची फाळणी इंग्रजांची फोडा आणि राज्य करा नितीचा, तसेच मुस्लिम लीगच्या जातीयवादाचा आणि फुटीरतावादाचा तो एक स्वाभाविक अंतिम परिणाम होता. ह्या दोन्ही प्रवृत्तींनी परस्पर सहकार्याने काम केले व फाळणी स्वीकारण्यास काँग्रेसला बाध्य केले. अनेक लेखक याबाबत काँग्रेसच्या नेत्यांना दोष देतात. त्यांच्या मते काँग्रेसने कणखर भूमिका घेतली असती व मुत्सद्दीपणा दाखवला असता तर फाळणी टळू शकली असती. पाकिस्तानात मात्र फाळणीला तर्कसंगत व आवश्यक मानले जाते. मुस्लिम राष्ट्रवाद भारताच्या इतिहासात अंतर्भूत होता असा त्यांचा युक्तिवाद आहे. अर्थात परिणाम आणि कारणे काही असली तरी परिस्थितीचा अचूक फायदा घेणाऱ्या जिनालाच फाळणीचे श्रेय दिले जाते. जिनाची ताकद दिवसेंदिवस जास्तच वाढत गेली आणि शेवटी त्यांना कायदेआझम असे म्हटले जाऊ लागले. पंडित नेहरूंच्या मते, “मुसलमानांमध्ये मध्यमवर्गाचा उदय उशिरा झाल्याने त्यांच्यात जातीयतेची भावना बळावत गेली आणि संधीचा फायदा घेत लीगने मुसलमानांमध्ये भीतीची भावना निर्माण केली”. इस्लाम खतरें मे है असा नारा देऊन सर्व मुसलमान लीगच्या झेंड्याखाली एकत्र आले आणि जीना त्यांच्याकरिता प्रेषित बनले. त्याचप्रमाणे हिंदू महासभेच्या कार्यामुळे प्रक्षोभ निर्माण झाला असे म्हटले जाते.

भारताच्या फाळणीसाठी सरदार पटेल, पंडित नेहरू आणि राजेंद्र प्रसाद हे सुद्धा जबाबदार आहेत. त्यांनी गांधीजींच्या सहमती शिवाय जीनांच्या पाकिस्तानच्या मागणीला संमती देऊन हिंदू आणि मुस्लिम बहुल प्रांतांमध्ये जनमत घेण्यास मान्यता दिली. अब्दुल कलाम आजाद आणि गांधीजी याचा विरोध करत होते परंतु स्वातंत्र्याची महत्वकांक्षा असलेले नेहरू आणि पटेल यांच्यासाठी गांधींचा आता काही उपयोग नव्हता. अंत: तीन जूनला माऊंटबॅटन यांनी विभाजनाची योजना मांडली आणि गांधीजींनी त्याला सहमती दर्शवली. जून १९४७ मध्ये गोविंद वल्लभ पंत यांनी काँग्रेसमध्ये स्वीकृती प्रस्ताव मांडला. नेहरू आणि सरदार पटेल यांनी याचे समर्थन केले. परंतु आजाद आणि इतर सदस्यांच्या विरोधामुळे मत विभाजन होऊन प्रस्तावाच्या बाजूने २९ व विरोधामध्ये १५ मते पडली. केवळ १४ मतांच्या अंतराने काँग्रेसने भारताच्या विभाजनाचा प्रस्ताव स्वीकार केला.

अशाप्रकारे हे स्पष्ट होते की भारताच्या फाळणीला काँग्रेस, मुस्लिम लिग आणि ब्रिटिश यांची संयुक्त भूमिका राहिलेली दिसून येते. म्हणून फाळणीसाठी कोणा एकावर जबाबदारी टाकता येत नाही.

## १.७ निवडक विचार

**(१) जवाहरलाल नेहरू:**

मला असे वाटते की, हे घटनांचे न टाळता येण्यासारखे दडपण होते आणि ज्या प्रकारे आम्ही जात होतो त्या दलदलीच्या व प्रतिरोधाच्या मार्गातून बाहेर येणे शक्य नव्हते आणि परिस्थिती बिघडतच गेली. याशिवाय असे वाटत होते की संघराज्याच्या घटकांकडे जास्तीत जास्त सत्ता असल्यामुळे स्वातंत्र्य मिळाले तरी भारत एक दुर्बल देश बनेल. तशा विशाल भारतात सतत भांडणे होत राहिली असती आणि विघटनकारी तत्वे कार्यरत राहिली असती. त्याशिवाय आम्हाला नजीकच्या भविष्यकाळात स्वातंत्र्य मिळविण्याचा दुसरा मार्ग दिसत नव्हता. म्हणूनच आम्ही त्याला मान्यता देऊन सुदृढ भारत निर्माण करण्याचे आव्हान केले आणि काही त्यात सामील होऊ इच्छित नाही तर आम्ही त्यांना तसे करण्यास बाध्य करू शकत नव्हतो.

**(२) सरदार वल्लभ भाई पटेल:**

मला असे दिसून आले की भारताची फाळणी आम्ही मान्य केली नसती तर भारत लहान लहान तुकड्यांत विभागला गेला असता आणि पूर्णतः नष्ट झाला असता. माझ्या एका वर्षाच्या अनुभवाने, माझी खात्री होऊन चुकली होती की, आम्ही ज्या मार्गावरून समोर जात होतो तो पूर्णपणे विनाशाचा मार्ग होता. आम्हाला एक नाही तर अनेक पाकिस्तान दिसले असते. आमच्या प्रत्येक कार्यालयात पाकिस्तानी घटक होता.

**(३) सी एच फिलिप्स:**

काँग्रेस आणि मुस्लीम लीग मध्ये वाढत असलेल्या मतभेदांमुळे असा गतिरोध उत्पन्न झाला. तो १९४२ ची क्रिप्स योजना, १९४६ ची त्रिमंत्री योजना अशा स्वरूपाचे इंग्रजांकडून प्रस्ताव येऊनही संपूर्ण युद्ध काळात कायम राहिला. या वेळेपर्यंत जबाबदार सरकार आणि भारताचे एक्य यावर भर देणारे इंग्रज आपले म्हणणे काँग्रेसच्या व मुस्लीम

लीगच्या गळी उतरवण्यात अयशस्वी झाली. भारतीयांना सत्तासंघर्षाची चिंता होती तर मुस्लीम लीग प्रतिनिधिक सरकारच्या परिणामांविषयी चिंतीत होती.आपले लष्करी व नागरी नियंत्रण कमी होत आहे तसेच देशात शांतता व सुव्यवस्थेची स्थिती राहिलेली नाही हे लक्षात येताच इंग्रज सरकारने फेब्रुवारी १९४७ मध्ये अशी घोषणा केली की जून १९४८ च्या पूर्वी सत्तेचे हस्तांतरण केले जाईल. शेवटी स्वातंत्र्य मिळवण्याच्या घाईत भारताची फाळणी झाली.

**(४) ए के जॉन्सन:**

काळाची मर्यादा (जून १९४८ पर्यंत) वास्तविक युद्धाच्या सुरुवातीच्या दिवसात इंग्रजांनी भारतीय मुलकी सेवेत भरती बंद करण्याचा स्वाभाविक परिणाम होता. या सेवेत कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे ११०० पेक्षा जास्त राहत नव्हती. नोव्हेंबर १९४६ पर्यंत फक्त मुख्य ५२० इंग्रज अधिकारी व उरलेले भारतीय अशी स्थिती होती. नोकरशाहीचे कार्य वाढत गेली आणि तुलनेत इंग्रज अधिकारी कमी होत गेल्याने भारतावर प्रशासन करणे १९४९ नंतर शक्य नाही हे स्पष्ट झाले होते. जी गोष्ट दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांना मान्य नाही ते त्यांना स्वीकारण्यास बाध्य करण्यासाठी १९४७ मध्ये पोलिस दलही तेवढे शक्तिशाली नव्हते. तसेच भारतात सत्ता टिकून ठेवण्यास लष्कराचा वापर करायला ब्रिटिश सरकारची मनपूर्वक तयारी नव्हती.

## १.८ सारांश

भारतामध्ये ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करून साम्राज्यवादाचा पाया घातला. हे साम्राज्य स्थिर ठेवण्यासाठी त्यांनी हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये दुही निर्माण करण्याचे निरंतर काम केले. भारतामध्ये जनजागृती होऊन राष्ट्रवादाची पायाभरणी झाल्यानंतर भारतीय जनतेमध्ये जो असंतोष निर्माण झाला होता तो दूर करण्यासाठी भारताला काही संविधानिक सुधारणा देण्याचे ब्रिटिशांनी ठरवले. त्याचाच परिपाक म्हणजे प्रतिनिधिक शासनाची निर्मिती होय. प्रतिनिधिक शासनामध्ये एक व्यक्ती एक मत हे तत्व असल्यामुळे बहुसंख्यांक लोकांचे शासन उभे राहते. याचीच भीती बाळगून मुसलमानांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. त्यांच्या या मागणीला इंग्रज सरकारने लगेच मान्यता देऊन १९०९ च्या कायद्यात तशी तरतूद केली. लोकमान्य टिळकांनीही १९१६च्या लखनऊ कराराच्या निमित्ताने मुसलमानांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्या या मागणीला सहमती दिली. त्यामुळे मुसलमानांमध्ये फुटीरतावादाची पाळेमुळे खोलवर रुजली. कवी इक्बाल आणि रहमत अली यांनी पाकिस्तानच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. जिनांनी याचे समर्थन करून पाकिस्तानची मागणी उचलून धरली. १९३५ च्या कायद्यानुसार झालेल्या निवडणुकांमध्ये लीगला म्हणावे तसे यश मिळाले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने १९३९ मध्ये राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या शासनातून मुक्त झाल्या बद्दल मुक्ती दिवस साजरा केला आणि १९४० च्या लाहोर अधिवेशनामध्ये पाकिस्तानी शिवाय काहीच कमी नाही याचा पुनरुच्चार करून पाकिस्तानची निर्मिती झाल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही असा दृढ निश्चय लीगने केला. दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडामध्ये १९४२ क्रिप्स योजनेमधील तरतुदीनुसार प्रांतांना स्वतंत्र राहण्याचा अधिकार दिला गेला होता, त्यामध्ये पाकिस्तानची

बीजे दिसून येतात.१९४५ मधील वेवेल योजना जीनांच्या दुराग्रही स्वभावामुळे बारगळली. त्यामुळे जीनांना आपण म्हणू तेच ब्रिटिश सरकार आणि काँग्रेस ऐकते असे वाटले. तरीपण १९४६च्या त्रिमंत्री योजनेत पाकिस्तानची मागणी फेटाळून लावत अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांच्या हिताच्या आड येता येणार नाही असे म्हणत पाकिस्तानची मागणी फेटाळून लावली. आपली स्वतंत्र राष्ट्राची मागणी फेटाळल्यामुळे मुस्लिम लीगने चिडून जाऊन जातीय दंगली घडवून आणल्या. ब्रिटिश सरकारने हा हिंसाचार थांबवण्यास असमर्थता दर्शवली. शेवटी नाईलाजाने हा हिंसाचार थांबावा म्हणून काँग्रेसने पाकिस्तानच्या निर्मितीसाठी सहमती दिली.

अशाप्रकारे ब्रिटिशांनी लावलेल्या जातीयवादी विषवृक्षाला मुस्लिम लीगने खतपाणी घालून वाढवले. हा जातीयवाद काँग्रेसला थोपवता न आल्याने शेवटी नाईलाजाने पाकिस्तानच्या निर्मितीला संमती द्यावी लागली. ज्याचे परिणाम आज देखील भारत आणि पाकिस्तान भोगत आहे.

## १.९ प्रश्न

१) भारताच्या फाळणीची सविस्तर पार्श्वभूमी सांगा.

२) द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत स्पष्ट करा.

३) भारतीय स्वातंत्र्य आणि विभाजन याचा सहसंबंध स्पष्ट करा.

४) भारताच्या फाळणीस जबाबदार घटकांची चर्चा करा.

## १.१० संदर्भ

१) ग्रोवर बी एल आणि बेलेकर- आधुनिक भारताचा इतिहास

२) के कृष्ण रेड्डी - भारत का इतिहास

३) बिपिन चंद्र - भारत का स्वतंत्रता संघर्ष

४) सुमित सरकार- भारत का इतिहास

५) बिपिन चंद्र- स्वतंत्रता के बाद भारत

*****

# २

# भारतीय संस्थानांचे विलीनीकरण आणि राज्यांची पुनर्रचना

**घटक रचना**

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रस्तावना

२.३ भारतीय संस्थानांचे विलीनीकरण

  २.३.१ संस्थानांच्या विलीनीकरणाची पार्श्वभूमी

  २.३.२ जुनागड

  २.३.३ हैदराबाद

  २.३.४ काश्मीर

२.४ राज्यांची पुनर्रचना

  २.४.१ राज्य पुनर्रचनेची पार्श्वभूमी

  २.४.२ भाषावार राज्य पुनर्रचना

  २.४.3 दार भाषावार समिती १९४८

  २.४.४ जे व्ही पी समिती १९४८

  २.४.५ आंध्र प्रदेश व तामिळनाडूची निर्मिती १९५३

  २.४.६ राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना १९५३

  २.४.७ राज्य पुनर्रचना कायदा १९५६

  २.४.८ महाराष्ट्र व गुजरातची निर्मिती १९६०

  २.४.९ पंजाब व हरियाणाची निर्मिती १९६६

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.७ संदर्भ

## २.१ उद्दिष्ट्ये

१) संस्थानांचे एकीकरण का आवश्यक होते याचा अभ्यास करणे.

२) प्रमुख संस्थानांच्या विलीनीकरणाचा अभ्यास करणे.

३) विलीनीकरणानंतर राज्यांच्या पुनर्रचनेची पार्श्वभूमी समजून घेणे.

४) पुनर्रचनेची आवश्यकता का होती याचा मागोवा घेणे.

५) विविध राज्यांच्या निर्मितीचा आढावा घेणे.

## २.२ प्रस्तावना

१७५७च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळवून भारतामध्ये ब्रिटिश सत्तेचा पाया घातला गेला. यावेळी भारतावर कोणत्याही राजकीय सत्तेचा एकछत्री अंमल नव्हता. म्हणून ब्रिटिशांनी जसे जसे प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणले तसे तसे त्यांची प्रशासन व्यवस्था उभी केली. त्यातील काही भागावर ब्रिटिशांची प्रत्यक्ष सत्ता होती तर काही भागांवर त्यांचे मांडलिकत्व पत्करलेल्या भारतीय राजांची सत्ता होती. यालाच संस्थाने म्हंटली जातात. या संस्थानांशी ब्रिटिशांनी करार करून त्यांना अंतर्गत स्वायत्तता दिली होती. मात्र परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण व्यवस्था ब्रिटिशांच्या हाती होती. अशा या संस्थांनांची संख्या भारतामध्ये सुमारे ५६२ होती. (आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर, बेलेकर:६५२) ही संस्थाने ब्रिटिशांची एकनिष्ठ होती आणि भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळीस सुरुवात झाल्यानंतर भारतीय जनतेच्या असंतोषाला अटकाव करण्यासाठी त्यांनी आघात प्रतिबंधक म्हणून कार्य केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीस यश येऊन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला व ब्रिटिश सत्ता भारतातून नष्ट झाली. त्यामुळे आपोआपच या देशी संस्थानावरील ब्रिटिशांची सर्वोच्च सत्ता आपोआपच समाप्त झाली. भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यामध्ये या संस्थांनाना स्वतंत्र राहण्याचा किंवा भारत किंवा पाकिस्तान या मधून कोणत्याही देशात विलीन होण्याचा अधिकार देण्यात आला. भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांचे सचिव मेनन यांच्या साह्याने या ५६२ संस्थानांपैकी जुनागड, हैदराबाद आणि काश्मीर ही संस्थाने वगळता १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी बाकी संस्थानांना भारतात विलीन करण्यास यश मिळवले आणि स्वातंत्र्यानंतर जुनागड, काश्मीर आणि हैदराबाद यांना लष्करी बळावर भारतात सामील करून घेण्यात आले.

या संस्थानांना विलीन करून घेताना कोणताही स्पष्ट नियम न लावता आजूबाजूच्या इतर राज्यांमध्ये किंवा स्वतंत्रपणे त्यांची रचना करण्यात आले. परंतु स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा समोर आला. त्याचे पहिले यश म्हणजे तेलगू भाषिक आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती होय. यानंतर भाषावार प्रांतरचनेची चळवळ उभी राहून भारत सरकारला भाषावार प्रांतरचनेसाठी आयोग नेमावा लागला. या आयोगाच्या अहवालाच्या आधारे भाषावार प्रांतरचनेला संमती दिली व भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात येऊ लागली.

त्यातूनच महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, हरियाणा अशा राज्यांची निर्मिती झाली आणि आजही या मागणीमध्ये खंड पडलेला दिसून येत नाही.

## २.३ भारतीय संस्थानांचे विलीनीकरण

### २.३.१ संस्थानांच्या विलीनीकरणाची पार्श्वभूमी:

इसवी सन १७५७ मधील प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. त्यावेळी भारतामध्ये कोणतीही एक संघ सत्ता नव्हती लहान मोठ्या राजकीय सत्तांमध्ये भारत देश विभागलेला होता. त्यामुळे ब्रिटिशांनी जसे जसे प्रदेश आपल्या ताब्यात घेतले तस-तशी आपल्या सोयीच्या दृष्टीने प्रशासन व्यवस्था उभी केली. त्याला कोणताही शास्त्रीय आधार नव्हता. त्यांनी काही भागावर आपले प्रत्यक्ष शासन स्थापित केले तर काही भागांवर भारतीय राज्यांची मांडलिक असलेली राज्य होती. त्यांनाच आपण संस्थाने म्हणतो. अशा संस्थानांची संख्या भारतामध्ये सुमारे ५६२ इतकी होती आणि त्यांनी एकूण ७,१२,५०८ चौरस मैल भूभाग व्यापला होता. त्यात काही मोठी राज्य होती तर काही अगदी लहान होती. हैदराबादचे राज्य इटली इतके मोठे होते व त्याची लोकसंख्या १ कोटी ४० लाख होती तर उत्पन्न साडेआठ कोटी रुपये होते. दुसऱ्या बाजूला बिलबारीचे राज्य होते ज्याची लोकसंख्या केवळ सत्तावीस होती व वार्षिक उत्पन्न आठ रुपये होते १९४१ मधील अंदाजाप्रमाणे दहा चौरस मैलांपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेली २०२ राज्य, पाच चौरस मैलां पेक्षा कमी क्षेत्रफळाची १३९ राज्य तर एक चौरस मैलांपेक्षा जास्त क्षेत्रफळ नसलेली ७० राज्य होती .बहुसंख्य राज्य भारताच्या कमी उपजाऊ प्रदेशात व दुर्गम भागात होती. कंपनीने भारतात विजय कार्य करतांना सागरी किनाऱ्यावरील महत्त्वाचे प्रदेश, समुद्रमार्गाने सहज आवागमन करता येतील अशी मोठमोठ्या नद्यांची सुपीक खोरी व श्रीमंत प्रदेश यावर जास्त लक्ष केंद्रित केले होते. (आधुनिक भारताचा इतिहास: ग्रोवर, बेलेकर ; २९४)

या राज्यांप्रती ब्रिटिशांची नीती काळानुरूप बदलत गेली. ब्रिटिश कालखंडात दत्तक वारस नामंजूर तसेच कुप्रशासनाच्या नावाखाली सातारा, झांसी, नागपूर, अवध यासारख्या अनेक संस्थानांचे विलीनीकरण करण्यात आले. परंतु १८५७च्या उठावा पासून धडा घेऊन ब्रिटिशांनी या राज्यांच्या बाबतीत मैत्रीपूर्ण धोरण अवलंबले आणि या राज्यांनीही ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहून भारतीयांच्या राजकीय असंतोषा विरुद्ध संरक्षणात्मक भिंतीचे कार्य केले. भारतामध्ये राष्ट्रीय चळवळीचा उदय झाल्यानंतर त्याचा प्रभाव संस्थानातील प्रजेवर पडणे स्वाभाविक होते. त्यातूनच या संस्थानांमध्ये प्रजा परिषदांची स्थापना होऊन राजांच्या अन्यायी आणि सरंजामशाही शासनाविरुद्ध आवाज उठवण्यास प्रारंभ झाला व ही चळवळ राष्ट्रीय चळवळीशी जोडली गेली. ३ डिसेंबर १९३८ रोजी महात्मा गांधींनी घोषणा केली की, "राज्यांमध्ये निर्माण झालेली जागृती म्हणजे काळाची मागणी आहे आणि पूर्णपणे जबाबदार शासनात राज्यांनी स्वतःचे अस्तित्व गमावणे निश्चित ठरले आहे, यात कोणताही अन्य मार्ग असू शकत नाही". (आधुनिक भारताचा इतिहास: ग्रोवर, बेलेकर; ३०२)

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतातील राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला. ब्रिटिशांबरोबर काँग्रेसने असहकार्याचे धोरण अवलंबिले. म्हणून भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी ब्रिटिश सरकारने अनेक प्रयत्न केले. क्रिप्स मिशन -१९४२, वेवेल योजना

-१९४५, त्रिमंत्री योजना-१९४६ आणि प्रधानमंत्री ॲटली यांची घोषणा २० फेब्रुवारी १९४७ म्हणजे या प्रयत्नांचा एक भाग होता. वरील सर्वच प्रस्तावामध्ये भारतीय राज्यांबाबत विचार करण्यात आला होता. क्रिप्स मंडळाच्या योजनेत राज्यांची सर्वोच्च सत्ता दुसऱ्या कोणाकडे सोपविण्याचा प्रस्ताव नव्हता. स्वतः राज्यांनीही आपला सार्वभौम सत्ता असलेला वेगळा संघ जो भारतात तिसरी शक्ती म्हणून काम करू शकेल बनवण्यावर विचार केला होता. नरेंद्र मंडळाचा चांसलर असलेल्या भोपाळच्या नवाबाने अशी अपेक्षा व्यक्त केली की, "भारतीय राज्यांना अनाथ बनवून इंग्रज जाणार नाहीत व हा प्रश्न जातीय आधारावर सोडवण्याचा प्रयत्न करतील". परंतु २० फेब्रुवारीच्या ॲटलीची घोषणेत व ३ जूनच्या लॉर्ड माऊंटबॅटनच्या योजनेत स्पष्ट केले की, भारतीय राजांवरील ब्रिटिशांची सर्वोच्च सत्ता समाप्त होईल आणि भारतीय राज्यांना पाकिस्तानात वा भारतात सामील होण्याचे स्वातंत्र्य असेल. माउंटबॅटनने राज्याला किंवा राज्यांच्या संघाला स्वतंत्र प्रदेश म्हणून राहण्यास मान्यता दिली नाही.

हंगामी सरकारमध्ये संस्थानासंबंधीचे खास खाते निर्माण करून त्याची जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेलांकडे देण्यात आली आणि त्यांच्या मदतीला सचिव म्हणून वी. पी. मेनन यांची नियुक्ती केली. विलीनीकरणासाठी राजांची मान्यता मिळवणे अतिशय बिकट असल्याची पूर्ण जाणीव पटेलांना होती. याबाबतीत राजांवर अवास्तव्य दडपण आणल्यास संस्थानात नव्या जटिल समस्या असंतुष्ट संस्थानिक उभ्या करतील हे ते जाणून होते. म्हणून त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे दडपण न आणता, संस्थानी प्रजेवरील त्यांचे अधिकार त्यांनी भारत सरकारच्या हाती स्वखुशीने सोपवून देणे त्यांच्या हिताचे ठरेल, असे केल्यास प्रशासकीय जबाबदारीतून ते मुक्त होतील, प्रजेच्या रोषाला त्यांना तोंड द्यावे लागणार नाही आणि त्यांच्या संपत्तीचा शांततेने उपभोग घेण्यास ते मोकळे होतील, हे संस्थानिकांच्या मनावर ठसवण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. अल्पावधीतच सरदार पटेलांच्या मुत्सद्देगिरीला यश आले आणि विलिनीकरणास संस्थानिकांनी मान्यता दिली. परंतु जुनागड, हैदराबाद व काश्मीरच्या संस्थानिकांनी उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण भारत सरकारला करावे लागले. वरील तीन संस्थानांपैकी जुनागड व हैदराबाद येथील गुंता सरदार पटेलांनी बळाचा सोडविला. मात्र काश्मीरचा प्रश्न गुंतागुंतीचा होऊन बसला तो अद्यापही सुटलेला नाही.

### २.३.२ जुनागड:

ज्या दिवशी भारत स्वतंत्र झाला त्याच दिवशी जुनागड संस्थानाच्या नवाब महाबतखानाने जुनागड पाकिस्तानात सामील झाल्याची जाहीर घोषणा केली. केवळ भौगोलिक दृष्ट्या नव्हे तर आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या जुनागड हा काठीयावाडचा अविभाज्य घटक होता. या संस्थानातील एकूण प्रजेपैकी २० टक्के मुसलमान तर ८० टक्के हिंदू होते. जुनागडचा नवाब इस्लाम धर्मीय होता आणि अतिशय चैनी विलासी होता. त्याने सुमारे ८०० कुत्री पाळली होती आणि या कुत्र्यांवर तो दरमहा १६ हजार रुपये खर्च करी. या नवाबाचे वर्णन हॉडसन या इतिहासकाराने 'द ग्रेट डिव्हाइड' या आपल्या ग्रंथात 'पत्यातला जोकर' असे केलेले आहे. (आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००; शांता कोठेकर, २३८) जुनागडचा नवाब मुसलमान असल्यामुळे त्याला पाकिस्तान मध्ये ओढण्याचा जीनांचा प्रयत्न होता. जीनांनी त्याच्यावरील दडपण वाढवून त्याला मदतीची भरघोस आश्वासने

दिली. मे १९४७ मध्ये त्याने शहानवाज भुत्तो या मुस्लीम लीगच्या सदस्याची जुनागडच्या दिवान पदी नियुक्ती केली आणि भुत्तो मार्फत जिना जुनागड मधील सूत्रे हलवू लागले. भारतामध्ये सामीलीकरणाचे  करारपत्र महाबतखानाकडे स्वाक्षरीसाठी धाडण्यात आले असता भुत्तोच्या सल्ल्यानुसार सामीलीकरणाबाबत अजून आपण कोणताही निर्णय घेतलेला नाही असे त्याने १३ ऑगस्ट १९४७ ला सरदार पटेल यांना कळवले आणि त्यानंतर दोनच दिवसांनी भारताच्या स्वातंत्र्यदिनी पाकिस्तानात सामील झाल्याची घोषणा महाबतखानाने करून टाकली. जुनागडच्या विशिष्ट भौगोलिक स्थितीमुळे महाबतखानाचा हा निर्णय काठीयावाडाच्या ऐक्याला धोका निर्माण करणारा होता. त्यामुळे भारत सरकार अस्वस्थ झाले. त्याचबरोबर काठीयावाडातील सर्व नरेषांनी त्याला प्रखरपणे विरोध केला. भारत सरकारने पाकिस्तानशी या बाबत पत्रव्यवहार केला. तेव्हा १३ सप्टेंबर १९४७ला जुनागड पाकिस्तानात सामील करून घेत असल्याचे व पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घेण्याचा नवाबालाला अधिकार असल्याचे पाकिस्तानने ठामपणे भारत सरकारला कळवले. भारत सरकार पाकिस्तानशी याबाबत पत्रव्यवहार करीत असतानाच जुनागडच्या नवाब प्रजेवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार करू लागला. अत्याचार करून संस्थानातील हिंदू प्रजेला आपली घरेदारे सोडून जाण्यास भाग पाडायचे आणि इतर मुसलमानांना जुनागड मध्ये येण्यास प्रोत्साहन द्यायचे असा जुनागडच्या दिवानाचा डाव होता व त्यामागे पाकिस्तान सरकारची चिथावणी होती. संस्थानातील अत्याचारामुळे त्रस्त झालेली हिंदू जनता नजीकच्या संस्थानात आश्रय घेऊ लागली. हिंदू निर्वासितांचा हा लोंढा पाहून नवानगरच्या नरेशने भारत सरकारकडे तातडीचा खलिता पाठवून जुनागड मधील समस्येची अविलंब दखल घ्यावी व तेथील हिंदू प्रजेच्या रक्षणार्थ योग्य ती कार्यवाही तातडीने करावी अशी विनंती केली.

जुनागड नवाबाच्या पाकिस्तानमध्ये सामील झाल्याच्या घोषणेमुळे काठीयावाडातील प्रजामंडळाचे नेते संतप्त झाले. नवाबावर दडपण आणून त्याला त्याचा निर्णय रद्द करण्यास भाग पाडावे या हेतूने गांधीजींचा पुतण्या समळदास गांधी यांच्या नेतृत्वाखाली काठीयावाड जनता आघाडी तयार करण्यात आली. काँग्रेसचा त्याला पाठिंबा होता. जुनागड नरेशच्या अत्याचाराला कंटाळलेल्या हिंदू प्रजेने काठीयावाड जनता आघाडीचे स्वागत केले. काठीयावाड प्रजा परिषदेचे नेते बलवंतराय मेहता, रसिक भाई पारेख आणि समळदास यांनी मुंबईला व्ही. पी. मेनन यांची भेट घेतली आणि भारत सरकारने जुनागड विरुद्ध कारवाई न केल्यास काठीयावाडातील लोक कायदा आपल्या हातात घेतील असे त्यांना निक्षून सांगितले. त्याचबरोबर समळदास यांच्या नेतृत्वाखाली जुनागडचे हंगामी सरकार स्थापन झाल्याची घोषणा ही २५ सप्टेंबर १९४७ रोजी करण्यात आली.

अशाप्रकारे काठीयावाडातील  परिस्थिती अतिशय स्फोटक बनत असल्याचे पाहून जुनागड बाबत विचार विनिमय करण्यासाठी भारताच्या मंत्रिमंडळाची बैठक १७ सप्टेंबरला झाली. या बैठकीला लॉर्ड माऊंटबॅटन उपस्थित होते. जुनागडमध्ये प्रतिकार करण्यासाठी भारतीय लष्कर पाठवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने एकमुखाने घेतला. माऊंटबॅटन यांना हा निर्णय पसंत नव्हता. परंतु नेहरू व पटेल यांच्या निर्णायक भूमिकेमुळे माऊंटबॅटन यांना गप्प बसावे लागले. लष्करी कारवाईचा निर्णय घेतल्यानंतरही वाटाघाटीचा अखेरचा प्रयत्न भारत सरकारने करून पहिला. त्यासाठी बोलणी करण्यासाठी व्ही पी मेनन यांना रवाना केले गेले. पाकिस्तानला कडक शब्दात खलिता पाठवला गेला. हे दोन्ही मार्ग निष्फळ ठरताच

जुनागडच्या सीमेलगत उभे असलेले भारतीय लष्कर जुनागड मध्ये शिरले. भारतीय लष्कर पाहून भुत्तोंनी तातडीने पाकिस्तानकडे लष्करी मदतीची मागणी केली परंतु अपेक्षित मदत मिळाली नाही. तेव्हा प्रक्षुब्ध जनतेला आणि भारतीय लष्कराला तोंड देणे अशक्य असल्याचे ओळखून भारतीय फौजा जुनागडच्या सीमित शिरण्यापूर्वीच नवाबाने ऑक्टोंबर १९४७ च्या अखेरीस कराचीला पलायन केले. नवाबा विरुद्धच्या उठावात काही मुसलमानही सामील झालेले पाहून जुनागड ताब्यात ठेवणे आपल्याला शक्य नसल्याचे भूतो यांनी जिनांना कळवले आणि जुनागडचा ताबा विभागीय आयुक्तांच्या हाती सोपवून ८ नोव्हेंबर १९४७ ला भुत्तोही कराचीला निघून गेले. जुनागड भागात स्थिरस्थावर होताच जुनागडच्या सामीलीकरणाबाबत तेथील प्रजेचा कौल घेण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. त्याप्रमाणे फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागड मध्ये सार्वमत घेण्यात आले. जुनागड मधील सुमारे दोन लाख मतदारांनी पैकी केवळ ९१ मते पाकिस्तानच्या बाजूने पडली. हा प्रचंड अनुकूल कौल मिळताच जुनागडचे सामीलीकरण भारतात केले गेले. (आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२००० ; शांता कोठेकर, २४०)

### २.३.३ हैदराबादः

#### १) हैदराबाद संस्थानाचे स्वरूपः

मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैदराबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसलेले होते. भारतातील मोठ्या संस्थानांपैकी हैदराबाद एक होते. हैदराबादच्या प्रजेपैकी सुमारे ८५ टक्के लोक हिंदू व जेमतेम पंधरा टक्के मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय करीत असे. नागरिकांना मूलभूत अधिकार तर नव्हतेच पण त्याचबरोबर शासकीय सेवेत अतिशय पक्षपात होता. मुलकी शासनात सुमारे ७५ टक्के तर लष्कर व पोलीस दलात ९०टक्के भरती मुसलमानांची असे. बहुसंख्य प्रजा हिंदू असूनही उर्दू भाषा त्यांच्यावर लादली गेली होती. १९११ साली मीर उस्मान अली खान निजाम सत्तेवर आला. तरी हिंदु प्रजेवरील अत्याचारात खंड पडला नाही. हैदराबाद मधील हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोषक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. निजामाचे रोजचे उत्पन्न चार लक्ष रुपये असूनही प्रजा कल्याणासाठी म्हणावा तसा तो उपयोग करत नसे. १९२० नंतर हैदराबाद मधील हिंदू प्रजेच्या प्रबोधनाचे कार्य आर्यसमाजाने हाती घेतले. १९३६ मध्ये मराठवाड्यात स्थापन झालेल्या महाराष्ट्र परिषदेने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची मागणी केली. राजकीय अधिकार मिळवण्यासाठी संघटीत लढा देण्याच्या हेतूने १९३८ साली हैदराबाद स्टेट काँग्रेस नावाची संघटना स्थापन झाली. गोविंदराव नानल या संघटनेच्या अध्यक्षपदी होते. स्वामी रामानंद तीर्थ यांचे प्रभावी नेतृत्व या सुमारास पुढे आले. या संघटनेच्या स्थापनेमागे राष्ट्रीय काँग्रेसची प्रेरणा होती. हैदराबाद स्टेट काँग्रेसचे नेते राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांशी सतत संपर्क साधून होते. भारतात सत्तेच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू होताच हैदराबादनेही भारतात सामील व्हावे ही मागणी हैदराबाद स्टेट काँग्रेस करू लागली. परंतु लोकमताचा हा कौल निजामाला मंजूर नव्हता.

## २) जैसे थे करार:

भारतावरील ब्रिटिश सत्ता संपुष्टात येताच हैदराबादला स्वतंत्र व सार्वभौम राज्याचा दर्जा मिळवून घेण्याचा आणि ब्रिटिश राष्ट्रकुलाचे सदस्यत्व मिळवण्याचा त्याचा मानस होता. म्हणून घटना समितीत सहभागी होण्यास त्याने नकार दिला. तसेच सामीलीकरण्याच्या करारपत्रावरही स्वाक्षरी करण्याचे त्याने नाकारले. ११ जुलै १९४७ रोजी हंगामी सरकारशी वाटाघाटी करण्यासाठी एक शिष्टमंडळ त्याने दिल्लीला रवाना केले. हैदराबादला स्वायत्त राज्य म्हणुन मान्यता मिळावी आणि भारतात कींवा पाकिस्तानात सामील न होता भारताशी जैसे थे करार करण्याची परवानगी दिली जावी अशी मागणी त्याने हंगामी सरकारपुढे ठेवली. हंगामी सरकार ही मागणी मंजूर करणे अशक्य होते. १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत सामीलीकरणाबाबत त्याने मौन पाळले आणि सप्टेंबरमध्ये निजामाने एक नवी मागणी भारत सरकार पुढे मांडली. हैदराबादला भारतात सामील करण्याचा आग्रह भारत सरकारने न धरता हैदराबादला सहवर्ती राज्याचा दर्जा द्यावा व परदेशात वकील नेमण्याचा अधिकार मान्य करावा. या बदल्यात निजाम हा भारत सरकारशी जैसे थे करार करून रेल्वे, पोस्ट व दळणवळण या बाबतचे भारत सरकारचे सर्व नियम पाळेल व भारताच्या मदतीसाठी वेळ पडल्यास आपले लष्कर पाठवेल ही नवी योजना निजामाने मांडली. निजामाच्या मागण्या मंजूर करण्याचे सरदार पटेल यांची तयारी नव्हती. तरीही बऱ्याच उहापोहा नंतर निजामाच्या मागण्यांच्या अनुरोधाने कराराचा एक मसुदा तयार करण्यात आला आणि त्या कराराला निजामाची संमती मिळवण्यासाठी शिष्टमंडळ २२ सप्टेंबरला हैदराबादला रवाना झाले. कराराचा मसुदा निजामाला बऱ्याच अंशी अनुकूल असूनही निजामाने त्यावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ केली आणि ज्या दिवशी कराराचा मसुदा घेऊन हैदराबादचे शिष्टमंडळ दिल्लीला परत जाणार होते त्या दिवशी पहाटे तीन वाजता इत्तेहाद नावाच्या कट्टर धर्मनिष्ठ मुस्लिम संघटनेचा नेता कासीम रझवी व त्याच्या सुमारे ३० हजार अनुयायांनी दिल्लीला जाणाऱ्या शिष्टमंडळातील प्रत्येक सदस्याच्या घराला वेढा घातला आणि हैदराबाद भारतात सामील करण्यात येऊ नये अशी मागणी केली. निजामने करार अमान्य करू नये असा सल्ला निजामाच्या प्रधानमंत्री यांनी देऊनही निजामाने रजवीच्या दडपणाखाली येऊन करार अमान्य केला. इतकेच नाही तर आपल्या सर्व अटी मान्य न झाल्यास आपण पाकिस्तानात सामील होऊ अशी धमकी दिली. मात्र त्याच वेळी पुन्हा वाटाघाटी करण्यासाठी दुसरे शिष्टमंडळ दिल्लीला पाठवले या शिष्टमंडळाबरोबर कासिम रजवीला सरदार पटेलांनी भेटीसाठी बोलावले. त्यावेळी त्यांने अत्यंत उद्दाम व आक्रमक पवित्रा घेऊन ; " हैदराबाद हे इस्लामिक राज्य आहे. त्याच्या स्वातंत्र्यावर भारत सरकारने अतिक्रमण केल्यास हैदराबादमधीलच नाही तर, संपूर्ण भारतातील मुसलमान सशस्त्र उठाव केल्याशिवाय राहणार नाहीत. मुसलमान हा प्रथम एक योद्धा असतो आणि आपला निश्चय पूर्ण झाल्याशिवाय तो आपली तलवार म्यान करत नाही. हैदराबाद वर आक्रमण झाल्यास संस्थानातील एकही हिंदु जिवंत राहणार नाही, अशा धमक्या दिल्या". (आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००; शांता कोठेकर, २४२) याच सुमारास हैदराबाद संस्थानातील हिंदूंवर रझाकारांनी अत्याचार करण्यास प्रारंभ केला.

अशाप्रकारे हैदराबाद मधील परिस्थिती चिघळत असताना २९ नोव्हेंबर १९४७ रोजी निजामाशी एक वर्ष मुदतीचा जैसे थे करार भारत सरकारने केला. या काळात हैदराबाद व भारत सरकार यांचे परस्पर संबंध पूर्वीच्या निजाम-ब्रिटिश संबंधा सारखे राहावेत, दोन्ही

पक्षांनी एकमेकांजवळ राजदूत ठेवावेत आणि दोघात असणारे विवाद्य प्रश्न लवादा मार्फत सोडवले जावेत अशा या करारातील तरतुदी होत्या. या करारामुळे स्वायत्त राज्याचा दर्जा बऱ्याच अंशी हैदराबादला मिळणार असल्यामुळे तो करार सरदार पटेल यांना पसंत नव्हता. परंतु लॉर्ड माउंटबॅटन यांनी घोळ घातल्यामुळे त्यांनी तो नाईलाजाने मंजूर केला.

जैसे थे हा करार भारत सरकारला मान्य करण्यास भाग पाडून आपण एक लढाई जिंकली आहे असे निजामाची कल्पना झाली. जैसे थे कराराच्या कालावधीत हर प्रयत्नाने आपले सामर्थ्य वाढवून हा करार आपण धुडकावून लावू आणि हैदराबादवरच नव्हे तर दिल्लीवर आपला ध्वज फडकावून अशा स्वरूपाच्या मुस्लीम मने उद्दीपित करणारा प्रक्षोभक प्रचार यावेळी कासिम रझवी करू लागला. जानेवारी ते ऑगस्ट १९४८ या काळात रजाकारांची संख्या तिपटी पेक्षाही जास्त वाढली. हिंदूंवरील रझाकारांच्या पाशवी अत्याचाराला उत आला. लुटालूट जाळपोळ, हिंसक हल्ले यांचे साम्राज्य हैदराबाद संस्थानात पसरले. रझाकारांच्या राक्षशी अत्याचारातून स्त्रिया व मुलेही सुटली नाहीत. हिंदूंची सुरक्षितता धोक्यात आल्यामुळे शेकडो हिंदू कुटुंबे घरादारावर तुळशीपत्र ठेवून संस्थाना बाहेर पडू लागली आणि हैदराबादचे शासन जणू रझाकारांच्या हाती आले.

दरम्यान निजामाने आपले लष्करी सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला. इराक,इराण व पाकिस्तान कडून शस्त्रास्त्रे मिळवू लागला. वायुदल बलशाली करण्यास त्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांची मदत घेतली. बॉम्बफेकी विमाने खरेदी करण्यासाठी ब्रिटिश कंपनीशी पत्रव्यवहार केला. कर्नल जॉन कॉब या अमेरिकेतील वायुदल अधिकाऱ्याला हाताशी धरून अमेरिकेकडून अत्याधुनिक शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी त्याची खटपट चालू होती. पाकिस्तानच्या मदतीवर तर त्याची सर्व भिस्त होती. जीना देखील निजामाला पाकिस्तानमध्ये सामील होण्यास उत्तेजन देत होते. एवढेच नाही तर पाकिस्तान व हैद्राबाद यांना जोडणारी एक भूपट्टी आपल्या प्रदेशातून पाकिस्तानला द्यावी अशी मागणी करण्याचे धारिष्ट्य ही ते करीत होते. हैदराबादचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोपवावा असाही प्रयत्न निजामाचे अमेरिकेतील हीतसंबंधी करू लागले. संयुक्त राष्ट्र संघातील अमेरिकन प्रतिनिधीने हैदराबादचा प्रश्न तेथे उपस्थित करण्याची तयारीही दर्शवली. असे करून भारताच्या अंतर्गत समस्येला आंतरराष्ट्रीय आयाम देण्याचा व भारतावर बड्या राष्ट्रांचे दडपण आणण्याचा साम्राज्यवादी शक्तींच्या डाव होता.

### ३) पोलीस कार्यवाहीचा निर्णय:

हैदराबाद संस्थानातील हिंदु प्रजे वरील अमानुष अत्याचाराच्या आणि निजाम परकीय सत्तांशी संपर्क साधीत असल्याच्या बातम्या हैदराबाद मधील भारताचे राजदूत कन्हैयालाल मुन्शी यांच्याकडून भारत सरकारकडे येत होत्या. हैदराबाद मधील आत्याचाराच्या बातम्याने भारतातील लोकमत प्रक्षुब्ध होत होते. भारत सरकारने हैदराबाद विरुद्ध कार्यवाही करून तेथील बेबंदशाहीला आळा घालावा अशी मागणी अनेक भारतीय नेते करू लागले. अशातच मे १९४८ मध्ये निजामाने दोन आदेश काढून हैदराबाद मधून भारताला होणाऱ्या मौल्यवान धातूंची निर्यात बंद केली आणि भारत सरकारचे चलन हैदराबाद संस्थानात अवैध ठरवले. यामुळे भारत सरकार विलक्षण अस्वस्थ झाले. या सुमारास २१ जून १९४८ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन मायदेशी परतल्यामुळे पटेलांचे हात मोकळे झाले.

त्यानंतरच्या दोन महिन्यात रझाकारांचे अत्याचार बेसुमार वाढले. २९ ऑगस्ट १९४८ रोजी माऊंटबॅटन यांना लिहिलेल्या पत्रात नेहरु म्हणतात; “हैदराबाद विरुद्ध कारवाई न करण्याचा मी आजपर्यंत आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यामुळे माझ्या निकटच्या लोकांच्या मनात माझ्याविषयी अविश्वास निर्माण होऊ लागला आहे. हैदराबाद विरुद्ध बळाचा वापर केल्या शिवाय हा प्रश्न निकालात निघणार नाही अशी माझी आता पक्की खात्री झाली आहे आणि लष्करी कारवाई करायची तर त्यात विलंब करण्यात अर्थ नाही असेही माझे स्पष्ट मत बनले आहे.” सरदार पटेलांनीही १५ जुलै रोजी केलेल्या एका जाहीर भाषणात हैदराबाद विरुद्ध सशस्त्र बळाचा वापर करण्याचा मानस बोलून दाखवला. “हैदराबाद मधील परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर जुनागड सारखीच हैदराबादची स्थिती होईल आणि ज्या परकीय मदतीवर हैदराबाद विसंबून आहे त्या मदतीचा त्यावेळी यित्किंचितही उपयोग होणार नाही”. असा गंभीर इशारा हि त्यांनी निजामाला दिला. निजामाला वठणीवर आणण्याच्या हेतूने भारत सरकारने प्रथम हैदराबादची आर्थिक नाकेबंदी केली परंतु हाही मार्ग अयशस्वी झाल्याचे पाहून मंत्रिमंडळाने अखेर लष्करी कारवाईचा निर्णय ९ सप्टेंबर १९४८ रोजी घेतला. या निर्णयाची माहिती घटना समितीला देताना पटेल म्हणाले, “हैदराबाद आणि भारत यांचा प्रादेशीक दृष्ट्या अतुट संबंध असल्यामुळे हैदराबादचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणे भारताला शक्य नाही. तसेच तेथील प्रजेवर सतत होत असलेल्या अमानुष अत्याचार निष्क्रियपणे पाहात बसणे भारत सरकारला शक्य नाही. लष्कर पाठविण्यामागे हैदराबादवर सामीलीकरणाबाबत दडपण आणण्याचा भारताचा हेतू नसून केवळ जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात येत आहे हे त्यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे निजामाला पूर्वसूचनाही देण्यात आली.

**४) ऑपरेशन पोलो:**

निजामाकडून झालेला करार भंग, रझाकारांनी सुरू केलेला रक्तपात,त्यांचे लूटमाराचे सत्र, निजामी फौजेचे उपद्व्याप आणि हैदराबाद संस्थानातील उग्र होत जाणाऱ्या स्वातंत्र्यलढ्याचे दडपण यामुळे निजामाविरुद्ध बळाचा वापर करणे अपरिहार्य आहे म्हणून ९ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने सैन्यदलाला हैदराबाद वर चढाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा हैदराबाद संस्थानांमध्ये घुसल्या. हैदराबाद संस्थानावरील लढाईची योजना ‘ऑपरेशन पोलो’ या सांकेतिक नावाने ओळखले जाते. भारतीय सेनेच्या सदर्न कमांडचे प्रमुख जनरल गोडार्ड यांनी ही योजना तयार केली तथापि ते निवृत्त झाल्याने लेफ्टनंट जनरल राजेंद्र सिंग यांची नियुक्ती झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर जनरल जयंत चौधरी आणि व्हाईस मार्शल मुखर्जी यांनी ही योजना राबवली व पूर्णत्वास नेली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद भोवती असलेल्या निजामी फौजांनी माघार घेतली. भारतीय सैन्याने निजामी फौजांचे प्रमुख जनरल अल इद्रिस यांना शरणागती पत्करावी असा संदेश पाठवला. त्याप्रमाणे १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी निजामाने आपली शरणागती घोषित केली. दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने निजामाची राजधानी हैदराबाद शहरात प्रवेश केला. तेथे मेजर जनरल चौधरींनी अधिकृतपणे निजामाचे सेना प्रमुख जनरल इद्रिस यांच्याकडून सत्तेची सूत्रे स्वीकारली आणि भारताविरुद्ध युद्ध करण्याचा बेफाम वल्गना करणाऱ्या कासिम रझवी आणि पंतप्रधान मीर लायक अली यांना अटक करण्यात आली. (मराठवाड्याचा इतिहास; सोमनाथ रोडे :१९६) संस्थांनी प्रजेने या कारवाईचे प्रचंड

उत्साहाने स्वागत केले. ८ ऑक्टोंबर रोजी सरदार पटेलांनी हैदराबादला भेट दिली. त्यावेळी निजामाने भारताशी एकनिष्ठ राहण्याचे आणि प्रजा कल्याणाचे आश्वासन दिल्यामुळे त्याच्या पदाला व प्रतिष्ठेला धक्का लावला गेला नाही. १९५२ मध्ये हैदराबाद संस्थानात सार्वत्रीक सार्वत्रिक निवडणुका होऊन तेथे काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले.

अशा प्रकारे अत्यंत अल्पावधीत हैदराबाद विरुद्धची पोलीस कारवाई यशस्वीरिता घडवून आणण्याची आणि त्यानंतर निजमांबाबत समोपचाराचे धोरण स्वीकारून त्याला भारताच्या राजकीय प्रवाहात सामावून घेण्याचे श्रेय सरदार पटेल यांच्या पोलादी मुत्सद्देगिरीला आहे.

## २.३.४ काश्मीर:

वरील दोन्ही संस्थानांपेक्षा काश्मीर मधील परिस्थिती वेगळी होती. जम्मू-काश्मीरमध्ये बहुसंख्य प्रजा मुस्लिम होती आणि शासक हरीसिंह हिंदू होता. काश्मीरचे क्षेत्रफळ ८४,४७० चौरस मैलांचे म्हणजे हैदराबाद संस्थानापेक्षाही मोठे होते. येथे हिंदू व शीख अल्पसंख्य होते. हा प्रदेश अत्यंत निसर्गरम्य तर आहेच पण त्यापेक्षा काश्मीरचे खरे महत्व आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने त्याची असलेले मोक्याची भोगोलिक स्थिती होते. काश्मीरची जवळ जवळ तीन चतुर्थांश लोकसंख्या मुसलमान असल्याने व त्याची सीमा एका बाजूने पाकिस्तानशी संलग्न असल्याने काश्मीर पाकिस्तानातच सामील व्हायला पाहिजे असे पाकिस्तानला वाटे. पाकिस्तान या शब्दातील 'के' हे इंग्रजी अक्षर काश्मीर शब्दावरूनच घेतले गेले होते. परंतु सलग एकसंध मुस्लिम बहुसंख्य प्रदेश पाकिस्तानला जावेत हे फाळणीची मूलभूत सूत्र केवळ ब्रिटिश आंकित भारतीय प्रदेशाला लागू होते. अर्धस्वायत्त भारतीय संस्थानांना नव्हे. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याने भारतीय संस्थांनाना त्यांनी भारतात विलीन व्हायचे की पाकिस्तानला जाऊन मिळायचे की स्वतंत्र राहावयाचे हे ठरविण्याचा अधिकार दिला होता. प्रारंभी काश्मीरच्या महाराजांनी पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतला असता तर भारताकडून त्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही झाली नसती. परंतु दोहोंपैकी कोणत्याही राष्ट्रात विलीन न होता स्वतंत्र राहण्याचे महाराज हरिसिंगाच्या मनात होते. म्हणून दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांशी त्यांनी जैसे थे करार केला आणि १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत सामीलीकरणा संबंधी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यांच्या संस्थानांच्या सीमा पाकिस्तान व भारत दोघांनाही लागून असल्यामुळे व तेथील बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्यामुळे सामीलीकरण्याबाबत निर्णय घेणे त्यांना अवघड जात होत. या अडचणीमुळे त्याने भारत किंवा पाकिस्तानामध्ये सामील न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. १५ ऑगस्ट पूर्वी गांधीजी व लॉर्ड माऊंटबॅटन यांनी काश्मीर नरेश हरीसिंगाशी चर्चा करून स्वतंत्र राहणे त्याच्या हिताचे ठरणार नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड माऊंटबॅटन यांनी तर पाकिस्तानात सामील होण्याचा त्याने निर्णय घेतला तरी भारतीय नेते त्याला हरकत घेणार नाहीत असे ते म्हणाले. परंतु लोकमताचा कौल घेऊनच काय तो निर्णय घ्यावा असा त्याला सल्ला दिला. काश्मीर हे भारताच्या उत्तर सीमेवर संलग्न असल्यामुळे भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काश्मीरचे भारतात सामीलीकरण अगत्याचे आहे अशी भारत सरकारची धारणा होती तर काश्मीरला पाकिस्तानात ओढण्याचा जीना आटोकाट प्रयत्न करत होते.

अशा स्थितीत हरीसिंहाने पाकिस्तानशी जैसे थे करार केलेला असतानाही पाकिस्ताने काश्मीरची आर्थिक नाकेबंदी केली. हे दडपण येऊन देखील काश्मीर नरेश आपला स्वातंत्र्याचा हेका सोडत नाही असे दिसताच पाकिस्तानने बळाचा वापर करण्याचे ठरवले आणि २२ ऑक्टोंबर १९४७ रोजी हजारा व पेशावर येथील लढाऊ टोळ्यांना काश्मीरवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले. काश्मीर वरिल या हल्ल्यात घुसखोरांनी लुटालुट, जाळपोळ, बलात्कार, कत्तली असे अमानुष अत्याचार काश्मिरी जनतेवर केले. अनेक गावे काबीज करून श्रीनगरच्या दिशेने त्यांनी आगेकूच सुरू केली. त्यांना आवर घालने अशक्य झाल्याने शेवटी हरीसिंहाने २४ ऑक्टोबरला भारताकडे मदतीची याचना केली. ती मदत काश्मीरला देण्याचा निर्णय भारत सरकार घेणार असे २५ ऑक्टोंबर १९४७ रोजी संरक्षण समितीत झालेल्या चर्चेवरून लक्षात येताच, भारतात सम्मिलीत न झालेल्या राज्याला लष्करी मदत देण्याचा भारत सरकारला अधिकार नाही, असा कायद्याचा पेच उपस्थित करून लॉर्ड माऊंटबॅटन यांनी काश्मीरमध्ये लष्कर पाठवण्याबाबत अडथळा आणला. ह्या मुद्द्याचे निराकरण करण्याच्या हेतूने नेहरूंनी मेनन यांना तातडीने श्रीनगरला रवाना केले. त्यावेळी हरिसिंग हे श्रीनगर सोडून जाण्याच्या तयारीत होते. कारण काही तासातच श्रीनगर शत्रूच्या हाती पडणार अशी लक्षणे दिसत होती. त्यामुळे परिस्थितीच्या दडपणाखाली हरीसिंगांनी लागलीच २६ ऑक्टोंबर १९४७ रोजी काश्मीर संस्थान भारतात विलीन करण्यासंबंधीच्या सामीलीकरण करारावर स्वाक्षरी केली. शेख अब्दुल्ला या काश्मिरी जनतेचा पाठिंबा असलेल्या काश्मीरच्या सर्वात बलशाली नेत्यांनेही काश्मीर भारतात विलीन करण्याचा सल्ला त्याला दिला. २७ ऑक्टोंबर १९४७ रोजी भारत सरकारने या करारास मान्यता देऊन लागलीच विमानाने भारतीय सैन्य काश्मीर मध्ये पाठविण्यात आले. त्यामुळे हल्लेखोर मागे रेटले जाऊन श्रीनगरचा बचाव झाला. परंतु तोपर्यंत हल्लेखोरांनी काश्मीरचा कित्येक चौरस मैलांचा प्रदेश व्यापला होता. परिणामी पाकिस्तानने भारताशी युद्ध सुरू केले. त्यावर भारताने सुरक्षा परिषदेत तक्रार केली. पाकिस्ताननेही विरोधात तक्रार केली. राष्ट्रसंघाने मध्यस्थी करून युद्धबंदी रेषा निश्चित करून दिली. मात्र पाकिस्तानने घेतलेला जम्मू-काश्मीरचा प्रदेश आजाद काश्मीर या नावाने आजही स्वतंत्र आहे आणि व्यावहारिक दृष्ट्या त्यावर पाकिस्तानचे नियंत्रण आहे.

अशाप्रकारे काश्मीर राज्य भारतीय संघराज्याचा एक अविभाज्य घटक असून त्याबाबत आता कोणतेही प्रश्नचिन्ह राहिलेले नाही, अशी भारताची धारणा असली तरी तो प्रश्न अजूनही अनिर्णीतच आहे असा पाकिस्तानचा दावा आहे. दोन्ही राष्ट्राच्या संबंधात काश्मीर एक सतत सलणारे शल्य ठरले असून त्यातून निर्माण होणारा परस्पर अविश्वास, तणाव, युद्धे व शस्त्रास्त्र स्पर्धा या बाबी दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीने घातक ठरल्या आहेत.

## २.४ राज्यांची पुनर्रचना

### २.४.१ राज्य पुनर्रचनेची पार्श्वभूमी:

भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना संस्थानांसंबंधीची नीती निर्धारित करीत असलेल्या सरदार पटेल यांनी दोन उद्दिष्टे निश्चित केली होती. त्यापैकी पहिले उद्दिष्ट संस्थानांचे भारतात सामीलीकरण करून साध्य झाले तर दुसरे उद्दिष्ट संस्थानांच्या प्रदेशाचे भारतीय संघराज्यात पूर्णतः विलीनीकरण करून घेणे आणि संस्थानातील प्रजेला भारतीय

नागरिकाप्रमाणे सर्व अधिकार देणे हे होते. १४ डिसेंबर १९४७ रोजी ओरिसातील कटक येथे संस्थानिकांच्या बैठकीत बोलताना सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले की, "संस्थाने ही प्रांतांच्या शरीरावरील व्रणासारखी आहेत तेथील प्रजा प्रक्षुब्ध मनस्थितीत असून कोणत्याही क्षणी उठाव करून संस्थानिकांना ती पदच्युत करू शकते. म्हणून संस्थानिकांनी स्वायत्ततेचा दुराग्रह न धरता प्रांतात विलीन होण्याचा निर्णय घ्यावा. संस्थानिकांनी हा सल्ला मानला नाही आणि त्यांच्या प्रजेने बंड करून त्यांना पदच्युत केले तर भारत सरकार त्यांना कोणत्याही प्रकारचे साहाय्य देऊ शकणार नाही." असा गर्भित इशारा त्यांनी संस्थानिकांना दिला. त्याचा योग्य परिणाम होऊन संस्थानिकांनी विलीनीकरणास संमिती दिली. संस्थानांच्या संपूर्ण विलीनीकरणा मागील भारत सरकारचा हेतू देशातील सर्व प्रादेशिक घटक आकाराने मोठे आणि स्वयंपूर्ण बनविण्याचा आणि अशा सर्व घटकांची एकात्मता साधून एकसंघी व लोकशाहीनिष्ठ भारताची प्रतिष्ठापना करण्याचा असल्याचे नमूद करण्यात आले. या विलीनीकरणाच्या उद्देशासाठी तीन भिन्न मार्गाचा अवलंब करण्यात आला

१) लहान-लहान संस्थानांचे त्यालगतच्या मोठ्या संस्थानात किंवा प्रांतात विलीनीकरण करणे हा पहिला मार्ग होता. त्यानुसार ओरिसा व छत्तीसगड भागातील संस्थाने अनुक्रमे ओरिसा व मध्यप्रांतात डिसेंबर १९४७ मध्ये विलीन करण्यात आली. मार्च १९४८ मध्ये दक्षिणेतील सतरा संस्थाने मुंबई प्रांतात विलीन झाली. त्यानंतर १९४९ च्या मध्यापर्यंत काठीयावाड मधील सुमारे २८९ संस्थाने आणि कोल्हापूर व बडोदा ही संस्थाने मुंबई प्रांतात विलीन केली गेली. अशाच प्रकारे पंजाब व बंगालमधील संस्थाने त्यांच्या नजीकच्या प्रांतात विलीन झाली. विलीनीकरणाच्या करारा अन्वये आपल्या संस्थानांचे प्रशासन संस्थानिकांनी भारत सरकारच्या हाती सोपवले. भारतीय संघराज्याचे अविभाज्य घटक बनताच प्रांतिक कायदेमंडळांत संस्थानी प्रजेला प्रतिनिधित्व देण्यात आले. भारतीय संघराज्याच्या घटनेत यांचा समावेश 'अ' गटात करण्यात आला.

२) विलीनीकरणाचा दुसरा मार्ग म्हणजे प्रादेशिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या परस्पर संलग्न असलेल्या अनेक संस्थानांचे एकत्रीकरण करून नवे प्रादेशिक घटक निर्माण करणे. यानुसार काठीयावाडातील सुमारे २२२ लहान लहान संस्थानांचे एकीकरण करून फेब्रुवारी १९४८ मध्ये सौराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. माळव्याचा काही भाग, ग्वाल्हेर आणि इंदौर ही संस्थाने मिळून मध्य भारत अस्तित्वात आला. तर पतियाळा, नाभा, कपूर्थळा इत्यादी पूर्व पंजाब मधील आठ राज्य मिळून पेप्सूची निर्मिती करण्यात आली. जोधपुर, बिकानेर, जयपुर, जैसलमेर इत्यादी संस्थांने मिळून राजस्थानची निर्मिती करण्यात आली.त्रावणकोर व कोचीन चे एकत्रीकरण जुलै १९४९ मध्ये झाले. हैदराबाद, म्हैसूर व जम्मू-काश्मीरचे प्रदेश पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आले. या नवनिर्मित घटकांचा अंतर्भाव संघराज्याच्या घटनेत 'ब' गटात करण्यात आला.

३) अत्यंत मागासलेल्या प्रदेशातील लहान संस्थानांचे एकीकरण करून त्या घटकांना केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा देण्याचा तिसरा मार्ग अवलंबण्यात आला. या प्रदेशांचा विकास जलद गतीने करण्यासाठी तेथे जबाबदार शासन न देता प्रशासनाची सूत्रे

केंद्र सरकारच्या हाती ठेवण्यात आली. यानुसार पूर्व पंजाब मधील दहा लक्ष लोकवस्तीच्या दहा हजार सहाशे चौरस मैलाच्या भागाचे रूपांतर एप्रिल १९४८ मध्ये हिमाचल प्रदेशात केले. बुंदेलखंड व त्यालगतच्या प्रदेशातील ३६ लक्ष लोकवस्तीच्या पस्तीस संस्थानांच्या एकत्रीकरणातून विंध्य प्रदेश जन्माला आला. त्रिपुरा, भोपाळ, कच्छ आणि पंजाब मधील बिलासपुर यांचे शासन १९४९ च्या अखेरपर्यंत केंद्र सरकारने हाती घेतले. या सात प्रदेशांचा अंतर्भाव राज्यघटनेतील 'क' गटात करण्यात आला व तेथील प्रशासन चीफ कमिशनर मार्फत केंद्र सरकार चालवू लागले.

अशाप्रकारे १९४९ च्या अखेरपर्यंत विलीनीकरणाचा दुसरा अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या कार्यामध्ये संस्थानांनी अडथळा तर आणला नाहीच, उलट अतिशय समंजसपणाने त्यांनी भारत सरकारला मदत केली व भारतीय संघराज्य खऱ्या अर्थाने एकसंधी व एकात्म बनवण्यास निःशंकपणे आधार लावला. त्याबद्दल सरदार पटेलांनी संस्थानिकांची प्रशंशा केली व त्यांचे आभार मानले तसेच विलीनीकरणाच्या वेळी त्यांना दिलेली आश्वासने ही पटेल यांनी तंतोतंत पाळली. संस्थानिकांचे तनखे ठरवून दिले आणि त्यांच्या उपाधी, विशेषाधिकार, खाजगी मालमत्ता आणि वारसाहक्काची तरतूद घटनेतील २९१ या कलमात करून देण्यात आली. (आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००; शांता कोठेकर :२४९)

### २.४.२ भाषावार राज्य पुनर्रचना:

भारताला स्वातंत्र्य मिळताच भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याचा मुद्दा पुढे आला. ब्रिटिशांनी प्रदेशांच्या सीमा बनवताना भाषा आणि संस्कृतीचा कोणताही विचार केलेला नव्हता. त्यातच जागोजागी असलेल्या संस्थानांमुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनलेला होता. भाषा आणि संस्कृती यांचा खूप जवळचा संबंध असतो आणि भाषेचा रीतीरिवाजावर मोठा प्रभाव पडत असतो. मातृभाषेशिवाय शिक्षणाचा प्रसार चांगला होत नाही. राजकारण आणि प्रशासन लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी भाषा हे खूप महत्त्वाचे माध्यम असते. म्हणून शिक्षण, प्रशासन आणि न्यायालय मातृभाषेतून चालवण्यासाठी राज्यांची रचना ही भाषेच्या आधारावर असणे आवश्यक असते. ह्याच कारणामुळे काँग्रेसने १९२१ मध्ये आपल्या घटनेत बदल करून आपल्या प्रांतीय शाखा भाषेच्या आधारावर गठीत केल्या होत्या. महात्मा गांधी म्हणाले होते की, "प्रादेशिक भाषांना पूर्ण उंचीवर नेऊन ठेवायचे असेल तर, प्रांतांची भाषेच्या आधारावर रचना आवश्यक आहे". म्हणून स्वतंत्र भारतामध्ये भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न ऐरणीवर आला. परंतु स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय नेतृत्व भाषावार प्रांतरचनेला विरोध करत होते. कारण फाळणीमुळे गंभीर प्रशासनिक, आर्थिक आणि राजनितीक समस्या उत्पन्न झाल्या होत्या. २७ नोव्हेंबर १९४७ रोजी पंडित नेहरूंनी स्पष्टपणे सांगितले की, "भारताचा अग्रक्रम हा भारताची सुरक्षा आणि एकता यासाठी राहील व भाषावार प्रांतरचनेचा निर्णय तुर्तास बाजूला ठेवावा लागेल". (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:१३४)

### २.४.3 दार (भाषावार) समिती १९४८:

भाषावार राज्य रचना हा निर्णय कॉंग्रेसने कित्येक वर्षांपूर्वी घेतला असल्याचा हवाला देऊन काही कॉंग्रेस सदस्यांनी भाषावार राज्यरचनेचा आग्रह धरला. तेव्हा भाषावार प्रांतरचना योग्य ठरेल की नाही याचा विचार करण्यासाठी जून १९४८ मध्ये घटना समितीने एस. के. दार समितीची नियुक्ती केली. या समितीने राष्ट्रीय निष्ठा व प्रादेशिक निष्ठा यांचा समन्वय साधणे प्रत्यक्षात अशक्यप्राय आहे आणि देश आणिबाणीच्या परिस्थितीतून जात असताना, प्रादेशिक पुनर्रचना भाषेच्या आधारे केल्यास, प्रादेशिक निष्ठा बळावतील व त्या प्रमाणात राष्ट्रीय निष्ठा दुबळी होऊ लागेल, हे राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरेल अशा आशयाचा अहवाल सादर करून भाषिक तत्त्वावर प्रादेशिक पुनर्रचनेच्या मागणीला विरोध दर्शविला. मात्र प्रशासकीय सोयीसाठी आवश्यक ते प्रादेशिक बदल करण्यास हरकत नसावी असे मत या समितीने प्रतिपादित केले.

### २.४.४ जे व्ही पी समिती १९४८:

दार समितीच्या शिफारशीवरून घटना समितीने भाषावार प्रांतरचनेच्या सिद्धांत घटनेमध्ये सामील न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भाषावार राज्य रचनेला समर्थन असणाऱ्या जनतेमध्ये असंतोष वाढत जाऊन दक्षिण भारतामध्ये भाषावार प्रांतरचनेची मागणी अजूनच जोर धरू लागली. म्हणून भाषावार समर्थकांना शांत करण्यासाठी कॉंग्रेसने डिसेंबर १९४८ मध्ये जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि कॉंग्रेसचे अध्यक्ष पट्टाभि सीतारामय्या यांची जे व्ही पी समिती भाषावार राज्यरचनेच्या प्रश्नावर पुनर्विचार करण्यासाठी नियुक्त केली. या समितीने दार समितीच्या अहवालातील शिफारशी पुढे करत असा तर्क दिला की, भाषावार राज्यरचनेपेक्षा सध्या देशाची सुरक्षा, एकता आणि आर्थिक संपन्नता यावर पहिले लक्ष दिले पाहिजे असे सांगितले. परंतु त्याचबरोबर जिथे भाषावार राज्यांची मागणी अधिक आहे आणि तेथील इतर भाषिकांचीही त्याला संमती असेल तर तिथे भाषावार राज्याची निर्मिती केली जाईल असे आपल्या अहवालात नमूद केले.

### २.४.५ आंध्र प्रदेश व तामिळनाडूची निर्मिती १९५३:

जे व्ही पी समितीच्या अहवालाचा परिणाम म्हणून मद्रास मधून तेलगू भाषिक आंध्र प्रदेशची मागणी नेटाने पुढे आली. मद्रास राज्यात तामिळ भाषिक जनता अधिक होती तर तेलगू भाषिक जनतेचे प्रमाण कमी होते. त्यांचे हे प्रभुत्व नष्ट करण्यासाठी तेलुगु भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात यावे अशी मागणी तेलगू भाषिक करू लागले. या ठिकाणी तामिळ भाषिकांचाही भाषावार राज्याला पाठिंबा होता परंतु त्यांच्यात मद्रास शहर कोणाकडे असावे यावरून एकमत होत नव्हते. त्यामुळे तेलुगू भाषिक आंध्रप्रदेशच्या मागणी कडे पंडित नेहरूंनी दुर्लक्ष केले. परिणामी आपली मागणी केंद्र सरकारच्या गळी उतरवण्यासाठी पोट्टी श्रीरामुलु यांनी १९ ऑक्टोंबर १९५२ रोजी आमरण उपोषण सुरू केले आणि ५८ दिवसाच्या उपोषणानंतर १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यामुळे तेथील जनतेच्या दृष्टीने ते हुतात्मा ठरले. प्रक्षुब्द तेलुगु जनतेने हिंसाचाराचा मार्ग अवलंबिला. अशाप्रकारे स्फोटक झालेली परिस्थिती बघून तेलगू भाषिक राज्याच्या निर्मितीसाठी वांछू समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार ऑक्टोंबर १९५३ मध्ये कायदा पास करून तेलुगू भाषकांच्या आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती करण्यात आली.

भारतीय संघराज्यातील हे पहिले एकभाषी राज्य होते. त्याचबरोबर तामिळ भाषी राज्याच्या रूपात तामिळनाडूची निर्मिती झाली. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र :१३६)

### २.४.६ राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना १९५३:

तेलुगू भाषिक आंध्रप्रदेश ची मागणी मान्य केल्यामुळे भाषावार राज्य निर्मितीची मागणी इतरत्रही सुरू झाली. राष्ट्रीय ऐक्याचे कारण पुढे करून नेहरूंनी या मागणीला विरोध केला होता. परंतु त्यांच्या भूमिकेवर त्यांच्याच पक्षातील नेत्यांनी टीका करून भाषावार प्रांतरचनेमुळे राज्यात एकता निर्माण होईल व त्यामुळे विकासाच्या विधायक योजना अधिक यशस्वीरित्या राबवता येईल असा युक्तिवाद केला. त्यामुळे नेहरूंचा नाइलाज होऊन डिसेंबर १९५३ मध्ये भाषावार प्रांतरचनेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी एक आयोग नेमला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले. त्यानुसार फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना करण्यात आली. पंडित हृदयनाथ कुंझरू आणि सरदार पण्णिकर हे या आयोगाचे सदस्य होते. या आयोगाने आपल्या कार्यकाळात लोकमताचा अंदाज घेण्यासाठी देशाच्या अनेक भागांचे दौरे करून त्या आधारे आपला अहवाल ३० सप्टेंबर १९५५ रोजी सरकारला सादर केला.

१) भारतीय संघराज्यात विद्यमान असलेल्या सत्तावीस राज्यांच्या व तीन केंद्रशासित प्रदेशांच्या जागी, एकभाषी राज्यांच्या तत्त्वानुसार १६ समान दर्जाची राज्य आणि ३ केंद्र केंद्रशासित प्रदेश यांची निर्मिती करण्यात यावी ही मूलभूत शिफारस या आयोगाने केली होती.

२) अ, ब, क अशी वर्गवारी नष्ट करून संघराज्यात राज्य व केंद्रशासित प्रदेश असे दोनच घटक असावेत अशी दुसरी शिफारस होती.

३) राजप्रमुखांचे पद रद्द करण्याची सूचना केली.

४) पंजाबचे भाषिक स्वरूप आणि दळणवळणाच्या गरजा लक्षात घेता पंजाबची मागणी या आयोगाला समर्थनीय वाटली नाही.

५) तसेच गुजरातीभाषी व मराठीभाषी प्रदेश मिळून मुंबईचे द्विभाषिक राज्य निर्माण करावे अशी शिफारस केली.

फाजल अली आयोगाच्या आहवाल जनतेपुढे येताच त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया झाल्या. विशेषतः पंजाब व महाराष्ट्रातील जनमत विलक्षण संतप्त झाले. अखेरीस मूळ अहवालात काही बदल करून ऑगस्ट १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना कायदा पारित करण्यात आला.

### २.४.७ राज्य पुनर्रचना कायदा १९५६:

या कायद्याने १४ राज्य आणि ५ केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती केल्या गेली. आंध्र प्रदेश, आसाम, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, मुंबई, मद्रास, मैसूर, उत्तर प्रदेश, केरळ, पंजाब, राजस्थान व पश्चिम बंगाल ही समान दर्जाची राज्य तर जम्मू काश्मीरला विशेष दर्जा दिला. दिल्ली, हिमाचल प्रदेश, मनिपुर, त्रिपुरा, अंदमान निकोबार आणि लखदिव मिनिकॉय अमीनदीवी बेटे केंद्रशासित प्रदेश होते. हैदराबादचा तेलुगु भाषिक प्रदेश व १९५३ साली

निर्माण करण्यात आलेल्या आंध्राचे राज्य मिळून नव्या आंध्रप्रदेशचे राज्य निर्माण झाले. तर अस्तित्वात असलेल्या म्हैसूर राज्यात हैदराबाद मुंबई व मद्रास राज्यातील कन्नड भाषीक प्रदेश व कुर्ग समाविष्ट करण्यात आले. त्रावणकोर व कोचीन मिळून केरळचे राज्य अस्तित्वात आले. मुंबई राज्यात पूर्वीचा मुंबई राज्याचा प्रदेश, हैदराबाद, मध्य प्रदेशातील मराठीभाषी प्रदेश, सौराष्ट्र आणि कच्छ यांचा अंतर्भाव केला. मध्यप्रदेशात अस्तित्वात असलेला मध्य प्रदेशाचा भाग, विंध्यप्रदेश, भोपाळ व राजस्थानमधील हिंदी भाषी भाग समाविष्ट करण्यात आला. अजमेरचा अंतर्भाव राजस्थानात झाला तर पतियाळा व पूर्व पंजाबचा संघ पंजाब राज्यात विलीन करण्यात आला. या प्रादेशिक पुनर्रचनेनुसार घटनेच्या पहिल्या परिशिष्टात परिवर्तन करण्यात आले. राज्य पुनर्रचना कायद्याच्या तिसऱ्या परिशिष्टात सर्व राज्यांच्या लोकसभेतील प्रतिनिधींची व त्यांच्या विधिमंडळातील सदस्यांची संख्या नमूद करण्यात आली. (आधुनिक भारताचा इतिहास १९४७ ते २०००; शांता कोठेकर :२५६)

## २.४.८ महाराष्ट्र व गुजरातची निर्मिती १९६०:

राज्य पुनर्रचना कायद्याने तयार झालेल्या मुंबई राज्याने मराठी जनतेचे समाधान झाले नाही. म्हणून मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मागणी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून केली गेली. तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील वित्तमंत्री चिंतामणराव देशमुखांनी स्वतंत्र महाराष्ट्राच्या मागणीसाठी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. याच दरम्यान गुजराती भाषी लोकांनी महागुजरात जनता परिषदेमार्फत स्वतंत्र गुजरात राज्याची मागणी केली. अखेरीस महाराष्ट्रातील व गुजरात मधील वाढता हिंसाचार आणि तणाव याकडे दुर्लक्ष करणे केंद्र सरकारला अशक्य झाले. परिणामी मुंबई राज्याचे विभाजन करून त्यातून मराठी भाषी महाराष्ट्र व गुजराती भाषी गुजरात राज्याची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र समितीची मुंबई सह महाराष्ट्राची मागणी मान्य झाली पण बेळगाव, निपाणी व कारवार महाराष्ट्रात सामील केले जावे ही मागणी मात्र नामंजूर झाली. ही नवी व्यवस्था करणारा मुंबई पुनर्रचना कायदा २५ एप्रिल १९६० रोजी पारित झाला आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्याचबरोबर गुजराती भाषी गुजरात राज्य सुद्धा उदयास आले.

## २.४.९ पंजाब व हरियाणाची निर्मिती १९६६:

१९५६ च्या कायद्यानुसार पंजाबमध्ये करण्यात आलेली प्रादेशिक व्यवस्था पंजाबी भाषीक शीखांना मान्य नव्हती. त्यामुळे केंद्र सरकारवर दडपण आणण्यासाठी शीखांनी आंदोलनाचा मार्ग अंगीकारला. अखेरीस या प्रश्नाचा विचार करण्यासाठी न्यायमूर्ती शहा समिती स्थापन करण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे १९६६ साली पंजाब पुनर्रचना कायदा पास केला. त्यात पंजाबचे विभाजन करून शिखांची वस्ती असलेल्या प्रदेशांचे पंजाब राज्य व हिंदीभाषी लोकांचे हरीयाना राज्य निर्माण करण्याची, तसेच पंजाबचा काही पर्वतीय भाग हिमाचल प्रदेशला जोडण्याची तरतूद केली गेली.

अशाच प्रकारे यानंतरही महत्त्वाचे प्रादेशिक बदल करण्यात आले. १९७१ साली आसाम राज्यातील मेघालयाला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला गेला. तसेच त्रिपुरा, मणिपुर व हिमाचल प्रदेश यांनाही राज्याचा दर्जा देण्यात आला. आसाम राज्याची प्रादेशिक पुनर्रचना करून

मिझोराम व अरुणाचल प्रदेश असे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले. १९७३ साली म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक असे ठेवण्यात आले. तसेच लखदीव, अमीनदीव व मिनीकॉय या बेट समूहाचे लक्षद्विप असे नामांतर केले. १९७५ मध्ये सिक्किमचा घटक राज्य म्हणून भारतीय संघराज्यात अंतर्भाव करण्यात आला.

अशाप्रकारे स्वातंत्र्यानंतर भाषा, भौगोलिक स्थिती इत्यादी कारणाने वेगळ्या राज्यांची मागणी वेळोवेळी होत राहिलेली दिसून येते. त्याचाच परिणाम म्हणून २००० साली उत्तर प्रदेश मधून उत्तराखंड, बिहार मधून झारखंड व मध्यप्रदेश मधून छत्तीसगड या स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली आणि आता २०१४ मध्ये आंध्र प्रदेश मधुन स्वतंत्र तेलंगणा राज्य अस्तित्वात आले.

## २.५ सारांश

ब्रिटिशांनी भारतामध्ये सत्तास्थापन करत असताना आपल्या आवश्यकतेनुसार प्रांतरचना केलेली होती. त्यामध्ये ब्रिटिश भारत आणि ब्रिटिशांचे मांडलिक असलेली संस्थाने अशी विभागणी होती. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना ब्रिटिशांनी संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा अधिकार दिला होता. भारत सरकारने संस्थानांसाठी स्वतंत्र खाते निर्माण करून वल्लभ भाई पटेल यांच्याकडे त्याची धुरा सोपवली. त्यांनी ५६२ पैकी हैदराबाद, जुनागड व काश्मीर वगळता भारतामध्ये उर्वरित संस्थांनांना आपल्या मुत्सद्देगिरीच्या आधारावर सामील करून घेतले. हैदराबाद, जुनागड व काश्मीर यांचा प्रश्न बळाचा वापर करून सोडवला. अशाप्रकारे एकसंध भारत निर्माण करण्याचे श्रेय सरदार वल्लभभाई पटेल यांना जाते.

ही संस्थाने भारतामध्ये सामील करून घेतल्यानंतर राज्य पुनर्रचनेचा मुद्दा समोर आला. राष्ट्रीय काँग्रेसने १९२१ पासून आपल्या प्रांतीय संघटना भाषेच्या आधारावर तयार केल्या होत्या. हाच दुवा हेरून स्वातंत्र्यानंतर भाषावर राज्यरचनेची मागणी समोर आली. राष्ट्रीय ऐक्यासाठी प्रादेशिक निष्ठा घातक ठरतील म्हणून नेहरू आणि पटेल यांनी या मागणीला विरोध केला. परंतु स्वपक्षातून आणि जनतेतून असणाऱ्या भाषावार राज्यरचनेच्या प्रचंड मागणीला राष्ट्रीय नेतृत्व नाकारू शकले नाही. त्यातूनच राज्यपुनर्रचना आयोग व राज्यपुनर्रचना कायदा अस्तित्वात येऊन, भाषिक आधारावर राज्यरचना वेळोवेळी करण्यात आली. परंतु त्यातून संकुचित प्रादेशिक निष्ठा तयार होऊन त्याचे रुपांतर राष्ट्रीय हितापेक्षा प्रादेशिक हिताला अग्रक्रम देणाऱ्या प्रादेशिक राजकीय पक्षात झाले. या शिवाय भाषावार प्रादेशिक पुनर्रचनेचे तत्व एकदा मान्य झाल्यामुळे त्याच्या आधाराने करण्यात येणाऱ्या मागण्यात तेव्हापासून खंड पडलेला नाही .

## २.६ प्रश्न

१. भारतीय संस्थानांच्या विलीनीकरणाची आवश्यकता का होती स्पष्ट करा ?

२. भारतीय संस्थानाच्या विलीनीकरणाची प्रक्रिया थोडक्यात सांगा.

३. राज्य पुनर्रचनेची पार्श्वभूमी सांगून आवश्यकता स्पष्ट करा.

४. भाषावर राज्यपुनर्रचना कायद्याविषयी माहिती विशद करा.

५. भाषेच्या आधारावर निर्मिती झालेल्या राज्यांची सविस्तर माहिती द्या.

## २.७ संदर्भ


१. शांता कोठेकर- आधुनिक भारताचा इतिहास १९४७-२०००

२. बिपिन चंद्र- आजादी के बाद का भारत

३. सोमनाथ रोडे - मराठवाड्याचा इतिहास

४. डॉ.साहेबराव गाठाळ- भारतीय राष्ट्रीय चळवळ

५. सुमित सरकार - आधुनिक भारत

६. बिपिन चंद्र- भारत का स्वतंत्रता संघर्ष

७. ग्रोवर व बेलेकर- आधुनिक भारताचा इतिहास


*****

# ३

# भारताच्या राज्यघटनेच्या इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका, भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी

३.४ भारतीय राज्यघटनेची निर्मिती

३.५ भारताच्या राज्यघटनेच्या इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका

३.६ भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

३.७ सारांश

३.८ प्रश्न

३.९ संदर्भ

## ३.१ उद्दिष्ट्ये

१. भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२. भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया समजून घेणे.

३. भारताच्या राज्यघटनेच्या इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका समजून घेणे.

४. भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये यावर चर्चा करणे.

## ३.२ प्रस्तावना

२६ जानेवारी १९५० पासून भारत प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास आले. त्या अगोदर भारतावर ब्रिटिशांची सत्ता होती. ब्रिटिशांनी १७५७ मध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर प्रशासनिक घडी बसवण्यासाठी कायद्याचे राज्य या संकल्पनेचा उपयोग केला. त्यासाठी वेळोवेळी कायदे करून प्रशासनात सुधारणा घडवून आणल्या. त्याची सुरुवात १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्ट पासून होते. सुरुवातीला गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी काही व्यक्तींची नियुक्ती केली जात असे. या व्यक्तींच्या मदतीने गव्हर्नर प्रशासनाच्या संदर्भात निर्णय घेत

असे. परंतु एखाद्या निर्णयासंदर्भात वाद निर्माण झाल्यास बहुमताच्या आधारे निर्णय घेतल्या जात असे. यामध्ये आपल्याला भारतीय लोकशाहीची व कायद्याच्या राज्याची बीजे दिसून येतात. कायद्यापुढे जात, धर्म, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देणे हे कायद्याच्या राज्याचे प्रमुख तत्व असते. आधुनिक शिक्षणामुळे भारतीयांना लोकशाही सारख्या आधुनिक संस्था आणि कायद्याचे राज्य यांची ओळख झाली. या आधुनिक संस्थांची ओळख झालेल्या भारतीयांनी आपलाही प्रशासनामध्ये सहभाग असावा म्हणून ब्रिटिश सरकारकडे वेळोवेळी त्यासंबंधी मागण्या केल्या. त्याचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी भारतीयांना टप्प्याटप्प्याने प्रशासनामध्ये सहभागी करून घेण्यासाठी वेळोवेळी घटनात्मक सुधारणांचा हप्ता दिला. त्यातूनच ब्रिटिश काळात अनेक कायदे निर्माण होऊन भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी तयार झाली. भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वतंत्र भारताची घटना स्वतः भारतीयांनी तयार करावी म्हणून ब्रिटिश सरकारने घटना समितीच्या निवडणुका घेतल्या. या घटना समितीने स्वतंत्र भारतासाठी प्रदीर्घ आणि लिखित घटना तयार केली. जगामधील विविध देशांच्या घटनांमधून जे जे चांगले तत्व असतील ते घेऊन भारताच्या संदर्भात त्याचा अंतर्भाव आपल्या या घटनेमध्ये करण्यात आला आणि २६ जानेवारी १९५० पासून ही राज्यघटना भारतासाठी लागू करण्यात आली. या राज्यघटनेच्या आधारेच भारतामध्ये कायद्याच्या राज्याची स्थापना होऊन लोकशाहीची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे.

## ३.३ भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी

ब्रिटिशांनी भारतामध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर कायद्याचे राज्य ही संकल्पना राबवण्यास सुरुवात केली. याबरोबरच भारतात लोकशाही, स्वातंत्र, समता आणि बंधुता यासारख्या आधुनिक संस्था आणि मूल्य रुजण्यास सुरुवात झाली. आधुनिक शिक्षणामुळे भारतातील मध्यमवर्गीयांना या संस्थांची ओळख झाल्यामुळे त्यांनी आपल्या न्याय हक्कासाठी १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेसने भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी ब्रिटिश सरकारकडे या आधुनिक संस्था आणि मूल्य यांची मागणी केली. त्याचाच परिणाम म्हणून ब्रिटिशांनी भारताला टप्प्याटप्प्याने घटनात्मक सुधारणा आणि राजकीय हक्क दिल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांनी या घटनात्मक सुधारणांची सुरुवात '१७७३च्या नियामक कायद्याने' केली. या कायद्यानुसार भारतातील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण घातले गेले आणि गव्हर्नर जनरल व चार कौन्सिलर यांचे कार्यकारी मंडळ स्थापन करून बहुमताने निर्णय घेण्याचे बंधन टाकण्यात आले. '१८३३च्या चार्टर कायद्या' नुसार कायदे करताना सल्ला देण्यासाठी गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये कायदा सदस्य नियुक्त करण्याची तरतूद केली गेली. त्याचबरोबर भारतीय कायद्यांचे संहितीकरण करण्यासाठी एक विधी आयोग नियुक्त करण्यात आला. '१८५३ च्या चार्टर कायद्या' मध्ये कायदा करण्यासाठी कौन्सिलची बैठक होईल त्यावेळी दोन न्यायाधीश आणि बंगाल, मद्रास, मुंबई व वायव्य प्रांताचा प्रत्येकी एक सदस्य असे सहा अतिरिक्त सदस्य घेण्याचे सुचवण्यात आले. '१८६१च्या कौन्सिल कायद्या'ने अतिरिक्त सदस्यांची संख्या १२ केली, तसेच या कायद्यानुसार भारतात मंत्रिमंडळ पद्धतीचा पाया घातला गेला. '१८९२च्या कौन्सिल कायद्या' नुसार मर्यादित प्रमाणात निवडणुकीचे तत्व स्वीकारण्यात आले. 'भारतीय कौन्सिल कायदा १९०९'

म्हणजेच मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा. या कायद्यानुसार केंद्रीय तसेच प्रांतीय कायदेमंडळांचा विस्तार करून त्याच्या सत्तेतही वाढ करण्यात आली. या कायद्यानुसार मर्यादित मताधिकार देऊन अप्रत्यक्ष निवडणूक घेण्याचीही तरतूद केली गेली. '१९१९चा भारत सरकार कायदा' म्हणजेच मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यानुसार केंद्रीय स्तरावर राज्य परिषद (Council of State) आणि केंद्रीय विधानसभा (Central Legislative Assembly) असे द्विसदनी कायदेमंडळ स्थापन करण्यात आले. या दोन्ही सदनांमध्ये निर्वाचित सदस्यांचे बहुमत होईल एवढी संख्या करण्यात आली. परंतु या निर्वाचित सदस्यांना निवडून देणाऱ्या मतदारांची संख्या मात्र खूपच कमी होती. या कायद्यानुसार विषयांची केंद्रीय विषयसूची आणि प्रांतीय विषयसूची असे वर्गीकरण करण्यात येऊन प्रांतामध्ये दुहेरी शासन व्यवस्था म्हणजेच राखीव महत्त्वाची खाती गव्हर्नरकडे आणि सोपी व कमी महत्त्वाची खाती भारतीय सदस्यांकडे देण्यात आली. एकूणच भारत सचिव मॉंटेग्यू याने म्हटल्याप्रमाणे "भारत सरकारच्या प्रत्येक विभागात भारतीयांचा संबंध दिवसेंदिवस वाढत जावा आणि स्वयंशासित संस्थांचा हळूहळू विकास व्हावा आणि जबाबदार शासनपद्धती भारतात स्थापन व्हावी" या उद्देशाने हा कायदा बनवण्यात आला होता. त्याचा बराचसा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर दिसून येतो.

यापुढील घटनात्मक सुधारणा देण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२७ मध्ये 'सायमन कमिशन' भारतामध्ये पाठवले. या कमिशनला १९१९च्या कायद्याचे मूल्यांकन करून पुढे कोणत्या प्रकारच्या घटनात्मक सुधारणा द्यायच्या, याची शिफारस करायची होती. या कमिशनच्या अहवालाच्या आधारेच १९३० ते १९३२ या कालखंडात इंग्लंडमध्ये तीन 'गोलमेज परिषदा' झाल्या. या गोलमेज परिषदांमध्ये झालेल्या चर्चेच्या आधारे १९३३मध्ये एक 'श्वेतपत्रिका प्रसिद्ध' केली. या श्वेतपत्रिकेच्या आधारे १९३४मध्ये सर सॅम्युअल यांनी एक विधेयक तयार केले. जबाबदार शासनपद्धती देण्याच्या उद्देशाने सरकारला काही ठोस पावले उचलणे भाग होते. त्याचीच परिणीती म्हणून१९३५चा कायदा केला गेला. हा '१९३५चा भारत सरकार कायदा' म्हणजे स्वातंत्र्योत्तर भारताच्या राज्यघटनेचा गाभा होय. या कायद्यानुसार भारताला संघराज्याचे स्वरूप दिले गेले. भारतातील विविध प्रांत आणि संस्थाने मिळून 'भारतीय संघराज्य' बनणार होते. केंद्रीय कायदेमंडळ, राज्य परिषद आणि संघसभा असे द्विसदनी असणार होते. केंद्रसूची, राज्यसूची आणि समवर्तीसूची असे विषयाचे वाटप करण्यात आले. प्रांतातील दुहेरी राज्यव्यवस्था आता केंद्रात लागू केली होती. प्रांतांमध्ये विधानसभा व विधान परिषद असे द्विसदनी कायदेमंडळ असणार होते. प्रांतातील कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळाला जबाबदार असणार होते. विधानसभेतील सर्व सदस्य जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पद्धतीने निवडून दिले जाणार होते. त्याचबरोबर या कायद्यानुसार एक संघ न्यायालय स्थापन करण्यात आले व न्यायालयाला संविधानाची व्याख्या करण्याचा अधिकार देण्यात आला. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ४७३)* अशाप्रकारे भारतीय राज्यघटनेचा मुख्य आधार हा १९३५चा कायदा होता. या कायद्याच्या आधारे भारतीय राज्यघटनेची संरचना करण्यात आलेली आहे. म्हणजेच ब्रिटिशांनी घटनात्मक सुधारणा करून भारतीयांना प्रशासनामध्ये प्रतिनिधित्व देण्यासाठी वेळोवेळी जे सुधारणा कायदे केले यातूनच भारतीय राज्यघटनेची पायाभरणी झालेली दिसून येते.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा. भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

## ३.४ भारतीय राज्यघटनेची निर्मिती

१९२७ मध्ये भारतीयांना पुढील टप्प्यातील घटनात्मक सुधारणा देण्यासाठी सायमन कमिशनची नियुक्ती करण्यात आली. या कमिशनमध्ये एकही सदस्य भारतीय नसल्यामुळे भारतीयांनी सायमन कमिशनला कडाडून विरोध केला. म्हणून ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांनाच असे आव्हान केले की, तुम्ही सर्वांनी मिळून सर्वांना मान्य होईल अशी अंतर्गत स्वायत्तता असलेली घटना तयार करावी. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली 'नेहरू समिती' स्थापन केली. या समितीने सांगोपांग विचार करून आपला अहवाल 'नेहरू रिपोर्ट'च्या स्वरूपात १९२८ मध्ये सरकारला सादर केला. त्याला मोहम्मद अली जिना यांनी विरोध करून आपला १४ कलमी कार्यक्रम स्वीकारण्याचा दुराग्रह धरला. हा कार्यक्रम राष्ट्रीय काँग्रेसला मान्य नसल्यामुळे नेहरू रिपोर्ट यशस्वी होऊ शकला नाही. परंतु हा भारतीयांनी घटना निर्मिती विषयी केलेला पहिला प्रयत्न होता. सायमन कमिशनच्या अहवालाच्या आधारावरच पुढे ब्रिटनमध्ये तीन गोलमेज परिषदा होऊन १९३५ चा घटनात्मक सुधारणा कायदा अस्तित्वात आला. जो भारतीय राज्यघटनेचा मुख्य आधार समजला जातो. या कायद्याच्या आधारे निवडणुका होऊन १९३७ मध्ये विविध राज्यांमध्ये भारतीयांचे प्रतिनिधीत्व असलेली मंत्रिमंडळे राज्यकारभारात आली. १७३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर भारतीयांना विचारात न घेता भारताला युद्धात सामील करून घेतले म्हणून काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. परीणामी भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी ब्रिटिशांनी १९४० मध्ये ऑगस्ट प्रस्ताव भारतीय नेत्यांपुढे ठेवला. यामध्ये युद्धसमाप्तीनंतर भारताची घटना तयार करण्यासाठी एक समिती निर्वाचित करण्यात येईल अशी तरतूद करून भारताची घटना बनविण्याचा अधिकार भारतीयांचा आहे हे सर्व प्रथम १९४०च्या ऑगस्ट प्रस्तावद्वारे मान्य करण्यात आले होते. परंतु काँग्रेसला ही व्यवस्था तात्काळ हवी होती म्हणून काँग्रेसने हा प्रस्ताव मान्य केला नाही. १९४२ मध्ये दुसऱ्या महायुद्धाची तीव्रता वाढल्यामुळे भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी 'क्रिप्स प्रस्ताव 'भारतीयांपुढे ठेवण्यात आला. यामध्येही युद्धसमाप्तीनंतर घटना समितीची निवडणूक कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा पद्धतीनुसार होईल असे सांगण्यात आले.त्यात भारतीय संस्थानांचा सहभाग असण्याची देखील व्यवस्था केली होती. परंतु महात्मा गांधीजींनी या व्यवस्थेला *"बुडत्या बँकेचा पुढील तारखेचा धनादेश"*, म्हणतही योजना नाकारली.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटिशांविरुद्ध भारतात दाटलेला तीव्र असंतोष व शस्त्रबळावर भारतावरील पकड टिकून धरण्याची ब्रिटनची असमर्थता यामुळे भारतातून लवकरच काढता पाय घ्यावा लागणार हे ब्रिटिशांना कळून चुकले होते. म्हणून भारताच्या सत्ता हस्तांतरणासाठी १९४६ मध्ये 'त्रिमंत्री योजना अर्थात कॅबिनेट मिशन'ची स्थापना करण्यात आली. या कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावामध्ये घटना समितीची रचना स्पष्ट करण्यात

आली होती. त्यानुसार घटना समिती प्रांतीय विधानसभांद्वारे निवडली जाणार होती. प्रौढ मताधिकाराद्वारे घटना समिती निवडण्याची कल्पना बाजूला सारली कारण त्यामुळे फार विलंब झाला असता. प्रांतिक विधानसभेच्या सदस्यांना सामान्य, मुस्लिम आणि शीख अशा तीन भागात विभाजित करण्यात आले. प्रत्येक भागातील सदस्यांना आपले प्रतिनिधी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने निवडायचे होते. गव्हर्नर प्रांतात हे प्रमाण दहा लक्ष लोकसंख्येला एक प्रतिनिधी असे होते. यामध्ये ब्रिटिश भारतामधून २९२ प्रतिनिधी निवडून येणार होते तर ४ सदस्य मुख्य आयुक्त प्रांतातून आणि ९३ सदस्य भारतीय संस्थानातून मनोनित होणार होते. काहीशा अनिच्छेने काँग्रेस व मुस्लिम लीगने त्रिमंत्री योजनेला स्वीकृती दिली. यानंतर घटना समितीसाठी झालेल्या निवडणुकीत २१४ साधारण जागांपैकी काँग्रेसला २०५ जागा मिळाल्या. शिवाय काँग्रेसला ४शिख सदस्यांचे देखील समर्थन होते. ७८ मुस्लिम जागांपैकी लीगला ७३ जागा मिळाल्या. अशाप्रकारे घटना समितीत पूर्णतः काँग्रेसचे बहुमत प्रस्थापित झाल्याने जिना अस्वस्थ झाले आणि २९ जून १९४६ रोजी मुस्लिम लीग त्रिमंत्री योजना फेटाळून लावत आहे असे जाहीर करून घटना समितीमध्ये सामील होण्यास लीगने नकार दिला. तरीही घटना समितीचे पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे सुरूझाले या अधिवेशनाला एकूण २०७ सभासद हजर होते. या अधिवेशनात श्री सच्चिदानंद सिन्हा यांची घटना परिषदेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली तर ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीची कायम अध्यक्ष म्हणून निवड झाली.

घटना परिषदेचे एकूण ११ अधिवेशने झाली. त्यातील स्वातंत्र्यापूर्वी चार व स्वातंत्र्यानंतर पाच अधिवेशने झाली. पहिल्या अधिवेशनात १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित नेहरूंनी घटनेची ध्येय आणि उद्दिष्टांचा ठराव मांडला. दुसऱ्या अधिवेशनात २२ जानेवारी १९४७ रोजी हा ठराव मान्य करण्यात आला. या ठरावानुसार घटनेमध्ये पुढील ध्येयांचा व उद्दिष्टांचा प्रामुख्याने स्वीकार करण्यात आला. स्वतंत्र सार्वभौम गणराज्याची निर्मिती, मूलभूत हक्कांची निर्मिती, जनतेचे सार्वभौमत्व, भारतीय संस्थाने आणि प्रांतांना सभासदत्व, अल्पसंख्यांक आणि मागासलेल्या वर्गांना खास सवलतीयांचा यात समावेश होता. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ४९०)* घटना परिषदेने आपल्या कामकाजाच्या सोयीसाठी काही समित्या नियुक्त केल्या होत्या त्यात संघशक्ती समिती, न्यायालय समिती, संघीय घटना समिती, मूलभूत हक्क समिती, अल्पसंख्यांक समिती आणि वित्त समिती यांचा समावेश होता. या सर्व समित्यांनी आपला अहवाल घटना परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात सादर केला. घटना परिषदेचे पाचवे अधिवेशन १४ ऑगस्ट १९४७ रोजी बोलवण्यात आले. या अधिवेशनात पाकिस्तान मध्ये गेलेल्या प्रदेशातील सभासद घटना परिषदेतून बाहेर पडले. ह्या अधिवेशनापासून घटना परिषदेला सार्वभौमत्व प्राप्त झाले. कारण १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. यानंतर घटना परिषदेचे सभासद कायदेमंडळ आणि भारताची राज्यघटना परिषद अशी दुहेरी कार्य करू लागले. या अधिवेशनापासून घटना परिषदेला फक्त तात्विक स्वरूप न राहता व्यवहारीक स्वरूप प्राप्त झाले.

घटना परिषदेला सार्वभौमत्व प्राप्त झाल्यानंतर घटनेच्या मसुदा तयार करण्यासाठी घटनातज्ञांची एक समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आली. तिलाच 'मसुदा समिती' असे म्हणतात. या मसुदा समितीत डॉ. आंबेडकरांसह सात

सभासद होते. त्यात श्री गोपाल स्वामी आयंगार, श्री अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, डॉ. के. एम. मुंशी, सय्यद मोहम्मद सदुल्ला, श्री. एन. माधवराव, श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांचा समावेश होता. मसुदा समितीचे सल्लागार म्हणून बी. एन. राव यांची नेमणूक झाली होती. घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर सहासभासदांशिवाय घटना समितीत अनेक विद्वान आणि घटना तज्ञांचा समावेश होता. त्यात पंडित नेहरू, सरदार पटेल, चक्रवती राजगोपालचारी, डॉ. राधाकृष्णन, फिरोजखा नून, डॉ. पुरुषोत्तमदास टंडन व सरोजिनी नायडू इत्यादी प्रमुख होते. घटना परिषदेत कृषीम्माचारी सारखे मध्यमवर्गीय व्यापारी, डॉक्टर राधाकृष्णन, एचसी मुखर्जी आणि केजी शहा सारखे प्राध्यापक, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर सारखे निष्णात वकील, कन्हैयालाल मुन्सी सारख्या विद्वानांचे प्रतिनिधित्व घटना परिषदेत होते. याव्यतिरिक्त श्रीमती सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, बेगम रसूल आदी स्त्रियांनाही घटना समितीत प्रतिनिधित्व मिळाले होते, स्वातंत्र्य संग्रामातील मौलाना अबुल कलाम आजाद, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यासारखे मान्यवर नेते घटना समितीवर होते.

मसुदा समितीने देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन व जगातील प्रमुख देशांच्या घटनांचा अभ्यास करून घटनेचा मसुदा तयार केला. तो ३० सप्टेंबर १९४७ रोजी घटना समितीत सादर केला. या मसुद्यात ३१५ कलमे आणि ८ परिशिष्टे होती. यानंतर घटनेच्या कलमांची चर्चा आणि घटनेची कलमे कशी मान्य करावी याबाबत निर्णय होऊन घटना परिषदेचे सहावे अधिवेशन २७ जानेवारी १९४८ला भरले. एका दिवसाच्या कामकाजानंतर फेब्रुवारी १९४८ मध्ये मसुदा समितीचा मसुदा जनतेच्या माहितीसाठी आणि चर्चेसाठी जाहीर करण्यात आला. जनतेकडून यावर विविध प्रकारच्या दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. ४ नोव्हेंबर १९४८ पासून मसुद्यावर आणि जनतेने पाठवलेल्या सूचनांवर चर्चा करण्यात आली. जनतेच्या ६७३५ सूचनांपैकी ५४७३ सूचनांवर चर्चा करण्यात आली. ही चर्चा साधारणपणे दोन महिन्यांपर्यंत चालली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचे अंतिम वाचन झाले. त्यावर साधक-बाधक चर्चा झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी करून घटना संमत झाल्याचे जाहीर केले. *(डॉ. सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. १७)* २६ जानेवारी १९५० रोजी ही घटना भारतासाठी लागू करण्यात आली आणि भारत हा प्रजासत्ताक म्हणून जगाच्या क्षितिजावर उदयास आला.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीवर भाष्य करा.

## ३.५ भारताच्या राज्यघटनेच्या इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका

भारतीय राज्यघटनेचा इतिहास म्हणजे केवळ कायद्याचा दस्तऐवज तयार करण्याचा इतिहास नव्हे, तर तो भारताच्या सामाजिक परिवर्तनाचा, लोकशाही मूल्यांचा आणि समतेसाठी चाललेल्या संघर्षांचा इतिहास आहे. या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांचे स्थान अत्यंत गौरवाचे, नेतृत्वाचे आणि निर्णायक आहे. त्यांनी केवळ भारतीय घटनेचे मसुदा लेखन केले नाही, तर भारताला एक सामाजिकदृष्ट्या समावेशक, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही राष्ट्र बनवण्याचे भव्य कार्य केले. त्यांच्या विचारांनी आणि कृतींनी भारतीय राज्यघटनेला एक सजीव आत्मा दिला, जो आजही राष्ट्राच्या प्रत्येक निर्णयात स्पंदनशील आहे.

डॉ. आंबेडकर हे जन्मतः अस्पृश्य मानल्या गेलेल्या महार समाजात जन्मले, आणि त्यांनी बालपणापासूनच जातीय भेदभावाचा भोग घेतला. ही सामाजिक पार्श्वभूमी त्यांना केवळ संघर्ष करायला शिकवून गेली नाही, तर न्यायाच्या मूल्यांबाबत गाढ जागरूकतेची बीजे त्यांच्या मनात रोवली. त्यांनी शिक्षणाचा आधार घेत जागतिक पातळीवरील उच्च शिक्षण मिळवले आणि कायदा, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान या क्षेत्रांत प्रभुत्व संपादन केले. या साऱ्या विचारांचा प्रभाव त्यांच्या संविधान निर्मितीच्या कार्यावर स्पष्ट दिसून येतो.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीसाठी १९४६ साली स्थापन झालेल्या संविधान सभेची रचना इंग्रजी कॅबिनेट मिशन प्लॅननुसार झाली होती. ही सभा भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या नव्या शासनव्यवस्थेचा पाया घालणार होती. सुरुवातीला डॉ. आंबेडकर यांना थेट या सभेवर निवड मिळाली नव्हती, परंतु बंगालमधील शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनच्या पाठिंब्यामुळे त्यांना शेवटी घटनासभेवर निवडण्यात आले. त्यानंतर २९ ऑगस्ट १९४७ रोजी, संविधानसभेने मसुदा तयार करण्यासाठी गठीत केलेल्या सात सदस्यीय समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर ते भारताच्या संविधान निर्मितीचे नेतृत्व करत भारतीय इतिहासातील सर्वांत महत्त्वाचे कार्य पार पाडू लागले.

संविधान तयार करताना डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजाची सामाजिक, धार्मिक, भाषिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विविधता लक्षात घेऊन एक अशी राज्यघटना तयार केली, जी प्रत्येक घटकाला न्याय देईल. त्यांच्यासाठी संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संकलन नव्हता, तर तो सामाजिक क्रांतीचा दस्तऐवज होता. त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, 'राजकीय स्वातंत्र्याच्या जोडीने जर सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले नाही, तर ती स्वातंत्र्य केवळ वरवरची असेल.'

त्यांनी 'मूलभूत अधिकारां'चा समावेश करून भारतीय नागरिकांना व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, समानतेचा हक्क, आणि शोषणविरुद्ध संरक्षण यांसारखे हक्क दिले. विशेषतः त्यांनी समतेच्या संकल्पनेवर भर दिला, कारण भारतीय समाजात असमानतेचे विष खोलवर रुजलेले होते. जातीय अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार आणि भेदभाव यांचा अंत व्हावा, यासाठी त्यांनी संविधानाच्या अनुच्छेद १७ मध्ये अस्पृश्यता निर्मूलनाची तरतूद केली, ज्यामुळे अस्पृश्यतेचा कायदेशीररित्या अंत झाला.

या हक्कांसोबतच त्यांनी 'राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' ही संकल्पना भारतीय घटनेत समाविष्ट केली. ही तत्त्वे सरकारला सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या दिशेने कार्य करण्यासाठी दिशानिर्देश देतात. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, समान वेतन, स्त्री-पुरुष समानता, रोजगाराची हमी, आणि सामाजिक सुरक्षेचे विचार सामावलेले आहेत. ही

तत्त्वे संविधानाच्या आत्म्याचा भाग आहेत, जरी ती थेट न्यायालयात अंमलबजावणीस पात्र नसली तरी.

डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या हक्कांसाठीही विशेष प्रयत्न केले. त्यांच्याच नेतृत्वाखाली हिंदू कोड बिल तयार करण्यात आले, ज्यामध्ये स्त्रियांना विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक घेण्याचे हक्क बहाल करण्यात आले होते. हे बिल स्त्रियांसाठी क्रांतिकारी ठरणार होते, पण त्या काळातल्या परंपरावादी लोकांनी त्याला विरोध केला. परिणामी, डॉ. आंबेडकरांनी आपल्या तत्त्वनिष्ठ भूमिकेवर ठाम राहून केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा दिला. या कृतीतून त्यांची मूल्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि समाजातील दुर्बल घटकांबद्दलची बांधिलकी प्रकर्षाने दिसून येते.

त्यांनी भारतीय घटनेत धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट पाया घातला. त्यांच्या मते, भारतात कोणत्याही व्यक्तीला त्याच्या धर्मावर आधारित भेदभाव न करता, सर्व धर्मांबाबत समभावाची आणि सहिष्णुतेची भूमिका ठेवणारी शासनव्यवस्था असावी. त्यांनी लोकशाहीची संकल्पना ही केवळ मत देण्याच्या अधिकारापुरती मर्यादित न ठेवता, ती सामाजिक बंधुता, व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि आत्मसन्मान यांच्याशी जोडली.

त्यांची आणखी एक महत्त्वाची भूमिका म्हणजे संविधानात दुरुस्तीची तरतूद करणे. त्यांच्या मते, संविधान हे स्थिर असले पाहिजे पण जडत्वयुक्त नसावे. बदलत्या काळानुसार समाजाच्या गरजांनुसार संविधानात सुधारणा होणे आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी कलम ३६८ अंतर्गत दुरुस्ती प्रक्रिया ठरवली, जी भारतीय लोकतंत्राच्या सातत्याचा आधार बनली आहे.

भारताने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० पासून ते लागू झाले. या दिवशी भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उभा राहिला. ही घटना केवळ कायद्याची स्थापना नव्हती, तर भारताच्या आत्म्याचा पुनर्जन्म होता — आणि या पुनर्जन्माचे सर्वात मोठे योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते.

### ३.५.१ भारताच्या संविधानाचा एक शिल्पकार:

भारतीय संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष असलेल्या डॉ. बी. आर. आंबेडकर यांना एक आदर्श न्यायतज्ज्ञ म्हणून ओळखले जाते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या स्वातंत्र्यानंतर, नव्या काँग्रेस नेत्रत्वाखालील सरकारने आंबेडकरजींना राष्ट्राचे पहिले कायदा मंत्री म्हणून सेवा देण्याचे आमंत्रण दिले, जे त्यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट रोजी, आंबेडकरजींना संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष नेमले आणि त्यांच्यावर स्वातंत्र्यप्राप्त भारताचे नवीन संविधान लिहिण्याची जबाबदारी सोपवली गेली. त्यांच्या मसुदा कार्याबद्दल सहकारी व समकालीन निरीक्षकांनी खूप प्रशंसा केली.

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून, डॉ. आंबेडकर यांनी नवीन राजकारणाच्या प्रत्येक संभवित गरजेचा विचारपूर्वक अंदाज लावला. डॉ. आंबेडकर यांना राज्याच्या तीन प्रमुख स्तंभ – विधिमंडळ, कार्यकारी आणि न्यायपालिका यांच्या परस्परतेचे स्पष्ट ज्ञान होते. प्रत्येकाची कार्यक्षेत्र स्पष्ट असायला हवी आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय असायला हवी.

त्याचबरोबर, त्यांना या तीनही स्तंभांच्या मर्यादा आणि नागरिकांच्या भूमिकेचे महत्व देखील जाणवले.

डॉ. आंबेडकर सभेत फक्त दुर्बळ व अन्यायग्रस्त घटकांचे हित संरक्षित करण्यासाठी सामील झाले होते आणि त्यांना इतर कुठलेही स्वार्थ नव्हते. त्यांनी एकदा सांगितले:

“मी संविधान सभेत अनुसूचित जातीचे (Scheduled Castes) हित संरक्षित करण्याच्या ध्येयाने प्रवेश केला. मला कधीच कल्पना नव्हती की मला आणखी जबाबदार कामे करावी लागतील. म्हणूनच मला सभेने मसुदा समितीत निवडले तेव्हा आणि मग मसुदा समितीने मला अध्यक्ष नेमले तेव्हा अत्यंत आश्चर्य झाले. समितीत माझ्यापेक्षा मोठे, उत्कृष्ट व अधिक सक्षम पुरुष होते जसे की माझे मित्र सर अल्लादी कृष्णनसामी अय्यर. मला संविधान सभा आणि मसुदा समितीने माझ्यावर इतका विश्वास ठेवला, हे मला सदैव स्मरणीय राहील.”

संविधानाच्या कार्यपद्धतीबद्दल डॉ. आंबेडकर यांनी आपल्या मनातील प्रामाणिक मते मांडली की, संविधानाचे कार्य केवळ संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसते. त्यांनी असे म्हटले:

“संविधान फक्त राज्याच्या अंगांची – विधिमंडळ, कार्यकारी व न्यायपालिका – रचना करू शकते. या अंगांवर काम करणाऱ्या घटकांचा आधार लोक आणि त्यांनी उभारलेल्या राजकीय पक्षांवर असतो, जे त्यांच्या इच्छा व धोरणांची अंमलबजावणी करतात.”

भारतीय संविधानाने वेळेची कसोटी उत्तीर्ण केली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताने अनेक आव्हानात्मक कालखंड व परिस्थितीचे परीक्षण केले आहे. जर भारतीय संघ एकात्मिक राहिला असेल तर त्याचे श्रेय नक्कीच भारतीय संविधानाला जाते. डॉ. आंबेडकर यांना सन्मानित करण्याच्या अर्थाने, प्रख्यात संविधान इतिहासकार व लेखक डॉ. एम. व्ही. पायलें असे म्हणतात:

“संविधान सभेत कोणीही इतका प्रभावी व स्पष्ट विचार मांडणारा नसला, आणि तरीही त्याने नेहमीच टीकाकर्त्यांना योग्य मान्य करून त्यांचे श्रेय दिले.”

या सर्वामुळे डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे योगदान सर्वोच्च मानले जाते. ते केवळ “भारतीय संविधानाचे जनक” किंवा “मुख्य शिल्पकार” म्हणूनच नव्हे तर ते देश बांधणारे, जागतिक नेते म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना स्थिर स्वरूप दिले.

### ३.५.२ नागरी स्वातंत्र्याचे संरक्षण:

आंबेडकरजींनी तयार केलेल्या मसुदा मजकुरात वैयक्तिक नागरी स्वातंत्र्यांचे विस्तृत संवैधानिक हमीपत्र व संरक्षण दिले गेले — जसे की धर्मशेष स्वातंत्र्य, अस्पृश्यता निर्मूलन व प्रत्येक प्रकारच्या भेदभावाला बंधनकारकपणे थांबविणे. आंबेडकरजींनी महिलांसाठी विस्तृत आर्थिक व सामाजिक अधिकारांची मागणी केली, तसेच सामान्य सेवांमध्ये, शाळा आणि महाविद्यालये यासारख्या ठिकाणी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सदस्यांसाठी नोकरी आरक्षित करण्याची व्यवस्था आणण्याकरिता संविधान सभेचा पाठिंबा जिंकून घेतला. भारतीय कायदेतज्ज्ञांनी आशा दर्शविली की, या उपाययोजनेद्वारे भारताच्या

अवमानित घटकांमधील सामाजिक-आर्थिक असमानता व संधींचा अभाव दूर झाला पाहिजे; ही व्यवस्था सुरुवातीला आवश्यकतेनुसार तात्पुरती ठरवण्यात आली होती. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने संविधान अंगिकारले. आपले काम पूर्ण झाल्यानंतर आंबेडकरजींनी असे म्हटले:

"मला वाटते की संविधान वापरण्यायोग्य आहे; ते लवचिक आहे आणि युद्ध किंवा शांततेच्या काळात देशाला एकत्र बांधून ठेवण्यासाठी ते पुरेसे मजबूत आहे. खरंच, जर नवीन संविधानाखाली काही चुकले तर त्याचे कारण वाईट संविधान नव्हे, तर मानवाचाच वाईटपणा असेल."

ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी डॉ. आंबेडकर यांच्याद्वारे मसुदा केलेल्या भारतीय संविधानाचे वर्णन "सर्वप्रथम एक सामाजिक दस्तऐवज" म्हणून केले आहे. त्यांनी असेही म्हटले की:

"भारताच्या संविधानातील बहुसंख्य तरतुदी थेट सामाजिक क्रांतीच्या उद्देशाला पुढे नेण्यासाठी किंवा सामाजिक क्रांतीला साध्य करण्याच्या अटी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात."

या सर्व अद्वितीय योगदानांमुळे डॉ. आंबेडकर यांना वास्तवातच भारतीय संविधानाचा शिल्पकार म्हटले जाऊ शकते.

### ३.५.३ संविधानाचा मूलभूत मापदंड:

संविधानाची रचना करणं कधीच सोपे नसतं. त्यासाठी उच्चतम राजकीय कौशल्य, साहस, शैक्षणिक ज्ञान, बौद्धिक प्रगल्भता आणि देश व जगाच्या इतिहासाचं विस्तृत ज्ञान आवश्यक असतं. आंबेडकरजींना संविधान केवळ देशाच्या शासकीय नियमांचा आधारभूत कायदा नव्हता, तर तो राष्ट्राच्या प्रगतीचं वाहतूक साधन होता. तो भूतकाळातील उत्कृष्ट परंपरा, वर्तमानाच्या गरजा पूर्ण करणारा आणि भविष्यातील आवश्यकतांसाठी पुरेशी लवचिकता असलेला होता. त्याचबरोबर, त्यांचा असा विश्वास होता की संविधान हा एक "जीवंत अंग" असला पाहिजे, जो फक्त एका किंवा दोन पिढ्यांसाठी नव्हे तर आगामी पिढ्यांसाठी कार्यरत राहावा. या दृष्टीने, संविधानाच्या तरतुदी सामान्य व व्यापक भाषेत मांडल्या गेल्या आहेत.

### ३.५.४ मूलभूत अधिकार सुनिश्चित करण्यासाठी:

संविधानाचे हृदय म्हणजे प्रत्येक नागरिकाला दिलेले मूलभूत अधिकार व कार्यकारी व विधानसभेसाठी शासनाच्या दिशानिर्देशात्मक तत्त्वांचे वर्णन. या अधिकारांची संकल्पना अशी आहे की नागरिकांना काही मूलभूत अधिकारांची हमी दिली जावी ज्यायोगे ते विधिमंडळीय मतांच्या बदलाच्या वाटचालीत ठेवले जाणार नाहीत. मूलभूत अधिकारांचा अध्याय माणसाची प्रतिष्ठा सुनिश्चित करतो आणि जातीव्यवस्था मुक्त, वंश, वर्ग-रहित व एकरूप समाज निर्माण करण्यावर भर देतो. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी असे म्हटले:

"डॉ. आंबेडकरजींनी भारताच्या संविधानाच्या रचनेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. संविधानाच्या रचनेत कोणीही त्यांच्यापेक्षा अधिक काळजी व मेहनत घेतलेली नाही."

त्यांनी स्वातंत्र्यप्राप्त भारतीय राष्ट्राच्या इतिहासात एक अद्वितीय आणि अटळ स्थान निर्माण केले. भारतीय संविधान जीवंत असेपर्यंत बाबासाहेब आंबेडकरजींचे नाव अमर राहील.

### ३.५.५ स्वीकारलेल्या लोकशाही प्रणालीसाठी:

आंबेडकरजींना हे ठाऊक होते की केवळ संविधानात लोकशाही पद्धतीचा अंगीकार करणे पुरेसे नाही. समाजातील समानता, कायद्यासमोर आणि प्रशासनासमोर समानता, संवैधानिक सदाचार, बहुसंख्यतेच्या अत्याचाराचा अभाव व सार्वजनिक चेतनेचा विकास या गोष्टी भारतात लोकशाहीची यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. आंबेडकरजींच्या मते लोकशाहीची मुख्य अट म्हणजे समाजातील समानता, कारण समानतेवरच स्वातंत्र्य व मैत्रीभावना आधारित असतात. त्यांनी असे म्हटले की, समानता ही मूळ संकल्पना आहे आणि मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान हाच त्याचा प्रतिबिंब आहे. जर समानता नाकारली गेली तर इतर सर्व गोष्टींचा नकार होऊ शकतो.

### ३.५.६ सामाजिक-आर्थिक समानता सुनिश्चित करण्यासाठी:

डॉ. आंबेडकर यांनी हेही मान्य केले की संविधानामध्ये मांडलेल्या उच्चतम आदर्शांचे स्वरूप समाजातील अंतर्निहित विरोधाभासांच्या मुळे जशीची तसेच राहतील. सामाजिक आणि आर्थिक पातळीवर समानतेचा अभाव हे विरोधाभास निर्माण करतो. यामुळे समाजात काही लोकांचा उच्चवर्गीकरण तर काहींच्या पतनाची स्थिती निर्माण होते. आर्थिक दृष्टिकोनातून, काही लोकांकडे अपार संपत्ती असते तर बहुतांश लोक बेरोजगारी व अत्यंत गरिबीत जगतात. सामाजिक आणि आर्थिक जीवनातील समानतेचा नकार केल्यास राजकीय लोकशाही संकटात येईल. जर विरोधाभास दूर केले नाहीत तर, जे लोक असमानतेचा सामना करतात ते राजकीय लोकशाहीच्या रचनेला उध्वस्त करू शकतील, जी संविधान सभेने खूप परिश्रमाने बांधली आहे.

### ३.५.७ संविधानाबद्दल निरीक्षणे:

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. आंबेडकर यांनी केलेली निरीक्षणे भविष्यसूचक आणि आजच्या राजकीय परिस्थितीला अनुकूल आहेत. प्रत्येक चांगल्या संविधानासाठी देखील अंतिम परिणाम वाईट होऊ शकतो कारण ते कार्यान्वित करणाऱ्या लोकांची गुणवत्ता महत्त्वाची असते. तसेच, जरी संविधान वाईट असले तरी ते उत्तम देखील होऊ शकते जर ते कार्यान्वित करणारे लोक चांगले असतील. संविधानाचे कार्य हे पूर्णपणे त्याच्या स्वरूपावर अवलंबून नसते. संविधान फक्त राज्याची अंगके – विधिमंडळ, कार्यकारी व न्यायपालिका – पुरवू शकते. या अंगांच्या कार्यावर लोक व त्यांनी उभारलेल्या राजकीय पक्षांचा प्रभाव असतो, जे त्यांच्या इच्छा व धोरणांची अंमलबजावणी करतात. म्हणूनच, लोक व त्यांच्या पक्षांचा भाग लक्षात न घेता संविधानावर काही निर्णय घेणे बेकार आहे.

भारतीय संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. तो मूलभूत राजकीय तत्त्वे, संरचना, कार्यपद्धती, शक्ती व कर्तव्ये निर्धारीत करतो तसेच नागरिकांचे मूलभूत अधिकार, निर्देशक तत्त्वे आणि कर्तव्ये स्पष्ट करतो. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्याकडून तयार केलेल्या मजकुराने नागरी स्वातंत्र्यासाठी विस्तृत संवैधानिक हमी व सुरक्षा प्रदान केली.

यात धर्मशेष स्वातंत्र्य, स्पृश्यतेचा निलंबन आणि सर्व प्रकारच्या भेदभावाविरुद्धची कारवाई यांचा समावेश होतो. तसेच, आंबेडकरजींनी महिलांसाठी व्यापक आर्थिक व सामाजिक अधिकारांसाठी काम केले, आणि अनुसूचित जाती व जमाती सदस्यांसाठी नोकरी आरक्षणाची व्यवस्था आणण्यासाठी संविधान सभेचा पाठिंबा जिंकला. भारतीय कायदेतज्ज्ञांनी सामाजिक-आर्थिक असमानता आणि संधींच्या अभावाला दूर करण्यासाठी हा उपाय घेतला होता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान अंगिकारले गेले. १९५१ मध्ये, डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलच्या चर्चेतून त्यांचा राजकारणी वाटा स्पष्ट करताना केबिनेटमधून राजीनामा दिला. १९५२ मध्ये त्यांनी स्वतंत्रपणे लोकसभेच्या निवडणुकीत स्पर्धा केली, परंतु ते हरले. त्यानंतर मार्च १९५२ मध्ये त्यांना राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आणि ते मृत्यूपर्यंत सदस्य राहिले.

भारतीय संविधानाच्या रचनेमध्ये त्यांच्या मौलिक भूमिकेमुळे डॉ. भीमराव आंबेडकर यांना "भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार" म्हणून ओळखले जाते. सामाजिक अयोग्यतेचे निवारण करण्यासाठी त्यांचे प्रयत्न उल्लेखनीय होते आणि म्हणूनच त्यांना भारतीय समाजातील दलित व दणकलेल्या लोकांचे "मोक्षदाता" म्हटले जाते. डॉ. आंबेडकर यांची संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आणि त्यांच्या तयार केलेल्या मजकुरात नागरिकांसाठी धर्मशेष स्वातंत्र्य, स्पृश्यतेचा निलंबन आणि भेदभाव नाकारण्याच्या बाबतीत संवैधानिक हमी मिळते. ते महिलांसाठी व्यापक आर्थिक व सामाजिक अधिकारांसाठीही काम करणारे होते, तसेच अनुसूचित जाती व जमातीसाठी नोकरी आरक्षणाची व्यवस्था आणण्यासाठी संविधान सभेचा पाठिंबा मिळवणारे होते. त्यांनी संविधानाच्या तरतुदींना लवचिक ठेवले जेणेकरून परिस्थितीनुसार त्यांमध्ये बदल केले जाऊ शकतील. त्यांनी एक प्रेरणादायी प्रस्तावना दिली ज्यात न्याय (सामाजिक, आर्थिक व राजकीय), स्वातंत्र्य, समानता व मैत्रीभावना सुनिश्चित केल्या गेल्या. तरीही, एक समसमान सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा त्यांचे स्वप्न आजही पूर्णत्वास आलेले नाही.

डॉ. आंबेडकर हे केवळ एक प्रख्यात शास्त्रज्ञ व न्यायतज्ज्ञ नव्हते तर सामाजिक अयोग्यताविरुद्ध लढणारे क्रांतिकारीही होते. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात दलित व इतर सामाजिकदृष्ट्या मागास वर्गांच्या हक्कांसाठी त्यांचा संघर्ष स्मरणीय आहे. ते एक महान राष्ट्रीय नेते व आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रतिष्ठित विद्वान म्हणून ओळखले जातात. त्यांनी केवळ सामाजिक प्रगतीसाठी आंदोलने चालवली नाहीत तर जाती, धर्म, संस्कृती, संवैधानिक कायदा व आर्थिक विकास यावर आपले शास्त्रीय लेखन करून भारतीय समाजाच्या समस्यांचे सूक्ष्म निरीक्षण केले. ते एक अर्थशास्त्रज्ञही होते ज्यांचे विविध शास्त्रीय लेख व भाषणे भारतीय समाजाच्या समस्या यांचं गहन ज्ञान दर्शवितात. त्यांना राष्ट्राचे पहिले कायदा मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आणि १९९० मध्ये त्यांना भारतरत्नाने सन्मानित करण्यात आले. त्यांनी भारतीय संविधानाच्या रचनेमध्ये महत्त्वपूर्ण वाटा उचलला आणि आपल्या अनुभव व ज्ञानाचा पूर्ण वापर करून एक सर्वसमावेशक व वापरण्यायोग्य संविधान तयार केले. ते स्वातंत्र्यप्राप्त भारताला त्याची कायदेशीर रचना देणारे होते आणि लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याचा पाया देणारे होते. या दृष्टीने त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे, भरपूर आणि अप्रतिम ठरले. डॉ. आंबेडकर यांचे मुक्त भारताच्या

विकासाकडे केलेले प्रयत्न सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय सुनिश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून अतुलनीय आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारताच्या संविधानिक इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका स्पष्ट करा.

## ३.६ भारतीय राज्यघटनेची मुख्य वैशिष्ट्ये

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत भारताच्या घटनेची उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत. कायद्याच्या दृष्टीने ही प्रस्तावना म्हणजे घटनेचा भाग नसला तरी ती भारतीय राज्यघटनेची आधारशिला आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारतीय नेत्यांनी जे आदर्श जोपासले होते त्यांचा आविष्कार राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत झालेला आहे. ***"आम्ही भारताचे लोक भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक बनवण्यासाठी तसेच त्याच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म व उपासनचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा व संधीची समानता देण्याकरिता व त्या सर्व लोकांची प्रतिष्ठा,राष्ट्राचे ऐक्य व अखंडता सुनिश्चित करणारा बंधुभाव वाढवण्यासाठी दृढ संकल्प होऊन आपल्या या घटनेला आज २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीत अंगीकृत, अधिनियमित आणि आत्मार्पित करीत आहोत"***. *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेल्हेकर : ५०७)* अशा प्रकारे भारताच्या राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत भारताच्या मानवतावादी आदर्शांचे प्रतिबिंब उमटलेले आहे. माणसामाणसातील उच्च-नीच हा भेदभाव नष्ट करून सर्वांना समान पातळीवर आणण्याचे उद्दिष्ट त्यावरून स्पष्ट होते. शिवाय राष्ट्राच्या घटनेचे उगमस्थान कोणते, राज्यव्यवस्थेचे स्वरूप कसे राहणार व त्या राज्यव्यवस्थेचा प्रमुख उद्देश कोणता हे ही त्यावरून स्पष्ट होते. त्या अनुषंगाने भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. प्रदीर्घ लिखित घटना:**

भारताची राज्यघटना इंग्लंडच्या घटनेप्रमाणे अलिखित नसून ३९५ कलमे व ८ परिशिष्ट यांची मिळून एक प्रदीर्घ लिखित घटना आहे. इंग्लंडची राज्यघटना अलिखित आणि उत्क्रांत आहे. मॅग्नाचार्टा पासून आज पर्यंत वेळोवेळी झालेल्या कायद्यातून, रूढी प्रथा-परंपरेतून त्या देशाचा राज्यकारभार चालतो म्हणून ती अलिखित आहे. मात्र आपली भारतीय राज्यघटना मुद्दाम जाणीवपूर्वक तयार करण्यात आली म्हणून तिचे स्वरूप लिखित आहे. जगातील इतर देशांच्या घटनांची तुलना केल्यावर असे लक्षात येते की भारताची घटना प्रदीर्घ आहे. चीनची राज्यघटना १०७ कलमांची, ऑस्ट्रेलियाची १२४, कॅनडा १४७, अमेरिकेची ७ कलमांची आणि दक्षिण आफ्रिकेची १५४ कलमांची राज्यघटना आहे. त्यामानाने भारताची राज्यघटना खूपच प्रदीर्घ स्वरूपाची आहे कारण घटक राज्यांना स्वतःच्या घटना नाहीत, त्यांच्या प्रशासनाचा समावेश एकाच घटनेत करण्यात आलेला आहे. तसेच लोकसेवा आयोगापासून निर्वाचन आयोगापर्यंत सर्व माहिती यात तपशिलाने दिली आहेत. राज्यांनी कोणकोणती कामे करावी त्याचाही उल्लेख यात आहे. अधिकारांचे उल्लंघन झाले तर कोणत्या घटनात्मक उपयोजना आखाव्यात याचेही तपशीलवार वर्णन घटनेमध्ये केलेले आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्यांचेही विस्तृत वर्णन आपल्या

राज्यघटनेत केलेले आहे. संकटकाळात कोणता मार्ग काढावा याचाही भाग घटनेत आला आहे. त्यामुळे तिचे स्वरूप विस्तृत झाले आहे. एकूणच केंद्र व राज्य सरकार यांचे स्वरूप, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, न्यायपालिका, संघ व घटक राज्यांच्या अधिकारांची विभागणी, निर्वाचन आयोग इत्यादी सर्वच बाबींचा खुलासेवार तपशील घटनेत असल्याने भारताची घटना कोणत्याही राष्ट्राच्या राज्यघटनेपेक्षा प्रदीर्घ अशी आहे.

**२. विविध देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव:**

भारतीय राज्यघटना तयार करत असताना त्यावर विविध देशांच्या राज्यघटनेचा प्रभाव पडलेला दिसून येतो. संसदीय लोकशाही इंग्लंडच्या धर्तीवर आधारलेली आहे तर मूलभूत हक्कांचा आधार हा अमेरिकन राज्यघटना आहे. राज्यांची मार्गदर्शक तत्वे ही आयर्लंडच्या घटनेवरून घेतलेली आहे. जर्मनीच्या राज्यघटनेतून आणीबाणी विषयक तरतुदींचा समावेश भारतीय राज्यघटनेत करून कठीण परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा याची तरतूद केलेली आहे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्याकडील रचनेप्रमाणे आपण विकेंद्रात्मक स्वरूपाचे संघराज्य स्वीकारले असून केंद्र आणि राज्यांच्या अधिकारांची व कामाची वाटणी केलेली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांप्रमाणे भारताचा राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख असला तरी तो शासन प्रमुख नाही. तो इंग्लंडच्या राजाप्रमाणे नामधारी राष्ट्रप्रमुख असून राष्ट्राच्या ऐक्याचे प्रतीक आहे. अशाप्रकारे भारताची परिस्थिती व आकांक्षा यांचा संदर्भ लक्षात घेऊन घटनेचे स्वरूप निश्चित करण्यात आले आहे.

**३. संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार:**

भारतीय घटनेनुसार भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. ब्रिटिशांच्या राजकीय व्यवस्थेकडून आपण ही पद्धती स्वीकारलेली आहे. ब्रिटिशांच्या काळात ही व्यवस्था आपल्याकडे विकसित झाली. या व्यवस्थेनुसार केंद्र आणि राज्यात दोन्ही ठिकाणी जनतेद्वारे निवडलेल्या बहुमत असलेल्या पक्षाचे सरकार सत्तेवर येते. केंद्रामध्ये पंतप्रधान व राज्यामध्ये मुख्यमंत्री हे शासनाचे वास्तविक प्रमुख असतात. त्याचप्रमाणे राष्ट्रपती आणि राज्यपाल ही घटनात्मक नामधारी प्रमुख असतात. कार्यकारी मंडळ विधानमंडळाला म्हणजेच लोकप्रतिनिधींना जबाबदार असते म्हणजे खरी सत्ता लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती असते. लोकप्रतिनिधींची निवड सार्वत्रिक प्रौढ मताधिकार व गुप्त मतदान पद्धतीने केली जाते.१८ वर्षावरील सर्व भारतीय नागरिकांना कोणत्याही प्रकारे वंश, धर्म, जात, स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता मतदान करण्याचा अधिकार दिला गेला आहे. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५: पृ. २४)*

**४. संघराज्यात्मक शासनपद्धतीचा स्वीकार:**

भारतीय राज्यघटनेने संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक विविधता असलेल्या आणि प्रचंड भूभाग असलेल्या देशाला संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारावी लागते. या पार्श्वभूमीवर भारताने संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारली आहे. विकेंद्रातमक प्रवृत्तीतून संघराज्य निर्माण होत असते.आज भारतात एक केंद्र सरकार आणि २९ घटक राज्य आहे. भारताचा भूप्रदेश फार मोठा

असल्यामुळे भारतात संघराज्य पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. संघराज्यात एक केंद्र सरकार व अनेक घटक सरकारे असतात. केंद्र व राज्यात अधिकाऱ्यांचे वाटप झालेले असते. भारतात केंद्र सूची, राज्य सूची आणि समवर्ती सूची द्वारे अधिकार व कामाचे वाटप झालेले आहे. केंद्राला अधिक अधिकार तर राज्यांना कमी अधिकार आहेत. देशाच्या परिस्थितीच्या संदर्भातून विचार केल्याने ही रचना अधिक फायदेशीर ठरली आहे. संघराज्यात केंद्र व राज्य यांच्यातील तंटे मिटवण्यासाठी निपक्षपाती अशी संस्था म्हणजे सर्वोच्च न्यायालय असते. ही सर्व वैशिष्ट्ये भारतीय राज्यघटनेत दिसून येतात, म्हणून ही संघराज्य पद्धती आहे. राज्यघटना, केंद्र व घटक राज्य यांच्यात अधिकार विभागणी, स्वतंत्र न्यायपालिका ही भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये संघात्मक असली तरी शक्तिशाली केंद्र, केंद्र व घटक राज्य यांची समान घटना, एकेरी न्यायव्यवस्था व एकेरी नागरिकत्व, संकटकालीन घोषणा करण्याचा किंवा घटक राज्यांच्या सीमेत बदल करण्याचा संसदेला असलेला अधिकार ह्या गोष्टी एकात्मकतेच्या द्योतक आहे. म्हणजेच भारतीय राज्यघटनेचे स्वरूप संघात्मक असले तरी मूळ गाभा मात्र एककेंद्रात्मक आहे. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. २६)*

**५. लोकांचे सार्वभौमत्व:**

भारतीय घटनेने लोकांचे सार्वभौमत्व हे तत्त्व प्रस्थापित केले आहे. घटनेची सुरुवात भारतीय जनतेच्या नावाने करण्यात आली आहे. भारत हे प्रजासत्ताक गणराज्य असेल असे त्यात स्पष्ट केले आहे. राज्यकारभारातील संपूर्ण अधिकार जनतेच्या हाती देण्यात आले आहेत. भारतात सरकार जनतेच्या प्रतिनिधींचे असेल, लोकांचे कल्याण हेच शासनाचे ध्येय असेल, राष्ट्र प्रमुखांची निवडणूक जनतेचे प्रतिनिधी करतील, घटनेत बदल करण्याचा अंतिम अधिकार जनतेच्या प्रतिनिधींचा असेल, या सर्वच तत्त्वांमूळे भारतीय राज्यघटनेने लोकांचे सार्वभौमत्व स्वीकार केलेले आहे.

**६. धर्मनिरपेक्षता:**

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्ष राज्याची निर्मिती केली आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मविरोध किंवा अधार्मिकता नव्हे किंवा धर्मावर विश्वास नसणे हा अर्थ नसून राज्याने कोणत्याही धर्माशी विशेष संबंध न ठेवणे होय. भारतीय घटनेने सर्व धर्मांना समान संधी व वागणूक दिली. धर्माच्या आधारावर येथे कोणताही भेदभाव पाळला जाणार नाही. प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य व उपासना स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतता समितीने भारतातील सर्वधर्मसमभावाचे कौतुक करून या तत्त्वाला उत्तेजन दिले आहे. घटनेनुसार प्रत्येकाला सार्वजनिक ठिकाणी मुक्त प्रवेश करता येईल. प्रत्येकाला आपल्या धर्मानुसार आचार, विचार व शिक्षणाचे स्वातंत्र्य असेल. हेच घटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप होय. आमची राज्यघटना धर्मविरोधी किंवा धर्मदिष्टीत नाही तर धर्मनिरपेक्ष आहे म्हणजेच विशिष्ट धर्म हा राज्याचा आधार नाही, यावरून हे सिद्ध होते की,राज्य कोणाच्याही धर्मात ढवळाढवळ करणार नाही. तरी पण नागरिकांच्या व्यापक हितासाठी आवश्यक वाटल्यास राज्य काही बाबतीत हस्तक्षेप करू शकेल. ४२व्या घटना दुरुस्तीनंतर धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा समावेश घटनेच्या उद्देशपत्रिकेतच करण्यात आल्यामुळे जगाच्या मोजक्या धर्मनिरपेक्ष देशात भारताचा समावेश झाला आहे.

### ७. मूलभूत अधिकार:

भारतीय राज्यघटनेतील कलम १२ ते ३५ नागरिकांच्या मूलभूत हक्काविषयी आहे. भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर भर देण्यात आला आहे. म्हणून ग्रॅनव्हिल आस्टिनने मूलभूत हक्कांना भारतीय घटनेचा आत्मा मानले आहे. नागरिकांना मिळत असलेल्या मूलभूत अधिकारावरूनच राज्याची उपयुक्तता लक्षात येत असते. या मूलभूत अधिकाराने प्रत्येकाला सुरक्षितता, समता व प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणारे हे हक्क असून घटनादुरुस्ती केल्याशिवाय हे मूलभूत अधिकार कोणालाही काढून घेता येत नाही. मुख्य म्हणजे मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी खास घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. समतेचा अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार, शोषनाविरुद्धचा अधिकार, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, सांस्कृतिक अधिकार आणि शेवटचा घटनात्मक उपाययोजना. या सात मूलभूत अधिकारांचा निर्देश घटनेत करण्यात आला आहे. पहिल्या सहा अधिकारांच्या रक्षणाकरता सातव्या अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना दिलेली मान्यता लोकशाहीतील जनकल्याणाची हमी मानले जाते.

### ८. राज्यांची मार्गदर्शक तत्त्वे:

देशाचे शासन जास्तीत जास्त लोककल्याणकारी स्वरूपाचे असावे या हेतूने मार्गदर्शक तत्वे राज्यघटनेत नमूद करण्यात आली आहे. ही तत्त्वे निश्चित करताना आयर्लंडच्या घटनेचा प्रामुख्याने आधार घेतलेला आहे. भारताने कल्याणकारी राज्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार जनतेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना कार्यान्वित कराव्या लागतात. सामाजिक न्याय, समान संधी, समता व समाजवाद या कल्याणकारी मूल्यांची हमी घटनेच्या उद्देशांमध्ये दिलेली आहे. या तत्त्वाला अनुसरून धोरणे आखावी लागतात व त्याची कार्यवाही करावी लागते. एवढे प्रचंड कार्य केवळ केंद्र सरकारकडून पूर्ण होऊ शकत नाही, म्हणून जनकल्याणाची भूमिका गृहीत धरून राज्यांनी काही कामे करावीत या उद्देशाने राज्यघटनेच्या चौथ्या प्रकरणात राज्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्य, समता, संधी, सामाजिक न्याय यांची पूर्तता करण्यासाठी या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग होतो. जनतेच्या इच्छा आकांक्षा यातून साकार होऊ शकतात, समाजाची व त्यातून राष्ट्राची प्रगती करण्याची ते एक साधन ठरू शकते, सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा पाया यातून मजबूत केल्या जाऊ शकतो. मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी राज्यांच्या इच्छेवर असून त्याबाबत सक्ती करता येत नाही, म्हणजे मार्गदर्शक तत्वे हे न्यायालयाच्या कक्षेबाहेर आहेत. परंतु गेल्या काही वर्षांपासून न्यायालयाने सुद्धा मार्गदर्शक तत्त्वांना प्राधान्य देणारे निवाडे दिलेले आहेत. अशाप्रकारे शासनाच्या दृष्टीने ही तत्वे नीतिनिर्देशक असतात. मूलभूत अधिकारांना जसा कायद्याचा पाठिंबा आहे तसा तो मार्गदर्शक तत्वांना नाही. परंतु शासकीय कामकाज चालवतांना या मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालावे अशी अपेक्षा घटनेमध्ये नमूद केली आहे. त्या तत्वांच्या पाठीशी जनमताची शक्ती असल्याने कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी त्याला मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणे सहजासहजी शक्य होत नाही.

**९. प्रौढ मताधिकार:**

नागरिकत्व बहाल करताना घटनेने जे उदार धोरण स्वीकारले आहे, तेच प्रौढ मतदान पद्धती बाबतही स्वीकारले आहे. यानुसार अठरा वर्षाच्या वरील सर्व स्त्री-पुरुषांना निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. त्यासाठी धर्म, जात, वंश, भाषा, प्रांत, लिंगभेद आशा कोणत्याही गोष्टीचा अडथळा येऊ शकणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे. या पद्धतीमुळे भारतात लोकशाही खऱ्या अर्थाने निर्माण झाली आहे.

**१०. मूलभूत कर्तव्यांचा समावेश:**

४२व्या घटना दुरुस्तीने घटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला गेला. त्यानुसार नागरिक ज्याप्रमाणे मूलभूत अधिकारांची मागणी करू शकतात त्याचप्रमाणे काही कर्तव्यांचे बंधने त्यांच्यावर टाकण्यात आले आहे. रशियन राज्यघटनेत आणि जर्मन राज्यघटनेत कर्तव्य समाविष्ट करण्यात आली आहेत त्याचा प्रभाव आपल्या राज्यघटनेवर पडलेला आहे. त्यामुळे अधिकारांबरोबर कर्तव्यांचाही समावेश भारतीय राज्यघटनेत केला गेलाआहे. राज्यघटना, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाचा मान ठेवणे, स्वातंत्र्यलढ्यातील उदात्ततत्वांचे जतन करणे, भारताच्या सार्वभौमत्वाचे व ऐक्याचे रक्षण करणे, देश संरक्षणासाठी वाहून घेणे, भातृभाव वृद्धिंगत करून महिलांची प्रतिष्ठा जतन करणे, विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृतीचा आदर करणे, नैसर्गिक वातावरणाचे जतन करणे, वन्य प्राण्यांवर दया करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, हिंसेचा त्याग करणे अशी काही प्रमुख मूलभूत कर्तव्य घटनेत सांगितलेली आहे. केवळ अधिकार मागायचे त्या बदल्यात कर्तव्य मात्र काहीच करायचे नाही असे चित्र निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर कर्तव्यांची नोंद महत्त्वाची ठरली आहे. असे असले तरी मूलभूत कर्तव्यांचा समावेश घटनेच्या प्रकरणचारमध्ये करण्यात आल्यामुळे त्यांना न्यायालयाचे पाठबळ मिळत नाही.

**११. एकेरी नागरिकत्वाचा स्वीकार:**

अमेरिकेने दुहेरी नागरिकत्वाची पद्धती स्वीकारलेली आहे. संपूर्ण अमेरिकेचे नागरिकत्व आणि तो नागरिक ज्या राज्याचा रहिवाशी आहे त्या राज्याचे नागरिकत्व अशी दुहेरी व्यवस्था तेथे आहे. भारताने मात्र एकेरी नागरिकत्वाची पद्धती स्वीकारलेली आहे. व्यक्ती कोणत्याही घटक राज्याची रहिवासी असली तरी तो फक्त भारताचा नागरिक असतो. आपण फक्त भारताचे नागरिक आहोत, महाराष्ट्राचे किंवा तामिळनाडूचे नागरिक नाही, यालाच एकेरी नागरिकत्व म्हणतात. त्याचबरोबर नागरिकत्व देतांना जात, धर्म, वंश, लिंग, वर्ग असा कोणताही भेदभाव केला जात नाही. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना नागरिकत्व मिळू शकले. एकेरी नागरिकत्वाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ झाली व फुटीरवादी प्रवृर्तिला आळा बसला. आम्ही सर्व एक आहोत ही एकात्मतेची भावना एकेरी नागरिकत्वाच्या पद्धतीतून व्यक्त होत असते. म्हणून एकेरी नागरिकत्वाचा स्वीकार भारतीय राज्यघटनेने केलेला आहे.

**१२. स्वतंत्र न्यायपालिका:**

राजकीय सत्तेच्या दबाव न्यायदानावर येऊ नये म्हणून विधिमंडळ व कार्यकारीमंडळ यापासून भारतातील न्यायपालिका स्वतंत्र करण्यात आलेली आहे. त्यासाठी न्यायाधीशांची

नियुक्ती करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला असला तरी त्याला बडतर्फ करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला देण्यात आलेला नाही. त्याकरता विशिष्ट पद्धती घालून देण्यात आलेली आहे. न्यायाधीशांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता विवेकाने निर्णय द्यावेत म्हणून न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे. घटनेचा निर्णयाक अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायालयावर टाकल्यामुळे तर हे स्वातंत्र्य आवश्यकच ठरले आहे. भारतीय राज्यघटनेने न्यायालयीन पुनर्लोकनाचा स्वीकार अमेरिकेकडून केला आहे. या तत्त्वानुसार संसदेने पास केलेला कोणताही कायदा जर घटनाबाह्य असेल आणि त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा येत असेल तर असा कायदा रद्द करण्याचा व घटनाविरोधी म्हणून जाहीर करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे.संसदेच्या निरंकुश अधिकारावर अशी मर्यादा टाकून घटनाकारांनी सत्ता समतोल राखला आहे. न्यायालयीन पुनर्लोकनाची तरतूद घटनेच्या कलम १३मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. समतोल आणि नियंत्रण या प्रक्रियेत कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यातील प्रत्येक शाखा दुसऱ्या शाखेवर नियंत्रण ठेवते. या सर्वात न्यायालयाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते.

### १३. ताठर आणि लवचिकतेचे मिश्रण:

भारतीय राज्यघटना अंशतः ताठर आणि अंशतः लवचिक आहे. घटना बदलण्याच्या प्रक्रियेवरून घटनाही लवचिक आहे की ताठर आहे हे ठरवलेजाते. घटना बदल जेव्हा कठीण व गुंतागुंतीचा असतो तेव्हा ती परीदृढ घटना मानली जाते. भारताच्या राज्यघटनेत काही कलमांच्या बाबतीत अशीच पद्धत ठरवण्यात आली आहे.जर समजा राष्ट्रपतीच्या निवडणूक पद्धतीत बदल घडवायचा असेल किंवा संसदेतील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व बदलायचे असेल तर घटना बदलणे अतिशय अवघड आहे. याबाबतीत बदल करायचा असेल तर संसदेच्या एकूण सभासदांचे बहुमत आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांचे दोन तृतीयांश बहुमत तसेच एकूण घटक राज्यांपैकी अर्ध्या राज्यांनी त्यास मान्यता असावी लागते. म्हणून आपली राज्यघटना काही बाबतीत ताठर आहे असे म्हणता येईल. उलट काही बाबतीत बदल करणे अतिशय सोपे आहे, जर समजा घटक राज्यांच्या नावात किंवा प्रदेशात बदल करायचे असेल किंवा घटक राज्यातील वरिष्ठ सभागृह कायम बरखास्त करायचे असेल किंवा त्याची कायम निर्मिती करायची असेल किंवा घटनेत एखाद्या नव्या भाषेचा समावेश करायचा असेल तर संसदेतील साध्या बहुमताने या संबंधित कलमात बदल करता येतो. घटनेच्या या वैशिष्ट्याबद्दल बोलताना डी. डी. बसू म्हणतात की, “आपली राज्यघटना जेवढ्या प्रमाणात लवचिक आहे तेवढ्या प्रमाणात दृढ मात्र नाही” घटनादुरुस्तीची पद्धत ३६८व्या कलमात स्पष्ट करण्यात आलेली आहे. राज्यघटना बदलणे हे राज्यकर्त्यांच्या लहरींवर अवलंबून असू नये याची काळजी घटनाकारांनी घेतलेली आहे. अशाप्रकारे भारतीय राज्यघटना लवचिक असली तरी त्यात सहजासहजी बदल करता येत नाही.

### १४. प्रगत राज्यघटना:

जनतेच्या गरजेप्रमाणे वाढत्या इच्छा आकांक्षाप्रमाणे राज्यघटनेत योग्य ते कालमानाप्रमाणे बदल करून तिची वाढ करावी लागते, अशा घटनेला प्रगत राज्यघटना म्हणतात.

भारताच्या राज्यघटनेमध्ये काळानुरूप बदल करण्याच्या सोय केलेली आहे. कारण बदलती परिस्थिती व सामाजिक परिवर्तन यानुसार घटनेत आवश्यक ते बदल होणे अगत्याचे असते. त्यानुसार काही नवीन कलमे वाढवावी लागतात तर काही गाळावी लागतात. राज्यघटना ही त्या देशाचा मूलभूत कायदा असते. लिखित तरतुदींप्रमाणे काही रूढीप्रथा परंपरा सारख्या अलिखित भागही महत्त्वाचा असतो. काही रुढींचे कायद्यात रूपांतर करावे लागते. त्यामुळे राज्यघटनेला जिवंतपणा प्राप्त होत असतो. प्रगत राज्यघटनेच्या प्रक्रियेतील पहिले स्थान त्यातील घटना दुरुस्तीला प्राप्त झाले आहे. मागासलेल्या जाती जमातींना संरक्षण देणाऱ्या तरतुदी १९५०मध्ये पहिल्या घटना दुरुस्तीने करण्यात आल्या.तर १९७६च्या ४२व्या घटना दुरुस्तीनुसार प्रस्तावनेत समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द नव्याने घालण्यात आल्यामुळे राज्यव्यवस्थेचा चेहरामोहराच बदलून गेला. ४४व्या घटना दुरुस्तीनुसार मूलभूत अधिकाऱ्यांच्या यादीतून मालमत्तेचा अधिकार रद्द करून त्याचा समावेश ३००व्या कलमात करण्यात आला. असे करीत करीत आतापर्यंत सुमारे ९८घटना दुरुस्त्या झाल्या आहेत. *(डॉ.सुधाकर जोशी; भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,२०१५: पृ. ३२)*

अशाप्रकारे घटनाकारांनी स्वतंत्र भारताच्या तत्कालीन गरजा व भविष्यकाळाचा आकांक्षा लक्षात घेऊन भारताची राज्यघटना तयार केली. भारतीय राज्यघटनेवर बऱ्याच विद्वानांनी टीकाटिप्पणी केली आहे. आयव्हर जेनिंग्ज यांच्यामते "भारतीय राज्यघटना प्रामुख्याने इंग्लड सारखी आहे. केवळ भारत सरकारच नव्हे तर राज्यसरकारे सुद्धा इंग्लंडच्या पद्धतीप्रमाणे जबाबदार सरकारे आहेत. भारत सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक आहे हे खरे असले तरी, आम्ही त्याला घटनात्मक राजेशाही म्हणू शकतो. कारण राष्ट्रपतीचे कार्य पूर्णपणे तसेच आहे जसे राजाचे आहे. केंद्र आणि राज्य यांच्या परस्पर संबंधावर विशेषतः व्यापार व वाणिज्य बाबत ऑस्ट्रेलियाच्या अनुभवाचा परिणाम जाणवतो. वर्णभेद आणि जाती याविषयीचा अपवाद वगळता अधिकार पत्रातील मूलभूत स्वातंत्र्य इंग्लंडच्या घटनात्मक इतिहासाच्या अनुभवातून घेतले आहेत. काही बाबतीत अमेरिकेतील विवादांची छाप जाणवते." *(आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर आणि बेलेकर:५१५)* काही इतिहासकारांनी भारतीय घटनेला 'कैची आणि गोंदचा' खेळ म्हटले आहे. तरी ज्या परिस्थितीमध्ये घटनेची निर्मिती करण्यात आली, त्या परिस्थितीमध्ये यापेक्षा चांगली घटना निर्माण करता आलीनसती. **एम. व्ही. पायली** म्हणतात की, "भारतीय घटना कार्य करण्यासारखा दस्तावेज आहे, हा दस्तावेज आदर्श आणि वास्तविकता यांचे मिश्रण आहे. ज्याने भारतातील सर्व लोकांना एकत्र राहण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या निर्मितीचा आधार प्रधान केला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) राज्यघटनेतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

## ३.६ सारांश

ब्रिटिशांनी कायद्याचे राज्य भारतामध्ये स्थापन केले. कायद्याच्या आधारे राज्यकारभार करण्यासाठी ब्रिटिशांनी वेळोवेळी घटनात्मक सुधारणा करून कायदे केले. यात भारतीय राज्यघटनेची पाळेमुळे आपल्याला दिसून येतात. ब्रिटिशांनी भारताला वेळोवेळी ज्या घटनात्मक सुधारणा दिल्या त्याचाच सर्वोच्च परिणाम म्हणजे भारताचे स्वातंत्र्य आहे. भारताला स्वातंत्र्य द्यायचे होते म्हणून ब्रिटिशांनी भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असताना स्वातंत्र्योत्तर भारताची राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समितीची निर्मितीकेली. त्यामध्ये राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेल्या अनुभवी लोकांचा समावेश होता. या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लोक जागृती करतांना उभे केलेले आदर्श आणि मूल्य यांचा घटनेमध्ये समावेश केला आणि भारताची राज्यघटना जगातील आदर्श राज्यघटना म्हणून नावारूपाला आली. २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी तयार झालेल्या भारताच्या राज्यघटनेमध्ये भारताने सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाहीचा पुरस्कार करून भारतीय नागरिकांना समान संधी आणि सामाजिक न्याय मिळावा यासाठी मूलभूत अधिकार आणि स्वतंत्र न्यायालय यांची स्थापना केली. संसदीय राज्यपद्धती स्वीकारून कायदे मंडळाला जबाबदार असलेले कार्यकारी मंडळ यांची रचना केली. हे कायदेमंडळ प्रौढ मताधिकाराद्वारे जनतेतून निवडून येणार असल्यामुळे अंतिम सत्ता जनतेचीच राहील याची खबरदारी भारतीय राज्यघटनेत घेतलेली आहे. भारताची एकता आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी भारतीय राज्यघटनेने नागरिकांना एकेरी नागरिकत्व बहाल केले आहे. कालमानाप्रमाणे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी घटनेमध्ये बदल करता यावे म्हणून त्या प्रमाणात तिला लवचिक बनवण्यात आले असून सरकारच्या लहरीपणामुळे तिच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जाऊ नये म्हणून घटना तितकीच ताठर बनवण्यात आलेली आहे. भारतीय राज्यघटनेवर अनेक विद्वानांनी टीका टिप्पणी केली असली तरी तत्कालीन परिस्थितीमध्ये यापेक्षा अधिक चांगली घटना निर्मिती होऊ शकणार नव्हती. या घटना निर्मिती मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष योगदान असून त्यांची विद्वत्ता आणि सामाजिक मूल्य घटनेमध्ये पदोपदी दिसून येतात. भारताच्या या आदर्श राज्यघटनेमुळे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये लोकशाहीची यशस्वी वाटचाल झालेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे केवळ मसुदा समितीचे अध्यक्ष नव्हते, तर त्या घटनेचे प्राण होते. त्यांनी भारतीय लोकशाहीला नुसती रचना दिली नाही, तर ती न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांच्या आधारावर उभी केली. त्यांच्या संविधान निर्मितीतील भूमिका ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज तयार करण्याची घटना नव्हती, ती भारतीय समाजाच्या आत्म्याचा उत्थान करणारी क्रांती होती. आजही भारतीय समाज, शासन आणि कायदा या घटकांत जेवढी प्रगती घडते आहे, ती त्यांच्या दूरदृष्टीच्या आणि कर्तृत्वाच्या अधिष्ठानावर आधारित आहे.

## ३.७ प्रश्न

१. भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीवर भाष्य करा.

३. भारताच्या संविधानिक इतिहासातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका स्पष्ट करा

४. राज्यघटनेतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

## ३.८ संदर्भ

१. बिपिन चंद्र- आजादी के बाद का भारत

२. शांता कोठेकर- आधुनिक भारताचा इतिहास

३. ग्रोवर आणि बेल्हेकर- आधुनिक भारताचा इतिहास

४. साहेबराव गाठाळ- भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास

५. बिपिन चंद्र- भारत का स्वतंत्रता संघर्ष

६. डॉ. सुधाकर जोशी- भारतीय शासन आणि राजकारण

*****

# ४

# जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता, फुटीरतावादी चळवळी

**घटक रचना**

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता : व्याख्या आणि अर्थ

४.४ भारतातील जमातवादाची कारणे

४.५ भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण

४.६ भारतीय धर्मनिरपेक्षते समोरील आव्हाने

४.७ प्रादेशिक राजकारण आणि फुटीरतावाद

४.८ फुटीरतावादी चळवळ

४.८.१ तेलंगणा आणि आंध्र प्रदेश

४.८.२ आसाम

४.८.३ पंजाब

४.८.४ जम्मू आणि काश्मिर

४.९ सारांश

४.१० प्रश्न

४.११ संदर्भ

## ४.१ उद्दिष्ट्ये

१. जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता यांची व्याख्या व अर्थ समजावून घेणे.

२. जमातवादी लक्षणांचा आढावा घेणे.

३. भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण कसे झाले याची चर्चा करणे.

४. जमातवादामुळे धर्मनिरपेक्षते समोर निर्माण झालेल्या आव्हानांवर चर्चा करणे.

५. भारतातील प्रादेशिक राजकारण समजून घेणे.

६. भारतातील फुटीरतावादी चळवळीचा उदय आणि विकास यांचा आढावा विविध राज्याच्या संदर्भात घेणे.

## ४.२ प्रस्तावना

भारत हा विविधतेने नटलेला देश असल्यामुळे आणि भारतामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहात असल्याने सर्वांना सामावून घेण्यासाठी भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा अंगीकार केला आहे. यासाठी भारतीय राज्यघटनेने कोणत्याही एका धर्माचे समर्थन केलेले नसून प्रत्येकाला आपापल्या धर्मानुसार वागण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. परंतु लोकशाहीमध्ये 'एक व्यक्ती एक मत' हे तत्व महत्त्वाचे असल्यामुळे ज्याच्या पाठीमागे अधिक लोक त्याचे राज्य हे सूत्र काम करत असते. त्यामुळे जमातवादी राजकीय पक्ष नेतृत्व आपल्या जनाधार वाढविण्यासाठी धर्माचा उपयोग करतात. यातूनच भारतामध्ये जमातवादाचा प्रचार झपाट्याने झालेला दिसून येतो.

ऐतिहासिक काळापासून भारतामध्ये वेळोवेळी विदेशी लोकांचे आगमन होत राहिले व भारतालाच आपली कर्मभूमी मानून येथील संस्कृतीत ते मिसळून गेले. त्याबरोबरच भारतीय भूमीमध्येही अनेक धर्म आणि पंथ यांचा वेळोवेळी उदय झाला. त्यांनी आपला धर्म तत्वांच्या आधारे आपापल्या धर्माचा प्रचार प्रसार केला. भारतामध्ये इस्लाम धर्मीय राज्यकर्त्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सत्ता मिळवण्यासाठी आपल्या सैनिकांना धर्माच्या आधारावर स्फूर्ती देण्याचा प्रयत्न अनेक वेळा केला. त्यांचा सत्तास्थापने मागील हेतू राजकारणाबरोबरच इस्लाम धर्माचा प्रचार प्रसार करणे हा असला तरी इतर प्रदेशांप्रमाणे ते भारताचे इस्लामीकरण करू शकले नाही. त्यांनी सत्तेसाठी धर्माचा वेळोवेळी वापर केला परंतु धर्माच्या आधारावर हिंसक जातीय दंगली झाल्याचे प्रणाम मात्र उपलब्ध नाही. भारतामध्ये ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर आपल्या सत्तेचा विस्तारासाठी व दृढीकरणासाठी त्यांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला. अठराशे सत्तावनचा उठावामध्ये हिंदू-मुस्लीम हे खांद्याला खांदा लावून लढल्यामुळे हिंदू-मुस्लिमांची एकता आपल्या साम्राज्यासाठी घातक आहे; हे ओळखून ब्रिटिशांनी या दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले.

अठराशे सत्तावनचा उठावानंतर भारतातील पारंपारिक सरंजामशाही नेतृत्व मागे पडून आधुनिक शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांच्या हाती भारतीय राजकारणाचे नेतृत्व आले. आपल्याला प्रशासनामध्ये सहभाग आणि राजकीय हक्क मिळावे म्हणून या वर्गाने एकत्र येत १८८५ मध्ये धर्मनिरपेक्ष आशा राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. याच दरम्यान ब्रिटिशांनी भारतीयांना स्थानिक प्रशासनामध्ये सामावून घेण्यासाठी काही घटनात्मक तरतुदी केल्या व त्यासाठी लोकशाही मार्गाने निवडणुकांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व देण्याचे मान्य केले. यातूनच जनाधार मिळवण्यासाठी भारतीय राजकारणामध्ये जमातवादाचा उदय झालेला दिसून येतो. पुढे चालून मुस्लिम, शिख व दलितांना स्वतंत्र मतदार संघ देण्याची घोषणा करण्यात आली. याचा फायदा उचलत जमातवादी तत्त्वांनी एकत्र येत मुस्लिम लीग आणि अकाली दल यासारख्या संस्थांची स्थापना केली. याला विरोध म्हणून हिंदू महासभे सारख्या हिंदुत्ववादी संघटनेची स्थापना करण्यात आली. या जमातवादी वृक्षाचे सर्वात विषारी फळ म्हणजे धर्माच्या आधारावर झालेली पाकिस्तानची निर्मिती होय. पंडित नेहरू

म्हणतात की, “One Communalism dose not end the other; each feeds on the other and both fatten”. (आधुनिक भारताचा इतिहास; ग्रोवर बेल्हेकर: ४९५) म्हणजे एक जमातवाद दुसऱ्या जमातवादाला संपवू शकत नाही तर तो दुसऱ्या जातीवादाला जन्म देत असतो आणि नंतर दोघांमध्ये संघर्ष उभा राहतो. या वक्तव्या प्रमाणे ब्रिटिशांनी भारत सोडल्यानंतरही जमातवाद कमी न होता तो नव्या रुपात समोर आलेला आहे. याला जातीयवाद्यांचा आक्रमक प्रचार प्रसारा बरोबरच धर्मनिरपेक्ष शक्तींना जातिवादास थोपवण्यात आलेले अपयश देखील कारणीभूत आहे. याचाच उहापोह आपण या प्रकरणात करणार आहोत.

ब्रिटिशांच्या वसाहतवादाने निर्माण केलेली आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला स्वातंत्र्यानंतर गती मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा वाढीस लागून राज्याराज्यांमध्ये संघर्ष उभे राहिले. त्यावर बऱ्याच अंशी मात करून देखील कालांतराने फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. या जातीयवादी चळवळींमुळे भारताच्या एकतेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. परंतु तत्कालीन नेतृत्वाने कधी चर्चेच्या माध्यमातून तर कधी बळाचा वापर करून भारताला या धोक्यापासून वाचवले. आजही बऱ्याच ठिकाणी हे जातीय आणि आर्थिक संघर्ष अधून मधून डोके वर काढत असतात.

## ४.३ जमातवाद आणि धर्मनिरपेक्षता: व्याख्या आणि अर्थ

भारतीय समाजाचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या जमातवादीकरण कशाप्रकारे झाले आहे. त्याने धर्मनिरपेक्षते समोर कोणती आव्हाने उभी केली. याचा अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला जमातवाद व धर्मनिरपेक्षतेच्या अर्थ समजून घेणे गरजेचे आहे .

### ४.३.१ जमातवाद / संप्रदायवाद:

जमातवाद या शब्दाची व्याख्या करताना, ए. आर. देसाई म्हणतात, “धर्म व संस्कृतीला श्रेष्ठ मानून राजकीय हेतू साध्य करणाऱ्या विचारास जमातवाद असे म्हणतात”. आर. सी. मजुमदार यांच्या मते “सांप्रदायिकता म्हणजे धर्म व राजकारणाचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करणे होय”. बिपीन चंद्र यांच्या मते, “जमातवादी विचारधारा असे मानते की, भारतीय समाज अशा वेगवेगळ्या गटांमध्ये विभाजित झालेला आहे ज्याचे आर्थिक, राजनीतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हितसंबंध एकमेकांपेक्षा वेगळे आहे आणि या धार्मिक अंतरामुळे ते एकमेकांचे शत्रू आहे”. ते पुढे म्हणतात की “जमातवाद ही एक अशी विश्वास प्रणाली आहे की, या माध्यमातून समाज, अर्थव्यवस्था व राजकारण यांचे अवलोकन आणि विश्लेषण केले जाते आणि त्याच्या अवती भोवती राजकारण संघटित केले जाते. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:६१०) जातीवादाचा मूळ उद्देश जमातवादी हिंसा घडवून आणणे हा नसून जातीवादाचा प्रचार आणि प्रसार करणे हा आहे. या जमातवादी विचारधारेचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे जमातवादी हिंसक संघर्ष होय. जमातवादी विचारधारा एका विशिष्ट उंची वर पोहोचल्यानंतर जमातवादाची भीती आणि द्वेष निर्माण झाल्याने जमातवादी हिंसा घडून येते. अशाप्रकारे जमातवादी विचारधारा हिंसेविना जिवंत राहू शकते. परंतु जमातवादी विचारधारेच्या पार्श्वभूमी शिवाय जमातवादी हिंसाचार घडू शकत नाही. एकूणच काय तर जमातवादी विचारधारा हा एक राजकीय रोग

असून जमातवादी दंगे हे त्याचे बाह्यलक्षण आहे. म्हणजेच सांप्रदायिक विचारधारेकडे दुर्लक्ष केल्यामुळे जमातवादी हिंसा होताना दिसते. म्हणून जमातवादाचा अंगीकार करणारे जमातवादी हिंसा फैलवत नाही, तर जमातवादी विचारधारा फैलवण्यात धन्यता मानतात. त्यांचा प्रमुख उद्देश मोठ्या प्रमाणात नरसंहार करणे हा नसून जास्तीत जास्त जनतेचे जमातवादीकरण करणे हा असतो.

### ४.३.२ धर्मनिरपेक्षता:

धर्मनिरपेक्षते विषयी चर्चा करताना बिपिन चंद्र असे म्हणतात की, "धर्मनिरपेक्षतेचा अर्थ राजसत्ता आणि राजकारण यापासून धर्माला वेगळे करणे व धर्माला व्यक्तीची खाजगी बाब म्हणून मान्यता देणे होय. यासाठी हे पण आवश्यक आहे की, राजसत्ता आपल्या नागरिकांना धर्म आणि जातीच्या आधारावर कोणताही भेदभाव करणार नाही". (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:६११) भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्येच धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे घटनाकारांनी नमूद केले आहे. भारतात राहणाऱ्या विविध धर्माच्या धर्मभावनांचा योग्य तो आदर राखला जाईल; याची हमी घटनेत दिली आहे. समाजात शांतता व सद्भावना नांदावी याकरिता तसे करणे आवश्यक होते. राष्ट्र धर्म म्हणून कोणत्याही धर्माला मान्यता देण्यात आलेली नाही किंवा धर्माच्या आधारे सार्वजनिक जीवनात कोणताही भेदभाव केल्या जात नाही. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याची व शांततेच्या मार्गाने धर्माचा प्रचार करण्याची मुभा देण्यात आली आहे. परंतु बळजबरीने कोणावरही आपला धर्म लादने व त्यासाठी सक्तीने पैसा गोळा करणे या गोष्टीला घटनेने परवानगी दिलेली नाही. सरकारी किंवा सरकारी अनुदान प्राप्त कोणत्याही संस्थांमधून धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही याचीही तरतूद घटनेत केलेली आहे. धार्मिक स्वातंत्र्य मान्य केले असले तरी धार्मिक बाबींचा आर्थिक, राजकीय व सामाजिक बाबींवर परिणाम होणार असेल तर त्याबाबत कायदे करण्याचा अधिकार सरकारला दिला आहे. मशिदीत किंवा मंदिरात पूजा प्रार्थना करण्यासंबंधी कायदा करता येणार नाही,परंतु मंदिराच्या किंवा मशिदीच्या मालमत्तेबाबत कायदा करण्याचा अधिकार आहे. हिंदूंची मंदिरे अस्पृश्यांना खुली करण्याचा अधिकार सरकारला आहे. धर्माच्या कारणावरून कृपान बाळगण्याची मुभा शिखांना देण्यात आलेली आहे. मात्र कोणत्याही धार्मिक आचरणामुळे सामाजिक शांतता व बंधुभाव यांना बाधा येऊ नये याची काळजी घेणे सरकारचे कर्तव्य आहे. अशी आपली राज्यघटना सांगते. (आधुनिक भारताचा इतिहास;शांता कोठेकर:२११)

## ४.४ भारतातील जमातवादाची कारणे

भारतामध्ये जमातवादाच्या वाढीमध्ये खालील घटकांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे.

### १. आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण:

स्वातंत्र्यानंतर भारताने धर्मनिरपेक्षतेचा अंगीकार केला असला तरी वसाहातिक शासनाच्या दुष्परिणामामुळे निर्माण झालेली आर्थिक विषमता आणि सामाजिक समस्यांमुळे बहुतांश भारतीय जनमानसात असंतोष होता. स्वातंत्र्यानंतर यावर बऱ्याच अंशी नियंत्रण मिळवले गेले असले तरी स्वतंत्र भारतामध्ये लोकांच्या महत्वकांक्षा अधिक वाढल्या होत्या. या

महत्त्वाकांक्षांना खतपाणी घालण्याचे काम जमातवादी नेतृत्वाने केले. इतर धर्मियांनी आर्थिक संसाधनांवर केलेल्या कब्जामुळे या समस्या निर्माण झाल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. या अशा प्रकारच्या विचारांना मध्यमवर्ग आणि छोटे भांडवलदार यांनी अधिक प्रतिसाद दिला. ते आपल्या समस्यांमागील कारणे समजण्यात कमी पडल्याचे दिसून येते.

**२. सामाजिक संक्रमण:**

भारतीय समाज पूर्वीपासून एका विशिष्ट बंदिस्त समाजव्यवस्थे मध्ये गुरफटलेला होता. स्वातंत्र्यानंतर संयुक्त कुटुंब पद्धती, बलुतेदारी, जातीव्यवस्था इत्यादी पारंपारिक संस्था झपाट्याने मोडकळीस येत होत्या आणि कामगार संघटना, किसान सभा, राजकीय पक्ष इत्यादी आधुनिक संघटनां बंधुत्वाचे एक वेगळे नाते तयार करत होत्या. या विविध संस्थांमधून नेमकी कशाची निवड करावी, या द्विधा मनस्थितीतून काही लोक जमातवादी संघटनांकडे ओढले गेले.

**३. राजकीय आदर्शवादांचा ऱ्हास:**

राष्ट्रीय चळवळी दरम्यान काँग्रेस नेत्यांनी जे राजकीय आदर्श निर्माण केले होते. स्वातंत्र्यानंतर हळूहळू त्यांचा ऱ्हास होत गेला. राष्ट्रीय एकता आणि सामाजिक धर्मनिरपेक्षता मजबूत करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर विशेष प्रयत्न केले गेले नाही. त्यामुळे मूलभूत सामाजिक परिवर्तनास आवश्यक असणारे प्रेरणादायी समतावादी विचार यांची निर्मिती होऊ शकली नाही. परिणामी जमातवादी तत्वांनी उचल खाल्ली.

**४. प्रशासनाची कचखाऊ भूमिका:**

मागील काही वर्षांपासून भारतीय राजकीय व्यवस्था आणि प्रशासनाने विशेष करून पोलिस खात्याने जमातवादी हिंसा रोखतांना कच खाल्लेली दिसून येते. जमातवादी विचारधारा आणि हिंसा रोखण्याचे सर्वात प्रभावी माध्यम हे सरकार असते. परंतु प्रशासनाने कधीही पूर्ण ताकतीने आपल्या शक्तीचा उपयोग जमातवादी विचारधारा आणि हिंसा रोखण्यासाठी केलेला नाही. बराच वेळा प्रशासनामध्ये सुद्धा जमातवादी तत्त्व काम करत असल्याने जमातवाद रोखतांना भेदभाव होताना दिसतो.

**५. धर्मनिरपेक्ष पक्षांची जमातवादी पक्षांसोबत आघाडी:**

१९६० नंतर धर्मनिरपेक्ष पक्षांनी आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी जमातवादी पक्षांसोबत आघाडी करण्यास मागेपुढे बघितले नाही. त्यामुळे जमातवादाला हातभार लागण्यास मदतच झाली. १९६० मध्ये धर्मनिरपेक्ष काँग्रेसने केरळ मध्ये मुस्लिम लीग सोबत राजकीय आघाडी केली होती. १९६७ मध्ये समाजवादी पक्षाने जनसंघासोबत जाण्यास मागेपुढे बघितले नाही. १९७५ मध्ये जयप्रकाश नारायण यांनी आरएसएस, जनसंघ आणि जमात ए इस्लामी यांना एकत्र करून काँग्रेस विरोधात संपूर्ण क्रांतीचा नारा दिला आणि १९७७मध्ये जनसंघामध्ये सामील झाले.१९८९च्या निवडणुकांमध्ये व्ही पी सिंह यांच्या नेतृत्वात जनता दलाने भाजपासोबत अप्रत्यक्षपणे निवडणुक आघाडी केली होती आणि साम्यवादी पक्षाने अप्रत्यक्षपणे त्यांना पाठिंबा दिला होता. परिणामी जमातवादी विचारधारेची झपाट्याने वाढ झाली. (आजादी के बाद का भारत; बिपिनचंद्र: ६१७)

## ४.५ भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण

१९६०च्या दशकाच्या आरंभी भारतामध्ये धार्मिक मुद्द्यांचा वापर राजकारणासाठी करण्यास सुरुवात झाली. मुस्लिम लीगच्या स्वातंत्र्यापूर्वीच्या जमातवादी राजकारणापासून प्रेरणा घेऊन जमातवादी शक्ती आकाराला येत होत्या. ज्याप्रमाणे मुस्लिम लीगने 'इस्लाम खतरे में है' चा नारा देताच मुसलमान लोक संघटित होऊन मुस्लिम लीगच्या पाठीमागे उभे राहिले. त्याप्रमाणे हिंदू जमातवादाच्या मागे लोक उभे राहिले नाही. कारण मुसलमान भारतामध्ये अल्पसंख्यांक असल्याने त्यांना बहुसंख्यांक हिंदूंची भीती दाखवण्यात आली होती. परंतु भारतामध्ये हिंदू बहुसंख्यांक असल्यामुळे अशा प्रकारची भीती दाखवून हिंदू जमातवाद संघटित करता आला नाही. म्हणून १९७०च्या दशकात हिंदू जमातवादी शा मुद्द्याच्या शोधात होते की, ज्यामुळे हिंदू धर्माला जमातवादाच्या आधारे संघटित करून त्याचा राजकारणासाठी उपयोग करता येईल. लवकरच त्यांना बाबरी मशिद आणि राम जन्मभूमी विवादाच्या रूपाने १९८०च्या दशकाच्या आरंभी अशा मुद्द्याच्या शोध लागला . या मुद्याच्या आधारे हिंदू जमातवादाला संघटित केल्या जाऊ शकत होते. कारण भगवान राम हे हिंदूंचे दैनंदिन जीवनमूल्य आणि भावनिक आस्था यांचे प्रतीक होते. त्यांचे नाव करोडो हिंदूंच्या मनामध्ये प्राचीन काळापासून घर करून होते. बऱ्याच काळापासून भाजप आणि त्याच्या सहयोगी संघटना विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल ज्यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने व्यवस्थित पालन-पोषण केले होते. त्यांच्या सहकार्याने बाबरी मशीद-राम जन्मभूमी या मुद्द्याच्या आधारे हिंदू जमातवादाला संघटित करून त्याचा राजकारणासाठी उपयोग करण्यात जमातवादी यशस्वी झाले. म्हणून बाबरी मशिद-राम जन्मभूमी विवाद नेमका काय आहे हे आपण थोडक्यात समजून घेऊ.

### ४.५.१ बाबरी मशिद-राम जन्मभूमी विवाद:

सोळाव्या शतकाच्या आरंभी मोगल शासक बाबर याच्या सरदाराने उत्तर प्रदेश मधील अयोध्या येथे बाबरी मशिदीची निर्मिती केली होती. १९व्या शतकाच्या आरंभी काही हिंदूंनी असा दावा केला की आयोध्येमधील बाबरी मशिदीच्या जागी राम जन्मभूमी असून तेथे मशिद बांधण्याच्या अगोदर रामाचे मंदिर होते. १९४९ पर्यंत या मुद्याला कोणीही गांभीर्याने घेतले नाही. परंतु १९४९ मध्ये एका जमातवादी जिल्हा न्यायाधीशाने काही हिंदू पुजाऱ्यांना मशिदीमध्ये राम सीतेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पूजा करण्यास परवानगी दिली. या कृतीचा पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी विरोध केल्याने उत्तर प्रदेश सरकारने या मशिदीला कुलूप ठोकून हिंदू आणि मुसलमान दोघांनाही या ठिकाणी जाण्यास बंदी घातली. त्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने दोन्हीही समाजाचे तात्पुरते समाधान होऊन १९८३ पर्यंत येथे शांतता कायम होती. परंतु यानंतर विश्व हिंदू परिषदेने राम जन्मभूमी मुक्तीसाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करून बाबरी मशीद जमीनदोस्त करावी व त्या जागी राम मंदिर उभे करावे, असे आवाहन केले. १९८६ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यावरून जिल्हा न्यायाधीशाने बाबरी मशिदीचे दरवाजे उघडून त्या ठिकाणी पुजाऱ्यांना पूजा करण्याची परवानगी दिली. परिणामी जमातवादी भावना भडकून देशामध्ये दंगली सुरू झाल्या. विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखाली हिंदू तर बाबरी मशीद ॲक्शन कमिटीच्या नेतृत्वाखाली मुसलमान जमातवादी लोक एकत्र येऊन एकमेकांच्या

विरोधात उभे ठाकले. हिंदू जमातवादी मशिद पाडून त्या ठिकाणी राम मंदिर निर्माण करण्याची मागणी करत होते तर मुस्लिम जमातवादी मशिद वापस मागत होते.

### ४.५.२ राजकारणासाठी उपयोग:

१९८९ मधील निवडणूका समोर ठेवून विश्व हिंदू परिषदेने बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदिर निर्माण करण्यासाठी खूप मोठे आंदोलन उभे केले आणि मंदिराच्या उभारण्यासाठी गंगाजलाने पवित्र केलेल्या विटा संपूर्ण भारतातून घेऊन येण्याचे आवाहन हिंदू जनतेला केले. १९८९ मधील निवडणुका प्रचंड जातीयतावादी तणावात पार पडल्या आणि भाजपने १९८४ मधील २ जागांवरून ८६ जागांपर्यंत मजल मारली. केंद्रामध्ये व्ही पी सिंह सरकार भाजपने बाहेरून दिलेल्या पाठिंब्याच्या आधारे सत्तेत आले. आपल्या वाढलेल्या जनाधाराला अधिक मजबूत बनवण्यासाठी मशिदीच्या जागी अधिकृतपणे मंदिर बनवण्यासाठी १९९० मध्ये लाल कृष्ण आडवाणी यांनी अखिल भारतीय रथयात्रेचे आयोजन केले. या रथयात्रेमुळे प्रचंड जमातवादी तणाव वाढीस लागून अनेक ठिकाणी जमातवादी हिंसा झाल्या. ऑक्टोबर १९९० च्या शेवटी मुलायमसिंह सरकारने मशिदीच्या आवारात जाण्यावर बंदी घातलेली असतांना देखील भाजप आणि विश्व हिंदू परिषद यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात बाबरी मशीदीजवळ लोक एकत्र आले. जमावाला पांगवण्यासाठी आणि मशीदीची सुरक्षा व्हावी म्हणून पोलिसांनी गोळीबार केला त्यात शंभराहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भाजपने व्ही पी सिंह सरकारला दिलेले समर्थन वापस काढून घेतले. परिणामी १९९१ च्या निवडणुकांमध्ये ११९ जागा जिंकत भाजप सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून पुढे आला. त्याचप्रमाणे भाजप उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश मध्ये देखील सत्ता मिळवण्यात यशस्वी झाले. मिळालेल्या या राजकीय लाभाला अधिक मजबूत बनवण्यासाठी भाजप आणि विश्व हिंदू परिषदेने ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशिदीच्या आवारात जवळजवळ दोन लाख लोकांना एकत्र जमवले. या जमावाने मशिदीवर चढून मशिद जमीनदोस्त केली. भाजपचा कल्याणसिंह सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये मशिदीच्या संरक्षणाच्या हमी दिलेली असतानाही बघ्याची भूमिका घेतली. केंद्र सरकारनेही कचखाऊ भूमिका घेतल्याने प्रचंड प्रमाणात जमातवादी तणाव वाढून देशाच्या संपूर्ण भागामध्ये जातीय दंगलींचे पीक उभे राहिले. मुंबई, कलकत्ता आणि भोपाळ सर्वाधिक प्रभावित झाले. मुंबईमध्ये तर जवळ-जवळ एक महिनाभर नरसंहार चालू होता. त्यामध्ये तीन हजाराहून अधिक लोकांचा बळी गेला. यावर कालांतराने नियंत्रण मिळवले गेले असले तरी, बाबरी मज्जिद-राम जन्मभूमी हा विवाद शरीरावरील जखमे प्रमाणे वेळोवेळी चिघळत असतो. ह्याच मुद्द्याच्या आधारावर भाजपने १९९६ च्या निवडणुकीमध्ये १६१ जागा मिळवल्या व अल्पकाळासाठी मित्रपक्षांच्या सहकार्याने सत्ता स्थापन केली. १९९८ च्या निवडणुकांमध्ये १८२ जागा मिळवून सत्ता स्थापन केली. परंतु ह्याही वेळेस भाजपचे सरकार अल्पजीवी ठरले. मात्र १९९९च्या निवडणुकांमध्ये भाजपने १८२ जागांवर विजय मिळवत मित्र पक्षांच्या सहकार्याने मजबूत आघाडी सरकार स्थापन केले आणि या सरकारने आपला कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला.

अशाप्रकारे बाबरी मशीद राम जन्मभूमी विवांद आपल्याला धार्मिक मुद्दा वाटत असला तरी वास्तविक तसे नाही आहे. वास्तविकता ही आहे की, जमातवाद्यांना धर्मामध्ये कोणताही

रस नसतो ते फक्त धार्मिक मुद्यांचा उपयोग आपले राजकीय हेतू पूर्ण करण्यासाठी करत असतात. विविध धर्मातील धार्मिक मतभेद हे जमातवादाचे मूळ कारण नाही. तसेच आपापल्या धर्मानुसार आचरण करणे सुद्धा जमातवाद नाही. उलटपक्षी कोणताही धर्माचे आध्यात्मिक (आजादी की बाद का भारत; बिपिन चंद्र:६२१)

**आपली प्रगती तपासा.**

१) 'ज्ञात' भारताच्या विकास मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. स्पष्ट करा.

## ४.६ भारतीय धर्मनिरपेक्षते समोरील आव्हाने

भारताची धार्मिक आधारावर फाळणी झाल्यामुळे उसळलेल्या जातीय दंग्यांच्या पार्श्वभूमीवरही भारतीय जनतेने धर्मनिरपेक्षतेचा आपल्या जीवनमूल्याच्या स्वरूपात स्वीकार केला आणि धर्मनिरपेक्षतेला भारतीय राज्यघटनेमध्ये स्थान देऊन धर्मनिरपेक्ष राजसत्ता आणि समाजाची निर्मिती केली. स्वातंत्र्य चळवळीचा वारसा, महात्मा गांधींचे बलिदान, पंडित नेहरूंची धर्मनिरपेक्षतेमध्ये असलेली आस्था याबरोबर सरदार पटेल, मौलाना आजाद इत्यादी नेत्यांचा संप्रदायिकतेला असलेल्या विरोधामुळे १९५० च्या दशकामध्ये धर्मनिरपेक्षता सर्वोच्च शिखरावर होती. परीणामी १९५२,१९५७ आणि १९६७ च्या निवडणुकांमध्ये जमातवादी पक्षांची कामगिरी निराशाजनक होती. त्यामुळे आरएसएस, जनसंघ, जमात-ए-इस्लामी, मुस्लिम लीग आणि अकालीदला सारख्या जमातवादी राजकीय पक्षांनी जनाधार मिळवण्यासाठी धार्मिक मुद्यांचा आधार घ्यायला सुरु आणि नैतिक मूल्य जमातवादाला प्रोत्साहन देत नाहीत. म्हणूनच महात्मा गांधी यांनी १९४२ मध्ये म्हटले होते की, "धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब असून, राजकारणामध्ये धर्माला कोणतेही स्थान नसले पाहिजे."

वात केली. १९६०च्या दशकामध्ये जमातवादी शक्ती वाढत जाऊन भारतीय समाजाचे मोठ्या प्रमाणात सांप्रदायिकरण होत गेले. १९५८ मध्ये जमातवादी हिंसेमध्ये बळी जाणाऱ्यांची संख्या ७ होती त्यात १९५९ मध्ये वाढ होऊन ४९ झाली तर १९६१ मध्ये १०८ बळी गेले. विशेषतः १९६१ मध्ये जबलपूरमध्ये झालेल्या जमातवादी दंगलींनी संपूर्ण देशाला हादरवून सोडले. जमातवादाला आळा घालण्यासाठी पंडित नेहरूंनी तात्काळ एका राष्ट्रीय एकता परिषदेची स्थापना केली. १९६२ मधील चिनी आक्रमणाने भारतीय जनतेच्या प्रत्येक स्तरांमध्ये राष्ट्रीय एकतेची भावना जागृत केली, त्यामुळे जमातवादी विचारधारा मागे पडली. परंतु ही स्थिती अल्पकाळ टिकली.

१९६० च्या दशकाच्या मध्यंतरी जमातवादी शक्तींनी पुन्हा उचल खाल्ली आणि भारतीय जनतेचा मोठा भाग जमातवादी शक्तींच्या प्रभावाखाली आला. जनसंघाने संसदेमध्ये १९६२ च्या १४ जागांच्या तुलनेत १९६७ मध्ये ३५ जागांवर झेप घेतली. त्याचबरोबर उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये आघाडी सरकारमध्ये सहभाग नोंदवला. याचदरम्यान जमातवादी हिंसेच्या घटना वाढत गेलेल्या दिसून येतात. १९६४ मध्ये १०७० हिंसक घटनां घडून त्यामध्ये १९१९ लोकांचा बळी गेला. तर १९६९ मध्ये ५२० दंगली होऊन त्यामध्ये ६७३ लोकांचा बळी गेला. १९७१ ते १९७७ च्या दरम्यान जमातवादी हिंसे मधून काही प्रमाणात उसंत मिळाली आणि या दरम्यान प्रत्येक वर्षी ५२० दंगली व एक

हजारापेक्षा कमी माणसे दंगलीत मृत्युमुखी पडली. १९७१ च्या निवडणुकांमध्ये इंदीरा गांधी यांनी आपली स्थिती मजबूत केल्यामुळे १९६७ च्या निवडणुकीमध्ये ३५ जागा असलेल्या जनसंघाची ताकत २२ पर्यंत खाली आली. १९७१ मध्ये झालेले भारत-पाक युद्ध आणि बांगलादेशची निर्मिती यामुळे हिंदू आणि मुस्लिम दोन्हीही जातीयवाद्यांना मोठा धक्का बसला. परंतु १९७८ नंतर जमातवाद आणि जमातवादी हिंसा पुन्हा एकदा वाढत जाऊन ती अनियंत्रित स्तरापर्यंत जाऊन पोहोचली.

१९८०च्या दशकामध्ये देशातील महत्त्वांच्या शहरांबरोबरच ग्रामीण भागालाही जमातवादी विचारधारेने आपला विळखा घातला. जातीवादाच्या दृष्टीने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या केरळ, तामिळनाडू, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश या राज्यांनांही जमातवादाने आपल्या कवेत घेतले. त्याचप्रमाणे आता जमातवादी दंगली पूर्वनियोजित, अधिक संघटित आणि अधिक वेळेपर्यंत चालायला लागल्या. दंगलखोरांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत आणि शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा केला जाऊ लागला. ध्यानात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे १९७५ ते ७७ दरम्यान ज्यावेळेस जनसंघ आणि जमात-ए-इस्लामी या जमातवादी संघटनांचे प्रमुख नेते तुरुंगात होते त्यावेळी जमातवादी हिंसा व जमातवादी विचारधारेच्या प्रचारामध्ये फार मोठी घसरण झालेली दिसून येते. कारण दंगली संघटित करणारे आणि जमातवादी द्वेष पसरवणारे खूप कमी लोक तुरुंगाच्या बाहेर होते. दुसरीकडे जनता सरकारच्या काळामध्ये सांप्रदायिकता आणि दंगली ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली कारण जनता सरकारवर आरएसएस आणि जनसंघाचा मोठा प्रभाव होता. या काळातील सांप्रदायिकतेचा वेग एवढा प्रचंड होता की, १९८० मध्ये इंदीरा गांधी पुन्हा सत्तेवर येऊनही त्या सांप्रदायिकतेला रोखू शकल्या नाही. (आजादी के बाद का भारत ; बिपीन चंद्र :६१२) त्यातीलच एका शिख सांप्रदायिकतेने त्यांचा बळी घेतला. यानंतर सांप्रदायिकता वाढतच जाऊन बाबरी मशीद-राम जन्मभूमी विवादाच्या रूपात सांप्रदायिकतेचा स्फोट झाला. त्यामुळे भारतीय धर्मनिरपेक्षतेला मोठा धक्का बसलेला दिसून येतो.

## ४.७ प्रादेशिक राजकारण आणि फुटीरतावाद

**प्रादेशिकता म्हणजे काय:**

प्रसिद्ध इतिहासकार बिपीनचंद्र यांनी प्रादेशिकते संबंधी स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यांच्यामते, "भारतीय संघराज्याच्या अंतर्गत व्यवहारीक कारणांच्या आधारे एखाद्या राज्याची मागणी करने किंवा अस्तित्वात असलेल्या राज्याच्या अंतर्गत स्वायत्त प्रदेशाची मागणी करणे याला आपण तोपर्यंत प्रादेशिकता म्हणू शकत नाही जोपर्यंत याला एखाद्या राज्याच्या उर्वरित जनते विरुद्ध शत्रुतापूर्ण भावनेने समोर आणले जात नाही. जेव्हा एखादे राज्य किंवा प्रदेश आपल्या हितसंबंधांसाठी पूर्ण देश किंवा एखाद्या राज्याविरुद्ध संघर्षाला प्रोत्साहित करतो तेव्हा त्याला प्रादेशिकतावाद म्हटले जाते." (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र :१६६)

भारतातील प्रादेशिकता ओळखण्यासाठी रशीद उद्दी खान यांनी खालील प्रमाणे कसोट्या सांगितल्या आहे. जास्तीत जास्त एकजिनसीपणा आणि जास्तीत जास्त वेगळेपण हा त्याचा आधार आहे. यात बोलीभाषा, सामाजिक रचना, वांशिक गट, लोकसंख्याशास्त्रीय

वैशिष्ट्ये, भौगोलिक संलग्नता, सांस्कृतिक नमुना, अर्थव्यवस्था आणि आर्थिक जीवन, ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजकीय पार्श्वभूमी, आणि मानसशास्त्रीय जाणीव यांचा समावेश होतो.

प्रादेशिकता ही विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील लोकांची ओळख आणि उद्देशाची सामान्य भावना म्हणून व्यक्त केली जाते. ही लोकांना एकत्र आणून त्यांच्यात बंधुत्व आणि निष्ठेची भावना निर्माण करते. तथापि राष्ट्राच्या उद्दिष्टांविरुद्ध एखाद्या प्रदेशाच्या अत्याधिक आसक्तीमुळे देशाचे अस्तित्व, एकता आणि अखंडतेला मोठा धोका निर्माण होतो. प्रादेशिकतेचे राजकारण भारतात नवीन नाही. त्याची मुळे वसाहतवादी धोरणांच्या काळात खोलवर रुजलेली आहे. ब्रिटिश सरकारने विविध राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिलेली भिन्न मानसिकता, दृष्टिकोण आणि अनुकूलता यातून स्वतंत्र अस्मितेची बीजे रोवल्या गेली. जातीच्या आधारावर अनेक राजकीय पक्षांचा उदय हे त्याचे धोतक होते. ब्रिटिशांच्या वसाहतवादी आर्थिक धोरणामुळे काही प्रदेशांकडे दुर्लक्ष झाले. ज्यामुळे आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असमतोल यांना चालना मिळाली. १९४० च्या दशकात डीएमके यांनी उभारलेली ब्राह्मणेतर द्रविड चळवळ पुढे स्वतंत्र तमिळ राज्याच्या मागणी मध्ये परावर्तित झाली. परिणामी आंध्र प्रदेशामध्ये तेलगू देशम पक्षाने वेगळ्या राज्याची मागणी केली. १९५० आणि १९६० च्या दशकामध्ये वेगळ्या राज्यांच्या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात हिंसक स्वरूपाचे आंदोलने झाली. राज्य पुनर्रचनेच्या अभ्यासादरम्यान भाषिक आयोगाने भाषेच्या आधारे वेगळ्या राज्यांच्या लोकांच्या मागण्या कशा पूर्ण केल्या हे आपण पाहिले आहे. अशाप्रकारे अनेक राज्यांच्या निर्मितीने भारतात राजकीय प्रादेशिकवादाचा उद्रेक झाला.१९७० आणि १९८०च्या दशकात प्रादेशिकतेच्या आधारे अनेक राज्य निर्मितीचे कायदे केले गेले.२००० च्या दशकामध्ये प्रादेशिक वंचिततेच्या भावनेमुळे मध्य प्रदेशातून छत्तीसगड, बिहार मधून झारखंड आणि उत्तर प्रदेशातून उत्तराखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती करण्यात आली. अशाच प्रकारे २०१४ मध्ये आंध्र प्रदेशातून तेलंगणा वेगळे करण्यात आले.

**प्रादेशिक राजकारणाचे परिणाम:**

प्रादेशिक राजकारणाचे पुढील प्रमाणे परिणाम झाले .

१) अनेक प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

२) प्रादेशिक समस्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची जनतेला सवय झाली.

३) प्रादेशिकतेच्या अत्याधिक स्वरूपामुळे फुटीरतावादी चळवळी वाढल्या ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाला. त्याचेच द्योतक म्हणजे काश्मिरी दहशतवादी, तेलंगणा चळवळ व पंजाब मधील फुटीरतावादी चळवळ होय.

## ४.८ फुटीरतावादी चळवळ

आपण या अगोदर बघितल्या प्रमाणे भारतामध्ये कशाप्रकारे नवीन भाषावार राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. त्यातून प्रादेशिकवादाला नवे धुमारे फुटत गेले. त्याचे रूपांतर

पुढे चालून आक्रमक आणि हिंसक फुटीरतावादी चळवळी मध्ये कसे झाले यासंबंधी उदाहरणा दाखल काही राज्यांतील परिस्थितीचा आपण आता आढावा घेणार आहोत.



## ४.८.१ तेलंगणा विरुद्ध आंध्र प्रदेश :

आंध्र प्रदेशामध्ये एकच भाषा आणि संस्कृती असून देखील विकासातील असमानता आणि आर्थिक संधी मधील विषमता यावर आधारित उपप्रादेशिक आणि राजनितिक संघर्ष उदयाला आला होता. १९५३ मध्ये आंध्र प्रदेश राज्याची स्थापना करण्यात आली आणि १९५६मध्ये हैदराबाद मधील तेलगु भाषिक प्रदेश आंध्र प्रदेशमध्ये सामील करण्यात आला. भाषावार राज्यनिर्मितीमुळे तेलगु लोकांचा सांस्कृतिक, राजनीतिक आणि आर्थिक विकास होईल ही त्यामागची धारणा होती. परंतु तेलंगणा हा निजामाच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे अत्याधिक अविकसित होता. आंध्र क्षेत्रातील लोकांचे राजकारण आणि प्रशासन यामध्ये वर्चस्व असल्याने आंध्र सरकार तेलंगणाच्या विकासाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करते. त्यामुळे तेलंगणाचा आर्थिक विकास खुंटला आहे अशी भावना तेलंगणातील जनतेची होती. तेलंगणाचा जलदगतीने विकास व्हावा म्हणून १९६९मध्ये वेगळ्या तेलंगणा राज्यासाठी आंदोलन उभे राहिले. सरकारी नोकऱ्यांमधील पक्षपात आणि तेलंगणा मधील वाढती बेरोजगारी हा या आंदोलनाचा मुख्य आधार होता. १९१८ मध्ये हैदराबादच्या निजाम सरकारने असा नियम केला होता की, सर्व प्रशासनिक नोकऱ्यांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य दिले जाईल.१९५६ मध्ये तेलंगणाचे आंध्रामध्ये विलीनीकरण केले तेव्हा तेथील नेत्यांमध्ये असा करार झाला होता की हा नियम पुढेही चालू राहील आणि हैदराबाद मधील उस्मानिया विद्यापीठासमवेत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये तेलंगणामधील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल. परंतु तेलंगणा मधील लोकांचे असे म्हणणे होते की आंध्र सरकार जाणून बुजून या नियमाकडे दुर्लक्ष करत आहे .

१९६८ च्या शेवटी उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थी नोकऱ्यांमधील भेदभावाच्या प्रश्नावर संपावर गेले. लवकरच हे आंदोलन तेलंगणाच्या इतर भागात पसरले. त्यामध्ये १९६९ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने तेल ओतण्याचे काम केले. कारण न्यायालयाने १९५६ मधील कराराला घटनाबाह्य म्हणून घोषित केले. या आंदोलनाला सरकारी कर्मचारी, शिक्षक, वकील, व्यापारी आणि इतर मध्यमवर्गाने मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. (आजादी के बाद का भारत ;बिपिन चंद्र :४०३)

वेगळ्या तेलंगणा राज्याच्या मागणीसाठी संघटितपणे आंदोलन चालवण्यासाठी तेलंगणा प्रजा समितीची (टी पी एस) स्थापना करण्यात आली. यामध्ये काँग्रेसमधील असंतुष्ट नेतेही सामील झाले. प्रमुख राष्ट्रीय पक्षांनी आणि साम्यवादी पक्षांनी या मागणीचा विरोध केला तर स्वतंत्र पार्टी, संयुक्त सोशालिस्ट पार्टी आणि जनसंघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी या मागणीला समर्थन दिले. परंतु इंदिरा गांधी आणि काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने या मागणीला सक्त विरोध करून आंध्र सरकारला तेलंगणाच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची सूचना केली. त्यामुळे १९६९च्या अखेरीस या संघर्षाचा शेवट झाला. तरीही १९७१च्या निवडणुकांमध्ये टीपीएस ने तेलंगणातील १४ पैकी १० जागांवर विजय मिळवला. निवडणुकांनंतर केंद्र सरकारने एक करार करून १९५६ चा करार तसाच पुढे चालू ठेवण्यासंदर्भात निर्णय घेतला आणि तेलंगणाच्या विकासासाठी तेलंगणा क्षेत्रिय समितीच्या

स्थापनेची घोषणा केली. त्यामुळे नाराज असलेल्या मध्यमवर्गीयांचे बऱ्याच प्रमाणात समाधान झाले. मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डी यांच्या जागी तेलंगणातील पी व्ही नरसिंहराव यांची नियुक्ती केली आणि सप्टेंबर १९७१ मध्ये टीपीएस काँग्रेसमध्ये विलीन झाली.

वरील व्यवस्थेमुळे तेलंगणातील जनतेचे समाधान तर झाले परंतु आंध्र क्षेत्रातील जनतेमध्ये यामुळे असंतोष निर्माण झाला. त्यांच्या मते १९५६ चा मुलकी प्राधान्याचा नियम कितीही संशोधित केला तरी सरकारी नोकऱ्यांमध्ये आंध्र क्षेत्रातील जनतेला मोठ्या प्रमाणात प्रभावित करेल. अशातच १९७२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्राधान्यक्रम नियमाला चालू ठेवण्यास मान्यता दिल्यामुळे हा असंतोष संघर्षाच्या रूपात पुढे आला. तेलंगणा प्रमाणेच आंध्रमधील विद्यार्थ्यांनी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी संप आणि प्रदर्शन करण्यास सुरुवात केली. त्यांचे म्हणणे होते की, आंध्र प्रदेशचे सरकार नोकऱ्यांमध्ये पक्षपात करीत आहेत, कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध भेदभाव करत आहे, डॉक्टरांचे असे म्हणणे होते की आरोग्याचा निधी हैदराबाद शहराकडे वळवल्या जात आहे, वकिलांना आंध्र क्षेत्रामध्ये वेगळे उच्च न्यायालय पाहिजे होते, व्यापारी लोक प्रस्तावित शहरी संपत्ती हदबंदी विधेयकाचा विरोध करत होते, त्याचे मोठे जमीनदार आणि श्रीमंत शेतकरी समर्थन करीत होते.

पंतप्रधानांनी परत एकदा २७ नोव्हेंबर १९७२ रोजी करार करून १९५६ च्या मुलकी सेवा नियमांमध्ये संशोधन करून हा नियम हैदराबाद शहरा करीता १९७७ पर्यंत आणि उर्वरित तेलंगाना क्षेत्रा साठी १९८० पर्यंत लागू राहील असे घोषित केले. या कराराला आंध्र क्षेत्रातील जनतेने तेलंगणाच्या पक्षातील मानून आंदोलन अधिक तीव्र केले. अराजपत्रीत कर्मचारी अनिश्चित काळासाठी संपावर गेले. त्यांनी स्वतंत्र पार्टी, जनसंघ आणि काही अपक्ष नेत्यांद्वारे प्रोत्साहित होऊन वेगळ्या राज्याची मागणी पुढे केली. त्यांचे हे आंदोलन आता तेलंगणाच्या बरोबरच केंद्र सरकारच्या देखील विरोधात होते. काँग्रेसमधील काही नेत्यांचे याला समर्थन होते. परंतु साम्यवादी पक्ष आणि किसान सभा यांनी या मागणीला जोरदार विरोध केला. इंदिरा गांधींनी आंध्र जनतेच्या वेगळ्या राज्याच्या मागणीला कडाडून विरोध करत संयुक्त आंध्रप्रदेशचे समर्थन केले. २१ डिसेंबर १९७२ मध्ये मुलकी नियम विधेयक लोकसभेमध्ये पारित करून १७ जानेवारी १९७३ला नरसिंहराव सरकार बरखास्त केले व आंध्रप्रदेश मध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली. त्यामुळे हळूहळू या संघर्षावर नियंत्रण मिळवून सप्टेंबर मध्ये केंद्र सरकारने सहासुत्री कार्यक्रम तयार केला. ज्यानुसार १९५६ चा मुल्की नियम समाप्त करून राज्याच्या सर्व प्रादेशिक विभागांमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याचे प्रावधान केले गेले. घटनेमध्ये ३२ वी दुरुस्ती करून हा कार्यक्रम लागू केला. ज्यामुळे अधिकांश काँग्रेस नेते संतुष्ट झाले. डिसेंबर १९७३ मध्ये राष्ट्रपती राजवट हटवण्यात आली आणि सर्वसंमतीने मुख्यमंत्री बनलेले वेंगल राव यांना हा फार्मूला लागू करण्यास सांगण्यात आले. परिणामी आंध्रप्रदेशच्या दोन्ही प्रादेशिक विभागातील वेगळ्या राज्याची मागणी समाप्त झाली तथापि नंतर बीजेपी ने याला आपला कार्यक्रम बनवले. (आजादी के बाद का भारत ;बिपिन चंद्र : ४०६)

तेलंगणा आणि आंध्र क्षेत्रातील जनतेच्या वेगळ्या राज्याची मागणी केंद्र सरकारने फेटाळून लावली कारण इतर ठिकाणीही अशीच मागणी होण्याची शक्यता होती. परंतु या दोन्ही क्षेत्रातील मागण्या मान्य करण्यास वाव होता कारण यांच्या मागण्या जातीयवादी आणि सांस्कृतिक नसून आर्थिक स्वरूपाच्या होत्या. या संघर्षामधून एक गोष्ट शिकायला मिळाली

ती म्हणजे दोन वेगळ्या राज्यातील नव्हे तर एकाच राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील आर्थिक विषमता दूर करून संपूर्ण राज्याचा एकत्रित विकास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर हे ही माहीत झाले की केवळ भाषेच्या आणि सांस्कृतिकतेच्या आधारावर जनतेमध्ये ऐक्य भावना निर्माण होऊ शकत नाही.

### ४.८.२ आसाम:

आसामी लोकसंख्येच्या दृष्टीने एक छोटेसे राज्य आहे. येथील जनतेला आपल्या आसामी ओळख कमी होण्याच्या किंवा पुसून जाण्याच्या भीतीने बऱ्याच वर्षापासून घेरले आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहे,

(१) आसामी लोकांचे म्हणणे आहे की, केंद्र सरकारने आसाम वर नेहमीच भेदभावपूर्ण नीतीचा अवलंब केला आहे. केंद्रीय निधी वाटपात आणि औद्योगिक व आर्थिक विभाग यांचे स्थान निर्धारित करताना हा भेदभाव प्रकर्षाने दिसून येतो. आसाम मधील कच्चे तेल, चहा आणि प्लायवुड उद्योगांमधून प्राप्त होणारे कराच्या स्वरूपातील उत्पन्नापासून आसामला वंचित केले आहे. त्यांचे म्हणणे होते की, आसाम मधील उत्पादनातून देशातील इतर भागाचा विकास केला जातो. त्याचप्रमाणे आसाम मधील चहा, प्लायवुड आणि इतर वस्तूंचे उत्पादन आणि विक्री व्यवहारावर बाहेरून आलेल्या लोकांचा विशेषतः मारवाडी आणि बंगाली लोकांचा कब्जा आहे आणि या उद्योगातील मजूरही अधिकांश गैरअसामी आहे. त्यामुळे त्यांनी अशा मागण्या केले की चहा आणि प्लायवूड उद्योगातून निर्माण होणारे कर स्वरूपातील उत्पन्नामध्ये असामला अधिक हिस्सा देण्यात यावा, तेलातील रॉयल्टी वाढवण्यात यावी, केंद्राची आर्थिक सहायता आणि योजना वाढविण्यात याव्या, आसाम मध्ये तेलाचे कारखाने उभारण्यात यावे, आसामला इतर भारताबरोबर रेल्वेद्वारे चांगल्या प्रकारे जोडण्यात यावे आणि राज्य व केंद्र सरकार मधील शासकीय सेवांमध्ये आसामी लोकांना जास्तीच्या संधी दिल्या जाव्यात.

(२) वसाहतिक कालखंडामध्येच नाही तर स्वातंत्र्यानंतरही आसाममध्ये गेलेल्या बंगाली लोकांनी शासकीय नोकऱ्या, शैक्षणिक संस्था आणि आधुनिक व्यवसाय यामध्ये वर्चस्व निर्माण केलेले आहे. शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्यामुळे आसामी युवक बंगाली युवकांशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे आसामी भाषी लोकांमध्ये अशी भावना निर्माण झाली की, शिक्षण आणि मध्यमवर्गीय नोकऱ्यांमध्ये बंगाली लोकांच्या वर्चस्वामुळे आसामी भाषा आणि संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे. परिणामी १९५०च्या दशकांमध्ये आसामी भाषी लोकांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यासाठी आणि आसामी भाषेला राज्याची एक मात्र भाषा बनविण्यासाठी तसेच आसामी भाषेला शैक्षणिक माध्यम बनवण्यासाठी आंदोलन उभे केले. सरकारी भाषेच्या परिवर्तनासाठी चाललेल्या या आंदोलनामुळे बंगाली आणि असामी भाषी लोकांमध्ये शत्रुत्व निर्माण होऊन १९६०च्या सुमारास भाषाई दंग्यांना सुरुवात झाली. लवकरच १९६० मध्येच बांगला भाषी आणि काही जनजातीय समुदायाच्या इच्छे विरुद्ध आसामच्या विधानसभेत एक कायदा करून आसामीला एक मात्र सरकारी कामकाजाची भाषा घोषित करण्यात आले. तसेच १९७२ मध्ये गुवाहाटी विद्यापीठाशी

संबंधित सर्व महाविद्यालयांमध्ये असामी भाषेला शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता दिली. याचा परिणाम म्हणून जनजातीय समुदायांनी आसाम मधून वेगळे होण्याची मागणी केली.

(३) आसाम मधील अशांततेला तिसरे कारण म्हणजे बंगाल, बांगलादेश आणि नेपाळ मधून येणाऱ्या बेकायदेशीर विदेशी स्थलांतरितांचा प्रश्न होय. मोठ्या प्रमाणातील गैरअसामी लोकसंख्येमुळे आसामच्या जनतेमध्ये अशी भीती निर्माण झाले की आपल्याच प्रदेशांमध्ये आपण अल्पसंख्यांक होऊन जाऊ. परिणामी आपली भाषा आणि संस्कृती दुसऱ्यांच्या आधीन होऊन जाईल, अर्थव्यवस्था आणि राजकारणातील आपले वर्चस्व समाप्त होईल व शेवटी आसामी समुदाय म्हणून असलेली आपली ओळख आणि विशिष्टता नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही.

राजकीय मुद्दा म्हणून बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न १९५० पासूनच पुढे येत होता. परंतु याचा विस्पोट १९७९ मध्ये झाला. कारण बेकायदेशीर आलेले हे स्थलांतरित राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतदार बनले होते. १९७९ मध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांचा वरचष्मा राहील या भीतीने ऑल आसाम स्टूडेंट युनियन आणि आसाम गण संग्राम परिषद यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधात चळवळ सर्व सुरू केली. आंदोलनकर्त्यांचा दावा होता की, या विदेशी लोकांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ३१ ते ३४ टक्यांपर्यंत मोठी आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडे त्यांनी अशी मागणी केली की, आसामच्या सीमा बंद करून बेकायदेशीर स्थलांतरितांवर बंदी आणावी आणि या स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांची नावे मतदार यादी मधुन कमी करावी व तोपर्यंत निवडणूका घेण्यात येऊ नये. या आंदोलनाला इतके समर्थन मिळाले की १६ पैकी १४ मतदार संघामध्ये निवडणुका होऊ शकल्या नाही.

१९७९ ते १९८५ दरम्यान आसाम मध्ये राजनीतिक अस्थिरता, राज्य सरकारची अस्तव्यस्तता आणि राष्ट्रपती राजवट लागू होणे अशा घटना घडल्या. याच दरम्यान सतत हिंसक चळवळी, संप, कायदेभंग इत्यादी गोष्टींमुळे जनजीवन ठप्प झाले होते. बरीच वर्ष केंद्र आणि राज्यातील नेत्यांमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या परंतु त्यातून कोणतेही समाधान निघू शकले नाही. अशातच केंद्रसरकारने १९८३ मध्ये घेतलेल्या निवडणुकांवर जवळजवळ पूर्ण बहिष्कार टाकला गेला. आसामी भाषी बहुसंख्यांक असलेल्या प्रदेशांमध्ये दोन टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले. काँग्रेसने सरकार बनवले परंतु त्याला वैधता नव्हती. याच वेळी राज्यव्यापी हिंसेमध्ये जवळ जवळ तीन हजार लोक मारले गेले. १९८३ नंतर परत चर्चा होऊन शेवटी राजीव गांधी सरकार आंदोलकांसोबत १५ ऑगस्ट १९८५ मध्ये एका करारावर स्वाक्षरी करण्यास यशस्वी झाले.या करारानुसार १९५१ ते १९६१ च्या दरम्यान आसाम मध्ये आलेल्या विदेशी नागरिकांना मतदानाचा अधिकार आणि नागरीकता दिली जाईल असे ठरले. १९६१ ते १९७१ दरम्यान आलेल्या नागरिकांना दहा वर्ष मतदानाचा अधिकार दिला जाणार नाही परंतु नागरिकत्वाचे इतर अधिकार दिले जातील. १९७१ नंतर आलेल्या लोकांना वापस पाठवले जाईल. आसामच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र पॅकेज दिल्या जाईल. औद्योगिक विकासासाठी दुसरा एक तेल शुद्धीकरण कारखाना, एक कागदाचा कारखाना आणि एक तांत्रिक शिक्षण संस्था स्थापन केल्या जाईल अशा तरतुदी होत्या. त्याचबरोबर आसामी लोकांच्या सांस्कृतिक, सामाजिक

आणि भाषाई अस्मितेला सुरक्षा प्रदान करण्याकरता प्रशासनिक रक्षा कवच देण्याचे मान्य केले. ( आजादी के बाद का भारत ;बिपिन चंद्र : ४११)

वरील कराराच्या आधारावर मतदार यादी तयार करण्यासाठी गांभीर्याने काम सुरु केले गेले. तत्कालीन विधानसभा भंग करून डिसेंबर १९८५ मध्ये पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या. आसाम गण परिषदेला विधानसभेमध्ये १२६ पैकी ६४ जागांवर विजय मिळाला. ऑल आसाम स्टुडंट युनियनचा नेता प्रफुल्ल महंतो ३२व्या वर्षी स्वतंत्र भारतातील सर्वात तरुण मुख्यमंत्री बनला आणि या बरोबरच आसाम मधील दीर्घकालीन जहालवादी राजकारणाचा शेवट झाला. परंतु त्याच बरोबर वेगळ्या राज्यांसाठी बोडो जमात आणि फुटीरतावादी युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) यांचा उदय झाला.

अशाप्रकारे आसाम मधील बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विरोधातील हे आंदोलन जातीयवादी आणि फुटीरतावादी नसून आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी होते असे दिसून येते. यामुळे भारताच्या एक्यामध्ये आणि अखंडते मध्ये कोणताही अडथळा निर्माण झाला नाही.

### ४.८.३ पंजाब:

१९८०च्या दशकामध्ये पंजाब फुटीरतावादी चळवळीचा बळी ठरला. १९४७च्या पूर्वी पंजाब मध्ये जातियवाद हिंदू, मुस्लिम आणि शिख या तीन जमातींमध्ये त्रिशंकू पद्धतीने अस्तित्वात होता. ज्यामध्ये एकाच्या विरुद्ध दोघे असे आलटून पालटून चालत असे. परंतु १९४७ च्या नंतर पंजाब मधून मुस्लिम जतियवाद नष्ट होऊन हिंदू आणि शीख एकमेकांविरोधात उभे ठाकले. प्रारंभापासूनच अकाली नेतृत्वाने जतियवादाचा अंगीकार केला होता. धर्मनिरपेक्ष व्यवस्थेचा विरोध करून अकाली दलाने धर्म आणि राजकारण आम्ही वेगळं करू शकत नाही असे सांगितले. तसेच अकाली दल शिखांची एक मात्र प्रतिनिधी आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी हिंदू वर असा आरोप लावला की त्यांच्यावर ब्राह्मणवादी हुकूमशाही लादली जात आहे. त्यामुळे शिखांची ओळख नष्ट होत असून शिख धर्म खतरे मे असा नारा दिला. तसेच काँग्रेसला हिंदुत्ववादी संघटना संबोधून शिख समुदायांमध्ये काँग्रेस विरोधी वातावरण निर्माण केले. १९५३ मध्ये मास्टर तारासिंह म्हणतात की, "इंग्रज चालले गेले परंतु आम्हाला स्वातंत्र्य मिळाले नाही, आमच्यासाठी स्वातंत्र्य म्हणजे फक्त मालकांमधील बदल आहे. गोरे जाऊन काळे आले. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या आडून आमच्या धर्माला व जातीला डावलण्यात येत आहे."

अकाली दलाने गुरुव्दारांचा विशेषतः सुवर्ण मंदिराचा आपल्या राजकारणासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यास सुरुवात केली होती.१९६६ पर्यंत पंजाब मध्ये मुख्यता दोन मुद्दे प्रमुख होते पहिला राज्याच्या भाषे संबंधित होता. हिंदू जनता हिंदी भाषेसाठी आग्रही होती तर शिखांचे म्हणणे होते की गुरुमुखी लिपीतील पंजाबी ही राज्याची भाषा असावी. दुसरा मुद्दा पंजाबी सूभ्याबद्दल होता, जो अधिक भावनात्मक आणि फुटीरतावादी म्हणून पुढे आला. १९५५ मधील राज्यपुनर्रचना आयोगाच्या स्थापनेनंतर अकाली दल, सी पी आय, काही कॉंग्रेस नेते आणि पंजाबी विद्वानांनी भाषेच्या आधारावर पंजाबची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी केली. ज्यानुसार पंजाबी भाषीक पंजाब आणि हिंदी भाषीक हरियाणा यांची निर्मिती केली जावी. परंतु या मागणीला पंजाब मध्ये म्हणावी तशी सहमती

नसल्यामुळे त्यांची हि मागणी फेटाळल्या गेली. १९५६ साली पेप्सू पंजाबमध्ये सामील केले गेले. परंतु लवकरच मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्वाखाली अकाली दलाने पंजाबच्या मागणीसाठी संघर्ष उभा केला. त्यांचे म्हणणे असे होते की, “शिखांना आपल्या स्वतंत्र प्रदेशाची आवश्यकता असून त्यांचा धर्म आणि राजकारण यांचे वर्चस्व राहण्यासाठी ते आवश्यक आहे.” जातियवादी आधारावर पंजाबच्या मागणीला नेहरूंचा विरोध होता कारण त्यांचे म्हणणे होते की, यामुळे राजसत्ता आणि समाज यांच्या धर्मनिरपेक्ष चरित्राला धक्का पोहोचेल. परंतु संत फतेह सिंह यांनी मास्टर तारा सिंह यांना अकाली दलातून बाहेर केल्यानंतर पंजाबची मागणी फक्त भाषेच्या आधारावर केल्यामुळे आणि हरियाणामधील जनतेने हिंदी भाषी हरियाणाची आणि कांगडा जिल्ह्याने हिमाचल प्रदेश मध्ये जाण्याची मागणी केल्यामुळे १९६६ मध्ये पंजाब आणि हरियाणा या दोन स्वतंत्र राज्यांची निर्मिती करण्यात आली व कांगडा जिल्हा हिमाचल प्रदेश मध्ये विलीन करण्यात आला. परंतु चंदीगड कोणाला मिळाले पाहिजे यावरून वाद झाल्याने चंदीगडला केंद्रशासित प्रदेश म्हणून मान्यता दिली गेली.

भाषावार पंजाबी राज्याची मागणी पूर्ण करूनही पंजाब मधील समस्येचे समाधान झाले नाही कारण ही समस्या राजकीय नसून जातीयवादी होती. त्यामुळे पंजाब मधील समस्या नव्या रुपात पुढे आली. पंजाबच्या निर्मितीनंतर अकाली दलाकडे कोणताही राजकीय कार्यक्रम राहिला नसल्याने,जनसमर्थन मिळवण्यासाठी जातियवादी तत्वाचा आधार घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. संत लोंगोवाल यांच्या नेतृत्वामध्ये अकाली दलाने पंतप्रधानांना धार्मिक, राजनीतिक, आर्थिक आणि सामाजिक अशा ४५ मागण्यांचे मागणी पत्र सोपवून त्यासाठी चळवळ सुरू केली. यांची एक मागणी पूर्ण केले की दुसरी मागणी उभे राहत असे. त्यांचा मुख्य दृष्टिकोन हा होता की पंजाब एक शिख धर्मीय राज्य आहे आणि अकाली दल शिख धर्मीय पार्टी असल्यामुळे भारतीय संघराज्याच्या रचनेपेक्षा श्रेष्ठ आहे.

१९७० च्या दशकामध्ये जातीयवादी तत्त्वांना खूष करण्याच्या नीतीमुळे पंजाब मध्ये १९७९ च्या दरम्यान जहाल जातीयवादी आतंकवादाची सुरुवात संत भिंद्रांवाले यांच्या नेतृत्वात झाली. याला ग्यानी झेलसिंग यांच्या नेतृत्वाखालील पंजाब काँग्रेसचा मुक पाठिंबा होता. भिंद्रांवाले आणि अमरीक सिंह यांच्या नेतृत्वाखाली ऑल इंडिया शिख स्टूडेंट फेडरेशनने आपल्या आतंकवादाची सुरुवात २४ एप्रिल १९८० रोजी निरंकारी संप्रदायाचे प्रमुख यांची हत्या करून केली. यानंतर अनेक निरंकारी, अधिकारी आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या. सप्टेंबर १९८१ मध्ये एक वृत्तपत्र संपादक जगत नारायणची हत्या झाली. ते भिंद्रांवालेचे प्रमुख टीकाकार होते. ग्यानी झैल सिंह यांनी भिंद्रांवाले यांना सरकारी कारवाई पासून वाचवले. १९८२ मध्ये भिंद्रांवाले यांनी आपल्याला सुरक्षित करण्याकरता सुवर्ण मंदिराच्या गुरुनानक भवन मध्ये आसरा घेतला आणि तेथून ते आपल्या आतंकवादी कार्यवाह्यांचे नेतृत्व करू लागले. भिंद्रांवाले आता पंजाबच्या राजकारणातील प्रमुख नेतृत्व म्हणून पुढे आले. १९८३ नंतर त्यांनी मोठ्या प्रमाणात हिंदूंना आपला निशाणा बनवायला सुरुवात केली. असे असले तरी पंजाब प्रशासन आणि भारत सरकार या आतंकवाद्यांविरुद्ध कारवाई करण्यास कच खात होते. भिंद्रांवाले यांनी बँका, दुकाने आणि शस्त्रागार लुटून आपल्याला आर्थिक आणि शस्त्राअस्त्रांच्या दृष्टीने मजबूत बनवले.

एप्रिल १९८३ मध्ये पोलीस महानिदेशक आटवाल यांची स्वर्ण मंदिरातून प्रार्थना आटोपून बाहेर येताना हत्या करण्यात आली. याबरोबरच आतंकवादी कारवाया वाढत जाऊन शिख आणि हिंदूंच्या मध्ये जातीयवादी भावना वाढायला लागली. भिंद्रांवाले आता भारतीय राजसत्तेच्या विरुद्ध सशस्त्र संघर्षाच्या नारा देऊ लागले.

१९८४ मध्ये पंजाबची स्थिती मोठ्या प्रमाणात बिघडायला लागली. अकाली नेतृत्वाने ३ जून १९८४ पासून आतंकवादाचा नवा अध्याय सुरू करण्याचे आव्हान करून त्यासाठी जन समर्थन मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. या स्थितीमध्ये सर्वात धोकादायक प्रकार म्हणजे पंजाब मध्ये पाकिस्तानचा वाढता हस्तक्षेप होता. पाकिस्तानने भारताचा विरुद्ध आतंकवादी संघटनांना प्रशिक्षण देणे व शस्त्रास्त्रे पुरविणे असे कार्य सुरू केले. विदेशातील काही जातियवादी शीख समुदायाने सुद्धा आर्थिक आणि शस्त्रास्त्रांच्या रूपात मदत घेऊन प्रोत्साहन दिले. यामुळे पंजाब आणि पूर्ण देशाच्या ऐकतेला व शांततेला धोका निर्माण झाल्याची भावना निर्माण झाली. हिंदूनी पंजाब सोडून जाण्यास सुरुवात केली. जास्तीत जास्त गुरुद्वारांची तटबंदी करून त्यांना शस्त्रागाऱ्यांमध्ये रूपांतरित केले जात होते. एकूण काय तर पंजाबमध्ये उठावाची जोरदार तयारी सुरू होती आणि जनतेचा सरकारवरील विश्वास झपाट्याने कमी होत चालला होता.

मे १९८४ च्या शेवटी हे स्पष्ट झाले की पंजाबी आतंकवादाच्या विरुद्ध बलप्रयोग करण्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा ऑपरेशन ब्लू स्टार ची योजना बनवण्यात आली. त्यानुसार ३ जून १९८४ रोजी भारतीय सेनेने सुवर्णमंदिराला वेढा घातला आणि ५ जून रोजी मंदिरात प्रवेश केला. परंतु सेनेच्या अनुमानापेक्षा आतंकवाद्यांची संख्या आणि शस्त्रास्त्रे कीतीतरी अधिक प्रमाणात होती. त्यामुळे ही छोटी कार्यवाही न राहता तिला युद्धाचे स्वरूप आले. सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे मंदिरामध्ये जवळपास एक हजार भाविक अडकले होते. त्यामधील बरेचसे दोन्ही बाजूकडील गोळीबारामध्ये मारले गेले. अकाल तख्त पूर्णतः नष्ट झाले. हरमंदिर सहिब जे शीखांचे सर्वात पवित्र स्थळ होते त्याच्यावर गोळीबाराच्या खुणा दिसत होत्या. तरीपण सैनिकांनी आपल्याकडून अनेकांचे बलिदान देऊन काळजी घेतली होती. या कारवाईमध्ये भिंद्रांवाले आणि त्यांचे अनेक अनुयायी मारले गेले.

अधिकतर लोकांनी याला आतंकवादविरोधी कारवाई न मानता धर्म विरोधी आणि शिख समुदायाच्या अपमान म्हणून बघितले. परंतु त्यासोबतच ऑपरेशन ब्लू स्टार ने हे दाखवून दिले की भारत सरकार कोणत्याही आतंकवादाला संपवण्यासाठी खंबीर आहे. ऑपरेशन ब्लू स्टारच्या नंतर शिख आतंकवाद्यांनी इंदीरा गांधी यांनी सुवर्णमंदिराला अपवित्र केल्याबद्दल बदला घेण्याची शपथ घेतली आणि त्याचाच परिणाम म्हणून ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी इंदिरा गांधींच्या सुरक्षा पथकातील दोन शिख रक्षकांनी त्यांची हत्या केली. विशेष म्हणजे त्यांच्या या सुरक्षारक्षकांना हटवण्याचा सल्ला दिला गेला होता. पण त्यांनी धर्मनिरपेक्ष भारतामध्ये असे आपण करू शकत नसल्याचे सांगितले होते. इंदिरा गांधींच्या हत्तेने उत्तर भारतामध्ये शिखविरोधी भावना निर्माण होऊन जातीय दंगली उसळल्या. दिल्लीमधील हिंसक कारवाईमध्ये अडीच हजार लोक मारले गेले. इंदिरा गांधींच्या जागी पंतप्रधान म्हणून नोव्हेंबर १९८४ मध्ये राजीव गांधी यांनी शपथ घेतली. त्यांनी डिसेंबर १९८४ च्या निवडणुकांनंतर पंजाब मधील समस्या सोडवण्यासाठी कंबर कसली. त्यासाठी

जानेवारी १९८५मध्ये अटक केलेल्या सर्व अकाली दलाच्या नेत्यांना सोडून देण्यात आले आणि त्यांच्यासोबत चर्चा सुरू केली. ह्या गोष्टी मुळे पंजाबच्या समस्या सुटण्यापेक्षा ऑपरेशन ब्लू स्टार मुळे मिळालेला फायदाही नष्ट झाला आणि आतंकवादास नवसंजीवनी मिळाली. तरीपण ऑगस्ट १९८५ मध्ये राजीव गांधी आणि लोंगोवाल यांनी पंजाब करारावर स्वाक्षरी केली. केंद्र सरकारने अकालींच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या तर इतर मागण्यांवर पुनर्विचार करण्याचे आश्वासन दिले. सप्टेंबर १९८५ मध्ये राज्य विधानसभा आणि संसदेच्या निवडणुका होणार होत्या त्या निवडणुकांमध्ये भाग घेण्याची घोषणा २० ऑगस्ट १९४५ रोजी लोंगोवाल यांनी केली. त्याच दिवशी आतंकवाद्यांनी लोंगोवाल यांची हत्या केली. पहिल्यांदा अकालींना राज्य विधानसभेमध्ये पूर्ण बहुमत प्राप्त झाले आणि सूरजित सिंह बरनाला यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन करण्यात आले. बरनाळा सरकाच्या अकार्यक्षमतेमुळे आतंकवादी समुदाय पुन्हा संघटित होऊ लागले. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य झाले नाही म्हणून १९८७ मध्ये राष्ट्रपती शासन लागू केले गेले. राष्ट्रपती शासन लागू करूनही पंजाब मधील आतंकवाद वाढतच गेला. शेवटी १९८८ मध्ये केंद्र सरकारने ऑपरेशन ब्लॅक थंडर राबवून स्वर्ण मंदिरातून आतंकवाद्यांना बाहेर काढण्यात यश मिळवले. १९९१ मध्ये नरसिंहराव सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई केली. त्याबरोबरच फेब्रुवारी १९९२च्या निवडणुकांमध्ये यश मिळवलेल्या पंजाबच्या बेअंत सिंह यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने आतंकवाद्यांच्या विरुद्ध कडक पावले उचलली. या व्यतिरिक्त सी पी आय आणि सीपीएम या दोन साम्यवादी पक्षांनी मोठ्या प्रमाणात आतंकवादाच्या विरुद्ध भूमिका घेतल्यामुळे १९९३ पर्यंत पंजाब मधून आतंकवादाचा सफाया झाला. अशाप्रकारे पंजाब मधील फुटीरतावादी चळवळ ही जातीयवादी भूमिका घेऊन उदयास आली होती. ज्यामुळे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला व अखंडतेला धोका निर्माण झाला होता. तथापि या आतंकवादा विरुद्ध सरकारने कडक पावले उचलल्यामुळे यावर नियंत्रण मिळवले गेले. पण त्यासाठी इंदीरा गांधी सारख्या नेत्यांना आपला जीव गमवावा लागला.

### ४.८.४ जम्मू आणि काश्मिर:

ऑक्टोंबर १९४७ मध्ये विलीनीकरणाच्या पत्रावर स्वाक्षरी झाल्यापासून जम्मू आणि काश्मीरला भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० नुसार विशेष राज्याचा दर्जा देण्यात आलेला होता. काश्मीर संस्थानाने भारतात विलीन होताना फक्त विदेशनीति, दळणवळण आणि संरक्षण याचेच हस्तांतरण केंद्र सरकारला केले होते बाकी बाबतीमध्ये जम्मू आणि काश्मिर स्वायत्त होते. या राज्याला आपले वेगळे संविधान बनवण्याची, वेगळा राज्यप्रमुख (सद्र ए रियासत ) निवडण्याची आणि आपला वेगळा ध्वज बनवण्याची परवानगी होती. त्याचा अर्थ असा होतो की भारतीय घटनेतील मूलभूत अधिकार येथील जनतेवर लागू होत नव्हते. त्याचप्रमाणे भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग आणि महालेखाकार अशा संस्थांच्या जम्मू-काश्मीरवर कोणताही अधिकार नव्हता. कलम ३७० काश्मीरच्या विलिनीकरणाच्या संबंधित नसून केंद्र आणि राज्यातील देवाण-घेवाण या संबंधित होते. १९५६ साली विधानसभेने भारतामध्ये काश्मीरच्या विलीनीकरणाला मान्यता दिली. त्यामुळे काश्मिरचा विशेष दर्जा जवळपास समाप्त झाल्यासारखाच होता. याबरोबरच भारतीय संघराज्याचे सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, संविधानातील

मूलभूत अधिकार काश्मीरला लागू झाले. भारतीय संसदेला काश्मीर संबंधात कायदे बनवण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचबरोबर काश्मीरमधील प्रशासनिक सेवा अखिल भारतीय सेवांशी जोडल्या गेल्या. तसेच सद्र ए रियासत नाव बदलून राज्यपाल तर प्रधानमंत्र्याला मुख्यमंत्री संबोधले जाऊ लागले.

काश्मीरची स्वायत्तता कमी केल्यामुळे काश्मीर जनतेचा एक मोठा हिस्सा नाराज झाला. दुसरीकडे कलम ३७० नुसार काश्मीरचे संपूर्ण विलीनीकरण, प्रशासनिक सेवांमध्ये जास्तीचा वाटा आणि जम्मूला काश्मीरपासून वेगळे करण्यासाठी एक शक्तिशाली आंदोलन उभे राहिले. लवकरच या आंदोलनाला जातीयवादी रंग आल्याने जम्मू आणि काश्मीर धार्मिक आधारावर विभक्त होण्याचा धोका निर्माण झाला. कारण काश्मीर एक मुस्लिम बहुसंख्यांक भाग होता तर जम्मूमध्ये हिंदूंची संख्या अधिक होती. जम्मूमधील आंदोलनाचे नेतृत्व जम्मू प्रजा परिषद करत होती, जीचे नंतर जनसंघांमध्ये विलीनीकरण झाले. या प्रजा परिषदेने जम्मू काश्मीरचा प्रश्न अखिल भारतीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान ३० जून १९५३ रोजी जनसंघाचे अध्यक्ष श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा हृदय विकाराच्या झटक्याने श्रीनगर तुरुंगात मृत्यू झाला. जम्मू-काश्मीरमध्ये बंदी असतानाही त्यांनी सरकारी आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. यांच्या मृत्यूमुळे जम्मू प्रजा परिषदेचे नेतृत्व काश्मीरच्या पाकिस्तान समर्थक जातीयवाद्यांच्या हाती गेले. त्यांनी भारताचे धर्मनिरपेक्ष चरित्र बदनाम करण्याचा प्रयत्न करून काश्मीर वरील भारताचे नियंत्रण हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र:४२४)

**शेख अब्दुल्लांची भूमिका:**

काश्मीरचे जातीयवादी तत्व जे पाकिस्तान मध्ये विलीन होण्याची मागणी करत होते आणि जम्मूमधील जातीयवादी तत्व जे भारतात संपूर्ण विलिनीकरणाची मागणी करत होते, या दोन्हींच्या दबावात येऊन शेख अब्दुल्ला हे फुटीरवादाकडे झुकायला लागले. ते जातीयवादाची शक्ती आणि धर्मनिरपेक्षतेची कमजोरी यावर अवास्तव भर द्यायला लागले. त्याचबरोबर काश्मीरचे भारतातील विलिनीकरण मर्यादित स्वरूपाचे असावे आणि जास्तीत जास्त स्वायत्तता असावी यावर ते जोर देऊ लागले. त्याच्याही पुढे जाऊन १९५३ मध्ये ते अमेरिका आणि इतर विदेशी देशांच्या मदतीने काश्मीरला स्वतंत्र करण्याची भाषा बोलू लागले आणि काश्मिरी मुसलमानांच्या जातीयवादी भावना भडकावू लागले. पंडित नेहरूंनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा शेख अब्दुल्लांवर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी त्यांच्या पक्षातील नेत्यांनी त्यांच्या या वागण्याचा विरोध करून त्यांना हटवण्याची मागणी केली. परिणामी शेख अब्दुल्ला यांना हटवून त्यांच्या जागी प्रधानमंत्री म्हणून बक्षी गुलाम मोहम्मद यांची नियुक्ती केली. या नव्या सरकारने त्यांना लगेच अटक करून तुरुंगात डांबले. पंडित नेहरू या घटनेने नाराज झाले, परंतु ते राज्य सरकार मध्ये हस्तक्षेप करू इच्छित नव्हते. १९५८ मध्ये पंडित नेहरूंच्या म्हणण्यानुसार शेख अब्दुल्ला यांना तुरुंगातून मुक्त करण्यात आले. परंतु त्यांनी जातीयवादी आणि फुटीरतावादी प्रचार सुरू ठेवल्याने त्यांना परत तीन महिन्यांनी अटक करण्यात आली. एप्रिल १९६४ मध्ये नेहरूंनी अब्दुल्लांना परत तुरुंगातून मुक्त केले. आता अब्दुल्लांनी असे बोलायला सुरुवात केली की, काश्मीरचे विलिनीकरण निर्णायक नसून राज्याचा स्वनिर्णयाचा अधिकार मिळवण्यासाठी ते संघर्ष करत राहतील. त्यांना आता पाकिस्तान समर्थक राजकीय समुदाय

ज्याचे नेतृत्व मौलवी फारूक आणि आवामी एक्शन कमिटी करत होते यांच्याही विरोधाला सामोरे जावे लागत होते. त्यांना परत १९६५ ते १९६८ दरम्यान घरातच नजरकैदेत ठेवण्यात आले. दरम्यान बक्षी गुलाम मोहम्मद यांनी जम्मू-काश्मीरवर कठोर निर्णयाद्वारे आणि सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करत शासन केले. त्यांच्यानंतर जी. एम. सादिक आणि मीर कासिम यांनी शासनाची धुरा सांभाळली. परंतु हे दोघेही प्रभावशाली प्रशासक आणि राजनीतिक मुत्सद्दी नव्हते. यांच्या काळात राज्य सरकार लोकप्रियता मिळू शकले नाही तरीही पाकिस्तान समर्थक शक्ती या काळात कमजोर राहिल्या. १९७१चे युद्ध आणि पाकिस्तानचे विभाजन होऊन बांगलादेशची झालेली निर्मिती याचा काश्मीरवर मोठा परिणाम झाला. पाकिस्तान समर्थक आवामी एक्शन कमिटी आणि फुटीरतावादी प्लेबीसाईट फ्रंटला यामुळे मोठा राजकीय झटका बसला. शेख अब्दुल्ला यांच्या मध्ये आता मोठी सुधारणा झाली होती. ते केंद्र सरकार बरोबर अधिक जबाबदारीने वागू लागले. त्यामुळे इंदिरा गांधींनीही त्यांच्यापुढे मित्रत्वाचा हात केला. त्यांच्यावरील सर्व निर्बंध उठवून त्यांच्या सोबत चर्चा सुरू केली. शेख अब्दुल्ला यांनीही स्वनिर्णय आणि जनमत संग्रह हे मुद्दे सोडून देण्याचे मान्य करून आपली मागणी भारतीय संघराज्याच्या अंतर्गत स्वायत्तता यापुरतीच मर्यादित ठेवतील हे मान्य केले. १९७५ मध्ये ते परत एकदा नॅशनल कॉन्फरन्सचे नेता आणि जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री बनले.१९७७च्या मध्यवती निवडणुकांमध्ये ते विजयी झाले. १९८२ मध्ये त्यांचा मृत्यू होऊन त्यांचा जागी त्यांचा मुलगा मुलगा फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री बनला.

**फारुख अब्दुल्ला, बंडखोरी आणि अतिरेकी:**

१९८२ नंतर जम्मू-काश्मीरमध्ये एक तर फारूक अब्दुल्ला यांचे शासन असते किंवा राष्ट्रपतीला राजवट लागू असते. १९८३ च्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला यांना स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु लवकरच केंद्र सरकार बरोबर त्यांचा बेबनाव झाला. जुलै १९८४ मध्ये जी एम शहा यांनी नॅशनल कॉन्फरन्स फूट पाडली आणि केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार राज्यपाल जगमोहन यांनी फारुख अब्दुल्ला यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून त्यांच्या जागी जी एम शहा यांना खुर्चीवर बसवले. परंतु जीएम शहा भ्रष्टाचारी आणि शासन करण्यास लायक नसल्याने ते काश्मिरी पंडितांवर होणाऱ्या हल्ल्यांना थोपवू शकले नाही. त्यामुळे १९८६ मध्ये त्यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. १९८७ मध्ये राजीव गांधी यांनी फारूक अब्दुल्ला यांच्याबरोबर निवडणुकांसाठी आघाडी केली. परंतु निवडणुका जिंकल्या नंतर फारूक अब्दुल्ला राजकीय आणि प्रशासनिक दृष्ट्या राज्यावर नियंत्रण ठेवू शकले नाही. यानंतर काश्मीर मध्ये फुटीरतावादी आंदोलन जोर पकडू लागले. हिजबुल मुजाहिद्दीन तसेच अन्य कट्टरपंथी पाकिस्तानी समर्थक समुदाय व जम्मु अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट यांच्या नेतृत्वाने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठी हिंसक चळवळी आणि सशस्त्र उठाव सुरू केला. या सर्व समुदायांना पाकिस्तानकडून आर्थिक मदत, शस्त्रसाठा आणि प्रशिक्षण दिल्या जाऊ लागले. यांनी पोलिस स्टेशन, सरकारी कार्यालये आणि इतर सरकारी इमारतींवर हल्ले करण्यास सुरुवात केली. सर्वात महत्वाचे म्हणजे काश्मिरी पंडितांवर हल्ले करून त्यांना आपली जमीन जायदाद सोडून जम्मू आणि दिल्ली येथील शरणार्थी शिबिरांमध्ये जाण्यास बाध्य केले. परिणामी बंडखोरी आणि अतिरेकी कारवाया नियंत्रित करण्यासाठी केंद्रातील व्ही पी सिंग सरकारने फारूक अब्दुल्ला यांचे सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. तरीही मोठ्या

कालखंडानंतर १९९६ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये फारूक अब्दुल्ला परत निवडून आले. (आजादी के बाद का भारत; बिपिन चंद्र;४२७)

कालांतराने जम्मू-काश्मीरच्या पूर्ण स्वातंत्र्याचे समर्थक ऑल पार्टी हुरियत कॉन्फरन्स, जम्मू अँड काश्मीर लिब्रेशन फ्रंट तसेच पाकिस्तान समर्थक मुजाहिद्दीन हे आपली शक्ती गमावून बसले आहेत कारण यांनी स्थानिक लोकांची मोठ्या प्रमाणात लुटमार केली होती. परंतु अजूनही पाकिस्तान समर्थित आणि संघटित आतंकवाद जम्मू व काश्मीर मधील राजकारणाला प्रभावित करणारा एक घटक म्हणून आजही कार्यरत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) फुटीरतावादी चळवळीवर थोडक्यात माहिती लिहा.

## ४.९ सारांश

भारताने स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक लोकशाहीचा अंगीकार केलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून मिळालेले आदर्श आणि भारतामधील विविध जाती-धर्मांच्या अस्तित्वामुळे भारत धर्मनिरपेक्ष असणे आवश्यक आहे. परंतु भारताने लोकशाहीचा अवलंब केल्यामुळे जनाधार मिळवण्यासाठी राजकीय पक्षांनी वेळोवेळी विविध मुद्यांचा आधार घेतलेला दिसून. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वातंत्र्यानंतर राजकारणामध्ये दबदबा असलेला एकमेव राष्ट्रीय पक्ष होता. या पक्षाने स्वातंत्र्यानंतर भारताला आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या सशक्त बनवण्यासाठी मिश्रित अर्थव्यवस्थेचा आधार घेऊन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध विकासाची कास धरली होती. परंतु जनसंघ, अकाली दल, जमात-ए-इस्लामी आणि मुस्लीम लीग या सारख्या जमातवादी पक्षांनी आपल्याला आर्थिक विकासाच्या आधारावर जनाधार मिळत नाही, म्हणून धार्मिक मुद्द्यांचा आधारे राजकारण करण्यास सुरुवात केली. त्यांनी जनतेच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांना जमातवादी रंग देऊन ह्या समस्यांचे मूळ धार्मिक हितसंबंधांमध्ये आहे, असा भासवण्याचा प्रयत्न केला. या जमातवादी पक्षांना धर्मनिरपेक्ष पक्षांनी साथ दिल्यामुळे आणि त्यांच्या जमातवादी विचारधारेला वेळेवर प्रत्युत्तर न दिल्यामुळे भारतामध्ये जमातवाद अनियंत्रित स्थितीमध्ये पोहचून त्याने राजकारणावर आपली पकड घट्ट केली. परिणामी भारतामध्ये वेळोवेळी जातीय हिंसा होऊन त्यामध्ये अनेक निरपराध जनतेचा बळी गेला. त्याबरोबरच जमातवादाने भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये अडथळा निर्माण केल्याची दिसून येते.

अशाप्रकारे भारत मूलतः एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. जमातवादाने धर्मनिरपेक्षते पुढे मोठे आव्हान उभे केले असले तरी भारतीय जनमानस याला सहजासहजी स्वीकारणार नाही. कारण भारतातील जनतेने जमातवादी पक्षांना मतदान धार्मिक आधारावर न करता त्यांच्या आर्थिक समस्या हे पक्ष प्रस्थापित पक्षांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे सोडू शकतील ही त्यामागची अपेक्षा आहे. त्यांच्या समस्या जमातवादी पक्षांनी योग्य प्रकारे सोडवल्या नाहीतर या पक्ष्यांचीही पीछेहाट होण्यास उशीर लागणार नाही.

ब्रिटिशांच्या वसाहतवादाच्या शोषणात्मक व्यवस्थेमुळे निर्माण झालेली प्रादेशिक विषमता आणि असमतोल यामुळे प्रादेशिक राजकारणाला चालना मिळाली. त्यातूनच प्रादेशिक निष्ठा व त्याची जोपासना करणारे प्रादेशिक नेतृत्व यांचा उदय झाला. परंतु कणखर राष्ट्रीय नेतृत्वाने यावर विजय मिळवून या समस्येचे वेळोवेळी निराकरण केले. असे असले तरी भारतामधील पंजाब, काश्मीर, आंध्र प्रदेश आणि आसाम अशा प्रदेशांमध्ये फुटीरतावादी चळवळी उभ्या राहिल्या. यांनी जातीयवादी हिंसक संघर्ष उभे करून आतंकवादाला प्रोत्साहन दिले. बऱ्याच वेळेस यांना विदेशी शक्तींचे प्रोत्साहनही मिळाले. तरीही राष्ट्रीय नेतृत्वाने वेळोवेळी चर्चा करून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला . तर काही प्रसंगी कडक पावले उचलत बळाचा वापर करून या फुटीरवादी शक्तींवर विजय मिळून भारताच्या एकतेला व अखंडतेला असलेला धोका दूर केलेला दिसून येतो.

## ४.१० प्रश्न

१. धर्मनिरपेक्षता आणि जमातवाद यांची व्याख्या सांगून अर्थ स्पष्ट करा.

२. भारतातील जमातवादाच्या वाढीस कारणीभूत असलेल्या प्रमुख घटकांची चर्चा करा.

३. भारतीय राजकारणाचे जमातवादीकरण कसे झाले याचा आढावा घ्या.

४. भारताच्या धर्मनिरपेक्षते समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा घ्या.

५. भारतामधील फुटीरतावादी चळवळीचा उदय आणि विकास विविध राज्यांच्या संदर्भासह स्पष्ट करा.

## ४.११ संदर्भ


१. बिपिन चंद्र, आजादी के बाद का भारत

२. बिपिन चंद्र, भारत का स्वतंत्रता संघर्ष

३. डॉ. साहेबराव गाठाळ, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास

४. शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७ ते २०००)

५. ग्रोवर आणि बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास.


*****

# ५

# पंचवार्षिक योजना

**घटक रचना**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ स्वातंत्र्य पूर्वकाळातील आर्थिक नियोजन किंव्हा नियोजनाचा इतिहास

५.३ नियोजन मंडळ / योजना आयोग

५.४ पंचवार्षिक योजना

- ५.४.१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ - ५२ ते १९५५ - ५६)
- ५.४.२ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ -५७ ते १९६० -६१)
- ५.४.३ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६)
- ५.४.४ योजना अवकाश / तीन वार्षिक योजना (स्वावलंबन योजना) (१९६६ - १९६९)
- ५.४.५ चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते १९७४)
- ५.४.६ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९)
- ५.४.७ सरकती योजना किंव्हा जनता दलची योजना (Rolling Plan)
- ५.४.८ सहावी पंचवार्षिक योजना (१९८० -१९८५)
- ५.४.९ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ -१९९०)
- ५.४.१० वार्षिक योजना किंवा स्वावलंबन योजना (Yearly Plan)
- ५.४.११ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ - १९९७)
- ५.४.१२ नववी पंचवार्षिक योजना (१९९७ ते २००२)
- ५.४.१३ दहावी पंचवार्षिक योजना (२००२ ते २००७)
- ५.४.१४ अकरावी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२)
- ५.४.१५ बारावी पंचवार्षिक योजना (२०१२ ते २०१७)

५.५ नीती आयोग

५.६ पंचवार्षिक योजनांचे परिणाम / यश

५.७ पंचवार्षिक योजनांचे अपयश

५.८ सारांश

५.९ प्रश्न

५.१० संदर्भ

## ५.० उद्दिष्ट्ये

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील नियोजनाचा आढावा घेणे.

२) भारतातील पंचवार्षिक योजनांचा सविस्तर अभ्यास करणे.

३) पंचवार्षिक योजनांचे यश किंवा परिणामांचा अभ्यास करणे.

४) पंचवार्षिक योजनेचे दोष तपासणे.

## ५.१ प्रस्तावना

ब्रिटिशांची भारतात सत्ता स्थापन झाल्यानंतर त्यांनी भारतात आर्थिक साम्राज्यवादाचे धोरण स्वीकारले व मोठ्या प्रमाणात भारतीय संपत्तीची लूट केली. त्याचा परिणाम हा भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येत होता. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वातंत्र झाल्यानंतर देखील भारताची आर्थिक परिस्थिती बिकटच होती. अत्यंत कमी कृषी उत्पादन, औदयोगिक क्षेत्राचा अल्प विकास व फाळणीची समस्या यामुळे अनेक आर्थिक प्रश्न निर्माण झाले होते. यामुळे स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आर्थिक पुनर्रचनेची कार्य हाती घेतले. स्वातंत्र्यपूर्व काळात काही उद्योगपती, अर्थशास्त्रज्ञ व अभियंते यांना आर्थिक नियोजनाचे महत्व पटले होते. रशियाने १९२८ पासूनच पंचवार्षिक योजना यशस्वीरीत्या आपल्या देशात राबवून अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणला होता. त्यामुळे त्या व्यवस्थेचे अनुकरण करावे असे अनेकांना वाटत होते. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजनेचा स्विकार केला.

## ५.२ स्वातंत्र्यपूर्व काळातील आर्थिक नियोजन किंव्हा नियोजनाचा इतिहास

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात आर्थिक नियोजनासाठी अनेक प्रयत्न केले गेले होते. आर्थिक नियोजन म्हणजे, 'आर्थिक व्यवस्थेतील उपलब्ध साधन सामुग्रीचा कार्यक्षम वापर करून काही ठराविक उद्दिष्टे काही ठराविक काळात साध्य करणे होय.' स्वातंत्र्य पूर्व काळात अशे अनेक प्रयत्न झाले होते ते पुढीलप्रमाणे:

### १) एम. विश्वेश्वरय्या योजना:

१९३४ मध्ये एम विश्वेश्वरैया यांनी आपल्या Panned Economy For India (भारतासाठी नियोजित अर्थव्यवस्था) या ग्रंथामध्ये सर्वप्रथम भारतासाठी नियोजनाची संकल्पना मांडली. १९३४ मध्ये प्रकाशित त्यांच्या योजनेत त्यांनी औद्योगीकरणावर भर दिल्याने कृषी व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होईल, अशी संकल्पना मांडली. ‘नियोजन करा अथवा नष्ट व्हा’ या शब्दात त्यांनी नियोजनाचे महत्त्व सांगितले. या योजनेमुळे भारतात आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले गेले.

### २) FICCI योजना:

एन. आर. सरकार अध्यक्ष असलेल्या भांडवलदारांच्या FICCI (Federation of Indian Chambers of Commerce & Industry) या संघटनेने मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध करत राष्ट्रीय नियोजन आयोगाची गरज बोलून दाखवली. या योजनेत केन्सवादी विचारसरणीचा त्यांनी पुरस्कार केला.

### ३) काँग्रेस योजना:

१९३७च्या प्रांतीय निवडणुकांमध्ये अनेक प्रांतात काँग्रेसचे सरकार स्थापन झाले होते. त्यामुळे आर्थिक नियोजनाच्या प्रश्नास चालना मिळाली. १९३७ मध्ये काँग्रेसने ' राष्ट्रीय आर्थिक समितीची ' स्थापना केली. १९३८ मध्ये तत्कालीन काँग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी दिल्ली मध्ये प्रांतातील उद्योग मंत्र्यांचे एक अधिवेशन बोलावले. या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू हे होते. या अधिवेशनामध्ये औदयोगिक करणाची चर्चा केली व आर्थिक नियोजनाविषयी एक अहवाल सादर केला गेला.

### ४) मुंबई योजना:

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील आर्थिक नियोजनाच्या क्षेत्रात मुंबई योजनेला विशेष महत्व आहे. मुंबईतील ८ उद्योगपतींनी ज्यामध्ये जमशेदजी टाटा, घनश्यामदास बिर्ला यांचा समावेश होता. त्यांनी ‘A Plan of Economic Development for India’ हा आराखडा जाहीर केल्या त्यालाच बॉम्बे प्लॅन (१९४४) म्हणून ओळखतात. बॉम्बे प्लानचे अध्यक्ष जे. आर. डी. टाटा होते. या योजनेत एकूण रक्कम १० हजार कोटी रुपये तर १५ वर्षात दरडोई राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करणे हे उद्दिष्टे ठेवले होते. तीव्र औद्योगीकरण, व्यापार, जमीन सुधारणा, लघुउद्योग याबाबत हि योजना सकारात्मक होती.

### ५) जनता योजना:

मुंबई योजनेच्या तीन महिन्यानंतर इंडियन फेडरेशन ऑफ लेबर ( Indian Federation of Laboure ) यांच्या तर्फे १९४५ मध्ये मानवेंद्रनाथ रॉय यांनी ‘जनता योजना’ ही योजना मांडली. मार्क्सवादी समाजवादाचा प्रभाव असलेल्या या योजनेत जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत सुविधांच्या नियोजनावर भर देण्याचे सांगण्यात आले. यात कृषी व उद्योग या दोन्ही क्षेत्रांवर भर देण्यात आला होता. परंतु सर्वाधिक भर हा कृषि विकासावर देण्यात आला. या योजनेचा आराखडा १० वर्षासाठी १५ हजार कोटी रु. होता.

**६) गांधी योजना:**

महात्मा गांधींच्या तत्वज्ञावर आधारलेली 'गांधी योजना' ही वर्धा येथील गांधीवादी नेते अग्रवाल यांनी मांडली होती. या योजनेत ग्रामीण विकास, कुटीर व लघुउद्योग तसेच कृषी व्यवस्थेवर सर्वाधिक लक्ष केंद्रित करण्यात आले होते. आर्थिक विकेंद्रीकरण हे मुख्य वैशिष्ट्य असलेल्या या योजनेचा आराखडा ३० हजार कोटी रु. होता.

**७) इतर योजना:**

१९४४ मध्ये भारतात तत्कालीन ब्रिटिश सरकारने सर आर्देशिर दलाल यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग बनवला, ज्यामध्ये अल्पकालीन व दीर्घकालीन आर्थिक योजना बनवल्या होत्या परंतु त्यावर कुठलेही कार्य झाले नाही. १९४६ मध्ये अंतरिम सरकारच्या काळात planning advisory board ची स्थापना केली. ज्याचे अध्यक्ष श्री. के. सी. नियोग होते. या बोर्डने योजना कमिशनच्या स्थापनेचे सूचना केल्या.

**आपली प्रगती तपासा.**

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील आर्थिक नियोजनाचा आढावा घ्या.

## ५.३ नियोजन मंडळ / योजना आयोग

नोव्हेंबर १९४७ मध्ये काँग्रेसने प. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली Economic Programme Committee ची स्थापना केली. ज्यांनी २५ जानेवारी १९४८ ला आपले रिपोर्ट प्रस्तुत केले व एक स्थायी योजना आयोगाच्या स्थापनेची भूमिका त्यांनी मांडली. ज्यमुळे पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली १५ मार्च १९५० भारत सरकारच्या प्रस्तावाद्वारे (मंत्रिमंडळाच्या ठरावाद्वारे) नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. नियोजन आयोगाची पहिली बैठक २८ मार्च १९५० रोजी पार पडली. सध्या या आयोगात एकूण सदस्य १७ आहेत. सदस्य व उपाध्यक्ष यांचा कार्यकाल हा निश्चित नाही.

**स्वरुप:**

या समितीचे स्वरुप सल्लागारी असून त्याला घटानात्मक स्थान नाही, रचना – एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व पूर्णवेळ सदस्य असतात. काही मंत्री अर्धवेळ सभासद असतात. तसेच काही वरिष्ठ अधिकारी असतात. या आयोगाचे पंतप्रधान हे पदसिध्द अध्यक्ष असतात. उपाध्यक्ष व इतर सदस्य यांच्यासाठी निश्चित कार्यकाल व निश्चित योग्यता दिलेली नाही. इतर सदस्यांमध्ये अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत, नियोजनमंत्री व सचिवाचा समावेश असतो. सरकारच्या इच्छेप्रमाणे निवड व संख्या यामध्ये परिवर्तन केले जाते.

**योजना आयोगाचे कार्ये: स्वरुप –**

१. देशातील संसाधने, भांडवल, भौतिक साधनसामग्रीचा विचार करून पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करणे.

२. योजनेच्या उद्दिष्टांचा अग्रक्रम ठरविणे

३. वेळोवेळी केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांना आर्थिक समस्यांच्या गरजेनुरुप सल्ला देणे.

४. देशातील भौतिक भांडवली व मानवी संसाधनांची मोजमाप करणे व यांचा परिणामकारक व संतुलीत वापर करुन घेण्यासाठी योजनेची निर्मीती करणे.

५. आर्थिक विकासातील अडथळे दूर करून योजनेत वेळोवेळी आवश्यक बदल करणे.

**आपली प्रगती तपासा.**

१) नियोजन मंडळ अथवा नियोजन आयोगाची माहिती द्या.

## ५.४ पंचवार्षिक योजना

पंचवार्षिक योजना नियोजनाची तत्वे भारताने रशिया कडून स्वीकारली आहेत. रशियामध्ये १९२७ मध्ये प्रथम नियोजनास सुरुवात झाली. जोसेफ स्टॅलिन यांनी १९२७ मध्ये सोव्हिएत युनियनमध्ये पहिली पंचवार्षिक योजना राबविली. आर्थिक नियोजन म्हणजे, आर्थिक व्यवस्थेतील उपलब्ध साधन सामुग्रीचा कार्यक्षम वापर करून काही ठराविक उद्दिष्टे ठराविक काळात साध्य करणे. पंचवार्षिक योजना केंद्रीयकृत आणि एकात्मिक राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम आहेत. पंचवार्षिक योजना या शब्दातच त्याचा अर्थ दडलेला आहे. देशाच्या विकासासाठी ५ वर्षाचा एक आराखडा आखण्यात येतो त्यालाच 'पंचवार्षिक योजना ' म्हणतात. पहिली पंचवार्षिक योजना ही पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ८ डिसेंबर १९५१ला संसदेत मांडली होती. ही योजना जरी ८ डिसेंबरला मांडली गेली असली तरी या पंचवार्षिक योजनेचा कालावधी हा १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६ हा ग्राह्य धरला जातो.

### ५.४.१ पहिली पंचवार्षिक योजना ( १९५१ - ५२ ते १९५५ - ५६):

पहिली पंचवार्षिक योजना हि १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६ या कालावधी साठी लागू केली गेली होती. या योजनांचे अध्यक्ष तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे होते. तर उपाध्यक्ष गुलझारीलाल नंदा होते. हि योजना हेरॉल्ड डोमर यांच्या प्रतिमानावर (मॉडेल) आधारलेली होती. या योजनेच्या सुरुवातीस दुसऱ्या महायुद्धाचे झालेले परिणाम व नुकत्याच झालेल्या फाळणीमुळे मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे शेती, जलसिंचन व ऊर्जा (४५%) यावर या योजनेत प्राधान्य देण्यात आले होते.

**योजना काळात घेण्यात आलेले काही महत्वाचे प्रकल्प:**

- १९५१ – सिंद्री ( झारखंड) येथे खत कारखाना. देशातील सार्वजनिक क्षेत्रातील पहिला खत कारखाना.
- १९५१ – चित्तरंजन (पश्चिम बंगाल) येथे रेल्वेचा कारखाना सुरु करण्यात आला.
- १९५२ – कोयना प्रकल्प (हेलवाड, ता. पाटण, जि. सातारा, महाराष्ट्र)
- १९५४ – पेरांबुर (तामिळनाडू) येथे रेल्वेचा कारखाना सुरु करण्यात आला.

- १९५४ – हिंदुस्थान अँटीबायोटिक्स, पिंपरी पुणे येथे स्थापन
- १९५५ – दामोदर खोरे विकास योजना. (झारखंड आणि पश्चिम बंगाल)
- १९५५ – भाक्रा नांगल प्रकल्प, सतलज नदीवर असुन हिमाचल प्रदेश व पंजाब राज्यांचा संयुक्त प्रकल्प.
- हिराकुड प्रकल्प (ओरिसा) महानदीवर.

**इतर महत्वाचे कार्यक्रम:**

- १९५१ मध्ये स्वतंत्र भारताची पहिली जनगणना करण्यात आली.
- ८ मे, १९५२ पासून औद्योगिक विकास व नियमन अधिवेशन १९५१ लागू करण्यात आला.
- २ ऑक्टोबर १९५२ रोजी सामुदायिक विकास कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर करण्यात आली.
- २ ऑक्टोबर १९५२ रोजी राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सुरुवात झाली. परंतु १९६१ नंतर या कार्यक्रमाची गती वाढली.
- हातमाग उद्योगाचा विकास करण्यासाठी २ ऑक्टोबर १९५२ रोजी ' अखिल भारतील हातमाग बोर्डची ' स्थापना करण्यात आली.
- १९५३ मध्ये अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग बोर्डाची स्थापना करण्यात आली.
- १ जुलै १९५५ रोजी अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी समितीच्या शिफारसीनुसार (गोरवाल समिती) एम्पिरियल बँकेचे रूपांतर स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये करण्यात आले.
- जानेवारी १९५५ मध्ये भारतीय औद्योगिक पत आणि गुंतवणूक महामंडळ (ICICI) स्थापन करण्यात आले, ज्याने मार्च १९५५ मध्ये आपले कार्य सुरू केले.

या पंचवार्षिक योजनेच्या काळात मान्सूनने साथ दिल्याने १९५१ मध्ये ५० दशलक्ष टन असलेले अन्नधान्यचे उत्पन्न १९५५ मध्ये ६४.९ दशलक्ष टन झाले. कृषिप्रमाणे औदयोगिक उत्पादनही ४०% वाढले, परंतु या योजनेत काही दोष देखील होते, राष्ट्रीय उत्पादनात अपेक्षेप्रमाणे वाढ झाली नाही. अपेक्षेप्रमाणे रोजगार वाढू शकला नाही. असे असले तरी ही योजना भारताच्या विकासासाठी महत्वाची ठरली.

**आपली प्रगती तपासा.**

१) पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घ्या.

### ५.४.२ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ - ५७ ते १९६० - ६१):

दुसरी पंचवार्षिक योजना हि १ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९६१ या कालखंडासाठी लागू केली होती. या योजनेचे अध्यक्ष प. जवाहरलाल नेहरु होते तर उपाध्यक्ष टी. टी. कृष्णाम्माचारी हे होते. हि योजना महालोनोबीस मॉडेलवर आधारलेली होती. या योजनेत आर्थिक विकासाची गती वाढवण्यात आली व तीव्र औद्योगिकीकरणावर भर देण्यात आलं. राष्ट्रीय उत्पन्न २५ टक्क्यांनी वाढावे व त्यासाठी अवजड उद्योगधंदे वाढवावे असे ध्येय होते.

**या योजनेची प्रमुख उद्दीष्ट्ये:**

१. **भिलाई (छत्तीसगड) पोलाद प्रकल्प (१९५९) –** रशियाच्या मदतीने स्थापन करण्यात आला.

२. **रुरकेला (ओरिसा) पोलाद प्रकल्प (१९५९) –** जर्मनीच्या मदतीने स्थापन करण्यात आला.

३. **दुर्गापूर (पश्चिम बंगाल) पोलाद प्रकल्प (१९६२) –** ब्रिटनच्या मदतीने स्थापन करण्यात आला.

४. **भेल BHEL (Bharat Heavy Electricals Ltd.) -**भोपाळ कंपनीची स्थापना.

५. नानगल व रुरकेला खत कारखाने.

या योजनाकाळात जलसिंचनाखालील क्षेत्र ५६.२ दशलक्ष एकरावरून ७० दशलक्ष एकर एवढे वाढले. यांत्रिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची वाढ झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेबद्दल माहिती घ्या.

### ५.४.३ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६):

तिसरी पंचवार्षिक योजना हि १ एप्रिल १९६१ ते ३१ मार्च १९६६ याकाळात लागू केली गेली. या योजनेचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरु आणि लालबहादूर शास्त्री हे होते, तर उपाध्यक्ष हे सी. एम. त्रिवेदी आणि अशोक मेहता होते. ही योजना सुखमोय चक्रवर्ती आणि महलोनोबिस मॉडेलवर आधारलेली होती. या योजनेची काही उद्दीष्ट्ये होती ती पुढीलप्रमाणे:

१) राष्ट्रीय उत्पनात ५% वाढ करणे.

२) अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता आणणे.

३) पोलाद, रासायनिक उत्पादने, इंधन, विद्युत शक्ती इ. उद्योगधंद्यात वाढ करणे.

४) नोकरीधंद्यात वाढ करून बेकारीची समस्या सोडविणे.

५) सामान संधी निर्माण करून उत्पन्नातील विषमता नष्ट करणे व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देणे.

**योजनेच्या दरम्यान घडलेल्या प्रमुख घटना:**

तिसरी पंचवार्षिक योजना ही निराशजनक ठरली. या योजनेच्या काळात अनेक राजकीय व आर्थिक संकटे निर्माण झाली. १९६२ मध्ये भारत – चीन युद्ध व १९६५ मध्ये भारत – पाकिस्तान युद्ध झाले, त्यामुळे मोठे आर्थिक नुसकान झाले. युद्धप्रयत्नांना प्राधान्य द्यावे लागल्यामुळे चलनवाढ झाली. शिवाय या काळात परराष्ट्रीय मदत देखील कमी झाली. या योजनेच्या पहिल्या चार वर्षात राष्ट्रीय उत्पन्न २०% ने वाढले परंतु शेवटच्या वर्षात ते उत्पन्न ५०% नि घटले. धान्याच्या उत्पादनात १०२० लक्ष टन हे उत्पादन योजनेच्या पहिल्या वर्षात झाले होते, परंतु शेवटच्या वर्षात ते ७२० दशलक्ष टन इतके झाले. औदयोगिक उत्पादन मात्र ८.५% नि वाढले. औदयोगिक उत्पादनात व औद्योगिकि करणात झालेली वाढ हेच तिसऱ्या योजनेचे वैशिष्ट्ये म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा.**

१) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेदरम्यान घडलेल्या महत्वाच्या घडामोडींचा आढावा घ्या.

## ५.४.४ योजना अवकाश / तीन वार्षिक योजना (स्वावलंबन योजना) (१९६६ - १९६९):

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्तीनंतर १ एप्रिल १९६६ मध्ये चौथी पंचवार्षिक योजना लागू करणे अपेक्षित होते, परंतु तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची असफलता, १९६२ चे चीन सोबतचे युद्ध, १९६५ चे भारत – पाकिस्तान युद्ध यामुळे देशात निर्माण झालेली कमकुवत आर्थिक स्थिती, परकीय मदत मिळण्याबाबतची संधिग्धता, १९६५ - ६६ मध्ये पडलेल्या भयंकर दुष्काळ परिस्थिमुळे चौथी पंचवार्षिक योजना भारतात लागू करण्यात आली नाही. व १९६६ ते १९६९ च्या दरम्यान योजनेला सुट्टी देण्यात आली. ही सुटी १ एप्रिल १९६६ ते ३१ मार्च १९६९ दरम्यान राहिली. त्यामुळे या योजनेला Gap in Planning असे देखील म्हटले जाते. मोरारजी देसाई यांनी याला 'योजना अवकाश' असे देखील म्हटले. या सुट्टीच्या कालावधीत सरकारने तीन वार्षिक योजना राबवल्या ज्यांचे उद्दिष्ट स्वावलंबन हे होते. या योजनेचा कार्यकाल हा १ एप्रिल १९६६ ते ३१ मार्च १९६९ असा होता. या योजनेचे अध्यक्षा इंदिरा गांधी या होत्या तर उपाध्यक्ष अशोक मेहता आणि डी. आर. गाडगीळ हे होते. ही योजना महलोनोबिस मॉडेल वर आधारित होती.

### १) पहिली वार्षिक योजना (१९६६-६७):

१९६६ च्या खरीप हंगामात सरकारने हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचा वापर केला. ६ जून १९६६ मध्ये रुपयाचे ३६.५ टक्क्यांनी अवमूल्यन घडवण्यात आले.

### २) दुसरी वार्षिक योजना (१९६७-६८):

हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानामुळे व पुरेशा मान्सूनमुळे अर्थव्यवस्थेची परिस्थिती सुधारण्यास सुरवात झाली. १९६७-६८ मध्ये अन्नधान्यांचे उच्चांकी उत्पादन झाले.

### ३) तिसरी वार्षिक योजना (१९६८-६९):

अन्नधान्य उत्पादन व किमती स्थिरावल्या. व्यवहारतोल सुधारला व चौथी योजना सुरु करण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) अवकाश योजना म्हणजे काय ते सांगा.

### ५.४.५ चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते १९७४):

तीन वार्षिक योजनेनंतर चौथी पंचवार्षिक योजना १९६९ मध्ये लागू करण्यात आली. यावेळी मुख्यभर हा स्वालंबन हे होते. हि योजना ॲलन मान व अशोक रुद्र प्रतिमान (खुले सातत्य प्रतिमान / Open Consistency Model ) यांच्या मॉडेलवर आधारित होती. या योजनेचे अध्यक्ष हे श्रीमती इंदिरा गांधी ह्या होत्या. तर उपाध्यक्ष धनंजय गाडगीळ, सी.सुब्रमण्यम, दुर्गप्रसाद धर हे होते. या योजनेचे घोषवाक्य 'स्थैर्यासह आर्थिक वाढ' हे होते.या योजनेच्या दरम्यान मार्च १९७१च्या संसदीय निवडणुकीच्या वेळी इंदिरा गांधींनी "गरीबी हटाओ" ही घोषणा दिली.

**चौथ्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्टे:**

१) ५.७% वार्षिक वृद्धीदर (NDP आधारित).

२) सर्वाधिक खर्च कृषी व सिंचन आणि त्यानंतर उद्योग आणि वाहतूक दळणवळण.

३) संपत्ती व आर्थिक विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक विकासावर भर.

४) शिक्षण व मनुष्यबळ विकासावर भर.

**या योजनेतील साध्य गोष्टी:**

१) वार्षिक वृद्धीदर – ३.३%

२) अन्नधान्य उत्पादन – १०४.७ Mt

३) चलनवाढ तीव्र.

**आपली प्रगती तपासा.**

१) चौथ्या पंचवार्षिक योजनेची माहिती सांगा.

### ५.४.६ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९):

पाचवी पंचवार्षिक योजना ही १ एप्रिल १९७४ ते ३१ मार्च १९७८ या कालावधीमध्ये राबवण्यात आली. या योजनेच्या अध्यक्षा श्री. इंदिरा गांधी या होत्या तर उपाध्यक्ष दुर्गप्रसाद धर, पी. एन. हक्सर होते. ही योजना ॲलन मान व अशोक रुद्र यांच्या प्रतिमानावर किंव्हा मॉडेल वर आधारित होती. (खुले सातत्य प्रतिमान)

**या योजनेचे उद्दिष्टे हे पुढील प्रमाणे ठरवण्यात आले होते:**

१) ४.४% वार्षिक वृद्धीदर (GDP आधारित)

२) गरिबी हटाओ

३) सार्वजनिक खर्च - १) उद्योग २) कृषी व सिंचन ३) ऊर्जा

**या योजनेतील साध्य गोष्टी:**

१) वार्षिक वृद्धीदर - ४.८%

२) भरमसाठ चलनवाढ (२५%)

३) अन्नधान्य उत्पादन – १२६mt

**महत्त्वाच्या घडामोडी:**

**योजना काळात हाती घेण्यात आलेले प्रकल्प:**

१) TRYSEM – ग्रामीण भागातील तरुणांच्या स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम.

२) दारिद्र्य रेषेतील कुटुंबांना मोफत व अनुदानित सेवा.

३) ग्रामीण व शहरी कामगारांची उत्पादक कार्यकक्षमता वाढविणे.

**इतर महत्वाचे कार्यक्रम:**

१) १९७४ - पोखरण येथे भारताची पहिली यशस्वी अणुचाचणी.

२) ऑक्टोबर १९७५ रोजी पहिल्या ५ प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या.

३) १९७६ - ७७ मध्ये दुसऱ्यांदा भारताचा व्यापारतोल अनुकूल ठरला.

४) १९७६ मध्ये भारताचे पहिले राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर करण्यात आले.

५) १९७५ - ७६ मध्ये बाल कल्याणासाठी एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) सुरू करण्यात आली.

६) १९७७ - ७८ मध्ये वाळवंटी क्षेत्रामध्ये परिस्थिकीय संतुलन प्रस्थापित करण्यासाठी वाळवंट विकास कार्यक्रम (DDP) सुरू करण्यात आला.

**आपली प्रगती तपासा.**

१) पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घ्या.

### ५.४.७ सरकती योजना किंव्हा जनता दलची योजना (Rolling Plan):

भारतामध्ये १९७७ मध्ये जनता पार्टीचे सरकार आले. मार्च १९७८ जनता सरकारने पाचवी योजना संपुष्ठात आणली. १ एप्रिल १९७८ मध्ये जनता सरकारने स्वतःची सहावी योजना (सरकती योजना) सुरु केली. या योजनेचा कार्यकाळ हा १ एप्रिल १९७८ ते जानेवारी १९८० या दरम्यान होता. या योजनेचे अध्यक्ष मोरारजी देसाई आणि चरणसिंग हे होते तर उपाध्यक्ष डी. टी. लकडावाला होते. ही योजना गुन्नार मिर्डाल प्रतिमानावर आधारलेली होती.

**या योजनेच्या दरम्यान घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी:**

१) जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना. (१९७८)

२) कामासाठी अन्न योजना. (१९७९)

१९८० मध्ये कॉंग्रेसची सत्ता पुन्हा आल्यानंतर जानेवारी १९८० मध्ये कॉंग्रेस (आय) ने सरकती योजना फेटाळली. १ एप्रिल १९८० नवीन सहावी योजना सुरु करण्यात आली.

**आपली प्रगती तपासा.**

१) सरकती योजना स्पष्ट करा.

### ५.४.८ सहावी पंचवार्षिक योजना (१९८० -१९८५):

जानेवारी १९८० मध्ये कॉंग्रेस (आय) सत्तेवर आल्यानंतर त्यांनी सरकती योजना फेटाळली. १ एप्रिल १९८० नवीन सहावी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. या योजनेचे अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी (३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधीची हत्या) होते तर उपाध्यक्ष  दुर्गाप्रसाद धर होते. ही योजना ॲलन व रुद्र यांच्या मॉडेलवर आधारित होती. या योजनेत मुख्य भर हा दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीवर देण्यात आला व सर्वाधिक खर्च हा ऊर्जा क्षेत्रावर केला गेला. या योजनेच्या दरम्यान अपेक्षित विकास दर हा ५.०२% निर्धारित करण्यात आला तर या योजनेत साध्य ५.०७% झाले. या योजना कालावधीत राष्ट्रीय उत्पन्नातील एकूण वाढ २८% होती.

**सहाव्या पंचवार्षिक योजनेची प्रमुख वैशिष्टे पुढीलप्रमाणे:**

१) ०२ ऑक्टो १९८० रोजी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरुवात.

२) ०२ ऑक्टो १९८० रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाची सुरुवात.

३) १५ ऑगस्ट १९८३ रोजी ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली.

४) १९८२ पासुन नवीन २० कलमी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

५) विशाखापट्टणम व सालेम, तामिळनाडु येथे पोलाद प्रकल्प सुरु करण्यात आले.

६) दारिद्र्य निर्मुलन, रोजगार निर्मिती, आर्थिक प्रगती व आर्थिक समृद्धी हे या योजनेचे उद्दिष्ट्य होते.

७) जार्ज फर्नांडीस यांच्या पुढाकाराने १९७८ मध्ये जिल्हा उद्योग केंद्रांची स्थापना झाली.

सहावी पंचवार्षिक योजना बहुतांशी यशस्वी झाली असे मानले जाते. योजना कालावधीत राष्ट्रीय उत्पन्नातील एकूण वाढ २८% होती.

**आपली प्रगती तपासा.**

१) सहाव्या पंचवार्षिक योजनेची माहिती द्या.

### ५.४.९ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ -१९९०):

सातव्या पंचवार्षिक योजनेचे अध्यक्ष हे राजीव गांधी होते, तर उपाध्यक्ष हे डॉ. मनमोहन सिंग, पी शिवशंकर, माधवसिंग सोळंकी आणि रामकृष्ण हेगडे होते. या योजनेत नियोजन मंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग हे काम बघत होते. हि योजना ब्रम्हानंद व वकील यांच्या “मजूरी वस्तु प्रतिमाना” वर आधारलेली होती. या मॉडेलनुसार श्रमिक उपभोग घेत असलेल्या वस्तु व सेवांच्या उत्पादनास प्राधान्य देण्यात आले. या योजनेला 'रोजगार निर्मिती जनक' योजना असे म्हणतात. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट्ये हे उत्पादन व रोजगार निर्मिती होते, तर योजनेचे घोष वाक्य' अन्न, काम व उत्पादकता. 'नियोजनामध्ये लोक सहभागासाठी आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा या योजनेचा उद्देश होता.

या योजनेच्या दरम्यान अपेक्षित विकास दर हा ५% होता तर साध्य दर हा ०६.०२% ठरला.

**सातव्या पंवार्षिक योजनेची मुख्य वैशिष्टे पुढीलप्रमाणे:**

१) या योजनेस ‘रोजगार निर्मिती जन योजना’ असे म्हणतात.

२) १९८५ - ८६ पासुन इंदिरा गांधी आवास योजना सुरु करण्यात आली.

३) १९८८ मध्ये दशलक्ष विहीर योजना सुरु करण्यात आली.

४) २० ऑगस्ट १९८६ ऑपरेशन ब्लॅक बोर्ड व दुसरा २० कलमी कार्यक्रम सुरु करण्यात आला.

५) ०१ एप्रिल १९८९ रोजी पासुन जवाहर रोजगार योजना ही ग्रामीण भागासाठी व नेहरु रोजगार योजना ही शहरी भागासाठी सुरु करण्यात आली.

६) वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न वाढीचे नियोजीत उद्दीष्ट पारीत केल्याने ही योजना यशस्वी ठरली.

संपूर्णपणे यशस्वी योजना म्हणून ०७ व्या पंचवार्षिक योजनेस ओळखले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१) सातव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घ्या.

### ५.४.१० वार्षिक योजना किंव्हा स्वावलंबन योजना (Yearly Plan):

सातवी योजना संपल्यानंतर लगेच आठवी योजना सुरु करण्यात आली नाही. त्याऐवजी दोन वार्षिक योजना राबवण्यात आल्या. केंद्रातील सत्ता बदलल्यामुळे ८ वी योजना पुढे ढकलण्यात येवुन १९९० -९१ वार्षिक योजना सुरु करण्यात आली. १९९० - ९१ ते १९९१ - ९२ या दोन वार्षिक योजना राबविण्यात आल्या. या दोन वार्षिक योजनांचा कालखंडास ' नियोजनाची सुट्टी ' असे म्हटले जाते. हि योजना १ एप्रिल १९९० ते ३१ मार्च १९९१ आणि १ एप्रिल १९९१ ते ३१ मार्च १९९२ यादरम्यान राबवली गेली. या योजनेचे अध्यक्ष चंद्रशेखर आणि नरसिंहराव हे होते. तर उपाध्यक्ष मधू दंडवते, मोहन धारिया आणि प्रणब मुखर्जी होते.

**या योजनेतील प्रमुख घडामोडी:**

१) १ व ३ जुलै १९९१ रोजी रुपयाचे अवमुल्यन.

२) २४ जुलै १९९१ रोजी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी नवे आर्थिक व औद्योगिक धोरण स्विकारले.

३) या योजनांमध्ये ०२.०५ % विकास दर होता.

४) १९९१ मध्ये भारताने नवे आर्थिक धोरण खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण ही धोरणे स्विकारण्यात आली.

**आपली प्रगती तपासा.**

१) वार्षिक योजना किंव्हा स्वावलंबन योजनेबद्दल माहिती द्या.

### ५.४.११ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ - १९९७):

भारतात आठवी पंचवार्षिक योजना अश्या वेळेस राबवण्यात आली, जेव्हा आंतरराष्ट्रीय स्थरावर अनेक आश्चर्यजनक व क्रातींकारी आर्थिक व सामाजिक परिवर्तन सुरु होते. या योजनेचे अध्यक्ष पी. व्हि. नरसिंह राव व चंद्रशेखर होते, तर उपाध्यक्ष रामकृष्णा हेगडे, मोहन धारीया व प्रणव मुखर्जी होते. ही योजना पी. व्हि. नरसिंहराव व मनमोहन सिंग यांच्या मॉडेलवर आधारित होती. या योजनेची मुख्य घोषणाही "नियंत्रित अर्थव्यवस्थेकडून नियोजित अर्थव्यवस्थेकडे" अशी होती.

**या योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये हि पुढीलप्रमाणे होती:**

१) शतकाच्या अखेरपर्यंत पूर्ण रोजगाराचे उद्दीष्ट गाठण्यासाठी पुरेशा रोजगाराच्या संधि निर्माण करणे.

२) लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित करणे.

३) १५ ते ३५ वर्ष वायोगटातील सर्वांना प्राथमिक शिक्षण देऊन त्यांच्यातील निरक्षरतेचे संपूर्ण उच्चाटन करणे.

४) कृषि क्षेत्राचा विकास व विविधिकरण करून अन्नधान्यांच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण करणे व निर्मितीसाठी योग्य असा शेतमालाचा आढावा निर्माण करणे.

५) ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, सिंचनसोई इ. सोई-सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध करून देवून भावी काळातील देशाच्या आर्थिक विकासाचा भक्कम पाया घालणे.

**या योजना काळात हाती घेण्यात आलेले प्रकल्प पुढीलप्रमाणे होते:**

१) १९९२ मध्ये पहिल्यांदा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

२) १९९२ - ९३ मध्ये रुपया व्यापार खात्यावर आंशिक परिवर्तनीय १९९३ - ९४ मध्ये व्यापार खात्यावर पूर्ण परिवर्तनीय, तर १९९४ - ९५ मध्ये चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय करण्यात आला.

३) १९९२ मध्ये (SEBI) ला संवैधानिक दर्जा देण्यात आला. सेबी (Securities Exchange Board of India) स्थापना १९८८ साली झाली. ही संस्था देशातील शेअर बाजारांवर नियंत्रण ठेवत आहे. देशात सध्या २४ शेअर बाजार आहेत. त्यातील महाराष्ट्रात ०४ शेअर बाजार आहेत. त्यांतील मुंबईमध्ये ०३ (स्थापना १८७७ ) व पुणे येथे ०१ आहे. पुणे शेअर बाजार निर्मिती १९८२ मध्ये करण्यात आली.

४) १९९२ मध्ये ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने पंचायत राज व्यवस्थेला संवैधानिक दर्जा देण्यात आला.

५) १९९३ - ९४ मध्ये खाजगी क्षेत्रात पुन्हा बँका स्थापन करण्याची संमती देण्यात आली.

६) १९९६ मध्ये भारतात पहिल्यांदा डीपॉझिटची प्रणालीची सुरवात करण्यात आली.

हि योजना सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वी ठरली. या योजनेअंतर्गत अपेक्षित विकास दर हा ०५.०६% एवढा निश्चित केला होता तर साध्य ०६.०८ % एवढा होता. ही योजना बहुतांश यशस्वी ठरली. याच योजनेमध्ये सर्वाधिक परकीय चलन प्राप्त झाले. कृषी क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर ३.९% एवढा तर उद्योग क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर ८.०% ने वाढला. सेवा क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर ७.९% एवढा होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) आठव्या पंचवार्षिक योजनेची माहिती द्या.

### ५.४.१२ नववी पंचवार्षिक योजना ( १९९७ ते २००२):

हि पंचवार्षिक योजना १९९७ ते २००२ या काळासाठी लागू केली होती. या योजना काळात नियोजन आयोगाचे अध्यक्ष एच.डी.देवगौडा व अटल बिहारी वाजपेयी तर नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मधु दंडवते, जसवंतसिंग, कृष्णचंद्र पंत होते. ही योजना १५ वर्षाच्या दीर्घकालीन योजनेचा भाग होती. या योजनेतील घोषवाक्य "सामाजिक न्याय आणि समानतेस आर्थिक वाढ." हे होते. या योजनेमध्ये परदेशी भांडवल गुंतवणूकीस प्राधान्य देण्यात आले. तर योजनेदरम्यान सर्वाधिक खर्च उर्जा क्षेत्रावर करण्यात आला. तर सर्वाधिक भर कृषी व ग्रामीण विकासावर देण्यात आला. हि योजना गांधीवादी प्रतिमानावर आधारलेली होती.

**या योजनेचे प्रमुख उद्दीष्टे:**

१) कृषि व ग्रामीण विकास ह्यांना अग्रक्रम.

२) आर्थिक वाढीचा दर वार्षिक सरासरी ६.५% एवढा साध्य.

३) सर्वात मूलभूत किमान सेवा पुरविणे.

४) शाश्वत विकास.

५) स्त्री, अनुसूचीत जाती, जमाती, इतर मागासवर्गीय इ. चे सबलीकरण.

६) लोकांचा सहभाग वाढू शकणाऱ्या संस्थांच्या विकासास चालना.

**नवव्या पंचवार्षिक योजनेचे महत्व:**

National Highways Development Programme हाती घेण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना स्वायत्तता देण्यासाठी नवरत्न व मिनिरत्न शृंखला सुरु करण्यात आली. कृषी विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली. कृषी क्षेत्रात वाढीचा दर कमी झाला. कृषी क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर २.४४%, उद्योग क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर ४.२९%, सेवा क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर ७.८७% एवढा होता. या योजनेतील अपेक्षित विकास दर हा ६.०५% व साध्य ५.०५% एवढा होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) नवव्या पंचवार्षिक योजनेची माहिती द्या.

### ५.४.१३ दहावी पंचवार्षिक योजना ( २००२ ते २००७):

दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यास राष्ट्रीय विकास परीषदेने ०१ सप्टेंबर २००१ रोजी मंजुरी दिली. या योजनेचे अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी व डॉ मनमोहनसिंग हे होते, तर उपाध्यक्ष के. सी. पंत व मॉंटेकसिंग अहलुवालिया. या योजनेअंतर्गत सर्वाधिक भर हा शिक्षण क्षेत्रावर देण्यात आला. व सर्वाधिक खर्च उर्जा क्षेत्रावर करण्यात आला. हि योजना गांधीवादी प्रतिमानावर आधारलेली होती. या योजनेचे घोषवाक्य समानतेसह सामाजिक

न्याय असे होते. या योजनेअंतर्गत अपेक्षित विकास दर ८.००% निश्चित केला होता तर साध्य दर हा ७.०६% एवढा होता.

**दहाव्या पंचवार्षिक योजनेचे वैशिष्टे:**

१) सामाजिक सुरक्षा प्रायोजिक योजना २३ जानेवारी २००४ रोजी सुरु झाली.

२) ०९ फेब्रुवारी २००४ रोजी वंदे मातरम् योजना सुरु झाली.

३) ०२ फेब्रुवारी २००६ रोजी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आंध्रप्रदेश या राज्यातुन सुरु झाली.

४) १० फेब्रुवारी २००६ रोजी विशेष आर्थिक क्षेत्र सेझच्या कायद्याची अंमलबजावणी झाली.

**दहाव्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट्ये:**

१) वार्षिक वृद्धीदर ०८% करणे.

२) दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २००७ पर्यंत २१% तर २०१२ पर्यंत ११% पर्यंत कमी करणे.

३) २००१ ते २०११ या दशकातील लोकसंख्या वाढीचा दर १६.०२% पर्यंत कमी करणे.

४) साक्षरतेचे प्रमाण २००७ पर्यंत ७५% करणे तर २०१२ पर्यंत ८०% पर्यंत साधणे.

५) बालमृत्युप्रमाण २००७ पर्यंत दर हजारी ४५ पर्यंत आणणे. तर २०१२ पर्यंत दर हजारी २८ पर्यंत कमी करणे.

**आपली प्रगती तपासा.**

१) दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घ्या.

**५.४.१४ अकरावी पंचवार्षिक योजना ( २००७ ते २०१२):**

११ व्या पंचवार्षिक योजनेस राष्ट्रीय विकास परीषदेने १९ डिसेंबर २००७ रोजी मंजुरी दिली. या योजनेचे अध्यक्ष डॉ. मनमोहनसिंग होते, उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया होते तर सचिव सुधाताई पिल्लई ह्या होत्या. ही योजना गांधीवादी प्रतिमानावर आधारलेली होती. या योजनेचे घोषवाक्य "वेगवान आणि सर्व समावेश विकासाकडे" असे होते. या योजनेत सर्वाधिक खर्च हा सामाजिक सेवांवर करण्यात आला. नंतर ११ व्या पंचवार्षिक योजनेचे नामकरण राष्ट्रीय शिक्षण योजना असे करण्यात आले आहे.

या योजनेत अपेक्षित विकास दर ०९.००% तर साध्य ०६.०७% झाले.

**योजना काळात हाती घेण्यात आलेले कार्य:**

१) वेगवान वृद्धी, ज्यामुळे दारिद्र्य कमी होऊन रोजगारांच्या संधीची निर्मिती होईल.

२) आरोग्य व शिक्षणासारख्या सेवांची उपलब्धता, विशेष: गरिबांसाठी उपलब्ध करून देणे.

३) शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून सबलीकरण करणे.

४) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधीचा विस्तार करणे.

५) पर्यावरणीय शाश्वतता.

**आपली प्रगती तपासा.**

१) अकराव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा घ्या.

### ५.४.१५ बारावी पंचवार्षिक योजना (२०१२ ते २०१७):

१५ सप्टेंबर २०१२ रोजी नियोजन मंडळाने १२व्या योजनेच्या मसुदयाला मान्यता दिली. या योजनेचे अध्यक्ष डॉ. मनमोहन सिंग व नरेंद्र मोदी होते, तर योजनेचे उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया होते. या योजनेचे घोषवाक्य हे 'जलद, शाश्वत आणि अधिक समावेश वृद्धी' हे होते. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे ही पुढीलप्रमाणे होती.

१) वाढीच्या दराचे लक्ष कमी करून ८% वार्षिक सरासरी इतके ठेवण्यात आले आहे. कृषि क्षेत्र ४% तर कारखानदारी १०% इतके लक्ष ठेवण्यात आले आहे.

२) योजनेचा मुख्य भर पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण या क्षेत्रांवर असेल.

३) योजनेचा आकार ४७.७ लक्ष कोटी इतका असेल.

२०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार केंद्रात आल्याने त्यांनी हि योजना बंद केली. व नियोजन आयोगाच्या जागी ' नीती आयोगाची ' स्थापना केली.

**आपली प्रगती तपासा.**

१) बाराव्या पंचवार्षिक योजनेचा माहिती सांगा.

## ५.५ नीती आयोग (NATIONAL INSTITUTE FOR TRANSFORMING INDIA)

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली १ जानेवारी २०१५ रोजी पूर्वीच्या योजना आयोग (Planning Commission) या सरकारच्या मुख्य संस्थेचे रूपांतर नीती (National Institute for Transforming India) या संस्थेमध्ये करण्यात आले. १५ मार्च १९५० रोजी तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली योजना

आयोगाला सुरुवात झाली होती, ज्याचे प्रमुख कार्य पंचवार्षिक योजनांद्वारे विकासासाठी योजना आखणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे हे होते. परंतु आता देशाचे आर्थिक धोरण 'नीती आयोग' ठरवणार आहे. नीती आयोगाचे पहिले अध्यक्ष हे नरेंद्र मोदी (पंतप्रधान) हे होते तर उपाध्यक्ष- अरविंद पानगरिया (अर्थतज्ञ) होते.

**नीती आयोगाची सरंचना:**

पूर्वीच्या नियोजन आयोगाप्रमाणेच देशाचे पंतप्रधान हे नीतीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. नियामक मंडळात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांचा समावेश आहे. तसेच मंडळात उपाध्यक्ष, दोन पूर्णवेळ सदस्य, विद्यापीठातील व संशोधन संस्थेतील दोन अर्धवेळ सदस्य, पंतप्रधानांनी नियुक्त केलेले केंद्रीय मंत्रिमंडळातील चार सदस्य यांचा समावेश आहे. नीतीचा उपाध्यक्ष हा आयोगाचा कार्यकारी प्रमुख असतो. आयोगामध्ये सरकारी आणि खाजगी संस्थांतील तज्ज्ञांची वेळोवेळी सदस्य म्हणून नेमणूक करण्याची व्यवस्था आयोगाद्वारे करण्यात येते. नीतीमध्ये 'टीम इंडिया हब' आणि 'इनोव्हेशन हब' अशी दोन नवीन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राजधानी दिल्ली येथे या आयोगाचे मुख्यालय आहे.

**नीती आयोगाचे धोरण:**

नीतीमध्ये 'थिंक टँक' या संकल्पनेवर भर दिलेला असून, धोरण आखताना केंद्र आणि राज्य सरकार यांच्या भागीदारीचा समावेश यात आहे. नीतीने भारतातील धोरणात्मक आणि दीर्घकालीन धोरणांवर लक्ष केंद्रित केले आहे. याद्वारेच भविष्यात आर्थिक वृध्दिदरवाढीवर भर दिला जाईल. ग्रामीण स्तरापर्यंत पोचण्याचे काम नीती करणार आहे. सामान्यांच्या विकासातून राष्ट्राचा विकास घडण्याऐवजी भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या विकासातून राष्ट्राचा आणि सामान्यांचा विकास घडावा, ही या धोरणाची दिशा आणि आशय आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) नीती आयोगाची माहिती द्या.

## ५.६ पंचवार्षिक योजनांचे परिणाम / यश

१९५१ मध्ये सुरु झालेली पंचवार्षिक योजना भारतासाठी काही क्षेत्रात लाभदायक ठरल्या. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था कमकुवत झाली होती, तिला गती देण्याचे कार्य पंचवार्षिक योजनांनी केले. या यॊजनाचे यश हे पुढील प्रमाणे होते.

**१) राष्टीय उत्पनातील वाढ:**

राष्ट्रीय उत्पनातील वाढ हे आर्थिक विकासाचे प्रतीक आहे. पंचवार्षिक योजनांच्या दरम्यान राष्ट्रीय उत्पनाच्या वाढीचा दर हा ४.१% प्रतिवर्ष होता. पहिल्या पंचवार्षिक योजनात वाढीचा दर हा २.२% निर्धारित केला होता. प्रत्यक्षात मात्र ३.७% प्रतिवर्ष वाढ झाली. काही योजना आपले निर्धारित लक्ष्य पूर्ण करू शकले नाही परंतु आठव्या योजनेत विकास दर हा वाढून ६.६% झाला.

### २) कृषी क्षेत्रात झालेली प्रगती:

ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसल्याने स्वातंत्र्यानंतर कृषी क्षेत्रात बदल करणे आवश्यक्य होते. पहिल्याच पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आण्यासाठी अनेक योजना राबवल्या. १९६६ पासून कृषीच्या तांत्रिक विकासावर भर दिल्यामुळे हरित क्रांती होऊ शकली. योजना काळात अन्नधान्य उत्पादनात तिप्पट वाढ झाली व कृषी क्षेत्रात विकास झाला. कृषी क्षेत्रात झालेल्या विकासामुळे आज भारत अन्नधान्याची आयात करण्याऐवजी निर्यात करू लागला आहे.

### ३) उद्योगातील प्रगती:

पंचवार्षिक योजनेची सर्वात महत्वाची उपलब्धी म्हणजे उद्योगक्षेत्रात झालेली प्रगती होय. उद्योगातील प्रगतीमुळे योजना काळात गेल्या ७५ वर्षात भारताची अर्थव्यवस्था संपूर्ण विश्वाची दहावी औद्योगिक व्यवस्था म्हणून समोर आली आहे. औदयोगिक क्षेत्रातील महत्वाचे यश म्हणजे भारतीय उद्योगांचे झालेले विविधकरण होय. भारताच्या औदयोगिक क्षमतेचे विविधिकरण व विस्तार होण्यात सरकारी क्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे. सर्व उपभोग्य वस्तू व पोलाद, सिमेंट ह्या सारख्या मूलभूत वस्तूंमध्ये देश हा स्वावलंबी बनत आहे.

### ४) रोजगाराच्या संधीत वाढ:

पंचवार्षिक योजनांच्या दरम्यान रोजगाराच्या संधी वाढवण्याचा सातत्याने प्रयन्त केला गेला. यासाठी अनेक महत्वाकांक्षी योजना सरकारद्वारा राबवण्यात आल्या. ह्या दृष्टिकोनातून रोजगार विन्मुख कार्यक्रम, कुटीर लघु उद्योगांचा विकास यासारख्या विशेष योजना कार्यक्रमामुळे रोजगाराच्या संधीत वाढ झाली.

### ५) सामाजिक न्याय:

देशातील प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने व विषमात कमी करून गरीब वर्गातील लोकांचा विकास करण्यासाठी गरिबी निर्मूलन कार्यक्रम राबविण्यात आले. ग्रामीण विकास कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, इ.सारख्या अनेक महतवाच्या योजना राबवण्यात आल्या.

### आपली प्रगती तपासा.

१) पंचवार्षिक योजनांच्या परिणामांची चर्चा करा.

## ५.७ पंचवार्षिक योजनांचे अपयश

भारतात पंचवार्षिक योजना राबविताना त्यामध्ये अनेक त्रुटी निर्माण झाल्या तसेच लोकांचा योग्य सहकार्य न लाभल्याने योजनेमध्ये ठरवलेले लक्ष्य प्राप्त करणे अवघड बनले. ह्या पंचवार्षिक योजना जरी यशस्वी ठरल्या असल्या तरी त्यामध्ये अनेक त्रुटी निर्माण झाल्या त्या पुढीलप्रमाणे:

**१) आर्थिक असमानता:**

डॉ. आर. के. हजारी, दत्त समिती व एकाधिकार आयोग हे स्पष्ट करते कि, पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतात आर्थिक असमानता मोठ्या प्रमाणावर वाढली. श्रीमंत हा अधिक श्रीमंत बनला तर गरीब हा गरीबच राहिला. देशातील जवळपास २६% पेक्ष्या जास्त लोकसंख्या गरिबी रेषेच्या खाली आहे.

**२) बेरोजगारीतील वाढ:**

पंचवार्षिक योजनांच्या काळात देशातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारांची संख्या वाढणे हे या योजनेचे सर्वात मोठे अपयश होते. पहिल्या योजनेत बेकारांची संख्या हि ७० लाख होती तर आठव्या योजनेत ही संख्या १५३ लाखावर पोहचली. याचे मुख्य कारण म्हणजे जड उद्योगांना आवश्यकतेनुसार जास्त महत्व देणे, ज्यामुळे शिक्षित व तंत्रज्ञान शिक्षण प्राप्त लोकांची बेरोजगारी वाढत आहे.

**३) काळया पैशातील वाढ:**

भारतातील विविध कर, त्या करांची जास्त दर, करांची चोरी व विविध आर्थिक नियंत्रणामुळे देशामधील काळा पैसे हा मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला. अरुण कुमार यांनी आपल्या 'The Black Economy in India' या पुस्तकात भारतातील काळ्या पैशाची चर्चा केली आहे. त्यांच्या मते १९९५-९६ या काळात भारतात काळा पैसा हा सकल घरेलू उत्पादनाच्या ४०% झाला होता.

**४) वस्तूंच्या किमतींमध्ये झालेली वाढ:**

भारतातील पंचवार्षिक योजना वस्तूंचा किंमती स्थिर ठेवण्यात अपयशी झाल्या. प्रत्येक पंचवार्षिक योजनते मूल्यवाढीच्या लक्ष्याची प्राप्ती न होऊ शकल्याने याकाळात मूल्यवाढीचा क्रम निर्देशात येतो. परिणामी देशाती गरीब जनता, मजदूर व निश्चित वेतन मिळविणाऱ्या वर्गावर महागाईचा बोझा हा वाढत आहे.

**५) विदेशी कर्जाचा भार:**

स्वतंत्रपूर्व काळात भारतावर विशेष विदेशी कर्ज नव्हते. पण योजना काळात त्या योजना यशस्वी राबविण्यासाठी मोठया प्रमाणात विदेशी कर्ज घेतल्याने त्याचा भार हा वाढला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) पंचवार्षिक योजना का अपयशी ठरल्या त्याचा आढावा घ्या.

## ५.८ सारांश

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतीय अर्थव्यस्था पश्चिमी युरोपियन देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षा अधिक विकसित होती. ब्रिटिशांची भारतात सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांच्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे पणे कोलमडून पडली. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणे आवश्यक्य होते. १९५१ मध्ये भारतात

पहिली पंचवार्षिक योजना राबवली गेली. व एक सुधारित कार्क्रमाद्वारे देशाचा क्रमबद्ध विकास घडवून आणला गेला. गेल्या ७५ वर्षात देशांमध्ये १२ पंचवार्षिक योजना राबविल्या गेल्या, या योजनांच्या काळात विकसनशील देशांमध्ये सर्वात अधिक वेगाने विकसित होणाऱ्या देशांमध्ये भारतच दहावा क्रमांक लागतो. या योजनाकाळात काही क्षेत्रांमध्ये भारताची प्रगती हि उत्साहवर्धक आहे.

## ५.९ प्रश्न

१) नियोजन मंडळाचा आढावा घेऊन स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील नियोजनाची माहिती द्या.

२) पहिल्या ते सहाव्या पंचवार्षिक योजनांचा सविस्तर आढावा घ्या.

३) सातव्या ते बाराव्या पंचवार्षिक योजेची माहिती द्या.

४) नीती आयोगाबद्दल माहिती द्या.

५) पंचवार्षिक योजनांच्या परिणामांचा आढावा घ्या.

६) पंचवार्षिक योजना अपयशी का ठरल्या त्याची चर्चा करा.

## ५.१० संदर्भ

१. बिपिन चंद्र, आजादी के बाद का भारत

२. बिपिन चंद्र- भारत का स्वतंत्रता संघर्ष

३. डॉ. साहेबराव गाठाळ, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास

४. शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७ ते २०००)

*****

# ६

# शेती सुधारणा आणि कृषी विकास

**घटक रचना**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ शेतीमधील सुधारणा

१) जमीनदारी पद्धतीचा नाश

२) जमिनीचे किंव्हा शेतीचे एकत्रीकरण

३) सहकार शेती

६.३ विनोबा भावे व भूदान चळवळ

६.४ शेतीमधील सुधारणांचे परिणाम

१) सरंजामशाही (सामंतवाद) व्यवस्थेची समाप्ती

२) सामंती शोषण व दडपशाहीतून मुक्ती

३) शेतकऱ्यांना जमिनीवरील अधिकार प्राप्त

४) लोकशाही मूल्यांचा विकास

५) शेतीमधील विकास

६.५ हरित क्रांती

६.६ हरितक्रांतीची कारणे

१) आधनिक बी - बियाणे

२) शेतीमध्ये आधुनिक खतांचा वापर

३) शेतीमधील आधुनिक उपकरणे व यंत्राचा वापर

४) जलसिंचनाच्या सोयी

५) पीक सरंक्षण व कीड नियंत्रण

६) पायाभूत सुविधांचा विकास

६.७ हरितक्रांतीचे परिणाम किंवा गुण

१) आर्थिक प्रभाव

२) शेती उत्पादन व उत्पादकता वाढली

३) शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल

४) प्रति हेक्टरी उत्पादन खर्च कमी

५) शेतीमधील भांडवली गुंतवणुकीमधील वाढ

६) स्थलांतरात घट

६.८ हरितक्रांतीचे दोष

१) जमिनीचा ह्रास

२) विशिष्ट पिकांच्या उत्पादनात वाढ

३) प्रादेशिक विषमतेमधील वाढ

४) बेरोजगारीतील वाढ

५) श्रीमंत व मोठ्या शेतकऱ्यांना फायदा

६) सिंचन सुविधानांचा अभाव

६.९ सारांश

६.१० प्रश्न

६.११ संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

१) स्वातंत्र्यानंतर झालेल्या शेती सुधारांचा आढावा घेणे.

२) भूदान चळवळीचा अभ्यास करणे.

३) शेती सुधारणांचे परिणाम अभ्यासणे.

४) हरितक्रांतीचा अभ्यास करणे.

५) हरितक्रांतीच्या परिणामांची चर्चा कारणे.

## ६.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा राहिलेला आहे. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचा सर्वात जास्त फटका हा शेतकऱ्यांना बसला. ब्रिटिशांची महसूल पद्धती, शेतीचे व्यापारीकरण, अन-औद्योगिकीकरण यामुळे शेतकरी हा आणखीनच गरीब बनला. भारतात जमीनदारी व्यवस्थेमुळे कृषिक्षेत्रात प्रचंड विषमता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू यांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीमधील अन्नधान्यचे जास्तीत जास्त उत्पादन वाढवण्याचे धोरण राबविले. तसेच पहिल्या पंचवार्षिक योजनेत जमिनीविषयक धोरण जाहीर केले. व शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध कायदे पारित केले, ज्यामध्ये जमीनदारी पद्धतीचा नाश, कुळांना जमिनीची मालकी देण्याचा अधिकार, सहकार शेतीला प्राधान्य, शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विविध जलसिंचनाच्या योजना इ. भर देण्यात आला.

क्रांती म्हणजे अचानक झालेला बदल, असा बदल हा राजकीय, सामाजिक, आर्थिक किंव्हा संस्कृतीचा देखील असू शकतो. आधुनिक - नवीन तंत्रज्ञान व यंत्रांची सांगड घालून शेती कसण्याचा जुन्या व परंपरागत पद्धतीचा त्याग करून त्याऐवजी नवीन पद्धतीचा अवलंब करणे व त्याद्वारे शेती उत्पादनाची पातळी वाढवणे म्हणजे 'हरितक्रांती' होय. कृषी क्षेत्रात १९४०–७० या काळात जागतिक पातळीवर संशोधन व नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून धान्योत्पादनात उल्लेखनीय वाढ केली गेली. ती चळवळ म्हणजे हरितक्रांती होय. अमेरिकन कृषिशास्त्रज्ञ व हरितक्रांतीचे जनक नॉर्मन बोरलॉग यांनी मेक्सिको येथे कृषी क्षेत्रात व्यापक असे संशोधन करून जादा व भरपूर उत्पन्न देणाऱ्या, रोगांचा प्रतिकार करणाऱ्या विविध पिकांच्या जाति-प्रजाती विकसित केल्या. त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या चळवळीमुळे शेती उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊन लक्षावधी लोकांची उपासमार होण्याचे टळले. भारतात सर्वप्रथम १९६५ साली उच्च पैदास बियाणांचा वापर केला गेला. भारतासारख्या अन्नधान्याची नेहमी टंचाई जाणवणाऱ्या देशाला हरितक्रांतीमुळे अन्न-धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होता आले. भारतातील थोर कृषितज्ज्ञ व भारतीय हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामिनाथन हे होते. नंतरच्या काळात पंजाबराव देशमुख, वसंतराव नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांकडे हरितक्रांतीचे मोठे श्रेय जाते.

हरितक्रांतीमुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर, संकरित बियाणे, उच्च पैदास बियाणे इ. चा वापर वाढवून उत्पादकता दुप्पटीपेक्षा वाढवण्यात आली. हरितक्रांतीमुळे धान्य उत्पादनात कमालीची भर पडून वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असे पुरेसे धान्य उपलब्ध होऊ शकले. ही जरी जमेची बाजू असली, तरी लोकसंख्येत सातत्याने भर पडत असल्याने व जमिनीचा पोत घटत असल्याने भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. जगातल्या पुढारलेल्या देशांना हरितक्रांतीचा जेवढा लाभ झाला, तेवढा आफ्रिकेमधील मागासलेल्या देशांना झाला नाही. हरितक्रांतीला अभिप्रेत असलेल्या कृषी संशोधन व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी आवश्यक असलेल्या अविकसित देशांतील पायाभूत सोयी-सुविधांची वनवा, भ्रष्टाचार व एकूणच असुरक्षिततेची भावना या समस्या त्यासाठी कारणीभूत ठरल्या. काही बाबतीत टीका झाली असली, तरी हरितक्रांतीमुळे जगभर शेतीचा विकास होऊन आधुनिक

तंत्रज्ञानामुळे अन्नधान्याच्या साठ्यात मोठी भर पडली. भारत व चीन यांसारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशांना हरितक्रांतीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

## ६.२ शेतीमधील सुधारणा

### १) जमीनदारी पद्धतीचा नाश:

सरकार व शेतकरी यांच्या मध्ये असलेल्या मध्यस्थ वर्गाचे अधिकार समाप्त केल्याशिवाय शेतीमध्ये सुधारणा करणे शक्य होणार नाही याची जाणीव तत्कालीन काँग्रेस सरकारला होती. या मध्यस्थ वर्गामध्ये मुख्यकरून जमीनदार, तालुकेदार व मोठे भू - स्वामित्व (श्रीमंत व्यापारी, सावकार, व श्रीमंत शेतकरी ) यांचा समावेश होता. व जमिनीचा एक मोठा भूखंड हा त्यांच्या ताब्यात असल्याने त्यांचे अधिकार कमी करणे आवश्यक्य होते. १९४९ मध्ये गोविंद वल्लभ पंथ यांच्या अध्यक्षतेखाली जहागीरदारी व जमीनदारी प्रथेची समाप्ती करण्यासाठी एका आयोगाची स्थापना केली गेली. या समितीने राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, मद्रास, आसाम व मुंबई इ. प्रांतामध्ये असलेल्या मध्यस्थ वर्गाचे अधिकार समाप्त करण्याची सूचना दिली. या आयोगाच्या सूचनेवर प्रांतीय सरकराने जहागीरदारी व जमीनदारी प्रथेच्या समाप्तीसाठी एक कायदा पास करण्याचे आध्यदेश काढला. बिपीन चंद्र यांच्या मते, "जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंथ, व सरदार पटेल या सारख्या काँग्रेसच्या मुख्य नेत्यांना जमीनदारी प्रथा नष्ट करण्याच्या संदर्भात काही साशंकता होती. त्यांना भीती होती कि, जमींनदार आपली संपत्ती वाचवण्यासाठी न्यायालयाचा आधार घेतील व सम्पतीचे अधिकार व त्यांना दिली जाणारी भरपाई यांच्या विरुद्ध ते प्रश्न विचारतील. त्यामुळे राज्यांच्या विधानसभेत जमीनदारी प्रथा समाप्त करण्यासंबधी एक कायदा निश्चित केलेल्या भरपाई सोबत पास केला. तसेच हा मध्यस्थ वर्ग न्यायालयात न जाण्यासाठी त्या कायद्याला न्यायालयीन प्रक्रियेचा बाहेर ठेवावे असे ठरले. व कायदा पास करण्यासाठी फक्त राष्ट्रपतींची अनुमती आवश्यक्य आहे ज्याचा स्पष्ट अर्थ होता कि, हा कायदा पास करण्याचे सर्व अधिकार हे केंद्रातील मंत्रिमंडळाकडे होते." (बिपीन चंद्र, आझादी के बाद भारत, पृ. क्र. ५३६) हा कायदा पास झाल्यामुळे जमीनदारांनी या कायद्याला विरोध करायला सुरवात केली. पटना उच्च न्यायालयाने या मध्यस्थ वर्गाची अपील स्वीकार केली. म्हणून १९५१ मध्ये पहिले व १९५५ मध्ये चौथे संविधानात संशोधन करून जमीनदारी व जहागीरदारी प्रथा समाप्त करण्यासाठी राज्यातील विधानसभेला काही विशेष अधिकार देण्यात आले. १९५६ प्रयन्त बहुसंख्य राज्यातील जमीनदारी प्रथा हि समाप्त करण्यात आली. जो शेतकरी एखादी जमीन कसत असेल त्याला ती जमीन वापस देण्यात आली. परंतु यामध्ये १९४९ मध्ये जमीनदारी व जहागीरदारी प्रथा समाप्त करण्यासाठी आयोगाची स्थापन केल्याने जमीनदारांनी त्यांच्या जमिनीमधून शेतकऱ्यांना बेदखल करण्यास सुरवात केली होती म्हणून सर्व राज्यांनी एक कायदा पास करून १९४९ व त्याच्या नंतर ज्या शेतकऱ्यांना बेदखल केले होते ते बेकायदेशीर मानले गेले.

जमीनदारी प्रथा समाप्त केल्यामुळे पारंपारिक जमिनीची मालकी असणारे मोठे जमीनदार अथवा जमिनीचे मालक यांचा जमिनीवरील अधिकार हा संपला. शेतकऱ्यांना जमिनीची मालकी प्राप्त झाली. त्यांना जमिनीवरील सर्व अधिकार प्राप्त झाले व ती जमिनीवर त्यांची

कायमस्वरूपी मालकी प्राप्त झाली. (स्थावर मालमत्ता) ज्यामुळे जमिनीवरून त्यांना कुठल्याही परिस्थितीमध्ये काढून टाकता येत नव्हते. जमिनीवर शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी अधिकार प्राप्त झाल्याने ते आपल्या जमिनी विकू शकत होते, त्या जमिनी कोणालाही गहाण देऊ शकत होते व कोणालाही भेट म्हणून देऊ शकत होते. तसेच सरकारच्या परवानगीने त्या जमिनीचा वापर अकृषी कार्यासाठी देखील करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला. याबदल्यात शेतकऱ्यांना फक्त नियमित रूपाने सरकारला कर द्यावा लागत असे. त्याला आपल्या शेतीसंबंधी पूर्ण अधिकार प्राप्त झाले होते. ज्यामध्ये तो कोणते पीक घेता येईल किंवा त्यासाठी तो कोणते तंत्रज्ञान वापरेल इ.

१९६० पर्यंत भारतात जमीनदारी प्रथा ही जवळपास संपुष्टात आली होती. जर या कायद्याचे मूल्यांकन केले तर असे आढळते कि, या कायद्यामुळे मध्यस्थ वर्गाची भूमिका समाप्त होऊन त्यांना जमिनीवरील अधिकार हे गमवावे लागले. व शेतकऱ्यांना त्या जमिनीवर अधिकार प्राप्त झाला. परंतु यामध्ये अनेक दोष देखील होते, जमींनदार वर्गाने स्वतःला शेतकरी दाखवून मोठ्या-मोठ्या शेतीवर आपला अधिकार सांगितला. तसेच त्यांनी आपल्या जमिनीवरून अनेक शेतकऱ्यांना बेदखल केले. शेतकऱ्यांकडे यासंदर्भातील कागदपत्रे नसल्याने ते त्या जमिनीवर आपला अधिकार सिद्ध करू शकले नाही. जमीनदारांनी शेतकऱ्यांना बेदखल करून त्या जमिनी आपल्या नातेवाईकांच्या नावे केल्या. परंतु या कायद्याचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे शेतीमधील सरंजामशाही व्यवस्था हि नष्ट झाली. सामाजिक व आर्थिक व्यवस्थेमध्ये सामंतांची स्थिती हि नाजूक बनली. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर वसूल केले जाणारे विविध कर हे समाप्त झाले. व सरकारने निश्चित केला कर हा त्यांना द्यावा लागला. शेतकऱ्यांवर कुठल्याही प्रकारचे अतिरिक्त कर नसल्याने त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली शेती विकसित केली. त्यांना जमिनीची कायमस्वरूपी मालकी प्राप्त झाल्यामुळे ते आपल्या शेतीकडे अधिक लक्ष देऊ लागले ज्यामुळे त्यांच्या उत्पनात वाढ झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) जमींनदारी प्रथा कशी समाप्त केली ते सांगा.

**२) जमिनीचे किंवा शेतीचे एकत्रीकरण:**

शेतीच्या सुधारणांमध्ये शेतीचे एकत्रीकरण हे एक महत्वाचे कार्य होते. स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांना जमिनीवरील अधिकार प्राप्त झाला होता पण त्या जमिनी छोट्या-छोट्या तुकड्यांमध्ये विभागल्या गेल्या होत्या. ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन शेतीच्या उत्पादनात घट होत गेली. त्यामुळे शेतीचे एकत्रीकरण करणे आवशक्य होते. हे शेतीचे एकत्रीकरण दोन प्रकारे केले गेले.

१) एकाच शेतकऱ्यांच्या जमिनी ह्या वेगेवेगळ्या तुकड्यांमध्ये विभागल्या गेल्या होत्या व त्या दूर-दूर होत्या. अशा वेळेस शेतकऱ्यांना तेवढीच जमीन हि एकाच ठिकाणी देण्यात आल्या.

२) यामध्ये सहकार शेती सुरु करण्यात आली.

शेतीच्या एकत्रीकरणाचा विचार हा स्वातंत्र्यपूर्व काळात मांडला गेला होता, पण भारतात पंचवार्षिक योजना राबवल्यानंतर सर्वच राज्यांमध्ये शेतीचे एकत्रिकरण केले गेले. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्तीनंतर जवळपास १ करोड २१ लाख हेक्टर जमिनीचे एकत्रीकरण करणे शक्य झाले.

### ३) सहकार शेती:

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तत्कालीन काँग्रेस सरकार सहकार शेती सुरु करण्याच्या बाजूने होते. परंतु भारतीय शेतकरी सहकार शेती हि संकल्पना हि नीटपणे समजू न शकल्याने ही व्यवस्था भारतात विशेष लोकप्रिय होऊ शकली नाही. सर्वप्रथम आपण सहकार शेती म्हणजे काय हे नीटपणे समजून घेऊ. सहकारी शेती म्हणजे, जमीन कसणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी स्वेच्छेने आपल्या जमिनीचा मालकी हक्क अबाधित ठेवून ती लागवडीसाठी एकत्रित करणे होय. सामान्यतः यामधील शेतकरी हे छोटे असून त्यांच्याकडची साधनसामगी तुटपुंजी असते. शेतीबरोबरच ते आपली साधनसामगी (उदा. अवजारे, बैल इ.) एकत्रित करतात आणि सहकारी शेती संस्थेची स्थापना करून कृषिविषयक सर्व कार्ये ते सामूहिकपणे पार पाडतात. शेतकऱ्याबरोबरच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती शेतीत काम करतात. त्या कामाचा मोबदला त्यांना मिळतो, शिवाय खर्च वजा जाता उर्वरित नफ्याचे (वाढाव्याचे) शेतकरी-सभासदात वाटप केले जाते. अनेकदा जमीन मोठया जमीनदाराकडून किंवा शासनाकडून भाडेपट्टीने मिळविली जाते. अल्पभूधारक शेतकऱ्यांबरोबरच भूमिहीन शेतमजूर व ग्रामीण बेरोजगार व्यक्तींना ही जमीन कसण्यासाठी दिली जाते. ‘एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक’, या सहकाराच्या मूलमंत्रानुसार अनेक सभासद एकत्र आल्याने त्यांची संघशक्ती वाढते. संस्थेची पत वाढल्यामुळे बँकेमार्फत कर्ज, सुधारित बियाणे, आधुनिक तंत्रे व यंत्रसामगी उपलब्ध होते. एकत्रित पाणीपुरवठयाच्या योजनाही राबविल्या जातात. शेतमालाचे उत्पादन, प्रतवारी, साठवण, प्रक्रिया, विक्री इ. सेवा संस्थेमार्फत मिळत असल्याने शेतीची उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर परस्परसहाय्य, प्रेम, बंधुत्व, सहकार्याची वृत्ती यांसारखी सामाजिक मूल्ये जोपासण्यास मदत होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी शेतीमुळे मोठया प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळून लोकांचे जीवनमान उंचावले जाते.

स्वातंत्र्यापूर्वी भारतात सहकार शेती हि संकल्पना रुजली होती. स्वातंत्र्यापूर्वी महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू याव्यतिरिक्त इतर समाजवादी व साम्यवादी नेत्यांनी सहकार शेती हि देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावेल असे मत मांडले. जुलै १९४९ मध्ये काँग्रेसने शेतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी एका समितीची स्थापना केली, या समितीला कुमारप्पा समिती देखील म्हटले जाते. यासमितीने सहकार शेतीसंदर्भात काही उपाय सुचवले होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत या प्रश्नांवर चर्चा देखील केली गेली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी सहकारी शेतीवर भर देण्यात आला. मध्यम व लहान शेतकऱ्यांना स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावित करण्यात आले. राज्य सरकारांनी सहकारी संस्थाच्या विकासासाठी योग्य असा आराखडा तयार करावा, अशी विनंती नियोजन मंडळामार्फत करण्यात आली. परिणामतः १९५६ च्या अखेरीस देशभरात एक हजारच्या आसपास सहकारी शेती-संस्था कार्यरत झाल्या, परंतु केवळ पंजाब, मुंबई व उत्तर प्रदेश या

राज्यांतील संस्थांनी विशेष प्रगती केली. इतर राज्य सरकारांनी सहकारी शेतीच्या सूचनेकडे दुर्लक्षच केले.

सहकार शेतीचे सर्वात जास्त समर्थन पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले. जानेवारी १९५९ नागपूर अधिवेशनात सामूहिक पणे शेती करणे, गावांचे संघटन हे ग्रामपंचायत व ग्राम सहकार या दोघांवर अवलंबुन असावे असे म्हटले गेले. परंतु काँग्रेस मधील इतर नेते एन. जी. रंगा, राजगोपालाचारी, चरणसिंह यांनी याचा विरोध केला.

**आपली प्रगती तपासा.**

१) सहकार शेतीचा आढावा घ्या.

## ६.३ विनोबा भावे व भूदान चळवळ

विनोबा भावे हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी १९४० मध्ये 'वैयक्तिक सत्याग्रह' ची घोषणा केली, त्यावेळीही पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी आचार्य विनोबा भावे यांची निवड केली. पुढे ते सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले. समाजात आर्थिक न्याय मिळावा म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी भू - दान चळवळीला सुरवात केली. भूमिहीन लोकांना जास्तीत जास्त जमीन बाळगणाऱ्या लोकांनी आपली जमीन स्वयंफुर्तपणे दान म्हणून द्यावी अशी विनंती विनोबा भावे यांनी केली. त्यांच्या या हाकेला अनेक जमीनदारांनी व भू - धारकांनी प्रतिसाद दिला. त्यांच्या या आंदोलनामुळे भूमिहीनांना अनेक नवीन जमिनी मिळाल्या. या आंदोलनाद्वारे जवळपास ५ करोड एकर जमीन मिळवण्याचा उद्देश होता. हे आंदोलन सरकारी आंदोलन नव्हते, परंतु काँग्रेसने व सरकारने या आंदोलनाला आपले समर्थन दिले होते.

या आंदोलनाची सुरवात ही एक आकस्मित घटना होती. हैदराबादजवळील शिवरामपल्ली येथे सर्वोदय समाजाचे तिसरे अधिवेशन १९५१ च्या एप्रिलमध्ये झाले. ह्या संमेलनानंतर १५ एप्रिल १९५१ रोजी साम्यवादी हिंसात्मक चळवळींनी त्रस्त झालेल्या तेलंगणात शांतीचा संदेश पोहोचविण्याच्या हेतूने विनोबाजींनी पदयात्रा सुरू केली. ह्या पदयात्रेतूनच भूदान आंदोलनाचा प्रारंभ झाला. १८ एप्रिल १९५१ रोजी विनोबाजी नळगोंडा जिल्ह्यातील ( सध्याचे तेलंगणा ) पोचमपल्ली या गावी गेले असताना काही हरिजन मंडळी त्यांच्या भेटीस आली. त्यांच्या अडचणींची विनोबांजींनी चौकशी केली, तेव्हा 'जमीन मिळाली तर आमचा प्रश्न सुटेल' असे ती मंडळी म्हणाली. उपस्थित असलेल्या इतर मंडळींपैकी रेड्डी नावाच्या सद्गृस्थाने शंभर एकर (४०.४६ हेक्टर ) जमीन देऊ केली हेच पहिले भूदान होय. पोचमपल्लीच्या ह्या घटनेतून एक महान आंदोलन निर्माण झाले. शांतियात्रेचे भूदानयात्रेत रूपांतर झाले, नैतिक संदेशाला व्यावहारिक कृतीची जोड मिळाली. ह्या घटनेनंतर इतर सर्वोदय कार्यकर्त्यांच्याही पदयात्रा वेगवेगळ्या राज्यांतून सुरू झाल्या. यानंतर त्यांनी उत्तर भारताकडे आपली चळवळ सुरु केली. पवनार आश्रम ते दिल्ली यादरम्यान त्यांनी ६२ दिवस पदयात्रा केली जिथे त्यांना १९,४३६ एकर भूदान प्राप्त झाले. दिल्ली वरून ते उत्तर प्रदेशात गेले तिथे त्यांना २,९५,०१८ एकर जमीन भूदान म्हणून प्राप्त झाले. मार्च १९६७ पर्यत भूदानात मिळालेल्या जमिनीचा आकडा ४२ लक्ष ७० हजार एकरांपर्यत (१७,२७,६४२ हेक्टरांपर्यत) गेला असून त्यातील जवळजवळ पन्नास टक्के

जमीन बिहारमधील लोकांनी दिली. बिहारमधील त्यांच्या यशाने हे सिद्ध झाले कि, अहिंसात्मक मार्गाने शेती व शेतकऱ्यांच्या समस्या ह्या सोडवल्या जाऊ शकतात. विनोबाजींच्या कार्याने प्रेरित होऊन त्याकाळातील प्रमुख समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांनी १९५३ मध्ये राजकारणांमधून सक्रीय संन्यास घेतला व ते भूदान आंदोलनात सहभागी झाले. यानंतर विनोबा भावे यांनी उडीसा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ व कर्नाटक इ. राज्यामधून भूमिदान प्राप्त करण्याचा प्रयन्त केला, मात्र इकडे त्यांना अल्प यश मिळाले. १९५५ नंतर भूदान आंदोलन हे कमजोर पडत गेले.

अनपेक्षित व आश्चर्यकारक प्रतिसाद मिळून ह्या आंदोलनाचा व्याप वाढत गेला. भूदानातून प्रेमदान, बुद्धिदान, श्रमदान, संपत्तीदान व जीवनदान असे पंचदान आंदोलन निर्माण झाले. ह्यामुळे सर्वानाच त्यात सहभागी होणे शक्य झाले. लोकांचे हृदयपरिवर्तन करणे, त्यांची जीवनदृष्टी बदलणे आणि त्या अनुरोधाने समाजाची पुनर्रचना करणे, असे भूदानाचे तत्वज्ञान विनोबाजींनी सांगितले. भूमिहीनांचा प्रश्न केवळ जमीन देऊन सुटत नाही. ती कसण्याकरिता साधनसामग्रीची गरज असते. शेतीवर आधारलेले त्यांचे जीवन भक्कम पायावर उभारण्याकरिता ग्रामराज्य स्थापना, ग्रामोद्योग, नई तालीम इ. कार्यांची आवश्यकता निर्माण झाली आणि भूदान व रचनात्मक कार्य ह्यांचा अविभाज्य संबंध दृष्टोत्पत्तीस आला. म्हणून सर्वोदय कार्यकर्त्यांनी ह्या कार्याला व्यापक स्वरूप देण्याचे प्रयत्न केले. भूदान आंदोलनातील मध्यवर्ती कल्पना अगदी साधी वाटली, तरी तिला महत्त्वाचे वैचारिक अधिष्ठान विनोबांनी दिलेले आहे. भूमिहीनांची गरज पुरी करणे, हा ह्या आंदोलनातील प्रधान हेतू नसून जमिनीविषयीची व पर्यायाने संपत्तीविषयीची आसक्ती नाहीशी करणे, हा खरा हेतू आहे. आंदोलनातून मालकी हक्क नष्ट करण्याच्या हेतूने ज्यांच्याजवळ निर्वाहापुरतीही जमीन नाही, त्यांनीदेखील आपली सर्व जमीन द्यावी, भूयज्ञ करावा असा विनोबांचा आग्रह आहे. १९६७ पर्यंत भूदानात मिळालेल्या जमिनीचा आकडा ४३ लक्ष एकरपर्यंत पोहोचला. ह्या आंदोलनाचा व्याप वाढत गेला. अनेकांनी या आंदोलनाचा उल्लेख विसाव्या शतकातील एक मोठी अहिसंक क्रांती, असा केला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) भूदान चळवळीची माहिती सांगा.

## ६.४ शेतीमधील सुधारणांचे परिणाम

समकालीन भारतातील शेती सुधारणांचा अभ्यास केले तर असे आढळते कि, शेती व्यवस्थेमध्ये पाहिजे त्या सुधारणा अजून होऊ शकल्या नाही. गेल्या ७५ वर्षात शेतकऱ्यांच्या आयुष्यात थोडाफार फरकाने बदल झालेला दिसून येतो. या शेती सुधारणांचे परिणाम पुढील प्रमाणे होते.

**१) सरंजामशाही (सामंतवाद) व्यवस्थेची समाप्ती:**

शेती सुधारणेमध्ये सरकारने केलेलं सर्वात पहिले कार्य म्हणजे मध्यस्थ वर्गाची समाप्ती होय. स्वातंत्र्यापूर्वी सरकार व शेतकरी यांच्या मध्ये मध्यस्थ वर्ग होता,जो समाजात प्रभावशाली होता. यामध्ये जमीनदार, जहागीरदार व ताल्लुकेदार इ. वर्ग होते. हा मध्यस्थ वर्ग फक्त

जमिनीचे मालक नव्हते, तर त्यांच्या कडे काही प्रशासकीय अधिकार देखील होते. शेती सुधारणा कायद्यामुळे या मध्यस्थ वर्गाची शक्ती कमी होऊन सरंजामशाही व्यवस्था नष्ट होण्यास मदत झाली.

**२) सामंती शोषण व दडपशाहीतून मुक्ती:**

सरंजामशाही व्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण व छळ होत असे. सामंत अथवा मध्यस्थ शेतकऱ्यांकडून बेगार (सक्तीचे श्रम) याव्यतिरिक्त नगदी अथवा विविध वस्तू ह्या करांच्या रूपाने वसूल केल्या जात. एकीकडे मोठ्याप्रमाणावर आकारला जाणारा भूमी कर व दुसरीकडे सामंतांकडून वसूल केले जाणारे विविध कर यामुळे शेतकऱ्यांचे जीवन हे कष्टदायक बनले होते. सरंमजामशाही व्यवस्था कायद्याने समाप्त झाल्याने सामंती शोषणापासून शेतकऱ्यांची मुक्ती झाली.

**३) शेतकऱ्यांना जमिनीवरील अधिकार प्राप्त:**

शेती सुधारणा कायदा लागू केल्याने शेतकऱ्यांना जमिनीवर स्थायी अधिकार प्राप्त झाला. यापूर्वी जमीनदार, ताल्लुकेदार व जहागीरदार यांच्या प्रभावाखाली असलेल्या जमिनीवर शेतकऱ्यांचा कुठलाही अधिकार नव्हता. त्यांना शेतीवर गुलामाप्रमाणे वागणूक दिली जात. शेती कायद्यामुळे शेतकऱ्यांचा जमिनीवर पूर्ण अधिकार प्राप्त झाला व शेतकरी आपल्या इच्छेप्रमाणे शेतीवर पीक घेऊ लागले व जमिनीची मालकी त्यांना प्राप्त झाल्याने ती शेती विकण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला.

**४) लोकशाही मूल्यांचा विकास:**

कायद्याने शेती सुधारणा घडून आल्याने लोकशाही मूल्यांची वाढ झाली. तत्कालीन भारत सरकारने लोकशाही मूल्यांची जोपासना करून जमींनदार वर्गावर कुठलेही जबरदस्ती न करता कायदयाद्वारे जमिनीची मालकी हि शेतकऱ्यांना दिली. ज्यामुळे शेतकऱ्यांनाच जमिनीवर स्थायी अधिकार प्राप्त झाला.

**५) शेतीमधील विकास:**

सरंजामशाही व्यवस्थेची समाप्ती तसेच शेतकऱ्यांचा जमिनीवर अधिकार प्राप्त झाल्याने शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास होता गेला. मध्यस्थ वर्ग शेतकऱ्यांकडून जे अतिरिक्त कर वसूल करत होते ते थांबल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनले. शेतीवर शेतकऱ्यांना अधिकार मिळाल्याने शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न हे निश्चित झाले. शेतीमध्ये सहकार शेती सुरु झाल्याने शेतकऱ्यांना कृषी कार्यासाठी व्याज सहज उपलब्ध झाले. ज्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञांचा वापर करून शेतीचा आर्थिक विकास घडवून आणला.

**आपली प्रगती तपासा.**

१) शेती सुधारणा कायदाच्या आढावा घ्या.

## ६.५ हरित क्रांती

१) ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचा सर्वात जास्त फटका हा कृषी क्षेत्राला बसला. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी अन्नधान्य उत्पादनाकडे किंव्हा शेती विषयक उत्पादनाकडे जास्त लक्ष न दिल्याने भारतात अन्नधान्य उत्पादनाची टंचाई निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर अन्नधान्य टंचाई निर्माण झाल्याने अन्नधाण्याची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागली. त्यामुळे भारत सरकारने शेतीविषयक उत्पादन वाढवण्यासाठी नवीन पद्धती, चांगल्या व उत्तम प्रकारच्या बियाणांचा वापर, रासायनिक खते आणि पाणीपुरवठच्या सोयींचा विकास करण्यावर भर देऊन शेतीच्या उत्पादनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नालाच 'हरित क्रांती' अथवा भारताचे नवे कृषी धोरण असे म्हणतात.

२) हरितक्रांती म्हणजे केवळ शेतीचे परंपरागत स्वरूप बदलणे असा त्याचा अर्थ नसून यामध्ये शेतीच्या परंपरागत स्वरूपातील बदलाबरोबरच जास्तीत जास्त उत्पादनासाठी वेगवेगळे शेतीविषयक प्रयोग अभिप्रेत आहे. हरितक्रांतीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारित बियाणे, आधुनिक उपकरणे, रासायनिक वापर, सिंचनाच्या सोयी, पीक संरक्षण, योग्य मूल्यांची खात्री व जास्त उत्पादन देणाऱ्या बी - बियाणाच्या नवीन जाती ह्या शेतकऱ्यांना पुरवण्यात आल्या. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली.

३) स्वातंत्र्यानंतर पं. जवाहरलाल नेहरू यांनी शेतीच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. त्यासाठी जमीनदारी पद्धतीचा नाश करून कसेल त्याची जमीन हा कायदा केला. पंचवार्षिक योजना राबवून शेरीसुधारणा केल्या. भाक्रा - नांगल प्रकल्प राबवून पाणी पुरवठ्याच्या सोयी केल्या. १९६० मध्ये भारतात प्रकर्षित स्थैय जिल्हा कार्यक्रम आखण्यात आला. भारतातील एकूण १५ जिल्हांमध्ये सखोल शेतीचा प्रयोग करण्यात आला. हा कार्यक्रम या जिल्यांमध्ये यशस्वी झाल्याने हा प्रयोग संपूर्ण भारतात राबवून हरितक्रांती घडवून आणली. १९५० - ५१ ते १९६६ -६७ या १६ वर्षात शेती उत्पादनात आमूलाग्र व क्रांतिकारी बदल झाले. १९६७ - ६८ मध्ये भारतीय शेती उत्पादनात झालेल्या आमूलाग्र बदलास हरितक्रांती असे म्हटले गेले. हरितक्रांतीमुळे शेती उत्पादन व उत्पादकतेमध्ये २५% अधिक वाढ झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) हरित क्रांती म्हणजे काय ते सांगा.

## ६.६ हरितक्रांतीची कारणे

शेतीचा जलद गतीने विकास घडवून आणणे, परंपरागत जुन्या उत्पादन पद्धतीचा त्याग करून नवीन उत्पादन पद्धतीच्या साहाय्याने नवीन उत्पादन वाढविणे म्हणजे 'हरितक्रांती' होय. हरितक्रांतीचे कारणे किंवा जबाबदार असणारे घटक अथवा हरितक्रांतीचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) आधुनिक बी - बियाणे:

हरित क्रांतीसाठी आधुनिक संकरित बी - बियाणे वापरले जाते. या बियाणांचा उपयोग केल्याने अन्नधान्याचे एकरी उत्पादन वाढते व एकूण उत्पादनात वाढ होते. म्हणून चांगले बियाणे उत्पादित करण्यासाठी सरकारने सीड्स फार्म तयार केले. भारतीय शेती संशोधन संस्था व भारतातील कृषी विद्यापीठे यांनी संशोधन करून भरपूर पिके देणाऱ्या नव्या संकरित जाती शोधून काढल्या. तीन महिन्यात पिकांचे उत्पादन होईल अशा पद्धतीने गहू, तांदूळ, ज्वारी व मका इ. पिकांच्या नवीन जाती विकसित करण्यात आल्या. या पिकांचे बियाणे शेतीमध्ये उपयोगात आणल्याने शेतीच्या उत्पादनात वाढ झाली.

### २) शेतीमध्ये आधुनिक खतांचा वापर:

शेतीमध्ये पिके हि सतत घेतल्याने जमिनीची सुपीकता कमी होत जाते, तेव्हा जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी व वाढवण्यासाठी खतांचा वापर हा अपिरिहार्य ठरतो. रासायनिक खतांच्या वापरामुळे पिकांची चांगली वाढ होते, जमिनीची एकूण सुपीकता वाढते त्यामुळे एकूण उत्पादनात वाढ होते. पिके जलद व भरपूर वाढण्यासाठी आधुनिक खतांचा वापर केला गेला तसेच खतांच्या नवीन विविध प्रकार व ती वापरण्याची नवीन पद्धती शोधून काढण्यात आल्या. भारतात १९५१ - ५२ मध्ये खतांचे उत्पादन ३९ हजार टन होते ते १९९४ - ९५ मध्ये १० दशलक्ष टन झाले.

### ३) शेतीमधील आधुनिक उपकरणे व यंत्राचा वापर:

शेतीमधील एकूण उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतीचे पूर्ण किंव्हा आंशिक यांत्रिकीकरण होणे आवश्यक्य आहे. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी ट्रॅक्टर, पेरणीयंत्र, कापणीयंत्र, मळणीयंत्र, पाणीपुरवठ्यासाठी वीज किंव्हा डिझेल पंप, शेतमाल वाहतुकीचे साधने इ. चा उपयोग करणे अभिप्रेत आहे. भारतातील बहुसंख्य शेतकरी हा गरीब असल्याने सरकारने यंत्रे विकत घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देते. शेतीमध्ये आधुनिक उपकरणाचा उपयोग केल्याने एकूण उत्पादन खर्च कमी होतो, एकूण उत्पादनात वाढ होते व शेतकऱ्यांचे नफ्याचे प्रमाण वाढते.

### ४) जलसिंचनाच्या सोयी:

भारतातील शेती हि निसर्गावर अवलंबून असल्याने व हरित क्रांतीला भरपूर पाणी पुरवठयाची आवश्यकता असल्याने केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून चालत नाही. शेतीमधून अतिरिक्त उत्पादन घेयाचे असेल तर जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक्य आहे. भारतात मोठ्या धरणाचे प्रकल्प, मध्यम पाटबंधारे योजना, कालवे, तलाव, विहिरी, पाणी आडवा पाणी जिरवा, कूपनलिका इ. योजनेअंतर्गत सिंचनायचा सोयींवर लक्ष केंद्रित करण्यात आले. २००६ - ०७ पर्यंत भारतातील एकूण सिंचन क्षमता १०२.८ दशलक्ष हेक्टर्स पर्यंत वाढली होती तर सिंचन क्षेत्रातील प्रत्यक्ष वापर हा ८७.२ दशलक्ष हेक्टर्स पर्यंत वाढला.

**५) पीक सरंक्षण व कीड नियंत्रण:**

शेतीमध्ये लागवड केल्यानंतर उगवणाऱ्या पिकांवर विविध रोग पडतात. त्यामुळे पिकाची एवढं चांगल्या पद्धतीने होत नाही. तसेच खतांच्या वापरामुळे विविध रोगांचे - किडीचे प्रमाण वाढते. त्यामुळे पिकांचे सरंक्षण करणे आवश्यक्य असते. भारतातील संशोधन संस्थांनी पिकांवरील रोगांचे निवारण करण्यासाठी अनके औषधी शोधून काढली आहे, त्या औषधांच्या प्रयोगामुळे पिकांवरील रोगांचे नियंत्रण होऊन एकूण उत्पादनात वाढ होते. पिकांवरील रोगनियंत्रण हा हरितक्रांतीच्या जबाबदार घटक मानला जातो.

**६) पायाभूत सुविधांचा विकास:**

भारतात पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत ग्रामीण पायाभूत सुविधांचा झालेला विकास हा हरितक्रांतीसाठी प्रेरक ठरला. पायाभूत सुविधांच्या घटकामध्ये वाहतूक व दळणवळण, नियंत्रित बाजारपेठा, साठगृहे, शेती शिक्षण, प्रशिक्षण शेती विस्तार व शेती संशोधन इ. बाबींचा समावेश होतो. या पायाभूत सुविधा शेतकऱ्यांना मिळाल्याने नवीन तांत्रिक लागवड पद्धतीचा वापरास प्रोत्साहन मिळते. हरितक्रांतीच्या यशात पायाभूत सुविधांचा झालेला विकास महत्वाचा होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) हरित क्रांतीची कारणे सांगा.

## ६.७ हरितक्रांतीचे परिणाम किंव्हा गुण

भारतामध्ये १९६७ - ६८ मध्ये पहिली हरितक्रांती व १९८३ -८४ मध्ये दुसरी हरितक्रांती घडून आली. तसेच सर्वच पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे १९७७ नंतर भारत हा अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण बनला. या हरितक्रांतीचे अनेक सकारात्मक परिणाम होते ते पुढीलप्रमाणे

**१) आर्थिक प्रभाव:**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने देशाच्या आर्थिक विकासातील शेतीचे योगदान हे अतिशय महत्वाचे मानले जाते. हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाल्याने औद्योगिक व सेवाक्षेत्रातील वस्तूंची मागणी वाढली. औद्योगिक विकास गतिमान झाल्याने देशाचा आर्थिक विकास झाला. हरितक्रांतीमुळे शेती क्षेत्रात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते.

**२) शेती उत्पादन व उत्पादकता वाढली:**

हरितक्रांतीमुळे भारतीय शेतीत नवीन तंत्र, संकरित बियाणे, जलसिंचनाचे संशोधन इ. कारणांनी शेतीतील दर एकरी उत्पादकता वाढली. हरितक्रांतीने ज्वारी, बाजरी, मका, या अन्नधान्याच्या उत्पादनाबरोबरच ऊस, कापूस, तेलबिया या नगदी पिकांच्या उत्पादनातही वाढ झाली. हरितक्रांतीमध्ये गहू, तांदूळ या पिकांची उत्पादकता वेगाने वाढल्याने भारत या

उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. २०१० - ११ मध्ये भारतात अन्नधान्यचे उत्पादन हे २३० दशलक्ष टन पर्यंत वाढले होते.

**३) शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल:**

हरितक्रांतीपूर्वी भारतीय शेतकरी शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून बघत असे, परंतु हरितक्रांतीनंतर शेतकऱ्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला. हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढल्याने शेती व्यवसाय हा किफायतशीर असल्याची जाणीव शेतकऱ्यांना झाली. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढल्याने तो बाजाराभिमुख बनला. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारल्याने शिक्षणाचा प्रसार वाढला, खेडी बाजारपेठांशी जोडल्या गेल्या, दळणवळणाच्या साधनात वाढ झाली, नवीन तंत्र - संकरित बियाणे यांच्या वापराने शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले व त्याच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला.

**४) प्रति हेक्टरी उत्पादन खर्च कमी:**

हरितक्रांतीमुळे शेतीचे उत्पादन वाढल्यामुळे उत्पादन खर्च कमी झाला. थोडक्यात, शेतीच्या उत्पादनात वाढ झाल्याने प्रति हेक्टरी खर्च कमी होऊन शेती उत्पादनाच्या निर्यातीला चालना मिळाली. त्यामुळे विदेशी चलनाची प्राप्ती होण्यास मदत झाली.

**५) शेतीमधील भांडवली गुंतवणुकीमधील वाढ:**

हरितक्रांती मुळे शेतकरी हा वर्षातून दोन किंव्हा तीन वेळा पिके घेऊ लागला. त्यामुळे उत्पादकता व उत्पादनात झालेली वाढ, किंमतीमधील स्थैर्य इ. शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली. शेतीतून उत्पन्न मिळू लागल्यामुळे भांडवली गुंतवणुकीमध्ये वाढ झाली व शेतीचा सर्वांगीण विकास झाला. शेतात विहारी खणणे, वीजपंप, पाईपलाईन, ट्रॅक्टर, मळणी, कापणी यंत्राची खरेदी, जमीन सपाटीकरण इ. गोष्टीमुळे शेतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढली.

**६) स्थलांतरात घट:**

हरितक्रांतीमुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाल्याने शेतीतमधून मिळणाऱ्या नफ्यामुळे व शेतीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर कमी झाले. शेतीमधून वाढलेल्या उत्पादनामुळे शहरी भागातील बरीच कुटुंबे आपल्या मूळ गावी शेती करण्यासाठी स्थलांतरित झाली. हरितक्रांतीच्या हा आर्थिक व सामाजिक प्रभाव देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारा ठरला असे म्हटले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१) हरित क्रांतीच्या परिणामांची चर्चा करा.

## ६.८ हरितक्रांतीचे दोष

हरितक्रांतीमुळे देशाचा आर्थिक विकास झाला असला तरी त्यामधून काही समस्या देखील निर्माण झाल्याचे दिसून येतात. हरितक्रांतीचे नकारात्मक परिणाम किंव्हा हरितक्रांतीचे दोष हे पुढील प्रमाणे

**१) जमिनीचा ह्रास:**

हरितक्रांतीमुळे पिकांच्या आकृतिबंधातील बदल, वर्षातून दोन ते तीन पिके घेणे, रासायनिक खतांचा अतिरेक वापर, कीटकनाशके इ. चा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याने शेतीमधील उत्पादन हे घटू लागले. रासायनिक खतांचा जास्त वापर केल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता कमी होऊन जमिनीचा कस कमी होत गेला. कीटकनाशके व औषधांच्या वापरामुळे पिकांवर तसेच शेतकऱ्यांच्या शरीरस्वास्थावर त्याचा परिणाम झाला. हरितक्रांतीमध्ये पडीक जमीन लागवडी खाली आल्याने जंगल क्षेत्र कमी झाले, जमिनीची धूप घडून आली. थोडक्यात, हरितक्रांतीमुळे अन्नधान्यच्या उत्पादनात वाढ झाली व जमिनीचा ह्रास घडून आला.

**२) विशिष्ट पिकांच्या उत्पादनात वाढ:**

हरितक्रांतीमुळे गहू, ज्वारी, बाजरी, व मका इ. पिकांच्या उत्पादनात वाढ झाली. परंतु तेलबिया, कापूस, ताग, या व्यापारी पिकांमधील उत्पादनात फारशी वाढ झाली नाही. शेतीमधील नवीन संशोधनाने अन्नधान्याच्या काही पिकांची वाढ झाली, परंतु कडधान्याच्या उत्पादनात वाढ घडून आली नाही. तसेच भारताच्या विविध ठिकाणी वेगवेगळ्या वातावरणामुळे विविध पिके घेतली जातात त्या दृष्टीने ह्या पिकांच्या विविध जाती निर्माण करण्यात आपण अपयशी ठरलो. थोडक्यात अनेक पिकांच्या उत्पादनात हरितक्रांतीच्या प्रभाव दिसून येत नाही.

**३) प्रादेशिक विषमतेमधील वाढ:**

भारताच्या काही राज्यातच हरित क्रांती हि यशस्वी झाल्याचे दिसून येते. पंजाब, राजस्थान, हरियाणा, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, केरळ, महाराष्ट्र इ. या राज्यात हरितक्रांतीच्या प्रभाव दिसून येतो. अन्य राज्यात या क्रांतीचा फारसा प्रभाव दिसून आला नाही. देशाच्या भौगोलिक विस्ताराच्या मानाने हरितक्रांतीचे क्षेत्र हे मर्यादित राहिल्याने प्रादेशिक विषमता वाढीस लागली. तसेच सर्व राज्यात पीक वाढीचा वेग हा एकसारखा नव्हता ज्यामुळे आर्थिक विषमता वाढली.

**४) बेरोजगारीतील वाढ:**

हरितक्रांतीमुळे शेती करण्याच्या परंपरागत पद्धतीऐवजी नवीन तंत्र व यंत्राचा अवलंब झाल्याने शेतीवर काम करणाऱ्या घटकास किंव्हा लोंकाना रोजगार उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्या. एक यंत्र अनेक व्यक्तीचे कार्य एका दिवसात करत असल्याने श्रीमंत शेतकऱ्यांनी शेतमजुरांऐवजी यंत्राचा वापर करण्यास सुरवात केली. परिणामी

शेतकऱ्यांना रोजगार न मिळाल्याने ते बेरोजगार झाले व मोठ्या प्रमाणावर शेतमजुरांचे स्थलांतर शहरी भागात होऊ लागले.

**५) श्रीमंत व मोठ्या शेतकऱ्यांना फायदा:**

भारतातील २०% मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांना हरितक्रांतीच्या फायदा झाल्याचे दिसून येतो. शेतीमधील नवीन तंत्रज्ञान लहान शेतकऱ्यांना स्वीकारता आले नाही. त्यामुळे मोठे शेतकरी हे आणखी श्रीमंत बनले व यामधून अप्रत्यक्ष रित्या जमींनदारी पद्धतीला चालना मिळाली. भांडवल कमी असल्याने छोटे शेतकरी शेती व्यवसायातून किंव्हा स्पर्धेमधून बाहेर फेकले गेले. सहकारी सोसायट्या व बँकांमधून मिळणाऱ्या कर्जाचा फायदाही मोठ्या शेतकऱ्यांना झाला. मोठे शेतकरी व लहान शेतकरी यांच्या उत्पनातील तफावत हि १०% वाढली. थोडक्यात हरितक्रांतीमुळे उत्पन्नातील विषमता वाढली.

**६) सिंचन सुविधानांचा अभाव:**

भारतात एकूण लागवडीखालच्या क्षेत्राच्या ३८% प्रदेशात सिंचनसुविधा उपलब्ध आहे. उर्वरित जमिनीचे क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. सिंचन सुविधा अपुऱ्या असल्याने संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके इ. च्या वापरावर बंधने येतात. जलसिंचन साधनांच्या अपुरेपणामुळे हरित क्रांतीचा विस्तार करता येत नाही. जलव्यवस्थापनाच्या अभावामुळे भारतातील भूजल पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) हरित क्रांतीचे दोष सांगा.

## ६.९ सारांश

स्वातंत्र्यानंतर शेती व्यवस्तेमध्ये सुधारणा हि आधुनिक काळाची गरज होती. याकाळात शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचा बराच प्रयन्त केला गेला. शेती सुधारांमध्ये बहुतांश राज्यात जमीनदारी पद्धती नष्ट करण्याकरिता कायदे पास करण्यात आले. कसणाऱ्याला जमीन द्यावी असा प्रयन्त केला गेला. शेतकरी व सरकार यांच्या मध्ये जे दलाल होते (जमनीदार, जहाँगीरदार, ताल्लुकेदार) या सर्वांची दलाली बंद करण्यात आली. यासर्व कायद्यांचा परिणाम म्हणून लक्षावधी कुळे जमिनीचे मालक बनले. जमिनीची मालकी कुळांना भेटल्यामुळे त्यांनी शेती व्यवसायामध्ये आणखी रस दाखवल्याने शेतीचा विकास घडून आला. याच काळात शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळावा म्हणून आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरु केली. याचळवळीमुळे अनेक भूमिहीनांना नवीन जमिनी मिळाल्या.

१९७० च्या दशकात देशात हरित क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्याआधी भारताला अन्नधान्याच्या भीषण टंचाईचा सामना करावा लागत होता. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजेइतके उत्पादन देशात होत नव्हते. यासाठी अन्नधान्याचा मोठा साठा आयात करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी हरित क्रांतीची योजना आखली गेली. वेगवेगळ्या तंत्राने अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे हा हरित क्रांतीमागचा उद्वेश होता. हा उद्वेश साध्य झाला आणि भारत अन्नधान्याच्या निर्मितीत स्वयंपूर्ण झाला. आज भारत

हा अनेक राष्ट्रांना अन्नधान्याची निर्यात करतो. हरित क्रांतीत यशस्वी ठरलेल्या गहू या पिकाच्या मेक्सिकन वाणापासून भारतात गव्हाचे कल्यापासोना व सोनालिका हे वाण विकसित करण्यात आले. तायचुंग कंपनीने तैवानमधून आणलेल्या भाताच्या (तांदूळ) वाणांना भारतात जया असे नाव देण्यात आले. हरित क्रांती यशस्वीतेमुळे १९७० मध्ये भारतातील अन्नधान्य उत्पादन ११० दशलक्ष मेट्रिक टन इतके वाढले. हरितक्रांती जरी भारतात यशस्वी ठरली असली तरी हरित क्रांतीचे काही दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. खते, कीटकनाशके, औषधे, रसायने यांचा पिकांवर मारा करून पिकांचे उत्पादन वाढविणे ही हरित क्रांतीची ओळख होती. जमिनीचा पोत जाणून न घेता भरपूर पाणी देणे, रासायनिक खतांचा पिकांवर भडीमार करणे यांसारख्या उपायांमुळे देशातील शेतजमिनीचा कस कमी होऊ लागल्याचे दिसून येऊ लागले आहे. त्याचबरोबर हरित क्रांतीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जमिनीला बेसुमार पाणी दिले जाऊ लागले. यासाठी भूगर्भातील पाण्याचा प्रचंड प्रमाणात उपसा केला जाऊ लागला. याचा परिणाम भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होण्यात होऊ लागला आहे.

## ६.१० प्रश्न

१) स्वातंत्र्यानंतर भारतात झालेल्या शेती सुधारणेचा आढावा घ्या.

२) सहकार शेती हि संकल्पना स्पस्ट करा.

३) भूदान चळवळीचा आढाव घ्या.

४) शेतीवरील सुधारणांचा भारतावर झालेला परिणाम सांगा.

५) हरितक्रांती म्हणजे काय ते सांगून हरतीक्रांतीच्या कारणांचा आढाव घ्या.

६) भारतावर हरितक्रांतीच्या काय परिणाम झाला ते स्पष्ट करा.

७) हरित क्रांतीच्या दोषांचा आढावा घ्या.

## ६.११ संदर्भ

१) शर्मा वृज / शर्मा शैलबाला, समसामायिक भारत (१९४७-२०००), पंचशील प्रकाशन, जयपूर, २००७

२) बिपीनचंद्र ,मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी, आझादी के बाद का भारत (१९४७ - २००७), हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली विश्वविद्यालय, २०१५

३) कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७ - २०००), साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१३

४) कोलारकर श. गो. स्वतंत्र हिंदुस्थानचा इतिहास (१९४७ - १९८०), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७

५) समकालीन भारत (१९४७ - २०००), (Study Material) वर्धमान महावीर खुला विश्व विद्यालय, कोटा

६) पिंपलपल्ले आर./ मुटकुळे रामभाऊ, स्वतंत्रत्तोर भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

७) Chandra Shekhar, Political Economy of India, Vikas Publication House, New Delhi, १९९२.

८) Datt & Sundharam, Indian Economy, S. Chand Publication, Mumbai, २०१५.

९) Kapila Uma (Edi.), Indian Economy since Independence, Academic Foundation, २०१८.

*****

# ७

# बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि औद्योगिक विकास

**घटक रचना**

७.० उद्दिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

७.३ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे

१) आर्थिक विकास घडवून आणणे

२) बँकेतून श्रीमंत लोकांचा प्रभाव नष्ट करणे

३) शेती, लघु - मध्यम उद्योग व व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्यता

४) बँकिंग व्यवस्थेमध्ये प्रोफेशनलिझम आणणे

५) ग्रामीण भारतात बँकेचा विस्तार घडवून आणणे

६) सरकारी धोरणांचे पालन

७.४ इंदिरा गांधींची भूमिका

७.५ चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण (पहिला टप्पा)

७.६ बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा (दुसरा टप्पा)

७.७ बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम

७.८ १९४८ चे औद्योगिक धोरण

७.९ १९५६ चे औद्योगिक धोरण

७.१० १९७७ चे औद्योगिक धोरण

७.११ १९८० चे औद्योगिक धोरण

७.१२ १९९१ चे औद्योगिक धोरण

७.१३ १९९३ चे औद्योगिक धोरण

७.१४ २००१ चे औद्योगिक धोरण

७.१५ भारतातील औद्यौगिक विकासाचे स्वरूप

१) सर्व प्रकारच्या उद्यौगधंदयांचा विकास

२) सार्वजनिक क्षेत्राचा विकास

३) उद्यौगधंद्यांच्या व्यवस्थापनाचे विविध प्रकार

४) प्रादेशिक असमोताल कमाई करण्याचा प्रयत्न

५) सहकारक्षेत्राचा विकास

७.१६ सारांश

७.१७ प्रश्न

७.१८ संदर्भ

## ७.० उद्दिष्ट्ये

१) भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा अभ्यास करणे.

२) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे तपासणे.

३) बँकाच्या राष्ट्रीयीकरणात इंदिरा गांधी यांची भूमिका अभ्यासणे.

४) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम अभ्यासणे.

५) भारतातील औद्यौगिक विकास समजून घेणे.

६) भारतातील औद्योगिक धोरणांचा आढावा घेणे.

७) औद्योगिक धोरणांच्या विकासाच्या स्वरूपाचा आढाव घेणे.

## ७.१ प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची आर्थिक परिस्थिती गंभीर होती. ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणाचे विपरित परिणाम स्पष्ट दिसत होते. देशातील मूठभर लोकांजवळ अमाप संपत्ती होती. उरलेला ९०% समाज गरीबीचे जीवन जगत होता. ताष्कंद करारानंतर लाल बहाद्दुर शास्त्री यांचा मृत्यू झाला. १९६७ साली इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. स्वतःच्या क्षमतेची ओळख पटविण्यासाठी इंदिराजींना कठोर निर्णय घ्यावे लागणार होते. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात देशातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या यशस्वी संचलनासाठी व देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी बँका ह्या महत्वाच्या भूमिका बजावत असतात. इंदिरा गांधींनी १४ बँकांचे केलेले राष्ट्रीयीकरण हा एक धाडसी व अर्थव्यवस्थेला कलाटणी देणार निर्णय ठरला. इंदिरा गांधीनी १४ बँकांचे केलेलं राष्ट्रीयीकरण हा त्यांच्या राजकीय

कूटनीतीचा भाग होता कि त्यांना गरिबांचे कल्याण करायचे होता हा एक विवादास्पद प्रश्न आहे. तरी त्यांच्या या निर्णयाने देशातील आर्थिक क्षेत्रात एकच खळबळ निर्माण केली.

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळे स्वातंत्र्यापूर्वी भारतात थोड्या फार प्रमाणात उद्यौगधंद्यांचा विकास झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात कापड उद्यौग, ताग उद्यौग, साखर उद्यौग, आणि लोखंड व पोलाद या उद्यौगांची स्थापना झाली होती. स्वातंत्र्यानंतर उद्यौगधंद्याकडे बघण्याचा सरकारचा दृष्टिकोन बदलला. १९४७ मध्ये पं. जवाहरलाल नेहरू यांनी देशाच्या आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी एका समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशींवर १९४८ मध्ये औद्यौगिक धोरण मांडले गेले. १९५१ मध्ये भारतात नियोजनाचे युग सुरु झाल्याने देशाच्या औद्योगिकीकरणाला एक वेगळी दिशा प्राप्त झाली. व देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास सुरु झाला. पंचवार्षिक योजनांच्या दरम्यान देशातील जुने उद्यौगधंद्यांचा झपाट्याने विकास झाला तर अनेक नवीन उद्यौगधंदे स्थापन झाले.

## ७.२ भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

लोकांना पैसे जमा करण्यासाठी आणि लोकांना कर्ज वाटण्यासाठी जी वित्त संस्था कार्य करते तिला बँक असे म्हणतात. सर्व प्रकारच्या आर्थिक सेवा या मुख्यतः बँकेच्या माध्यमातून चालतात. भारतातील नव्हे तर संपूर्ण जगभरातील बँका या वित्तीय सेवा देत असतात. आधुनिक जगात बँक हा शब्द किंव्हा हि व्यवस्था सर्वसामान्य लोंकाना परिचित आहे. परंतु बँक हा शब्द कधी प्रचलित आला याबद्दल विद्वानांमध्ये एकमत आढळून येत नाही. काहींच्या मते, बँक हा शब्द जर्मन शब्द (BANCK) या शब्दापासून बनला असावा, तर काहींच्या मते हा शब्द इटालियन भाषेतील (BANCO) या शब्दापासून बनला आहे ज्याचा अर्थ “Common Fund” असा होतो. जगातील बँकांचा इतिहास हा ई. स. पूर्व २००० वर्षांपूर्वी बेबोलीयन किंव्हा ग्रीक मध्ये आढळतो. इ. स. पूर्व. २००० मध्ये असिरियन आणि बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये आपल्याला कर्जे दिल्याची काही उदाहरणे बघायला मिळतात. या  मंदिरातील साधक म्हणजेच पुजाऱ्यानी काही व्यापाऱ्यांना कर्ज दिले होते असे उल्लेख आढळतात. भारतात वैदिक काळापासूनच बँकिंग व्यवस्था असल्याची माहिती आढळते. भारतात प्राचीन काळामध्ये अनेक व्यापारी संस्था ह्या बँक व्यवस्थेचे कार्य कारात असल्याचे पुरावे आढळतात.

अलेक्झांडर हॅमिल्टन यांना “आधुनिक बँकिंगचे जनक” म्हणून ओळखले जाते. भारतातील आधुनिक बँकिंग व्यवस्था हि ब्रिटिश कालखंडापासुनन सुरु झाल्याचे दिसून येते. १७७० मध्ये भारतात ‘बँक ऑफ हिंदुस्तान’ ही पहिली बँक स्थापन झाली. ही बँक अलेक्झांडर अँड कंपनीने कलकत्त्याला स्थापन केलेली होती. मात्र ही बँक १८३२ मध्ये बंद पडली. १८०६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने ‘बँक ऑफ कलकत्ता’ ही पहिली प्रेसिडेन्सी बँक स्थापन केली. १८४० मध्ये दुसरी प्रेसिडेन्सी ‘बँक ऑफ बॉम्बे’ या नावाने स्थापन करण्यात आली आणि १८४३ मध्ये ‘बँक ऑफ मद्रास’ ही तिसरी प्रेसिडेन्सी बँक स्थापन करण्यात आली. १८६५ मध्ये अलाहाबाद बँक, अलायन्स बँक ऑफ सिमला या बँकांची स्थापना करण्यात आली. १८८१ मध्ये मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर अवध कमर्शियल बँक या बँकेची स्थापना करण्यात आली. मर्यादित जबाबदारीच्या तत्वानुसार बँकेमध्ये गुंतवणूकदार

असतात. यांची जबाबदारी कमी असते. त्यामुळे भांडवलदार अशा प्रकारच्या बँका स्थापन करण्याला प्राधान्य देतात. १८९४ मध्ये पंजाब नॅशनल बँकेची स्थापना झाली आणि संपूर्ण भारतीयांच्या मालकीची ही पहिलीच बँक होती. २०व्या शतकाच्या सुरवातीस भारतीय बँकामध्ये अनेक दोष दिसू लागल्याने त्या बँका बुडू लागल्या. हे टाळण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२० मध्ये इंपिरियल बँकेची निर्मिती केली. १९३५ मध्ये भारताची मध्यवर्ती बँक म्हणून 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची' स्थापना झाली. १९४९ मध्ये रिझर्व्ह बँकचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. १९५५ मध्ये 'इंपिरियल' बँकेचे राष्ट्रीयीकरण करून तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

## ७.३ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची कारणे

एखाद्या बँकेची अथवा काही बँकांची मालकी जेव्हा सरकार स्वतःकडे घेते व त्या बँकेचे किंवा बँकांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सरकारकडे येते, त्यास ' राष्ट्रीयीकरण ' असे म्हणतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण १ जानेवारी १९४९ रोजी करण्यात आले. १जुलै १९५५ रोजी इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँक ऑफ इंडिया ची (SBI) ची निर्मिती करण्यात आली. इंदिरा गांधींनी १९ जुलै १९६९ रोजी राष्ट्रपतींच्या वटहुकूमाद्वारे ५० कोटी रु. पेक्षा अधिक ठेवी असणा-या १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची अनेक कारणे होती ती पुढीलप्रमाणे

### १) आर्थिक विकास घडवून आणणे:

पंचवार्षिक योजनांच्या यशस्वी संचलनासाठी मोठ्या प्रमाणावर वित्तीय साधनांची आवश्यक्यता होती. वित्तीय समस्यांमुळे शेती, छोटे व मोठे उद्योगधंदे यांच्या विकासाची गती मंदावली होती. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास जलद गतीने घडवून आणण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण आवश्यक्य होते.

### २) बँकेतून श्रीमंत लोकांचा प्रभाव नष्ट करणे:

स्वातंत्र्यानंतर बँकिंग व्यवस्थेवर श्रीमंत वर्गांचा प्रभाव होता. व देशातील ८०% संपत्ती या मूठभर श्रीमंत लोकांच्या हाती एकवटल्याने सामान्य व्यक्तींना बँकेकडून कुठल्याही प्रकारची मदत मिळत नव्हती. राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी व्यावसायिक बँक 'क्लास बँकिंग' नीतीचा वापर करायचे. याअंतर्गत केवळ श्रीमंतांनाच बँकेद्वारे कर्ज आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जायच्या. या काळात बँका ह्या आपल्या मित्रांना किंव्हा मोठ्या उद्योगपतींना आपल्या फायद्यासाठी बँकेतील पैसा व्याजाने देत. व राष्ट्रीय हिताच्या कार्यासाठी आर्थिक मदत करण्यास नकार देत. राष्ट्रीयीकरण करून उद्योगपतींचा हा प्रभाव नष्ट करणे हे मुख्य उद्देश होता.

### ३) शेती, लघु - मध्यम उद्योग व व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्यता:

या बँकांवर मोठ्या व्यापाऱ्यांचे नियंत्रण असल्याने सर्वसामान्य व्यापाऱ्यांना कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नसे. लघु उद्योग व व्यापाऱ्यातील विकासामध्ये कर्ज उपलध करून देणे हे फार आवश्यक्य असते परंतु हे कर्ज फक्त श्रीमंत व्यापाऱ्यांना किंव्हा जवळच्या व्यक्तींना दिले जात असल्याने छोटे उदयोगधंदे, शेती यांचा हवा तसा विकास होत नव्हता. कृषी, लघु आणि मध्यम उद्योगांसोबत छोटे व्यापाऱ्यांना सरळ अटींवर आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण कारणे आवश्यक्य होते.

### ४) बँकिंग व्यवस्थेमध्ये प्रोफेशनलिझम आणणे:

बँका जेव्हा खाजगी क्षेत्रात होत्या, तेव्हा त्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची कुठलीही व्यवस्था नव्हती. तसेच त्या कर्मचाऱ्यांची नोकरी हि बँकाच्या मालकावर निर्भर होती. त्यामुळे आपली नोकरी टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टचाराला वाव होता. राष्ट्रीयीकरणामुळे या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन कार्यक्षमता व कुशलता वाढवणे हे मुख्य उद्दिष्टे होते.

### ५) ग्रामीण भारतात बँकेचा विस्तार घडवून आणणे:

राष्ट्रीयीकरणाचा मुख्य उद्देश भारतातील ग्रामीण भागात बँकिंग क्षेत्राचा विकास घडवून आणणे हा होता. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून पैशांची गुंतवणूक होईल तर दुसरीकडे बँका ह्या शेतकऱ्यांना व्याजाने पैसे देऊन त्याद्वारे अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणेल.

### ६) सरकारी धोरणांचे पालन:

१९४८ च्या भारतातील आर्थिक व औदयोगिक धोरणांद्वारे हे स्पष्ट केले होते कि, राष्ट्रीय व सामाजिक महत्वाच्या कोणत्याही उपक्रमाद्वारे राष्ट्रीयीकरण केले जाईल. समाजवाद व गरिबी हटाव सारखे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकांची भूमिका हि महत्वाची होती. त्यामुळे त्याचे राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक आहे अशी भूमिका तत्कालीन सरकारने घेतली.

**आपली प्रगती तपासा.**

१) इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण का केले त्याची कारणे सांगा.

## ७.४ इंदिरा गांधींची भूमिका

भारतात १९६० पासूनच ८ क्षेत्रीय बँकांचे प्रायोगिक तत्वावर राष्ट्रीयीकरण करावे हा विचार रुजू लागला होता. १९६६ मध्ये इंदिरा गांधी ह्या पंतप्रधान झाल्या. तत्कालीन आर्थिक व्यवस्थेमध्ये मोठे बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी पाऊले उचलायला सुरवात केली. सामान्य माणसाला कर्जपुरवठा करता यावा, व्यापाराप्रमाणेच शेतीसाठी व इतर ग्रामीण उद्योगांनाही पतपुरवठा करावा. यासाठी देशातील प्रमुख बँकांवर सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक्य आहे, असे इंदिरा गांधीना वाटत होते. या बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यास पतपुरवठ्याविषयी काही मार्गदर्शक नियम कसे तयार करता येईल व श्रीमंतांसाठीच

असलेले हे क्षेत्र सामान्यांसाठी कसे उपलध होईल यादृष्टीने इंदिरा गांधी प्रयन्त करत होते. १९६६ मध्ये आकशवाणीवर दिलेल्या भाषणात बँकेच्या राष्ट्रीयीकरणाच्या संदर्भात आपले उद्देश मांडले होते. त्यांच्या मते,

१) सामान्य गरजू माणसाला पतपुरवठा व्हावा.

२) बँकेवरील आणि अर्थपुरवठयावरील मूठभर लोकांची मक्तेदारी संपावी.

३) शेती, ग्रामीण, उद्योग व छोटे - मोठे उद्योगधंदे यांनाही बँकेने मुक्तहस्ते कर्ज द्यावे.

४) बँकेतील नोकरांना संरक्षण देऊन त्यांच्या सेवाशर्तीतीत सुसूत्रता आणणे.

**आपली प्रगती तपासा.**

१) १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणात इंदिरा गांधी यांच्या भूमिकेचा आढाव घ्या.

## ७.५ चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण (पहिला टप्पा)

२५ ऑक्टोम्बर १९६७च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार, राष्ट्रीय पतपुरवठा समितीचे गठन आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदयांना आर्थिक मदत याविषयी सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव मांडण्यात आला. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध मोरारजी देसाई, सत्यनारायण सिन्हा व चेन्ना रेडी हे या ठरावाच्या विरुद्ध बोलले. तर जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण व स्वर्णसिंग यांनी आपला होकार इंदिरा गांधींच्या बाजूने दिला. मोरारजी देसाई हे काँग्रेसचे जेष्ठ नेते असल्याने व इंदिरा गांधी या नुकत्याच सत्तेवर आल्याने यावेळी मोरारजी देसाई यांना त्यांनी विरोध केला नाही. मोराररजी यांनी यावेळी सर्व प्रमुख बँकांचे एका राष्ट्रीय क्रेडीट कौंसिलद्वारे नियंत्रण व्हावे, या कौंसिलचे अध्यक्ष रिझर्व्ह बँकांच्या गव्हर्नरला द्यावे व यामार्फत शेती, ग्रामीण उद्योगधंदे यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देण्यात यावी असे सुचवले. त्यांच्या या निर्णयाला इंदिरा गांधी यांनी पाठींबा दिला. याचवेळेस काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक होती. सिंडिकेटने अध्यक्ष म्हणून नीलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी घोषित केली. तर अपक्ष उमेदवार व्ही. व्ही. गिरींना इंदिराजींचा पाठिंबा होता. यामुळे सिंडिकेट - इंदिरा संबंध ताणले गेले. मोरारजी देसाई यावेळेस अर्थमंत्री होते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणातील प्रमुख अडथळा दूर करण्यासाठी सर्वप्रथम इंदिराजींनी मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते काढून घेतेले. व ते खाते स्वतःकडे ठेवले.

१९६९ मध्ये बंगलोर येथे काँग्रेसच्या अधिवेशनानंतर १९ जुलै १९६९ मध्ये इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण घडवून आणले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने काढलेल्या वटहुकूमानें १४ प्रमुख मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या वटहुकूमाचे नाव "उपक्रमांचे संपादन आणि हस्तांतरण वटहुकूम १९६९" असे होते. यामध्ये ज्या बॅंकाच्या ठेवी ५० कोटी रुपये किंव्हा त्यापेक्षा जास्त होत्या अशा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अशा प्रकारे वटहुकूमाद्वारे १४ बँकांचे स्वामित्व व नियंत्रण हे सरकारच्या ताब्यात आले. १० फेब्रुवारी १९७० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने १४ बँकांचे राष्ट्रीयकरण घटनाबाह्य घोषित केले. परंतु लोकांच्या दबावामुळे व समाजवादी विचारधारेच्या प्रेरणेने

तसेच सर्वोच्य न्यायालयाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करून सरकारने १४ फेब्रुवारी १९७० ला राष्ट्रपतींच्या नवीन अध्यादेशाद्वारे बँकांचे पुन्हा राष्ट्रीयीकरण केले. ह्या बँका पुढीलप्रमाणे होत्या:

१) सेंट्रल बँक ऑफ इंडिया

२) बँक ऑफ इंडिया

३) पंजाब नॅशनल बँक

४) बँक ऑफ बडोदा

५) युनाइटेड कमर्शियल बँक

६) कॅनरा बँक

७) युनाइटेड बँक ऑफ इंडिया

८) देना बँक

९) सिंडिकेट बँक

१०) युनियन बँक ऑफ इंडिया

११) इलाहाबाद बँक

१२) इंडियन बँक

१३) बँक ऑफ महाराष्ट्र

१४) इंडियन ओव्हरसीज बँक


THE TIMES OF INDIA

14 TOP BANKS ARE NATIONALISED

Ordinance follows unanimous Cabinet decision

"The Times of India" News Service

NEW DELHI, July 19.

WITHIN an hour of the formal exit of Mr. Morarji Desai from the Union Government, the Cabinet today decided to nationalise 14 major commercial banks, thus providing an immediate economic justification for the Prime Minister's political decisions taken during the week.

Nationalised banks

Kamaraj, Chavan happy

'Syndicate' in disarray as Morarji goes

Assam flood worsens: heavy havoc

Nanda called to Delhi

A vital step,

**आपली प्रगती तपासा.**

१) इंदिरा गांधी यांनी कोणत्या १४ बँकांचे राष्ट्रीकरण केले?

## ७.६ बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा (दुसरा टप्पा)

१५ एप्रिल १९८० मध्ये इंदिरा गांधी यांनी आणखी सहा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करणारा कायदा पास केला. या सहा बँका पुढीलप्रमाणे होत्या

१) आंध्र बँक

२) पंजाब अँड सिंध बँक

३) विजया बँक

४) कॉर्पोरेशन बँक

५) न्यू बँक ऑफ इंडिया

६) ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स

या सर्व बँकांकडे ठेवी २०० कोटी रु. पेक्ष्या अधिक होत्या. राष्ट्रीयीकरणाच्या दुसऱ्या टप्प्या बरोबर देशातील ९३% बँक व्यवसाय सार्वजनिक क्षेत्रात आले.

## ७.७ बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम

१) बँकेकडे पडून असलेला अनावश्यक पैसा आवश्यक क्षेत्रामध्ये गुंतविण्यात आला. यामध्ये प्राथमिक सेक्टर, छोटे उद्योग, कृषी आणि छोटे ट्रान्सपोर्ट यांचा समावेश होता.

२) शासनाने राष्ट्रीय बँकांना दिशानिर्देश देत लोन पोर्टफोलियोमध्ये ४०% कृषी कर्ज देणे अनिवार्य केले. सोबतच प्राथमिकता प्राप्त इतर क्षेत्रातही कर्ज देण्यात आले. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला.

३) राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या शाखांचा वेगाने विस्तार झाला. बँकांनी त्यांचा व्यवसाय गाव, शहरा-शहरांपर्यंत पोहोचविला. आकडेवारीनुसार जुलै, १९६९ मध्ये देशात बँकां केवळ ८३२२ शाखा होत्या. १९९४ पर्यंत या शाखा ६० हजारांच्या पलीकडे पोहोचल्या.

४) बँका ह्या सरकारच्या नियंत्रणात आल्यामुळे लोकांचा बँकेवरील विश्वास वाढला, त्यामुळे बँकेतील गुंतवणूक वाढत गेली. १९६९ मध्ये ४६४५ करोड रुपये बँकेची गुंतवणूक होती तीच गुंतवणूक १९८६ मध्ये ९८००० करोड रुपया पर्यंत पोहचली.

५) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा सकारात्मक प्रभाव हा इतर क्षेत्रावर देखील पडला. १९९२ मध्ये विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. व पुढे १९७३ मध्ये कोळसा कंपनीचे देखील राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**आपली प्रगती तपासा.**

१) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे परिणाम सांगा.

## ७.८ १९४८ चे औद्योगिक धोरण

१९४८ च्या औद्योगिक धोरणात मिश्र अर्थव्यवस्थेचे उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे महत्व स्पष्ट केले व भारतीय उद्योगांचे चार भागात विभागणी केली गेली.

**१) सरकारची पूर्ण मक्तेदारी असलेले उद्योग:**

शास्त्रासे, दारुगोळा, अणुशक्ती, रेल्वे, वीज इ.

**२) संमिश्र क्षेत्रातील उद्योग:**

कोळसा, लोखंड, पोलाद, जहाजबांधणी, विमानसेवा इ.

**३) सरकारी नियंत्रणाखालील उद्योग:**

अवजड यंत्रसामग्री, रसायने, खते, सिमेंट, साखर इ.

**४) खाजगी क्षेत्रातील उद्योग:**

वरील सर्व गटात न बसणाऱ्या उद्योगांचा समावेश यामध्ये केला गेला व त्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप मान्य केला.

१९४८ च्या औद्योगिक धोरणात सरकाने परिस्थितीनुसार आवश्यक्य ते बदल करून सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांच्या नियंत्रणाखाली कोणते उद्योग असावे याविषयी योग्य असे विश्लेषण केले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९४८ चे औद्योगिक धोरण सांगा.

## ७.९ १९५६ चे औद्योगिक धोरण

१९५६ च्या औद्योगिक धोरणात संमिश्र भारताच्या विकासात आवश्यक्य अश्या पूरक वाटचाली ठेवण्यात आल्या. या धोरणात समतोल विकासाचे उद्दिष्टे ठेवण्यात आले. १९५६ च्या औद्योगिक धोरणाच्या मसुद्यात वरील धोरणाला सुसंगत असे सर्व उद्योगधंद्यांचे वर्गीकरण तीन विभागांत करण्यात आले.

**१) राज्यसत्तेचे संपूर्ण वर्चस्व असलेले उद्योग:**

कोळसा, लोखंड व पोलाद, खनिज तेले, काही अवजड यंत्रसामग्री, सर्वसाधारण विद्युत-यंत्र-सामग्री.

**२) विकासाच्या दृष्टीने महत्त्व असलेले सरकारी क्षेत्रात वाढविण्याचे उद्यौगधंदे:**

या क्षेत्रात नवीन उद्यौगधंदे स्थापन करण्याची जबाबदारी सरकारने घेतली. उदा., यंत्र - अवजारे, ॲल्युमिनियम, प्रतिजैविक पदार्थ, खते, सागरवाहतूक आणि

**३) खाजगी क्षेत्र:**

एक व दोन यांमध्ये अंतर्भूत नसलेल्या उद्यौगांचा या विभागात समावेश करण्यात आला. याव्यतिरिक्त

१) खाजगी व सार्वजिक उद्यौगांना न्याय व समानतेची वागणूक देऊन त्यांना स्वातंत्र्य करण्याचा पूर्ण प्रयत्न केला गेला.

२) औद्यौगिक विकासात परकीय भांडवलाची भूमिका स्पषट करून विकासाचे धोरण आखले.

लघुउद्यौगांना व कुटीरोद्यौगांना १९५६ च्या औद्यौगिक धोरणात रोजगारी, विकेंद्रित अर्थव्यवस्था व उभारणीस लागणारे अल्प भांडवल ह्या तीन कारणांमुळे महत्त्वाचे स्थान दिले गेले. विशेषतः योजनेतील अवजड व मूलभूत उद्यौगधंद्यांना वाढीकरिता बरेच भांडवल खर्च होणार असल्यामुळे उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्याकरिता लघुउद्यौगांवरव कुटीरोद्यौगांना भर दिला गेला.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९५६ चे औद्यौगिक धोरण स्पष्ट करा.

## ७.१० १९७७ चे औद्यौगिक धोरण

१९७७ मध्ये भारतात जनता सरकार सत्तेवर आल्याने १९५६ च्या औद्यौगिक धोरणावर त्यांनी कडक टीका केली. व २३ डिसेंबर १९७७ मध्ये संसदेमध्ये नवीन औद्यौगिक धोरण मांडले. त्याला १९७७ चे औद्यौगिक धोरण म्हणतात.

१) मोठ्या उद्यौगांचे क्षेत्र आणि कार्य यांचे नियमन व नियंत्रण करण्याचे ठरवले.

२) मोठे उद्यौग व उद्यौगपतींच्या वित्त पुरवठयावर नियंत्रण तसेच मक्तेदारी विरुद्ध कायदयाचा वापर करणे.

३) ज्या उद्यौगातील तंत्रज्ञान भारतात विकसित झाले आहेत त्या परदेशी कंपन्यांचे करार यांचे नूतुनिकीकरण करता येणार नाही. उदा. बिस्किटे, साखर, पावडर, कॉफी, पंखा इ.

४) तांत्रिक क्षेत्रात पूर्णपणे स्वावलंबी होण्याचे धोरण ठरवले आहे.

५) मालक व मजूर यांच्यातील संबंध सुधारण्यासाठी कामगारांना व्यवस्थापनामध्ये स्थान, कामगार कायदे, भागभांडवलात वाव इ. कार्यात सामावून घेण्यात आले.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९७७ चे औद्योगिक धोरणाची माहिती द्या.

## ७.११ १९८० चे औद्योगिक धोरण

१९८० मध्ये देशात पुन्हा एकदा काँग्रेसची सत्ता आल्याने तसेच १९७७ च्या औद्योगिक धोरणांचा अर्थव्यवस्थेवर कुठलाच प्रभाव न पडल्याने काँग्रेसने २३ जुलै १९८० मध्ये नवीन औद्योगिक धोरणांची घोषणा केली. हे धोरण १९५६च्या धोरणावरच अवलंबून होते.

१) सार्वजनिक क्षेत्रातील उद्यौगात नवचैतन्य आणून रोजगार व वित्तीय साधनसामुग्री वाढवून देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे.

२) औद्योगिक आजारपण असणाऱ्या उद्यौगांना करात सूट देणे व त्यांना अनुदान देऊन ते पुन्हा स्थापित केले. व शासनाच्या ताब्यातील उद्यौग राज्यसरकारकडे देण्यात आले.

३) निर्यात प्रधान उद्यौगांना आर्थिक साहाय्य देणे.

४) आधुनिकीकरणाचा विचार करून स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी उच्य औद्योगिक तंत्रज्ञान वापरण्याची परवानगी देण्याचे धोरण.

५) ग्रामीण भागातील रोजगार वाढवण्यासाठी ग्रामउद्यौगांची स्थापना करण्याचे ठरले.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारताचे १९८० चे औद्योगिक धोरण सांगा.

## ७.१२ १९९१ चे औद्योगिक धोरण

पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या काँग्रेस सरकराने अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग व उद्यौगमंत्री पी. जे. कुरियन यांनी २४ जुलै १९९१ मध्ये भारताच्या नवीन औद्योगिक धोरणांची घोषणा केली. त्यांनी आपल्या धोरणात खाजगीकीकरण, जागतिकीकरण व उदारीकीकरण या नवीन धोरणांचा विचार देऊन भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा दर्जा देण्याचा प्रयन्त केला. या ओद्यौगिक धोरणांची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

१) सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती हि मर्यादित करून फक्त सात उद्यौग हे सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवले व बाकी सर्व उद्यौग खाजगी क्षेत्रासाठी मुक्त केले. हे सात उद्यौग शस्त्रनिर्मिती, दारुगोळा, अणुशक्ती, रेल्वे, कोळसा, खनिजे व लोखंड.

२) या औद्योगिक धोरणानुसार १८ उद्यौग सोडून बाकी सर्व उद्यौगांचे परवाने रद्द केले.

३) भारतात परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी तसेच भारताची निर्यात व परकीय गुंतवणुकीत वाढ घडवून आणण्यासाठी ५१ परकीय गुंतवणुकीस मान्यता दिली.

४) मक्तेदारी व व्यापारी कायदा शिथिल केला गेला.

५) भांडवल बाजारांचा विकास घडवून आणणे.

१९९१च्या औद्योगिक धोरणाने १९५६च्या औद्योगिक धोरणांच्या चौकोटीबाहेर जाऊन मूलभूत बदल घडवून आणले. बदललेल्या काळानुसार भारताने आपले हे धोरण आखले होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारताचे १९९१ चे औद्यौगिक धोरण स्पष्ट करा.

## ७.१३ १९९३ चे औद्योगिक धोरण

१९९३च्या औद्यौगिक धोरणांचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे भांडवल बाजाराची सरकारी नियंत्रणापासून मुक्तता करण्यात आली. या धोरणानुसार परकीय विनिमय नियंत्रण कायद्याऐवजी (FEMA) परकीय वित्तीय व्यवस्थापन कायदा (FERA) संमत करण्यात आला. या कायद्यानुसार

१) ज्या कंपन्यांमध्ये ४०% पेक्ष्या जास्त विदेशी भांडवल आहे. त्यांच्यावरील नियंत्रणे दूर करण्यात आली.

२) भारतीयांना विदेशात स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार मिळाला.

३) १४ एप्रिल १९९३ रोजी ज्या १८३ उद्यौगांना पूर्वी परवाना देणे बंधनकारक करण्यात आपले होते. त्यामधून तीन उद्यौगांना वगळण्यात आले.

४) डिसेंबर १९९६ मध्ये १६ प्रकारच्या उद्यौगात ५१% पर्यंत परकीय भांडवलाच्या गुंतवणुकीस मान्यता दिली गेली.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९९३ चे औद्योगिक धोरण थोडक्यात सांगा.

## ७.१४ २००१ चे औद्योगिक धोरण

२००१ च्या औद्योगिक धोरणात देशाची अर्थव्यवस्था अधिक खुली करण्याचे धोरण राबविले गेले.

१) औद्योगिक विकासाच्या वेगात वाढ करण्यासाठी थेट परकीय गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली.

२) या औद्यौगिक धोरणात परकीय गुंतवणुकीबाबत उदार धोरण स्वीकारून तेल शुद्धीकरण क्षेत्रात १०० % परकीय गुंतवणुकीस मान्यता देण्यात आली.

३) सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंतवणूकीचे धोरण स्वीकारून सार्वजनिक क्षेत्रात २७ उद्यौगांमधील निर्गुंतवणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

४) लघु व कुटीर उद्यौगांना चालना देण्यासाठी तसेच बाजार विषयक सुविधा पुरवण्यासाठी 'बाजार विकास सहाय्यक योजना' सुरु केली.

५) निर्यात व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी निर्यात गृहांना लागू असणारी परवाना पद्धती रद्द करण्यात आली. २००२ ते २००७ या काळातील पंचवार्षिक योजनेत आयात - निर्यातीचे धोरण हे उदारीकीकरणावर आधारलेले होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) २००१ चे औद्यौगिक धोरण थोडक्यात सांगा.

## ७.१५ भारतातील औद्यौगिक विकासाचे स्वरूप

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या औद्योगिकीकरणाला एक वेगळी दिशा प्राप्त झाली. पं. नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून भारतातील उद्यौगधंदे हे सार्वजनिक व खाजगी क्षेत्राखाली आणले. नेहरू यांनी भारतातील औद्यौगिक धोरणाला गती दिली. पुढे इंदिरा गांधी यांनी नेहरूंचे औद्यौगिक दृष्ट्या स्वावलंबी होण्याचे धोरण पुढे चालूच ठेवले. राजीव गांधींच्या काळात बदललेल्या परिस्थितीमध्ये अनेक नवीन धोरण स्वीकारण्यात आले तर पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या काळात खाजगीकीकरण, जागतिकीकरण व उदारीकीकरण हे तत्व स्वीकारून अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रयन्त केला गेला. या औद्यौगिक विकासाचे स्वरूप हे पुढीलप्रमाणे होते:

**१) सर्व प्रकारच्या उद्यौगधंदयांचा विकास:**

स्वत्रंतत्तोर काळात भारतात सर्व प्रकारच्या उद्यौगधंद्यांचा विकास झाला आहे. अनेक उपभोग्य वस्तूंबरोबरच भांडवली वस्तूंचे देखील उत्पादन होऊ लागले. छोटी उपकरणे तसेच अवजड व कुशल यंत्रे देशात निर्माण होऊ लागली. कागद, साखर, सिमेंट, कापड इ. मोठ्या उद्यौगांना लागणारी यंत्रसामग्री भारतातच बनू लागली. पोलाद कारखाने, मोटारी, आगगाडीचे इंजिने व डबे, जहाज बांधणी इ. मोठे उद्यौगधंदे भारतात मोठ्या प्रमाणावर विकसित झाले. भारतात सर्व प्रकाच्या उद्यौगधंद्यांचा विकास झाल्याने देशाचा आर्थिक विकास घडून आला.

**२) सार्वजनिक क्षेत्राचा विकास:**

स्वातंत्र्यानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये काही उद्यौगांचा विकास सार्वजनिक क्षेत्रात करण्यात आला तर काही उद्यौगांचा विकास हा खाजगी क्षेत्रावर सोपवण्यात आला. भारताने देशाच्या आर्थिक विकासासाठी आखलेल्या कार्यक्रमात खाजगी क्षेत्राबरोबर सार्वजनिक उद्यौगक्षेत्रालाही महत्व दिले.

**३) उद्यौगधंद्यांच्या व्यवस्थापनाचे विविध प्रकार:**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील बहुतेक उद्यौगधंदे हे खाजगी उद्योगपतींच्या मालकीचे होते. याकाळात सार्वजनिक क्षेत्रातील उद्यौगधंदे अभावानेच दिसून येतात. स्वातंत्र्यानंतर उद्यौगधंद्यांचे व्यवस्थापनाचे विविध प्रकार दिसून येतात.

**१) खाजगी क्षेत्र:**

खाजगी क्षेत्रातील उद्यौगधंदे प्रामुख्याने तीन प्रकारचे असतात.

**अ) लहान उद्यौग:**

हे उद्यौग एका व्यक्तीच्या मालकीचे असतात.

**ब) भागीदारी:**

दोन किंव्हा त्यापेक्षा अधिक (२० पर्यंत) संख्या असलेल्या व्यक्तींनी संयुक्तरित्या चालवलेले व्यवसाय.

**क)** मोठ्या प्रमाणावर व्यापार किंव्हा उत्पादन करण्यासाठी मर्यादित सार्वजनिक कंपनी स्थापन केली जाते.

**२) सार्वजनिक क्षेत्र:**

सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापन हे तीन प्रकारचे असते.

**अ)** काही उद्यौग सरकारी खात्यामार्फत चालवले जातात. उदा. रेल्वे आकशवाणी, पोस्ट, टेलिग्राफ इ.

**ब ) स्वय्यात मंडळ:**

विशिष्ट उद्यौगसंस्था चालवण्यासाठी लोकसभेने मंजूर केलेल्या कायदयानुसार महामंडळाचा कारभार स्वायत्त महामंडळ पद्धतीने सरकार चालविते. उदा. आयुर्विमा महामंडळ, अर्थपुरवठा महामंडळ, महारष्ट्र राज्य परिवहन महामंडळ.

**३) कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार नोंदवलेल्या कंपन्या:**

यामध्ये फक्त ५१% जास्त अधिक भागभांडवल सरकारने पुरवलेले असेल तर कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार कारभार चालवून कारभारावर सरकार नियंत्रण ठेवते.

**४) प्रादेशिक असमोताल कमी करण्याचा प्रयत्न:**

स्वातंत्र्यपूर्व काळात देशाच्या काही विशिष्ट भागातच औद्यौगिक विकास झालेला होता. देशातील अनेक प्रदेश पूर्णपणे अविकसितच राहिले होते. परंतु नियोजनाच्या काळात देशातील सर्व भागांचे आर्थिक विकास होण्याकडे सरकारने लक्ष दिले आहे. अविकसित प्रदेशात उद्यौगधंदे सुरु करण्यासाठी सरकारने विशेष सवलती दिल्या तर काही सरकारी

उद्यौगसंस्था मागासलेल्या भागातच सरकारने सुरु केल्याने त्या भागांचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली.

**५) सहकारक्षेत्राचा विकास:**

स्वतंत्रप्राप्ती नंतर भारताने नियोजन लागू करून उद्यौगधंदे चालवण्याचा एक महत्वाचा मार्ग म्हणून सहकारी संस्था स्थापन केल्या. आर्थिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तींनी एकत्र येऊन स्वतःचा आर्थिक विकास करून घेणे हा सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश आहे. भारतात अनेक उद्यौगधंदे चालवण्यासाठी सहकारी संस्था निघाल्या आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी तर खूपच मोठे यश संपादन केले आहे. स्वातंत्र्य काळातील औदयोगिक विकासाचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे औद्यौगिक क्षेत्रात सहकारी संस्थंचा झालेला उदय होय.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतातील औद्यौगिक विकासाचे स्वरूप सांगा.

## ७.१६ सारांश

१९६७ साली इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या. स्वतःच्या क्षमतेची ओळख पटविण्यासाठी इंदिराजींना काही कठोर निर्णय घ्यावे लागले. १९६७ मध्ये इंदिरा गांधी यांनी काँग्रेस पार्टीमध्ये १० सूत्री कार्यक्रम सादर केले. बँकेवर शासनाने नियंत्रण असावे हा यामागील मुख्य हेतू होता. राजा-महाराजांना मिळणारा आर्थिक लाभ बंद करणे, किमान मजुरीचे धोरण ठरविणे, पायाभूत संरचणेचा विकास, कृषी, लघु उद्योग आणि निर्यातीत गुंतवणूक वाढविणे हा यामागील मुख्य हेतू होता. इंदिरा गांधींनी १९ जुलै, १९६९ रोजी एक सूचना काढून देशातील १४ मोठ्या खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. या सूचनेला 'बँकिंग कंपनीज ऑर्डिनन्स' म्हटल्या जाते. पुढे याच नावाने विधेयक पारित करण्यात आले. यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर झाले. राष्ट्रीयीकरण होण्याच्या आधी देशामध्ये केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया ही एकमात्र शासकीय बँक होती.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणांमुळे या बँकांचे पतपुरवठा धोरण बदलले. ज्यामुळे सामान्य माणसाला हि आता कर्ज मिळू लागले. सामान्य व्यक्ती, व्यापारी व नवीन तरुण उद्योजकही आपल्या उद्योग उभारणीसाठी आत्मविश्वासाने बँकेकडे जाऊ लागला. बँकेतील पैसे हा सर्वसामान्य माणसा पर्यंत झिरपू लागला.

विसाव्या शतकाच्या सुरवातीपासूनच जगातील विविध देशांनी औद्यौगिकीकरणाचे महत्व ओळखून आपल्या देशात औद्यौगिकीकरणास सुरवात केली होती. औद्यौगिक धोरण हे प्रत्येक देशाच्या आर्थिक धोरणाचे महत्वाचे साधन मानले जाते. देशातील उद्यौगांची वाढ निकोप, संतुलित व सदृढ पायावर उभी करण्यासाठी औद्यौगिक धोरणांची आवश्यक्यता असते. भारतने स्वातंत्र्यानंतर मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारून आपले औद्यौगिक धोरण आखले. १९४८ पासून भारताने काळानुसार आपल्या औद्यौगिक धोरणांत बदल करून भारतीय उद्यौगधंद्यांचा व भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणला. १९९१ मध्ये बदलेल्या परिस्थितनुसार भारताने उदारीकीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरण या धोरणांचा स्वीकार केला. जर देशाची आर्थिक परिस्थिती बदलायची असेल तर कोणत्याही

देशाचे औद्यौगिक धोरण हे ताठर ठेवता येत नाही, भारताने देखील परिस्थिनुसार व काळानुसार आपल्या औद्यौगिक धोरणात बदल करून देशाचा आर्थिक विकास केला.

## ७.१७ प्रश्न

१) भारतातील बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२) इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण का केले त्याची करणे सांगा.

३) बँकांच्या राष्ट्रीयीकरणातील इंदिरा गांधी यांची भूमिका सांगून बँकांचे राष्ट्रीयीकरण स्पष्ट करा.

४) पं. जवाहरलाल नेहरू यांच्या कालखंडात झालेल्या औद्यौगिक धोरणांचा आढावा घ्या.

५) १९७७ - १९८०च्या दरम्यान झालेल्या औद्यौगिक विकासाची माहिती द्या.

६) १९९१ - २००१ च्या दरम्यान झालेल्या भारताच्या औदयोगिक विकासाची माहिती द्या.

७) भारतातील औद्यौगिक विकासाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ७.१८ संदर्भ

१) शर्मा वृज / शर्मा शैलबाला, समसामायिक भारत (१९४७ - २०००), पंचशील प्रकाशन, जयपूर, २००७.

२) बिपीनचंद्र ,मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी, आझादी के बाद का भारत (१९४७ - २००७), हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली विश्वविद्यालय, २०१५.

३) कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७ - २०००), साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१३.

४) कोलारकर श. गो. स्वतंत्र हिंदुस्थानचा इतिहास (१९४७ - १९८०), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

५) पिंपलपल्ले आर./ मुटकुळे रामभाऊ, स्वतंत्रत्तोर भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

६) समकालीन भारत (१९४७ - २०००), (Study Material) वर्धमान महावीर खुला विश्व विद्यालय, कोटा.

७) भोसले व काटे, स्वातंत्रोत्तर भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर

८) भारतीय अर्थव्यवस्था,(Study Material),शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

९) ग्रामीण विकास, (Study Material), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

१०) Kapila Uma (Edi.), Indian Economy since Independence, Academic Foundation, 2018.

११) Chandra Shekhar, Political Economy of India, Vikas Publication House, New Delhi,1992.

१२) Datt & Sundharam, Indian Economy, S. Chand Publication, Mumbai, 2015

*****

# ८

# उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण

**घटक रचना**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ उदारीकरण म्हणजे काय?

८.३ भारतातील उदारीकरण

८.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

८.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

- ८.५.१ १९९१ नंतर झालेले बदल
- ८.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल
- ८.५.३ करविषयक सुधारणा
- ८.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा
- ८.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा
- ८.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा
- ८.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा
- ८.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा

८.६ उदारीकरणातून अपेक्षाभंग

८.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का ?

८.८ उदारीकरणाने विषमता वाढली?

८.९ खाजगीकरण म्हणजे काय

८.१० खाजगीकरणांची आवश्यकता

८. ११ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

८.१२ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही !

८.१३ खाजगीकरणाला होतोय विरोध ?

८.१४ खाजगीकरण वारे

८.१५ खासगीकरणाचे दुष्परिणाम

८.१६ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

८.१७ खाजगीकरणांचे वास्तव

८.१८ जागतिकीकरण

८.१९ जागतिकीकरणाची व्याख्या

८.२० जागतिकीकरणाचे वैशिष्ट्ये

८.२१ जागतिकीकरण आणि भारत

८.२२ जागतिकीकरण व भांडवलशाही

८.२३ जागतिकीकरणाचे फायदे

१) औद्योगिकीकरणास चालना

२) बाजारपेठांचा विस्तार

३) परकीय व्यापारात वाढ

४) रोजगारामधील वाढ

५) सेवा क्षेत्रांचा विस्तार

६) सामाजिक - सांस्कृतिक संबंधामध्ये झालेली वृद्धी

८.२४ जागतिकीकरणाचे तोटे

१) स्थानिक उद्योगधंद्यास मारक

२) बहुराष्ट्रीय कंपन्यांची बाजारपेठेतील मक्तेदारी

३) बेरोजगारीमधील वाढ

४) विकसनशील देशांची आर्थिक लूट

५) पर्यावरणीय समस्या

६) पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष

८.२५ सारांश

८.२६ प्रश्न

८.२७ संदर्भ

## ८.० उद्दिष्टे

१. भारतातील उदारीकरण धोरणाचा मागोवा घेणे.

२. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे स्पष्ट करणे.

३. उद्योग क्षेत्रात झालेल्या सुधारणाचा आढावा घेणे.

४. उदारीकरणांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

५. उदारीकरण होऊनही भारत मागे का ? याचा उलगडा करणे.

६. खाजगीकरणांची संकल्पणा स्पष्ट करणे.

७. खाजगीकरणांची आवश्यकता समजून घेणे.

८. खाजगीकरणांचे परिणाम अधोरेखित करणे.

९. खाजगीकरणांचे वास्तव समजून घेणे.

१०. जागतिकीकरण म्हणजे काय हे अभ्यासणे.

११. जागतिकीकरणाच्या विविध व्याख्यांचा अभ्यास करून त्याची वैशिष्ट्ये तपासणे.

१२. जागतिकीकरणाचे फायदे अभ्यासणे.

१३. जागतिकीकरणाचे तोटे अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना

१९८० नंतर जगातील अनेक राष्ट्रांनी अर्थव्यवस्थेत शिथिलीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा स्वीकार केला. उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर राष्ट्रांशी खुला व्यापार असणे आणि देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही बंधन नसणे होय. सीमाशुल्क आणि वाटप पद्धती नष्ट करणे हा शिथिलीकरणा मागचा हेतू आहे. उदारीकरणाची संकल्पना ही बाजार यंत्रणा आणि खुला (मुक्त) बाजार आणि मुक्त स्पर्धा यांवर आधारित आहे. म्हणून उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला जातो. थोडक्यात सरकारने मुख्यतः आयात निर्यात, उत्पादन यांवर कोणत्याही प्रकारचा निर्बंध लादू नयेत. अनावश्यक नियंत्रणे दूर करावीत बाजारपेठेत किंमत यंत्रणेच्या माध्यमाने जसे व्यवहार होतील त्यावर निर्बंध आणू नयेत. अर्थव्यवस्थेत अधिक स्पर्धा आणि कार्यक्षमता असावी, विदेशी विनिमय बाजार, वित्तीय बाजार, शेतमालाचा बाजार इत्यादी बाबतचे अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यास किंवा बाजाराधिष्ठित किंमत यंत्रणेतील अडथळे दूर केल्यास अर्थव्यवस्थेची स्पर्धा शक्ती,

कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते. परिणामी राष्ट्रीय उत्पादन जलद गतीने वाढते. थोडक्यात आर्थिक उदारीकरणाद्वारे अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा केली जाते. आर्थिक उदारीकरण म्हणजे सरकारी नियंत्रण आणि हस्तक्षेप कमीत-कमी असा अर्थ आहे. २४ जुलै १९९१ रोजी मा. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी परमिटराज- समाप्तीची घोषणा केली आणि भारतात उदारीकरणाला सुरुवात झाली. उदारीकरणाला सुरुवात होऊन आता तीन दशकांचा काळ लोटतो आहे. या तीन दशकात आपण काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मांडला तर आपले चुकले कुठे आणि अजून काय केलं तर पुढील दशकात भारत एक सशक्त महासत्ता होऊ शकेल याचा उहापोह करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

१९९१ च्या नंतर आपल्या देशात सत्तेवर आलेल्या विविध सरकारांनी जागतिकीकरणाचे धोरण अवलंबले आहे. या जागतिकीकरणाचा अविभाज्य भाग म्हणजे सरकारी वा सार्वजनिक क्षेत्रांत असलेले उद्योग मोडून काढून त्याचे खाजगीकरण करणे होय. त्यात सरकारची जबाबदारी असलेल्या जनतेच्या आरोग्याचे खाजगीकरण करणे हेही क्षेत्र त्याला अपवाद राहिले नाही. खरे म्हणजे भारतीय राज्यघटनेने जनतेच्या शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबींची जबाबदारी शासनावर टाकलेली आहे. पण राज्यघटनेतील या तरतुदीचीही फिकीर कोणत्याच सरकारांनी केली नाही. मोठ्या धुमधडाक्यात सर्वच क्षेत्रांचे खाजगीकरण करण्याचा सपाटाच त्यांनी लावला. मुळात सार्वजनीक उद्योग हे नफा कमावण्या च्या उदेशाने उभारले च नसतात. त्यामागे राष्ट्रीय हिताचे उद्देश असतात. नुसता नफा कमवणे म्हणजे राष्ट्रीय हित नव्हे. सदर उदयोग तोट्यात चालत असतील तर त्या साठी सरकारने लक्ष घातले पाहिजे. त्याची कारणे शोधून त्या वर उपाय केले पाहिजेत. सार्वजनीक उद्योग तोट्यात आहेत म्हणून ते आपली आर्थिक अडचण भागवण्यासाठी विकणे आणि खाजगीकरणला प्रोत्साहन देणे हा निर्णय विचार पूर्वक वाटत नाही.

खाजगीकरणतून भांडवलदार वर्गाची ताकद वाढू शकते. देशाच्या व जनतेच्या हिताचे महत्वाचे प्रश्न सोडवायला सरकारला मर्यादा येवू शकतात. देशाच्या अविकसित भागातील बेरोजगारी वाढू शकते कारण खाजगी उद्योगपती आपले उद्योग विकसीत शहरांच्या आजूबाजूला च उभारणार कारण उद्योगांशी निगडित सोयी सुविधा ह्या विकसीत शहरांलगतच असतात व सहज उपलब्ध होतात. हळू हळू देशाची अर्थव्यवस्थेची धुरा भांडवल दार वर्गाच्या हातात जाईल. ज्यामुळे गरीब व श्रीमंत अशी आर्थिक विषमता निर्माण होऊ शकते. खाजगीकरणा च्या विषया बाबतीत देशातील सामाजिक हित तज्ञ व अर्थ तज्ञांची मत मतांतरे असल्यामूळे सार्वजनीक उद्योग खाजगीकरणाला सतत विरोध होतो . जे जे उद्योग देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने व समाज हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत असे उदयोग ज्यात संरक्षणासाठी लागणारी साहीत्य सामुग्री उत्पादन करणारे उद्योग अर्थात रणगाडे, लढावू विमाने, लढावू जहाजे, अत्याधुनिक बंदुका, दारूगोळा इ.तसेच आरोग्याशी निगडीत अत्यावश्यक औषधे निर्मीती करणारे उद्योग, जीवन विमा व सरकारी दवाखाने तसेच शिक्षण क्षेत्रातील सर्व संस्था तसेच आर्थिक दृष्टीने बँकांच्या सहीत सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था व इंधन पेट्रोल, डिझेल व गॅस इत्यादी उद्योग १००% सरकारच्या अखत्यारीत असावीत. इतर मूलभूत उद्योग म्हणजे रस्ते, विज, पाणी, दळण वळण म्हणजे प्रवासी व मालवाहू वाहणे, विमाने, रेल्वे, जहाजे , विज निर्मीती उद्योग, धरणे व पाणी शुद्धीकरण तसेच दूरसंचार इ. शी निगडीत उद्योग निमसरकारी असावीत म्हणजे ५१% हिस्सा सरकारचा असावा व उर्वरीत हिस्सा खाजगीकरणात असावा, व इतर जी उदयोग

आहेत ज्यामधी अत्यावश्यक औषधी सोडून इतर औषधी निर्मीती, इतर वाहण निर्मीती, कापड उद्योग, रसायने इत्यादी तसेच शेती क्षेत्रातील सर्व उद्योग खाजगीकरण करणे योग्य राहील.

भारतीय अर्थव्यवस्थेत १९९० च्या दशकात आर्थिक क्षेत्रात अनेक बदल झाले. याकाळात भारतावर मोठ्या प्रमाणावर विदेशी कर्ज असल्यामुळे जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्या संस्थांनी भारताला कर्ज देतांना भारतावर काही अटी लादल्या. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत काही धोरणात्मक बदल करून विदेशी कंपनीसाठी भारतीय अर्थव्यवस्था खुली करून अर्थव्यवस्थेत काही मूलभूत बदल घडवून आणले. व १९९१ मध्ये भारताने जागतिकीकरण, खाजगीकीकरण व उदरिकीकरण या धोरणांचा स्वीकार करून आपल्या आर्थिक धोरणांना नवीन रूप दिले. जगातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास जलद किंव्हा तीव्र गतीने घडवून आणणे हा या धोरणांचा मुख्य उद्देश होता.

## ८.२ उदारीकरण म्हणजे काय ?

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. ही संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरुपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.

१) **डॉ. व्ही. एम्. अत्री -** आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठीत किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो.

२) **डॉ. एस रामनजनेयुल** आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, निर्यात आणि उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निबंध, नियंत्रणे, परवाने शिथिल करणे होय. अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा वाढीला लावण्यासाठी, बाजाराधिष्ठीत किंमत यंत्रणेचा स्वीकार, ही यंत्रणा म्हणजे मागणीपुरवठा यांच्या आधारे उत्पादन व उपयोग याबाबतचे निर्णय घेणारी यंत्रणा होय. ती अधिक सुलभ झाली तर अर्थव्यवस्थेची गती वाढते. त्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेतील आपला हस्तक्षेप क्रमाक्रमाने कमी करणे आणि खुल्या स्पर्धेला वाव देणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

उदारीकरण हा शब्द अर्थ व्यवस्थेच्या संदर्भात आपण वापरणार आहोत. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारणे म्हणजे उदारीकरण. उदार धोरण म्हणजे मुक्त अर्थ व्यवस्थेचे धोरण, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण — थोडक्यात उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था खुली करणे. किंमतींवरचे सरकारी नियंत्रण काढून टाकणे, परवाने आणि लायसन्स ची पद्धत रद्द करणे, परकीय भांडवलाचे स्वागत करणे. उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था देशी आणि विदेशी खाजगी संस्थांसाठी खुली करणे.

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेतील शासकीय हस्तक्षेप व नियंत्रण कमी करण्याकडे कल असणाऱ्या धोरणांचा अवलंब करणारी प्रक्रिया होय. या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेमध्ये खासगी

क्षेत्राला अधिक सहभागी करून घेण्यात येते. सामान्यपणे, या धोरणांमध्ये उद्योगधंद्यांच्या खासगीकरणावर भर देण्यात येतो.

देशात स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी व्यवसायाला प्रोत्साहन देणे हा उदारीकरणाचा अर्थ आहे. यासाठी उद्योगांवरील काही कठोर निर्बंध त्यांच्या अधिकारक्षेत्रातून काढून टाकणे. खाजगी आणि परदेशी गुंतवणुकीचा विस्तार करण्यासाठी नियम शिथिल करणे म्हणजे उदारीकरण होय.

## ८.३ भारतातील उदारीकरण

भारतासारख्या देशांनी साम्यवादी व्यवस्था स्वीकारली नसली तरी १९५० च्या दरम्यान नियोजनाचे तत्त्व स्वीकारले होते. नियोजित अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेमुळेच शासनाचे अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण वाढत गेले. बाजार मागणी आणि पुरवठ्यानुसार चालतो. त्यामुळे बाजारामध्ये अनिश्चितता असते. कोणाचा फायदा होईल आणि कोणाचा तोटा होईल ते खात्रीने सांगता येत नाही. प्रचंड स्पर्धा असते. या स्पर्धेमध्ये बलवान स्पर्धक विजयी ठरतात, दुर्बलांचा कोणीही वाली नसतो. खाजगी उद्योजक कामगारांच्या हीताचा विचार करीत नाहीत. त्यांना सामाजिक जबाबदारीचे भान नसते. त्यांच्यामधील स्पर्धेमुळे अमूल्य संसाधनांचा विनाश होतो. ग्राहकांना योग्य भावात वस्तु आणि सेवा मिळत नाहीत. किंमतीमध्ये भरमसाठ वाढ होते. तसेच शेती मालाला चांगला भाव मिळत नाही. या सर्व कारणांसाठी विविध देशांच्या सरकारांनी अर्थव्यवस्था मुक्त ठेवण्याऐवजी, म्हणजेच बाजाराच्या हाती सोपविण्याऐवजी अर्थव्यवस्थेवर बंधने घालणे पसंत केले. परंतु काही काळानंतर जगातील सर्वच बंदीस्त किंवा शासननियंत्रित अर्थव्यवस्थांना काही समस्यांना तोंड द्यावे लागले. किंमतींचे नियंत्रण सरकारांनी आपल्या हाती ठेवले होते. महाग दराने एखादी वस्तु आयात करावी लागली तरी ग्राहकांना ती स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्याच्या अट्टाहासामुळे या शासन व्यवस्थांना आर्थिक तोटा सहन करावा लागला.

चीनने वेळीच (१९७९ च्या दरम्यान) आपली अर्थव्यवस्था खुली करण्यास सुरवात केली. परकीय भांडवलाचे स्वागत केले. त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था टिकून आहे, वाढते आहे.

१९८० च्या दशकात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात झाली. आज भारतात पेट्रोलियम, दूरचित्रवाणी, रेडीओ, दूरसंचार, वीजनिर्मिती, विमा इत्यादी क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्यानंतर लगोलग भांडवलाची कमतरता आणि पायाभूत सुविधांचाही अभाव असल्याने तत्कालीन बडे उदयोगपती टाटा, बिर्ला, बांगर यांनी BOMBAY PLAN द्वारे नेहरू सरकारला खाजगी क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारने सरकारी क्षेत्राचा नियोजनपूर्वक विकास करून हस्तक्षेप करण्याचा आग्रह केला होता. भारतीय अर्थव्यवस्थेचं उदारीकरण नरसिंहराव सरकारने केलं आणि नियतीशी नेहरू सरकारने केलेल्या कराराला आमुलाग्र वेगळं वळण दिलं. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेल्या औद्योगिक धोरणामुळे सरकारी नियंत्रण आणि सरकारी उद्योगांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले होते. परंतु त्यामुळे अर्थव्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले परिणामी १९८० च्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाला मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार मोठ्या उद्योगांच्या परवाना

धोरणाबाबत शिथिलता आणि भारत सरकारने १९८६ मध्ये २३ उद्योगांना मक्तेदारी नियंत्रण, विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यातून परवाना मुक्त केले. औद्योगिक परवान्याचे शिथिलीकरण करण्यात आले. जुलै १९९१ मध्ये नव्या औद्योगिक धोरणाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले.

उदारीकरण प्रक्रियेत अर्थव्यवस्था मुक्त करता करता, आता मोकाट अर्थव्यवस्था होऊन देशाची परिस्थिती अधिक संकटग्रस्त झाली आहे काय ? हा संदर्भ तपासावा लागेल.

## ८.४ भारताने उदारीकरण स्वीकारण्याची कारणे

१) १९८८ ते ९१ या काळात सरकारला आयात-निर्याती मी करण्यात अपयश आले. त्यामुळे महसूलातील तूट तीव्रतेने वाढ लागली लागताच सरकारला सर्व बाजूंनी कर्ज घ्यावे लागले. कर्ज वाढल्याने देशा संकट आले. या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारला उदारीकरण मार्ग अवलंबावा लागला.

२) आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात प्रगती होणे आवश्यक होते. भारतातील उद्योगधंद्यांवर सरकारी नियंत्रणे बरीच होती: ती शिशित करून परवानामुक्त धोरण अवलंबिणे सरकारला अत्यावश्यक होते.

३) कृषी क्षेत्रातही बदल करणे आवश्यक होते. कारण देशातील कषिमालाची निर्यात नगण्य होती. कृषी क्षेत्राला फारसे महत्त्वही दिले गेले नव्हते. त्यामुळे कृषी उत्पन्नावरील नियंत्रणेही दर करणे निकडीचे होते.

४) भांडवल बाजारातही कमालीचे औदासिन्य होते. सर्वसामान्य माणस शेअर बाजारापासून तसेच भांडवल बाजारापासून चार हात लांबच होता. त्यामळे उद्योगधंद्यातील गंतवणूकही अत्यल्प अशीच होती. भारत सरकारने परकीय भांडवलाच्या आयातीवर निर्बंध घातल्याने भारतीय उद्योगाच्या क्षेत्रात परकीय भांडवल विशेष गुंतलेले नव्हते. सरकारने उदारीकरणाचे धोरण अवलंबिले असते तरच गंतवणुकीतील निर्बंध शिथील झाले असते. जागतिक व्यापारवती करण्यावर भर देणेही आवश्यक होते. कारण १९९१ पूर्वी भारताचा जागतिक व्यापार अत्यल्प होता, निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण अधिक होते. निर्यातीत वाढ करावयाची असल्यास भारताला उदारीकरणाचे धोरण पत्करणे आवश्यक होते.

५) याशिवाय मंदगतीने असणारी भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतिमान करणेही तितकेच निकडीचे होते. त्यासाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक होते. भारताची फारशी निर्यात होत नसल्याने त्याला व्यापारात सतत तूट सहन करावी लागत होती. तुटीमुळे परकीय चलन विशेष उपलब्ध होत नव्हते. परकीय चलन उपलब्ध नसल्यामुळे नवीन तंत्रज्ञान आयात करण्यासाठी भारताला अनेक अडचणीना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे लवकरात लवकर उदारीकरणाची प्रक्रीया सुरू करण भारताला आवश्यक होऊन बसले.

६) बहुराष्ट्रीय कंपन्या आपली आगेकूच अधिक गतीने करीत होत्या. त्याच्यासमोर भारतीय कंपन्या टिकणे अशक्य झाले होते. ही स्पर्धा देशांतर्गत नसून आंतर्राष्ट्रीय

स्वरूपाची बनल्याने उदारीकरण आवश्यक झाले होते. १९९१ पतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी उदारीकरणाचे धार राबविण्यास मंजुरी दिली. १९९१ मध्ये (New Economic Policy) - धोरण सरकारने घोषित केले. त्यानुसार-

१) नवे औद्योगिक धोरण

२) नवीन शा व्यापार धोरण

३) विनिमय दर धोरण या गोष्टींवर आधारित १९९१-९२ चे केंद्रीय अंदाजपत्रक घोषित करण्यात आले व भारतात उदारीकरणाला प्रारंभ झाला.

## ८.५ उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे

भारताचा परकीय चलनाचा साठा इतका कमी झाला होता की पंधरवड्यानंतर लागणारे परकीय चलन सुद्धा रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक नव्हते. आपल्याकडील 47 टन सोन्याचा साठा जागतिक बँकेकडे तारण ठेवावा लागण्याची नामुष्की भारतापुढे ओढवली होती. अशा अगतिकतेच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेणे भाग होते. त्यावेळी कर्ज देतांना आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष (IMF) आणि जागतिक बँकेने घातलेल्या अटी मान्य करण्यावाचून भारताला गत्यंतर नव्हते.

### ८.५.१ १९९१ नंतर झालेले बदल :

समाजवादाच्या रुळावरून जाणारी गाडी रूळ बदलून दिशा बदलून जायला लागली. गाडी रूळ बदलते तेव्हा खडखडाट हा होतोच. पण तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी सरकार अल्पमतात असूनदेखील अत्यंत कुशलतेने ही परिस्थिती सांभाळली.

पुढील पाच वर्षे काँग्रेस पक्षातील आणि मित्र पक्षातील समाजवादी विचारसरणी असलेल्या पुढाऱ्यांना बाजूला सारून किंवा त्यांची समजूत काढून त्यांनी उदारीकरणाची प्रक्रिया चालू ठेवली आणि उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या रुळावरून भारताची घोडदौड सुरू झाली.

जीडीपी वाढीचा दर २-३ टक्क्यांवरून वाढून ६-७ टक्क्यांवर आला. पाच वर्षानंतर आलेल्या वाजपेयी सरकारनेही त्याच मार्गावरून वाटचाल केली किंबहुना त्यांच्या काळात या धोरणांना बळ प्राप्त झाले कारण त्यांचा पक्षच मुळी "उजव्या" विचारधारेचा असल्याने नरसिंहराव यांना जसा पक्षांतर्गत विरोधाचा सामना करावा लागला तसा वाजपेयींना करावा लागला नाही. पुढील दहा वर्षं युपीए सरकारने तोच मार्ग अवलंबला आणि सकल उत्पन्न वाढीचा दर २०१० साली चक्क ८.५% झाला. २०१४ साली भाजपचे सरकार आल्यावर तर मा. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यावर जाहीरच केलं की सरकाराचे काम व्यापार / उद्योग करणे हे नसून त्यांना प्रोत्साहन देणे हे आहे -" Government has no business to do business." उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण मागील ७ वर्षांत जेवढे झाले तेवढे आधीच्या २३ वर्षांत झाले नाही असे दिसून येते. कोणत्या क्षेत्रात काय

काय बदल झाले हे बघायचे झाले तर प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रातील बदल, आर्थिक क्षेत्रातील बदल, कर-प्रणालीतले बदल, परकीय चलन बाजारातील बदल, कृषी क्षेत्रातील बदल आणि विदेशी गुंतवणुकीस चालना देणारे बदल आणि त्यांचे परिणाम या विषयी जाणून घ्यावे लागेल.

### ८.५.२ उद्योग क्षेत्रात झालेले बदल :

१९९१ पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी लायसन्स किंवा परवान्याची गरज असे. तो मिळवण्यासाठी तुम्ही कोणते उत्पादन घेणार, किती घेणार, कामगार किती ठेवणार, वगैरे तपशील दिल्यावर उद्योग निरीक्षक दहा खेटे घालायला लावणार, वीस आक्षेप घेणार आणि नशीब चांगले असले आणि निरीक्षकाला "खुश" करू शकलात तरच उद्योगास परवाना मिळत असे. परवाना कधी मिळेल, याची कोणीही खात्री देऊ शकत नसे. Ease of doing business याची परिभाषा निरीक्षकास माहीत नव्हती. उद्योग हे केवळ सरकारी संस्थांनीच करायचे, खाजगी गुंतवणूकदारांना, उद्योजकांना अनेक उद्योग निषिद्ध होते. काही उत्पादने ही केवळ लघु उद्योगांसाठी राखीव होती. उत्पादनांची किंमत ठरवायची मुभा देखील अनेकदा उद्योजकांना नसे. १९९१ मध्ये मनमोहन सिंग हे केंद्रीय अर्थमंत्री होते. १९९१ मध्ये नवे औद्योगिक धोरण जाहीर झाले आणि यामध्ये अमुलाग्र बदल झाला. अनेक निर्बंध हटविले गेले, "इन्स्पेक्टर राज" मधून मालकांची सुटका झाली, उद्योग परवाना न घेताही अनेक उद्योग सुरू करण्याची मुभा मिळाली.

### ८.५.३ करविषयक सुधारणा :

आयकराचे दर कमी करण्यात आले. कॉर्पोरेट टॅक्स केवळ कमीच करण्यात आला असे नाही तर ३० टक्क्यांहून अधिक असलेला कर-दर टप्याटप्याने कमी होईल आणि तो २५% होईल अशी घोषणा अर्थमंत्रानी संसदेत केली आणि त्याबरहुकूम कॉर्पोरेट टॅक्स चे दर कमी केले देखील. वैयक्तिक आयकराचे दर पण कमी झाले, कर आकारणी सुलभ झाली. आपण आयकर भरतो याचा अभिमान वाटायला हवा अशी वागणूक त्यांना आयकर अधिकाऱ्यांकडून मिळायला हवी अशा स्पष्ट सूचना पंतप्रधानांनी दिल्या. या सर्वांचा परिणाम आयकर विवरण भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय अशी वाढ दिसून आली आणि कर संकलन देखील बरेच वाढले. असे जरी असले तरी याच काळात पूर्वलक्षी कर आकारणीच्या व्होडाफोन सारख्या केसेसने भारताची बदनामी झाली.

### ८.५.४ बँकिंग क्षेत्रातील सुधारणा :

स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये इतर स्टेट बँकांचे विलीनीकरण करण्यात आले तसेच राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या कमी करण्यात आली. बँकांचे विलीनीकरण झाल्याने अनुत्पादित खर्चात आणि अनुत्पादित कर्जात कमी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे बॅकांमधील कम्युनिस्ट प्रणित कामगार संघटनांच्या विरोधाला न जुमानता सरकारने बँकांचे विलीनीकरण केले. दोन सरकारी बँकांची विक्री करण्याची घोषणा करण्यात आली आहे. आयडीबीआय बँकेतील हिस्सेदारी आधी कमी करून आता ती बँक पूर्णपणे खाजगी करण्याच्या हालचाली सुरू आहेत. महाराष्ट्र बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक या बँकांचे यथावकाश खाजगीकरण करून सरकार

या बँकांमधील आपली हिस्सेदारी पूर्णपणे काढून टाकणार आहे. भारतीय बँकांमधील विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ७४% पर्यंत वाढवण्यात आली तसेच नवीन शाखा विस्तारासाठी आता रिझर्व्ह बँकेची परवानगी लागत नाही.

### ८.५.५ विमा क्षेत्रातील सुधारणा :

विमा कंपन्यांमधील विदेशी गुंतवणूकीची मर्यादा वाढवून ७४% करण्यात आली. सरकारी स्वामित्वाच्या साधारण विमा कॉर्पोरेशन (GIC ) आणि न्यू इंडिया अशुरन्स कंपनी यांची शेअर बाजारात नोंदणी करण्यात आली. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत एलआयसीचा आयपीओ (IPO) येऊ घातला आहे. त्या निर्गुंतवणुकीद्वारे सरकार रु. ८०,००० ते १,००,००० कोटी उभे करेल असे दिसते. ही आतापर्यंतची सर्वाधिक रकमेची प्रारंभिक विक्री होण्याची शक्यता आहे. एलआयसीची नोंदणी भांडवली शेअर बाजारात झाल्यावर नोंदणी झालेल्या कंपन्यांमध्ये एलआयसीचे भांडवली बाजारमूल्य सर्वाधिक असण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच वर्षांत सरकार एलआयसीतील आपली हिस्सेदारी २५ टक्क्यांनी कमी करणार आहे.

### ८.५.६ अप्रत्यक्ष करातील सुधारणा :

"एक देश : एक कर" या तत्त्वानुसार जुलै २०१७ पासून जीएसटीची अंमलबजावणी करण्यात आली. पेट्रोलियम उत्पादने, दारू असे काही अपवाद वगळता सर्व वस्तू आणि सेवा चार दरात विभागण्यात आल्या असून त्यात सुसूत्रता आणण्यात आली आहे. त्यामुळे कर संकलनात भरीव वाढ होऊन आता दर महिन्याला १ लाख कोटीहून अधिक कर संकलन होत आहे. सध्या होत असलेल्या चार दरांऐवजी दोनच दराने आकारणी करणे गरजेचे आहे तसेच केंद्राने राज्यांचा वाटा वेळच्या वेळी राज्यांना देणे आवश्यक आहे. नजीकच्या काळात कुठल्याही अपवादाशिवाय सर्व सेवा आणि वस्तू जीएसटीच्या अंतर्गत आणणे गरजेचे आहे.

### ८.५.७ विदेशी विनिमयातील सुधारणा :

१९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन केल्याने विदेशी विनिमयातील तूट कमी झाली. रुपया - डॉलर चा विनिमय दर (Exchange Rate) पूर्वी नियंत्रित असे, तो बाजारमूल्याशी निगडित झाला. रिझर्व्ह बँकेचा विनिमयदरातील हस्तक्षेप कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात शेअर बाजारात, म्युच्युअल फंडात, बँकात, विमा कंपन्यात, उद्योगात विदेशी गुंतवणूक होऊ लागल्याने १९९१ साली केवळ १५ दिवस पुरेल इतका परकीय चलनाचा साठा होता तो वाढून १८ महिने पुरेल इतका म्हणजे म्हणजे ६ बिलियन डॉलर वरून वाढून ६०० बिलियन डॉलर इतका झाला. निर्यातीवरील कर पूर्णतः काढून टाकल्याने १९९१ मध्ये असलेले ४ बिलियन डॉलर चे उत्पन्न वाढून १६५ बिलियन डॉलर इतके झाले. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राने तर दरवर्षी २१% चक्रवाढ दराने १५० बिलियन डॉलर इतके प्रचंड विदेशी विनिमय भारतात आणले.

### ८.५.८ कृषी क्षेत्रातील सुधारणा :

राजकीय इच्छा शक्तीच्या अभावामुळे कृषी क्षेत्रातील बदल आणि कृषी कायद्यातील बदल लांबणीवर पडले. अनेक पुढाऱ्यांचे हितसंबंध गुंतले असल्याने कृषी कायद्यांतील सुधारणा करणे दुरापास्त झाले होते. पण विद्यमान सरकारने अत्यंत कुशलतेने या कायद्यांना होणार विरोध मोडून काढला आणि आता पंजाब आणि हरियाणा या केवळ दोनच राज्यांमधील शेतकरी आंदोलन करताना दिसताहेत.

## ८.६ उदारीकरणातून अपेक्षा भंग

उदारीकरणाचा अभ्यास तौलनिकही करावा लागेल. आपण हे धोरण अवलंबलं तेव्हाच इतर देशही किंबहुना आपल्या आधी इतर देश या वाटेवरून गेले होते. चीनने उदारीकरणाच्या तीस वर्षांत जेवढी प्रगती केली त्याच्या निम्मीपण आपण करू शकलो नाही. रोजगार निर्मिती ज्या प्रमाणात व्हायला हवी होती, त्याहून खूपच कमी प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. मोठे उद्योगधंदे सुरू झाले नाहीत. Ease of doing business या क्षेत्रात लक्षणीय अशा सुधारणा झाल्या नाहीत. दरडोई उत्पन्न वाढलं असलं तरी ते अजून किमान दुप्पट वाढायला हवं होतं. या वर्षीच्या शेवटच्या तिमाहीत एलआयसीचा आयपीओ येऊ घातला आहे. कर प्रणालीत सुसूत्रता आणणे गरजेचे आहे. लोकांच्या मानसिकतेत बदल घडवणे जरुरी आहे त्यासाठी मोठ्या प्रमाणावर संवाद साधायला हवा. "सरकारने बँका विकायला काढल्या आहेत," ही मानसिकता बदलून अशा सुधारणांची आवश्यकता आम जनतेला पटवून देणे गरजेचे आहे.

हळुहळू या मानसिकतेत बदल झालेला दिसून येतोय. एके काळी सिंगूर मधून टाटांना पळवून लावणाऱ्या बंगालच्या मुख्यमंत्री मा. ममतादीदींनी नुकतेच टाटांना बंगालमध्ये प्रकल्प सुरु करण्याचे आवाहन केले आहे. चीनने आपल्या आधी केवळ १२ वर्षं म्हणजे १९७८ पासून उदारीकणाला सुरुवात केली तेव्हा भारताचे आणि चीनचे दरडोई उत्पन्न जवळपास सारखे होते. आज  चीनचे दरडोई उत्पन्न भारतातून ५ पटीहून अधिक आहे याचे कारण म्हणजे तिथे आर्थिक सुधारणा मनापासून करण्यात आल्या. कम्युनिस्ट शासन असल्याने विरोधाला वाव नव्हता. भारतात मात्र लोकशाही असल्याने व समाजवाद खोलवर रुजला असल्याने नव-विचाराला होणार विरोध मोडून काढणं कठीण जातं. शिवाय महत्त्वाचे म्हणजे आपण उदारीकरणाचे धोरण केवळ इष्टापत्ती होती म्हणून मान्य केलं, मनापासून नव्हे. एवढे असले तरी भारताचे सकल उत्पन्न जे स्वातंत्र्य मिळाले तेव्हा १० बिलियन डॉलर होते ते १००० बिलियन डॉलर व्हायला ६० वर्षं लागली मात्र उदारीकरणानंतर पुढचा हजाराचा टप्पा आपण केवळ ७ वर्षांत गाठला आणि करोनाने अर्थव्यवस्था मोडकळीस आली असतांना देखील पुढचा हजाराचा टप्पा २०२२-२३ मध्ये आपण गाठू आणि त्या पुढील हजाराच्या टप्प्यातील कालावधी झपाट्याने कमी होईल असे दिसते.

## ८.७ उदारीकरण होऊनही भारत मागे का?

मानवी विकासाच्या निर्देशांकात चीन पुढे आहे. भारतात उदारीकरण राबविण्यात भारतीय लोकशाहीने अर्थव्यवस्थेत मूठभरांची संपत्ती वाढविण्याचं काम केलं आणि बेसुमार विषमता निर्माण करणारी मोकाट अर्थव्यवस्था जन्माला घातली.

## ८.८ उदारीकरणाने विषमता वाढली?

उदारीकरण करताना निर्माण झालेली विषमता कमी करणे, लहान उद्योग मोठया उद्योगाने गिळंकृत करणे या प्रक्रियेत स्पर्धेतून मक्तेदारी निर्माण होणे किती धोक्याचे आहे याकडे सरकारचं दुर्लक्ष झालं. नवीन निर्माण झालेले रोजगार याची भलामण करताना किती बंद कंपन्यांमधील रोजगार विनाश झाला याची खबर ही न घेणे, उदारीकरणाचे समाजावरील दुषपरिणाम अधोरेखित करणारे होते. मानवी विकासाकरिता रोजगार, अन्न सुरक्षा, शिक्षण आणि आरोग्य यावर सरकारने किती कमी खर्च करावा आणि ही क्षेत्रं खाजगी भांडवल आधारिताच मोकळी ठेवणं यांत तीन दशकांच्या उदारीकरणांत मानव विकासांचे, सामाजिक न्यायव्यवस्थेचे प्रश्न पायदळी तुडविणे सुरू राहिले आहे. उदारीकरणाच्या प्रक्रियेत देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर सरकारने विदेशी भांडवलाला प्रवेश देणे हे देशाच्या सुरक्षेला नख लावणारे होत आहे. खनिजे, कोळसा, तेल, वायु, पाणी व संरक्षण कारखान्याचे महत्त्व बॅंका आणि विमा व्यवसाय सारखेच राष्ट्रीय महत्त्वाचे आहे.

उदारीकरण खासगीकरणाचा हा मार्ग देशाची सार्वभौम लोकशाही व्यवस्था कायम ठेवण्यात संविधानाने बजावलेली भूमिका कमकुवत करतो. या संदर्भात खासगीकरण हा 'नीजिकरण एक धोका है,' हे सिध्द होतं.

चीनने एक पक्षीय साम्यवादी राजवटीत उदारीकरण राबविलं, विदेशी भांडवलाशी चक्क पार्टनशिप केली. भांडवलशाही विकासाची फळे साम्यवादी राजवटीत आपल्या जनतेला चाखायला दिली. तरी शोषण व्यवस्था त्याच्या २१ Trillion डॉलर अर्थव्यवस्थेत संपली असं म्हणतां येत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत तर सध्या २.५० Trillion अर्थव्यवस्थेत भांडवलशाही शोषण व्यवस्था अधिक मजबूत झाली आहे. काम करण्यास पात्र असणाऱ्या ९७ टक्के भारतीयांना उदारीकरण प्रक्रियेत असंघटीत आणि असुरक्षित जगणे देऊ केले आहे.

अशा उदारीकरणात भारतात यापुढे तंत्रज्ञानाच्या विकासाच्या टप्प्यात बॅंका आणि विमा, बंदरे आणि रेल्वे, तेल आणि वायु तसंच नैसर्गिक संपती मूठभरांच्या ताब्यात जाणे यांत लोकशाही व्यवस्थेलाच धोका आहे. उदारीकरण करणाऱ्या शक्ती कोण? आणि उदारीकरणाचे उद्दिष्ट स्पष्ट असणे आवश्यक आहे.

## ८.९ खाजगीकरण म्हणजे काय

एखादी इंडस्ट्री किंवा संस्था पब्लिक सेक्टर मधून प्रायव्हेट सेक्टर मध्ये ट्रान्स्फर करण्याच्या प्रक्रियेला खासगीकरण म्हणतात. पब्लिक सेक्टर मधील कंपन्या सरकार मार्फत चालवल्या जातात. खाजगीकरणामध्ये सरकार प्रायव्हेट कंपन्या आणि संस्थांवरील

बंधने शिथिल करते. यामुळे सरकारी कंपन्या/ संस्था ई.ना एक पर्याय उभा राहतो. तसेच सरकारदेखील काही जबाबदाऱ्यांमधून मुक्त होते. जसे कि ऑइल इंडस्ट्री मधील खाजगीकरणाने अंबानी सारखा बिझनेसमॅन स्वतःचे पेट्रोल पंप टाकू शकतो. जेव्हा खाजगीकरण नव्हते (सुमारे १९९० च्या आधी) त्यावेळेस सर्व पेट्रोल पंप सरकारी कंपन्यांचे होते. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील खाजगीकरणामुळे बऱ्याच खाजगी शाळा आणि खाजगी शैक्षणिक संस्थाना परवानगी मिळाली. यातून कॉम्पिटिशन होऊन काही प्रमाणात शिक्षणाची क्वालिटी सुधारली तसेच सरकारची जबाबदारी देखील थोड्या प्रमाणात कमी झाली.

## ८.१० खाजगीकरणांची आवश्यकता

भारताच्या विकासात खाजगीकरणाचा मोठा वाटा असेल असे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी म्हटले होते पण त्यांना त्याचा वेग वाढवता आला नाही. कारण आपल्या देशातले लोक अजूनही साऱ्या भांडवलदारांना चोर समजतात. ती समाजवादी चालीची सवय अजून गेलेली नाही. म्हणूनच आपण फार खाजगीकरण करायला लागलो तर जनता आपल्यावर नाराज होईल आणि आपल्या मागे उभी राहणार नाही अशी भीती नेत्यांना वाटते. यामुळे ते खाजगीकरण देशाच्या फायद्याचे असूनही ते टाळतात. परिणामी देशाच्या विकासाचे खोबरे होते. ही गोष्ट आपल्याला दोनदा दिसून आली आहे. वाजपेयी सरकारने खाजगीकरण करण्याचा प्रयत्न करताच त्यांचा पराभव झाला. पण त्यांच्या काळात विकासाला चांगली गती मिळाली होती.

१९९१ साली भारतात समाजवादाचा अंत झाला आणि हळू हळू एक एक सेवा खाजगी व्हायला लागली. पूर्वी जसा समाजवादाने सगळे प्रश्न सुटतील असा भ्रम निर्माण करण्यात आला होता, तसा आता खाजगीकरणाने सगळे प्रश्न सुटतील असा नवा भ्रम जोपासला गेला. म्हणजे पद्धत कोणतीही असो, विकासाची एक गुरुकिल्ली असते असा लोकांचा भ्रम आहे. प्रत्यक्षात तसे नाही. विचारसरणी किंवा अर्थव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो ती अर्थव्यवस्था जादूची कांडी फिरवून बदल घडावा तसा बदल घडवू शकत नसते. पण लोक तशी अपेक्षा करतात.

## ८.११ रोजगारासांठी एल्गार आणि खाजगीकरण

बँका ब्रिटीश काळापासून खाजगी होत्या. कर्ज फक्त श्रीमंतांना मिळत होते. भांडवलशाहीचे तत्त्व असे कि बँकामध्ये पैसा जमा होतो तो श्रीमंत भांडवलदारांना द्यायचा म्हणजे ते उद्योग काढतील. त्यातून रोजगार निर्माण होईल व जनतेला चांगले जीवन मिळेल. हे सिद्धांत पूर्णपणे फसवे निघाले. तेव्हा गरीब बँकेकडे फक्त दुरून बघत होता. त्यांना स्वत: रोजगार निर्मिती करण्याची संधी नव्हती; तसेच, शेतकऱ्याला कर्ज मिळवून शेतीतून चांगले उत्पन्न काढण्याची संधी नव्हती. इंदिरा गांधीनी बँकांचे राष्ट्रीयकरण केले आणि गरिबांना बँका खुल्या झाल्या. शेतकऱ्यांना कर्ज मिळायला लागले. त्यामुळे हरित क्रांती देशात आली. शेतकऱ्याला चांगले दिवस आले. आमच्या मुलांना रिक्षासाठी कर्ज मिळाले. छोटी दुकाने घातली. मध्यम आणि छोटे उद्योग सुरु झाले. छोटे उद्योग सर्वात जास्त रोजगार निर्माण करतात. तर मोठे उद्योग नोकऱ्या कमी करतात. आधुनिक तंत्रज्ञान मोठ्या उद्योगात,

माणसाचे महत्व कमी करते. म्हणूनच मोठ्या उद्योगांचा समाजाला उपयोग होत नाही. कारण ते नोकऱ्या कमी करतात. पैसे जास्त कमावतात.

ह्या जगात महाकाय MONSENTO सारखी कंपनी पूर्ण जगात बियाणे नष्ट करत आहेत आणि त्यांची बियाणे जगात शेतीवर प्रभुत्व निर्माण करत आहेत. ग्रामीण बियाणे व्यवस्था संपली. पुन्हा पुन्हा त्याच कंपनीकडे बियाणे घेण्यासाठी जावे लागते. जसे BT COTTON हे GMO बियाणे. म्हणजेच जीनमध्ये बदल करून नवीन बियाणे निर्माण होते. युरोपमध्ये ह्याला बंदी आहे. पण आमच्या महान नेत्यांनी ते भारतात आणले. बँकेच्या राष्ट्रीयकरणामुळे हरित क्रांती आली आणि बऱ्याच प्रमाणात गरिबी कमी झाली. त्याच काँग्रेस पक्षाच्या मनमोहन सिंघाने १९९१ साली बँकांच्या खाजगीकरणाचे धोरण आणले. गरीब कर्ज परतफेड करत नाहीत म्हणून गरिबांना कर्ज देता नये हे कारण पुढे ढकलण्यात आले. सर्वात भयानक सरकारचे षड्यंत्र म्हणजे बँकांना विकून टाकण्याचे आहे. कर्ज बुडव्या श्रीमंतांचा नोकर असल्यासारखे सरकार त्यांचे ऐकत आहे. तसे बघितले तर बँकांचे कर्ज द्यायचे नियम फार कडक आहेत. १५०% हमी असल्याशिवाय कर्ज द्यायचे नाही हा नियम आहे. म्हणजे जर रु.१०० कर्ज द्यायचे असेल तर रु. १५० ची मालमता जामीन ठेवली पाहिजे. कर्ज बुडवले कि जमीन मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार बँकांना असतात. तरी देखील रु.८ लाख कोटी एवढे कर्ज मोठे भांडवलदार कसे बुडवू शकले ? त्याचे एकमेव कारण म्हणजे भ्रष्टाचार. बँकांना कोणीतरी हे करायला लावले. बँकांच्या प्रमुखांना सरकार नेमते. म्हणून सरकारचा वरदहस्त असल्याशिवाय; जामीन न घेता कर्ज बँका देऊच शकत नाही. म्हणून मुख्य माणसाचे नाव निरव मोदीसारख्या चोरांच्या भानगडीत येत नाही. सही करणारे अधिकारी सापडतात. एकंदरीत बँकांना बुडवण्याचा धंदा सरकार करत आहे. ज्या उद्योगपतींनी बँका लुटल्या त्या बँकांना खाजगीकरण करा म्हणून आक्रोश करत आहेत. सरकारचे धोरण आहे कि बँका बुडाल्या म्हणून बँकांनी पैसे उभे करावेत. कसे? तर खाजगी क्षेत्राकडून. म्हणजेच बँकांचे भाग भांडवल खाजगी कंपन्यांना विकून टाकणे. भाग भांडवल खाजगी मालकाचे झाले कि बँक त्यांच्या मालकीची होणार. ह्या पद्धतीने बँका विकून टाकणे. रु.८ लाख कोटीचे बुडीत कर्ज झाले. जप्ती केली तर उद्योग बंद पडणार. मग उद्योग बंद पडू नये म्हणून सरकारने बँकांना आदेश दिले कि उद्योगांना कर्जमाफी करा. शेतकऱ्यांना रु.३४००० कोटी कर्ज माफ करताना रडणाऱ्या सरकारने लाखो कोटी रुपये कर्जमाफी उद्योगांना केली. त्यामुळे बँका बुडाल्या. त्यांना सावरण्यासाठीच्या रु २.१५ कोटी अनुदान देण्याची घोषणा केली. हे पैसे गरिबांना देण्याच्या ऐवजी श्रीमंतांची कर्जमाफी करण्यासाठी मोठ्या श्रीमंतांना दिले. त्यामुळे सरकारकडे गरिबांना देण्यासाठी पैसा कमी पडला. बँक खाजगी झाल्या कि लाखो नोकऱ्या नष्ट होतील. तंत्रज्ञानामुळे नोकऱ्या बंद व्हायला लागल्या. जसे ATM झाल्यामुळे बँकेतील लाखो लोक बेकार झाले. त्यात बँका खाजगी झाल्या तर शेतकरी कामगार, छोटे उद्योजक, व्यापारी उद्धवस्त होतील.

ह्या सर्व अपयशापासून लोकांचे लक्ष दूर नेण्यासाठी पुतळे पाडण्याचा धंदा सुरु झाला. त्यात लेनिन आणि पेरीयारचे पुतळे म्हणजे शोषणाविरुध्द लढणाऱ्याचे पुतळे पाडण्यात येत आहेत. हिंदुत्वाच्या नावावर दंगे पेटवण्यात येत आहेत. बॉम्बब्लास्ट, दहशतवादी हल्ले वाढत आहेत. बेकारीच्या बडग्यापासून लोकांचे लक्ष दूर खेचण्यासाठी पाकिस्तानचे भूत पुन्हा उभे करण्यात येत आहेत. देशावर एक जबरदस्त संकट येत आहे, बेकारीचे. युवक रस्त्यावर येत आहेत. MPSC विरुद्ध मोर्चे निघाले. रेल्वे नोकऱ्यासाठी रेल रोको झाले. ही

तर सुरुवात आहे. ज्यांना रोजगार नाही ते हत्यारे घेतात. आज एक ठिणगी पडली तर आग लागेल अशी परिस्थिती आहे.

## ८.१२ बँकांचे खाजगीकरण देशहिताचे नाही !

निकृष्ट कर्जांमुळे बँकांचे नुकसान होत असते. या विषयाचा सर्वांगीण विचार करताना, ७० च्या दशकात इंदिरा गांधी यांनी खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करतानाचा त्यांचा राजकीय हेतू बाजूला ठेवूनच मूल्यमापन केले पाहिजे. राष्ट्रीयीकरणापूर्वी प्रामुख्याने शहरातच शाखा असलेल्या बँकांना नंतर खेडोपाडी- संपूर्ण भारतभर शाखा उघडणे भाग पडले. पण, त्यामुळे सर्वच बँकांचा शाखाविस्तार आणि व्यवसाय कैकपटींनी वाढून बँका सर्व जनतेपर्यंत पोहोचल्या. आम जनतेला बँकिंग सेवा प्रथमच उपलब्ध झाल्या, ज्याची खरी गरज होती. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आर्थिक सुधारणा आणि योजना केवळ बँकांमार्फतच राबविल्या जातात. कारण, बँकांची विश्वासार्हता व कार्यक्षमता सरकारी कार्यालयांपेक्षा नेहमीच गतिशील, तत्पर व पारदर्शी असते. सरकारी बँकांतील कारकुनाच्या जागाही उच्च अर्हताप्राप्त आणि स्पर्धात्मक परीक्षेद्वारा भरल्या जात असल्याने, त्यांची क्षमता जास्त असते आणि अधिकारीवर्ग तर आयएएस व आयपीएसच्या बौद्धिक दर्जाचे असतात. त्यामुळे अशा तज्ज्ञ कर्मचाऱ्यांच्या भरवशावरच आज बँकांचे स्पृहणीय कार्य सुरू आहे, हे मानलेच पाहिजे. मात्र, या यंत्रणेतही अनेक दोष आहेत.

## ८.१३ खाजगीकरणाला होतोय विरोध ?

महाराष्ट्रातील विजवितरण कंपन्यातील कर्मचा-यांनी या खाजगी करणाला तीव्र विरोध दर्शवला आहे. काही मोजक्या उद्योपतिंना फायदा देण्यासाठी खाजगीकरणाचा घाट असल्याचा त्यांचा आरोप आहे. चंडीगड या केंद्रशासित प्रदेशात खासगीकरणाची प्रक्रिया सुरू केली पण तेथील वीज कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी त्याविरोधात उच्च न्यायालयात दाद मागितली.खरं तर येथे वीजकंपनी फायद्यात आहे. सरकारी वीजवितरण कंपनी तीन वर्षांपासून नफ्यात असताना आणि वीजगळतीचे प्रमाण १५ टक्के या आदर्श मर्यादेत असताना खासगीकरण कशासाठी, असा सवाल वीज कर्मचारी संघटनेने केलाय. त्याची दखल उच्च न्यायालयाने घेतली असून सुनावणीचे आदेश दिले आहेत केंद्र सरकारला हा एक झटका मानला जातो.

औष्णिक वीज विद्युत विज आणि सोलर सूत्रातून सरकार २० तयार करतात पण सरकारने सोलर वीज निर्माण करण्यासाठी जे कायदे केले आहेत. ते चांगल्यासाठी आहेत की वाईट याच्या साठी हेच स्पष्ट होत नाही कारण एखाद्या ग्राहकाने दहा किलोवॅट पेक्षा जास्त वीज जर निर्माण केली तर ती तीन रुपये दराने घेतली जाते. पण दहा किलो पेक्षा कमी असेल तर ती सात रुपये युनिट ने घेतली जाते. म्हणजे जास्त उत्पादन करतील त्यांना मोठा तोटा सहन करावा लागतो. या नियमामुळे सरकार सोलर एनर्जीला येत आहे मागे खेचत आहे असा प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याचं वगैरे सांगतात.

## ८.१४ खाजगीकरण वारे

१९९१ मध्ये जेव्हा भारत आर्थिक संकटात सापडला होता तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी परकीय गंगाजळी भारतात मोठ्या प्रमाणावर आणण्यासाठी वेगवेगळ्या आर्थिक उपाययोजना केल्या. त्यामध्ये विविध सरकारी प्रकल्पांचे खाजगीकरण हीदेखील एक महत्त्वपूर्ण उपाययोजना होती. त्यानंतर १९९७ ते २००२ अशी पाच वर्षे देशात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी प्रणित भाजप आघाडीचे सरकार केंद्रात सत्तेवर होते. मात्र काँग्रेस सरकारच्या काळात सुरू झालेला खाजगीकरणाचा रेटा हा एवढा प्रचंड होता की भाजपप्रणीत एनडीए सरकारलादेखील खाजगीकरणाचे प्रयोग देशभरात राबवण्याखेरीज पर्याय राहिला नाही. २००४ मध्ये पुन्हा काँग्रेसप्रणीत यूपीए सरकार केंद्रात सत्तेवर आले आणि २०१४ पर्यंत म्हणजेच दहा वर्ष हे सरकार देशावर राज्य करत होते. देशाच्या आर्थिक चक्राला गती द्यायची तर खाजगीकरण याशिवाय पर्याय नाही याची जाणीव काँग्रेस सरकारला सातत्याने होती त्यामुळेच जेव्हा जेव्हा केंद्रात काँग्रेस प्रणित सरकार सत्तेवर होते तेव्हा तेव्हा तत्कालीन केंद्र सरकारने खासगीकरणाचा पुरस्कार करणारेच निर्णय प्रमुख्याने घेतले आहेत. मात्र २०१४ साली देशात राजकीय क्रांती झाली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार बहुमताने केंद्रात सत्तेवर आले. गुजरातचे तब्बल तीन टर्म मुख्यमंत्रीपद भूषवलेले नरेंद्र मोदी हे काँग्रेसी विचारसरणीच्या पूर्णपणे विरोधात असलेले प्रधानमंत्री आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात खऱ्या अर्थाने स्वराज्याचे सुराज्य आणण्यासाठी सत्तेवर असलेल्या काँग्रेस सरकारने आणि त्यातही विशेषत: सत्तेचा रिमोट हाती असलेल्या नेहरू आणि गांधी परिवाराने गेल्या साठ वर्षांच्या काळात देशाला अधिकाधिक खड्ड्यात घालण्याचेच काम केल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने करत असतात. मोदी यांच्या या आरोपांमध्ये तथ्य किती हा भाग वेगळा आहे. मात्र गेल्याच आठवड्यात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशातील सार्वजनिक उपक्रमांबाबत खाजगीकरणाची जी घोषणा केली आहे ती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आजवरच्या तत्वांशी पूर्णपणे विसंगत आहे असेच म्हणावे लागेल.

गेली दीड-पावणेदोन वर्ष देश कोरोनासारख्या जीवघेण्या विषाणूशी लढत आहे. टाळेबंदीमुळे देशभरातील उद्योग कारखाने अक्षरश: दिवाळखोरीत निघत आहेत. विविध करांच्या रूपाने सरकारी तिजोरीत जमा होणारी गंगाजळी देखील या काळात मोठ्या प्रमाणावर आटली आहे. असे असताना विकास कामे विविध प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. कोणत्याही विचारसरणीचे सरकार आले तरी जर राज्याचा, देशाचा विकास करायचा असेल तर जनताभिमुख विकास योजना राबवायच्या तर त्यासाठी निधीची तरतूद असणे आवश्यक आहे. मात्र देशातील आर्थिक परिस्थिती चिंताजनक असताना अशा विकास प्रकल्पांकरिता निधी उभा राहणार कुठून असा यक्षप्रश्न केवळ केंद्र सरकारच नव्हे तर देशातील सर्वच राज्य सरकारांना पुढे आणि स्थानिक पातळीवर विचार करायचा झाल्यास अगदी महापालिका नगरपालिका यांच्या समोरही आ वासून उभा ठाकला आहे. त्यामुळेच जरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वतःची विचारसरणी ही काँग्रेसची विचारसरणीपेक्षा भिन्न असली तरीदेखील देशाचा गाडा चालवण्यासाठी आज मोदींनाही खासगीकरणाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यासाठीच आता सरकारी मालमत्तांच्या विक्रीतून केंद्र सरकार येत्या काही काळात सहा

लाख कोटींचा निधी उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतीच दिल्लीत केली. यामध्ये वाराणसी, बडोदा, भोपाळ, चेन्नई यासह देशातील २५ विमानतळ, देशभरातील तब्बल ४०० हून अधिक रेल्वे स्थानके, ९० प्रवासी रेल्वे, ७४१ किलोमीटरपर्यंत धावणारी कोकण रेल्वे त्यावरील १५ रेल्वे स्टेशन, चौदाशे किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक, पंधरा रेल्वे स्टेडियम, १६५ रेल्वेचे गुड्स शेड, चार पर्यटनस्थळांवरील रेल्वे आणि काही ठिकाणी तर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचा अर्थात रेल्वे कॉलनींचाही या विक्रीमध्ये समावेश करण्यात आला आहे. भारतीय रेल्वे ही सध्या केंद्र सरकारकडे असणारी सर्वात मोठी पायाभूत दळणवळण व्यवस्था असलेली वाहतूक यंत्रणा आहे. केंद्रातील भाजप सरकारने तब्बल १.५२ लाख कोटीचा निधी या रेल्वेच्या मालमत्ता विक्रीतून उभारण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये कोकण रेल्वेची मालमत्ता विकून केंद्र सरकारला तब्बल सात हजार २८१ कोटी इतकी रक्कम मिळणार आहे. तर केंद्र सरकार येत्या काही काळात ज्या सहा लाख कोटींच्या मालमत्ता विकणार आहे. त्यामध्ये एकट्या रेल्वेच्या मालमत्ता विकून केंद्र सरकारला या सहा लाख कोटींपैकी सर्वाधिक २६ टक्के निधी यामधून प्राप्त होणार आहे. या बरोबरच देशातील महामार्गांची मालमत्ता विकून दीड लाख कोटी ऊर्जा क्षेत्रातून एक लाख कोटी गॅस पाईपलाईन मधून ५९ हजार कोटी तर टेलिकम्युनिकेशनमधून ४० हजार कोटी असा हा सहा लाख कोटींचा निधी केंद्र सरकार उभा करणार आहे. याबाबत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्टीकरण दिले आहे ते फारसे समाधानकारक नाही याचं कारण म्हणजे केंद्रीय अर्थमंत्री म्हणतात की, सरकारी मालकीच्या प्रकल्पांची विक्री होईल. मात्र केंद्र सरकारच्या मोनेटायझेशन धोरणानुसार जरी प्रकल्पांची विक्री झाली तरी जमीन मात्र खाजगी कंपन्यांना विकली जाणार नाही. जमिनीची मालकी केंद्र सरकारकडे राहील, असे अर्थमंत्री सांगत आहेत. हे कोणत्याही सुशिक्षित व अर्थसाक्षर व्यक्तीला फारसे पटण्यासारखे नाही. कारण घर विकायचे मात्र घराची जमीन विकायची नाही असेच केंद्र सरकारचे मोनेटायझेशनचे धोरण आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. कोरोनामुळे देशासह जगभरात आलेली आर्थिक मंदी यामुळे त्याचा सगळ्याच पातळ्यांवर परिणाम झालेला आहे. भारताचीही त्यातून सुटका झालेली नाही. त्यामुळे विकास कामांसाठी आर्थिक निधी उभारण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

एवढी मोठी सार्वजनिक मालमत्ता विक्रीला काढण्याचे जे प्रमुख कारण सांगितले जात आहे ते म्हणजे सार्वजनिक आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून केंद्र सरकारला पायाभूत सुविधांचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईप लाईनकरिता आगामी काळात तब्बल ४३ लाख कोटी रकमेची गरज आहे आणि विशेष म्हणजे पुढील तीन वर्षात म्हणजेच २०-२२ ते २०-२५ या चार वर्षांच्या काळात मोनेटायझेशन हे धोरण राबवून केंद्र सरकार या ४३ लाख कोटी रुपयांपैकी केवळ सहा लाख कोटी उभे करू शकणार आहे. त्यामुळे उर्वरित ३७ लाख कोटींचा निधी केंद्र सरकार कशाच्या माध्यमातून उभे करणार हा आजच्या घडीला प्रश्न आहे. जी अवस्था केंद्र सरकारची आहे तीच किंबहुना त्याहून अधिक दारुण अवस्था आर्थिक स्थिती देशातील विविध राज्य सरकारांची आहे. नवीन विकास कामे सुरू करायची तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधीची गरज आहे. कोणत्याही पक्षाचे केंद्रातील तसेच राज्यातील सरकार हे पूर्णपणे सरकारी निधीमधून विकास प्रकल्प राबवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे, मात्र असे असताना खाजगीकरणाचे तसेच सरकारी मालमत्ता देशातील मूठभर उद्योगपतींच्या घशात घालण्याचे हे जे काही प्रयोग सर्वच

पक्षातील सरकारांकडून सुरू आहेत हे देशाकरता आणि विशेषतः देशातील समाजवादी कामगार चळवळ आणि मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत धोकादायक आहेत, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

## ८.१५ खासगीकरणाचे दुष्परिणाम

भारतात जी विषमता आणि जातीवाद यामुळे द्वेषाची व विषमतेची व्यवस्था निर्माण करून कोणत्याही परिस्थितीत एक वर्ग सत्तेत वा मोठ्या पदावर राहील यासाठी पूर्वीपासून नियोजन केलेले आहे मग परिस्थिती आणि सत्ता कोणाचीही असो. परकीय लोकांच्या गुलामगिरी लाचारीचे जिवन जगणे भारतीय लोकांना पसंत आहे. म्हणून पारतंत्र्यातही लोक आनंदी राहतात. काही काही लोकांना तर आपण आजही पारतंत्र्यात आहोत याचीच जाणीव नाही. स्वतः चा मेंदू न वापरता दुसऱ्याने सांगितलेल्या अफवेवर सर्वात जास्त विश्वास ठेवणारा व्यक्ती म्हणजे भारतीय माणूस होय. आजही ९५ टक्के लोक फक्त अफवेला सत्य समजून जगत आहे. जो अफवा अथवा काल्पनिक बाबीं विषय खर बोलतो त्याला मुर्खात काढतात किंवा विद्रोही बनवतात.

खाजगीकरणामुळे देश गुलामीत कसा जातो याचे उदाहरण म्हणजे इस्ट कंपनी व्यापाराच्या उद्देशाने भारतात आली आणि बघता बघता भारताला गुलाम बनवून कसे टाकले हेच कळाले नाही. बघता बघता संपूर्ण भारतावर इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापित झाली. सांगायचे तात्पर्य गुलामीकडे जाण्याचा पहिले लक्षण म्हणजे खाजगीकरण होय. खाजगीकरणामध्ये मुलभूत हक्क व आधिकारांचे हनन होऊन, नागरिकांना फक्त गुलाम म्हणून बघितले जाते आणि तशी त्याला वागणूक दिली जाते. ज्यांच्याकडे दूरदृष्टी नाही वा ज्यांना राष्ट्राबद्दल आपुलकी नाही असेच लोक खाजगीकरणाचे जल्लोष करून आनंदाने स्विकार करतात. खाजगीकरण आणि सार्वजनिक अर्थात सरकारी यामध्ये काय फरक आहे ? हे सुशिक्षित लोकांना याची जाणीव नाही. म्हणून लोक खाजगीकरणाचा हसत हसत स्विकार करून सार्वजनिक मालमत्तेची हानी आणि देशाचे नुकसान करतात. आज सर्वच सार्वजनिक क्षेत्र खाजगीकरणामध्ये गेले आहे. बोटावर मोजण्या इतक्या लोकांना खाजगीकरण व त्याचे दुष्परिणाम माहिती आहेत बाकीच्या लोकांचे काय? खाजगीकरणाची झळ सोसत असताना सुद्धां खाजगीकरण फायद्याचे आहे की तोट्याचे आहे हे कळत नसेल तर याला काय म्हणावे? टेलिकॉम क्षेत्रात पाय ठेवताना जिओने एक वर्षे नेट फ्री देऊन ग्राहकांना आकर्षित केले. अनेक ग्राहक जिओशी जुळल्या गेले, लोकांना सवय झाली आणि आज जिओ सर्वात महाग आहे. भारतीय लोक कोणताच विचार करत नाहीत, काही दिवस वापरून सिम कार्ड फेकून देऊ इथपर्यंत विचारसरणी असलेल्या लोकांमुळे आज जिओ नंबर एक वर आहे. उद्योजक कोणतीही वस्तू वा सेवा कधीच मोफत देत उलट दिलेल्या च्या बदल्यात जास्त वसूल कसे करायचे याचे नियोजन अगोदरच असते. सुरवातीला हवे हवेसे वाटणारे आज खिशाला परवडणारे नाही. याचे कारण समोरचा विचार करण्याची मानसिक कुवत नाही. हीच परिस्थिती शिक्षण, नोकरी, वाहतूक, याविषयी झाली आहे. खाजगीकरण ही संकल्पना आली आणि देश अधोगतीकडे जायला सुरवात झाली. शिक्षणामध्ये खाजगीकरण आले. मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे. असा कायदा असताना सुद्धां मुलांना केजी, ज्युनिअर केजी सिनिअर केजी यामध्ये हजारो रुपये देऊन प्रवेश घेतला जातो.

माझं मुल कॉनव्हेटमध्ये शिकायला जाते याच खूप गर्व पालकांना असते पण त्याच्या फायदे तोट्यांचा कुठेच विचार नसतो. सरकारच्या बालवाड्या असायच्या मोफत प्रवेश, रोज रोज गाणे गाऊन व कथा सांगून मुलांना शिक्षणामध्ये आवड निर्माण केली जायची. ती गोष्ट केजी मध्ये मिळत नाही. पहिल्या वर्गापासून इंग्रजी माध्यम घेऊन मुलांना शाळेत प्रवेश दिला जातो, घरी कोणाला एबीसीडी माहिती नाही तरी मुलगा इंग्रजी शाळेत. पाचव्या सहाव्या वर्गात मुलगा गेला की जवळचा पैसा संपून जातो. दहावी बारावी नंतर खाजगी मध्ये शिकवताना पालकाच्या नाकी नऊ येतात. ज्यांच्याकडे स्थावर मालमत्ता आहे असे लोक जमीन विकून मुलांना शिकवतात. लाखो रुपये खर्च करून जेव्हा शिक्षण पूर्ण होते तेव्हा आपण तर शिकलो पण नोकरीच काय. कारण नोकरी सुध्दा खाजगीकरणात कमी पगाराची असते.

कमी पगारावर जास्त वेळ काम करावे लागते. शिक्षणाला लागलेला पैसा सुद्धा आपण कमवू शकत नाही. आपण कॉनव्हेंट आले कोणताही विचार न करता दुसऱ्याने केले म्हणून आपण सरकारी शाळेतील मुल खाजगी शाळेत टाकून स्वतः चे, मुलाचे आणि अर्थाचे नुकसान करून टाकतात. शासकीय बसने प्रवास करणे कंटाळवाणे वाटतं पण खाजगी बसने प्रवास करताना खुप आनंद होतो. खाजगीकरणाचा स्विकार आपण हसत खेळत करून अनेक समस्या निर्माण करून ठेवतो. वाहतूक रस्त्याची सुद्धा तिच परिस्थिती आहे. सरकार कडे रस्ते बांधायला पैसे नसतात. मग सरकार खाजगी कंपनीला काम देऊन रस्ते बांधून घेतात. मोठ मोठे टोल नाके उभे करतात. रस्ते खराब होतात, टोलची मुदत संपून जाते तरी नागरिकांची लुट थांबता थांबत नाही. जे काम कंपनी करू शकते ते काम सरकार का करत नाही? सुरवातीला शासकीय चॅनल दूरदर्शन म्हणून होते. परंतु जसजसे खाजगी कंपन्या आल्या आणि दूरदर्शन नामशेष झाले. दूरदर्शन मोफत बघायला मिळायचे परंतु आता दरमहा विशिष्ट शुल्क आकारूनच आपल्या घरातील टिव्ही आपण बघू शकतो. आज शेतजमीन जर खाजगीकरणाद्वारे कंपनीकडे गेली तर उपासमार आणि महागाईमध्ये होरपळून मरणाऱ्यांची संख्या करोडोच्या घरात राहील. खाजगीकरणाचा काही लोकांना सुरवातीला चांगले वाटते. परंतु दुष्परिणाम दिसून येत नाही. खाजगीकरणा शिवाय विषमतावादी व्यवस्था सुद्धा कायम राहू शकत नाही. म्हणून विषमतावाद पसरवून उद्योगपतींच्या हाती सत्ता देऊन पुन्हा पारतंत्र्यात जाण्याची पूर्ण तयारी झालेली आहे. अशा प्रकारे खाजगीकरणाचा आपण हसत स्विकार केला तरी त्याचे दुष्परिणाम खूप भयावह आहेत. शाळेच्या फी वाढण्याचे, सरकारी नोकरी कमी होण्याचे, कमी पगारावर जास्त काम करण्याचे, दिवसातून फेरी परत टोलनाका अशा अनेक प्रकारे आपल्याकडून खाजगी सेवेच्या नावाखाली नागरिकांचे खिसे रिकामी करून खाजगीकरणाने देशाला आर्थिक मागास केले आहे. सरकारी तिजोरीत जाणारा पूर्ण पैसा खाजगी लोकांकडे गेला आणि भारत देशाची तिजोरी रिकामी करून देशाला कंगाल केले. राष्ट्रीय संपती कंपनीच्या हाती गेली. त्यामुळे देशातील जनता भिकेला लागली. हे सर्व घडले कारण स्वतःला सुशिक्षित समजणारा वर्ग आपल्या मेंदूने विचार न करता दुसऱ्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे, दुरदृष्टीचा अभाव असून तर्क करण्याची क्षमता नाही. म्हणून खाजगीकरण वाढून दुष्परिणाम दिसून येतो. आता तर ही खाजगीकरणाला सुरवात झाली आहे. येणाऱ्या काळामध्ये शिक्षण, राशन, आरोग्य, नोकरी, सर्व काही खाजगीच असेल आणि ते कोणत्याही सर्व सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारे नसेल म्हणजे खाजगीकरणामुळे

आपण भिकेला लागणार हे नाकारून चालणार नाही. म्हणून आज खाजगीकरणाचा आनंदाने स्विकार केल्यापेक्षा स्वाभिमानाने विरोध जर झाला तर राष्ट्रीय संपती राष्ट्राच्या मालकीची राहील आणि जास्त दुष्परिणाम बघायला मिळणार नाहीत.

## ८.१६ देशातील नोकरीचं खाजगीकरण: एक गंभीर बाब !

देशात खाजीकरणाचं वादळ सुरु झालं आहे. वीज, रेल्वे आणि तत्सम क्षेत्राचं आता खाजगीकरण झालं आणि आता शिक्षणक्षेत्रही खाजगी होवू पाहात आहे. ती अगदी जमेची बाजू आहे. कारण यातून त्या त्या क्षेत्राचा विकास होवू शकतो आणि देशाचाही. देशाला कराच्या स्वरुपात फायदा होचो. परंतू यामधून एक सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे गरीबांची मुलं उच्च शिक्षण घेवू शकणार नाहीत. तसेच खाजगी नोकऱ्या ही गरीबांच्या वाट्याला येणार नाही. जरी त्यांच्यात कौशल्य असले तरीही बेरोजगारी वाढली आहे. देश चरणसीमेला पोहोचलेला आहे. लोकांना शिकावंसं वाटत आहे. लोकं शिकतात आहे. उच्च शिक्षण घेतात आहे. परंतू हे शिक्षण घेतात नोकरीच्या अपेक्षेनं. कोणीही साधा धंदा लावायचा विचार करीत नाहीत. त्यांना असं वाटतं की नोकरी करणे हे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे काम आणि धंदा करणे हे निरक्षरांचे काम. मग मी जर निरक्षर नाही तर मी धंदा कशाला करु? शेवटी याच प्रश्नांच्या चक्रव्युहात फसून लोकं उच्च शिक्षण तर घेतात. परंतू नोकरी व्यतिरिक्त इतर कामे करायला धजत नाहीत. मग बेरोजगारी वाढणार नाही तर काय ? अलीकडे नोकरीमध्येही स्पर्धा आहेत. नोकरी नोकरी करता करता वय निघून जातं. परंतू नोकरी मिळत नाही. तसेच नोकरी मिळवीत असतांना लाखो रुपये डोनेशन म्हणून द्यावं लागतं. शिवाय शिफारशीही भरपूर लागतात. शेवटी या कितीही शिफारशी असल्या तरी भागत नाही. जवळचा नातेवाईक व जवळची ओळखही असते नोकरी मिळवायला. ती नसल्यानेही नोकरी लागत नाही. आजच्या परिस्थितीत असा विचार केला तर नोकऱ्याच अलिकडे संपलेल्या आहेत. लोकं उच्च शिक्षण घेत आहेत. परंतू नोकरी न मिळाल्यानं ते आत्महत्याही करीत आहेत. कारण शिक्षण घेत असतांना घरी आलेली डबघाईची परिस्थिती, अलिकडचं शिक्षण एवढं महाग झालं आहे की त्याचा विचारच आपण करु शकत नाही. कोणताही मुलगा सहजपणे दहावी बारावीपर्यंत शिकू शकतो. कारण तेवढं शिकायला तेवढा पैसा लागत नाही. परंतू पुढे मात्र भरपूर पैसा लागतो. कारण सर्व शैक्षणीक संस्था ह्या खाजगी आहेत. याचाच अर्थ असा की मालीक मौजाच्या आहेत. त्या संस्थेचे मालक विद्यार्थ्यांकडून अतोनात शुल्क गोळा करतात नव्हे तर शिक्षण देण्यासाठी व्यापार करतात. मग एवढा पैसा गरीबांजवळ कुठून? तरीही त्यांची मुलं उच्च शिक्षण शिकता यावं म्हणून शिकतात. त्यामुळं आलेली डबघाईची परिस्थिती. त्यातच मुलं शिकली की त्यांना वाटणारी लाज. उच्च शिक्षीत मुलांना कोणतेही काम करायला शरमच वाटते.

## ८.१७ खाजगीकरणांचे वास्तव

भारतीय समाजाला गुलामगिरीच्या चक्रव्युहात ढकलणारी व्यवस्था म्हणजे खाजगीकरण होय. भारत देश जेव्हा पासून प्रजासत्ताक झाला तेव्हा पासून अलोकशाही वृत्तीवादी भारताला स्वतःच्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण भारतीय संविधानातील बळकटीमुळे राजकर्त्यांना तसे करता आले नाही.सन १९८५ पासून भारतीय राजनीती नव्या मोडवर आली आहे. बदलत्या युगाचे नवे स्थितंतरे आपल्या पाहायला मिळत आहेत.

देशहीतपेक्षा स्वःहीत व पक्षहीत यामध्ये राजकारणी मशगुल असल्याने गरीब हा गरीब तर श्रीमंत हा श्रीमंत होत आहे. भ्रष्टाचारांचे नवे कुरण म्हणजे आजचे राजकिय क्षेत्र पाहायला मिळत आहे. सरकारी सेवावर कुटाराघात करून खाजगी मालकांचे नवे अर्थसम्राट निर्माण झाले आहेत. शिक्षणक्षेत्र, दुरसंचार क्षेत्र, बँक क्षेत्र, कमजोर झाले असून खाजगीकरणाचा उदो उदो सारीकडे वाढला आहे. आजचे वर्तमान केंद्र सरकार भांडवलधार्जिने असल्याने देशातील सर्व सरकारी क्षेत्र विकण्याचा सपाटा सरकारने लावला आहे. भारतीय दुरसंचार व्यवस्थेला मोळकळीस आणून विदेशी कंपण्यांनी भरघोस फायदा केला आहे. कोरोना महामारीने मोबाईल कंपण्यांची चांदी झाली आहे. ऑनलाईन शिक्षणाने व वर्क टू होम प्रक्रियेने सर्व कंपन्यांनी अतोनात पैसा कमविला आहे. भारतीय उच्चतम श्रीमंताच्या फायद्यासाठी सामान्य जनतेला वेठीस धरले जात आहे. ऑनलाईन परिक्षेसाठी दहावी व बारावी मधील श्रीमंत विद्यार्थांनी आंदोलन चालवले आहे. खेड्यातील लाखो विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून कोसो दूर असतांना श्रीमंत विद्यार्थी स्वतःचा विचार करत आहे हे नक्कीच वेदनादायक आहे. यासाठी शासनाने योग्य पावले उचलने गरजेचे आहे. विद्यार्थांत गरीब व श्रीमंत असा भेद निर्माण होऊ देऊ नये. नाहीतर यांचे गंभीर परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील. आज फुकटच्या डाटाने तरूण पिढी वाईट मार्गाने जात आहे. तरी सरकार यावर नियंत्रण ठेवू शकत नाही. कारण हाच तरूण राजकारणी लोकांचा खरा राजवाहक आहे. इ.स. १९९१ पासून भारतात खाजगीकरणाचे वारे जोरात वाहू लागले. कृषी, शिक्षण,कामगार व असंघटित क्षेत्राला या नीतीने जबरदस्त हादरे दिले. पैसाच्या झगमगाटात सरकारी कंपण्या कवडीभावाने विकल्या गेल्या. आर्थिक विकासाचे मॉडेल श्रीमंतासाठी लाभदायक ठरले पण गरीब व बेरोजगारासाठी धोकादायक ठरले. या खाजगीकरणाने आदिवासी,शेतकरी,कामगार, कर्मचारी यांचे शोषण केले. राजकारण्यांनी खाजगीकरण म्हणजे भारताचे नंदनवन करणारा महामार्ग असा भ्रम निर्माण करून खाजगीकरण म्हणजे भारताला गुलाम करण्याच्या षडयंत्राचे वास्तव लपवून ठेवले. सन १९९१ ते सन २०२१ या कालखंडात देशातील व विदेशी कंपण्यांनी अब्जो रूपयांचे द्रव्यनिःसारण केले आहे. करोडो कामगाराचे शोषण करून गडगंज संपत्ती कमावली आहे. या कमाईवर सरकारला टेकू देऊन देश गुलाम केला आहे. आज लोकशाहीचे लक्तरे वेशीवर टांगवले जात आहे. नव्या कायद्याने भारतीय कामगार व शेतकरी वर्गाला दास्य व गरीबीच्या अंधकारमय आभासी जगात लोटले आहे. नवा भ्रम मेंदूत तयार करून खरे वास्तव लपवून ठेवले आहे. सरकार शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्यासाठी नवी रणनीती आखत आहे. तरी शेतकरी स्वतःची जमीन व देश वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावत आहेत. न्यायालयातील न्यायधिशांनी आरक्षण समाप्त करण्याविषयी सुतोवातन केले आहे. कायद्यानी सत्यता सांगणाऱ्या न्यायधिशांनी असे वक्तव्य करून स्वतःचे पूर्वग्रह दूषितपणाची भावना जाहीर केली आहे. त्याच्या बोलण्यांनी आरक्षणाविषयी भ्रम निर्माण झाला आहे .तर आरक्षणाचे खरे वास्तव जनतेपासून डोळेझाक होत आहे. आरक्षण समाप्त करता येत नसल्याने सर्व सरकारी विभागाचे खाजगीकरण करून व प्रतिआंदोलन करून आरक्षण कमकूवत करणे हे त्यांचे वास्तव आपण समजून घेतले पाहिजे. आज कोविड-१९ च्या महामारीने सारे क्षेत्र प्रभावित झाले आहेत. भारतीय अर्थव्यवस्था ऋण अवस्थेत पोहचली आहे. अनेकांची आयुष्य उध्दवस्त झाली आहेत. अशा कठीण काळात केंद्र सरकारने सरकारी सेवा क्षेत्राचे खाजगीकरण करण्याचा कपटी डाव आखला आहे. खाजगीकरणातून देशहीत असल्याचा भास निर्माण करून स्वतःच्या मित्रांचा फायदा करण्याचा हा डाव दिसून

येत आहे. वित्तमंत्री यांनी अर्थसंकल्पात खाजगीकरणाचा आगाज केला आहे. बँक व विमा क्षेत्र, अनेक सरकारी क्षेत्रात खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

बँक कर्मचारी स्वतःला सरकारचे तारणहार समजत होते. त्याच कर्मचाऱ्यांचे जीवन उध्दवस्त होत आहे. ग्रामीण जनतेचे जीवन श्रीमंताच्या हवाली करून देशाला विकण्याचा हा डाव फारच धोकादायक ठरू शकतो. भारतीय सर्व नागरिकांनी खाजगीकरणातील भ्रम व वास्तव यांचा योग्य अर्थ समजून स्वतःची वाटचाल करावी. येणाऱ्या पुढील निवडणूकित यांचे गंभीर परिणाम पाहायला मिळतील. देशातील तरुणांनी व सर्व लोकांनी सरकारचे धोरण समजून घ्यावे. देशाला विकणाऱ्या कावेबाजापासून देशाचे रक्षण करावे. सारे भेदभाव सोडून आपण एक होऊ या. देशाला आम्ही विकणार नाही असा भ्रम निर्माण करणाऱ्या सत्तेपासून सावध राहावे. खाजगीकरणातील वास्तव ओळखून नवा क्रांतीपथ निर्माण करून देशाला व संविधानाला वाचवावे हाच खरा मार्ग आहे. दुसरा कोणताच मार्ग चांगला नाही.

## ८.१८ जागतिकीकरण

जागतिकीकरणाची नीती हि ऍडम स्मिथच्या निरंकुशतेच्या धोरणांवर आधारलेली आहे. आजच्या काळातील जागतिकारणाची संकल्पना हि १४ ऑगस्ट १९४१ च्या अटलांटिक सनदेत सापडते. दुसऱ्या महायुद्धानंतर मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक धोरणे व व्यापार विषयक धोरणे कशी असावी याबाबत जागतिक पातळीवर विचार सुरु झाला व त्यामधूनच १९४४ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, १९४७ मध्ये आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य गटाची स्थापना करण्यात आली. जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था इतर देशांसाठी (खासकरून इतर देशाच्या कंपनीसाठी) खुली करणे. आपल्या देशाची अर्थव्यवस्था हि जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडून घेणे. आपल्या देशात इतरांना मुक्तपणे व्यापार आणि आर्थिक व्यवहार करून देणे. आणि आपण इतरांच्या देशात त्याचप्रकारे व्यापार व आर्थिक व्यवहार करणे.

१९९० मध्ये सोवियत युनियनचा पाडाव झाल्यानंतर जागतिकारणाच्या प्रक्रियेला वेग आला. १९८० नंतर इंग्लड, फ्रांस, रशिया, ऑस्ट्रेलिया इ. देशात आर्थिक सुधारणेचे व पुनर्रचनेचे जे कार्यक्रम सुरु झाले. त्यामधून जागतिकीकरणाची प्रक्रिया हि सुरु झाली. जागतिकीकरण हि संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी प्रक्रिया आहे किंव्हा एका अर्थाने जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे हि मुळात आर्थिक प्रक्रिया आहे. परंतु या प्रक्रियेत आर्थिक पैलूंबरोबरच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पर्यावरण विषयक अनेक पैलू आहे. जागतिकीकरणामुळे प्रगत देशांना नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात.

थोडक्यात, जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा व नवे तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून उत्पादकता वाढविणे व संपूर्ण जगाची एकच बाजारपेठा निर्माण करणे होय.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरण म्हणजे काय ते सांगा?

## ८.१९ जागतिकीकरणाची व्याख्या

जागतिकीकरण हि अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी संबधित असणारी अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा एक विशिष्ट अर्थ सांगणे अवघड आहे. वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळ्या दृष्टितिकोनातून जागतिकीकरणाच्या व्याख्या केल्या आहे. त्यापैकी काही महत्वाच्या पुढीलप्रमाणे :

**१) दीपक नय्यर:**

एखाद्या राष्ट्रचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारित करण्याच्या प्रक्रियेला 'जागतिकीकरण' म्हणतात.

**२) रुसी मोदी:**

मुक्त स्पर्धा व नवे तंत्रज्ञान याद्वारे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आणि संपूर्ण जगाची सलग एकच बाजारपेठ निर्माण करून वस्तू व सेवा यांची विक्री करणे.

**३) श्रवणकुमार सिंग:**

जागतिकीकरण म्हणजे, आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्टांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामुग्रीचा व भांडवलाचे सुलभ परिचालन करणे होय.

**४) अँथनी गिडेन्स:**

जगातील विविध लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता व परस्पर निर्भयता म्हणजे जागतिकीकरण होय. हि पारस्पारिकता आर्थिक व सामाजिक संबधातील तसेच स्थळकाळातील अंतर मिटवून टाकते.

**५) एम. अलब्रो व ई. किंग:**

ज्या प्रक्रियेद्वारे जागतिक लोक एकच समाजात एकत्रित होतात. त्या प्रक्रियेस जागतिकीकरण म्हणतात.

**६) जागतिक बँक:**

जागतिक बँकेच्या मते, जागतिकीकरण म्हणजे

१) उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तूवरील आयात नियंत्रणे टप्प्या - टप्पाने रद्द करणे होय.

२) आयात शुल्काचे दर कमी करणे.

३) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकीकरण करणे होय.

**७) चंद्रकांत खंडागळे:**

जगातील विविध लोक, राष्ट्रे व समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय समाजाचे उल्लंघन करून त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि

सांस्कृतिक व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे ' जागतिकीकरण ' होय.

**८) ऋषी मोदी:**

मुक्त स्पर्धा किंव्हा खुली स्पर्धा नवे तंत्रज्ञान यातून उत्पदकता आणि उत्पादन वाढविणे म्हणजे ' जागतिकीकरण ' होय.

वरील विविध व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाचा अर्थ आपणास तीन दृष्टिकोनातून सांगता येईल.

**१) आर्थिक दृष्टिकोनातून:**

जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करून तिच्याशी सर्व राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे.

**२) सामाजिक दृष्टिकोनातून:**

जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध लोक, राष्ट्रे किंव्हा समाज यांच्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून त्यांना एकाच जागतिक व्यवस्थेत सामील करून घेणे होय.

**३) राजकीय दृष्टिकोनातून:**

जागतिकीकरण म्हणजे विकसित अश्या प्रभुत्वशाली राष्ट्रांनी आपली आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारण्यास लावणे होय.

थोडक्यात, जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध लोक, राष्ट्रे किंव्हा समाज यांच्यातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक संबंधाची जागतिक व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया होय.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरणाच्या विविध व्याख्यांचा आढावा घ्या?

## ८.२० जागतिकीकरणाचे वैशिष्ट्ये

जागतिकीकरण हि एक वैश्विक संकल्पना आहे. आर्थिक दृष्टीने ती संपूर्ण जगाची एकच अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. सामाजिक दृष्टीने जगातील सर्व समाज व लोक यांना एका जागतिक व्यवस्थेमध्ये सामील करून घेण्याची प्रक्रिया आहे. तर राजकीय दृष्ट्या ती प्रभुत्वशाली राष्ट्रांनी त्यांची ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारण्यास भाग पडणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची अनेक वैशिष्ट्ये आहे ते पुढीलप्रमाणे सांगता येतील:

१) संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था निर्माण करणे.

२) जागतिक विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणे.

३) उदारीकरण व खाजगीकीकरण यांना चालना देणे.

४) विविध माध्यमांद्वारे जागतिकीकरणास चलन गतिमान करणे.

५) जागतिकीकरणात विकसित राष्टांचे प्रभुत्व आढळून येते.

६) जागतिकीकरण हि जगात आमूलाग्र बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये सांगा?

## ८.२१ जागतिकीकरण आणि भारत

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर भारताने भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा उत्तम समन्व्यय साधणाऱ्या मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. पंचवार्षिक योजना राबवून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयन्त केला. याचकाळात अनेक उद्योगधंदे निर्माणकरून त्याचे नियंत्रण सार्वजनिक क्षेत्राकडे अर्थातच सरकारकडे होते. १९५० ते १९९० या ४० वर्षाच्या काळात अकार्यक्षमता, भ्रष्टाचार, गैरव्यवस्थापन, नोकरशाहीचे वर्चस्व, राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप इ. गोष्टींमुळे सरकारला मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागला. ज्यामुळे दारिद्र्य, बेकारी व महागाई वाढत गेली. १९८० ते १९९० या दशकात मोठी चलनवाढ निर्माण झाली. परकीय गंगाजळी अर्थात चलनसाठा हा घटत गेला. देशाला अन्य अडचणींना देखील सामोरे जावे लागले. यासर्व कारणांमुळे १९९१ मध्ये भारतात मोठे आर्थिक संकट उभे राहिले. या संकटाचे स्वरूप पुढील प्रमाणे होते.

१) भारताचा आर्थिक विकासाचं दर हा मे १९९१ पासून ऋणात्मक झाला.

२) चलनवाढीचा वार्षिक दर हा १७% होता.

३) भारतातील राजकीय अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची आर्थिक पथ घसरून विदेशी व्यापारात कर्ज उभे करणे अवघड झाले.

४) १९८९ - १९९१ याकाळात अनिवासी भारतीयांच्या भारतीय बँकेच्या ठेवी कमी झाल्या.

या संकटग्रस्त परिस्थितीमध्ये २१ जून १९९१ रोजी पी. व्ही. नरसिंह राव हे पंतप्रधान झाले. भारताची आर्थिक स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी भारत सरकारने आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या दोन्ही संस्थांनी भारताने आपल्या आर्थिक धोरणात पुढीलप्रमाणे बदल करावे असे सुचवले.

१) रुपयाचे अवमूल्यन करावे.

२) राजकोषीय तुटीत कपात करावे.

३) परकीय भांडवलंस भारतात मुक्त प्रवेश द्यावा.

या अटी मान्य करून भारत सरकारने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर केले. व उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तत्वांचा स्वीकार केला. व इथूनच भारतात जागतिकीकरणाची सुरवात झाली.

भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार करून नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. या आर्थिक धोरणात पुढील तरतुदी होत्या.

१) आयात - निर्यातीवरील निर्बंध शिथिल करणे.

२) आयत - निर्यातीवरील जकात करात मोठी कपात केली गेली.

३) मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारले गेले.

४) रुपयाचे टप्प्या टप्प्याने अवमूल्यन करून रुपया पूर्णतः परिवर्तनीय केला.

५) सोन्याच्या आयातीवरील निर्बंध पूर्णतः उठवले.

६) परकीय चलनाच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवणाऱ्या कायद्यात बदल करून कमीत कमी नियंत्रण असणारा हा कायदा संमत केला.

७) १५ एप्रिल १९९४ रोजी भारतने गॅट करारावर सही करून जागतिक व्यापारी संघटनेचे सद्सत्व स्वीकारले. व दळणवळण पर्यटन, व्यापारी व पायाभूत सेवा इ. मध्ये परकीय गुंतवणुकीस मान्यता दिली.

जागतिक व्यापारी संघटना आणि गॅट यांच्या धोरणांमुळे जगात मुक्त व्यापार सुरु झाला. या मुक्त व्यापारामुळे भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. भारताने आपल्याला कोणत्या उत्पादन क्षेत्रात जास्त फायदा आहे. याचा विचार करून त्यादृष्टीने आपले डावपेच आखले. भारताने १९९१ - ९२ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यास सुरवात केली. आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर म्हणजे १९९१ - ९२ नंतर ते २००० - २००१ पर्यंत भारताच्या स्थूल देशांतर्तगत उत्पादनवाढीचा दर ६.१% एवढा होता. आर्थिक सुधरणापूर्वी तो ५.३% एवढा होता. १९९५ - ९६ नंतर उत्पादन वाढीचा दर ११.८% इतका होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारताने जागतिकीकरण का लागू केले ते सांगा?

## ८.२२ जागतिकीकरण व भांडवलशाही

जगातील बहुतेक औदयोगिक विकसित राष्ट्रांमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था आज बघायला मिळते. भांडवलशाहीचा जगभर वाढ व विस्तार करण्यामध्ये जागतिकीकरणाची महत्वाची भूमिका राहिली आहे. म्हणूनच भांडवलशाही व जागतिकीकरण यांचा जवळचा संबंध राहिलेला आहे. १९७० पूर्वी अराष्ट्रीयीकरन या नावाने इंग्लडमध्ये खाजगीकीकरणाची प्रक्रिया सुरु होऊन तेथील अनके उद्योग हे खजगी क्षेत्राकडे सोपवले गेले. इंग्लंडच्या अनुभवाने प्रेरित होऊन १९८० मध्ये फ्रांस व त्यानंतर ऑस्ट्रेलिया,

जपान, तुर्कीस्थान या राष्ट्रांनीही खाजगीकीकरण स्वीकारले. १९८८ मध्ये रशियाचे राष्टाध्याक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी उदारीकरण, खाजगीकीकरण व जागतिकीकरण या तत्वांचा स्वीकार केल्याने सोविएत रशियासह रूमानिया, पोलंड, बल्गेरिया इ. राष्टांमधील समाजवादी अर्थव्यवस्था कोसळल्या व तेथील सरकारी उद्योगांचे खाजगीकीकरण करण्यात आले. चीननेदेखील आर्थिक क्षेत्रात उदारीकीकरण व खाजगीकरणाचा तत्व स्वीकारले, परंतु राजकीय क्षेत्रात समाजवादी व्यवस्था कायम ठेवली. पुढे टांझानिया, चिली, अल्गेरिया, ब्राझील, हाँगकाँग, सिंगापूर, मेक्सिको, तैवान इ. राष्ट्रांनीही उदारीकीकरण व खाजगीकरणाचे तत्व स्वीकारले. स्वातंत्र्यनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून देशाचा नियोजनबद्ध विकस घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु १९९१ मध्ये भारतात मोठे आर्थिक संकट उभे राहिल्याने भारताने उदारीकीकरण, खाजगीकीकरण व जागतिकीककरणाचे तत्व स्वीकारले. अशा प्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार केला जात आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरण व भांडवलशाही यांचा परस्पर संबंध सांगा?

## ८.२३ जागतिकीकरणाचे फायदे

भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर व अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर जागतिकीकरणाचे विविध परिणाम घडून आलेले आहे, ते पुढीलप्रमाणे :

### १) औद्योगिकीकरणास चालना:

जागतिकीकरणांमुळे विकसनशील राष्ट्रांत औद्योगिकीकरणास मोठी चालना मिळाली. भारताच्या दृष्टिकोनातून औद्योगिकीकरणाचा मोठा फायदा झालेला दिसून येतो. जागतिकीकरणांमुळे भारतात अनेक परकीय व स्थानिक कंपन्यांनी नवीन उद्योगधंदे सुरु केले. तसेच सध्याच्या उद्योगांचा विस्तार घडवून आणला. उदा. फोर्ड व हुंडाई यासारख्या परदेशी कंपन्यांनी भारतात मोटार कारखाने उभारले. तर आयटीसी, हिंदुस्थान लिव्हर, पेप्सी, कोका - कोला, पिझ्झा हट इ. कंपन्यांनी खाद्य - पदार्थ व शीतपेयाच्या कारखाने काढले. खाजगीकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे बंद होण्याच्या मार्गावर असलेले उद्योगधंदे खाजगी उद्योजकांना दिल्यामुळे उद्योगांची कार्यक्षमता, गुणवत्ता व उत्पादकतेमध्ये वाढ झाली. तसेच अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीवरील निर्बंध हटल्यामुळे पर्यटन व हॉटेलिंग उद्योगांचा विकास घडून आला.

### २) बाजारपेठांचा विस्तार:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल व तंत्रज्ञान इ. एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रांत सहज प्रवेश मिळू लागला. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्यांची उत्पादके परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी दिल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा निर्मण होऊन बाजारपेठांचा विस्तार होण्यास मदत झाली.

**३) परकीय व्यापारात वाढ:**

जागतिकीकरणानंतर भारताने 'मुक्त व्यापार धोरणांचा' स्वीकार केल्याने आयत-निर्यात व्यापारावरील निर्बंध दूर झाले. भारताने आपल्या आयात करात कपात करून आपले चलन परिवर्तनीय करावे लागले. या सर्व उपायांमुळे भारताचा परकीय व्यापार मोठया प्रमाणात वाढला. जागतिकरणामुळे भारताचा परकीय व्यापार हा जगातील प्रत्येक देशाबरोबर होऊ लागला. उदा. भारताचा सुरवातीस व्यापार हा केवळ इंग्लंड, जर्मनी, जपान, कॅनडा, अमेरिका, रशिया इ. मोजक्याच देशांबरोबर होत होता. जागतिकीकरणामुळे भारताचा व्यापार हा मध्यपूर्व राष्ट्रांशी ज्यामध्ये इराक, सौदी अरेबिया, कुवेत, दुबई इ. तर आफ्रिकन राष्ट्रांमधील द. आफ्रिका, केनिया, घाना, टांझानिया, इथोपिया इ. देशांशी व्यापार होऊ लागला. याव्यतिरिक्त लॅटिन अमेरिकन देशांशी देखील भारताला व्यापार वाढविण्याची संधी आहे.

**४) रोजगारामधील वाढ:**

जागतिकीकरणामुळे भारतात उच्चशिक्षितांना व कुशल व्यक्तींना रोजगाराच्या अनेक संधी उत्पन्न झाल्या आहेत. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, वाहतूक संप्रेषण, माहिती तंत्रज्ञान इ. अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उत्पन्न झाल्या आहे. अनेक रोजगार उत्पन्न झाल्यामुळे रोजगार किंव्हा नोकरीसाठी आवश्यक्य असणारे शिक्षण देणाऱ्या अनेक शिक्षण संस्थाही भारतात सुरु झाल्या.

**५) सेवा क्षेत्रांचा विस्तार:**

भारतात जागतिकीकरणामुळे सेवा क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला दिसून येतो. वाहतुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक सुरु झाल्याने रस्ते व महामार्ग यांची स्थिती बदलली. हवाई वाहतुकीत खाजगी व परकीय कंपन्यांनी गुंतवणूक केल्याने हवाई वाहतुकीच्या सेवाही सुधारल्या. बँका व वित्तसंस्थांना स्वायत्तता मिळाल्याने इंटरनेट बँकिंग, ईटीएम सुविधा लोकांना मिळू लागल्याने बँकिंग सुविधा ह्या सुधारल्या. जागतिकीकरणामुळे संप्रेषण क्षेत्रात क्रांती घडून दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट इ. क्षेत्रांचा विस्तार घडून आला. त्यामुळे जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरित व जलद गतीने संपर्क साधने शक्य झाले.

**६) सामाजिक - सांस्कृतिक संबंधामध्ये झालेली वृद्धी:**

जागतिकीकरणामुळे जगातील विविध राष्ट्रांमधील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहे. शिक्षण, रोजगार, पर्यटन इ. निमित्ताने विविध जगातील लोक कुठेही स्थलांतरित होऊ लागली. जागतिकीकरणामुळे फक्त आर्थिक सहकार्यच वाढले नाही तर जगातील सामाजिक - सांस्कृतिक संबंध देखील वृद्धिगंत झाले. जागतिकीकरणामुळे राजकीय व भौगोलिक सीमा दूर होऊन जग खूप जवळ आले. जागतिकीकरणामुळे जागतिक खेड्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरणाचे फायदे सांगा?

## ८.२४ जागतिकीकरणाचे तोटे

**१) स्थानिक उद्योगधंद्यास मारक:**

जागतिकीकरण हे स्थानिक उद्योगांस मारक ठरत आहे. जागतिकीकरांमुळे उत्तम प्रतीच्या परकीय वस्तू मोठ्या प्रमाणात व स्वस्त दरात स्थानिक बाजारपेठेमध्ये उपलब्ध होत आहे. स्थानिक वस्तू ह्या परकीय वस्तूंशी स्पर्धा करू न शकल्याने स्थानिक वस्तूंची मागणी कमी होऊन ते उद्योगधंदे बंद पडण्याच्या मार्गावर आहे. तसेच परकीय देशात तयार होणाऱ्या वस्तू ह्या मोठ्या प्रमाणावर जाहिरातीवर पैसे खर्च करात असल्याने स्थानिक उद्योगधंद्यांची विशेषतः लघु उद्योगांची स्थानिक बाजारपेठेतुन पीछेहाट होत आहे.

**२) बहुराष्ट्रीय कंपन्यांची बाजारपेठेतील मक्तेदारी:**

जागतिकीकरणामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विविध देशांच्या बाजारपेठेत आपली मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिका, पश्चिम युरोपियन राष्ट्रे, जपान इ. देशातील अनके महत्वाच्या कंपन्यांनी गरीब व विकसनशील राष्ट्रांमधील उद्योग आपल्या ताब्यात घेऊन स्थानिक उद्योगांना बाजारपेठांमधून हद्दपार केले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्तम व्यवस्थापकीय कौशल्य, आकर्षक जाहिरातीबाजी इ. जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेतील एक मोठा हिस्सा काबीज केला आहे.

**३) बेरोजगारीमधील वाढ:**

जागतिकीकरणामुळे बेरोजगारीच्या मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. परकीय वस्तूंशी स्थानिक माल किंव्हा व्यापारी स्पर्धा करू शकत नसल्याने स्थानिक उद्योगधंदे बंद पडून बेरोजगारांची संख्या वाढत आहे. खाजगीकीकरांचे धोरण देखील देखील बेरोजगारी वाढवण्यास हातभार लावत आहे. खाजगीकीकरांच्या धोरणांमुळे कामगारांची कपात होऊन अनेक कामगार हे बेरोजगार झाले.

**४) विकसनशील देशांची आर्थिक लूट:**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत प्रत्येक राष्ट्रांनी आपल्या भौगोलिक सीमा ओलांडून इतर देशात आपला व्यापार समृद्ध केला व तेथील बहुतेक बाजारपेठा ह्या त्यांनी काबीज केल्या. जागतिकीकरणामुळे विकसित देश उदा. अमेरिका व इतर युरोपियन राष्ट्रे हि विकसनशील व इतर मागास राष्ट्रांची आर्थिक लूट करत असल्याचे दिसून येते. रॉयल्टी, कर्जावरील व्याज, नफा इ. च्या रूपाने हि आर्थिक लूट घडत आहे. या प्रक्रियेत विकसनशील देशात मिळालेले उत्पन्न आपल्या देशात पाठवून विकसित राष्ट्रे हि आपली आर्थिक लूट करीत आहे.

**५) पर्यावरणीय समस्या:**

जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या हि अधिक गंभीर बनत चालली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती जास्त नफा मिळवण्याच्या उद्देश्याने नैसर्गिक साधनसामुग्रीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करत आहे. पर्यावरणाचे स्वरंक्षण व संवर्धन करण्याऐवजी या बहुराष्ट्रीय

कंपन्या मोठ्या प्रमाणावर जंगल तोड करीत आहे. पर्यावरणाचा संतुलन बिघडल्याने ग्लोबल वॉर्मिंग सारख्या अतिशय गंभीर समस्या ह्या जगासमोर उभ्या टाकल्या आहे.

### ६) पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पायाभूत सेवा ज्यामध्ये वीज, पाणीपुरवठा, रस्ते वाहतूक, संप्रेषण इ. क्षेत्रात गुंतवणूक करण्याची परवानगी दिली गेली होती. परंतु या कंपन्या याकडे दुर्लक्ष करत आहे. व जास्त नफा मिळवण्याच्या दृष्टीने ते विविध चैनीच्या वस्तू ज्यामध्ये वॉशिंग मशीन, संगणक, लॅपटॉप, मोटार, कार, इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असल्याचे दिसून येते. यामुळे पायाभूत व जनतेच्या मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष होऊन चैनीच्या वस्तूमधून जास्त नफा मिळवण्याचा प्रयन्त ह्या कंपन्या करीत आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) जागतिकीकरणाचे तोटे थोडक्यात सांगा?

## ८.२५ सारांश

आर्थिक सुधारणांच्या दिशेने उदारीकरण हे एक मोठे पाऊल आहे. मुळात याचा अर्थ अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप कमी करून बाजार व्यवस्थेवरील अवलंबित्व वाढवणे. कृषी, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रांवर उदारीकरणाचा चांगला परिणाम झाला आहे. कृषी क्षेत्रातील उदारीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार झाला आहे, ज्यामुळे उत्पादकांना कृषी माल आकर्षक किमतीत आणि ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत मिळणे सोपे झाले आहे. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाची पातळी वाढल्याने उत्पादकताही वाढली आहे. याशिवाय या क्षेत्रातील संशोधन आणि विकासावर भर देण्यात आला आहे. उदारीकरणानंतर उद्योगांची स्थितीही सुधारली आहे. औद्योगिक उत्पादनात वैविध्य आले आहे, परदेशातून उच्च तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा वाढली आहे. उदारीकरणाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम सेवा क्षेत्रावर दिसून येत आहे. सध्या या क्षेत्रातून सर्वाधिक जीडीपी येतो. सॉफ्टवेअर सेवा, पर्यटन सेवा, वैद्यकीय सेवा इत्यादींसाठी भारत हे एक आदर्श ठिकाण बनले आहे. बीपीओ या क्षेत्रातही भारत अग्रेसर आहे. परंतु या सकारात्मक परिणामांसोबतच उदारीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर काही आव्हानेही उभी केली आहेत. उदारीकरणाची प्रक्रिया स्वीकारल्यानंतर आपल्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी होत आहे. भारतातील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असल्याने देशभरातील प्रत्येक शेतकऱ्याकडे उदारीकरणाचा लाभ घेण्याची क्षमता नाही. आपले उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत आणि देशी उद्योग उद्ध्वस्त होत आहेत. विकसित देशांच्या तुलनेत कमी सोयी असलेल्या सेवा क्षेत्रातही पर्यटन क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. ऐतिहासिक सांस्कृतिक क्षेत्रातील महत्त्वाच्या स्थळांमध्ये प्रचंड क्षमता असूनही त्यांचा विकास होत नाही. त्याच वेळी, आपल्या अर्थव्यवस्थेवर बाह्य घटकांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे भारताला अद्याप उदारीकरणाचा योग्य फायदा घेता आलेला नाही.

नवीन आर्थिक सुधारणांचे मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे सुधारणांमुळे कोणत्याही उद्योग/ व्यापार/ व्यवसाय संस्थेला किंवा नवप्रवर्तकाला कोणताही उद्योग/ व्यापार/ व्यवसाय सुरू करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. याचा अर्थ असा होतो की, उत्पादनाच्या विविध घटकांना म्हणजेच उत्पादक, मालक आणि ग्राहक यांना त्याचे हित जोपासण्यासाठी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतात. औद्योगिक क्षेत्र, परकीय क्षेत्र (परकीय व्यापार, विनिमय दर) बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र, राजकोषीय क्षेत्र या सर्व क्षेत्रांमध्ये सरकारने उदारिकरणाचे धोरण स्वीकारली खाजगी उद्योगसंस्थाना भांडवली बाजारही खुला आणि मुक्त केला. १९९१ पासून परकीय भागभांडवलातील सहभाग ५१% किंवा त्यापेक्षा जास्त वाढविण्याला परवानगी दिली गेली. औद्योगिक क्षेत्र परवानमुक्त केले गेले. मक्तेदारी आणि व्यापार प्रतिबंध कायदा काढना टाकण्यात आला. त्याऐवजी भारतीय स्पर्धा आयोगाची स्थापना केली गेली. परकीय गुंतवणूकदारांना पायाभूत क्षेत्र खुले केले गेले. परकीय चलन विनिमय कायदा (FERA) सुधारून परकीय चलन व्यवस्थापन कायदा (FEMA) अस्तित्वात आला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणामुळे असमानतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आणि १९९१ मधील शीर्ष १०% लोकसंख्येच्या उत्पन्नाचा वाटा ३५% वरून २०१४ मध्ये ५७.१% इतका वाढला. त्याचप्रमाणे, तळाच्या 50% लोकांच्या उत्पन्नाचा वाटा १९९१ मध्ये २०.१% वरून कमी झाला. २०१४ मध्ये १३.१%. ग्रामीण जीवनमान, ग्रामीण रोजगार आणि शेतकरी आत्महत्येत वाढ झाल्यामुळेही टीका केली गेली आहे.

जागतिकीकरण हे नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे सूत्र आहे. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार कारणे होय. भारताने १९९१ - ९२ पासून नवीन आर्थिक धोरण राबवण्यास सुरवात केली आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रगतीच्या मार्गावर आहे व पुढील काळातही हा आर्थिक वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. जागतिकीकरणामुळे मुक्त स्पर्धा व नवीन तंत्रज्ञान यामुळे उत्पादन व उत्पादकता वाढविणे व संपूर्ण जगाची सलग एकच बाजारपेठ निर्माण करून वस्तू व सेवा यांची विक्री करणे हे जागतिकीकरणाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

जागतिकीकरणाचा भारताला काही प्रमाणात फायदा झाल्याचे दिसून येतो. जागतिकीकरणामुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये विदेशी व्यापाराला महत्वाचे स्थान निर्माण झाले. विदेशी व्यापारामुळे देशाच्या विकासाला चालना मिळाली. नवीन ज्ञान व अनुभवाच्या फ़ायद्याने भारताचा विदेशी व्यापार वाढला.

## ८.२६ प्रश्न

१. उदारीकरण म्हणजे काय ते सांगून भारतातील उदारीकरण स्पष्ट करा.

२. उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला झालेले फायदे लिहा.

३. उदारीकरणामुळे १९९१ नंतर झालेले बदल लिहा.

४. उदारीकरण होऊनही भारत मागे का ? सविस्तर माहिती लिहा.

५. उदारीकरण म्हणजे खासगीकरण नव्हे स्पष्ट करा.

६. खाजगीकरण म्हणजे काय ?

७. बँकाच्या खाजगीकरणांचे दुष्परिणाम स्पष्ठ करा.

८. शिक्षणाच्या खाजगीकरणांचे परिणाम स्पष्ट करा.

९. देशातील नोकरींचे खाजगीकरण एक गंभीर बाब आहे सविस्तर चर्चा करा.

१०. जागतिकीकरण म्हणजे काय ते सांगून जागतिकीकरणांच्या विविध व्याख्यांचा आढाव घ्या?

११. भारतातील जागतिकीकरणाचे वैशिष्ट्ये सांगा?

१२. जागतिकीकरणाची फायदे सांगा? जागतिकारणाच्या तोट्यांचा आढावा घ्या?

## ८.२७ संदर्भ


1. Social and Economic Problems in India, Naseem Azad, R Gupta Pub (2011)

2. Indian Society and Culture, Vinita Padey, Rawat Pub (2016)

3. Social Problems in India, Ram Ahuja, Rawat Pub (2014)

4. Faces of Feminine in Ancient, medivial and Modern India, Mandakranta Bose Oxford University Press

5. National Humana rights commission-disability Manual

6. Rural, Urban Migration : Trends, challenges & Strategies, S Rajagopalan, ICFAI- 2012

7. Regional Inequilities in India Bhat L SSSRD- New Delhi.

8. Urbanisation in India: Challenges, Opportunities & the way forward, I J Ahluwalia, Ravi Kanbur, P K Mohanty, SAGE Pub 2014)

9. The Constitution of India, P M Bakshi 2011

10. The Problems of Linguistic States in India, Krishna Kodesia Sterling Pub.

11. कराडे जगन :-'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' डॉयमण्ड पब्लिकेशनसदाशिव पेठ, पुणे-३०.

12. गायकवाड मुकुंद :-'जागतिकीकरण शाप नव्हे वरदान' कॉन्टीनेटल प्रकाशन,विजय नगर, पुणे-३०.

13. जाधव अपेक्षा :-'भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजन, निराली प्रकाशन, शिवाजी नगर, पुणे.

14. दत्त गौरव, महाजन अश्विनी :- 'भारतीय अर्थव्यवस्था' एस चन्द ॲण्ड कंम्पनी प्रा. लि. रामनगर, नई दिल्ली-११००५५

15. भागवत ॲण्ड ॲडमिरल :- 'जागतिकीकरण नविन गुलामगिरी' समता प्रकाशन, समता सैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाण पूल-लष्करी बाग, नागपूर-१६

16. जिभकाटे, शास्त्री :- स्थूल अर्थशास्त्राचे सिध्दान्त-१ विश्व पब्किास ॲण्ड डिस्टीब्यूटर्ट्स नागपूर-४४००३२

17. म्हारेके राहूलः-अर्थसंवाद त्रैमासिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, खंड ४४ अंक १ भारतीय, मृद्रणालय, शाहपुरी, कोल्हापूर-४३१२०४

18. साठे मधुसूदनः-'जागतिक अर्थकारण, नव्या जगाचे अर्थकारण' डायमण्ड पब्लिकेशन्स पुणे-३०

19. साठे मधुसूदनृ :-'भारताच्या आर्थिक समस्या भाग-५, आर्थिक सुधारणा आणि वाढ' डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे-३०

20. साठे मधुसूदन :-'जागतिक अर्थकारण : आशियातील अर्थव्यवस्था' डायमण्ड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे-३०

21. वावरे अनिलकुमार, :-'आंतरराष्ट्रिय अर्थशास्त्र' एज्युकेशनल पब्लिशर्स घाटगे लालासाहेब ॲण्ड डिस्टिब्यूटर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

22. लोकमत ई - पेपर मुंबई १२/०६/२०२०

23. www.bbc.com.in> 10 mar 2020

24. www.bbc.com.in> india.5189827915mar 2020,

25. M. dailyhunt.in> india> marathi> b.... १८ Dec २०१६ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

26. www.bbc.com.India. 53975746

27. Musselburgh co-op in crisis as privatisation bid fails

28. The Pursuit of Reason: The Economist 1843–1993. Harvard Business School Press. p. 946. ISBN 0-87584-608-4.

29. पंडित नलिनी, जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००४

30. बिपीनचंद्र ,मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी, आझादी के बाद का भारत (१९४७ - २००७), हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली विश्वविद्यालय, २०१५

31. घाटगे / वावरे अनिल, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, २०१०

32. व्यावसायिक पर्यावरण, (Study Material), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

33. जागतिकीकरण आणि समाज,(Study Material), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

34. Datt Ruddar, Economic Reforms in India, S. Chand, Mumbai 1997


*********

# ९

# मंडल आयोग आणि आरक्षणाचा मुद्दा

**घटक रचना**

९.० उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ मागासवर्गीयांचा मुद्दा: पार्श्वभूमी

९.३ मंडल आयोगाचा अहवाल

९.४ मंडल आयोगाचा तपशील

९.५ मंडल आयोगाच्या शिफारसी

९.६ मंडल आयोग प्रकरण

९.७ मंडल आयोग स्थापन करण्यामागील कारणे

९.८ मंडल आयोगाचे फायदे व तोटे

९.९ मंडल आयोगाचा प्रभाव

९.१० सारांश

९.११ प्रश्न

९.१२ संदर्भ

## ९.० उद्दिष्ट्ये

हे युनिट पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होतील:

१. मागासवर्गीय समुदायांच्या उन्नतीसाठी सकारात्मक कृती (affirmative action) व आरक्षणाची गरज

२. मागासवर्गीयांचे ओळख व कल्याण यासाठी जे भारतीय संविधानातील कलम ३४० आहे त्याबाबत माहिती

३. उच्च शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण धोरणाचा प्रभाव

४. जातिवादी आरक्षण विरुद्ध आर्थिक आधारित आरक्षणाचे फायदे व तोटे

५. आरक्षण व सामाजिक न्याय संदर्भातील विविध आयोग, धोरणे व घटना दुरुस्ती

६. आरक्षण धोरणांनी भारतीय राजकारणावर घडवलेले परिणाम, आंदोलन, सुधारणा

## ९.१ प्रस्तावना

मंडल आयोग, ज्याला अधिकृतपणे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय आयोग (SEBC) असे म्हटले जाते, याची स्थापना १ जानेवारी १९७९ रोजी भारत सरकारने तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली केली. या आयोगाचे अध्यक्ष संसद सदस्य बिंधेश्वरी प्रसाद मंडल होते. या आयोगाला भारतातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय (SEBCs) वर्गांचे अध्ययन व ओळख पटविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

मंडल आयोगाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे भारतीय समाजात अस्तित्वात असलेल्या जातिनिर्मित विषमता व भेदभावाचे मूल्यांकन करणे आणि मागासवर्गीयांसाठी शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाच्या स्वरूपात उपाययोजना सुचवणे हे होते. आयोगाने विस्तृत संशोधन केले, माहिती संकलित केली आणि विविध सामाजिक व आर्थिक घटकांचे विश्लेषण करून वेगवेगळ्या समुदायांच्या मागासलेपणाचा निर्धार केला.

सुमारे दोन वर्षांच्या सखोल अभ्यासानंतर मंडल आयोगाने आपला सविस्तर अहवाल ३१ डिसेंबर १९८० रोजी भारताच्या राष्ट्रपतींकडे सादर केला. या अहवालात इतर मागासवर्गीयांसाठी (OBCs) सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षण देण्याची शिफारस केली होती, जेणेकरून वंचित समुदायांना सशक्त व सक्षम बनवता येईल. मंडल आयोगाच्या या शिफारसींनी भारताच्या सकारात्मक कृती धोरणाला आकार देण्यात आणि जातीनिर्मित ऐतिहासिक विषमता दूर करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## ९.२ मागासवर्गीयांच्या प्रश्नाची पार्श्वभूमी

भारतात जातीनिहाय आरक्षणाची संकल्पना ही ऐतिहासिकदृष्ट्या फार जुनी आहे. ही कल्पना प्रथम १८८२ मध्ये विल्यम हंटर आणि ज्योतिराव फुले यांनी मांडली होती. त्यांनी सामाजिक व शैक्षणिक स्तरावर मागे पडलेल्या समुदायांसाठी विशेष तरतुदी असाव्यात, असा आग्रह धरला होता. १९०९ मधील मिंटो-मॉर्ले सुधारणा आणि त्यानंतर १९१९ च्या भारत सरकार कायद्यात जातिनिहाय प्रतिनिधित्वाची तत्त्वे समाविष्ट करण्यात आली, ज्यामुळे भविष्यातील आरक्षण धोरणांचा पाया घातला गेला.

१९३३ मध्ये ब्रिटनचे पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी जाहीर केलेल्या जातीय निवड्याद्वारे अनुसूचित जातींसह विविध समुदायांसाठी स्वतंत्र मतदारसंघ व आरक्षणाची तरतूद करण्यात आली. मात्र, या निर्णयाला महात्मा गांधी यांनी तीव्र विरोध केला. परिणामी, पूना करार झाला ज्याद्वारे स्वतंत्र मतदारसंघ रद्द करून अनुसूचित जातींसाठी सामान्य मतदारसंघातच आरक्षित जागा राखण्यात आल्या.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समुदायांच्या सक्षमीकरणासाठी सकारात्मक कृती धोरणे (affirmative action policies) राबविण्यात

आली. १९५० मध्ये स्वीकारलेल्या भारतीय संविधानात अनुसूचित जाती (SCs) व अनुसूचित जमातींना (STs) शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात आले, जेणेकरून शतकानुशतके चालत आलेल्या भेदभावावर मात करता येईल. मात्र, इतर मागासवर्गीय (OBC) समुदायांचे प्रश्न फारसे हाताळले गेले नाहीत. SC आणि ST यांना सामाजिक बहिष्कृततेचा सामना करावा लागत होता, तर OBC वर्ग आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागे होता पण त्यांना अधिकृत मान्यता आणि सुविधा मिळत नव्हत्या.

ही दरी भरून काढण्यासाठी १९५३ मध्ये पहिला मागासवर्गीय आयोग, ज्याला कळेलकर आयोग म्हणून ओळखले जाते, स्थापन करण्यात आला. या आयोगाचे अध्यक्ष काका कळेलकर होते. आयोगाने व्यापक सर्वेक्षण केले आणि १९५५ च्या अहवालात २,३९९ मागास गटांची नोंद केली, त्यातील ८३७ गट अत्यंत मागास म्हणून वर्गीकृत करण्यात आले. जात हा मागासलेपणाचा मुख्य निकष होता, त्यासोबत सामाजिक व आर्थिक घटकांचाही विचार केला गेला. तरीही, केंद्र सरकारने आयोगाच्या शिफारसी नाकारल्या कारण त्या जातिनिहाय भेद वाढवतील असे सरकारचे मत होते.

परंतु समाजात अद्यापही चालू असलेल्या सामाजिक-आर्थिक विषमतेची जाणीव झाल्याने, सरकारने १४ ऑगस्ट १९९३ रोजी सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत OBC समुदायाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक घटनात्मक संस्था स्थापन केली. या प्रक्रियेत मंडल आयोगाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मंडल आयोगाच्या शिफारसी १९९१ मध्ये लागू करण्यात आल्या, ज्याद्वारे OBC समुदायासाठी सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षण लागू करण्यात आले. हे पाऊल भारताच्या आरक्षण धोरणात एक महत्त्वपूर्ण वळण ठरले आणि SC व ST पलीकडील वंचित जातीय गटांसाठीही सशक्तीकरणाची दारे खुली झाली.

## ९.३ मंडल आयोगाचा अहवाल

दुसरा मागासवर्गीय आयोग, ज्याला सामान्यतः मंडल आयोग म्हणून ओळखले जाते, तो भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४० अंतर्गत १९७९ मध्ये मोरारजी देसाई सरकारने स्थापन केला होता. या आयोगाचा प्रमुख उद्देश म्हणजे भारतातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांचा (SEBC) सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्तराचा अभ्यास करून त्यांच्यासाठी योग्य शिफारसी करणे हा होता. या आयोगाचे अध्यक्ष संसद सदस्य बिंदेश्वरी प्रसाद मंडल होते, म्हणून याला "मंडल आयोग" असे नाव मिळाले.

या आयोगाने संपूर्ण देशभर सर्वेक्षण व विश्लेषण केल्यानंतर १९८० मध्ये आपला अंतिम अहवाल सादर केला. या अहवालात ३,७४३ जाती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे नमूद करण्यात आले, ज्या भारतीय लोकसंख्येच्या सुमारे ५२% भागाचे प्रतिनिधित्व करतात (अनुसूचित जाती व जमाती वगळून). या अहवालात शिक्षण, नोकरी व सामाजिक चढाओढीच्या बाबतीत जातिनिहाय असमानता खोलवर रुजलेली असल्याचे स्पष्ट झाले.

**मंडल आयोगाच्या मुख्य शिफारसी:**

मंडल आयोगाची सर्वात महत्त्वाची शिफारस म्हणजे इतर मागासवर्गीय (OBC) समुदायासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये २७% आरक्षण लागू करणे. यामध्ये सर्व मागासवर्गीयांना योग्य प्रतिनिधित्व व संधी मिळाव्यात, असा उद्देश होता. या आरक्षणासह अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) व OBC यांचे एकत्रित आरक्षण एकूण ५०% इतके होते, जे घटनात्मक मर्यादेत राहते.

मात्र, या शिफारसी त्वरित लागू झाल्या नाहीत. १९९० मध्ये पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने OBC साठी २७% आरक्षण जाहीर केले, ज्यामुळे देशभरात राजकीय व सामाजिक चर्चेला सुरुवात झाली. अनेकांनी या निर्णयाचे स्वागत केले व सामाजिक न्यायाचा विजय मानला, तर काही ठिकाणी विशेषतः उच्चवर्णीयांमध्ये याला विरोध झाला, कारण त्यांना नोकरीच्या संधी कमी होतील, अशी भीती वाटत होती.

**१९९१ मध्ये नरसिंह राव सरकारकडून सुधारणा:**

१९९१ मध्ये नरसिंह राव सरकारने आरक्षण धोरणात दोन महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या:

**१. OBC आरक्षणात आर्थिक निकष:**

२७% OBC आरक्षणाच्या अंतर्गत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अधिक प्राधान्य देण्यात आले, जेणेकरून आरक्षणाचा फायदा फक्त सधन OBC लोकांपर्यंत मर्यादित राहू नये. यामुळे खऱ्या अर्थाने गरजू आणि वंचित घटकांपर्यंत आरक्षण पोहोचवण्याचा प्रयत्न झाला.

**२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल सवर्णांसाठी (EWS) आरक्षण:**

विद्यमान आरक्षण धोरणाव्यतिरिक्त, उच्चवर्णीय पण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये १०% आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. यामुळे जातीपेक्षा आर्थिक गरजा अधोरेखित करून सामाजिक न्यायाचा विस्तार करण्यात आला.

मंडल आयोगाच्या शिफारसींच्या अंमलबजावणीनंतर भारतातील सामाजिक न्यायाच्या चौकटीत मोठा बदल घडून आला. या निर्णयामुळे आरक्षण धोरणाची व्याप्ती केवळ SC-ST पर्यंत मर्यादित न राहता OBC व नंतर EWS पर्यंतही वाढवण्यात आली. जरी या निर्णयाला काही ठिकाणी तीव्र विरोध झाला, तरीही मंडल आयोगाचा प्रभाव आजही भारताच्या शैक्षणिक व रोजगार धोरणात खोलवर रुजलेला आहे, आणि जातनिहाय आरक्षण तसेच आर्थिक समावेश या विषयावर सुरू असलेली चर्चा याच पार्श्वभूमीवर आधारित आहे.

## ९.४ मंडल आयोग: मागास वर्ग ओळखण्यासाठीचे निकष

मंडल आयोगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC), ज्यांना इतर मागासवर्गीय (OBC) म्हणूनही ओळखले जाते, यांची ओळख पटवण्यासाठी एक सुसंगत व व्यापक चौकट तयार केली. वर्गीकरणामध्ये प्रणालीबद्धता आणि निष्पक्षता राखण्यासाठी

आयोगाने ११ विशिष्ट निकष ठरवले, जे तीन मुख्य गटांमध्ये विभागले गेले: सामाजिक निर्देशक, शैक्षणिक निर्देशक आणि आर्थिक निर्देशक.

**प्रत्येक निर्देशकाला विशिष्ट गुण दिले गेले:**

सामाजिक निर्देशक – ३ गुण

शैक्षणिक निर्देशक – २ गुण

आर्थिक निर्देशक – १ गुण

या निर्देशकांच्या आधारे एकूण गुण मोजले गेले आणि ज्या जातींना किमान ११ गुण मिळाले, त्यांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग म्हणून घोषित करण्यात आले.

**१. सामाजिक निर्देशक (प्रत्येकी ३ गुण)**

या निकषांमधून समाजात त्या जातीची स्थिती व इतर समुदायांकडून त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी यांचा अभ्यास केला गेला:

**जात किंवा वर्गाविषयीची धारणा:** जी जात इतर समुदायांकडून सामाजिकदृष्ट्या मागास समजली जाते.

**शारीरिक श्रमावर अवलंबित्व:** ज्या जाती किंवा वर्गांचा उपजीविकेचा मुख्य स्रोत शारीरिक श्रम आहे.

**ग्रामीण भागातील अल्पवयीन विवाह:** जर वयाच्या १७ वर्षांखाली लग्न होणाऱ्या मुलांचा टक्का राज्याच्या सरासरीपेक्षा किमान १०% अधिक आणि मुलींचा टक्का किमान २५% अधिक असेल.

**शहरी भागातील अल्पवयीन विवाह:** मुलांचा टक्का सरासरीपेक्षा ५% अधिक आणि मुलींचा १०% अधिक असल्यास.

**काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण:** जर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा २५% अधिक असेल.

**२. शैक्षणिक निर्देशक (प्रत्येकी २ गुण):**

या निर्देशकांमधून जातींची शैक्षणिक प्रगती आणि शालेय गळतीचे प्रमाण तपासले गेले:

**शाळेत न गेलेली मुले:** वय ५ ते १५ दरम्यान जी मुले कधीच शाळेत गेली नाहीत, त्यांचा टक्का राज्याच्या सरासरीपेक्षा २५% अधिक असेल.

**उच्च गळती दर:**

५ ते १५ वयोगटातील शालेय गळतीचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा २५% अधिक असेल.

दहावी उत्तीर्णांचे कमी प्रमाण: त्या जातीतील दहावी पास उमेदवारांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा २५% कमी असेल.

**३. आर्थिक निर्देशक (प्रत्येकी १ गुण):**

या निर्देशकांमधून जातींची आर्थिक स्थिती व जीवनमान तपासले गेले:

**कुटुंबाच्या संपत्तीचे कमी मूल्य:** कुटुंबाच्या मालमत्तेचे सरासरी मूल्य राज्याच्या सरासरीपेक्षा २५% कमी असल्यास.

**निकृष्ट निवास व्यवस्था:** कुचाबांधीत (कच्च्या) घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा २५% अधिक असल्यास.

**उपभोगासाठी घेतलेले कर्ज:** अशा कुटुंबांचे प्रमाण ज्यांनी उपभोगासाठी कर्ज घेतले आहे, जर ते राज्याच्या सरासरीपेक्षा २५% अधिक असेल.

**मागास वर्गाचे अंतिम वर्गीकरण:**

एकदा सर्व माहिती संकलित व विश्लेषित झाल्यानंतर, हे ११ निर्देशक राज्यातील प्रत्येक जातिपर आधारित लागू करण्यात आले. ज्या जातींना एकूण ११ गुण किंवा त्याहून अधिक गुण मिळाले, त्यांना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग (SEBC) म्हणून अधिकृतपणे मान्यता देण्यात आली.

ही शास्त्रीय व आकड्यांवर आधारित पद्धत मंडल आयोगाला यामध्ये मदत झाली की, कोणत्या जातींना खरोखरच आरक्षणासारख्या सवलतींची गरज आहे हे वस्तुनिष्ठपणे ठरवता येईल. यामुळे केवळ सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या गंभीर अडचणीत असलेल्या समुदायांनाच शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळेल, असा आयोगाचा उद्देश होता . यामध्ये कोणताही पक्षपात किंवा मनमानी टळली.

**आपली प्रगती तपासा:**

१. मंडल आयोगाचे निर्देशक काय होते?

## ९.५ मंडल आयोगाच्या शिफारसी

मंडल आयोगाने व्यापक अभ्यास करून निष्कर्ष काढला की भारताच्या लोकसंख्येपैकी सुमारे ५२% लोकसंख्या इतर मागासवर्गीय (OBC) गटातील आहे. सुरुवातीला आयोगाने सरकारी सेवांमध्ये आरक्षण ही टक्केवारी लक्षात घेऊनच द्यावी अशी शिफारस केली. मात्र, याला कायदेशीर मर्यादा होती, कारण सर्वोच्च न्यायालयाच्या एका आधीच्या निर्णयानुसार सार्वजनिक नोकरी व शिक्षणामध्ये आरक्षणाचे एकूण प्रमाण ५०% पेक्षा अधिक असू शकत नाही असे ठरवले गेले होते.

त्या काळात अनुसूचित जाती (SC) साठी १५% व अनुसूचित जमाती (ST) साठी ७.५% अशा एकूण २२.५% आरक्षणाची अंमलबजावणी आधीच सुरू होती. त्यामुळे सर्वोच्च

न्यायालयाच्या ५०% मर्यादेचे पालन करताना OBC समुदायाला २७% आरक्षण देण्याची शिफारस मंडल आयोगाने केली. त्यामुळे एकूण आरक्षणाचा टक्का ४९.५% झाला.

मंडल आयोगाने हेही लक्षात घेतले की सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा फक्त हिंदू धर्मापुरता मर्यादित नाही. त्यामुळे मुस्लिम, ख्रिश्चन, शीख आणि इतर अल्पसंख्याक धर्मीय मागासवर्गीयांनाही आरक्षणाचा लाभ द्यावा असे आयोगाने नमूद केले.

**मंडल आयोगाच्या मुख्य शिफारसी:**

**१. सरकारी नोकऱ्या व सार्वजनिक क्षेत्रातील आरक्षण:**

OBC उमेदवारांसाठी २७% आरक्षण, जे सामान्य गुणवत्ता यादीत पात्र ठरणार नाहीत. OBC समुदायाचे सरकारी सेवांमध्ये प्रतिनिधित्व वाढवणे हा यामागचा उद्देश होता.

**२. पदोन्नतीत आरक्षण:**

सार्वजनिक क्षेत्रातील सर्व स्तरांवर OBC उमेदवारांसाठी २७% प्रोन्नती आरक्षण होते. यामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना नोकरीत प्रगतीची संधी मिळणार होती.

**३. रिक्त असलेली आरक्षित जागा पुढे नेण्याचे धोरण (Carry-Forward Rule):**

OBC साठी आरक्षित जागा भरल्या गेल्या नाहीत, तर त्या ३ वर्षांपर्यंत पुढे नेण्याची परवानगी यात अंतर्भूत होती. तीन वर्षांनंतरही रिक्त राहिल्यास, त्या जागा इतर पात्र उमेदवारांना देण्याची तरतूद यात अंतर्भूत होती.

**४. OBC उमेदवारांसाठी वयोमर्यादेत सवलत:**

स्पर्धा परीक्षांमध्ये वयोमर्यादेत सवलत, जी SC/ST उमेदवारांना मिळते तशीच OBC साठी लागू करावी. यामागे उद्देश असा होता की OBC उमेदवारांना शिक्षण व आर्थिक अडचणींचा फटका भरून काढता यावा.

**५. यादी (रॉस्टर) प्रणालीची अंमलबजावणी:**

SC/ST साठी जशी रॉस्टर प्रणाली आहे, तशीच OBC साठीही रॉस्टर प्रणाली विकसित करावी. यामुळे सर्व विभागांमध्ये आरक्षणाची अंमलबजावणी नीट व पारदर्शकपणे होईल.

**६. शिक्षण व खाजगी संस्थांमध्ये आरक्षण:**

OBC साठी आरक्षणाचा विस्तार खालील क्षेत्रात करावा:

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs), बँका, सरकारकडून अनुदानित खाजगी संस्था, महाविद्यालये व विद्यापीठे

**७. कायदेशीर तरतुदी:**

या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने आवश्यक कायदे किंवा घटनादुरुस्त्या कराव्यात. यामुळे OBC समुदायाच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित होईल.

**परिणाम व अंमलबजावणी:**

१९९० साली व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. त्यानंतर देशभरात तीव्र आंदोलने व सामाजिक-राजकीय चर्चा सुरू झाली. तरीही या निर्णयामुळे भारताच्या सामाजिक न्याय धोरणांमध्ये ऐतिहासिक बदल घडला.

मंडल आयोगाचे कार्य SC/ST पलीकडे जाऊन OBC समुदायासाठी आरक्षण लागू करण्याचे प्रथम पाऊल ठरले, जे जातीय विषमतेवर मात करणारे ठरले. त्यामुळे शिक्षण व रोजगारामध्ये मागासवर्गीय समुदायांचे प्रतिनिधित्व वाढण्याचा मार्ग मोकळा झाला.

**आपली प्रगती तपासा**

१. मंडल आयोगाच्या शिफारसी काय होत्या?

## ९.६ मंडल आयोग प्रकरण: इंद्रा साहनी खटला (१९९२)

इंद्रा साहनी प्रकरण (१९९२), ज्याला सामान्यतः मंडल प्रकरण म्हणून ओळखले जाते, हे भारताच्या आरक्षण धोरणाचे स्वरूप निश्चित करणारे एक ऐतिहासिक न्यायालयीन प्रकरण होते. या खटल्यात भारतीय राज्यघटनेच्या कलम १६(४) च्या कक्षेची व मर्यादेची तपासणी करण्यात आली. हे कलम सरकारला सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गासाठी सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची परवानगी देते.

हा खटला मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणी विरोधात विशेषतः OBC साठी २७% आरक्षण या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला होता. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की जातीवर आधारित आरक्षण हे राज्यघटनेतील कलम १४ मध्ये नमूद केलेल्या समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन करते, आणि सरकारने आपले घटनात्मक अधिकार ओलांडले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्णय (इंद्रा साहनी प्रकरणात)

**१. OBC साठी २७% आरक्षण वैध ठरवले:**

सर्वोच्च न्यायालयाने OBC साठी २७% आरक्षण वैध ठरवत सरकारला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी आरक्षण देण्याचा अधिकार आहे, असे मान्य केले. न्यायालयाने स्पष्ट केले की जात हा मागासलेपणाचा निकष असू शकतो, मात्र आर्थिक निकषालाही महत्त्व दिले पाहिजे.

**२. सामान्य वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १०% अतिरिक्त आरक्षण नाकारले:**

नरसिंह राव सरकारने (१९९१) उच्चवर्णीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण जाहीर केले होते. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय रद्द केला, असे सांगितले की फक्त आर्थिक निकषावर आरक्षण दिले जाऊ शकत नाही. आरक्षणाचा उद्देश केवळ आर्थिक दुर्बलतेचे नव्हे तर ऐतिहासिक आणि सामाजिक भेदभावाचे निराकरण करणे असा असतो.

**३. एकूण आरक्षण मर्यादा ५०% निश्चित केली:**

न्यायालयाने स्पष्ट केले की एकूण आरक्षण ५०% पेक्षा जास्त नसावे, जेणेकरून कलम १४ मधील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन होणार नाही. SC/ST साठी २२.५% आणि OBC साठी २७% यामुळे एकूण आरक्षण ४९.५% होते, जे कायदेशीर मर्यादेत येते.

**४. 'क्रीमी लेयर' वगळण्याची अट:**

न्यायालयाने 'क्रीमी लेयर' संकल्पना मांडली, म्हणजे OBC मधील आर्थिकदृष्ट्या प्रगत घटकांना आरक्षण लाभ देऊ नये. खऱ्या गरजू व मागास घटकांपर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचावा, हा या निर्णयामागचा हेतू होता. सरकारला 'क्रीमी लेयर' ओळखण्याचे निकष ठरवण्याचे निर्देश देण्यात आले.

**५. पदोन्नतीत आरक्षण नाकारले:**

न्यायालयाने सांगितले की कलम १६(४) फक्त प्रारंभिक नियुक्त्यांपर्यंत मर्यादित आहे, त्यामुळे पदोन्नतीत आरक्षण OBC साठी वैध नाही. मात्र, नंतर घटनादुरुस्त्यांद्वारे काही अटींसह पदोन्नतीत आरक्षण लागू करण्याची परवानगी देण्यात आली.

**इंद्रा साहनी निर्णयाचा परिणाम:**

या खटल्यामुळे OBC आरक्षणाची वैधता मजबूत झाली आणि आरक्षणाच्या मर्यादा ठरल्या. 'क्रीमी लेयर' वगळल्यामुळे आरक्षण हे अधिक लक्ष्यित व न्याय्य झाले. प्रोन्नतीत आरक्षण मर्यादित केल्यामुळे कारकीर्दीतील अन्यायकारक लाभ टाळले गेले. हा निर्णय भारतातील भावी आरक्षणविषयक खटल्यांसाठी न्यायनिवाड्याचा आधार ठरला. ही ऐतिहासिक निकालपत्रिका भारताच्या सामाजिक न्याय धोरणात एक प्रमुख खूण ठरली, जी सामाजिक न्याय आणि गुणवत्ता या दोहोंमध्ये संतुलन राखते आणि घटनात्मक मर्यादा सुनिश्चित करते.

## ९.७ मंडल आयोग स्थापनेची कारणे

भारताच्या दीर्घ इतिहासात जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेमुळे गंभीर सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण झाली. शतकानुशतके, विशेषतः नीच समजल्या जाणाऱ्या जातींना शिक्षण, नोकरी व राजकीय सहभाग यापासून दूर ठेवण्यात आले. या खोलवर रुजलेल्या अन्यायाविरुद्ध उपाययोजना म्हणून भारत सरकारने शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण, तसेच राजकीय प्रतिनिधित्व यांसारखी सकारात्मक कृती धोरणे (affirmative action policies) राबवली.

मंडल आयोग हे या व्यापक प्रयत्नांचा एक भाग होता, ज्याचा उद्देश सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBCs) ओळखणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे हा होता. यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समाजघटकांना संधी आणि प्रतिनिधित्व मिळवून देणे शक्य होईल.

**मंडल आयोग स्थापन करण्यामागील महत्त्वाची कारणे:**

**१. ऐतिहासिक भेदभावाचे निवारण:**

जातिव्यवस्थेमुळे अनेक शतकांपासून काही समाजघटकांवर अन्याय झाला, त्यांना शिक्षण, नोकरीसारख्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले गेले. या भेदभावामुळे आर्थिक व सामाजिक मागासलेपणा वाढला. मंडल आयोगाचा उद्देश या वंचित घटकांना ओळखून त्यांच्यासाठी विकासात्मक उपाय सुचवणे हा होता.

**२. सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची अंमलबजावणी:**

भारतीय राज्यघटना सामाजिक न्याय व समानता यांना मूलभूत तत्त्व मानते. कलम १५(४) व १६(४) सरकारला मागास वर्गासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देतात. मंडल आयोगाची स्थापना ही राज्यघटनेतील सामाजिक न्यायाच्या वचनबद्धतेचे पालन होती.

**३. आरक्षण धोरणांचा विस्तार:**

स्वातंत्र्यपूर्व काळात आरक्षणाचा लाभ फक्त अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांनाच मिळत असे. मात्र इतर अनेक सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास समुदाय (आता OBC म्हणून ओळखले जातात) हेही वंचित होते. मंडल आयोगाने या गटांची ओळख करून त्यांना आरक्षणाच्या कक्षेत आणण्याचे कार्य केले.

**४. शिक्षण व नोकरीत समान संधी देणे:**

चांगल्या शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये मुख्यतः उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. आरक्षणाचे उद्दिष्ट गरजूंना समान संधी देणे व स्पर्धा सुलभ करणे हे होते. सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये मागास वर्गांचे प्रतिनिधित्व वाढवून आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**५. सामाजिक विषमता कमी करणे व सामाजिक चळवळीला चालना देणे:**

मागास वर्गांमध्ये सामाजिक व आर्थिक चळवळ (mobility) मर्यादित होती. मंडल आयोगाच्या २७% आरक्षणाच्या शिफारशीने, या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. यामागचा मुख्य हेतू होता की जात ही संधी ठरवणारा निकष राहू नये, आणि एक समावेशक व न्याय्य समाजव्यवस्था निर्माण व्हावी.

**६. राजकीय प्रतिनिधित्व बळकट करणे:**

अनेक मागास समुदाय राजकीयदृष्ट्या अप्रतिनिधीत राहिले होते, त्यामुळे त्यांच्या हिताचे निर्णय घेणे कठीण होते. मंडल आयोगाने राजकीय सहभागाची गरजही अधोरेखित केली, जेणेकरून वंचित घटकांचे प्रश्न धोरणांमध्ये प्राधान्याने येतील. मंडल आयोगाची स्थापना ही भारतातील जातीय विषमता कमी करण्याच्या प्रयत्नांतील एक महत्त्वपूर्ण पाऊल होती. या आयोगाने आरक्षण धोरण OBC पर्यंत विस्तारित करून सामाजिक व शैक्षणिक समतेच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला. आरक्षण व्यवस्था ही आजही समाजातील वंचित

घटकांसाठी शिक्षण, रोजगार व प्रतिनिधित्व मिळवण्याचे प्रभावी साधन ठरते, आणि भारताच्या प्रगल्भ होत असलेल्या लोकशाहीत समतेचा पाया मजबूत करते.

**आपली प्रगती तपासा**

१) मंडल आयोग स्थापनेची कारणे स्पष्ट करा.

## ९.८ मंडल आयोगाचे फायदे व तोटे

मंडल आयोग हा भारताच्या आरक्षण धोरणांची दिशा निश्चित करणारा एक ऐतिहासिक टप्पा होता. त्याने जातीय विषमतेविरुद्ध लढा देत वंचित घटकांना संधी देण्याचे कार्य केले, परंतु त्याच्या अंमलबजावणीमुळे सामाजिक सलोखा, आर्थिक न्याय व प्रशासनिक कार्यक्षमता यासंदर्भात विविध वादही निर्माण झाले.

**मंडल आयोगाचे फायदे:**

**१. सामाजिक न्यायाची अंमलबजावणी:**

मंडल आयोगाचा मुख्य उद्देश म्हणजे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांना (SEBCs) समान संधी उपलब्ध करून देणे. OBC साठी २७% आरक्षणाची शिफारस करून त्यांना शिक्षण, नोकरी व प्रशासनातील सहभाग मिळवून देणे हे हेतू होते. हा निर्णय कलम १४ (समानता) व कलम १५, १६ (सामाजिक न्याय) यांना पूरक होता.

**२. मागासवर्गीयांचे राजकीय सशक्तीकरण:**

मंडल आयोगाच्या अहवालामुळे OBC समाजात राजकीय जागरूकता निर्माण झाली. प्रादेशिक पक्ष उदयास आले, ज्यांनी मागास वर्गीय अधिकारांसाठी आवाज उठवला. यामुळे राजकारणात उच्चवर्णीयांचा एकाधिकार संपुष्टात आला व वंचितांचे प्रतिनिधित्व वाढले.

**३. OBC समुदायाचा आर्थिक विकास:**

आरक्षणामुळे OBC समाजातील गरीब घटकांना सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संधी मिळाल्या. त्यामुळे अनेक कुटुंबांना दारिद्र्याच्या साखळीमधून बाहेर पडता आले. कालांतराने याचा उत्पन्न व जीवनमान सुधारण्यावर सकारात्मक परिणाम झाला.

**४. शिक्षण व रोजगारात प्रतिनिधित्व वाढले:**

आधी उच्चशिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये मुख्यतः उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. आरक्षणामुळे OBC साठी जागा राखीव ठेवल्याने कामाच्या ठिकाणी व शैक्षणिक संस्थांमध्ये समावेशकता वाढली. यामुळे नोकरशाही, न्यायपालिका व प्रशासकीय यंत्रणेत विविधता आली.

**५. जातीय भेदभाव कमी होणे व सामाजिक चळवळ:**

सरकारी सेवा व शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधित्वामुळे OBC समाजात सामाजिक प्रतिष्ठा वाढली. जातीय आधारित कलंक हळूहळू कमी झाला व मागास वर्ग मुख्य प्रवाहात सहभागी होऊ लागला. यामुळे जातीय विषमता कमी करण्यास मदत झाली.

**मंडल आयोगाचे तोटे:**

**१. जातीय ओळखी बळकट होणे:**

आरक्षण हे जातिवर आधारित असल्यामुळे, काही समीक्षकांचे म्हणणे आहे की यामुळे जात-पात अजून दृढ झाली. अनेक राजकीय पक्षांनी जातीय समीकरणांच्या आधारे मतं मागवायला सुरुवात केली, ज्यामुळे विकासाऐवजी जात हे निवडणुकीचे मुद्दे बनले. हे 'जातिविहीन समाज' या घटनात्मक संकल्पनेला धक्का पोहोचवते.

**२. आर्थिक निकषांची उपेक्षा:**

आयोगाने जात यावरून मागासलेपणाचा निकष ठरवला, आर्थिक स्थितीचा विचार फारसा केला गेला नाही. त्यामुळे गरीब उच्चवर्णीयांना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, तर काही सधन OBC कुटुंबांना लाभ मिळत राहिला. यावरून 'जात की आर्थिक स्थिती?' ही चर्चासुद्धा सुरू झाली.

**३. 'क्रीमी लेयर' संकल्पनेवर वाद:**

इंद्रा साहनी खटल्यात (१९९२) सर्वोच्च न्यायालयाने 'क्रीमी लेयर' म्हणजे आर्थिकदृष्ट्या सक्षम OBC घटकांना आरक्षणातून वगळण्याचा आदेश दिला. मात्र प्रत्यक्षात या नियमाची अंमलबजावणी एकसंध नाही, आणि काही संपन्न OBC लोक अजूनही लाभ घेत आहेत. यामुळे आरक्षणाचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत नाही.

**४. राज्यांमध्ये असमान अंमलबजावणी:**

काही राज्यांनी २७% आरक्षण तत्काळ लागू केलं, तर काहींनी उशिरा किंवा संशोधित स्वरूपात लागू केलं. यामुळे राज्यागणिक आरक्षणाचा लाभ वेगवेगळ्या प्रमाणात मिळू लागला, व त्यामुळे न्याय्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

**५. गुणवत्ता प्रणालीवर परिणाम:**

आरक्षणामुळे अनेकांच्या मते गुणवत्ता आधारित संधी कमी झाल्या, विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी व प्रशासकीय सेवा यासारख्या क्षेत्रांत. उर्वरित (जनरल) जागांसाठी स्पर्धा अधिक तीव्र झाली, ज्यामुळे अनेक पात्र उमेदवार वंचित राहतात.

**६. प्रतिक्रिया व सामाजिक अशांती:**

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे १९९० च्या दशकात तीव्र आंदोलनं व हिंसक निदर्शनं झाली. अनेक विद्यार्थ्यांनी आरक्षणाला विरोध केला आणि काहींनी आत्मदहनही केले, ज्यामुळे विषयाची सामाजिक गुंतागुंत अधोरेखित झाली.

मंडल आयोग हे भारतातील सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल होते. त्याने OBC समाजाला सक्षम केले, राजकीयदृष्ट्या जागृत केले व आर्थिकदृष्ट्या उन्नती दिली. मात्र जातीय ध्रुवीकरण, आर्थिक घटकांची उपेक्षा व गुणवत्ते बाबत प्रश्न यांमुळे वाद सुरूच राहिले आहेत. आजही आरक्षण धोरणांवर चर्चा सुरू आहे, आणि त्यासाठी एक संतुलित व सुधारित धोरण गरजेचे आहे, जे जात व आर्थिक स्थिती दोघांचाही विचार करेल, आणि सामाजिक न्यायासोबतच गुणवत्तेची जपणूक करेल.

**आपली प्रगती तपासा**

१. मंडल आयोगाचे फायदे व तोटे काय होते?

## ९.९ मंडल आयोगाचा प्रभाव

मंडल आयोगाच्या शिफारसींनी भारताच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रावर खोल आणि दीर्घकालीन प्रभाव टाकला. OBC (इतर मागासवर्गीय) समुदायासाठी सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षण लागू केल्याने संपूर्ण देशात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. उत्तर व पश्चिम भारतात हिंसक आंदोलने झाली, तर दक्षिण भारतात तुलनेने स्वीकार होता. १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या 'क्रीमी लेयर' संकल्पनेने धोरणात महत्त्वाचे बदल घडवून आणले. कालांतराने मंडल आयोगाचा प्रभाव फक्त नोकरी आरक्षणपुरता मर्यादित राहिला नाही, तर राजकीय समीकरण, सामाजिक गतिशीलता आणि भविष्यातील धोरण निर्मितीवरही त्याचा प्रभाव पडला.

**१. आरंभीच्या प्रतिक्रिया (१९९०–१९९३):**

**अ. उत्तर व पश्चिम भारतातील आंदोलन व असंतोष:**

१९९० मध्ये पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी लागू करण्याची घोषणा संसदेत केली. या निर्णयामुळे विशेषतः उत्तर व पश्चिम भारतात उच्चवर्णीयांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. शहरी मध्यमवर्गीय युवकांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले, कारण सरकारी नोकऱ्यांवर त्यांचा अधिक अवलंब होता. काही विद्यार्थ्यांनी आत्मदहन करून निषेध व्यक्त केला, ज्यामुळे अनेक मृत्यूमुखी आणि गंभीर जखमी झाले.

**ब. दक्षिण भारतातील सौम्य प्रतिक्रिया:**

तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि केरळ या राज्यांमध्ये प्रतिक्रिया तुलनेत शांत होत्या. याचे कारण म्हणजे या राज्यांमध्ये आधीच ५०% पर्यंत आरक्षण लागू करण्यात आले होते. इतिहासकार रामचंद्र गुहा यांच्या मते, दक्षिण भारतातील उच्चवर्णीयांचे प्रमाण १०% पेक्षा कमी, तर उत्तर भारतात २०% पेक्षा अधिक होते. शिवाय, दक्षिण भारतात खाजगी व औद्योगिक क्षेत्र विकसित असल्यामुळे, लोकांचा सरकारी नोकऱ्यांवरील अवलंब कमी होता.

### क. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय (१९९२) व पुढील अंमलबजावणी (१९९३):

१९९२ मध्ये इंद्रा साहनी खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने २७% OBC आरक्षण मंजूर केले, पण काही महत्त्वाचे बदल सुचवले:

आरक्षणाची एकूण मर्यादा ५०% पेक्षा जास्त नसावी. फक्त जात हा मागासलेपणाचा प्रश्न निकष असू शकत नाही; सामाजिक आणि आर्थिक घटकही विचारात घ्यावेत. 'क्रीमी लेयर' संकल्पना मांडली गेली, ज्यामुळे संपन्न OBC लोकांना आरक्षणातून वगळले गेले. १९९३ मध्ये पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची पुन्हा पुष्टी केली, आणि यावेळी सार्वजनिक विरोध बराचसा कमी झाला होता.

## २. राजकीय परिणाम:

### अ. जातीनिहाय राजकारणाचा उदय:

मंडल आयोगाने भारतीय निवडणूक राजकारणाचे स्वरूपच बदलून टाकले. समाजवादी पक्ष (SP), राष्ट्रीय जनता दल (RJD) सारख्या पक्षांनी OBC समुदायाचे समर्थन मिळवून सत्ता मिळवली. कॉंग्रेस व भाजप सारख्या राष्ट्रीय पक्षांनाही OBC नेत्यांना संधी देऊन आपली रणनीती बदलावी लागली.

### ब. प्रादेशिक पक्षांचे बळकटीकरण:

उत्तर भारतातील जनतेच्या पाठिंब्यामुळे जनतादलचे अनेक गट बळकट झाले. दक्षिण भारतात आधीपासूनच आरक्षण धोरण प्रभावी होते, त्यामुळे तिथे फारसा बदल झाला नाही.

### क. भविष्यातील आरक्षण धोरणांची निर्मिती:

मंडल आयोगामुळे आरक्षण धोरणाची एक चौकट तयार झाली, ज्यामुळे पुढील निर्णय घेतले गेले:

२०१९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) १०% आरक्षण लागू करण्यात आले. काही राज्यांनी खासगी शिक्षण संस्था व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण वाढवले.

## ३. सामाजिक व आर्थिक परिणाम:

### अ. शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये OBC प्रतिनिधित्वात वाढ:

कालांतराने OBC समाजाचे शैक्षणिक संस्था, सरकारी नोकऱ्या आणि प्रशासनात मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व वाढले. त्यामुळे शैक्षणिक प्रगती व आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले, व सामाजिक गतिशीलतेला चालना मिळाली.

### ब. 'क्रीमी लेयर' संकल्पना लागू करणे:

ही संकल्पना केवळ गरजू OBC लोकांनाच लाभ मिळावा या हेतूने मांडण्यात आली. मात्र राज्यानुसार अंमलबजावणीची पद्धत वेगळी आहे. काही राज्ये काटेकोरपणे नियम पाळतात, तर काहींमध्ये निकष सैल आहेत.

**क. नोकरीच्या प्रवाहात बदल:**

पूर्वी सरकारी नोकऱ्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी एकमेव मार्ग मानल्या जात होत्या. १९९० नंतर खाजगी क्षेत्रात संधी वाढल्यामुळे अनेक उच्चवर्णीय युवकांनी कॉर्पोरेट क्षेत्र व उद्योजकतेकडे वळणे सुरू केले.

**४. चालू विवाद व आव्हाने:**

**अ. इतर समाजघटकांकडून आरक्षणाची मागणी:**

OBC आरक्षणाच्या यशामुळे इतर समाजघटकांनीही समान लाभ मागितले:

हरियाणा व राजस्थानमध्ये जाट, महाराष्ट्रात मराठा, गुजरातमध्ये पटेल/पाटीदार,आंध्र प्रदेशात कापू. या मागण्यांमुळे आंदोलने व न्यायालयीन लढाया वाढल्या, कारण ५०% आरक्षण मर्यादेच्या उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित झाला.

**ब. गुणवत्ता व सामाजिक न्याय यांच्यात समतोल साधण्याचे आव्हान:**

समीक्षक म्हणतात की आरक्षणामुळे गुणवत्तेवर आधारित निवड कमी झाली आहे, विशेषतः UPSC, IITs आणि वैद्यकीय क्षेत्रात जात की आर्थिक स्थिती? हा वाद अजूनही सुरू आहे.

**क. आरक्षण सुधारणा आवश्यक:**

बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार आरक्षणाचे पुनरावलोकन आवश्यक आहे. काही तज्ज्ञ आर्थिक निकषावर आधारित आरक्षणाचे समर्थन करतात, तर काहीजण शिक्षण व कौशल्यविकास कार्यक्रमांना अधिक प्राधान्य देण्याचे सुचवतात.

मंडल आयोगाचे प्रभाव परिवर्तनकारी पण वादग्रस्त राहिले. यामुळे OBC समाज सशक्त झाला, त्यांचे प्रतिनिधित्व वाढले, आणि भारताचे राजकारण बदलले. पण त्याच वेळी जातीय ध्रुवीकरण, आंदोलन, आणि गुणवत्तेच्या मुद्द्यांवर वाद निर्माण झाले. आजही आरक्षण धोरण हे भारताच्या सामाजिक न्याय प्रणालीचे केंद्रबिंदू आहे. मात्र, पुनरावलोकन व सुधारणा अनिवार्य आहेत. सामाजिक न्याय, आर्थिक स्थिती आणि शैक्षणिक सक्षमीकरण यांच्यात संतुलन साधून खऱ्या गरजूंपर्यंत लाभ पोहोचवणे, आणि राष्ट्रीय प्रगतीसाठी गुणवत्तेची जपणूक करणे हे अत्यावश्यक ठरते.

**आपली प्रगती तपासा:**

१. मंडल आयोगाचे परिणाम काय होते?

## ९.१० सारांश

मंडल आयोग, ज्याला अधिकृतपणे दुसरा मागासवर्ग आयोग म्हणून ओळखले जाते, जानेवारी १९७९ मध्ये मोरारजी देसाई सरकारने स्थापन केले होते. या आयोगाची स्थापना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांची ओळख पटवून त्यांच्यासाठी प्रगतीची शिफारस करण्यासाठी करण्यात आली होती. बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या

अध्यक्षतेखालील या आयोगाचे उद्दिष्ट ऐतिहासिक जातीय भेदभाव दूर करणे आणि मागासवर्गीय समुदायांना शासकीय नोकऱ्यांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळवून देणे हे होते.

या आयोगाने मागासवर्ग ओळखण्यासाठी अकरा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक निकषांचा वापर करून सखोल अभ्यास केला. विस्तृत संशोधनानंतर, आयोगाने असे निष्कर्ष काढले की भारताच्या लोकसंख्येपैकी ५२% लोकसंख्या इतर मागासवर्ग (OBC) यामध्ये मोडते. म्हणूनच, त्यांनी शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण या प्रमाणात असावे अशी शिफारस केली, जेणेकरून OBC समुदायांना योग्य संधी मिळू शकतील.

तथापि, ही शिफारस १९६३ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत होती, ज्यामध्ये एकूण आरक्षणाची मर्यादा ५०% पर्यंत ठेवण्याचे निर्देश दिले होते, जेणेकरून आरक्षण व गुणवत्ता यामध्ये संतुलन राखता येईल. त्या काळात अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) साठी आधीच २२.५% आरक्षण होते, त्यामुळे अतिरिक्त आरक्षणासाठी मर्यादा होती.

७ ऑगस्ट १९९० रोजी, पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, ज्यामुळे भारताच्या सामाजिक न्यायाच्या आणि राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडून आला. या निर्णयानंतर देशभर तीव्र आंदोलनं व चर्चांना सुरुवात झाली, अनेकांनी असा युक्तिवाद केला की जात आधारीत आरक्षणाबरोबरच आर्थिक निकष विचारात घेणेही आवश्यक आहे.

विवाद असूनही, या शिफारशी अंशतः लागू करण्यात आल्या, आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये OBC साठी २७% आरक्षण लागू करण्यात आले. यामुळे SC, ST आणि OBC यांचे एकूण आरक्षण ४९% झाले, जे सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या ५०% मर्यादेपेक्षा थोडेसे कमी होते.

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे भारताच्या आरक्षण धोरणात मूलभूत बदल घडले, मागासवर्गीयांचे राजकीय संघटन वाढले आणि त्यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये तसेच शिक्षण क्षेत्रात अधिक प्रतिनिधित्व मिळाले. मात्र, अजूनही काही समस्या कायम आहेत – जसे की लाभांचा योग्य पद्धतीने वाटप, 'क्रीमी लेयर' चा प्रश्न, आणि जातीय व आर्थिक निकषांमध्ये संतुलन राखणे.

ही प्रणाली अधिक समावेशक आणि प्रभावी करण्यासाठी, धोरणकर्त्यांनी आरक्षणाबरोबरच अधिक शैक्षणिक संधी, आर्थिक प्रगतीसाठी कार्यक्रम आणि कौशल्यविकास उपक्रमांचा समावेश असलेले सुधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. आरक्षणासह समांतर सामाजिक-आर्थिक सुधारणा केल्यासच सामाजिक न्याय आणि समतोल विकासाचे ध्येय पूर्णतः साध्य होऊ शकते.

## ९.११ प्रश्न

१. मंडल आयोगाची स्थापना कशामुळे झाली?

२. मंडल आयोगाचे फायदे आणि तोटे काय होते?

३. मंडल आयोगावर सविस्तर लिहा.

## ९.१२ संदर्भ


1. डॉ. न. ग. पेंडसे – आरक्षणाचा सामाजिक इतिहास
2. प्रा. हरी नरके – मंडल आयोग: एक समाजशास्त्रीय अभ्यास
3. डॉ. रा. ग. जाधव – आरक्षण आणि सामाजिक समता
4. अनिल अवचट – जात, धर्म आणि आरक्षण
5. गोपाळ नारायण आवटे – भारतातील आरक्षणाची वाटचाल
6. दत्ता भगत – सामाजिक न्याय आणि मंडल आयोग
7. मंडल आयोग अहवाल (१९८०) – भारत सरकारचे प्रकाशन
8. मार्क गॅलंटर, Justice and Reservation in India
9. क्रिस्तोफ जैफ्रेलॉट, Caste, Reservation, and Politics in India
10. बी. के. नेहरू, Caste and Social Backwardness: The Mandal Commission and After
11. पी. आर. गोपीनाथन नायर, Caste and Reservation in India
12. मार्क गॅलंटर, Social Justice and Reservation in India
13. सुधीर कृष्णस्वामी, The Idea of Reservation: The Supreme Court in Public Debate
14. सुमित गुहा, Beyond Caste: Identity and Power in South Asia, Past and Present


*****

# १०

# हिंदू कोड बिल आणि महिला चळवळ

**घटक रचना**

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ प्रस्तावना

१०.२ डॉ. बाबासाहेबांचे स्त्रियांसाठी कार्य

१०.३ भारतीय हिंदू कोड बिल

१०.३.१ हिंदू कोड बिलामधील आठ अधिनियम

१०.३.२ हिंदू कोड बिलामधील ७ घटक

१०.४ इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे

१०.५ भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ (१९४७-२०००)

१०.५.१ सामाजिक सुधारणांचा परिणाम

१०.५.२ राष्ट्रीय चळवळीचा परिणाम

१०.५.३ स्वातंत्र्योत्तर कालखंड

१. स्वातंत्र्यानंतरची स्त्रीवादी चळवळ पुनर्जागरण

२. स्त्रियांच्या चळवळीची रचना

३. महिलांचा अभ्यास आणि महिलांच्या हालचाली: संवाद

४. सहभागी तंत्र

५. नवीन महिला गटांच्या कार्यपद्धती

६. महिला हक्क चळवळीचा राजकीय-सामाजिक-आर्थिक अजेंडा

७. नवीन महिला गटांनी घेतलेले मुद्दे

८. अन्यायकारक कौटुंबिक कायद्यांविरुद्ध लढा

९. कायदेविषयक सुधारणा

१०. महिलांचे पुनरुत्पादक अधिकार

११. दारूविक्रीच्या विरोधात लढा

१०.६ महिला चळवळ आणि विकास अजेंडा

१०.७ सामाजिक चळवळी आणि मुख्य प्रवाहातील राजकीय प्रक्रिया

१०.८ महिला सबलीकीकरणाकडे वाटचाल

१०.९ सारांश

१०.१० प्रश्न

१०.११ संदर्भ

## १०.० उद्दिष्ट्ये

हे युनिट पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होतील:

१. हिंदू कोड बिलाच्या तरतुदींचे विश्लेषण करतील.

२. हिंदू कोड बिलाच्या समर्थन आणि विरोधाचे मूल्यमापन करतील.

३. हिंदू कोड बिलावरील भिन्न वैचारिक प्रवाह आणि वादविवादांची गंभीरपणे ओळख होईल.

४. समकालीन भारतातील स्त्रियांच्या चळवळीद्वारे लैंगिक पूर्वाग्रहांना कसे आव्हान दिले जाते याचे विश्लेषण करतील.

५. विविध वैचारिक प्रवाह आणि वादविवाद गंभीरपणे ओळखतील.

६. भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीवरील सामाजिक सुधारणांचा आणि राष्ट्रीय चळवळीचा परिणाम स्पष्ट करतील.

७. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे मूल्यांकन करतील.

## १०.१ प्रस्तावना

भारतात प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती रूढ होती व समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते. पूर्वीपासून भारतातील अनेक समाज सुधारकांनी स्त्रियांना रुढी परंपरेतून बाहेर काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले. स्त्री शिक्षण, सती बंदी (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदेशीर मान्यता (१९५६), स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध (१८७०), आंतरजातीय विवाहास मान्यता (१८७२), संमती वयामध्ये वाढ (१८९१) यांचा समावेश होतो. यामध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर, पंडिता रमाबाई, राजाराम मोहन राय, धोंडो केशव कर्वे, ज्योतिबा सावित्री बाई फुले यांचे कार्य महत्वाचे ठरते. परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री मुक्ती साठी केलेले प्रयत्न अतिशय महत्वाचे आहेत.

हिंदू कोड बिल (हिंदू सहिंता विधेयक) हे स्त्रीयांच्या सशक्तीकरणासाठी एक पाऊल होते. भारत स्वातंत्र्य झाला तेव्हा हिंदू समाजात पुरुष आणि महिलांना घटस्पोटाचा अधिकार नव्हता. पुरूषांना एकापेक्षा अधिक लग्न करण्याचे स्वतंत्र होते परंतु विधवा दुसरे लग्न करु शकत नव्हती. विधवांना संपत्तीपासून सुद्धा वंचित ठेवण्यात आले होते.

राक्षसांचा संहार करणाऱ्या दुर्गा, काली, चंडी या देवता स्त्रीरूप असल्या, तरी प्राचीन काळापासून भारतातील स्त्री शोषित व अन्यायग्रस्तच आहे. वेदकाळात गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी, सुलभा या स्त्रिया ब्रह्मवादिनी होत्या. इतिहास-काळात जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, चांदबिबी, राणी लक्ष्मीबाई इ. राजघराण्यातील स्त्रिया लढवय्या होत्या. मध्ययुगीन काळातील मुक्ताबाई, जनाबाई, विठाबाई, कान्होपात्रा इ. संतस्त्रियांनी अभंगरचनेतून स्त्रीच्या आध्यात्मिक मुक्तीची कल्पना मांडली, तरी हे सर्व अपवाद आहेत. मनुवादी विचारसरणीच्या प्राबल्यामुळे येथील स्त्री दुर्बल, परावलंबी व अज्ञान-अंधकारात पिचलेलीच होती. धर्माने स्त्रीला धार्मिक रीतिरिवाजांत कोणतीही क्रियाशील भूमिका दिली नाही, उलट, व्रतवैकल्यांचे ओझे पापपुण्याशी जोडून शारीरिक कष्ट व उपवास तिच्यावर लादले. नव-याच्या मृत्यूनंतर सती जाणे, बालवयातील विवाह व मातृत्व, बालाजरठविवाह, विधवांचे केशवपन, शिक्षणाचा अभाव हे येथील स्त्रीचे भोग होते.

भारतातील सामाजिक चळवळींच्या विसतृत स्वरूपाच्या संदर्भात स्त्री चळवळीचे महत्व आजही टिकून आहे. व्याप्ती आणि विस्तार लक्षात घेता ही चळवळ दीर्घकालीन आहे आणि जगभर तिचा प्रभाव आहे. पुढील टप्प्यांच्या मदतीने स्त्री-चळवळींचा अभ्यास केला जाऊ शकतो.

## १०.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांसाठी कार्य

बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मुल्यमापण त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पूरुषांची नव्हे तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे. हे भान त्यांना विद्यार्थी दक्षेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे पूरस्कर्ते होते. औरंगाबादला त्यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली येथे मुलींनाही प्रवेश दिला.

खाण कामगार स्त्रिला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाया स्त्री कामगारांना पूरुषा इतकीच मजूरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजुर कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्यांची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्त वेतनाची तरतूद यासारख्या महत्वाच्या निर्णयाचा उल्लेख करता येतो. कामगार किंवा नोकरी करणा-या स्त्रिला प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहीले व्यक्ती होते. भारतानंतर अनेक वर्षांनी इतर देशातील महीलांना प्रसूती रजा मंजूर झाली आहे.

बाबासाहेबांनी १९४७ मध्ये कायदे मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदु कोडबिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्न संबंधातील स्त्री पुरुष समानता, स्त्रीयांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचे लाभ स्त्रियांनाही

देण्याची तरतूद या तत्वांचा यात समावेश होतो. बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. १९२७ चा महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, १९३० चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, १९४२ च्या नागपूरातल्या महीला परिषदेत स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या. स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी स्वतः ही पूढे यायला हवे हा विचार आंबेडकरांनी मांडला. ज्या मतदानाच्या अधिकारासाठी यूरोप मधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला. तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला होता. अश्या तऱ्हेने बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांसाठी अनेक कार्य आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१. डॉ. बाबासाहेबांचे स्त्रियांसाठी केलेले कार्य विषद करा.

## १०.३ भारतीय हिंदू कोड बिल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते की देशाच्या विकासासाठी देशाच्या सर्व वर्गातील लोकांना समानतेचा अधिकार मिळाला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडरांना आपण ओळखतो ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणूनच. पण त्याचे कर्तृत्व इतपतच मर्यादीत नाही. आंबेडकरांनी भारतीय समाजात स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी म्हणून अहोरात्र प्रयत्न केले. स्त्रियांना कायदयाने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे स्वप्न त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून केले. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून बाबासाहेबांची इच्छा होती की तमाम स्त्रियांना या जाचक रूढी आणि परंपरामधून मुक्त करावे आणि ते आपले कर्तव्य आहे असे समजून त्यांनी हिंदू कोड बिल बनवायला घेतले. १९४७ पासून सतत ४ वर्ष १ महिना २६ दिवस बाबासाहेबांनी अविरत कष्ट करून हिंदू कोड बिल तयार केले. आणि २४ फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले.

### १०.३.१ हिंदू कोड बिलामधील आठ अधिनियम:

या बिलामध्ये आठ अधिनियम बनवले आहेत.

१. हिंदू विवाह अधिनियम

२. विशेष विवाह अधिनियम

३. दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायु - संरक्षता अधिनीयम

४. हिंदू वारसदार अधिनियम

५. दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरन-पोषण अधिनियम

६. अप्राप्तवय संरक्षण सम्बन्धी अधिनियम

७. वारसदार अधिनियम

८. हिंदू विधवाला पुनर्विवाह अधिकार अधिनियम

### १०.३.२ हिंदू कोड बिलामधील ७ घटक:

हे बिल ७ वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायदयाचे कलमात रुपांतर करून पाहणारे होते. हे ७ घटक खालील प्रमाणे.

१. जी व्यक्ती मृत्यूपत्र न करता मृत पावली असेल अश्या मृत हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पू दोघांचाही) मालमत्तेच्या हक्का बाबत.

२. मृताचा वारसदार ठरवण्याचा अधिकार

३. पोटगी

४. विवाह

५. घटस्फोट

६. दत्तक विधान

७. अज्ञानत्व व पालकत्व

हिंदू कोड बील प्रथमतः १ ऑगस्ट १९४६ रोजी संसदेत मांडले गेले परंतु त्यावर कोणतीही संमती झाली नाही. नंतर ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ते पुन्हा मांडले. या बिलाने हिंदू धर्मात त्याकाळी असलेल्या कुप्रथांना दूर केले त्या प्रथांचे वर्णन पुढील प्रमाणे, हिंदू धर्मातील "मिताक्षरा" (दायभाग आणि मिताक्षरा या संस्कृत ग्रंथात वारसा हक्काबद्दल मांडणी आहे.) नुसार वारसा हक्काने संपत्ती मुलांकडेच हस्तांतरण होत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बीलात सर्वसामान्य महिलांसोबतच विधवा व तिच्या मुलींना देखील समाविष्ट केले. याचाच अर्थ हिंदू कोडबीलातून त्यांनी मुलींना मुलांबरोबरीचा वारसा हक्कात दर्जा देवू केला. हिंदू दायभाग कायद्यानुसार महिलांना तिच्या पतीची संपत्ती विकता येत नसे. अर्थात ती पुढे पतीच्या भावांकडे अथवा मुलांकडे हक्काने जात असे. यावर हिंदू कोड बीलात महिलांना तीच्या पतीच्या मालकीची संपत्ती विकण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. हिंदू धर्मात त्याकाळी असलेल्या आणखी एका कुप्रथेनुसार दत्तक घेतलेल्या मुलाला संपत्तीचा अधिकार नसे. तो अधिकार प्रदान करण्याचा हिंदू कोडबीलात मांडला. हिंदू कोड बिलात बहुपत्नीत्व प्रथेला मज्जाव करून एक पत्नीत्वाचा पुरस्कार केला.

संसदेच्या आत व बाहेर विद्रोहाचे वातावरण तयार झाले. सनातनी अनुयायांसह आर्य समाजी पर्यंत आंबेडकरांचे विरोधी झाले. भारतीय स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरूंनी कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांवर हिंदू वैयक्तिक कायद्यास एक समान नागरी कायद्याच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून काम करण्याची जबाबदारी सोपविली. डॉ. आंबेडकरांनी स्वतः एक समिती स्थापन केली. ज्यात ते समितीचे अध्यक्ष होते तर सदस्य के.के. भंडारकर, के.वाय. भांडारकर, कायदामंत्री जी.आर. राजगोपाल आणि बॉम्बे बारचे एस.व्ही. गुप्ते होते. इ.स.

१९४७ स्वातंत्र्यपूर्व काळात विधानसभेला सादर केलेल्या मसुद्यामध्ये समितीने केवळ किरकोळ बदल केले. पण विधेयक संविधान सभेसमोर ठेवण्यापूर्वी सनातनी हिंदू नेत्यांनी 'हिंदू धर्म धोक्यात आहे' अशी ओरड सुरु केली.

बाबासाहेबांनी इ.स. १९४७ पासून सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस काम करून हिंदू कोड बिल तयार केले होते. हे बिल संसदेत ५ फेब्रुवारी १९५१ रोजी संसदेत मांडले. परंतु अनेक हिंदू सदस्यांसह, ज्या काही जणांनी मंत्रिमंडळात पूर्वी मंजुरी दिली होती त्यांनीही आता या बिलाला विरोध केला. ज्यांनी मंत्री मंडळात हिंदू कोड बिलास मंजूरी दिली होती ते तीन सदस्य बी.एन. राव, महामहोपाध्याय आणि गंगानाथ झा हे होत. मुलतः या मसुदा समीतीचे अध्यक्ष देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे हिंदू कोड बीलासाठी गठीत केलेल्या समितीची सदस्य संख्या ही डॉ. आंबेडकरांसह ३+१ अशी चार होती. आधीचे हिंदू कोड बीलास त्यांची सहमती होती परंतु डॉ. आंबेडकरांनी त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही म्हणून नव्याने मांडलेल्या बीलाला त्या तीन सदस्यांनी देखील विरोध केला. भारताचे राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, भारताचे गृहमंत्री व उपपंतप्रधान वल्लभभाई पटेल, उद्योगमंत्री श्यामाप्रसाद मुखर्जी, हिंदू महासभेचे सदस्य मदन मोहन मालवीय आणि पट्टाभी सीतारामय्या यांनी विधेयकाला विरोध केला. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून केला होता.

या स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांवर संविधान सभेने जात, धर्म किंवा लिंगभेद करून मानवप्राण्यात कायदा भेदभाव करणार नाही, न्यायाच्या तराजूत सर्वांना एकाच मापात तोलले जाईल अशी घोषणा केली. या पार्श्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्याचे न्याय्य हक्क देण्यास विरोध झाला.

या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी तीव्र विरोध केला. हे बील तीन+एक सदस्यांनी आधी तयार केले परंतु उर्वरित तीन सदस्यांनी पुढे त्याला विरोध केला व या बिलासाठी डॉ. आंबेडकरांनी पुढे राजीनामा दिला. इतर तीन सदस्य किंवा संविधान सभेतील अन्य सदस्यांनी त्यांना साथ दिली नाही. मात्र हे बिल आंबेडकर मंत्रीपदी असताना मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे दुःखीकष्टी होऊन आंबेडकरांनी २७ सप्टेंबर इ.स. १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला आणि नेहरूंनी तो मंजूर केला. राजीनामा दिल्यानंतर त्यावर लोकसभेमध्ये निवेदन करण्याची संधी उपसभापतींनी नाकारली. तत्कालीन नवशक्ती वृत्तपत्रात हिंदू कोड बिलाचा खून झाला अशी बातमी आली होती.

**आपली प्रगती तपासा**

१. हिंदू कोड बिलामधील आठ अधिनियम स्पष्ट करा.

## १०.४ इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे

पुढे ज्या वारसा कायद्याला विरोध करण्यात आला होता तो बाजूला सारून प्रथम हिंदू विवाह कायदा हाती घेण्यात आला. हिंदू कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून हे चारही

कायदे वेगवेगळ्या वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले. इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे खालीलप्रमाणे:

१. हिंदू विवाह कायदा

२. हिंदू वारसाहक्क कायदा

३. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा

४. हिंदू दत्तक व पोटगी कायदा

हे कायदे लोकसभेत मंजूर होत असताना त्याच्यांशी बाबासाहेबांचा थेट संबंध येत नव्हता, तेव्हा ते राज्यसभेत होते. हे कायदे मंजूर होणे म्हणजे भारतीय न्याय व कायदा व्यवस्थेच्या इतिहासातली एक क्रांतिकारक घटना होती असे मानले जाते. या कायद्यांनी भारतीय स्त्रियांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली. या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली. बाबासाहेबांनी भारताचे कायदेमंत्री पदाचा राजीनामा देताना हिंदू कोड बिलाविषयी असे म्हटले होते की, "समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगारावर राजमहाल बांधण्यासारखे होय."

**आपली प्रगती तपासा.**

१) इ.स. १९५५-५६ मध्ये मंजूर झालेले चार हिंदू कायदे लिहा.

## १०.५ भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ (१९४७-२०००)

### १०.५.१ सामाजिक सुधारणांचा परिणाम:

महिला चळवळीची सुरुवात साधारणपणे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली, जेव्हा स्त्रियांच्या छोट्या गटांनी आणि काही पुरोगामी पुरुषांनी भारतातील स्त्रियांच्या असमान स्थितीचा मुद्दा अधोरेखित केला. तत्कालीन स्त्री-चळवळ अनेक प्रकारे समाजसुधारणेच्या चळवळीच्या अनुषंगाने गेली. ब्राह्मो समाज आणि आर्य समाज यांनी महिला मंडळे तयार केली. ज्यामुळे स्त्रियांना विचारांची देवाणघेवाण करून प्रगती करण्यास व्यासपीठ मिळाले. राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, न्या. महादेव गोविंद रानडे, बेहरामजी मलबारी या समाजसुधारकांनीभेदभाव करणाऱ्या प्रथा व रुढींना आव्हान दिले. सुधारकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ब्रिटिश सरकारने या प्रकरणात हस्तक्षेप केला. द प्रिव्हेन्शन ऑफ सती ॲक्ट (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६), स्त्री-भ्रूणहत्या (निवारण) कायदा (१८७०), द एज ऑफ कन्सेण्ट ॲट मॅरेज ॲक्ट (१८९१) सारखे कायदे सरकारने केले.

### १०.५.२ राष्ट्रीय चळवळीचा परिणाम:

राष्ट्रीय चळवळीत महिलांचा सहभाग वाढला. महात्मा गांधींच्या तत्त्वांचा चळवळीतल्या स्त्रियांच्या विचारांवर आणि सहभागावर परिणाम होऊ लागला. स्वातंत्र्याच्या लढ्यात

महिलांच्या वाढत्या सहभागाने त्यांना त्यांच्या हक्काबद्दल जागरूक केले. स्वातंत्र्यलढ्यातील आंदोलनात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. जेव्हा पुरुष स्वातंत्र्यसैनिकांना तुरुंगात टाकले गेले; तेव्हा स्त्री-स्वातंत्र्यसैनिकांनी कठीण आणि आव्हानात्मक परिस्थिती हाताळल्या. यासंदर्भात कस्तुरबा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, ॲनी बेझंट आणि सरोजिनी नायडू या महिला नेत्यांचा उल्लेख आवश्यक आहे. ॲनी बेझंट यांनी प्रसिद्ध होमरूल चळवळीचे नेतृत्व केले, ज्यामध्ये महिलांनी भाग घेतला. सरोजिनी नायडू यांनी महिलांच्या मताधिकारांसाठी काम केले आणि कायदेभंग चळवळीत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले. याशिवाय मुथुलक्ष्मी रेड्डी, राजकुमारी अमृत कौर, सरला देवी, सुचेता कृपलानी, अरुणा असफ अली यांनी अहिंसा चळवळीत भाग घेतला. १९४२ मध्ये पारित झालेल्या 'भारत छोडो' ठरावामध्ये महिलांना 'भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील शिस्तबद्ध सैनिक' म्हणून संबोधित केले गेले. स्त्री ही शक्ती असून तिची अस्मिता केवळ पुरुषांच्या संदर्भात मर्यादित नाही. तिचे स्वातंत्र्य समाजघडणीसाठी आवश्यक आहे, हे भान महात्मा गांधींनी दिले.

१९०९ व १९१९ च्या राजकीय सुधारणांत स्त्रियांना मर्यादित मतदानाचा अधिकार मिळाला. १९३० चा मिठाचा सत्याग्रह, १९३२ ची सविनय कायदेभंग चळवळ यांत महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने हजारो स्त्रिया प्रथमच सामील झाल्या. मोर्चे, लाठीमार, तुरुंगवास, हालअपेष्टा यांना तोंड देण्याचे सामर्थ्य याच काळात स्त्रीमध्ये आले. सरोजिनी नायडू , ॲनी बेझंट यांनी राष्ट्रीय चळवळ व होमरूल चळवळ यांचे नेतृत्व केले. पहिल्या महायुद्धापासून आर्थिक मंदीमुळे स्त्रियांना नोकरी करण्याला अडसर राहिला नाही, त्यामुळेही स्त्रीशिक्षणाला अधिक चालना मिळाली. १९३७ मधील प्रांतिक स्वायत्तता, १९४७ मधील स्वातंत्र्यप्राप्ती, १९५० मधील सार्वभौम प्रजासत्ताकाची स्थापना यांमुळे स्त्रियांना घटनात्मक समान नागरिकत्वाचा दर्जा व सर्व क्षेत्रांत समान संधीची ग्वाही मिळाली.

**आपली प्रगती तपासा.**

१) भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीवरील सामाजिक सुधारणांचा आणि राष्ट्रीय चळवळीचा परिणाम स्पष्ट करा.

### १०.५.३ स्वातंत्र्योत्तर कालखंड:

महिलांच्या प्रयत्नांमुळे आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या भूमिकेमुळेच भारतातील संविधानात महिलांना मतदानाचा अधिकार आणि संपूर्ण समानता मिळाली. कलम १५(३) (इंडिया, १९४९) राज्याला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देते.

स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन स्त्रीवादी चळवळीवर लोकशाहीच्या प्रयोगाचा प्रभाव हा वसाहतवादी राजवटीच्या अनुभवाइतकाच महत्त्वाचा आहे, जो विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या स्त्रीवादी चळवळीवर सर्वात महत्त्वाचा परिणामकारक प्रभाव ठरला. लिंग आधारित संरचना स्त्रियांवर अत्याचार करतात आणि त्या गौण आहेत असे प्रतिपादन करतात. स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन स्त्रीवादी चळवळीची सुरुवात समतेच्या तत्त्वांवर ठाम राहून झाली. स्वातंत्र्यानंतरची वर्षे स्त्रीवाद्यांसाठी फार धक्का देणारी ठरली. स्त्री-

पुरुष समानतेचे तत्त्व मान्य असूनही, त्याचे परिणाम पूर्णपणे उमटले नाहीत. स्वतंत्र भारतात महिलांना घरामध्ये आणि घराबाहेर अनेक प्रकारच्या भेदभावांना बळी पडावे लागले. एकोणिसाव्या शतकाच्या सत्तरच्या दशकात समानतेची घटनात्मक हमी ढोंगी म्हणून नाकारली गेली आणि सत्तर आणि ऐंशीच्या दशकात सुरू झालेली चळवळ त्या काळातील अनेक कट्टरवादी चळवळींमधून वाढणारी चळवळ खूपच वेगळी होती. एकोणिसाव्या शतकाच्या ऐंशीच्या दशकात मोठ्या संख्येने महिला संघटनांचा जन्म झाला आणि जुन्या संस्थांचे पुनरुज्जीवन झाले. स्त्रियांच्या सक्रियतेची एक विशेष श्रेणी नवीन आयामांद्वारे वैशिष्ट्यीकृत झाली. या संदर्भातच स्त्री चळवळीचे हे विविध पैलू समजून घेण्याचा आणि त्यातून स्वतंत्र झाल्यानंतरच्या काळात झालेल्या बदलांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रात केला आहे. महिला चळवळीतील उत्क्रांतीमुळे नवीन वादविवाद आणि समस्या उदयास येत आहेत ज्यांना जुन्या समस्यांशिवाय सोडवण्याची गरज आहे.

### १. स्वातंत्र्यानंतरची स्त्रीवादी चळवळ पुनर्जागरण:

स्त्रियांना दिलेल्या वचनांना मान्यता देण्यासाठी, स्वतंत्र भारताच्या संविधानाने "लिंगांमधील समानतेची" हमी दिली आणि महिलांसाठी संधी निर्माण करण्यासाठी विविध प्रशासकीय संस्था स्थापन केल्या. एकोणिसाव्या शतकाच्या पन्नास आणि साठच्या दशकात स्त्रीवादी चळवळीतील मंदपणा दिसून आला.

### २. स्त्रियांच्या चळवळीची रचना:

एकोणिसाव्या शतकाच्या साठच्या दशकाच्या उत्तरार्धात भारतीय राजकारणाच्या मूलगामीकरणात नव्या स्त्रीमुक्ती चळवळीची उत्पत्ती झाली. महाराष्ट्रात पुरोगामी चळवळींमध्ये सहभागी असलेल्या महिला कार्यकर्त्यांनी आणि महिला विचारवंतांनी महागाईविरोधी महिला समिती नावाची संयुक्त आघाडी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला आणि जीवनावश्यक वस्तूंची मानवनिर्मित टंचाई निर्माण करणाऱ्या दोषींवर थेट कारवाई केली. डाव्या आणि समाजवादी पार्श्वभूमीतील अनुभवी आणि सक्षम महिलांच्या नेतृत्वाखाली हजारो गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय महिला संघर्षात सामील झाल्या. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, मंजू गांधी आणि तारा रेड्डी यांनी विविध वर्गीय पार्श्वभूमीच्या महिलांपर्यंत पोहोचण्याच्या त्यांच्या अद्वितीय क्षमतेमुळे जनसामान्यांच्या नजरेत त्यांचा विशेष ठसा उमटवला. त्यांची बौद्धिक स्वावलंबीता, सूक्ष्म मुद्द्यांचा स्थूल राजकीय वास्तवाशी संबंध ठेवण्याची क्षमता, साधी जीवनशैली आणि बिनबोभाट स्वभाव यांनी सर्व राजकीय रंगांच्या महिला मुक्ती कार्यकर्त्यांच्या तरुण पिढीला आदर्श दिला.

त्याच सुमारास पुण्यात स्त्री मुक्ती आंदोलन समन्वय समितीची परिषद भरवण्यात आली. याला आणखी मोठा सामाजिक-राजकीय आणि सांस्कृतिक आधार होता कारण तरुण सुशिक्षित महिला, व्यावसायिक, लेखक, शिक्षक, औद्योगिक कामगार वर्ग महिला, असंघटित क्षेत्रातील महिला कामगार, मंदिरातील वेश्या आणि आदिवासी महिलांनी चर्चेत भाग घेतला आणि त्यांच्या मागण्यांवर प्रकाश टाकला.

मुंबईतील स्त्री मुक्ती संघटना आणि हैदराबादमध्ये प्रोग्रेसिव्ह ऑर्गनायझेशन ऑफ वुमनची स्थापना १९७४ मध्ये झाली. दिल्लीत, कट्टरपंथी विद्यार्थ्यांच्या चळवळीतून आणि

लोकशाही हक्कांच्या चळवळीतून महिलांमध्ये नवीन नेतृत्व विकसित झाले. संपूर्ण भारतातील विविध राजकीय गटांमधील वैयक्तिक महिलांना त्यांच्या संघटनांमधील पितृसत्ताक पक्षपातीपणाबद्दल असंतोष वाटत होता, परंतु आणीबाणीची राजवट संपल्यानंतरच त्या त्याविरोधात उघडपणे समोर आल्या. या स्वतंत्र, स्वयं-निर्धारित लोकशाही चळवळी होत्या, ज्यांनी सर्व श्रेणीबद्ध संरचनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

भारतात त्या काळातील तरुणांनी राष्ट्रवादी चळवळीत सहभाग घेतला नव्हता. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय, भ्रष्टाचार, दुष्काळ, महागाई, बेरोजगारी, ग्रामीण भागातील गरीबी या अनेक संकटांना तोंड देत निराश झालेल्या तरुणांनी निषेध व्यक्त केला. देशभरात शक्तिशाली संघटनांमध्ये विकसित झालेल्या कृती आणि एकत्रीकरणामध्ये व्यापक, उघड असंतोष व्यक्त केला गेला. या चळवळींनी जमिनीचे हक्क, वेतन, रोजगार, कामाच्या ठिकाणी सुरक्षा, पाण्याची उपलब्धता, निसर्गाचा नाश, दलित आणि कष्टकरी जनतेचे अत्याचार आणि शोषण असे अनेक वैविध्यपूर्ण मुद्दे उपस्थित केले. अनेक महिलांनी उत्साह, जबाबदारी आणि सर्जनशीलतेने या संघर्षांमध्ये भाग घेतला. १९७५ ची आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटनेची घोषणा भारतातील आणीबाणीच्या नियमाशी जुळली. १९७७ मध्ये आणीबाणी उठवली गेली तोपर्यंत, अनेक महिला गटांनी लोकशाही हक्कांच्या मुद्द्यांचे समर्थन केले होते. जवळपास दोन वर्षांच्या शांततेनंतर प्रेस 'कृती'मध्ये उतरले. आणीबाणीच्या काळात महिलांवर झालेल्या अत्याचारांचे उघडपणे दस्तऐवजीकरण करण्यात आले आणि प्रसारमाध्यमांमध्ये नोंदवले गेले. कुटुंबातील, रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी आणि राजकीय गटांमधील बहुतेक स्त्रियांच्या जीवनातील स्वतःच्या अनुभवावर या अत्याचारांनी जोर दिला. या प्रक्रियेचा कळस १९८० मध्ये झाला जेव्हा अनेक महिला गट रस्त्यावर उतरून निषेध नोंदविला. एकोणिसाव्या शतकाच्या १९८० च्या दशकात, महिला अत्याचाराचा मुद्दा केवळ चर्चा मंच, परिसंवाद आणि 'गंभीर' लेखांमध्येच नव्हे तर लोकप्रिय माध्यमांमध्ये देखील चित्रित केला गेला. महिलांनी, ज्यांनी त्यांच्या समस्या आणि अपमानाचे स्रोत स्वतःच ओळखले होते, त्यांना एक भाषा, एक संघटनात्मक व्यासपीठ, एक सामूहिक ओळख आणि वैधता प्राप्त होऊ लागली जी त्यांना पूर्वी नव्हती.

भारतातील महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना केली गेली. समितीने आपला अहवाल सन १९७४ मध्ये प्रकाशित केला. 'टूवर्डस इक्वालिटी' (समानतेच्या दिशेने) या अहवालात महिला दखलपात्र नसल्याचे, पुरुषप्रधानतेचे आणि महिलांवरील हिंसाचाराचे मुद्दे मांडण्यात आले. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील महिलांविरुद्धचे भेदभाव आणि शोषण अधोरेखित केल्यामुळे हा अहवाल महत्त्वाचा गणला जातो. या अहवालाने स्त्रियांच्या समस्यांशी संबंधित अनेक मुद्द्यांचे सर्वेक्षण व आढावा यशस्वीपणे घेतला. स्त्रियांशी संबंधित अनेक समस्या व मुद्दे अस्पर्शितच असल्याची वस्तुस्थिती या अहवालाने मांडली. स्त्री-चळवळीच्या या टप्प्यात महिलांवरील हिंसा, लैंगिक साचेबद्ध प्रतिमा तसेच, महिला समानतेसाठीच्या वैधानिक मागण्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले गेले.

१९७७ ते १९७९ दरम्यान, दिल्ली, बंगलोर, हैदराबाद, बॉम्बे, अहमदाबाद, पाटणा आणि मद्रास या शहरांमध्ये नवीन महिला गट उदयास आले. त्यांनी हुंडाबळी हत्या, सौंदर्य स्पर्धा,

माध्यमांमध्ये महिलांचे लैंगिक चित्रण, अश्लील चित्रपट आणि परदेशातून आयात केलेले साहित्य, यूके इमिग्रेशन अधिकार्यांकडून कौमार्य चाचण्यांचा परिचय, कोठडीतील बलात्कार आणि तुरुंगातील महिलांची दयनीय स्थिती याविरुद्ध निषेध कृती आयोजित केल्या. हे गट त्यांच्या रचना आणि जागतिक दृष्टिकोनात बहुसांस्कृतिक होते. परिणामी, त्यांचा राजकीय अजेंडा वर्ग, जात, धर्म, वांशिकता आणि जागतिकीकरणाच्या परस्परसंवादाने बांधलेल्या स्त्रियांच्या जटिल वास्तवाचे समकालीन हाताळणी प्रतिबिंबित करतो. या गटांच्या प्रवक्त्यांना उच्च पातळीवरील वैचारिक गुंतवणुकीचा फायदा होता आणि एकोणिसाव्या शतकाच्या साठच्या दशकाच्या उत्तरार्धातल्या कट्टरवादी चळवळींचा अनुभव होता. त्यांच्या सामूहिक शहाणपणाने चळवळीला मुख्य आधार दिला. त्यांची प्रादेशिक भाषांतील तसेच इंग्रजीतील वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तिकांनी भारतीय महिलांच्या समस्या हाताळण्याचा सर्जनशील मार्ग उपलब्ध करून दिला.

जानेवारी १९७९ मध्ये मानुषीचे प्रक्षेपण ही या दिशेने एक गुणात्मक झेप होती. शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करण्याची आणि प्रायोगिक सामग्री आणि सकारात्मक कृतीवर आधारित संशोधन करण्याची गरज भारतीय स्त्री अभ्यास विद्वानांमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीस चर्चिली जाऊ लागली. पुढे, या विषयावरील प्रवचन कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक, धोरण नियोजक आणि संयुक्त राष्ट्रांच्या प्रणालीसाठी एक फलदायी वरदान ठरले. उच्च शिक्षणाची सर्वोच्च संस्था, युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनने महिलांच्या अभ्यासाची (WS) व्याख्या केली आहे ज्यामध्ये संशोधन, दस्तऐवजीकरण, अध्यापन, प्रशिक्षण आणि कृती यांचा समावेश आहे. आपल्या समाजात स्त्रियांना गौण दर्जा आहे, त्यामुळे 'स्त्री अभ्यास' द्वारे निर्माण झालेल्या ज्ञानभांडाराचा उपयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्हायला हवा.

### ३. महिलाविषयीचा अभ्यास आणि महिलांच्या हालचाली: संवाद:

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात महिला अभ्यास केंद्रे, स्वायत्तपणे किंवा विद्यापीठ प्रणालीमध्ये कार्यरत, महिला चळवळीतील अनुभवजन्य आणि अनुभवात्मक पुरावे स्वीकारू लागले. तो काळ होता जेव्हा सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रात तसेच विशेष क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणार्या सामाजिक कार्य संस्था आणि गैर-सरकारी स्वयंसेवी संस्थांमध्ये सहभागात्मक संशोधन, कृती संशोधन आणि तळागळातील अभ्यासाला महत्त्व प्राप्त होत होते. या प्रक्रियेने अप्रत्यक्षपणे 'स्त्री अभ्यास' आणि 'स्त्री चळवळ' यांच्यातील परस्परसंवाद साधला. डिसेंबर १९८० मध्ये भारतातील स्त्री मुक्ती चळवळीच्या दृष्टीकोनातील पहिल्या राष्ट्रीय परिषदेत महिलांशी संबंधित समस्यांवर प्रचंड तांत्रिक तपशीलांसह विस्तृतपणे चर्चा करण्यात आली. वैकल्पिक सांस्कृतिक माहितीच्या दृष्टीने ही परिषद ट्रेंडसेटर होती. यात गाणी, संगीत बॅले, स्किट्स, विनोद, शब्दसंग्रह, अनेकवचनी जीवनशैली आणि बहुभाषिक संवादांचा समावेश होता. या परिषदेमुळे पूर्णपणे भिन्न राजकीय प्रवाहातील महिलांना लोकशाहीकरणासाठी एकत्र येणे शक्य झाले. चार महिन्यांनंतर, एप्रिल १९८१ मध्ये SNDT महिला विद्यापीठात महिला अभ्यासाच्या पहिल्या राष्ट्रीय परिषदेत, कार्यकर्ते, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, प्रशासक आणि धोरण निर्मात्यांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. यामध्ये महिलांना मागे टाकणारी विकास प्रक्रिया, पाठ्यपुस्तकांमधील लिंगभेद, प्रसारमाध्यमांमधील लैंगिकता, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील

लिंग अंधत्व, महिलांच्या आरोग्याच्या गरजा आणि महिलांवरील हिंसा-बलात्कार, घरगुती हिंसाचार आणि वेश्याव्यवसाय यांचा समावेश होतो. सहभागींमध्ये (स्त्री आणि पुरुष दोघेही) सर्वसाधारण एकमत असे होते की डब्ल्यूएस महिला समर्थक आहे आणि तटस्थ नाही. असे दिसून आले की WS धोरणात्मक स्तरावर आणि अभ्यासक्रमाच्या विकासामध्ये बदलासाठी दबाव आणून, मुख्य प्रवाहातील शैक्षणिक क्षेत्रातील लिंग-अंधत्व तसेच लिंग-पूर्वाग्रह यावर टीका करून, पर्यायी विश्लेषणात्मक साधने आणि दृष्टीकोन तयार करून आणि वकिलीद्वारे महिलांना अर्थव्यवस्थेत आणि समाजातील महिलांच्या विकासात्मक गरजांसाठी सक्षम करण्यासाठी ज्ञानाचा आधार घेतील. या परिषदेने एक नवीन ट्रेंड स्थापित केला ज्याद्वारे, हळूहळू, महिला कार्यकर्त्यांना, संसाधन व्यक्ती आणि सहभागी म्हणून, शैक्षणिक चर्चासत्रे, सल्लामसलत आणि प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये आमंत्रित केले गेले.

### ४. सहभागी तंत्र:

सहभागी तंत्राचा वापर विकास कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यासाठी अधिक वेळा केला जातो. कृती हा WS चा एक महत्त्वाचा घटक असल्याने, हे तंत्र विद्यमान हालचाली आणि विकासात्मक प्रकल्पांवर संशोधन करण्यासाठी वापरले जाते. तळागाळात महिलांसोबत काम करणाऱ्यांना महिलांचे मौन भंग करण्यासाठी, त्यांचा सहभाग मिळवण्यासाठी आणि शेवटी समानतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी विविध तंत्रांचा वापर करण्याची गरज भासू लागली आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रशिक्षणार्थी आणि महिला एजन्सी यांच्यातील अंतर नष्ट करणे आवश्यक आहे; ज्ञानाचा निर्माता आणि ज्ञानाचा वापरकर्ता यांच्यातील अंतर दूर करणे आवश्यक आहे. 'स्त्रियांच्या अभ्यासात' आपण म्हणत आहोत की स्त्रियांचा आवाज ऐकला पाहिजे; हुंडा किंवा हिंसक परिस्थिती त्यांना कसे समजते हे खूप महत्वाचे आहे. वस्तुनिष्ठ वास्तव आणि सूक्ष्म शक्तींचा अभ्यास करताना, 'महिला अभ्यास' व्यक्तिनिष्ठ प्रतिक्रिया आणि मानसिक समस्या देखील तपासतो. सामाजिक दडपशाही समजून घेण्यासाठी, वैयक्तिक सहभागामुळे समस्येचे सखोल आकलन होते. त्यामुळे दुष्काळ, जातीय दंगली, भोपाळ वायू दुर्घटना, योग्य तंत्रज्ञान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, इंधन, चारा, पाणी व्यवस्थापन, उत्पन्न निर्मिती उपक्रम आणि विकासात्मक धोरणे यांसारख्या परिस्थितीत महिलांच्या अत्याचाराची गतिशीलता अधोरेखित करण्यासाठी महिलांच्या अभ्यासात वैयक्तिक खात्यांची भूमिका ओळखली जाते.

### आपली प्रगती तपासा

१. स्त्री चळवळीच्या स्वरूपाची योग्य उदाहरणे देऊन चर्चा करा.

२. स्त्री चळवळ आणि स्त्री अभ्यास यांच्यातील संबंधांचे वर्णन करा.

### ५. नवीन महिला गटांच्या कार्याच्या पद्धती:

नवीन महिला गटांच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतलेल्या बहुतेक स्त्रिया कुटुंब, शैक्षणिक आणि धार्मिक संस्था आणि समाजातील हुकूमशाही संरचनांना अत्यंत प्रतिकूल होत्या कारण त्या सर्वांनी स्त्रियांना टीकात्मक विचारसरणी आणि जागा वाढू दिली नाही. स्वतंत्र

मध्य मुंबईच्या पोटनिवडणुकीवर बहिष्काराची घोषणा दलित पँथरनं केल्यानंतर हे जवळपास स्पष्ट झालं की, काँग्रेसला हक्काची 'दलित मते' मिळणार नव्हती आणि त्यांना पराभव समोर दिसू लागला होता. याच रागातून या सभेत नामदेव ढसाळांचं भाषण सुरू असताना मैदानाशेजारील बीडीडी चाळींच्या गच्चीवरून शिवसैनिकांनी दगडफेड सुरू केली. मात्र, त्याही स्थितीत नामदेव ढसाळांनी भाषण सुरू ठेवलं होतं, असं कॉ. सुबोध मोरे त्यांच्या लोकसत्तामधील लेखात लिहितात.

ते पुढे म्हणतात की, "नंतर राजा ढाले भाषणाला उभे राहिले. दगडफेक करणाऱ्या गुंडांना आव्हान देत भाषण सुरू केलं की, हिंमत असेल तर समोर येऊन हल्ला करा. ढालेंच्या भाषणाने वातावरण तापलं."

शिवसैनिकांनी सभेवर दगडफेक करून सभा उधळली आणि पोलिसांनी लाठीमार सुरू केला. राजा ढाले यांनाही यात मारहाण करण्यात आली. याचे पडसाद वरळी, नायगाव, भायखळा, दादर, परळ, डिलाईल रोड इथल्या दलित वस्त्यांमध्ये उमटले. या दरम्यान पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चर्मकार समाजातील रमेश देवरुखकर या तरुण पँथरचा मृत्यू झाला.

या घटनेच्या निषेधार्थ चार-पाच दिवसांनीच म्हणजे १० जानेवारी १९७४ रोजी नायगाव, दादरमधून मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा परळ रस्त्यावरून जात असताना, मोर्चावरही दगडफेक झाली आणि यात दुसरा पँथर मृत्युमुखी पडला, तो म्हणजे, भागवत जाधव. भागवत जाधव यांच्या डोक्यावर दगडी पाटा टाकण्यात आला. त्यांचा जागीच श्वास गेला. ढसाळांसह भाई संगारे, प्रल्हाद चेंदवणकर, लतिफ खाटीक, ज. वि. पवार यांनाही पोलिसांनी अटक केली. पुढे नियोजितपणे १३ जानेवारी १९७४ रोजी निवडणूक झाली आणि त्यात दलित पँथरच्या बहिष्काराचा परिणाम दिसून आला. काँग्रेसच्या बॅ. रामराव आदिकांचा पराभव झाला आणि भाकपच्या कॉ. रोझा देशपांडे विजयी झाल्या.

**आपली प्रगती तपासा.**

१) दलित युवक आघाडी ते दलित पँथर पर्यंतच्या वाटचालीचा आढावा घ्या.

### ११.२.८ रिपब्लिकन पक्षाचं ऐक्य आणि दलित पँथरला धक्का:

दलित पँथरच्या फुटीकडे वळताना, मध्य मुंबईच्या पोटनिवडणुकीनंतरची एक घडामोड महत्त्वाची आहे. अर्जुन डांगळेंनी त्यांच्या 'दलित पँथर : अधोरेखित सत्य' या पुस्तकात विश्लेषणासह ही घटना नमूद केलीय.

कॉ. रोझा देशपांडेंच्या विजयाचा हादरा जसा काँग्रेसला बसला, तसा रिपब्लिकन पक्षातील गटा-तटातल्या नेत्यांनाही बसला. कारण दलित पँथरची निवडणुकीच्या रिंगणातली ताकद त्यांना कळून चुकली होती. मग पुढे काँग्रेसच्या पुढाकारानं रिपब्लिकन पक्षाचं ऐक्य झालं. २६ जानेवारी १९७४ रोजी अशा ऐक्याची घोषणा चैत्यभूमीवर करण्यात आली. २० फेब्रुवारी १९७४ रोजी एकसंध रिपब्लिकन पक्षाचा मोठा मोर्चाही मुंबईत काढण्यात आला. रिपब्लिकन हा आंबेडकरी जनतेचा कायमच जिव्हाळ्याचा विषय असल्यानं त्यांनी या ऐक्याचं स्वागत उत्साहानं केलं. परिणामी दलित पँथरच्या चळवळीला हा मोठा धक्का होता. कारण काँग्रेसप्रणित हे ऐक्य दलित पँथरला मोठा शह होता.

### ११.२.९ आणि पँथर फुटली!:

दलित पँथर फुटीचं एक प्रमुख कारण सांगितलं जातं, नामदेव ढसाळ प्रणित जाहीरनामा. या जाहीरनाम्यातून नामदेव ढसाळ हे कम्युनिस्ट विचारांकडे दलित पँथरला झुकवण्याचा प्रयत्न करतायेत, असा आरोप करण्यात आला होता.

राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांच्यात हा वाद प्रामुख्यानं झाला.

'जाहीरनामा की नामा जाहीर?' असा नवाकाळ वृत्तपत्रात लेख लिहून राजा ढालेंनी नामदेव ढसाळांविरोधात उघड आघाडीच उघडल्याचं अर्जुन डांगळे लिहितात. त्यातूनच पुढे राजा ढालेंनी १९७४ साली नागपूरच्या मेळाव्यात नामदेव ढसाळांना दलित पँथरमधून काढण्याची घोषणा केली.

दलित पँथरच्या आंदोलनाच्या दबावामुळेच सरकारला सार्वजनिक उपक्रमात, महामंडळाच्या कार्यालयात दलित आदिवासींच्या राखीव जागांचा बॅकलॉग भरणे भाग पडले, रोस्टरची अंमलबजावणी करावी लागली. विधिमंडळातील ठरावाप्रमाणे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी जो 'नामांतर लढा' झाला त्यामध्येही दलित पँथरचे मोठे योगदान होते. या लढ्यात पोचिराम कांबळे, जनार्दन मवाडे, चंदर कांबळे, गौतम वाघमारे ते सातारच्या विलास ढाणेसारखे समतावादी मराठा तरुणही आत्मबलिदान करून या आंदोलनात शहीद झाले आहेत. चळवळीतूनच प्रेरणा घेऊन भटके विमुक्त, आदिवासी, स्त्रीवादी, मुस्लीम मराठी साहित्य, ग्रामीण बहुजनांच्या आणि विद्रोही साहित्य सांस्कृतिक चळवळी उभ्या राहिल्या.

मूळ दलित पँथरची वाटचाल १९७२ ते १९७७ पर्यंतची, नंतर 'भारतीय दलित पँथर' या नावाने १९७७ ते १९९० असा प्रवास प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, एस. एम. प्रधान, प्रीतमकुमार शेगावकर, दयानंद म्हस्के, अनिल गोंडाणे आदींसह झाला व नंतर ही संघटना बरखास्त झाली.

दलित पँथरचे अनुक्रमे रमेश देवरुखकर व भागवत जाधव हे पहिले दोन शहीद जानेवारी १९७४ मध्ये झाले.

**आपली प्रगती तपासा.**

१) दलित चळवळ कोणत्या टप्प्यांतून गेली ते सांगा.

### ११.२.१० कांशीरामांची चळवळ:

कांशीरामच्या चळवळीने एक वेगळी रणनीती स्पष्टपणे प्रतिबिंबित केली, ज्यामध्ये 'दलित' पेक्षा सर्व SC, ST, BC, OBC आणि धार्मिक अल्पसंख्याकांचा समावेश असलेली 'बहुजन' ओळख होती, जी व्यावहारिकरित्या केवळ अनुसूचित जातींचे प्रतिनिधित्व करते. कांशीराम यांनी बहुजनांच्या सरकारी कर्मचार्‍यां या समुदायांचे मुख्य स्त्रोत असल्याचे ओळखून उघडपणे अराजकीय संघटनेची सुरुवात केली, त्याने नंतर DS4 - दलित शोषित समाज संघर्ष समिती - बहुजन समाज पक्ष (BSP) म्हणून एक आंदोलक राजकीय गटाची निर्मिती उत्प्रेरित केली, जी कालांतराने एक पूर्ण राजकीय पक्ष बनली.

निव्वळ, निवडणुकीच्या राजकारणाच्या बाबतीत, कांशीरामची रणनीती सर्व दलित पक्षांचा एक मोठा ध्यास बनला आहे, जी देशाच्या काही भागांमध्येच प्रभावी ठरली आहे. भारतातील सर्व दलित लोकांच्या विस्तीर्ण जागेत स्वतःचे स्थान निर्माण करून त्यांनी मरणासन्न दलित राजकारणाला गुणात्मक चालना दिली आहे. पण त्यांनी या लोकांना

त्यांच्या जाती आणि समाजाच्या संदर्भात ओळखले. आंबेडकरांच्या समान स्थानाचे प्रतीक काय होते याचा कळस त्यांनी प्रतिबिंबित केला हे त्यांचे श्रेय म्हणता येईल. दलित जातींच्या नावाखाली सत्तेचा पाठपुरावा करणाऱ्या या आयकॉनची राजकीय प्रभावीता कांशीराम यांनी चतुराईने आत्मसात केली.

१९७३ मध्ये, कांशीराम यांनी पुन्हा त्यांच्या सहकाऱ्यांसोबत BAMCEF: मागास आणि अल्पसंख्याक समुदाय कर्मचारी महासंघाची स्थापना केली. १९७६ मध्ये दिल्लीत पहिले कार्यकारी कार्यालय उघडले गेले - "शिक्षित- संघटित व्हा आणि आंदोलन करा" या आंबेडकरांच्या विचारांचा आणि त्यांच्या विश्वासांचा प्रसार करण्यासाठी हे आधार म्हणून काम केले. तेव्हापासून कांशीराम आपले नेटवर्क तयार करत राहिले आणि लोकांना जातिव्यवस्थेची वास्तविकता, ती भारतात कशी कार्य करते आणि आंबेडकरांच्या शिकवणींबद्दल जागरूक करत राहिले. १९८० मध्ये त्यांनी "आंबेडकर मेळा" नावाचा रोड शो तयार केला ज्यात आंबेडकरांचे जीवन आणि त्यांचे विचार चित्रे आणि कथनातून दाखवले. १९८१ मध्ये त्यांनी BAMCEF ला समांतर संघटना म्हणून दलित सोशीत समाज संघर्ष समिती किंवा DS4 ची स्थापना केली. जातीव्यवस्थेवर जनजागृती करणाऱ्या कामगारांवरील हल्ल्यांविरुद्ध लढण्यासाठी त्याची निर्मिती करण्यात आली. कामगार एकजुटीने उभे राहू शकतात आणि ते सुद्धा लढू शकतात हे दाखवण्यासाठी ते तयार केले गेले. तथापि हा नोंदणीकृत पक्ष नसून राजकीय स्वरूपाची संघटना होती.

१९८४ मध्ये, त्यांनी बहुजन समाज पक्ष म्हणून ओळखला जाणारा एक पूर्ण वाढ झालेला राजकीय पक्ष स्थापन केला. तथापि, १९८६ मध्ये जेव्हा त्यांनी सामाजिक कार्यकर्ता ते राजकारणी असे त्यांचे संक्रमण घोषित केले की ते बहुजन समाज पक्षाव्यतिरिक्त इतर कोणत्याही संघटनेसाठी/सोबत काम करणार नाहीत. नंतर त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. कांशीरामच्या चळवळीने एक वेगळी रणनीती स्पष्टपणे प्रतिबिंबित केली, ज्याने 'दलित' पेक्षा 'बहुजन' ओळख सर्व SC, ST, BC, OBC आणि धार्मिक अल्पसंख्याकांना समाविष्ट करून दिली, जी व्यावहारिकपणे केवळ अनुसूचित जातींचे प्रतिनिधित्व करते. कांशीराम यांनी बहुजनांना या समुदायांचे मुख्य स्त्रोत असल्याचे ओळखून सरकारी कर्मचार्यांच्या उघडपणे अराजकीय संघटनेची सुरुवात केली. याने नंतर एक आंदोलक राजकीय गटाची निर्मिती उत्प्रेरित केली ज्याला DS4 म्हणून रचनात्मकपणे तयार केले गेले, जो कालांतराने एक पूर्ण वाढ झालेला राजकीय पक्ष बनला - बहुजन समाज पक्ष (BSP). निव्वळ, निवडणुकीच्या राजकारणाच्या बाबतीत, ज्याला सर्व दलित पक्षांचा एक मोठा ध्यास बनला आहे, कांशीरामची रणनीती देशाच्या काही भागांमध्येच प्रभावी ठरली आहे. भारतातील सर्व दलित लोकांच्या विस्तीर्ण जागेत स्वतःचे स्थान निर्माण करून त्यांनी मरणासन्न दलित राजकारणाला गुणात्मक चालना दिली आहे. पण त्यांनी या लोकांना त्यांच्या जाती आणि समाजाच्या संदर्भात ओळखले.

आंबेडकरांच्या समान स्थानाचे प्रतीक काय होते याचा कळस त्यांनी प्रतिबिंबित केला हे त्यांचे श्रेय म्हणता येईल. दलित जातींच्या नावाखाली सत्तेचा पाठपुरावा करणाऱ्या या आयकॉनची राजकीय प्रभावीता कांशीराम यांनी चतुराईने आत्मसात केली. बहुसंख्य समाजाकडून उपेक्षितपणाचा सामना करणार्या धार्मिक अल्पसंख्याकांना त्यात सहज जोडून संसदीय भाषेत एक मजबूत मतदारसंघ बनवता येईल. प्रत्येकाला ते माहित होते परंतु ते

कसे अंमलात आणायचे हे कोणालाही माहिती नव्हते. कांशीराम या कामात काही ठराविक अंशी तरी यशस्वी झालेले दिसत आहेत. या यशामागे काही ऐतिहासिक घडामोडी आणि परिस्थितीजन्य घटक यांचा संयोग असल्याचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यास दिसून येईल. या यशाचा उपयोग आपल्या घटकांमध्ये वर्गीय ओळख निर्माण करण्यासाठी क्रांतिकारी कार्यक्रम राबविण्यासाठी केला जात नाही तोपर्यंत ते अल्पायुषी आणि भ्रामक असेल. तसे न केल्यास, त्यांच्या एकजुटीसाठी आणि निष्ठेसाठी सत्ती पुन्हा निर्माण करण्यासाठी एखाद्याला सतत प्रयत्न करावे लागतील. कोणताही वर्ग-अजेंडा नसताना, जे निश्चितपणे बसपचे आहे, या सत्ती केवळ हेराफेरीच्या राजकारणातूनच निर्माण केल्या जाऊ शकतात ज्यासाठी राजकीय शक्ती एक आवश्यक संसाधन आहे. बसपचा सत्तेचा निःसंदिग्ध प्रयत्न मुळात याच गरजेतून चालतो. अत्याचाराच्या प्रकरणांच्या सांख्यिकीय पुराव्यांवरून आणि त्याच्या राजवटीत गरीब लोकांच्या एकूण परिस्थितीवरून लक्षात येण्यासारख्या विषयातील लोकांच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया या प्रक्रियेमध्ये पाहणे व्यर्थ आहे. या प्रकारच्या रणनीतीच्या अत्यावश्यकतेने चळवळीला सत्ताधारी वर्गाच्या छावणीत नेले पाहिजे, जसे बसपच्या बाबतीत घडले आहे.

अलीकडेच यूपीमध्ये थेट राज्य सत्तेत वाटाण्याच्या टप्प्यावर पोहोचलेल्या काँग्रेस, भाजप, अकाली दल (मन) सोबत बसपाची निवडणूक वार्ता, मूलत: अध:पतनाची ही प्रक्रिया प्रतिबिंबित करते आणि आज त्याची वर्ग वैशिष्ट्ये उघड करतात, याला खुद्द बसपा या चिन्हाचा कायम पाठिंबा असल्याचे दिसते.

कांशीरामचे आंबेडकरांचे वाचन या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करते की एका बाजूला विविध भारतीय राजकीय पक्ष आणि गट आणि दुसरीकडे वसाहतवादी सत्ता यांच्यातील विरोधाभासांमुळे आंबेडकरांना त्यांच्या चळवळीसाठी जागा तयार करावी लागली. त्यांचा बहुतेक काळ, त्यांनी मुस्लीम लीग आणि काँग्रेसकडून या जागेचा जास्तीत जास्त वाढ करण्याचा प्रयत्न केला आणि अखेरीस दलितांचा मुद्दा राष्ट्रीय राजकीय अजेंड्यावर आणला. कांशीराम आपल्या आंबेडकरी आयकॉनला अशा प्रकारच्या अतिप्रचंडतेने भरून ठेवतात की ते भोळ्या दलित जनतेला विश्वासार्ह वाटेल. हा चिन्ह त्याच्या एकमेव विचारधारेला मान्यता देतो की त्याच्या पक्षाची राजकीय सत्ता दलितांच्या सर्व समस्या सोडवू शकते. त्यांना लोकशाहीची पर्वा नव्हती. काही प्रमाणात ही गैर-लोकतांत्रिक भूमिका त्याच्या पक्षाच्या संरचनेवर एकहाती सत्ता असण्याची त्यांची सत्ती दर्शवते, कारण त्याशिवाय त्यांचे विरोधक ते गुंडाळतील. कोणत्याही कार्यक्रमासाठी किंवा जाहीरनाम्यासाठी त्यांची उपयुक्तता नव्हती, कोणत्याही मार्गाने आपली शक्ती वाढवणे हा त्यांचा एकमेव ध्यास होता. बहुजनांना सक्षम बनवण्याच्या वक्तृत्वात या सक्षमीकरणाचा नेमका अर्थ काय आणि त्यातून त्यांना कोणते फायदे होतील हे दाखवून देण्याची गरजही वाटत नाही.

सत्ता काबीज करण्याच्या ध्यासामुळे आंबेडकरांनी कधीच तडजोड केलेली नाही किंवा मूलभूत मूल्ये हिरावून घेतली नाहीत. आंबेडकरांच्या चळवळीचे मूळ मूल्य स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांनी व्यक्त केले. कांशीराम यांना राजकीय आणि पैशाच्या सत्तेपेक्षा कुठलीही किंमत मानली जात नाही. आंबेडकरांसाठी राजकीय सत्ता हे एक साधन होते,

कांशीरामांसाठी ते शेवटचे दिसते. आंबेडकरांच्या १९२० च्या चळवळीची प्रतिकृती बनवण्याच्या त्यांनी केलेल्या अनावश्यक प्रयत्नातून कांशीरामचे मूळ शोधले जाऊ शकते.

कांशीरामच्या आतापर्यंतच्या नोंदीवरून स्पष्टपणे दिसून येते की राजकीय सत्तेत वाटा देण्याचे वचन देणाऱ्या कोणाशीही हातमिळवणी करण्यास ते तयार आहेत. आंबेडकरांनी त्यांच्या चळवळीसाठी भांडवलशाही आणि ब्राह्मणवाद हे दुहेरी शत्रू म्हणून निदर्शनास आणले परंतु कांशीरामने त्यांना उत्साहाने स्वीकारले.

आंबेडकरांच्या १९२० च्या चळवळीची प्रतिकृती बनवण्याच्या त्यांनी केलेल्या अनावश्यक प्रयत्नातून कांशीरामचे मूळ शोधून काढता येते. आंबेडकरांना राजकीय शक्तीचे सामर्थ्य लक्षात आल्यावर, त्यांनी त्यांचा भारतीय मजूर पक्ष सुरू केला ज्याने जातीच्या रेषेच्या पलीकडे जाऊन कामगार वर्गाला एकत्र आणण्याची त्यांची इच्छा प्रतिबिंबित केली. जेव्हा राजकीय ध्रुवीकरणाने जातीय वळण घेतले तेव्हाच त्यांनी आपला ILP प्रकल्प सोडून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन सुरू केले. कांशीराम यांच्यासाठी, जात आणि समुदायाशिवायची चर्चा कदाचित एक अनास्था आहे. त्यांचे जातीयवादी व्यासपीठ त्यांच्या सत्तेच्या महत्त्वाकांक्षेने पूर्वनिश्चित केलेले दिसते. कांशीरामच्या आतापर्यंतच्या नोंदीवरून स्पष्टपणे दिसून येते की राजकीय सत्तेत वाटा देण्याचे वचन देणाऱ्या कोणाशीही हातमिळवणी करण्यास ते तयार आहेत. जाहीरपणे तो सर्व रंगांच्या डाव्या विचारांना टाळेल आणि सर्व प्रकारच्या प्रतिगामी लोकांची मैत्री स्वीकारेल. आंबेडकरांनी त्यांच्या चळवळीसाठी भांडवलशाही आणि ब्राह्मणवाद हे दुहेरी शत्रू म्हणून निदर्शनास आणून दिले पण कांशीरामने त्यांच्या विवेकाला धक्का न लावता उत्साहाने त्यांना स्वीकारले. आंबेडकर त्यांच्या पद्धतीने दलित चळवळीसाठी योग्य वैचारिक वाहकाच्या शोधात आहेत. कांशीरामांना अशा गोष्टीची उपयोगिता नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) कांशीरामच्या चळवळीवर एक टीप लिहा.

### ११.२.११ मंडल आयोग:

मंडल आयोग, ज्याने अनेक पुरोगामी पक्षांना आणि लोकांना मागासलेल्या जातींच्या आरक्षणाचा विस्तार कायम ठेवण्यास प्रोत्साहित केले, त्यांनी लोकांच्या जातीय ओळख मजबूत करण्यात मोठे योगदान दिले आहे. जेवढे ते मागासलेल्या जातींना, प्रत्यक्षात त्यांच्या श्रीमंत वर्गांना सशक्त बनवते, तितकेच खेड्यातील दलितांची सापेक्ष स्थिती बिघडते.

### ११.२.१२ दलित आणि समकालीन भारतीय राजकारण:

भारतीय राज्यघटनेने दलितांच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी, अनुसूचित जाती आणि जमातींचा समावेश करून त्यांना वरची सामाजिक गतिशीलता प्राप्त करण्यास सक्षम करण्यासाठी विधिवत विशेष तरतुदी केल्या आहेत, परंतु या सवलती केवळ हिंदू राहिलेल्या दलितांपुरत्याच मर्यादित आहेत. इतर धर्मात धर्मांतरित झालेल्या दलितांमध्ये अशी मागणी आहे की त्यांनाही वैधानिक लाभ मिळावा, ऐतिहासिक अन्याय दूर व्हावा आणि बंद व्हावा.

भारतीय राजकारणात हिंदुत्वाच्या (हिंदू राष्ट्रवाद) भूमिकेच्या उदयासोबत आणखी एक मोठा राजकीय आरोप आहे तो म्हणजे धर्मांतराचा. या राजकीय चळवळीचा आरोप आहे की दलितांचे धर्मांतर हे कोणत्याही सामाजिक किंवा धर्मशास्त्रीय प्रेरणांमुळे होत नसून शिक्षण आणि नोकऱ्यांसारख्या मोहांमुळे होते. समीक्षकांचा असा युक्तिवाद आहे की धर्मांतरावर बंदी घालणाऱ्या कायद्यांमुळे आणि भारतीय समाजातील या मागासलेल्या घटकांसाठी सामाजिक सवलतीची मर्यादा धर्मांतर करणाऱ्यांसाठी रद्द करण्यात आल्याने उलट सत्य आहे. अनेक दलितही हिंदुत्वाच्या विचारसरणीचा भाग बनत आहेत. सरकारी नोकऱ्या आणि विद्यापीठ प्रवेशांमधील कोट्याद्वारे दलितांच्या उत्थानासाठी सरकारने केलेल्या सकारात्मक-कृती उपायांचा आणखी एक राजकीय मुद्दा आहे. राष्ट्रीय आणि राज्य संसदेतील जागा अनुसूचित जाती आणि जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत, दलितांना समान प्रमाणात राजकीय आवाज मिळेल याची खात्री करण्यासाठी बी.आर. आंबेडकर आणि इतर दलित कार्यकर्त्यांनी मागितलेला उपाय. भारताच्या बिहार राज्याच्या भागात मोठ्या प्रमाणात उच्च-वर्णीय जमीनदारांद्वारे चालवल्या जाणाऱ्या अतिरेकी मिलिशिया रणवीर सेना सारख्या सीमावर्ती गटांमध्ये दलितविरोधी पूर्वग्रह अस्तित्त्वात आहेत. ते दलितांना समान किंवा विशेष वागणूक देण्यास विरोध करतात आणि दलितांना दाबण्यासाठी हिंसक मार्गांचा अवलंब करतात.

१९९७ मध्ये एक दलित, बाबू जगजीवन राम भारताचे उपपंतप्रधान बनले , के.आर. नारायणन पहिले दलित राष्ट्रपती म्हणून निवडून आले, के जी बालकृष्णन भारताचे पहिले दलित सरन्यायाधीश झाले.

तथापि, जातीय निष्ठा ही मतदारांची मुख्य चिंता होती असे नाही. त्याऐवजी, महागाई आणि सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या इतर समस्यांना जातीचा विचार न करता मतदारांचे सर्वोच्च प्राधान्य होते. दामोदरम संजीवय्या (आंध्र प्रदेश), मायावती उत्तर प्रदेशच्या चार वेळा मुख्यमंत्री, बिहारचे मुख्यमंत्री जितन राम मांझी हे दलित मुख्यमंत्री बनले आहेत. आधुनिक भारताच्या व्यवसायात आणि राजकारणात काही दलित यशस्वी झाले आहेत. भेदभावविरोधी कायदे असूनही, अनेक दलितांना अजूनही सामाजिक कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. दलित आणि गैर-दलित यांच्यातील जातीय तणाव आणि जाती-संबंधित हिंसाचार पाहिला गेला आहे. अशा तणावाचे कारण आर्थिकदृष्ट्या वाढणारे दलित आणि दलितांविरुद्ध सततचे पूर्वग्रह असल्याचा दावा केला जातो.

दलित ऐक्यासाठी झटणाऱ्यांच्या प्रयत्नांची कोणत्याही प्रकारे निंदा न करता, भारतातील सर्व दलित, सर्व जाती, रंग आणि रंगांचे एकत्र आले, तरी ते इतर अत्याचारित जातींच्या मदतीशिवाय कोणतीही सत्ता मिळवू शकत नाहीत. कारण ते फक्त १६ टक्के किंवा त्याहून अधिक आहेत. बऱ्याच दलितेतर जातींना जातिव्यवस्थेने केलेल्या कुप्रथेची जाणीव होत आहे, ते दलितांशी संवाद साधत आहेत आणि त्यांच्याशी एकरूप होत आहेत, जसे उत्तर भारतीय राज्यांमध्ये दिसून येते. 'ऐक्य'च्या गप्पा मारणारे 'प्रबळ जाती'चे आहेत आणि म्हणून 'एकात्मते'मध्ये अन्यायकारक स्वार्थ बाळगतात, असा विचार करणे त्यांच्या प्रयत्नांवर अन्याय होईल. त्यांनी मिळवलेले वर्चस्व हे त्यांच्या 'एकता चर्चेचे' कारण नाही, तर ते त्याचे फलित आहे. फुले, शाहू आणि आंबेडकरांनी ऐक्याचा विचार करण्यापूर्वी, सर्व

दलित जातींची स्थिती कमी-अधिक प्रमाणात सारखीच होती, कोणीही प्रबळ नव्हते आणि सर्व BSO च्या अधीन होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) दलित आणि समकालीन भारतीय राजकारणाचे पुनरावलोकन करा.

## ११.३ सारांश

आंबेडकरी चळवळ ही केवळ दलितांसाठीची नव्हे, तर सर्व भारतीयांसाठी समतेचे आणि न्यायाचे प्रतीक आहे. ही चळवळ एक सामाजिक क्रांती होती – ज्यामध्ये व्यक्तीच्या मानवी हक्कांचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार केला गेला. आजही ही चळवळ नव्या स्वरूपात, नव्या माध्यमांतून आणि नव्या नेतृत्वात समाजपरिवर्तनासाठी प्रयत्नशील आहे.

इ. स. १९५७ ते इ. स. २००० हा काळ आंबेडकरी चळवळीच्या सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा होता. या कालखंडात दलित समाजाने शिक्षण, साहित्य, धर्म, राजकारण व समाजकारण या सर्व क्षेत्रांत ठसा उमटवला. डॉ. आंबेडकरांचे विचार केवळ दलित समाजापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारताच्या सामाजिक परिवर्तनाचा मार्गदर्शक ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूनंतर (१९५६), आंबेडकरी चळवळ एका नव्या टप्प्यात प्रवेश करते. त्यांच्या विचारांचा प्रसार आणि सामाजिक क्रांतीचे कार्य पुढे नेण्याची जबाबदारी अनुयायांवर आली. त्यामुळे चळवळ केवळ व्यक्तिनिष्ठ न राहता, एक संघटनात्मक, बौद्धिक व सांस्कृतिक स्वरूप धारण करते. १९५७ ते २००० या काळात ही चळवळ सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी मार्ग बनली.

भारतातील दलितांच्या स्थितीत सामाजिक-राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी दलित चळवळ ही निषेध चळवळ म्हणून सुरू झाली. शतकानुशतके उच्चवर्णीयांकडून दलितांचे निर्दयपणे शोषण झाले आणि ते अमानुषपणे दबले गेले. ब्राह्मण संस्कृतीच्या वर्चस्वामुळे ते अलिप्त, खंडित आणि अत्याचारित झाले आहेत. नवीन राज्यव्यवस्था, आधुनिकोत्तर प्रशासकीय चौकट, तर्कसंगत न्यायव्यवस्था, जमिनीचा कार्यकाळ आणि कर आकारणीचे सध्याचे प्रकार, व्यापाराचे नवीन नमुने, उदारमतवादी शिक्षण प्रणाली आणि संवादाचे जाळे यांनी स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायाच्या भावनेवर भर दिला. दलित चळवळ दलितांना हक्क आणि विशेषाधिकार प्रदान करते. रुमन सूत्रधार (२०१४) लिहितात की दलित चळवळ ही एक सामाजिक क्रांती आहे ज्याचा उद्देश सामाजिक बदलासाठी आहे, भारतातील पदानुक्रमित भारतीय समाजातील जुन्या दलित चळवळींची जागा घेत आहे आणि ती स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक न्यायाच्या लोकशाही आदर्शांवर आधारित आहे. शतकानुशतके सामाजिक-सांस्कृतिक बहिष्कार, आर्थिक वंचितता आणि राजकीय शोषण यामुळे दलितांना अशा प्रकारच्या जुन्या पूर्वग्रहांपासून मुक्तता मिळाली, असेही ते स्पष्ट करतात. त्यामुळे त्यांनी साहित्याच्या साहाय्याने किंवा दलित पँथर्ससारख्या संघटना स्थापन करून आंदोलन करण्यास सुरुवात केली आणि या आंदोलनाला दलित चळवळ म्हणून मान्यता मिळाली. उत्तरआधुनिक संशोधक, सामाजिक शास्त्रज्ञ आणि अभ्यासकांनी दलित चळवळीचा अभ्यास करण्याची त्यांची आवड निर्माण

केली आहे कारण ही भारतातील एक महत्त्वाची सामाजिक चळवळ आहे. विविध दलित नेत्यांनी त्यांच्या संघटना आणि राजकीय पक्षांद्वारे सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दलित जनतेला एकत्रित आणि प्रेरित केले आहे. बहुजन समाज पक्षाच्या बळकट एकत्रीकरणामुळे दलितांना देशातील लोकशाही निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता आले आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करता आली. दलित नेत्यांनी राजकीय कार्यालये, सरकारी नोकऱ्या आणि कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये आरक्षण टिकवून ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी चळवळ सुरू केली. त्याला दलितांच्या नव्या राजकीय चळवळी म्हणतात. दलित चळवळीने भारतीय समाजाच्या जातीय रचनेत परिवर्तन घडवून आणले आणि स्वाभिमानाच्या लढ्यावर भर दिला. सध्याची आरक्षण व्यवस्था ही दलित चळवळीची परिणती आहे.

वास्तविक पाहता दलित चळवळीने लोकशाहीला बळकटी मिळवून दिली आहे याची अनेक उदाहरणे देता येतील. दलितांचा निवडणुकीतील सहभाग, मोठ्या संख्येने मतदानात सहभाग, अन्यायाविरोधात संघर्ष आणि सामुदायिक प्रतिनिधित्वासाठी आग्रह धरणे व त्यासाठी चळवळ करणे इ.

इ.स. १९५७ ते २००० या कालखंडात आंबेडकरी चळवळीने सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने ठोस पावले उचलली. धर्म, साहित्य, शिक्षण, राजकारण आणि विचारांमधून या चळवळीने भारतीय समाजव्यवस्थेत नवे वळण दिले. बाबासाहेबांनी दिलेल्या चैतन्याचा प्रभाव या काळात सर्वत्र जाणवतो. ही चळवळ अजूनही परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## ११.४ प्रश्न

१. सामाजिक चळवळीतील डॉ. आंबेडकरांचे योगदान स्पष्ट करा.

२. आंबेडकरी सामाजिक चळवळ कोणत्या टप्प्यांतून गेली ते सांगा.

३. निवडणुकीच्या राजकारणातील दलित आणि त्यांच्या संघटनांच्या भूमिकेचे विश्लेषण करा.

४. रिपब्लिकन पक्षाची पहिली फूट पडण्याची कारणमीमांसा करा.

५. दलित पँथर्स चळवळीवर चर्चा करा.

६. कांशीरामच्या चळवळीवर एक टीप लिहा.

७. दलित आणि समकालीन भारतीय राजकारणाचे पुनरावलोकन करा.

## ११.५ संदर्भ

१. नामदेव ढसाळ, दलित पँथर : एक संघर्ष.

२. शरणकुमार लिंबाळे, दलित पँथर.

३. अर्जुन डांगळे, दलित पँथर : अधोरेखित सत्य.

४. ज. वि. पवार, आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ (खंड 4 था).

५. गोरे, एम. एस., एका विचारसरणीचा सामाजिक संदर्भ: आंबेडकरांचे राजकीय आणि सामाजिक विचार, सेज पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, १९९३.

६. जोशी बार्बरा आर., अनटचेबल!: दलित मुक्ती चळवळीचे आवाज, झेड बुक्स, १९८६.

७. लिंबाळे शरणकुमार, दलित साहित्याच्या सौंदर्याच्या दिशेने, ओरिएंट लाँगमन, २००४.

८. मायकल एस.एम., आधुनिक भारतातील दलित – व्हिजन अँड व्हॅल्यूज, सेज पब्लिकेशन्स, २००७.

९. ओमवेद गेल, दलित व्हिजन: द अँटी कास्ट मूव्हमेंट अँड द कन्स्ट्रक्शन ऑफ अ इंडियन आयडेंटिटी, ओरिएंट लाँगमन, २००६.

१०. प्रकाश प्रेम, आंबेडकर: राजकारण आणि अनुसूचित जाती, आशिष पब्लिशिंग हाऊस, रॅाब, पीटर (सं.), नवी दिल्ली, १९९३.

११. शब्बीर, मोहम्मद (सं.), बी.आर. आंबेडकर: स्टडी इन लॉ अँड सोसायटी, रावत पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, १९९७.

१२. शर्मा प्रदीप के., दलित राजकारण आणि साहित्य, शिप्रा प्रकाशन, २००६.

*****

# १२

# कामगार चळवळी आणि आदिवासींच्या चळवळी: समस्या

**घटक रचना**


१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रस्तावना

१२.२ कामगार चळवळीचे चार टप्पे

१२.२.१ पहिला टप्पा: कामगार चळवळीचा उदय (१८५० ते १९१८ चा कालावधी)

१२.२.२ दुसरा टप्पा: दबाव गटांचा उदय (१९१८ ते १९४७ पर्यंतचा कालावधी)

१२.२.३ तिसरा टप्पा: इंटक (INTUC) ची भूमिका (१९४८ ते १९६० चा कालावधी)

१२.२.४ चौथा टप्पा: चळवळींचे एकत्रीकरण आणि विविधीकरण (१९६० आणि त्यानंतरचा कालावधी)

१२.३ आदिवासी समाज आणि अर्थव्यवस्था

१२.४ आदिवासी चळवळी (१९४७-२०००)

१२.४.१ स्वातंत्र्यपूर्व काळ

१२.४.२ स्वातंत्र्यानंतरचा काळ

१२.४.३ झारखंड आंदोलन

१२.४.४ उत्तर-पूर्व आदिवासी चळवळी

१२.४.५ नागा चळवळ

१२.४.६. खाणकाम विरुद्ध आदिवासी चळवळी

१२.४.७ कृषी आणि वन-आधारित हालचाली

१२.५ आदिवासी चळवळींची वैशिष्ट्ये आणि परिणाम

१२.६ सारांश

१२.७ प्रश्न

१२.८ संदर्भ

## १२.० उद्दिष्ट्ये

हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल.

१. भारतातील श्रमशक्तीचे स्वरूप अभ्यातील.

२. स्वातंत्र्यानंतरच्या ट्रेड युनियन चळवळीची मुख्य वैशिष्ट्ये जाणून घेतील.

३. सध्याच्या काळात कामगारांना भेडसावणा-या समस्या आणि त्यांचा प्रतिकार करण्यासाठी अवलंबलेले उपाय समजून घेतील.

४. भारतातील कामगार चळवळीच्या वाढीचे विश्लेषण करतील.

६. भारतातील आदिवासींचा अर्थ आणि मुख्य वैशिष्ट्ये समजून घेतील.

७. भारतातील आदिवासींची सामाजिक-आर्थिक परिस्थिती जाणून घेतील.

८. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आदिवासी चळवळींची माहिती समजून घेतील.

९. भारतातील आदिवासी चळवळींची कारणे आणि परिणामांचे मूल्यांकन करतील.

१०. भारतातील प्रमुख आदिवासी बंडखोरी समजून घेतील.

## १२.१ प्रस्तावना

भारतातील कामगार चळवळ समजून घेण्यासाठी योग्य प्रारंभिक बिंदू म्हणजे भारतातील औद्योगिकीकरणाची प्रक्रिया. कारखानदारी आणि आधुनिक उद्योगधंद्यांमुळे भारतीय समाजाची वैशिष्ट्ये आणि स्वरूप बदलले. यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेचा कायापालट झाला आणि नवीन उत्पादन यंत्रणेच्या अनुषंगाने श्रमविभाजनाची पद्धत बदलली. भांडवलदार (कारखाना मालक) आणि कामगार असे दोन वर्ग उदयास आले.

आधुनिक उद्योग हे नफ्याच्या तत्वावर कार्य करत असल्यामुळे कामगारांकडून वाढीव काम करून घेणे, कमीत कमी पगार देणे, कामकाजाचे तास वाढवणे, पदोन्नतीस उशीर करणे, रोजगारात कपात करणे, कामाच्या ठिकाणावरील सुविधांचा अभाव असे प्रकार अस्तित्वात येऊ लागले. या परिस्थितीमुळे कामगारांनी एकत्र येऊन भारतातील व्यवस्थेचा निषेध करण्यास सुरुवात केली.

जमाती ही एक वसाहतवादी संकल्पना आहे, जी १९व्या शतकात भारतातील सर्व समुदायांचे वर्णन करण्यासाठी वसाहतवादी अधिकारी आणि वांशिक शास्त्रज्ञांनी मांडली.

त्याच शतकाच्या उत्तरार्धात, जमातीची संकल्पना जातींपासून भिन्न म्हणून आदिम गटांपर्यंत संकुचित करण्यात आली. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यानुसार आणि भारतीय राज्यघटनेनुसार अनुसूचित जमातीचे नाव पूर्णपणे उदयास आले. भारतीय राज्यघटनेत जमातीची व्याख्या केलेली नाही. अनुसूचित जमातीच्या कल्पनेला दोन पैलू आहेत. हे प्रशासकीयदृष्ट्या मागासलेपणा आणि दुर्गमतेच्या निकषांद्वारे निर्धारित केले जाते- जंगलात आणि टेकड्यांवर राहणारे लोक. त्यांना आदिवासी – मूळ निवासी असेही म्हणतात. इतर अनेक सामाजिक गटांप्रमाणेच आदिवासींनीही त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सामाजिक आणि राजकीय चळवळी सुरू केल्या आहेत. दक्षिणेकडील भाग, उत्तर-पश्चिम प्रदेश आणि बेटे वगळता बहुतेक प्रदेशांनी वसाहती आणि वसाहतोत्तर काळात आदिवासींची अनेक आंदोलने पाहिली आहेत. वसाहतपूर्व काळात आदिवासी मराठा किंवा राजपूतांच्या प्रादेशिक सत्तेच्या विरोधात उठले. त्यांनी जमीनदार आणि बिगर आदिवासी प्रशासकांविरुद्ध प्रतिकार केला. वसाहतीच्या काळात त्यांनी स्वायत्ततेसाठी ब्रिटिश राजवटीविरुद्ध संघर्ष केला. मध्य भारतातील बिरसा मुंडा बंड हे याचे उत्तम उदाहरण आहे. धार्मिक कल्पनांद्वारे बिगर-आदिवासी सांस्कृतिक अधिकाराच्या विरोधात प्रादेशिक-राजकीय चळवळी देखील होत्या.

## १२.२ कामगार चळवळीचे चार टप्पे

**कामगार वर्गाची चळवळ मुख्यत्वे चार टप्प्यांत विभागली जाऊ शकते:**

### १२.२.१ पहिला टप्पा: कामगार चळवळीचा उदय (१८५० ते १९१८ चा कालावधी):

पहिला टप्पा प्राथमिक स्वरूपाचा होता. पूर्वनियोजन आणि पूर्वसंघटन न करता कामगारांच्या गटांनी केलेला निषेध स्वयंस्फूर्त असला तरी स्वतंत्र घटनांपुरता मर्यादित होता. मार्च, १८७५ मध्ये शापूरजी बेंगाली यांनी कामगारांच्या असमाधानकारक परिस्थितीविरुद्ध बंड केले. त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून १८८१ मध्ये पहिला कारखाना कायदा लागू झाला. नारायण मेघाजी लोखंडे यांचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. देशातील पहिली कामगार संघटना 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन' ही २३ सप्टेंबर १८८४ रोजी लोखंड्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली. त्यांनी कामगारांच्या मागण्या व समस्या समजून घेण्यासाठी मुंबई प्रांतामध्ये गिरणी कामगारांची परिषद आयोजित केली आणि कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी ठराव संमत केले. नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतीय कामगार चळवळीचे जनक मानले जाते.

दुसऱ्या टप्प्यात कामगारांना भेडसावणाऱ्या अडचणी व समस्यांबद्दल जाणीवपूर्वक आकलन केले गेले. कामगार संघटनांची स्थापना ही या टप्प्यातील महत्त्वाची उपलब्धी होती. अनेक समाजधुरिणांनी कामगारांमधील असंतोषाची जाणीवपूर्वक दखल घेतली आणि परिस्थितीवर उपाय म्हणून कल्याणकारी उपाययोजना अमलात आणण्याचा प्रयत्न केला. अनेक विद्वानांच्या मतानुसार ही कामगारांची चळवळ म्हणून असण्याऐवजी कामगारांसाठीची चळवळ म्हणून दृगोचर झाली. तसेच ही चळवळ सौम्य स्वरूपाची होती.

**आपली प्रगती तपासा.**

१) १८५० ते १९१८ या कालावधीतील कामगार चळवळीचा उदय व वाढ स्पष्ट करा.

### १२.२.२ दुसरा टप्पा: दबाव गटांचा उदय (१९१८ ते १९४७ पर्यंतचा कालावधी):

पहिल्या महायुद्धानंतर अर्थव्यवस्था व उद्योगात अनेक बदल घडून आले. वस्तूंच्या किमती व नफा वाढला परंतु कामगारांच्या रोजगाराची आणि कामाची परिस्थिती सुधारली नाही. यामुळे कामगारांमध्ये असंतोष व अशांतता निर्माण झाली. संप हे कामगारांच्या हातातील एक प्रमुख अस्त्र असते. कामगारांच्या असंतोषाचे प्रतिबिंब १९१८ ते १९२० या कालावधीतील अनेक संपांच्या रूपाने दिसून आले. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, मद्रास (चेन्नई) येथील कापड गिरणी कामगार, कानपूरची लोकर गिरणी, कलकत्त्याच्या जूट गिरण्या, जमशेदपूरची स्टील कंपनी, मुंबई व जबलपूरमधील रेल्वे कामगार आणि मुंबईचे गोदी कामगार यांची निदर्शनेही झाली. यांपैकी बहुतेक संप उत्स्फूर्तपणे केले गेले आणि बहुतांश संप हे रोजगार आणि वेतन अशा कारणांशी संबंधित होते.

कामगार संघटनांचा दबावगट म्हणून उदय ही या चळवळीतील प्रगतीदर्शक घटना म्हटली जाऊ शकते. वाढत्या असमाधानकारक औद्योगिक वातावरणामुळे भारतात कामगार संघटनेची चळवळ अधिक संघटितपणे उभी राहिली. ऑक्टोबर १९२० मध्ये ६४ कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची परिषद आयोजित केली गेली. याचा परिणाम म्हणून लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कामगार संघटना काँग्रेसची (AITUC) स्थापना झाली. १९२६ मध्ये सरकारने इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट संमत केला ज्यायोगे सर्व नोंदणीकृत संघटनांना घटनात्मक मान्यता देण्यात आली. या अधिनियमांतर्गत १९२६ साली मान्यता प्राप्त करणारी पहिली संघटना म्हणजे ना. म. जोशी यांच्या नेतृत्वाखालील बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियन.

कामगार चळवळीतील मार्क्सवादी विचारांचा प्रमुख प्रभाव असलेल्या डाव्या विचारसरणीचा उदयदेखील याकाळात झाला. त्यातून शोषणात्मक व्यवस्थेला रोखण्याच्या हेतूने कामगार वर्गाला भांडवलशाही रचनेच्या विरोधात संघटित होण्याची पार्श्वभूमी निर्माण झाली.'महामंदी' या जागतिक आर्थिक संकटाचा भारतातील कामगार चळवळीवर विपरित परिणाम झाला. संपांची वारंवारिता वाढली आणि कामगार संघर्ष अधिक तीव्र करण्यात मुझफ्फर अहमद, श्रीपाद अमृत डांगे या नेत्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. वेगवेगळ्या वैचारिक पार्श्वभूमी असलेल्या कामगार संघटनांची संख्या वाढली. यांच्यात समन्वय साधण्यासाठी नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन (एनटीयूएफ) ची स्थापना केली गेली.

एआयटीयूसी आणि एनटीयूएफच्या एकत्रित प्रयत्नांमुळे परिस्थितीत फारसा बदल झाला नाही आणि वेगवेगळ्या संघटनांमध्ये तणाव व वैर कायम राहिले.

समग्र भारतातील कामगारांची स्थिती अत्यंत निराशाजनक होती. मालक-भांडवलदार वर्ग दुर्बल, असंघटित कामगारांना वाटेल तसा राबवित होता. कामगार संघटनासुद्धा मलिकधार्जिण्या वृत्तीचे असल्यामुळे कामगारांचे अस्तित्व गोठवून टाकले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कामगारांबद्दल आस्था होती. जिव्हाळा होता. कामगारांनी

स्वाभिमानशून्यतेचे जीवन कंठणे नाकारले पाहिजे. अन्यथा गुलामीचे जीवन जगावे लागेल, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश मंत्रिमंडळात मजूर मंत्री होते. त्यांनी समायोजन कार्यालयाची ( एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) स्थापना केली. त्यामुळे बऱ्याच जणांना रोजगार मिळाला. समग्र भारतातील कामगार आणि कामगार चळवळ, कामगार कायदे, स्त्री कामगाराबद्दलची आत्मीयता, त्यांच्या कौटुंबिक संसाराविषयीची चिंता, त्यांच्या जीवनाच्या उत्थान, उन्नतीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच सुकर झाला. डॉ. बाबासाहेब आंबडेकर नसते तर कामगारांचे भवितव्य अंधकारमय झाले असते.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९१८ ते १९४७ या कालावधीतील कामगार चळवळीच्या प्रगतीचा आढावा घ्या.

### १२.२.३ तिसरा टप्पा: इंटक (INTUC) ची भूमिका (१९४८ ते १९६० चा कालावधी):

सन १९४७ मध्ये इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस (इंटक) ची स्थापना झाली. १९४८ मध्ये कामगारांच्या हक्कांच्या रक्षणासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजकीयरीत्या असंलग्न अशी स्वतंत्र संस्था स्थापन केली गेली. ही हिंद मजदूर सभा (एचएमएस) होय. जे एचएमएसच्या तत्वांशी सहमत नव्हते त्यांनी १९४९ मध्ये युनायटेड ट्रेड युनियन कॉंग्रेस (यूटीयूसी) नावाची एक समांतर संस्था स्थापन केली. १९५५ मध्ये भारतीय मजदूर संघ (बीएमएस) ची स्थापना झाली. १९४७ मध्ये कॉंग्रेसची सत्ता आल्यावर कामगार संघटनांच्या उपक्रमांचे परीक्षण सुरू झाले. वेळप्रसंगी टीकाही झाली. सर्वात महत्त्वाची टीका म्हणजे सरकारचा कामगार संघटनांच्या कामातील हस्तक्षेप ही होय.

या चार प्रमुख कामगार संघटनांच्या व्यतिरिक्त इतर अनेक कामगार संघटना कामगार चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. त्यानंतरच्या काही वर्षांत कामगारांनी उद्योगपतींच्या विरोधात अनेकवेळा संपाचे हत्यार उपसले.

साठच्या दशकात कामगारांच्या तक्रारी वेतन, बोनस आणि ओव्हरटाइमशी संबंधित होत्या. परंतु, त्यानंतर त्यामध्ये कामावरून निलंबन, अन्यायकारक बडतर्फी, कामगारांचे हक्क असा बदल झाला.

त्यानंतरच्या औद्योगिक काळात, त्यात कामगारांची बढती, संधींचा अभाव, कामगारांचा सन्मान इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरू लागल्या. प्रत्येक प्रस्थापित राजकीय पक्षाने कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व आपली मतपेढी वाढविण्याच्या उद्देशाने स्वतःची कामगार संघटना विकसित केली. याचा परिणाम असा झाला की राजकीय पक्ष जितका मोठा तितकाच त्यांचा कामगारांचा गट विस्तृत व सामर्थ्यवान ठरू लागला.

त्याचप्रमाणे जर पक्षात फूट पडली तर संघटनांचे विभाजन होऊ लागले. उदाहरणार्थ, जेव्हा कम्युनिस्ट शाखा सीपीआय आणि सीपीएममध्ये विभागली गेली, तेव्हा कम्युनिस्ट शाखेने

सीपीआय हाती घेतली आणि सीपीएमने भारतीय कामगार संघटना (सीआयटीयू) नावाची स्वतंत्र संस्था स्थापन केली.

१९५० नंतर ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात भांडवल गुंतवणूक करू लागल्या, त्यांनी आपापल्या देशातील ही नवी व्यवस्थापकीय नीती तेथेदेखील राबविण्यास सुरुवात केली. या कंपन्यांची नवी व्यवस्थापकीय नीती, त्यांची एकूण आíथक सुस्थिती आणि मर्यादित स्पर्धा यामुळे तेथील कामगारांचे वेतनमान- अधिकार हे वाढत राहिले.

**आपली प्रगती तपासा.**

१) १९४८ ते १९६० या कालावधीतील कामगार चळवळीच्या प्रगतीचा आढावा घ्या.

### १२.२.४ चौथा टप्पा: चळवळींचे एकत्रीकरण आणि विविधीकरण (१९६० आणि त्यानंतरचा कालावधी):

पन्नासच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत कामगार चळवळ, कामगारांना कामाचा मोबदला, कामाची परिस्थिती इत्यादीबाबत लढा देण्यात यशस्वी ठरली.

साठच्या दशकात आर्थिक वाढ व विस्ताराची गती कमी झाली होती. आर्थिक मंदीमुळे व्यवस्थापनांनी कामगारांच्या मागण्या नाकारण्यास सुरुवात केली होती. औद्योगिक कलह कायदा १९४७ हा औद्योगिक कलहांची तपासणी तसेच त्यावर तोडगा काढण्यासाठी यंत्रणा व प्रक्रिया करून औद्योगिक शांतता व सुसंवाद सुनिश्चित करण्यासाठी पारित केला गेला. या कायद्याद्वारे कामगार व व्यवस्थापनातील संघर्ष कमी करण्यासाठी समेट, लवाद आणि न्यायालयीन निवाडा यांच्या यंत्रणा वापरण्यास अनुमती दिली गेली. अगदी प्रतिकूल परिस्थितीतही, १९७० च्या दशकापर्यंत चळवळीने कामगारांच्या हितसंबंधाचे आणि समस्यांचे प्रतिनिधित्व करण्याचे आश्वासक काम केले.

१९७० नंतर मात्र चळवळीची गती मंदावली. साधारणपणे आठ वर्षे चाललेला गिरणी कामगार संप हा शेवटचा मोठा संप होता. या ऐतिहासिक बॉम्बे टेक्सटाइल संपाची सुरुवात जानेवारी, १९८२ मध्ये मुंबईतील गिरणी कामगारांचे केंद्रीय नेते दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली झाली. एकूण ६५ कापड गिरण्यांमधील २,५०,००० कामगारांनी काम थांबवले. वेतन आणि बोनस संबंधित बाबींमध्ये वाढ करण्याची मागणी हे या संपाचे मुख्य उद्दिष्ट होते. वेतनवाढीच्या मागणीबरोबरच दत्ता सामंत यांनी १९४७ चा बॉम्बे इंडस्ट्रियल ॲक्ट रद्द करण्याची मागणी केली. तत्कालीन सरकारने कामगार संघटनांच्या मागणीला ठामपणे नकार दिला. हा संप वर्षानुवर्षे सुरू राहिला. संपामुळे उद्योगाचे मोठे नुकसान झाले आणि कामगार दारिद्र्याच्या खाईत ढकलले गेले. बऱ्याच कामगारांना त्यांचे घरदार, अल्प मालमत्ता विकून मुंबईच्या उपनगरी भागात स्थलांतरित व्हावे लागले. या संपाचा कामगार, उद्योग आणि सरकार यांच्यातील औद्योगिक संबंधांवर नकारात्मक परिणाम झाला.

१९५२ पर्यंत देशात कामगार कायद्यांचा नवा पायाच घातला गेला. त्यातून औद्योगिक विवाद सोडविण्याची नवी यंत्रणा निर्माण झाली. या कायद्याचे अर्थ लावताना १९६० ते १९८० या काळात सर्वोच्च न्यायालयाने कायद्याच्या उद्दिष्टांचा विचार करून कामगारांना अनुकूल असे निवाडे दिले.

तिसरे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील कारखानदारीचा विकास याच काळात मोठ्या प्रमाणात झाला. तेथेदेखील कामगार संघटनांच्या अधिकारांना मोठा वाव मिळाला.

चौथे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील नि:स्वार्थी ध्येयवादी राजकीय नेतृत्व हे वरील सर्व परिस्थितीत सर्वात प्रभावी ठरले. या घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून १९८० पर्यंत ज्याला संघटित कामगार म्हणतात, त्या मोठ्या कारखान्यातील कामगारांच्या चळवळीला खूप मोठे उधाण आले.

पण हे यश अनेक मर्यादांनी ग्रस्त होते. त्याचा पाया हा मोठ्या शहरातील मोठ्या कारखान्यांपुरता मर्यादित होता. स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणे, त्याची व्याख्या आणि व्याप्ती उद्योग अशी न राहता, एकेका कारखान्यापुरती संकुचित झाली होती. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मोठ्या कारखान्यांतील संघटित कामगारांचे वेतन आणि साधारणत: समाजातील कोणत्याही अन्य कष्टकरी समुदायातील कामगारांचे वेतन यातील अंतर वेगाने वाढत काही पटींपर्यंत पोहोचू लागले. वेतनाचे - नफ्याचे अर्थशास्त्रच त्यामुळे बिघडू लागले. त्यामुळे जसे कामगार चळवळ प्रभावी आणि आक्रमक होत आहे, असे दिसू लागले, तसे १९८० नंतर व्यवस्थापनांनी कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन कारखान्यांत हजारो हंगामी कामगार- कंत्राटी कामगार नेमण्यास सुरुवात केली. एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांमध्ये सरळसरळ दोन स्तर निर्माण झाले. एक संरक्षित-संघटित कायम कामगारांचा, तर दुसरा असंरक्षित हंगामी कामगारांचा. या असंरक्षित कामगारांची तसेच त्या त्या मोठ्या कारखान्यांच्या पुरवठादार हजारो छोट्या उद्योगांतील कामगारांचे वेतन मात्र त्या तुलनेत निम्म्यावर राहिले.

पूर्वीची कामगार वर्गाची चळवळ एकेका कारखान्यातील कर्मचाऱ्यांची संघटना झाली. १९८० नंतर त्यांना या उद्दिष्टासाठी डावे वैचारिक-सद्धान्तिक नेतृत्व हे अडगळीप्रमाणे वाटू लागले. त्यांनी त्यांचे त्यांचे स्थानिक नेते शोधले. व्यवस्थापनांनी लाल बावट्याला असणाऱ्या राजकीय विरोधातून, तर काही ठिकाणी तात्कालिक घटकांचा विचार करून अशा तथाकथित 'उत्स्फूर्त' नेतृत्वाला उघड उत्तेजन दिले. मात्र अपरिहार्यपणे काही ठिकाणी अशा संघटना अत्यंत आक्रमक झाल्याने अशी अराजकी, ध्येयहीन आक्रमकता म्हणजेच 'नवी' कामगार चळवळ, असे त्याचे 'कोडकौतुक' करून मुंबईच्या गिरणी कामगारांमधून लाल बावट्याच्या हद्दपारीचे सद्धान्तिक समर्थनदेखील काही तथाकथित डाव्या बुद्धिमंतांनी केले. सर्व नव्या उद्योगांमध्ये ही सिद्धान्तहीन आक्रमकता कामगार चळवळीचा 'स्वभाव' असल्याचे मानण्यात आले. शिवसेनेसारख्या उजव्या फॅसिस्ट शक्तींचा राजकीय हत्यार म्हणून वापर करूनदेखील कामगार चळवळ फोडण्यात आली.

१९६० ते १९८० ह्या काळात मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण झाले. हा कार्यकाळ कामगारांच्या उभारीचा होता. ह्याच कालखंडात मोठं मोठ्या गिरण्या अस्तित्वात आल्या होत्या. साहजिकच कामगार वर्ग सुद्धा मोठ्या प्रमाणात होता. १९९० पासून नवीन आर्थिक धोरण आले आणि कामगारांच्या आदोलनाला उतरती कळा लागली. कामगार संघटनांनी ह्या नवीन आर्थिक धोरणाचा कडाडून विरोध केला. मोठं मोठ्या गिरण्या उद्योगधंदे बंद झाले. कामगारांचे रोजगार गेले. सरकारला व व्यवस्थापनाला सध्या संघटना

नकोच आहे. सध्या वातावरण असे आहे की सरकारला आणि व्यवस्थापनाला हक्क मागणारी, न्याय मागणारी, प्रश्न विचारणारी कामगार संघटन नकोच आहे.

कामगारांच्या बाजूने कायदे कानून अस्तित्वात असून सुद्धा न्याय मिळत नाही, न्याय दिला जात नाही ह्या अश्या बिकट परिस्थितीतून कामगार जात आहे.

कामगार संघटनांची संख्या ही खूप झालेली आहे. कामगारांची एकजूट नाही हे सरकार आणि व्यवस्थापन ओळखून आहेत. त्यामुळे ह्या दुफळीचा फायदा सरकार आणि व्यवस्थापन घेत आहेत. जर आपले अधिकार टिकवून ठेवायचे असतील तर कामगारांची येकी होणे फार गरजेचे आहे व ही कामगारांची येकी होऊ नये याची काळजी सरकार घेत आहे. उलट तोडफोडची नीती अवलंबिल्या जात आहे.

संयुक्त महाराष्ट्र लढ्यातून महाराष्ट्रांना मिळालेली `मुंबई'व त्यापासून उभारून आलेली `मराठी अस्मिता' या जोरावर शिवसेना १९६६ ला जन्माला आली असली तरी, चार वेळा नगरसेवक व तेव्हा आमदार असलेल्या कृष्णा देसाई या `मराठी कामगार' नेत्याच्या खूनानंतर मात्र शिवसेनेला जहालपणाची ओळख मिळाली. रात्रीच्या अंधारातील भ्याड हल्ल्यात ५ जून, १९७० रोजी कृष्णा देसाईंचा खून झाला. मुख्यमंत्री वसंतराव नाईकांचा शिवसेनेला असलेल्या पाठिंब्यामुळे, लालबाग या कामगार चळवळीचे केंद्र असलेल्या भागात झालेल्या कृष्णा देसाई यांचा खून हा भांडवलदार उद्योगपतींच्या पथ्यावर पडला. कृष्णा देसाईंच्या खूनामुळे रिकामी झालेल्या विधानसभेच्या जागेसाठीच्या पोट निवडणुकीत त्यांच्या पत्नींचा पराभव करून शिवसेनेनी आमदारकी पटकावली व राजकारणाला `गजकर्ण' संबोधणाऱ्या शिवसेनेने राजकारणात सक्रीय पवेश केला. याच दरम्यान मुंबई या औद्योगिक नगरीतील कम्युनिस्टांच्या कामगार चळवळी फोडण्याचे भांडवलदारांनी राजकारण्यांच्या मदतीनं पद्धतशीरपणे सुरू केले. याच काळात शिवसेना प्रणीत कामगार संघटना देखील उदयास आल्या.

यातून कामगार नेतृत्वाची नवी जीवघेणी लढाई अन मागच्या दाराने भांडवलदारांना मदत करणारा छुपा कामगार नेता-कार्यकर्ता वर्ग उभा राहिला. कृष्णा देसाई हत्याकांडातून शिवसेनेचा कामगार चळवळीत शिरकाव झाला तर हेकेखोरी आणि आपसातले मतभेद यामुळे दरम्यानच्या काळात कम्युनिस्ट चळवळीच्या चिरफळ्या झाल्या. कम्युनिस्टांच्या प्रभावाखालील कामगार चळवळीमधली फूट इंटक आणि सेनेच्या पथ्थ्यावर पडत गेली. कम्युनिस्ट आणि समाजवादी यांच्यातील वैचारिक अंतर तीव्र कटुता आणि जहर प्रत्यक्ष विरोधापर्यंत पोचले. कम्युनिस्टांबद्दलच्या वैचारिक-भावनिक आकर्षणाला फार मोठी घरघर लागली. चळवळीचे रूपांतर नोकरशाहीमध्ये होण्यास सुरूवात झाली.

त्याची परिणती मुंबईमध्ये लाल बावट्याच्या कामगार संघटनांमध्ये फूट पाडण्यात झाली. त्यांचा प्रभाव जवळपास संपवला गेला. गिरणी कामगारांमधून लाल बावटा हद्दपार झाला. जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारख्या समाजवादी पुढाऱ्यानी त्या काळात शिवसेनेशी काही प्रसंगी विरोध तर काही वेळा सरळ सरळ युती केली. त्यांचा निवडणुकांत पाठिंबादेखील घेतला. त्यामुळे त्यांच्या टॅक्सी युनियन, बेस्ट, मुंबई महानगरपालिका या सारख्या संघटना टिकून राहिल्या.

मुंबईमधील गिरणी कामगारांच्या संघटनांमध्ये, तसेच एकूण कापड, सूत, वाहतूक,साखर, नागरी बँका यासारख्या क्षेत्रात काँग्रेसने मुंबई औद्योगिक संबंध कायद्याचा वापर (BIR Act) अतिशय हुषारीने करून घेतला.त्या कायद्याचे स्वरूप इतके नोकरशाही आणि केंद्रीकरणास उत्तेजन देणारे आहे की, जरी एखाद्या परिस्थितीमध्ये १००टक्के कामगार प्रस्थापित प्रातिनिधिक संघटनेच्या विरोधात गेले तरी प्रत्यक्षात कायद्याने दुसऱ्या युनियनला ती मान्यता मिळणे अतिशय जिकीरीचेच ठरते. त्याचा फायदा मुख्यतः इंटक या काँग्रेसच्या संघटनेने घेणे अपेक्षित होते. तो त्यांनी तसा घेतला. आणि कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील मुंबईतील गिरणी कामगार युनियनचे किंवा मिल मजदूर सभेचे स्थान राष्ट्रीय मिल मजदूर संघाने घेतले.

मुंबईच्या बाहेर, प्रथम पुणे १९८०नंतरच्या काळात औरंगाबाद, नाशिक, काही प्रमाणात कोल्हापूर, नागपूर येथे मोठे उद्योग उभारले गेले. मुंबईचे कापड उत्पादन भिवंडी येथे पॉवर लूम्सवर गेले. तर मालेगाव, इचलकरंजी, सोलापूर, माधवनगर येथे नवी पॉवरलूम्स केंद्रे निर्माण झाली. महाराष्ट्रातील पॉवरलूम उद्योग हे खरे तर कापड गिरणी धंद्याचे अनौपचारिकीकरण किंवा बकालीकरण आहे. त्यातून अतिशय कनिष्ठ दर्जाचा आणि कामगारांचे भयानक शोषण करणारा रोजगार निर्माण होतो. तेथे कामगार चळवळी झाल्या. लढे झाले. संघटना देखील झाल्या. पण तेथील रोजगाराची असहायता अशी आहे की, तेथे कोणतीही स्थायी टिकाऊ चळवळ संघटना निर्माण करणे अतिशय अवघड आहे. पण तरीही इचलकरंजी येथे डाव्या कामगार चंळवळीचे एक केंद्र उभे राहिले. १९७० ते २००० पर्यंत टिकले देखील. इतरत्र तसे घडू शकले नाही.

पुणे औद्योगिक परिसरामध्ये मुख्यतः प्रगत असा महाकाय इंजिनिअरिंग धंदा, वाहन उद्योग निर्माण झाले. बजाज टेल्को सारखे कारखाने आले. शिवाय बहुराष्ट्रीय कंपन्यांची लक्षणीय उपस्थिती तेथे होती. औद्योगिक विकासाच्या त्या टप्प्यावर, तेथे या मक्तेदार मोठ्या औद्योगिक संस्था, त्यांच्या बाजारपेठीय स्थानामुळे किंमती वरच्या पातळीवर टिकवू शकत होत्या. त्यामुळे त्या विशिष्ट संस्थांमधील कारखान्यांमधील कामगारांचे वेतन किंवा सेवाशर्ती कामगारांना जास्त अनुकूल करणे भांडवलदारांना शक्य झाले होते.मात्र त्यासाठी त्यांना कामगार संघटना या बाहेरील वर्चस्वापासून मुक्त असाव्यात, अशी त्यांची अपेक्षा होती. त्याचा अंदाज आणि अनुभव तेथील कामगारांना सुरूवातीच्या काही वर्षांत म्हणजे १९८० पर्यंत आला.

ही वस्तुस्थिती लक्षात येताच, त्या कारखान्यांतील कागारांमध्ये एक नवी प्रक्रिया निर्माण झाली. व्यापक कामगारवर्गाच्या सार्वत्रिक मागण्यांसाठीच्या लढ्यापेक्षा आपल्या संस्थेतील कामगारांना जो जास्त तात्कालिक वेतनवाढ मिळवून देईल तो आपला नेता आणि त्याचा झेंडा हाच आपला झेंडा ही पूर्णपणे अर्थवादी विचारसरणी केवळ पुण्यात, तसेच औरंगाबाद नाशिक येथे त्याचप्रमाणे मुंबईमधील कामगारांमध्ये ही रूजू लागली. अंतर्गत, स्वतंत्र संघटना असा एक नवा प्रकार निर्माण झाला. त्याचे मूर्तिमंत प्रतीक असणाऱ्या व स्वतंत्र म्हणविणाऱ्या गुलाब जोशी, आर. जे. मेहता, करकेरा, यासारख्या धंदेवाईक पुढाऱ्यांचा उदय झाला. किंवा करण्यात आला. अर्थात तरीही या सर्व केंद्रात विचारसरणीशी बांधिलकी असणाऱ्या लाल बावट्यांच्या संघटनांचा एक गट कायमच टिकून राहिला. नाशिकसारख्या

ठिकाणी तर तोच तेथील चळवळीचा मुख्य प्रवाह म्हणावा असे आपले स्थान आजदेखील टिकवून आहे.

डॉ. दत्ता सामंत यांचा उदय १९७० च्या दशकातील.ते व्यवसायाने डॉक्टर आणि सामाजिक जाणीवेने प्रेरित होते. ते "धंदेवाईक" पुढारी नव्हते. पण त्यांच्या नेतृत्वशैलीमुळे प्रथम मुंबईतील आणि नंतर महाराष्ट्रातील कामगार चळवळीला जे साहसवादी-व्यक्तिवादी-अराजकी वळण लागले, त्यामुळे अंतिमतः कामगार चळवळीचा सामाजिक परिवर्तनाची चळवळ, राजकीय चळवळ म्हणून लोप झाला. डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाला भांडवलदारवर्ग किती घाबरतो, या एका नकारात्मक मूल्यावर कामगारांमध्ये त्यांच्या संघटना मोठ्या झाल्या. ठराविक मोठ्या कारखान्यांमध्ये किती वेतनवाढ, किती सवलती मिळविल्या, व्यवस्थापनावरचा कामगारांचा दबाव किती प्रमाणात वाढला, हीच कामगार चळवळीच्या यशाची एकमेव मानके आणि गमके ठरली. यांच्याच हिशेबात स्थानिक कामगार नेते विचार करण्यास शिकले.त्यालाच अर्थवाद असे म्हणले जाते. त्यातून स्थानिक पातळीवर किती दादागिरी निर्माण झाली, त्याचा विचार डॉक्टरांनी केला नाही. घाटकोपरचे गरोडिया नगर, पंत नगर, राजावाडी घाटकोपर ईस्ट या रशियन कामगार वसाहतीच्या धर्तीवर म्हाडाने (तेव्हाचे हाउसिंग बोर्ड) १९६० च्या दशकात घरांची वसाहतच उभारलेली होती. भारताचे दुसरे गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांच्या नावावरुन या वसाहतीचे नामकरण करण्यात आले. कामगारांसाठी ही वसाहत असल्याने गिरणी, खाण आणि गोदितील कामगारांची संख्या मोठी होती. त्याचबरोबर मोठी पोलिस वसाहत देखिल पंतनगर मध्ये आहे. डॉ.दत्ता सामंतांचे घर आणि दवाखाना या वसाहतीत होता. दवाखान्यात येणाऱ्या कामगाराच्या समस्या जाणुन घेता-घेता त्यांनी कामगार चळवळ उभारली. यामुळे पंतनगर मध्ये अनेक कामगार चळवळींचे रणशिंग फुंकले गेले.

विविध संघटना आणि राजकीय पक्ष यांनी केवळ शोषणयोग्य म्हणून ज्यांच्याकडे पाहिले त्या असहाय कामगारांना दत्ता सामंत यांचा आधार वाटू लागला. लाखोंच्या संख्येने ते त्यांच्याकडे येत होते यात शंका नाही. त्यातूनच एक मोठी लाट १९७० ते १९८५ या १५ वर्षांत टिकून होती.मुंबईत गिरण्यांचे नवीनीकरण करण्यापेक्षा त्या बंद करून त्यांच्या जमिनी विकण्याच्या मागे मालक लागले होते. या सर्व परिस्थितीमुळे मुंबईतील गिरणी कामगारांची लढाशक्ती मुद्दलातच क्षीण झालेली होती, अशा परिस्थितीत कामगार त्यासाठी शेवटची आशा म्हणून डॉ. दत्ता सामंत यांच्याकडे गेले. आणि त्या पर्वाची अखेर म्हणूनच की काय, दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखालचा १९८१ सालचा गिरणी कामगारांचा संप सुरू झाला. वास्ताविक पाहता "बॉम्बे इंडस्ट्रियल ऍक्ट'च्या विरोधात आणि वेतन वाढीच्या मागणीसाठी १९८१ मध्ये शिवसेनेनेच मुंबईतल्या गिरणी कामगारांना चेतवून शहरात संपाचे वातावरण तापवले होते. संपाची घोषणा शिवसेनाप्रमुखांकडून ऐकण्यासाठी परेलच्या कामगार मैदानात लाखभरापेक्षा अधिक कामगार जमा झाले होते. कोणत्याही क्षणाला संपाची घोषणा होणार याच दिशेने सभा चालली असताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मैदानात आले आणि मुख्यमंत्र्यांशी (बॅ. अंतुले) चर्चा झालेली असून, मागण्यांवर चर्चा करण्याची तयारी दाखवली आहे. त्यामुळे संप केला जाणार नसल्याच्या आशयाचे भाषण केले होते. शिवसेनेकडून झालेल्या भ्रमनिरासामुळे निर्माण झालेला संताप कामगारांना दिवंगत कामगार नेते दत्ता सामंत यांच्या दिशेने घेऊन गेला होता. १८ जानेवारी १९८२ पासून ५८ गिरण्यांचे कामगार संपावर गेले. हा संप चिघळत गेला आणि पुढे जाऊन फुटला

देखील! त्यातून कामगार संपला. पण संप मात्र संपला नाही. त्यातून कामगारांचे काय कल्याण झाले ते माहित नाही, पण गिरणी धंद्यापेक्षा त्याखालची जमिन विकण्यामध्ये जास्त रस असणाऱ्या भांडवलदारांचे आणि जमिन माफिया नेते-कामगार पुढारी यांचे मात्र नशीब उघडले. मुंबईमध्ये गिरण्यांखालील जमिन कापडाच्या उत्पादनासाठी वापरण्यापेक्षा त्यावर घरे किंवा व्यापारी संकुले उभी केल्यास त्यातून अभूतपूर्व पैसा कमाविता येईल, अशी परिस्थिती मुंबईत १९७० नंतरच्या काळात उभी राहिली. परंतु त्यावेळी शहर विकासाचे जे नियम होते, त्यामध्येत शक्य नव्हते. दुसऱ्या बाजूस भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी यासारख्या ठिकाणी यंत्रमागांवर कापडाचे उत्पादन करून ते आपल्या मिलच्या नावावर विकल्यास मुंबईपेक्षा निम्म्यापेक्षा कमी मजूरीत मजूर मिळतील, तेदेखील असंघटित, सुताचा पुरवठा त्या त्या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या सूत गिरण्यांमधून होऊ शकेल, असेदेखील या मालकांच्या लक्षात आले, त्यामधून मुंबईमधील गिरणी धंदा हा महाराष्ट्रातील यंत्रमागांवर हस्तांतरित झाला.

वरील घटकांच्या पार्श्वभूमिवर संपाचा उपयोग गिरणी मालाकांनी त्यांच्याच स्वार्थासाठी करून घेतला. गिरणगावातील गिरण्या कोणत्याही पर्यायाशिवाय बंद पाडल्या. त्याखालच्या जमिनी विकून त्यातून शहराचा विकास करण्यावर असणारे शहरविकासाचे निर्वंध उठविण्यासाठी भांडवलदारांनी जोरदार प्रयत्न सुरू केले. त्यावेळी मुंबईचे महापौर शिवसेनेचे छगन भुजबळ होते. मुख्यमंत्री शरद पवार होते. पण या जमिनींवरची बंधने आणि कामगार यांना एकाच वेळी आयुष्यातून उठविण्याच्या आड कोणतेही (तथाकथित) राजकीय मतभेद आले नाहीत. जमीन मोकळी झाली. डॉ. दत्ता सामंत यांनी जोरदार विरोध केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यांचा काटा काढण्यासाठी १६ जानेवारी १९९७ मध्ये त्यांचा खून झाला. इतकेच काय पण काँग्रेसच्या नेतृत्वाखालील गिरणी धंद्यामधील एकमेव मान्यताप्राप्त संघटना म्हणजे मिल मजदूर संघ वसंतराव होशिंग यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या संघटनेच्या अंतर्गत अचानक शरद पवार यांना मानणाऱ्या सचिन अहिर यांचे नेतृत्व आले. जमिनी विकल्या, त्याचे कोट्यावधी रूपये आले, तरी, आजपर्यंत हजारो कामगारांच्या थकबाक्या दिलेल्या नाहीत. त्यांचे संसार मार्गावर आलेले नाहीत. आपली घरे दारे सोडून ते टाचा घासत कोकणात किंवा सातारा कराड या त्यांच्या गावाकडे गेले. मात्र याच गिरण्यांच्या जागी, त्या जमिनी विकून, बकाल वस्त्यांच्या मधोमध चकाचक टोलेजंग व्यापारी संकुले तयार झाली. त्यात या कामगारांना ना रोजगार मिळाले ना घरे मिळाली की म्हातारपणासाठी आधार म्हणून काही नुकसानभरपाई मिळाली.

**गिरणी कामगारांच्या लढ्याला कलाटणी देणाऱ्या सहा प्रमुख घटना अशा सांगता येतील:**

१) १९२६ ला सहा महिन्यांचा गिरणी कामगारांचा संप,

२) १९४७ मध्ये कामगार मंत्री गुलजारीलाल नंदा यांनी "बॉम्बे इंडस्ट्रियल ॲक्ट"ची घोषणा केली,

३) बॉम्बे इंडस्ट्रियल ॲक्टच्या विरोधात कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचे विधानसभेत २६ तास भाषण झाले अन पुढे त्यांच्याच नेतृत्वाखाली १९७४ ला ४३ दिवसांचा गिरणी कामगारांचा संप.

४) डिसेंबर १९८१ मध्ये कामगार मैदानातील सभेत संपातून माघार घेतल्याची शिवसेनाप्रमुखांची घोषणा,

५) १८ जानेवारी १९८२ पासून ५८ गिरण्यांमध्ये संप सुरू होऊन नंतर एक वर्षाने संप फुटला,

६) १९९८ पासून गिरणी कामगारांना वेतन देण्याच्या निमित्ताने गिरण्यांच्या जमिनी विकणे आजतागायत सुरू असणे! (कोहिनूर आणि इंदू मिल या गिरण्या देखील अशीच पद्धतशीर रित्या बद पाडलेल्या गिरण्यापैकी होत !)

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणातील परिस्थितीत बदललेली होती. अशा परिस्थितीत दोन बड्या राष्ट्रांच्या गटाव्यतिरिक्त एक तिसरा गट अलिप्ततावादी विचारसरणीचा अंगीकार करून उदयाला येवू पाहत होता. या गटाची  विशिष्ट विचारसरणी व धोरणेस्पष्ट झाली होती. यातच आपल्याला अलिप्ततावादाच्या धोरणांची वैशिष्ट्ये पाहायला मिळतात.

### १३.४.१ लष्करी संघटनांपासून अलिप्त:

लष्करी संघटनाला विरोध हे अलिप्तता धोरणाचे पाहिले महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते.अलिप्तता धोरणाला अनुसरून या गटात येणाऱ्या कोणत्याही राष्ट्राने जागतिक स्तरावर कोणत्याही प्रकारच्या लष्करी संघटने मध्ये सहभागी होवू नये. कारण या विचारसरणीचा स्वीकार करणारे राष्ट्र जर लष्करी गटामध्ये गेला तर तर त्याचे दुसऱ्या गटातील राष्ट्रांमध्ये शत्रुत्व अटळ होवून बसेल, मग अलिप्ततेच्या लष्कर निर्मित व लष्कर संघटन विरोधी धोरणाचे उल्लंघन होईल. म्हणूनच लष्करी संघटन विरोध हे अलिप्ततावादाचे एक वैशिष्ट्ये बनले.

### १३.४.२ लष्करी करारांपासून अलिप्त:

लष्करी करारांपासून अलिप्त हे अलिप्तता धोरणाचे दुसरे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरून अलिप्तता गटात सामील होणाऱ्या कोणत्याही राष्ट्राने जागतिक स्तरावर होणाऱ्या कोणत्याही लष्करी करारामध्ये सामील होवू नये कारण या गटातील कोणतेही राष्ट्र या प्रकारच्या लष्करी करारामध्ये सामील झाले तर त्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचे विचार व लष्करी प्रवृत्तीचे समर्थन केले व तो लष्करी प्रवृत्तीला प्रोत्साहन देत आहे हे सिद्ध होईल होईल. म्हणूनच लष्करी कराराला विरोध करणे हे अलिप्ततावादाचे एक वैशिष्ट्ये बनले.

### १३.४.३ शांततेचे धोरण:

शांततेचे धोरण हे अलिप्तता धोरणाचे तिसरे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या धोरणाला अनुसरून अलिप्ततेच्या धोरणाचा स्विकार करणाऱ्या कोणत्याही राष्ट्राने कोणतीही किंमत देवून शांततेच्या धोरणाचा स्विकार केला पाहिजे. संघर्ष अथवा युद्धाला विरोध करणे कोणतेही प्रश्न अथवा समस्या चर्चेने व सामोपचाराने सोडविणे. तसेच जागतिक राजकारणात शांतता, संयम व विचारपूर्वक मार्गाने सहभागी होणे तसेच जागतिक राजकारणातील युद्ध अथवा तणाव दूर करणे आदी कामगिरी व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. होईल म्हणूनच शांततेच्या धोरणाचा स्विकार करणे हे या अलिप्ततावादाचे वैशिष्ट्ये बनले.

### १३.४.४ स्वातंत्र्याला महत्त्व:

स्वातंत्र्याला महत्त्व हे अलिप्तता धोरणाचे चौथे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरून कोणत्याही राष्ट्राच्या दृष्टीने स्वातंत्र्य हे महत्वाचे असते जर तो राष्ट्र व राष्ट्रातील जनता स्वतंत्र असेल तर त्या राष्ट्राला व राष्ट्रातील जनतेला आपले आपल्या संदर्भातील निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. त्यामुळे त्या राष्ट्राचे नैतिक व राजकीय सामर्थ्य वाढते आहे. होईल. म्हणूनच प्रत्येक राष्ट्राने आपल्या राष्ट्राच्या दृष्टीने स्वातंत्र्याला महत्व देणे हे या अलिप्ततावादाचे वैशिष्ट्ये बनले.

**१३.४.५ सार्वभौमत्वाला महत्व:**

महत्त्व स्वातंत्र्यालाहे अलिप्तता धोरणाचे पाचवे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरूनकोणत्याही राष्ट्रातील जनता कोणत्याही अंतर्गत व बाह्यशक्तीच्या नियंत्रणापासून मुक्त असायला पाहिजे तरच त्या जनतेला स्वतःचे व स्वयंम निर्णयाचे अधिकार प्राप्त होवू शकतील व त्या राष्ट्रातील जनता देशहित लक्षात घेवूनच आपल्या राष्ट्राच्या हिताचा निर्णय घेईल. आहे. होईल. म्हणूनच प्रत्येक राष्ट्राने आपल्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला महत्व देणे हे अलिप्ततावादाचे वैशिष्ट्ये बनले.

**१३.४.६ प्रसंगानुरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य:**

प्रसंगानुरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य हे अलिप्तता धोरणाचे सहावे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरून कोणत्याही आंतरराष्ट्रीय समस्येवर निर्णय घेवून कारवाई करण्याचा अधिकार राहील. मात्र ही कारवाई करतांना पूर्वग्रह अथवा अंधविश्वासावर आधारीत नसावी तर ती वास्तविक परिस्थितीतवर आधारित असावी. जर अलिप्ततावादी गटाची या संदर्भातील कारवाई योग्य असेल तर कदाचित आंतरराष्ट्रीय स्तरावर या संदर्भात पाठिंबा मिळू शकेल. भारताने आशिया खंडातील राष्ट्रांच्या सहकार्याने अलिप्ततावादी राष्ट्रांच्या तिसऱ्या गटाची निर्मिती केली त्यामुळे आफ्रिका व आशिया खंडातील  नवजात राष्ट्रे भारताकडे अपेक्षेने पाहू लागली व भारताच्या अलिप्तता धोरणास या राष्ट्रांनी पाठिंबा देण्यास सुरुवात केली. म्हणूनच प्रसंगानुरूप कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देणे हे अलिप्ततावादाचे वैशिष्ट्ये बनले.

**१३.४.७ निर्भयतेचे धोरण:**

निर्भयतेचे धोरण हे अलिप्तता धोरणाचे सातवे महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरून अलिप्तता म्हणजे नुसतीच शांतता अथवा भित्रेपणा नव्हें हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरी महायुद्धानंतर जग हे दोन गटामध्ये विभागल्यामुळे अशांत झाले आहे याची जाणीव सर्वांना आहे. त्यामुळे जर का प्रसंग आला तर त्या प्रसंगाला तोंड देण्याचे सामर्थ्य हे या गटातील राष्ट्रांकडे असणे आवश्यक आहे. मग कारवाई करत असताना तो मित्रराष्ट्र आहे का शत्रूराष्ट आहे याचा विचार करून चालणार नाही. निर्भयतेने निर्णय घेवून परिणामास तयार राहवेच लागेल. निर्भयतेचे धोरण हे अलिप्ततावादाचे वैशिष्ट्ये बनले.

**१३.४.८ सहकार्याचे व सहजीवनाचे धोरण:**

सहकार्याचे व सहजीवनाचे धोरण हे अलिप्तता धोरणाचे शेवटचे व  महत्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. या वैशिष्ट्याला अनुसरून प्रत्येक राष्ट्राने सर्वच राष्ट्रांबरोबर सहकार्याने, सल्लामसलतीने व सहजीवन तत्वाने वागणे हे एवढी मोठी व्यापकता या वैशिट्यामध्ये आहे. या तत्वाला अनुसरून अलिप्ततावादी गटातील कोणतेही देश जगातील इतर कोणत्याही राष्ट्रांपासून अलिप्त राहणार नाहीत. तसेच जरी अलिप्ततावादी गट निर्माण केला जात असला तरी जागतिक राजकारणात तिसरा शक्ती निर्माण करणे हा या गटाचा उद्देश नाही तर हा गट सदैव सहकार्य व सहजीवनाचे तत्व अंगीकृत करेल त्यामुळेच हे अलिप्ततावादाचे अत्यंत महत्वाचे  वैशिष्ट्ये मानले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१. अलिप्तता धोरणाची वैशिष्ट्ये नमूद करा.

## १३.५ पंचशील

भारतीय संस्कृतीत 'पंच', या संख्येस महत्वाचे स्थान असल्याकारणाने व 'पंच' या संख्येस धार्मिक पावित्र्य लाभल्याने भारताने आंतरराष्ट्रीय सद्भावना व सहकार्य वृद्धिंगत व्हावे तसेच जागतिक शांतता टिकावी या हेतूने पंचशील तत्वांचा पुरस्कार केला. हिच पंचशील तत्वे सर्वप्रथम भारत व चीन या देशांनी १९५४ मध्ये तिबेट संबंधीत झालेल्या करारासाठी वापरली. या करारानंतर याच वर्षात १७ ऑक्टोबर १९५४ मध्ये व्हिएतनामाचे अध्यक्ष हो-ची-मिन्हा यांनी या पंचशील तत्वाना मान्यता दिली. नंतर १९५५ मध्ये युगोस्लाव्हिया या यूरोपीय राष्ट्राने पंचशीलला मान्यता दिली. या ही पुढे जावून कंबोडिया, नेपाळ, लाओस, चीन व ब्रह्मदेश या राष्ट्रांनीसुद्धा पंचशीलला पाठिंबा दिला. तसेच एप्रिल १९५५ मध्ये नवी दिल्ली येथे भरलेल्या आशियाई राष्ट्रांच्या परिषदेत सामील झालेल्या वेगवेगळ्या राष्ट्रांच्या २०० प्रतिनिधींनी पंचशील तत्वांच्या आधारावर आंतरराष्ट्रीय सद्भावना व सलोखा विकसित होईल असा विश्वास व्यक्त केला व त्यांनी या पंचशील तत्वास आपला पाठिंबा जाहीर केला. तर याहीपुढे जावून ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया व पोलंड या राष्ट्रनीही पंचशील तत्वास पाठिंबा दिला. अशी ही उपयुक्त व महत्वपूर्ण पंचशील तत्व खाली नमुद करण्यात आली आहेत.

१. प्रत्येक राष्ट्राने परस्परांच्या सार्वभौमत्वाचा व प्रादेशिक अबाधित्वाचा सन्मान करावा.

२. कोणत्याही राष्ट्रावर आक्रमण न करणे.

३. परस्पर राष्ट्रांच्या आंतरिक कारभारात हस्तक्षेप न करणे.

४. परस्पर राष्ट्रांच्या हितावह होईल असा समानतेचा व्यवहार करणे.

५. परस्पर राष्ट्रांच्या शांततामय सहजीवनाला मान्यता देणे.

ही पंचशील जागतिक राजकारण, शांतता, सद्भावना व सहकार्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरल्याने जगातील अनेक राष्ट्राने या तत्वांना मान्यता दिली. तर काही राष्ट्राने या पंचशील तत्वांचा स्वीकार केला. परिणामी जागतिक राजकारणाच्या दृष्टीने ही पंचशील तत्वे अत्यंत महत्वाची ठरली.

## १३.६ अलिप्तता चळवळीची वाटचाल

पाश्चिमात्य वासहतवादास मूठमाती देण्याच्या उद्देशाने इंडोनेशियाचे अध्यक्ष डॉ.सुकार्नोच्या आग्रहाखातर आफ्रो-आशियायी राष्ट्राची परिषद १८ एप्रिल १९५५ रोजी बांडुग येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस आशियातील २३ व आफ्रिकेतील ६ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत पंडित जवाहरलाल नेहरूनी उपस्थित राष्ट्रांच्या प्रतिनिधीना 'पंचशील' स्वीकारण्याचे आवाहन केले. हे आवाहन पाकिस्तान व इंडोनेशिया

या दोन मुसलमान राष्ट्रांनी स्वीकारले नाही. पंचशीलमधील पाच हा शब्द व शांततामय सहजीवन हा शब्द नको असे सांगत पंचशील ऐवजी दशशील तत्वांना मान्यता प्राप्त झाली व ही तत्व दशशील म्हणून प्रसिद्ध झाली. ही दशाशील तत्वे पुढील प्रमाणे आहेत.

१. परस्परांची प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वाचा आदर करणे.

२. अनाक्रमण

३. अंतर्गत हस्तक्षेपास मज्जाव

४. परस्पर हितसबंध व समानता राखणे.

५. मूलभूत मानवी हक्कांची आदर.

६. एकट्याने किंवा समुदायिकरित्या राष्ट्र संरक्षणाच्या हक्कास मान्यता.

७. निखळ देशहितासाठी गुप्त करारात सामील होण्याच्या स्वातंत्र्यास मान्यता.

८. बाह्य दबावविना कोणतीही करारात सामील होण्याचे स्वातंत्र्य मान्य.

९. शांततेच्या मार्गाने वादाची सोडवणूक.

१०. न्यायाबद्दल आदर बाळगणे.

पोलंड व ऑस्ट्रियाने या दशशीलास १९५५ मध्ये मान्यता दिली. तसेच भारत, अस्ट्रेलिया व अमेरिका वकिलाताने या तत्वास पाठिंबा दिला. 'पंचशील' व 'दशशील' ने अलिप्ततावादी चळवळीस पार्श्वभूमी तयार होण्यास मदत झाली. बांडुग परिषदेने अलिप्ततावादी चळवळीचा पाया घातला होता. मात्र परिषदेने घेतलेल्या निर्णयाचा अंमलबजावणीसाठी अनेक अडचणी येत होत्या. आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांनी आर्थिक व संस्कृतीक सहकार्य करावे, स्वयंनिर्णयाच्या तत्वास सर्वांनी मान्यता द्यावी, वंशभेदाला विरोध व्हावा, वासहतवाद समूळ नष्ट व्हावा, शस्त्रास्त्रांवर सार्वत्रिक बंदी घालावी, या दृष्टीने प्रयत्न सुरू केले होते. मात्र हे प्रयत्न निष्फळ ठरू लागले होते. बऱ्याच राष्ट्रांनी या नियमांचे उल्लंघन करून 'नाटो', 'सीटो' व 'सेंटो', च्या लष्करी करारात सामील झाले. त्यामुळेच 'नाटो', 'सीटो' व 'सेंटो', च्या लष्करी करारात सामील न झालेल्याच राष्ट्रांना स्थान देण्याचे विचार पुढे येवू लागले व यातूनच 'नेहरू-नासार-टिटो', या तीन महान नेतृत्वाने अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद घेण्याचा निर्णय घेतला व येथूनच अलिप्तता चळवळीची वाटचाल सुरू झाली.

### १३.६.१ बेलग्रेड येथील पहिली शिखर परिषद:

१९६१ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरु, नासार व टिटो यांच्या प्रयत्नाने पहिली शिखर परिषद युगोस्लाव्हियाच्या बेलग्रेड येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत १९६१ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरु, नासार व टिटो यांच्या प्रयत्नाने पहिली शिखर परिषद युगोस्लाव्हियाच्या बेलग्रेड येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत अलिप्त परिषदेचे अध्यक्ष म्हणून युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांनी काम पाहिले.

या परिषदेवर पंडित जवाहरलाल नेहरु व नासार यांच्या नेतृत्वाचा ठसा उमटला. या परिषदेत दोन महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

१. सभासद राष्ट्रांनी कोणत्याही लष्करी करारात सामील होवू नये झाल्यास अलिप्त राष्ट्राच्या संघटनेचे सभासदत्व रद्द होईल.

२. जगातील तिसऱ्या महायुद्धाचा संभाव्य धोका लक्षात घेवून रशिया व अमेरिका या दोन बड्या राष्ट्रांना अणूचाचण्या बंद करण्याची विनंती करण्यात आली. तसेच शांतता व मैत्रीपूर्ण मार्गाने लष्करी गटातील संघर्ष मिटवता येतील असा या परिषदेत विश्वास व्यक्त करण्यात आला.

### १३.६.२ कैरो येथील दुसरी शिखर परिषद:

१९६४ मध्ये दुसरी शिखर परिषद इजिप्त मधील कैरो येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षपद कर्नल नासेर यांनी स्वीकारले होते. या परिषदेत सभासद राष्ट्रांची सांख्य वाढली होती. पहिल्या परिषदेमध्ये सभासद संख्या २२ होती मात्र या दुसऱ्या परिषदेतील सभासदांची संख्या ४७ झाली होती. या परिषदेत दोन ठराव मंजूर करण्यात आले.

१. स्वातंत्र्य व वासहतवादापासून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या जनतेला पाठिंबा देणे.

२. शांतता सहजीवनाच्या तत्वास मान्यता व संयुक राष्ट्रसंघाने त्याचा स्वीकार करावा अशी शिफारस.

### १३.६.३ ल्युसाका येथील तिसरी शिखर परिषद:

१९७० मध्ये तिसरी शिखर परिषद झाम्बिया मधील ल्युसाका येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षपद आफ्रिकेतील झाम्बियाचे अध्यक्ष केनेथ कौंडा यांनी स्वीकारले होते. या परिषदेत सभासद राष्ट्रांची सांख्य वाढली होती. या परिषदेत ५४ सभासद राष्ट्र उपस्थित होते. या परिषदेत, "वंशवाद विरोधी प्रखर आंदोलन करणारा व वासहतवादाचे समूळ उच्चाटन करणारा 'ल्युसाका' जाहीरनामा प्रसिध्द झाला". तसेच स्वतंत्र होणाऱ्या वसाहतींना हीया परिषदेने आपला पाठिंबा जाहीर केला. तसेच विकसित राष्ट्रे व अविकसित राष्ट्रे यांच्यात फरक असून विकसित राष्ट्राने अविकसित राष्ट्रांकडे लक्ष दिले नाही त्यांचे शोषण केले तर जागतिक शांतता भंग होईल असे सुचित केले.

### १३.६.४. अलजीयर्स येथील चौथी शिखर परिषद:

१९७३ मध्ये चौथी शिखर परिषद अलजेरिया येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस ७४ सभासद राष्ट्रे उपस्थित होती. या परिषदेत खालील महत्वाच्या विषयावर चर्चा झाली.

१. व्हिएतनाम युद्धविराम.

२. रशिया व अमेरिका यांच्यातील वर्धिष्णू संवाद याची गंभीर दखल.

३. दक्षिण आफ्रिका व ऱ्होडेशिया येथील वर्णद्वेष व वासहतवादाची दखल.

४. पोर्तुगीजांच्या हातातून मोझाम्बिका या दोन वसाहती जावू नयेत म्हणून पोर्तुगीजांना अमेरिकेने दिलेल्या पाठिंब्याचा निषेध.

### १३.६.५ कोलंबो येथील पाचवी शिखर परिषद:

१९७६ मध्ये पाचवी शिखर परिषद श्रीलंकेतील कोलंबो येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस आफ्रिकेतील ४८, आशियातील २७, लॅटीन अमेरिकेतील ७ व युरोपातील ३ अशी एकुण ८५ सभासद राष्ट्रे उपस्थित होती. या परिषदेत सातसूत्री जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारी संस्थांची पुनर्रचना करून व्यापाराच्या अटी व नियम विकसनशील राष्ट्रांना अनुकुल करण्यात यावे.

२. श्रमविभागणी नुसार आंतरराष्ट्रीय उत्पादनाची पुनर्ररचना करण्यात यावी.

३. आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेत विकसित देशांनी एकतर्फी निर्णय न घेता सर्वसमावेशक समानतेच्या तत्वाला निर्णय घेवून नवीन चलनव्यवस्था उभी करावी.

४. कोणत्याही अविकसित राष्ट्राची साधनसंपत्ती हस्तांतरित करतांना त्या राष्ट्राची अखंडता टिकून राहील याचा गांभीर्याने विचार करण्यात यावा.

५. विकसनशील देशांच्या कर्जाचे विमोचन करण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्यात याव्या.

६. विकसित देशांनी विकसनशील देशांचे अन्नधान्य व शेतीच्या गरजेच्या वस्तू यांचे उत्पादन वाढविण्यासाठी पुरेशी साधनसंपत्ती व तंत्रज्ञान रास्त अटींवर विकसनशील देशांना द्यावे.

७. अलिप्त राष्ट्रांच्या १९७५ च्या जाहिरनाम्यानुसार भूमिनी वेढलेल्या राष्ट्रांना सागरी दळणवळणाचा हक्क देण्यात यावा. या पाचव्या परिषदेत विकसित देशांशी संघर्ष न करता आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अलिप्त राष्ट्रांमध्ये ऐक्यभाव कसा वाढेल यासाठी प्रयत्न करण्यात आले.

### १३.६.६ हॅवाना येथील सहावी शिखर परिषद:

१९७९ मध्ये सहावी शिखर परिषद क्युबा येथील हॅवाना येथे आयोजित करण्यात आली होती.या परिषदेस एकुण ९३ सभासद राष्ट्रे उपस्थित होती. या परिषदेला सुरवात होण्यापूर्वी जागतिक वातावरण अत्यंत संघर्षमय झाले होते.

- सोव्हिएत रशिया व अमेरिका यांच्यातील संघर्ष तीव्र झाला होता.
- अमेरिकेने न्यूट्रॉन बॉंब तयार करून आपल्या शास्त्रागारात ठेवला होता.

- व्हिएतनामाने कंबोडियातील खोर क्रांतिकारकांचे पोलपॉट सरकार तेथे लष्करी हस्तक्षेप केला होता.
- रशियाने अफगाणिस्तानात शिस्त लावण्यासाठी सैन्य पाठविले होते .
- इराणमध्ये आयातुल्ला खोमेनी यांनी रिझाशहाला पळवून क्रांती घडवून आणली होती.
- इथोपिया साम्यवाद्यांच्या ताब्यात गेला होता.

एकंदरीत जगात अतिशय संघर्षमय वातावरण असताना क्युबात ही परिषद भरली होती. या परिषदेत कॅस्ट्रो यांनी आपले मत प्रकट करताना सांगितले की, "वर्णभेद, वासहतवाद, साम्राज्यवाद यांच्याशी संघर्ष केल्याशिवाय अलिप्त राष्ट्रांच्या विकासाच्या वाटा मोकळ्या होणार नाहीत. सद्यस्थितीत विषमतेवर आधारीत जगाला मूठमाती देवून नवे जग निर्माण करण्याचे प्रयत्न अलिप्ततावादी राष्ट्राने केले पाहिजेत". यासाठी अलिप्ततावादी राष्ट्रांनी संधिसाधू भूमिका घेवू नये. वसाहतवाद व साम्राज्यवादास विरोध करावा व जागतिक राजकारणात विधायक हस्तक्षेप करावा.

### १३.६.७.दिल्ली येथील सातवी शिखर परिषद:

१९८३ मध्ये सातवी शिखर परिषद भारत  येथील दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत आशिया खंडातील २९, आफ्रिकेतील ५०, लॅटिन अमेरिकेतील १६ व युरोपातील ३ देश सभासद म्हणून उपस्थित होते. तसेच १६ देश व राजकीय संघटना निरीक्षक म्हणून उपस्थित होते तसेच २७ देश व राजकीय संघटनांना खास पाहुणे म्हणून उपस्थित होते. या परिषदेस एकुण १८३ देश उपस्थित होते.

१. अलिप्त राष्ट्रांनी न्याय आधारावर आर्थिक पुनर्रचना करावी.

२. तिसऱ्या जगातील राष्ट्रे व विकसित राष्ट्रे यांच्यात समानतेच्या तत्वावर वाटाघाटी व्हाव्यात.

३. निर्यात व्यापारास प्रोत्साहन मिळविण्यासाठी विकसीत देशांनी व्यापरावरील बंधने कमी करावी.

४. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांनी जास्तीत जास्त उदार अटींवर अविकसित व विकसनशील देशांना कर्जे द्यावीत. भारत अलिप्तता चळवळीचा संस्थापक राष्ट्र असल्याने या चळवळीला महत्व प्राप्त झाले होते.

### १३.६.८ हरारे येथीलआठवी शिखर परिषद:

१९८६ मध्ये आठवी शिखर परिषद झिम्बाबे येथील हरारे येथे आयोजित करण्यात आली होती.ही परिषद झिम्बाबेचे पंतप्रधान रॉबर्ट मुगाबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या परिषदेस एकुण १०१ सभासद राष्ट्र उपस्थित होते. भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा

गांधी यांच्या हत्येनंतर या परिषदेचे अध्यक्षस्थान राजीवगांधी यांच्याकडे आले होते. त्यांनी या परिषदेची सूत्रे झिम्बाबेचे पंतप्रधान रॉबर्ट मुगाबे यांच्याकडे दिली.

१. हरारे परिषदेत दक्षिण आफ्रिकेतील वंश विरोधी धोरणा विरुद्ध उपाययोजना करणारा कडक जाहीरनामा एकमताने संमत करण्यात आला.

२. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आर्थिक बहिष्कार स्वरूपाच्या उपाययोजनाना अग्रक्रम देण्यात आला.

३. इराण-इराकला आपापसातील संघर्ष मिटविण्याचे आवाहन करण्यात आले.

४. दक्षिण गोलार्धातील राष्ट्रांमध्ये सहकार्य घडवून आणण्यासाठी टांझानियाचे अध्यक्ष जुलिअस न्येरेरे यांच्या नेतृत्वाखालील एक समिती या परिषदेने नियुक्त केली.

५. मानवजातीचे १० शत्रू -

- साम्राज्यवाद
- वसाहतवाद
- नववसाहतवाद
- वर्णविद्वेष
- वंशभेद
- माथेफिरुपणा
- अस्थिरता
- परकीयांचा बळकावूपणा
- प्रभुत्व
- पुढारीपणा

आंतराष्ट्रीय मानवजातीच्या या १० शत्रूंच्या विरोधात लढा तीव्र करण्याचे आवाहन या परिषदेने केले.

६. न्याय व समता यावर आधारित आंतराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेचा आराखडा तयार करण्यासाठी या परिषदेने २५ राष्ट्रांची एक समिती नियुक्त केली.

**१३.६.९ बेलग्रेड येथील नववी शिखर परिषद:**

१९८९ मध्ये नववी शिखर परिषद युगोस्लाव्हिया येथील बेलग्रेड येथे आयोजित करण्यात आली होती. ही परिषद युगोस्लाव्हिया येथे दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आली होती. ही परिषद युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष जेनेझ डीनोव्हेस्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

मात्र यावेळची युगोस्लाव्हियाची परिस्थिती अत्यंत बिकट होती. कारण युगोस्लाव्हिया विघटनाच्या उंबरठ्यावर होता. त्यामुळे दुसऱ्यांदा आयोजित परिषदेत फक्त परीषद घेण्याची औपचारिकता दिसत होती. या परिषदेचे वैशिष्ट्ये म्हणजे या परिषदेत बेलग्रेड जाहीरनामा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. "जागतिक वातावरण पुरेसे नसले तरी बरेंचसे निवळले आहे. प्रादेशिक आणि जागतिक प्रश्नांची उकल करण्यासाठी अलिप्त राष्ट्रांनी भरीव कामगिरी केली आहे. जग जरी विस्तारित असले तरी एक होवू लागले आहे. मूलभूत हितसंबंध व अलिप्तता चळवळीची परिणामकारकता या साठी जागतिक राजकारणात अलिप्त राष्ट्रांनी थेट भाग घेण्याची गरज आहे. आपण आपली आर्थिक व तांत्रिक प्रगती करून निर्णयांक भूमिका बजावली पाहिजे. असे केले तरच जागतिक एकात्मता योग्य प्रकारे साध्य करता येईल. "याच परिषदेत भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी केलेली 'पर्यावरण संवर्धनासाठीची, वसुंधरा संरक्षण निधी' च्या स्थापनेची सूचना या शिखर परिषदेने एकमताने स्वीकृत केली."

### १३.६.१० जकार्ता येथील दहावी शिखर परिषद:

१९९२ मध्ये दहावी शिखर परिषद इंडोनेशिया येथील जकार्ता येथे आयोजित करण्यात आली होती. ही परिषद इंडोनेशिया चे अध्यक्ष जनरल सुहार्तो यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या परिषदेत सभासद राष्ट्रांच्या १०८ प्रतिनिधीनी भाग घेतला होता. या परिषदेत चीनला सुद्धा अलिप्तत राष्ट्रांचे सभासदत्व देण्यात आल्याने अलिप्तता चळवळीला व्यापक आकार प्राप्त झाला होता. याच परिषदेत अलिप्त राष्ट्रांची तात्विक भूमिका मांडत असताना भारताचे पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह रावम्हणाले, "जगात एक वा दोन महासत्ता आहेत ही गोष्ट महत्वाची नसून महासतेच्या प्रभावापासून दूर राहून आपले स्वातंत्र्य व आपली स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची इच्छा महत्वाची असते कारण अलिप्ततेचा मूळ अर्थच यात दडला आहे."

या परिषदेत भारताच्या दृष्टीने एक विसंवादाची घटना घडली ती म्हणजे कश्मीर प्रश्न हा भारत व पाकिस्तान या दोन देशांचा द्विपक्षीय प्रश्न आहे असे सांगूनही पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी हा प्रश्न आपल्या भाषणातून मांडला. मात्र भारताने परिषदेस सुचित केले की द्विपक्षीय प्रश्नावर परिषदेची शक्ती खर्च करण्यापेक्षा परिषदेने जागतिक प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित करावे. जकार्ता परिषदेत राजकीय व आर्थिक समित्यांकडून १३० दुरुस्त्या विचारार्थ आल्या त्या पैकी ४१ दुरुस्त्या एकट्या भारताकडून आल्या होत्या. या परिषदेच्या मध्यानातून भारताने संयुक्त राष्ट्रसंघाचे लोकशाहीकरण,दक्षिण गोलार्धातील राष्ट्रांचे ऐक्य व नवीन जागतिक अर्थव्यवस्था या तीन तत्वांवर अलिप्तत राष्ट्रांच्या चळवळीची वाटचाल व्हावी या साठी समतोल भूमिकेतून प्रयत्न केले.

### १३.६.११ कार्टाजेना येथील अकरावी शिखर परिषद:

१९९५ मध्ये दहावी शिखर परिषद कोलंबिया येथील कार्टाजेना येथे आयोजित करण्यात आली होती. ही परिषद कोलंबियाचे अध्यक्ष अर्नेस्टो पिझानो यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या परिषदेत सभासद राष्ट्रांच्या १३३ प्रतिनिधीनी भाग घेतला होता. लॅटिन अमेरिका, आफ्रिका, युरोप व आशिया खंडातील विविध प्रकारची तात्विक भूमिका असणारी राष्ट्रे या परिषदेस उपस्थित राहिल्याने या परिषदेस महत्व प्राप्त झाले होते. या परिषदेस

भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव, पाकिस्तानच्या पंतप्रधान बेनझीर भुट्टो, झिम्बाबेचे अध्यक्ष रॉबर्ट मुगाबे, इंडोनेशियाचे अध्यक्ष जनरल सुहार्तो, क्युबाचे अध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो, मलेशियाच्या अध्यक्ष महाथिर महंमद व संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस डॉ.ब्युट्रोस उपस्थित होते. कोलंबिया शिखर परिषदेत अण्वस्त्रबंदी करारावर स्वाक्षरी करणे, बोसनिय व जपान या दोन राष्ट्रांना सभासदत्व देणे, अलिप्त राष्ट्रांच्या वतीने भारतास संयुक्त राष्ट्रसंघात कायमस्वरूपी प्रतिनिधित्व देणे, द्विपक्षीय वाद मिटविण्यासाठी अलिप्त राष्ट्रांची औपचारिक यंत्रणा उभी करणे आदी बाबत चर्चा झाली.

### १३.६.१२ दर्बान येथील बारावी शिखर परिषद:

१९९८ मध्ये बारावी शिखर परिषद दक्षिण आफ्रिकेतील येथील दर्बान येथे आयोजित करण्यात आली होती. ही परिषद दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष डॉ.नेल्सन मंडेला यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या परिषदेत सभासद राष्ट्रांच्या ११३ प्रतिनिधीनी भाग घेतला होता. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, क्युबाचे फिडेल कॅस्ट्रो पॅलेस्टाईनचे यासार आरफत यांच्यासह ६० राष्ट्रप्रमुख व संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस कोफी आन्नन उपस्थित होते. या शिखर परिषदेत खालील दिलेल्या घटकांना अनुसरून चर्चा झाली.

- विकसित आणि विकसनशील देशातील आर्थिक असमतोलाच्या प्रश्नावर चर्चा झाली.
- अर्थकारणाची जागतिकीकरण होत असतांना विकसनशील देशांना या पर्वात प्रवेश व समर्थपणे तोंड देण्याची क्षमता कशी निर्माण होईल या प्रश्नावर चर्चा झाली.
- जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासारख्या संस्थेच्या भूमिकेत विकसनशील राष्ट्रांचा विचार व्हावा.
- भारताचा जम्मू-काश्मीर प्रश्न शांततापूर्ण वाटाघाटीने सोडविण्यात यावा हा प्रश्न सोडविण्यासाठी अलिप्त राष्ट्र चळवळीची सर्व शक्ती मदत करेल.
- भारताच्या अणुचाचण्याचा पडसात या परिषदेत उमटला.
- जागतिक स्तरावर अणुचाचण्याचा निषेध करणाऱ्या राष्ट्रांनी भारत व पाकिस्तानवर आर्थिक निर्बंध लादले.
- बेलारूसला एकमताने अलिप्त राष्ट्र चळवळीचे सभासद म्हणून मान्यता देण्यात आली.

### १३.६.१३ कुआलालांपुर येथील तेरावी शिखर परिषद:

२००३ मध्ये तेरावी शिखर परिषद मलेशिया येथील कुआलालांपुर येथे आयोजित करण्यात आली होती. ही परिषद मलेशियाच्या अध्यक्ष महाथिर महंमद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या परिषदेत सभासद राष्ट्रांच्या ११२ प्रतिनिधीनी भाग घेतला होता. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष थांबो

एम्बेकी, इराणचे अध्यक्ष मोहम्मद खतामी, नायजेरियाचे अध्यक्ष ओलूसेगन, पाकिस्तानचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ, क्युबाचे फिडेल कॅस्ट्रो, झिम्बाबेचे अध्यक्ष रॉबर्ट मुगाबे उपस्थित होते. या शिखर परिषदेत खालील दिलेल्या घटकांना अनुसरून चर्चा झाली.

- भारत आणि पाकिस्तान व इतर काही राष्ट्राने इराकचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्याचे आवाहन केले.
- श्रीमंत बड्या राष्ट्रांनी लोकशाही राष्ट्रांवर बंधने लादून उपासमारीची वेळ आणली आहे. त्यांच्याकडून मानवी हक्कांबद्दल अनादर दाखविला जात आहे. पाश्चिमात्य राष्ट्रे इराकवर अन्याय करत आहेत. (महाथिर मोहम्मद)
- अलिप्त राष्ट्रे सदस्य देशांच्या सार्वभौमत्वाचा, प्रादेशिक एकात्मतेचा व राजकीय स्वातंत्र्याचा व सनरक्षणचा आदर करतात असे निवेदनात सांगण्यात आले आहे.
- मलेशिया, क्युबा व दक्षिण आफ्रिका या देशांनी इराककडे व्यापक शस्त्रास्त्रे नाहीत याची पाहणी करून वस्तुस्थितीवर आधारीत अहवाल द्यावा.
- पॅलेस्टाइनवर इस्रायल करत असलेले हल्ले थांबवावेत.
- अमेरिकेचे अध्यक्ष बुश व इंग्लंडचे पंतप्रधान ब्लेअर यांनी युनोची सनद डावलून कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू नये.
- दहशतवादा बरोबरच दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा अशा आर्थिक व सामाजिक संकटांशी सर्वांनीच सामना करावा.
- अमेरिकन सैन्य कोणत्याही क्षणी जगाच्या अंधाऱ्या कोपऱ्यात हल्ला करण्यास तयार आहे. या अमेरिकन अध्यक्षाच्या निवेदनावर निषेध नोंदविण्यात आला.
- फिडॉल कॅस्ट्रोने अंधार कोपर न म्हणजे नामची तिसऱ्या जगातील राष्ट्रे आहेत या वाक्यांचा ही जाहीर निषेध केला.
- खतामी यांनी इराणमधील जनतेवरील अमानवीय कारवाई पश्चिम आशियात अस्थिरता निर्माण करणारी आहे आवर्जून नमूद केले.

एकंदरीत सर्व परिषदांचा सर्वसमावेशक विचार केला तर या परिषदा अलिप्ततावादी राष्ट्रांच्या विचारधारेला अनुसरून आयोजित करण्यात आल्या होत्या. सुरवातीला या परिषदेत आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्र सहभागी झाले होते नंतर बदलत्या परिस्थितीला अनुसरून लॅटिन अमेरिका, युरोप या ठिकाणची राष्ट्रेही या परिषदेत सहभागी होवू लागली त्यामुळे अलिप्तता चळवळीची व्यापकता वाढत गेली.

**आपली प्रगती तपासा.**

१. अलिप्तता चळवळीची वाटचाल समजून घ्या.

## १३.७ अलिप्तता चळवळीचे बदलते स्वरूप

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन महाशक्ती व्यतिरिक्त जागतिक राजकारणात तिसरी शक्ती कार्यरत झाली होती ती शक्ती म्हणजे अलिप्त राष्ट्रांचा गट होय. या गटाने लष्करी संघटन अलिप्तता, लष्करी करारापासून अलिप्तता, जागतिक शांतता, अंतर्गत स्वातंत्र्य, सार्वभौमत्वाला महत्व, प्रसंगानुरूप कारवाई, निर्भयता, सहकार्य, हा घटकांना अनुसरून अलिप्तता चळवळ सुरू केली होती. या चळवळीच्या माध्यमातून १९६१ पासून काम सुरू होते मात्र बदलत्या परिस्थिनुसार अलिप्तता चळवळीची उद्दिष्ट्ये कालबाह्य झाली. त्यामुळे ही चळवळ विसर्जित करण्यापेक्षा या चळवळीला नवीन दिशा दिली तर या चळवळीमध्ये काम करणारी राष्ट्रे पुनः एकदा नव्या जोमाने काम करतील असा विश्वास या चळवळीतील नेत्यांना वाटू लागला व यातूनच जकार्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत चळवळीची दिशा बदलण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला व यातूनच या चळवळीचे स्वरूप बदलले .

- विकसित व अविकसित राष्ट्रांची आर्थिक विषमता बदलणे.
- संयुक्त राष्ट्रसंघाचे लोकशाहिकरन करणे.
- दहशतवादविरुद्ध सामूहिक लढा देणे.
- तिसऱ्या जगाच्या पर्यावरणाचे संरक्षण करणे.
- स्वतःचे भविष्य घडविण्याचे खरेखुरे स्वातंत्र्य प्राप्त करणे.
- नववसाहतवादास पायबंद घालणे.
- नवी न्याय अर्थव्यवस्था उभी करणे. ही सर्व नवीन तत्वे नवविचारसरणीची असल्याने या चळवळीचे स्वरूप या तत्त्वांनी बदलल्याचे दिसून येते.

## १३.८ अलिप्तता चळवळीचे मूल्यमापन

अलिप्तता, लष्करी करारापासून अलिप्तता, जागतिक शांतता, अंतर्गत स्वातंत्र्य, सार्वभौमत्वाला महत्व, प्रसंगानुरूप कारवाई, निर्भयता, सहकार्य हा घटकांना अनुसरून अलिप्तता चळवळ सुरू झाली होती. पंडित जवाहरलाल नेहरु, नासर व टिटो यांच्या प्रयत्नानमुळे या चळवळीला योग्य ती दिशा प्राप्त झाली होती. या चळवळीच्या माध्यमातून पाश्चिमात्य वसाहतवादाला बळी पडलेली आशिया अ आफ्रिका खंडातील बहुसंख्य राष्ट्र एकत्रित आली होती. तदनंतर टप्याटप्याने इतर खंडातील राष्ट्रांचाही सहभाग या चळवळीमध्ये वाढला व या चळवळीची व्यापकता वाढली. अमेरिका व रशिया या महासत्ताना या चळवळीच्या माध्यमातून अप्रत्यक्षपणे थांबविविण्यात या चळवळीला यश आले. अविकसित व विकसनशील देशांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. स्वातंत्र्य, सार्वभौम, सद्भावना, सहकार्य, सद्विचार, अंतर्गत विकास व एकसंघ आदी संकल्पनांचा विकास होवून या गटातील राष्ट्रांमध्ये आदरभाव निर्माण झाला. सुरुवातीला २२ राष्ट्र सदस्य होते हीच सदस्य राष्ट्रांची संख्या पुढे १३३ वर गेली होती. या अलिप्तता

चळवळीच्या माध्यमातून तिसऱ्या जगाची संकल्पना विकसित झाली होती. जरी या चळवळीला पूर्ण यश प्राप्त झाले नसले तरी या चळवळीने जागतिक राजकारणावर प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या वर्चस्व प्रस्थापित केले होते. अमेरिकी व रशिया या दोन शक्तींना थांबविण्यासाठी प्रयत्न केले होते. संयुक राष्ट्रसंघाला सुद्धा अलिप्तता चळवळीची दखल घ्यावी लागली होती. म्हणूनच अलिप्तता चळवळीला केवळ राष्ट्रीय इतिहासातच नव्हे तर जागतिक इतिहासात सुद्धा महत्व प्राप्त झाले.

## १३.९ सारांश

भारताच्या पंचशील तत्वांच्या विचारधारेला अनुसरून अलिप्तता चळवळ निर्माण होण्यासाठी पार्श्वभूमी तयार झाली व पुढे पंचशील मध्ये थोड्याफार प्रमाणात बदल करत दशशील निर्माण झाले व ही तत्वप्रणाली अवलंबिण्याचा निर्णय घेवून जागतिक राजकारणात एक स्वतंत्र गट निर्माण झाला. या गटाच्या निर्मितीमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची होती. त्याच बरोबर पंडित जवाहरलाल नेहरु, नासर व टिटो यांचे प्रयत्नही तितकेच महत्वाचे होते.या प्रयत्नातून ही चळवळ उभी राहिली व या चळवळीने टप्याटप्याने जागतिक राजकारणात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. म्हणूनच या चळवळीचे जागतिक राजकारणातील योगदान महत्वाचे मानले जाते.

## १३.१० प्रश्न

१. अलिप्ततावादाचा अर्थ सांगून अलिप्तता चळवळीतील भारताची भूमिका स्पष्ट करा.

२. अलिप्तता धोरणाची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.

३. अलिप्तता चळवळीच्या वाटचालीचा आढावा घ्या.

४. अलिप्तता चळवळीचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.

## १३.११ संदर्भ


१. डॉ. मधुकर पाटील, डॉ.सुनील अमृतकर - 'समकालीन भारत'

२. प्राचार्य, य.ना.कदम - 'विसाव्या शतकातील जगाचा इतिहास'

३. डॉ.धनंजय आचार्य - 'विसाव्या शतकातील जग'

४. डॉ.एन.एस.तांबोळी - 'आधुनिक जग'

५. डॉ.पी.जी. जोशी - 'आधुनिक जग'

६. डॉ.सुमन वैद्य - 'आधुनिक भारत'


*****

# १४

# भारताचे पाकिस्तान, चीन आणि श्रीलंका बरोबर सबंध

**घटक रचना**


१४.० उद्दिष्ट्ये

१४.१ प्रस्तावना

१४.२ भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे

१४.३ भारत पाकिस्तान सबंध

१४.४ भारत चीन सबंध

१४.५ भारत श्रीलंका सबंध

१४.६ सारांश

१४.७ प्रश्न

१४.८ संदर्भ


## १४.० उद्दिष्ट्ये

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे समजून घेणे.

२. भारत-पाकिस्तान सबंधाची माहिती जाणून घेणे.

३. भारत-चीन सबंधाची माहिती जाणून घेणे.

४. भारत-श्रीलंका सबंधाची माहिती अभ्यासने.

## १४.१ प्रस्तावना

भारत स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या परराष्ट्र धोरणाच्या राष्ट्रीय सार्वभौमत्व, परदेशिक अखंडत्व, स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा अवलंब, आंतरराष्ट्रीय शांततेस उत्तेजन, भारतीय वंशाच्या नागरिकांच्या हितसंबंधानचे संरक्षण, तिसऱ्या जगातील देशांच्या हितसंबंधांचे संरक्षण, अवलंबित लोकांचे स्वातंत्र्य आणि वंशाच्या आधारावरील भेदभावाचे उच्चाटन या उद्दिष्टांना अनुसरून तसेच भारताच्या अलिप्ततावाद, वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक पातळीवर शांततेसाठी उत्तेजन, चांगले शेजारी व प्रादेशिक सहकार्य, नि:शस्त्रिकरणाला पाठिंबा, संयुक्त राष्ट्रावर विश्वास, राष्ट्रकुलाशी सौदहार्य या भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या तत्वांना अनुसरूनच भारताने आपल्या शेजारी राष्ट्रांना

बरोबर तसेच जगातील इतर राष्ट्रांन बरोबर आपले परराष्ट्र धोरण राबविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. या प्रकरणात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक भाग म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाची भारताचे शेजारी राष्ट्र म्हणून पाकिस्तान, चीन, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रह्मदेश बरोबरचे सबंध आदी घटकांची माहिती पाहणार आहोत.

## १४.२ भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे

पंडित जवाहरलाल नेहरूंना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार मानले जाते.पंडित जवाहरलाल नेहरुननंतर थोड्याफार अंशी जरी परराष्ट्र धोरणाचे स्वरूप बदलले असले तरी आजही बऱ्याच प्रमाणात भारताचे परराष्ट्र धोरण आरंभीच्या धोरणासारखे प्रचलीत आहे असे दिसते. खालील माहितीच्या आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे स्पष्ट करण्यात आली आहेत.

### १४.२.१ अलिप्ततावाद:

अलिप्ततावाद हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र होते. या धोरणाला अनुसरूनच तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरनी जागतिक राजकारणात हे धोरण अवलंबिण्याचा निर्णय घेतला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात दोन गट निर्माण झाले होते. अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रांच्या प्रभावक्षेत्राखाली बरीच राष्ट्र गेली होती. मात्र भारताने या दोन्ही गटांपैकी कोणत्याही गटात न जाता अलिप्तता धोरणाचा अंगीकार करत अलिप्ततावादी राष्ट्रांच्या स्वतंत्र गटनिर्मितिचे आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्राना आवाहन केले व पुढे अलिप्ततावादी राष्ट्रांची स्वतंत्र चळवळ उभी राहिली. परिणामी अलिप्ततावाद हे भारताच्या धोरणाचे मुख्य सूत्र ठरेल.

### १४.२.२ वसाहतवाद व सम्राज्यवादला विरोध:

स्वातंत्र्यापूर्वी भारत ब्रिटिशांची वसाहत होती. भारत ब्रिटिशांची वसाहत असतांना ब्रिटिशांच्या जे भारताचे शोषण केले होते त्याचा अनुभव भरतानी घेतला होता. त्याच बरोबर आशिया, आफ्रिका खंडातील बरीच राष्ट्र युरोपीय राष्ट्रांच्या वसाहती म्हणुन युरोपीय राष्ट्रांच्या नियंत्रणात होत्या. म्हणजेच वसाहतवाद व साम्राज्यवाद हा दोन्ही गोष्टी ह्या कोणत्याही राष्ट्रांच्या दृष्टीने घातक आहेत. या गोष्टीचा कोणत्याही राष्ट्रांवर मोठ्या प्रमाणात राजकीय, आर्थिक व प्रशासकीय परिणाम होतो. म्हणुनच या वाईट गोष्टींना विरोध करण्याचा उद्देशाने भारताने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये विरोध दर्शविला.

### १४.२.३ वर्णभेदभावला विरोध:

भारत जेंव्हा ब्रिटिशांच्या नियंत्रणात होता तेंव्हा ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणात वांशिक भेदभाव केला होता त्याच बरोबर जागतिक स्तरावर अमेरिका व आफ्रिकेमध्ये मोठ्या प्रमाणात वांशिक भेदभावाचे वातावरण निर्माण झाले होते. व हा वर्णद्वेष मिटविण्यासाठी मोठे लढे उभारावे लागेल होते.मोठी जीवित व वित्तहानी झाली होती. म्हणूनच भरतानी आपल्या परराष्ट्र धोरणात वर्ण द्वेषाला विरोध करण्याचा निर्णय घेतला.

### १४.२.४ शांततेला प्रोत्साहन:

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शांततेला महत्व दिले होते. मानवी जातींच्या कल्याणासाठी शांतता आवश्यक आहे असे भारताला वाटत होते. अविकसित व विकसनशील राष्ट्रांच्या अस्तित्वासाठी व विकासासाठी शांतता ही महत्त्वाची आहे म्हणूनच भारताने या आपल्या परराष्ट्र धोरणात शांततेचा अंगीकार केला होता. परराष्ट्र धोरणाच्या या तत्वाला अनुसरून भारतानी संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता व विकासाच्या तत्वावर विश्वास दाखवला होता. संयुक्त राष्ट्राचा सभासद म्हणुन प्रसंगी जागतिक तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या तत्वाला अनुसरून कोरियन युद्ध, भारत-चीन पेचप्रसंग, सुएझ पेचप्रसंग, कंगोची समस्या आदी प्रसंग शांततेच्या तत्वाला अनुसरून सोडविण्यासाठी प्रयत्न केले होते.

### १४.२.५ चांगले शेजारी व प्रादेशिक सहकार्य:

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर चांगले सहकार्य टिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येते. दक्षिण आशियात प्रादेशिक सहकार्य निर्माण करण्याचा उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या सार्कच्या स्थापनेत भारताची भूमिका महत्त्वाची मानली जाते. तसेच "गुजराल" धोरणाला अनुसरून शेजारील राष्ट्रांना केलेल्या मदतीही महत्वाच्या मानल्या जातात.

### १४.२.६ नि:शस्त्रिकारणाला पाठिंबा:

पहिली व दुसऱ्या जागतिक महायुद्ध जगाची मोठ्या प्रमाणात हानी झाली होती. या युद्धकाळात व युधोत्तर काळात जागतिक शांतता भंग पावली होती अशा कठीण परिस्थितीत जग पुनः एकदा अमेरिका व रशिया सारख्या बलाढ्य शक्तींच्या दोन गटात विभागले होते. जगात शितयुद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. अशा कठीण परिस्थिती भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात नि:शस्त्रिकारणाला पाठिंबा दर्शविला व त्याचा नेटाने पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला.

### १४.२.७ संयुक्त राष्ट्रसंघावर विश्वास:

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपले परराष्ट्र धोरण राबवत असतांना जागतिक पातळीवर आपल्या एक वेगळ्या स्वरूपाच्या स्वतंत्र अस्तित्वाची संपूर्ण जगाला जाणीव करून दिली होती. ही कामगिरी करत असतांना भारताने जागतिक शांततेसाठी निर्माण करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघावरही आपला पुर्ण विश्वास दाखवला होता. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनेक शांतता मोहिमेत ही आपला सहभाग नोंदविला होता.तसेच भारत संयुक्त राष्ट्रसंघाच्या विधायक मोहिमांमध्येही सहभागी झाला.

### १४.२.८ राष्ट्रकुलाशी सहकार्य:

भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात शांतता व सहकार्याला प्राधान्य दिल्याने संयुक्त राष्ट्रसंघ, अलिप्तता चळवळ, या ठिकाणी महत्वपूर्ण कामगिरी केली होती त्याचबरोबर

राष्ट्रकुल संघटनेचे सुद्धा सदस्यत्व मिळविले होते.भारताचे या ठिकाणीही परराष्ट्र धोरण महत्वाचे ठरले.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे समजून घ्या.

## १४.३ भारत पाकिस्तान सबंध

हिंदुस्थानाची फाळणी होवून भारत-पाकिस्तान या दोन राष्ट्रांची निर्मिती झाल्यापासून या दोन्ही राष्ट्रांचे सबंध तसे पाहिले तर सलोख्याचे नव्हते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण हिंदुस्थानच्या फळणीपासून आजतागायत या दोन्ही राष्ट्रांचे सबंध संघर्षाचेच आहेत हे आजही दिसून येते. अशा या भारत-पाकिस्तान सबंधाची माहिती खालील माहितीच्या आधारे स्पष्ट करण्यात आली आहे.

### १४.३.१ फाळणीतून निर्माण झालेले प्रश्न:

हिंदुस्थानची फाळणी होवून भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्र निर्माण झाली होती. मात्र या दोन राष्ट्रांच्या विभाजनामुळे अनेक समस्या निर्माण होवून उभय राष्ट्रांमध्ये संघर्षमय वातावरण निर्माण झाले होते.

**अ) निर्वासितांचे प्रश्न:**

हिंदुस्थानची भारत-पाकिस्तान अशी फाळणी झाल्यानंतर भारतातील मुसलमानांचे भारतातून पाकिस्तानमध्ये स्थलांतर तर पाकिस्तानातील शिख व हिंदूंचे भारतात स्थलांतर सुरू झाले होते. या स्थलांतराची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर स्थलांतरित लोकांच्या शेतजमिनी, इमाताती, बँकेतील ठेवी, अलंकार इतर मालमत्ता याबाबत तपासणी, खरेखोटपणा याची पडताळणी करणे अत्यंत कठीण काम होते. अशातच भारत सरकारने स्थलांतरित लोकांच्या नुकसानभरपाई साठी कायदा करून तसेच नुकसान भरपाई मंजूर करून हा प्रश्न निकाली लावला पुढे पाकिस्तानेही असाच निर्णय घेवून हा प्रश्न निकाली लावला.

**ब) नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न:**

भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये सिंधू व तिच्या उपनद्यांच्या पाणी वाटपावरून प्रश्न निर्माण झाला होता. रावी, बियास व सतलज या पूर्वेकडील नद्यांच्या पाण्याचा उपयोग भारताने करावा व पश्चिमेकडील सिंधू, झेलम व चिनाब नद्यांचे पाणी पाकिस्तानने वापरावे. या पाणी प्रश्नावर निर्णय घेण्याकरीत पंडित जवाहरलाल नेहरु व अयुबखान तसेच बँक अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यात चर्चा व्होवून १९ सप्टेंबर १९६० रोजी 'इंडस वॉटर' करार झाला या करारानुसार पश्चिमेकडील झेलम, चिनाब व सिंधू नद्यांचे पाणी पाकिस्तानला तर रावी, बियास व सतलज नद्यांचे पाणी भारताला अशी विभागणी होणार होती. या साठी पाकिस्तानातील कालवे निर्मितीसाठी स्वतंत्र सिंधू विकास खोरे निधीची स्थापना करण्यात आली. जागतिक बँक, अमेरिका, ऑस्ट्रीया, कॅनडा, जर्मन, न्यूझीलंड व ब्रिटन आदीकडून वीतभर उपलब्ध होणार होता तसेच भारताकडून ८३.३ कोटी उपलब्ध व्हावा अशी मागणी

होती. या धोरणामुळे रावी, सतलज व बियास नद्यांचे पाणी उपलब्ध होणार असल्याने भारताने राजकीय चातुर्याच्या दृष्टिकोनातून होकार दिला व उभय देशांमध्ये तडजोड होवून हा प्रश्न त्या परिस्थितीला अनुसरून सुटला.

**क) सीमा प्रश्न:**

काश्मीरची सिमा वगळता पश्चिमेकडील भारत-पाकिस्तान सीमा १५०३ मैलाची तर पूर्वेकडील सीमा २०८० मैलाची होती. त्यामुळेच सुमारे १२३ लहान-लहान भारतीय प्रदेश पाकिस्तानने व तर सुमारे ७४ छोटे पाकिस्तानी प्रदेश भारतीय प्रदेशाने वेढले होते. १९५८ व १९६९ मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू व पाकिस्तानी नेते यांच्यात वाटाघाटी होवून भारत व पाकिस्तान यांच्यात समप्रमाणात विभाजन व्हावे या विभाजनाचा अनुसरून पाकिस्तानी प्रदेशाने वेढलेले कूच, बिहारचे प्रदेश भारताने पाकिस्तानला द्यावेय व तसेच भारतीय प्रदेशनी वेढलेले पाकिस्तानी प्रदेश पाकिस्तानने भारताला द्यावेत याला दोन्ही राष्ट्रांनी मान्यता दिली. मात्र काश्मीर प्रश जटिल होता तो सोडविण्यासाठी पाकिस्तानने सर्व शक्तनिशी बळप्रयोगाचा अवलंब केला व यातूनच संघर्षमय परिस्थिती उद्भवली.

### १४.३.२ काश्मीरवर आक्रमण व विलीनीकरण:

पाकिस्तानच्या परिपूर्ण निर्मितीसाठी काश्मीर आवश्यक आहे असे सुरवातीपासून पाकिस्तानला वाटत होते. तर काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे असे भारताला वाटत होते. अशा अवस्थेतच काश्मीरच्या महाराजाचे नाक दाबण्याचा काश्मीरच्या व्यापारावर बंदी घातली व याही पुढे जावून ऑक्टोबर १९४७ मध्ये उत्तरेकडील हजार व पेशावर येथील टोळ्यांना काश्मीरवर हल्ला करण्यास प्रवृत्त केले.या हल्ल्यात हल्लेखोरांनी लुटालुट, जाळपोळ, बलात्कार, कत्तली असे भयानक अत्याचार काश्मीर जनतेवर केले. हा हल्ला परतवून लावण्यासाठी महाराजा हरिसिंग यांनी भारताची मदत मागितली. तेंव्हा लॉर्ड माऊंट बॅटन यांनी आक्षेप घेवून काश्मीर भारतात विलीन झाला नसल्यामुळे भारत या संस्थानास मदत करू शकत नाही असे स्पष्ट सांगितले. हा तांत्रिक मुद्दा मिटविण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरूनी मेनन यांना तातडीने काश्मीरला पाठविले त्यामुळेच २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराजा हरिसिंग यांनी काश्मीर भारतात विलीन झाल्याचे जाहीर केले. काश्मीरचे विलीनीकरण पुर्ण कायदेशीर असल्याने जनमताचा पाठिंबा घेण्याची गरज नाही असे पंडित जवाहरलाल नेहरुनी जाहीर केले. भारतीय सैन्य काश्मीरच्या मदतीला धावून आले. पुढे भारतीय सैन्यानी पराक्रमाची शर्थ करत काश्मीरमधील घुसखोरांना मागे रेटत नेले त्यामुळे भारताला श्रीनगर वाचवता आले मात्र काश्मीरच्या कित्येक चौरस मैल भागात हे घुसखोर तसेस राहिले त्यामुळे हा प्रश्न पुढे भिजत राहिला.

### १४.३.३ १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध:

भारतात काश्मीरचे विलीनीकरण होणे ही बाब पाकिस्तानला पटणारी नव्हती म्हणूनच भारताबरोबर युद्ध करण्याची तयारी पाकिस्तान करू लागला होता. अशातच १९६२ च्या भारत-चीन युद्धात भारताचा पराभव झाला होता, तसेच पंडित जवाहरलाल नेहरूंचा मृत्यू झाल्यामुळे भारताचे नेतृत्व कमजोर झाले आहे असे पाकिस्तानला वाटत होते तसेच अमेरिकेकडून पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात लष्करी मदत मिळाली होती. या कारणामुळे

पाकिस्तानचा आत्मविश्वास वाढला होता. अशा परिस्थितीत आपण भारताकडून काश्मीर जिंकू अशी दृढभावना पाकिस्तानचा हुकूमशाहा जनरल आयुबखान याची झाली. पाकिस्तानच्या या मानसिकतेतूनच १९६५च्या भारत-पाकिस्तान युद्धाला सुरवात झाली. पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय सीमेचा भंग करत काश्मीरच्या छांब-जोरीया भागात आपले सैन्य घुसवले. या आक्रमणाची पाकिस्तानने अमेरिकेकडून मिळालेल्या पॅटन जातीच्या अत्याधुनिक रणगाड्यांचा वापर केला होता. तसेच आक्रमण करण्यासाठी त्यांनी सेबर जेट विमानांचा वापरही केला होता. छांब भागात सैन्य घुसवून भारताचा काश्मीरबरोबर असणारा सबंध तोडून टाकायचा अशी पाकिस्तानची व्यहरचना होती. भारताचे तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी पाकिस्तानच्या या आक्रमणाचा खंबीरपणे प्रतिककरण्याचा निर्णय घेतला. व पाकिस्तानचे हे आक्रमण थोपवून धरण्याचे आदेश दिले. पाकिस्तानला लष्करी दृष्ट्या अनुकुल वातावरण असतानाही भारतीय सैन्याना पाकिस्तानचे छांब भागातील आक्रमण थांबविण्यात यश आले. या युद्धप्रसंगी भारतीय सैनिकांनी पाकिस्तानचे पॅटन रणगाडे निकामी केले. पुढे भारताने बाचावावर भर न देता पाकिस्तानवर दबाव आणण्यासाठी प्रतिआक्रमनाचा निर्णय घेतला व भारतीय सैन्य पाकिस्तानच्या लाहोर भागात घुसले व त्याठिकाणी पाकिस्तानी सैन्याचा मोठा पराभव केला. भारताची ही आक्रमकता पाहून पाकिस्तानला आपले छांब भागातील आवरते घ्यावे लागले. बावीस दिवस चाललेले हे युद्ध बाह्य सत्ता व संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदतीने थांबले. युध्दाबंदीचा ठराव सुरक्षा परिषदेने एकमताने मंजूर केला. युद्धबंदी नंतर ताश्कंद करारावर साह्य झाल्या. या तहात पुढील अटींचा समावेश होता.

- भारत व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रात शांततापूर्ण सबंध प्रस्थापित व्हावेत.
- युद्ध सुरू होण्यापूर्वी दोन्ही राष्ट्रांच्या सेना जेथे होत्या तेथे परत घेतल्या जाव्यात.
- युद्ध बंदयांची अदलाबदल करण्यात यावी.
- राजनैतिक, आर्थिक व दळणवळण क्षेत्रात दोन्ही राष्ट्रांमध्ये सलोख्याचे सबंध प्रस्तापित व्हावेत.
- परस्परविरोधी दोन्ही राष्ट्रांनी अपप्रचार करू नये.

ताश्कंद करारानंतर पाकिस्तान आपले विचार बदलेल असे वाटत होते मात्र हे विचार न बदलल्याने पुनः एकदा दोन्ही राष्ट्रांना युद्धाला सामोरे जावे लागले.

### १४.३.४ १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध:

१४ ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थानाची फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानची निर्मिती झाली होती. तेव्हां पाकिस्तानची विभागणी भौगोलिक दृष्ट्या पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान अशा दोन गटात झाली होती. धर्माच्या आधारावर जरी पाकिस्तानची निर्मिती झाली असली तरी पाकिस्तानच्या या दोन भागात अनेक बाबतीत मतभिन्नता होती. पाकिस्तानच्या राजकारणात पश्चिम पाकिस्तानचा पगडा जास्त होता त्यामुळेच पश्चिम पाकिस्तान सातत्याने पूर्व पाकिस्तानवर अन्याय करत होता. पूर्व पाकिस्तानची संस्कृती, भाषा व आर्थिक विकास याकडे दुर्लक्ष करत होता. परिणामी पूर्व पाकिस्तानच्या लोकांच्या मनात

टप्याटप्याने असंतोष निर्माण होवू लागला होता. या असंतोषाचा उद्रेक होण्यास सुरुवात झाली होती. 'अवामी लीग' या राजकीय पक्षाचे प्रमुख शेख मूजीबुर रहमान यांनी पूर्व पाकिस्तानच्या स्वायततेची मागणी केली. त्यांच्या या मागणीला पर्व पाकिस्तानमधून प्रचंड पाठिंबा मिळू लागला. १९७० च्या पाकिस्तानच्या नॅशनल असेंम्बलिमध्ये 'अवामी लीग' या पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या. या घटनेला अनुसरून अवामी लीग' या राजकीय पक्षाचे प्रमुख शेख मूजीबुर रहमान यांची पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती होणे कायद्याच्या दृष्टीने योग्य होते मात्र पाकिस्तानचे प्रचलीत अध्यक्ष जनरल याह्याखान यांनी शेख मूजीबुर रहमान यांना संधीच दिली नाही. याह्या खानच्या या निर्णयामुळे पूर्व पाकिस्तानात प्रचंड असंतोष निर्माण झाला. पश्चिम पाकिस्तानातील लोक आपणांस घटनात्मक अधिकार देण्यास तयार नाहीत असे वाटू लागले व याचाच परिणाम होवून पूर्व पाकिस्तानने स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा निर्णय घेतला व २५ मार्च १९७१ रोजी शेख मूजीबुर रहमान यांनी बांगलादेश स्वतंत्र राज्य असल्याची घोषणा केली. शेख मूजीबुर रहमान यांच्या घोषणेमुळे पूर्व व पश्चिम पाकिस्तान मध्ये यादवीला सुरवात झाली. पश्चिम पाकिस्तानमधील राज्यकर्त्यांनी पूर्व पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केले व पूर्व पाकिस्तानमधील जनतेची मुस्कटदाबी सुरू केली. अवामी लीगच्या प्रमुख नेत्यांना व कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले व पूर्व पाकिस्तानमधील जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय केला. पूर्व पाकिस्तानची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. पश्चिम पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारमुळे पूर्व पाकिस्तानातील लोक जीव वाचविण्यासाठी भारतीय प्रदेशाकडे मोठया प्रमाणात धावू लागले.

१९७१ च्या शेवटापर्यंत १० लाख निर्वासित पूर्व पाकिस्तानची सीमा ओलांडून भारतात आले.निर्वासितांना नागरी सुविधा देतांना भारातपुढे प्रश्न निर्माण झाला. तेंव्हा जागतिक सत्तानी ह्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मागणी जागतिक सत्तांकडे केली. तसेच मानव्य दृष्टीने निर्वासितांना मदत केल्याचे जाहीर केले. अशातच पूर्व पाकिस्तानमधील जनतेने मुक्तवाहिनीच्या माध्यमातून संघर्ष सुरू केला. मुक्तवाहिनीच्या कडव्या प्रतिकारामुळे राज्यकर्त्यांना पूर्व पाकिस्तानचा कारभार चालविणे अशक्य होवून बसले. मात्र निर्वासितांना भारताने आश्रय दिल्याने पाकिस्तानच्या मनात राग होताच पण भारत मुक्ती सेनेला मदत करतो असा संशय ही होता. दरम्यानच्या कालखंडात पाकिस्तानचे अमेरिकेबरोबर मित्रत्वाचे सबंध वाढले होते. परिणामी पाकिस्तानने अशा परिस्थिती भारतावर आक्रमण केले तर पाकिस्तानला अमेरिकेची मदत होईल हे निश्चित झाले होते. म्हणूनच या परिस्थितीला शह देण्यासाठी भारताने राशियाबरोबर आपले मित्रत्वाचे सबंध प्रस्थापित केले. भारताच्या या धोरणामुळे पाकिस्तानला अमेरिका मदत करणार नाही हे निश्चित झाले होते. भारत मुक्तीवाहिनीला सर्व प्रकारची मदत करतो असा आरोप ठेवून शेवटी ३ डिसेंबर १९७१ मध्ये पाकिस्तानने अचानक भारताच्या हवाई तळावर हल्ला चढवला. भारताने चोख प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारताने ४ डिसेंबर १९७१ मध्ये घेतला. भारतीय सेना मुक्तीवाहिनीच्या मदतीने बांगलादेशात घुसली व पाकिस्तानी सैन्यावर आक्रमण केले.भारतीय सैन्यापुढे पाकिस्तानी सैन्य निष्प्रभ झाले. व पाकिस्तानी व १६ डिसेंबर १९७१ रोजी शरणागती पत्करली. अशा पद्धतीने बांगलादेश पाकिस्तानच्या नियंत्रणातून मुक्त झाला. या युद्ध विजयात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, लष्करप्रमुख जनरल माणेकशा व भारतीय सैन्यांचे योगदान महत्वाचे ठरले.

### १४.३.४ १९९९ चे कारगील युद्ध:

१९९९ चे कारगील युद्ध भारत व पाकिस्तान या दोन देशामध्ये झाले होते. या युद्धाची व्याप्ती कारगील व आजूबाजूच्या परिसरापुराती मर्यादीत होती. १९९९ मध्ये पाकिस्तानी घुसखोरांना भारतीय सीमा ओलांडून भारतीय हद्दीतील अनेक ठिकाणे काबीज केली होती. भारताने अत्यंत संयमाने हे युद्ध कारगीलपुरतेच मर्यादीत ठेवून 'ऑपरेशन विजय' या नावाने युद्धाला सुरवात करून कार्यवाही सुरू केली. भारताने २००००० सैन्य तैनात केले होते मात्र भारताने एकुण ३००००० सैन्य या युद्धासाठी वापरले. या युद्धप्रसंगी पाकिस्तानी घुसखोरांची संख्या ५००० होती. यात पाकव्याप्त सैनिकांचा ही समावेश होता. भारतीय वायुसेनेनेही 'ऑपरेशन सफेदसागर' सुरू करून पाकिस्तानी घुसखोरांना धडा शिकवला. भारताच्या कारगील विजयाने पाकिस्तानवर पुनः एकदा नामुष्कीची वेळ आली.

एकंदरीत वरील सर्व माहितीच्या आधारे असे दिसून येते की हिंदुस्थानच्या फळणीपासून भारत-पाकिस्तान या उभय राष्ट्रनमध्ये सलोख्याचे वतातवरण नाही. निर्वासितांचा प्रश्न, पाणीवाटपाचा प्रश्न, १९६५ चे भारत-पाकिस्तान युध्द, १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध, कारगील युद्ध तदनंतर घडून आलेला सर्जिकल स्ट्राईक हे हा दोन राष्ट्रांचे संघर्षमय परिस्थितीचे दाखले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारत-पाकिस्तान सबंधाच्या माहितीचे अवलोकन करा.

## १४.४ भारत-चीन सबंधाची माहिती

आशिया खंडातील दोन मोठे शेजारी राष्ट्र म्हणुन चीन व भारताकडे पाहिले जाते. जेंव्हा भारत ब्रिटिशांच्या बंधनातून मुक्त झाला, स्वतंत्र झाला तेव्हां भारताने चीनच्या राष्ट्रवादी सरकारशी राजनैतिक सबंध प्रस्तापित केले. तसेच चीनमधील राष्ट्रवादी सरकार उलथून १९४९ मध्ये साम्यवादी विचारसरणीचे सरकार प्रस्तापित झाले तेंव्हा भारताने चीनच्या या नव्या सरकारला राजनैतिक मान्यता दिली. पंडित भारत जवाहरलाल नेहरुच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत चीन-भारत सबंधात आपणांस मोठ्याप्रमाणात चढउतार पहावयास मिळतात. 'हिंदी-चिनी-भाई-भाई' या मित्रत्वाच्या नात्यापासून ते पुढे परस्पर कट्टर द्वेषभावापर्यंतचची चढउताराची परिस्थिती आपणांस या दोन राष्ट्रांच्या संबंधांमध्ये पहावयास मिळते. खालील माहितीच्या आधारे आपण ही परिस्थिती जाणून घेणार आहोत.

### १४.४.१ कोरिया प्रश्न:

भारत व चीन ही दोन्हीं राष्ट्रे सुरवातीला राजनैतिक दृष्ट्या एकत्र आली होती पण कोरियन प्रश्नावरून ह्या दोन राष्ट्रांचे सबंध ताणले गेले होते. जेंव्हा उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हल्ला केला तेव्हां भारताने या घटनेचा निषेध केला तसेच संयुक्त राष्ट्रांच्या कोरिया बाबतच्या भूमिकेला पाठिंबा दिला. भारताच्या या भूमिकेमुळे चीन संतप्त झाला. मात्र चीनच्या युध्द प्रवेशाचे कारण सकारात्मक असल्याचे भरतानी स्पष्ट केले. तसेच १९५२ मध्ये कोरियन युद्धातील भारताची मध्यस्थी मान्य केली. भारताने सुचविलेल्या अटींवर युद्धबंदी करण्याची तयारी दर्शविली.

### १४.४.२ तिबेट प्रश्न:

तिबेट प्रश्न भारत व चीन या दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा होता.जेंव्हा चीनमध्ये साम्यवादी सरकार स्थापन झाले तेंव्हा या सरकारला असे वाटत होते की तिबेट आपल्या ताब्यात यावा. या साठी प्रचलीत सरकारने निर्धार करून तिबेट मुक्तीसाठी आपले सैन्य तिबेटमध्ये पाठविले. भारताच्या सीमेजवळ असणाऱ्या लष्करी कारवाईमुळे भारत मात्र अस्वस्थ झाला. मात्र भारताने सावध पवित्रा घेत भारताचे तिबेटमधील अधिकार कायम ठेवण्यासाठी एक खलिता पाठविला. या खलित्यात असे नमुद करण्यात आले होते की, "भारतात तिबेटमध्ये कोणताही राजकिय, प्रादेशिक अथवा प्रशासकीय अधिकार नको फक्त भारताचा तिबेटमध्ये सुरू असणारा व्यापार कायम सुरू राहावा." २३ मे १९५१ मध्ये चीन-तिबेट करार झाला व या कराराला अनुसरून तिबेटने चीनचे वर्चस्व मान्य केले. भारतालाही शेवटी तिबेटशी चाललेला व्यापार मागे घ्यावा लागला. तेंव्हा भारताची लष्करी व आर्थिक परिस्थिती कमजोर असल्यासने भारताला चीनवर कारवाई करणे शक्य नव्हते तसेच हिमालय सीमा रक्षणासाठी चीन बरोबर शांतता व सहजीवन तत्व सुरू ठेवणे आवश्यक होते. असे जरी असले तरी तिबेट प्रश्नाने भारताला चीनने जी वागणूक दिली होती ती भारताच्या कायमस्वरूपी लक्षात राहिली.

### १४.४.३ भारताचा चीन बाबत सावध पवित्रा:

भारताने सुरवातीपासून चीन बरोबर मित्रत्वाचे धोरण प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे १५९५० ते १९५८ या कालखंडात भारताची चीन बरोबर मैत्री असावी यासाठी प्रयत्न केले. कोरियन युद्धात चीन उतरल्यानंतर पाश्चिमात्य राष्ट्रांनी १९५१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडला तेंव्हा भारताने चीनला मदत करण्यासाठी भारताने चीनची बाजू घेण्यासाठी ठरावाच्या विरोधात मतदान केले. याच कालखंडात चीनचे चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय चार वेळा भारतात आले तेव्हां त्यांच्या प्रत्येक भेटीत भारताने त्यांचे हार्दिक स्वागत केले. गोवा मुक्तीच्या वेळी चीनने भारताला उघड उघड पाठिंबा दिला. याहीपुढे जावून जानेवारी १९५७ मध्ये काश्मीर विषयी अमेरिकेने संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीत मांडलेली भारत विरोधी ठरावाला चीनने कडाडून विरोध केला एकंदरीत या सर्व घटनांचा विचार केला तर या दोन्ही राष्ट्रांच्या मैत्रीत दृढता निर्माण होईल अशी अशी परिस्थिती होती. पुढे चीनने आपली भूमिका बदलल्यामुळे पुढे या मैत्रित तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

### १४.४.४ भारत-चीन संबंधात दुरावा:

चीनमध्ये साम्यवादी सरकार आल्या नंतर चीनने ताबतडतोब कठोर निर्णय घेण्यास सुरुवात केली. सिकीयांग मधील 'काशगर' येथील कौन्सुल जनरलला भारताने परत आपल्या देशात बोलवावे असे चीनने भारत सरकारला कळविले. भारताच्या ल्हासा येथील पोलिटिकल एजंटलाही तेथे राहण्याची परवानगी नाकारण्यात अली. चीनने काही नकाशे प्रकाशित केले होते त्या नकाशात भारत-चीन सीमेनुसार ५०,००० चौरस मैलाचा भारतीय प्रदेश चीनचा असल्याचे दर्शविण्यात आले होते. या व्यतिरिक्त चीनने चायना पिक्टोरियलच्या ग्रंथात पुनः एकदा विवादात्मक नकाशे प्रकाशित केले मात्र या चीनच्या कृतीचा भारताने निषेध केला. तिबेट प्रश्न, तिबेट मध्ये व्यापार करण्यास बंदी, तिबेटमधील

लोकांवर अन्याय, तिबेटमधील ३०००० लोक भारताच्या आश्रयाला येणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत चीन दडपशाहीच्या निषेधाचा ठराव पास होवूनही चीनने त्याची दखल न घेणे, दलाई लामाचे भारतात आश्रयाला येणे अशा संवेदनशिल घटना घडत असताना त्याचा चीनवर कोणताही परिणाम होत नव्हता. चीनच्या या अन्यायकारक धोरणामुळेच भारत - चीन संबंधात दुरावा निर्माण झाला होता.

### १४.४.५ चीनच्या धोरणात बदल:

भारताने चीनबरोबर आपले मित्रत्वाचे सबंध टाकावेत म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केले होते मात्र चीन आपली अडमुठेपणाची भूमिका सोडायला तयार नव्हता. उलट चीन दिवसेंदिवस भारताच्या विरोधात आपली आक्रमक भूमिका घेवू लागला होता. चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय १९६० मध्ये दिल्लीला आले. तेव्हां त्यांनी अकसाई चीनवरील आपला हक्क कधीही सोडणार नाही हे स्पष्ट केले. म्हणजे भारताने लडाख जवळील अकसाईवर पाणी सोडणे त्या मोबदल्यात चीनने भारताला नेफाचा प्रदेश भारताला द्यावा. पंडित जवाहरलाल नेहरुनी हा निर्णय घेतला असता तर कदाचीत भारतीय जनतेला हे पटले नसते. चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय व भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या चर्चेतून एक गोष्ट निष्पन्न झाली की सदर प्रकरणाबाबत दोन्ही राष्ट्रांनी पुरावे पडताळून पाहावे व नंतर या प्रकरणाबाबत निर्णय घ्यावा. भारताने सहा महिने पुरावे जमा केले मात्र चीनने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. उलट हे दोन्ही प्रदेश ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला.

### १४.४.६ चीनचे आक्रमण:

चीन व भारत यांच्या चर्चेत विसंवाद निर्माण झाल्यानंतर संघर्षमय परिस्थिती निर्माण झाली होती. चीनने भारताच्या विरोधात हल्ला करण्याची योजना अगोदरपासून केली होती. भारताला कोणतीही संधी न देता ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. चीनने या आक्रमणात सुरवातीला खिंझेमाने व ढोला ही ठिकाणे जिंकली. भारताने चिनी सैन्याना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला पण या प्रतिकारात भारतीय सैन्याची दाणादाण उडाली. या प्रतिकारात भारतीय सैनिकांच्या फळ्या कोलमडून पडल्या. एका महिन्यातच चीनी सैन्य प्रचंड प्रदेश काबीज करत मॅकमोहन रेषेपर्यंत येवून पोहचले. नेफाचा मोठा प्रदेश जिंकून चिनने लडाखच्या प्रदेश काबीज केला व २० नोव्हेंबर २९६२ रोजी चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली. चीनने एकतर्फी युद्ध बंद करण्याची दोन करणे होती पाहिले कारण म्हणजे आफ्रो-आशियायी राष्ट्रांकडून चीनला पाठींबा मिळविणे व सोव्हिएत संघाने चीनवर युद्धबंदीचे दडपण आणू नये.

### १४.४.७ १९६२ ची कोलंबो परिषद:

भारत-चीन या दोन देशांमध्ये तडजोड घडववून आणण्याचा उद्देशाने कोलंबो येथे श्रीलंका, इजिप्त, घाना, ब्रम्हदेश, इंडोनेशिया व कंबोडिया या सहा राष्ट्रांची परिषद भरली होती. या परिषदेने केलेल्या योजनेनुसार चीनने २० किलोमीटर अंतरापर्यंत आपल्या फौजा मागे घ्याव्यात आणि भारतानी आपली तत्कालीन ठाणी कायम ठेवावीत. चीनने २० किलोमीटर खाली केलेला प्रदेश निर्लष्कर मानावा. प्रत्यक्ष 'नियंत्रण रेषा' ही, 'युद्धबंदी रेषा' म्हणून मान्य व्हावी. याव्यतिरिक्त उरलेल्या प्रदेशाचा वाद उभय राष्ट्राने समोपचाराने सोडवावा अशी

शिफारस कोलंबो परिषदने केली. परिषदेच्या सूचनेला चीनने तत्त्वता मान्यता दिली. भारतानेही परिषदेकरून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर परिषदेच्या सुचनाना मान्यता दिली. परंतु चीनने नंतर परिषदेच्या सूचना फेटाळून लावल्या. व चीनने लडाख भागात लष्करी चौक्या उभारल्या. भारत-चीन प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर नेण्यास सुद्धा चीनने स्पष्ट नकार दिला.

### १४.४.८ १९७६ पासून भारत-चीन सबंधात बदल:

भारत-चीन प्रश्न दिवसेंदिवस कठीण बनत चालला होता. भारताने काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेल्याने गुंतागुंत निर्माण झाली होती त्यामुळे चीनच्या संदर्भातला हा प्रश्न भारत संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेवू शकत नव्हता. अशा कठीण परिस्थितीत १९७६ पासून भारत-चीन यांच्या संबंधात बदल होण्याची चिन्हे दिसू लागली होती. १९७७ मध्ये भारतातील काँग्रेस पक्ष पराभूत झाला व जनता पक्ष भारतात सत्तारूढ झाला. या बदलत्या सत्तांतराचे चीनने स्वागत केले.

### १४.४.९ १९७९ मधील भारताचे प्रयत्न:

भारत-चीन सबंध सुधारण्यासाठी १९७९ मध्ये भारताने महत्वाचे पाऊल उचलले. तत्कालीन परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी चीन दौरा निश्चित केला व चीनला प्रयाण करण्याचा निर्णय घेतला. मात्र परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी चीन दौऱ्यावर असतांनाच भारताचा मित्र असणाऱ्या व्हिएतनामवर चीनने आक्रमण केले. परिणामी परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी चीन दौरा आटोपता घेवून परतले मात्र पुढे भारत-चीन या देशांच्या उच्यस्तरावर भेटी सुरू झाल्या.

### १४.४.१० १९८० ते १९८८ या कालखंडातील भारत-चीन सबंध:

अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्र मंत्री असताना चीन दौरा केल्यानंतर उभय राष्ट्रानमध्ये उच्यस्तरावर भेटी सुरू झाल्या. भारतात सत्तान्तर होवून काँग्रेस सत्तेवर आले. पंतप्रधान इंदिरा गांधींनी चिन बरोबर नव्याने संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू केले. याच कालखंडात चीनचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री भारत दौऱ्यावर आले व चीन-भारत वाद समोपचाराने मिटविण्याची तयारी दर्शविली. दरम्यानच्या कालखंडात मात्र इंदिरा गांधींनचा मृत्यू झाल्याने या चर्चेत खंड पडला. पुढे भारताच्या पंतप्रधानपदी राजीव गांधींची नियुक्ती झाली. या कालखंडात पुनः चीनी परराष्ट्र मंत्र्यांच्या भेटी वाढल्या व उभय देशांमध्ये व्यापारी सबंध वाढीस लागले. १९८६ मध्ये इंडियन चेंबर्स ऑफ कोमर्सच्या प्रतिनिधी मंडळाने चीनला भेट दिली तसेच पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनला भेट दिली. परिणाम उभय देशांमध्ये व्यापारी व आर्थिक सबंध वृद्धिंगत झाले.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारत-चीन सबंधाच्या माहितीचे अवलोकन करा.

## १४.५ भारत श्रीलंका सबंध

भारत-श्रीलंका संबंधाचा विचार करता सुरुवातीला हे सबंध अत्यंत क्लिष्ठ होते. एकमेकांचा एकमेकांवर विश्वास नव्हता. अशातच श्रीलंका व ब्रिटिशांचे मित्रत्वाचे सबंध होते त्यामुळे भारत सुरवातीपासूनच श्रीलंके बाबत सावध होता. १९५५ मध्ये बांडुंग परिषदेत श्रीलंकेचे पंतप्रधान कोटेलवाला यांनी असे स्पष्ट केले की, 'पाश्चिमात्य साम्राज्यवाद' व 'सोव्हिएततांचा वसाहतवाद' यात आम्हाला काहीही फरक पडत नाही. त्यामुळे पंचशिलातील सर्व तत्व आमच्या दृष्टीने अव्यवहार्य आहेत. याही पुढे जावून श्रीलंकेमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांवर श्रीलंका मोठ्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्वरूपाचे अन्याय करत होती परिणामी या पार्श्वभूमीमुळे उभय राष्ट्रांच्या सबंधामध्ये दरी निर्माण झाली होती.

### १४.५.१ १९५६ ते १९६० या कालखंडातील सबंध:

श्रीलंकेत १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होवून एस.डब्लू.आर.डी. बंदारनायके श्रीलंकेचे पंतप्रधान झाले तेव्हां पासून भारत-श्रीलंका संबंधात सुधारणा होण्यास सुरुवात झाली.पुढे भारताबरोबर सलोख्याचे सबंध प्रस्थापित झाल्यानंतर श्रीलंकेने अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार केला. सुवेझ कालवा प्रसंग व हंगेरी प्रश्नाबाबत भारत व श्रीलंका या दोन्ही राष्ट्रांची भूमिका समान होती. तसेच श्रीलंकेतील भारतीयांचे प्रश्न सहानुभूतीने सोडविण्याचे दोन्ही राष्ट्राने ठरविले. याच कालखंडात भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूनी श्रीलंकेला भेट दिली व नंतर श्रीलंकेचे पंतप्रधान एस.डब्लू.आर.डी.बंदारनायके भारताला भेट दिली. परिणामी दोन्ही राष्ट्रांचे प्रश्न समाधानकारकरीत्या सुटतील असा आशावाद निर्माण झाला. तसेच दोन्ही राष्ट्रांमध्ये शांततेचे व सदभावाचे वातावरण निर्माण झाले.

### १४.५.२ १९५६ ते १९६० या कालखंडातील सबंध:

या कालखंडात व्यापार क्षेत्रातील अडचणी दूर करण्यासाठी या दोन राष्ट्रात करार झाला. त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सुद्धा श्रीलंकेने भारताची बाजू घेतली. गोवामुक्ती प्रसंगी सुरक्षा समितीत श्रीलंकेने भारताची बाजू घेतली. तसेच भारताच्या काश्मीर प्रश्नाबाबत पाठविलेल्या अहवालात असे म्हटले आहे की, 'काश्मीर प्रश्न हा उभय राष्ट्रांच्या शीतयुद्धाचा भाग आहे. अमेरिकेसाठी पाकिस्तान हा लष्करीदृष्ट्या महत्वाचा प्रदेश असल्याने या प्रश्नासाठी अमेरिकाला प्रोत्साहन देणे आहे. त्यामुळेच काश्मीर प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीची बनला आहे.

### १४.५.३ १९६४ ते १९६६ या कालखंडातील सबंध:

१६६४ मध्ये भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व श्रीलंकेचे पंतप्रधान एस.डब्लू.आर.डी.बंदारनायके एक महत्वपूर्ण करार झाला या कराराला अनुसरून श्रीलंकेत राहत असलेल्या ८,७५,००० तामिळानंविषयी निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला अनुसरून ३,००,००० तामिळाना श्रीलंकेने नागरिकत्व देणे व नंतरच्या ४,२५,००० तामिळाना नंतरच्या १५ वर्षाच्या काळात भारतात पाठविण्यात यावे व त्यांना भारताने नागरिकत्व देणे. व उरलेल्या १,५०,००० तामिळानच्या बाबतीत नंतर निर्णय घेणे अशी

तरतुद या करारामध्ये करण्यात आली होती. मात्र १९६५ मध्ये श्रीलंकेत युनायटेड नॅशनल पक्ष सत्तेवर आला. त्यामुळे या सरकारने या कारारावर शिक्का मोर्तब केला नाही. १९६७ मध्ये या प्रश्नावर वाटाघाटी झाल्या पण काही निष्पन्न झाले नाही. असे असतांनाही भारताने या कालखंडात श्रीलंकेला दोन कोटी रुपयांची मदत मंजूर केली व श्रीलंके बरोबर सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### १४.५.४ १९६७ ते १९७१ या कालखंडातील सबंध:

या कालखंडात भारत-श्रीलंका सबंध दृढ होण्यासाठी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी श्रीलंकेला भेट दिली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भेटीनंतर श्रीलंकेचे पंतप्रधान सेनानायके यांची बारा दिवसाची भारत भेट भारत-श्रीलंका यांची मैत्री दृढ होण्यासाठीच होती. १९७१ मध्ये श्रीलंकेत मोठा उठाव झाला होता तो उठाव मोडण्यासाठी भारताने लष्कर पाठवून मदत केली होती. १९६५ व १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धप्रसंगी सुद्धा श्रीलंकेची भूमिका टस्थतेची होती. मात्र सहानुभूती भारताच्या बाजूची होती. परिणामी पुढे भारत-श्रीलंका या राष्ट्रांमध्ये पुढे वाटाघाटी सुरू राहिल्या.

### १४.५.६ १९७१ ते १९८० या कालखंडातील सबंध:

या कालखंडाच्या सुरवातीलाच १९७४ मध्ये भारताने श्रीलंकेचा पाल्कच्या समुद्रध्वनीतील कच्छतिबु बेटावरील हक्क मान्य केला. याही पुढे जावून १९७६ मध्ये बंगालच्या उपसागरपासून ते दक्षिण किनाऱ्यापर्यंतच्या सागरी सीमा निश्चित करण्याचा करार ही करण्यात आला. याच कालखंडात भारत-श्रीलंका यांच्यातील आर्थिक सबंध टप्याटप्याने वाढत गेले.

### १४.५.७ १९८० ते १९८५ या कालखंडातील सबंध:

या कालखंडात सिंहली तामिळ लोक यांच्यातील संघर्ष पराकोटीला पोहचला होता. सिंहली म्हणजे श्रीलंकेती मुळ लोक व तामिळ म्हणजे भारतातून श्रीलंकेत स्थायिक झालेले लोक. या दोन गटात वांशिक संघर्ष निर्माण झाला होता. या वादातून शेकडो तामिळाची हत्या झाली होती. यातूनच तामिळ फुटीरवादाचा जन्म झाला. व या फुटीरवादातून श्रीलंकेच्या उत्तरेकडे असणाऱ्या बहुसंख्य तामिळ प्रदेशाला स्वायत्तता मिळावी अशी मागणी वाढू लागली. तामिळ बंडखोरांचा बंदोबस्त करणे श्रीलंकेला अवघड होते म्हणूनच चीन, इंग्लंड, इस्त्रायल व अमेरिकेची श्रीलंका मदत घेत आहे अशा वाईट बातम्या भारताला ऐकू येवू लागल्या. तसेच परकीय सत्तानी जर नाविक दल उभारले तर ती भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे याची जाणीव भारताला झाली. म्हणूनच भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८५ मध्ये प्रयत्न केले. व भुतांची राजधानी थिम्पू येथे श्रीलंका सरकार व बंडखोर यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. या वाटाघाटी सुरू असतांनाच १९८५ मध्ये श्रीलंका अध्यक्षाची हत्या झाली. व वाटाघाटी फिस्कटल्या. त्यामुळे आजही हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारत-श्रीलंका सबंधाच्या माहितीचे अवलोकन करा.

## १४.६ सारांश

भारत आणि भारताच्या शेजारील राष्ट्रांचा विचार करत असतांना आपण भारता शेजारील राष्ट्रे म्हणून पाकिस्तान, चीन, श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रह्मदेश या राष्ट्रांचा विचार केला. या सर्वच राष्ट्रांबरोबर आपल्या पंचशील तत्वाला अनुसरून आपले परराष्ट्र धोरण राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. या सहसंबंधाचा विचार करत असतांना चीन व पाकिस्तानचे कटू अनुभव वगळता इतर शेजारी राष्ट्रांबरोबरचे भारताचे सबंध हे शांततेचे व सहकार्याचे होते. अनेक राष्ट्रांबाबरोबरचे वादग्रस्त प्रश्न भारताने वाटाघाटीने सोडविले. श्रीलंका, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश व ब्रम्हदेश या राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. या देशातील निर्वासितांना मदत केली. सार्क परिषद व संयुक्तराष्ट्रसंघ या ठिकाणी या राष्ट्रांचे प्रश्न मांडण्यासाठी मदत केली. विशेष म्हणजे कोणत्याही राष्ट्रावर स्वतः कुरघोडी न करता जर दुसऱ्या राष्ट्राने कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तर त्या गोष्टीला प्रतिकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न केला. परिणामतः चीन व पाकिस्तान वगळता भारताचे शेजारील राष्ट्रांबरोबरचे सबंध अत्यंत सलोख्याचे होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## १४.७ प्रश्न

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे स्पष्ट करा.

२. भारत-पाकिस्तान सबंधावर एक दृष्टिक्षेप टाका.

३. भारत-चीन सबंधाचा आढावा घ्या.

४. भारत-श्रीलंका सबंधाची माहिती स्पष्ट करा.

५. भारत-अफगाणिस्तान सबंधावर चर्चा करा.

६. भारत-भूतान सबंधाचे सविस्तर विवेचन करा.

७. भारत-बांगलादेश संबंधावर भाष्य करा?

८. भारत-ब्रह्मदेश सबंधाची चर्चा करा?

## १४.८ संदर्भ

१. डॉ. एन. एस. तांबोळी, व्ही. पी. पवार - आधुनिक भारत.

२. कठारे अनिल - आधुनिक भारताचा इतिहास.

३. डॉ. मधुकर पाटील, डॉ. सुनील अमृतकर - समकालीन भारत.

४. डॉ. सुमन वैद्य - आधुनिक भारत.

५. डॉ. एन. एस. तांबोळी - आधुनिक जग.

६. के. सागर - आधुनिक भारताचा इतिहास.

*****

# १५

# भारत आणि आंतरराष्ट्रीय सबंध (अमेरिका आणि रशिया)

**घटक रचना**

१५.० उद्दिष्ट्ये

१५.१ प्रस्तावना

१५.२ भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणा बाबतची विचार प्रणाली

१५.३ भारत आणि अमेरिका सबंध

१५.४ भारत आणि रशिया सबंध

१५.५ सारांश

१५.६ प्रश्न

१५.७ संदर्भ

## १५.० उद्दिष्ट्ये

१. भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणा बाबतची विचार प्रणाली समजून घेणे.

२. भारत आणि अमेरिका संबंधाचा अभ्यास करणे.

३. भारत आणि रशिया संबंधाचा अभ्यास करणे.

## १५.१ प्रस्तावना

ब्रिटिशांच्या बंधनातून मुक्त होवून भारत स्वतंत्र झाल्यानंतर जागतिक राजकारणात भारताने अत्यंत सावध पावले टाकण्याचा निर्णय घेताला. कारण भारताने पारतंत्र्याचे कटू अनुभव अनुभवले होते. पुनः या गोष्टीची पुनरावृत्ती नको तसेच आपल्या देशाच्या वाट्याला पुनः संघर्ष नको. या उद्देशाना अनुसरूनच भारताने आपाले जागतिक राजकारणातील ध्येय-धोरण राबविण्याचा निर्णय घेतला. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांना भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार मानले जाते. ते पंतप्रधान झाल्या नंतर त्यांनी स्वतःकडे परराष्ट्र खाते ठेवले होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाला तात्विक बैठक असावी या बाबत ते आग्रही होते. आपल्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनातून व आपल्या तत्वचिंतानातून त्यांनी आपली आंतरराष्ट्रीय राजकारणातील परराष्ट्र नीती व परराष्ट्र नितीची तात्विक बैठक निश्चितच केली होती. भारतीय परराष्ट्र धोरणातील पंचशील व अलिप्तता चळवळ

तसेच भारत आणि भारताचे शेजारी राष्ट्र या दोन घटकांच्या माध्यमातून भारताच्या परराष्ट्र धोरणाची माहिती पाहिली आहे. या घटकात आपण भारत व भारताची आंतराष्ट्रीय राजकारणा बाबतची विचारप्रणाली, तसेच दोन बड्या सत्ता असणाऱ्या अमेरिका व रशिया या राष्ट्राबरोबरचे सहसंबंध आदी मुद्यावर आपण विचारमंथन करणार आहोत.

## १५.२ भारताचची आंतरराष्ट्रीय राजकारणा बाबतची विचार प्रणाली

दुसरे महायुद्ध जगाच्या दृष्टीने अत्यंत भयानक होते. दुसऱ्या महायुद्धात सहभागी झालेल्या राष्ट्रांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते तसेच नुकसान सहभागी न झालेल्या राष्ट्रांचे ही झाले होते. अशातच प्रत्येक राष्ट्राच्या मनात भीती तर होतीच पण त्यापेक्षाही जागतिक शांतताही प्रत्येक राष्ट्राला आवश्यक वाटत होती. अशातच जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र प्रयत्नशील होता. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाला म्हणावे तितकेसे यश प्राप्त होत नव्हते. मात्र जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन बड्या राष्ट्रांच्या नेतृत्वाने दोन गट तयार झाले होते. आणि या गटांमध्ये पुनः एकदा शह-कटशहाचे राजकारण सुरू झाले होते व यातूनच शीत युद्धाचा आरंभ झाला होता. अशा नाजूक परिस्थितीत भारताने केवळ भारतालाच नव्हे तर भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना जागतिक शांततेचे महत्व पटवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्याच बरोबर या गटा-तटाच्या राजकारणापासू अलिप्त राहण्याचे आवाहन केले होते. यातूनच पुढे अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाला.व या चळवळीतूनच जगातील काही समविचारी राष्ट्र एकत्र आली व यातूनच तिसरे जग निर्माण झाले. भारताने दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात दोन गट निर्माण झाल्या नंतर जगातील जी राष्ट्रे परकीयांच्या बांधनातून मुक्त झाली आहेत अशा राष्ट्रांनी या दोन बड्या गटापासून अलिप्त राहावे असे विनम्र आवाहन जगातील राष्ट्राना केले व त्याचा परिणाम असंख्य राष्ट्रवार होवून अनेक राष्ट्रांनी अलिप्तता विचारसरणी स्वीकारण्याचा निर्णय घेतला. भारताने आपल्या परराष्ट्र नितीत स्पष्टपणे सांगितले की मानव जातीच्या कल्याणासाठी जागतिक शांतता आवश्यक आहे. कारण जागतिक शांततेच्या जोरावरच जगातील अविकसित व विकसनशील राष्ट्रे स्वतःची प्रगती करू शकतील. तसेच या राष्ट्रांचा स्वतंत्र अस्तित्वासाठी जागतिक शांतता ही आवश्यक आहे. भारताने आपल्या आंतरराष्ट्रीय तत्वप्रणालीचा एक भाग म्हणून जगातील कोणत्याही राष्ट्रांच्या लष्करी करारामध्ये सहभागी न होणे या तत्वांचा अवलंब केला. तसेच इतर राष्ट्रांनाही तसे आवाहन केले. त्याचाही परिणाम तत्कालीन जागतिक राजकारणावर दिसून आला. भारताने आपल्या चिंतनशील विचारातून सम्राज्यवादला विरोध, वसाहतवादाला विरोध, वंशभेदाला विरोध, अविकसित व विकसनशील राष्ट्रांबरोबर मैत्री व या विचारसरणीचा स्वीकार करणाऱ्या सर्वच राष्ट्रांना आर्थिक व इतर मदतीचे सहकार्य आदी गोष्टींना प्राधान्य दिले. परिणामी भारताचची आंतरराष्ट्रीय राजकारणा बाबतची विचार प्रणाली जगातील अनेक राष्ट्रांना आवडल्याने या विचारप्रणालीचा स्वीकार जगातील अनेक राष्ट्रांनी केला.

## १५.३ भारत आणि अमेरिका सबंध

भारत हे आशिया खंडातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र तर अमेरिका एक जगातील एक महासत्ता व संपन्न राष्ट्र. दोन्ही राष्ट्रांमध्ये भौगोलिकदृष्ट्या हजारो मैलाचे अंतर. दोन्ही

राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील विचारप्रणाली वेगवेगळी असल्याने या दोन्ही राष्ट्रांचे विचार व कार्यप्रणाली एकमेकांना न पटल्याने परस्पर संबंध विरोधाभासाचे असल्याचे आपल्याला पहावयास मिळतात.

### १५.३.१ परस्पर विचारप्रणालीमधील फरक:

भारत व अमेरिका सबंधाचा विचार करत असतांना सुरवातीला आपल्याला या दोन राष्ट्रातील विचातप्रणालीचा विचार करावा लागेल. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जागतिक राजकारणात आपले प्रभुत्व निर्माण करण्यासाठी व साम्यवादाला विरोध करण्यासाठी आपला एक स्वतंत्र गट निर्माण केला होता. या गटात जगातील अनेक देशांना ओढण्याचा प्रयत्न केला, गटात सहभागी होणाऱ्या अनेक राष्ट्रांबरोबर मैत्री करार करणे, अशा गटात सहभागी होणाऱ्या राष्ट्रांना मोठ्याप्रमाणात आर्थिक मदत करणे. अशा राष्ट्रांमध्ये लष्करी करार करणे या तत्वप्रणालीचा अवलंब केला होता. या उलट भारताने दुसऱ्या महायुद्ध समाप्ती नंतर जागतिक शांततेसाठी कोणत्याही दोन गटात सहभागी न होण्याचा निर्णय घेणे, जगातील इतर राष्ट्रांना या गटांपासून अलिप्त राहण्याचे आवाहन करणे, जागतिक शांततेसाठी या सर्वच राष्ट्रांनी प्रयत्न करणे. वसाहतवाद, वंशवाद, साम्राज्यवाद, लष्करी करार या पासून अलिप्तत राहणे. प्रत्येक राष्ट्राने आपल्या सार्वभौमत्वाला महत्व देणे, समविचारी राष्ट्राने परस्परांना आर्थिक सहाय्य करणे व परस्पर समविचारी राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे व सहकार्याचे सबंध प्रस्तापित करणे. ही विचारप्रणाली भारताची होती. दोन्ही राष्ट्रांच्या या विचारप्रणाली परस्पर विरोधाभासी असल्याने या दोन्ही राष्ट्रमध्ये सुरवातीपासून परस्पर विरोधाभासी वातावरण होते.

### १५.३.२ चीनी सत्ता समर्थनावरून मतभेद:

चीनमध्ये सुरवातीला लोकशाही विचारप्रणालीला अनुसरून चँग-काय-शेकची सत्ता होती. या सत्तेला अमेरिकेचा पाठिंबा होता. मात्र मोओच्या नेतृत्वाखाली साम्यवादी क्रांती होवून चीनमध्ये सत्तान्तर झाले. या सत्तांतराला भारताने पाठिंबा दिला. चीनमधील सत्तांतरामुळे अमेरिकेच्या साम्यवादी लढ्याची पीछेहाट झाली होती. त्या मुळेच अमेरिकेच्या मनामध्ये भारताबद्ल द्वेष निर्माण झाला असावा असे काही विद्वानांचे मत आहे.

### १५.३.३ कोरियन प्रश्नावरून मतभेद:

कोरियन प्रश्नावरून परस्पर राष्ट्रांमध्ये मतभेद होते. दक्षिण व उत्तर कोरियामध्ये परस्पर मतभेद होते यातूनच १९५० मध्ये कोरियन युद्ध उद्भवले होते. उत्तर कोरियाला या युद्धात मदत करण्यासाठी अमेरिकेने संयुक्त राष्ट्रसंघामार्फत उभारण्यात येणाऱ्या लष्कराला सर्वच सदस्य राष्ट्रांनी मदत करावी असा ठराव मांडला. मात्र भारताने या ठरावाच्या बाजूने मतदान केले नाही. भारताला असे वाटत होते की कोरियन प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावा. भारताच्या या धोरणामुळे अमेरिकेच्या गटाचे समर्थन करणारी राष्ट्रे भारतावर नाराज झाली. अजून एक महत्वाचा प्रसंग घडला. अमेरिकेने दक्षिण व उत्तर कोरियाच्या विभाजनाचा ठराव मांडला त्या ठरवास ही भारताने कडाडून विरोध केला. तसेच भारताने कोरियन युध्दाबाबत केलेली मध्यस्थीही अमेरिकेला आवडली नाही. परिणामी अमेरिकेच्या मनात भारताबद्दल द्वेषभावना निर्माण झाली.

### १५.३.४ काश्मीर प्रश्नावरून मतभेद:

सोव्हिएत संघ व चीन या साम्यवादी विचारसरणीच्या राष्ट्रांना व अलिप्तता-वादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या भारताला नियंत्रणात ठेवण्यासाठी आपणांस पाकिस्तान अत्यंत उपयुक्त आहे याचं उद्देशाने अमेरिकेने पाकिस्तान बरोबर मित्रत्वाचे सबंध प्रस्तपित केले. पाकिस्तान बरोबर परस्पर संरक्षणचा व मैत्रीचा करार केला. अमेरिकेच्या या संधीसाधू धोरणाचा भारताने कडक शब्दात निषेध केला. या निषेधानंतर अमेरिकेने भारतास सांगितले की अमेरिका पाकिस्तानला देत असणाऱ्या शस्त्रास्त्रांचा वापर भारत विरोधासाठी करणार नाही.मात्र भारताने या अश्वासनाकडे दुर्लक्ष केले. अमेरिकेने पाकिस्तानला केलेल्या मदतीमुळेच पाकिस्तानचे लष्करी सामर्थ्य वाढले होते. त्यामुळेच १९४७ ला पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमक केले व काश्मीरचा एकतृतीयांश प्रदेश काबीज केला तेव्हां भारताने अमेरिकेला विनंती केली की पाकिस्तानला या व्याप्त प्रदेशातून सैने मागे घेण्यास सांगावे. मात्र या मागणीकडे अमेरिकेने दुर्लक्ष केले. जेंव्हा भारत-पाकिस्तान बाबतचा काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीकडे गेला तेंव्हा अमेरिकेने या प्रश्नाला भारत- पाकिस्तान तंटा असे स्वरुप दिले. या प्रसंगी अमेरिकन प्रतिनिधीनी काश्मीरचे भारतातील विलीनीकरण हे कायदेशीर आहे व काश्मीरचे सर्वभौमत्व भारताकडे आहे अशी कबुली दिली. मात्र असे असूनही अमेरिकेने पाकिस्तानला आक्रमक ठरविण्यास नकार दिला व पाकिस्तान ची पाठराखण केली. काश्मीरच्या घटना समितीने जेंव्हा १९५४ मध्ये काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणावर शिक्का मोर्तब केला तेंव्हा भारताने या घटनेचे समर्थन केले. मात्र या बाबीवर अमेरिकेने प्रखर टीका केली. पाकिस्ताननच्या विनंतीवरून काश्मीरचा प्रश्न पाश्चिमात्य राष्ट्रांनी सुरक्षा समितीत पुनः उकरून काढला याचा फायदा घेत अमेरिकेने असे सांगितले की संयुक राष्ट्रसंघ आयोजित सर्वमताद्वारे हा प्रश्न निकाली काढावा.या साठी अमेरिकेने २४ जानेवारी १९५७ मध्ये ठराव मांडला व दुसरा ठराव १४ फेब्रुवारी १९५७ मध्ये मांडून काश्मीर च्या निर्लष्करीकरणासाठी संयुक राष्ट्रसंघाच्या सेना पाठवण्यात असे सांगण्यात आले. अमेरिकेने मांडलेल्या या ठरवास ब्रिटन, ऑस्ट्रेलिया व क्युबाने पाठिंबा दिला. अमेरिकेचे भारत विरोधी धोरण केवळ भारतपोटीअसणाऱ्या द्वेषभावनेतूनच निर्माण झाले होते. यातूनच काश्मीर प्रश्नांचा अमेरिकेने भारतविरोधी धोरणासाठी पुरेपुर वापर केला होता हे सिद्ध होते.

### १५.३.५ गोवा प्रश्न:

भारताला स्वातंत्र्य जरी मिळाले असले तरी दीव, दमण व गोवा या वसाहती पोर्तुगीजांच्या ताब्यात होत्या. या तिन्ही वसाहती स्वतंत्र भारतात विलीन कराव्या असे भारताला वाटत होते. मात्र अमेरिकेने साम्यवादाविरूद्ध उभारलेल्या नाटो करारात पोर्तुगाल सदस्य असल्याने अमेरिकेने पोर्तगालची बाजू घेतली व भारताच्या या तिन्ही वसाहत विलीनीकरणाला विरोध केला. म्हणजेच अमेरिकेची गोवा विलीनीकरण विषयक भूमिका प्रतिकुल होती. १९५५ मध्ये सोव्हिएत नेते बुल्गालीन व क्रुशचेव भारत भेटीला आले तेंव्हा त्यांनी गोवा प्रश्नावर भारताला पाठींबा देवून युरोपीय वासहतवादाचा धिक्कार केला. सोव्हिएत संघाच्या पाठींब्यानंतर गोवा प्रश्न वाटाघाटीने सोडवावा असा सल्ला पोर्तुगालला अमेरिकेने दिला मात्र या सल्ल्याकडे पोर्तुगालाने दुर्लक्ष केले. गोव्या बाबत भारताने वारंवार अमेरिका व ब्रिटनला स्पष्ट कल्पना दिली होती. तरी पण पोर्तुगालाने गोव्याबाबत सतत बारा

वर्षे अडमुठेपणाची भूमिका घेतली होती. असे असूनही भारताने गोव्या बाबत संयमाची भूमिका घेतली होती.मात्र असे असतांनाही भारताने गोव्यावर कारवाई करू नये या बाबतीत अमेरिका सतत दडपण आणत होता. मात्र भारताने अमेरिकेच्या दडपणाला बळी न पडता गोवा ताब्यात घेतला. व गोवा प्रश्नाबाबत अमेरिका भारताची कशी अडवणूक करत होता हे जगाच्या निदर्शनास आणून दिले.

### १५.३.६ अमेरिकेचे भारत-पाक युद्धाबाबतचे धोरण:

भारताने स्वीकालरलेले अलिप्ततावादी धोरण व भारताला होणारी सोव्हिएत संघाची मदत यामुळे अमेरिकेचे भारताबाबतचे धोरण अनुकुल नव्हते. काश्मीर प्रश्न सुरू असतांना सातत्याने अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानची बाजू घेवून पाकिस्तानच्या बाजूचे समर्थन केले होते व पाकिस्तानची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला होता. याही पुढे जावून सोव्हिएत संघ, चीन व सोव्हिएत संघाची मैत्री ठेवणाऱ्या भारतावर जरब ठेवण्यासाठी एका लष्करी तळाची गरज होती व ती गरज पाकिस्तान कडून पूर्ण होणारी होती. यामुळे अमेरिकेचे धोरण पाकिस्तानच्या दृष्टीने अनुकूल होते. याचा फायदा घेवून १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमक केले मात्र भारताने या आक्रमणाला चोख उत्तर देवून पाकिस्तानचा पराभव केला. अमेरिकेने जरी भारत विरोधी धोरण अवलंबले असले तरी आर्थिक दृष्टीकोनातून दुर्बल असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला मदत करण्याचे काम थोड्याफार अंशी सुरू ठेवले होते. अनुदान कर्जे व तांत्रिक मदत स्वरूपात ही मदत सुरू ठेवली होती. यामुळेच दोन्ही राष्ट्रांमधील व्यापार सतत वाढत चालला होता. अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांच्या कारकिर्दीत ही मदत सुरु होती. १९७१ मध्ये पुनः एकदा पाकिस्ताननी आक्रमक धोरणाचा अवलंब करून भारतावर आक्रमण केले. असे असतांनाही अमेरिकेने संयुक्त राष्ट्रसंघात व संयुक्त राष्ट्रसंघाच्या बाहेर पाकिस्तानची बाजू उचलून धरली. अमेरिकेने पाकिस्तान ऐवजी भारताला आक्रमक ठरवून दोन्ही राष्ट्रांनी आपले लष्कर मागे घ्यावे असा प्रस्ताव सुरक्षा परिषदेत मांडला. याही पुढे जावून निक्सनने पाकिस्तानचे तुकडे करण्याचा व पाकिस्तान पूर्ण गिळंकृत करण्याचा भारताचा हेतू आहे असा जहरी प्रचार अमेरिकेने सुरू केला. या कालावधीत अमेरिकेने भारताची आर्थिक मदत बंद केली. मात्र पाकिस्तानला आर्थिक व लष्करी मदत सुरू ठेवली. मात्र भारताविरुद्ध अमेरिकेने पाकिस्तानला पाठविलेली अण्वस्त्रांची मदत येण्यापूर्वीच भारताने पाकिस्तानचा पराभव केला. त्यामुळे पुढील गोष्टी साध्य करण्यात अमेरिकेला अपयश आले.

### १५.३.७ १९७२ नंतरचे भारत- अमेरिका सबंध:

भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कुशल नेतृत्वाने पाकिस्तानवर विजय मिळाल्याने आशियायी राजकारणात भारताचा प्रभाव वाढला होता. अशातच भारत रशियाच्या बाजूने झुकू नये म्हणून अमेरिकेने भारतास पुनः एकदा आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. मात्र अमेरिकेने हिंदी महासागरात लष्करीकरण केल्याबद्दल भारताने अमेरिकेचा निषेध केला. दरम्यानच्या कालखंडात अमेरिकेने व्हिएतनामावर बॉम्ब हल्ले वाढविल्याने भारताने अमेरिकेवर टीका केली. १९७४ मध्ये भारतात आणीबाणी लागू केल्यानंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. या परस्पर विरोधी भूमिकेमुळे २९७४ ते १९७७ या कालखंडात भारत- अमेरिका सबंधात दुरावा निर्माण झाला.

### १५.३.८ १९७७ नंतरचे भारत- अमेरिका सबंध:

१९७७ मध्ये भारतात सत्तान्तर झाले. जनता पक्ष सत्तेवर आला. अमेरिकेने या नव्या सरकारचे स्वागत केले. अमेरिकेने जनता सरकार बरोबर आपले सबंध स्नेहाचे ठेवले. अमेरिकेचे नेतृत्व करणाऱ्या जिमी कार्टरने भारताबरोबर आपले सबंध चांगले ठेवले. परिणामी दोन्ही राष्ट्रांची कटुता कमी झाली. स्नेहभाव निर्माण झाला. अमेरिकेचे अध्यक्ष जिमी कार्टरने १९७८ मध्ये भारत भेट केली. भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई अमेरिका दौऱ्यावर गेले. दरम्यान उभय राष्ट्रात व्यापारवाढ व आर्थिक सहकार्याचे करार झाले. तारापूर येथील अणुभट्टीस युरेनियम देण्याची तयारीही अमेरिकेने दर्शविली. मात्र याची अंमलबजावणी झाली नाही. हिंदी महासागरात अमेरिकेने सतत लष्कर वाढविणे व पाकिस्तानला सतत लष्करी मदत करणे या दोन कारणावरून पुनः एकदा दोन्ही राष्ट्रांमध्ये दुरावा निर्माण झाला.

### १५.३.९ १९८० नंतरचे भारत- अमेरिका सबंध:

जनात सरकार जावून पुनः एकदा पंतप्रधान इंदिरा गांधींनच्या काँग्रेस सरकार सत्तेवर आले. त्यांनी शेवट पर्यंत अमेरिकेबरोबर सलोख्याचे सबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांची हत्या झाली. त्यांच्या नंतर राजीव गांधी सत्तेवर आले. त्यांनी १९८५ मध्ये अमेरिका दौरा केला. भारताच्या धोरणाबाबत त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रिगन यांच्याबरोबर चर्चा केली. जागतिक शांतता टिकविण्यासाठी उभयता चर्चा झाली. पंतप्रधान राजीव गांधीना अमेरिकन काँग्रेसपुढे भाषण करण्याचा मान मिळाला. अमेरिकन भांडवल गुंतविण्यापेक्षा अमेरिकन कंपन्यांना भारतात आवाहन करण्यात आले. यातूनच भारत अमेरिक अर्थिक क्षेत्र विकसित होण्यास मदत झाली.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारत-अमेरिका सबंध कसे होते त्याची माहिती तपासा.

## १५.४ भारत आणि रशिया सबंध

भारत-रशिया संबंधाचा विचार करता या राष्ट्रांचे सबंध अत्यंत जवळचे व स्नेहाचे होते. रशियाने जरी दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात आपला स्वतंत्र गट तयार केला असला तरी भारताला व रशिया या दोन्ही राष्ट्रमध्ये अत्यंत परस्पर सहकार्याचे नाते होते. जेंव्हा भारत स्वतंत्र झाला तेंव्हा भारताच्या हंगामी सरकारचे नेतृत्व पंडित जवाहरलाल नेहरूनी घेतले होते. तेंव्हा पंडित जवाहरलाल नेहरुनी आपल्या भाषणात सांगितले होते की भारताचे परराष्ट्र धोरण हे अलिप्ततेचे राहील. भारताचे जगातील जसे इतर राष्ट्रांबरोबर मित्रत्वाचे संबंध आहेत तसेच ते अमेरिका व रशिया बरोबरही राहतील. येतूनच खऱ्या अर्थाने भारत-रशिया संबंधाची सुरवात झाली.

### १५.४.१ भारत-रशिया सुरवातीचे सबंध:

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही आठवड्यातच पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुनी आपली भगिनी श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची नियुक्ती सोव्हिएत संघातील

भारताची पहिली राजदूत म्हणुन केली. मॉस्को मध्ये श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी इंग्लंड व अमेरिका वकालतीशी जास्त सबंध ठेवल्याने रशिया नाराज झाला व या दोन राष्ट्रांमध्ये दुरावा निर्माण झाला. म्हणजेच भारत रशिया सबंधाची सुरवात दुराव्याने झाली.

### १५.४.२ अन्नधान्य पुरावठ्या संदर्भातला प्रश्न:

भारतात अन्नधान्य तुटवडा निर्माण झाला होता. अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी करण्यासाठी भारताची अमेरिकेबरोबर बोलणी सुरू झाली होती. मात्र या बाबतीत अमेरिका टाळाटाळ करत होती. पुढे या प्रश्नाकडे अमेरिकेने पूर्णपणे दुर्लक्ष केले. मात्र भारताच्या अशा या कठीण प्रसंगी रशियाने भारताला अन्नधान्य पुरवठा करण्याचा निर्णय घेतला.तसेच भारताने या अन्नधान्याची किंमत भारतातील ताग, रबर व कापूस या वस्तूंच्या माध्यमातून चुकवली तरी चालेल असे सांगितले. व तातडीने रशियाने अन्नधान्याच्या मदतीसाठी अन्नधान्यानी भरलेली चार जहाजे भारताकडे रवाना केली. त्यामुळे भारताचा तत्कालीन कालखंडातील अन्नधान्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.

### १५.४.३ काश्मीर प्रश्न व रशियाची भूमिका:

काश्मीर प्रश्नावरून भारत व पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू होता. या संघर्षांतून पाकिस्तानने भारतावर हल्ला केला. सततच्या संघर्षामुळेच भारताने हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढे ठेवला. इंग्लंड व अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानला या प्रश्नानावरून सहकार्य करण्याचा प्रयत्न केला. मात्र ही चुकीची परिस्थिती लक्षात घेवून रशियाने भारताच्या बाजूने ठामपणे उभा राहण्याचा निर्णय घेतला. १९५१ मध्ये सुरक्षा परिषदेत भारताची बाजू उचलून धरली. तसेच १९५२ मध्ये इंग्लंड व अमेरिकेने केलेल्या पाकिस्तानच्या बाजूचे जोरदार खंडन केले. तसेच कश्मीरमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा पाठविण्याचा इंग्लंड व अमेरिकेच्या पाठिंब्याचा जोरदार खंडन केले. पुनः एकदा इंग्लंड व अमेरिकेने काश्मीर प्रश्न उकरून काढून १९५७ मध्ये कश्मीरमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा पाठविण्याचा खोडसाळ प्रस्ताव मांडला तो प्रस्ताव रशियाने नाकाराधिकाराच्या जोरावर उधळून लावला. म्हणजेच आंतरराष्ट्रीय स्तरावर काश्मीर प्रश्न मोडीत काढण्यासाठी भारताला रशियाची महत्वपूर्ण मदत झाली.

### १५.४.४ गोवा प्रश्न व मदत:

भारताला स्वातंत्र्य मिळूनही गोव्यावर भारताचे वर्चस्व प्रस्थापित झाले नव्हते. म्हणूनच दीव, दमण व गोवा भारतात विलीन करण्यासाठी रशियाने भारताला निःसंकोचपणे पाठिंबा दिला. स्वतंत्र भारतात गोवा ही वसाहत पोर्तुगीज्यांच्या ताब्यात राहावी ही एक लांच्छनास्पद गोष्ट आहे असे उद्गार भारत भेटीवर आलेल्या बुल्गनिन यांनी काढले. तसेच जेंव्हा भारताच्या पुनरर्भेटीसाठी आले होते तेंव्हा त्यांनी गोवा प्रश्नाबाबत आमची तुम्हाला कायम सहानुभूती असेल असे स्पष्ट केले. गोवा प्रश्न हा भारताचा अंतर्गत प्रश्न असल्याकारणाने संयुक्त राष्ट्रसंघा पुढे मांडण्याचा प्रश्न उद्भवत नाही असा युक्तिवाद केला व प्रश्न सुरक्षा समितीपुढे येवू नये यासाठी प्रयत्न केले. मात्र पोर्तुगालला इंग्लंड व अमेरिकेचा पाठिंबा असल्याने हा प्रश्न पाश्चिमात्य राष्ट्रांनी सुरक्षा समितीपुढे आणला मात्र हा प्रश्न

रशियाच्या मदतीने उधळून लावण्यात भारताला यश आले म्हणजेच गोवा प्रश्न मोडीत काढण्यामध्ये सुद्धा भारताला महत्वपूर्ण अशी मदत झाली.

### १५.४.५ चीन आक्रमणाबाबतची भूमिका:

भारत चीन युद्धजन्य परिस्थितीत रशियाने कोणाची बाजू घ्यावी असा प्रश्न निर्माण झाला होता. कारण भारत जसा रशियाचा मित्र आहे तसाच चीन सुद्धा साम्यवादी विचारप्रणालीला अनुसरून रशियाचा मित्र होता. १९५९ मध्ये भारत-चीन सीमा प्रदेशात संघर्ष सुरू झाला तेंव्हा रशियाने या दोन्ही राष्ट्रांना सामोपचाराने सीमावाद प्रश्न सोडवावा असे आवाहन केले. मात्र या आव्हानास चीनकडून प्रतिसाद मिळाला नाही. जेंव्हा १९६२ भारत-चीन युद्ध झाले तेंव्हा रशियाने भारताची बाजू घेतली. तसेच भारताला आक्रमक ठरविण्याचा चीनच्या धोरणाला विरोध केला. तसेच रशियाने चीनला पुरवत असलेला खनिज तेलाचा पुरवठाही बंद केला. तसेच साम्यवादी गटांच्या राष्ट्रांकडून चीनच्या या आक्रमणाचा निषेधही केला. परिणामतः चीनच्या भारत विरोधी आक्रमणाला पायबंद बसला. म्हणजेच भारत-चीन युध्द कालखंडात सुद्धा भारताला रशियाची महत्वपूर्ण अशी मदत झाली.

### १५.४.५ सुएझ कालवा पेचप्रसंग:

इजिप्तने १९५६ मध्ये सुएझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केले.याचा राग म्हणून इस्त्रायलने इजिप्तवर हल्ला केला. इस्त्रायल पाठोपाठ इंग्लंड व फ्रांसनेही इजिप्तवर हल्ला केला. अमेरिकेने मात्र दिखाऊपणाने तटस्थता दाखविण्याचा प्रयत्न केला. मात्र भारत व रशियाने या हल्ल्याचा कडक निषेध केला. तसेच तातडीने सुएझ प्रश्न वाटाघाटीने सोडविण्यात यावा अशी सूचना भारताने केली या सूचनेला रशियाने पाठिंबा दिला. त्यामुळे सुएझ प्रश्नावर दोन्हीं राष्ट्रांचे एकमत होते हे सिद्ध झाले.

### १५.४.६ हंगेरी प्रश्नाबाबत भारताची भूमिका:

१९५६ मध्ये पाश्चिमात्यांना अनुकूल असणारा उठाव रशियाने लष्करी कारवाई करून दडपून टाकला. या कारवाईचा पाश्चिमात्य राष्ट्राने कठोर शब्दात निषेध केला मात्र एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रात फौजा पाठवून लष्करी कारवाई करणे म्हणजे त्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला धक्का पोहचविणे असे रशियाच्या बाबतीत या लष्करी कारवाई बाबत भारताने सामान्य विधान केले. म्हणजेच रशियाचा या प्रसंगा बाबत धिक्कार केला नाही. रशिया बाबतचे अशाच प्रकारचे विधान युगोस्लाव्हियाने केले. तसेच हा प्रश्न सुरक्षा समितीमध्ये मांडला तेंव्हा या प्रश्नांवर भारताने मतदान केले नाही. म्हणजेच हंगेरी प्रश्नावरून उभय राष्ट्रात द्वेषभावना निर्माण होणार नाही याची खबरदारी भारताने घेतली.

### १५.४.७ १९६५ ते १९७० या कालखंडातील भारत रशिया सबंध:

या कालखंडाच्या सुरवातीला भारत-पाकिस्तान युद्ध झाल्याने आशियाच्या राजकारणात रशियाला स्थान मिळविण्याची संधी उपलब्ध झाली होती. रशियन पंतप्रधान कोसीजन यांनी या संधीचा फायदा घेण्यासाठी दोन्ही राष्ट्रांच्या प्रमुखांना पत्र पाठवून युद्धबंदीसाठी आवाहन केलं. व दोन्ही राष्ट्रांमध्ये मध्यस्थी करण्याची तयारी दर्शविली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चर्चेच्या वेळी कोणाची बाजू घेतली नाही. मात्र काश्मीर हा भारताचा

अविभाज्य घटक आहे याचा पुनर्रउच्चार केला. तसेच उभय राष्ट्रांमधील युद्ध थांबविण्यात रशियाला यश आले. व भारत व पाकिस्तान मध्ये ताशकंद करार सुरू झाला. पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आयुबखान व भारताचे पंतप्रधान लालबहादू शास्त्री यांच्यामध्ये वाटाघाटी होवून ताशकंद करारावर सह्या झाल्या. मात्र त्याच रात्री पंतप्रधान लालबहादू शास्त्री हृदयविकाराचा झटका आला व त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. विरोधकानीं लालबहादूर शास्त्रीनवर रशियाने दबाव आणण्याचा प्रयत्न केला मात्र लालबहादूर शास्त्रींननंतर सत्तेवर आलेल्या पंतप्रधान इंदिरा गांधींनी यांनी दोन वेळा मॉस्कोला भेट दिली. व भारताचे राशियाबरोबरचे सबंध कायम टिकविण्यासाठी प्रयत्न केले. याच कालखंडात एक शंकास्पद घटना सुरू होती ती घटना म्हणजे रशिया पाकिस्तानला शस्त्रास्त्रे पुरवितो. या घटनेमुळे भारताच्या मनामध्ये रशियाच्या बाबतीत शंका निर्माण झाली. रशियाचा या पाठीमागचा उद्वेश म्हणजे पाकिस्तानने अमेरिकेच्या गटात पूर्णपणे जावू नये असाच होता. मात्र भारताला पण ही भीती वाटत होती की अमेरिका, चीन, पाकिस्तान यांचा एक गट जर तयार झाला व रशिया जर आपल्याला सोडून गेला तर आपण एकाकी पडू. अशातच दोन गोष्टी अजून पुढे आल्या होत्या पहिली गोष्ट म्हणजे रशियात प्रकाशित झालेल्या नकाशात काश्मीरच्या काही भागात चीनचा प्रदेश दाखविण्यात आला. तर दुसरी गोष्ट म्हणजे भारत-पाकिस्तान मधील फराक्का पाणी प्रश्नावर रशिया भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करणार आहे. भारत रशिया संबंधात कटुता निर्माण झाली होती.अशातच पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आयुबखान यांना राष्ट्राध्यक्ष पदावरून दूर करण्यात आले. त्यांच्या जागी याह्याखान सत्तेवर आले.त्यांनी चीन व अमेरिकेबरोबर आपले सबंध दृढ केले परिणामी रशियानी पाकिस्तान बरोबरचे सबंध तोडून टाकले. त्यामुळे भारताची चिंता दूर झाली. १९७१ मध्ये पाकिस्तानने पूर्व बंगालमध्ये लष्करी कायदा करून तेथील नागरिकांवर अत्याचार केले तेंव्हा रशियाने हा प्रश्न सामोपचाराने सोडविण्यासाठी पुढे यावे अशी आवाहन केले मात्र पाकिस्तानने यास प्रतिसाद दिला नाही.उलट अमेरिका व चीन यांच्या सोबत मैत्री वाढविण्यास सुरवात केली. त्यामुळे रशिया अडचणीत आला होता. म्हणूनच रशियाने पुनः एकदा भारताबरोबर सबंध दृढ केले.

### १५.४.८ भारत-रशिया मैत्री करार:

भारत व रशियामध्ये १९७१ मध्ये घडून आलेला हा करार अत्यंत महत्वाचा मनाला जातो. हा करार वीस वर्षासाठी होता. या करारात बारा कलमे होती. दोन्ही देशांनी एकमेकांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडत्व कायम राखावे, एकमेकांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करूनये जागतिक शांततेसाठी व स्थिरतेसाठी संयुक्त राष्ट्रसंघामार्फत शस्त्रास्त्र स्पर्धेस आला घालण्यासाठी प्रयत्न करणे, वंशवाद व वसाहतवाद विरुद्ध लढणाऱ्या गटांना मदत करणे, आंतरराष्ट्रीय समस्यावर परस्पर विचारविनिमय करणे, दोन्ही राष्ट्रांमध्ये व्यापारी व सांस्कृतिक सबंध प्रस्तापित करणे, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढविणे. भारताने अलिप्ततावादी गट सोडून रशिया गटात जाण्याचा मार्ग निश्चित केला आहे अशी टीका विरोधी गटाने केली मात्र तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी या कराराचे समर्थन केले व त्यांनी असेही स्पष्ट केले की भारत व रशियाची मैत्री पारंपरिक आहे .व हा करार जागतिक शांततेसाठी उपयुक्त आहे.

### १५.४.९ भारत-पाकिस्तान युद्धातील रशियाची भूमिका:

१९७१ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यानंतर ताबडतोब रशिया भारताच्या बाजूने उभा राहिला. रशियाच्या सीमेजवळ चाललेल्या या युद्धामुळे रशियाच्या सुरक्षिततेला धोका पोहचू शकतो म्हणून पाकिस्तानने हे युध्द बंद करावे असा निर्वाणीचा इशारा रशियाच्या सरकारी वृत्तपत्राने पाकिस्तानला दिला. तसेच या युद्धात इतर कोणत्याही राष्ट्राने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर रशिया तो हस्तक्षेप खपवून घेणार नाही. रशियाच्या या धोरणामुळे चीन व अमेरिकेला या युध्दापासून दूर ठेवण्यात रशियाला यश आले. अल्पावधीतच भारताने हे युद्ध जिंकले. १९६१ मध्ये भारत-पाकिस्तान या दोन राष्ट्रांमध्ये सिमला करार झाला. या मदतीमुळे रशिया हा भारताचा खरा मित्र आहे हे सिद्ध झाले.

### १५.४.१० जनता राजवटीतील भारत-रशिया सबंध:

१९७७ मध्ये भारतात सत्तान्तर झाले. भारतात जनता पक्ष सत्तेवर आला.मागील सरकारने रशियाबरोबर सुरू ठेवलेले मित्रत्वाचे धोरण या सरकारने तसेच पुढे सुरू ठेकेले.भारताचे परराष्ट्र मंत्री अटलबिहारी वाजपेयी व रशियाचे परराष्ट्र मंत्री ग्रोमिको यांची भेट झाली. जनता सरकारने भारत-रशिया मैत्री कायम राहतील असे रशियाला आश्वासन दिले. या काराराादरम्यान रशियाने भारताला मदत करण्याचे मान्य केले. भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी १९७८ व १९७९ मध्ये मॉस्कोला भेट दिली. तसेच उभय राष्ट्रांनी अणुशक्तीचा वापर जागतिक शांततेसाठी व विकासासाठी करण्याचा निर्णय घेतला. या सर्व घटनाक्रमांमुळे उभय राष्ट्रांमध्ये जवळीकता वाढली. भारतात पुनः सत्तान्तर झाले. काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. या कालखंडात एक पेच प्रसंग निर्माण झाला होता. अफगाणिस्तानमधील बब्राक कमालचे आसन स्थीर करण्यासाठी रशियन लष्कर अफगाणिस्तानात आले होते. रशियाच्या या हस्तक्षेपावर संयुक्त राष्ट्रसंघ व संयुक राष्ट्रसंघाबाहेर रशियावर टीका होवू लागली. या प्रसंगी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मुत्सद्दीपनाणे मार्ग काढला. रशियाने अफगाणिस्तानातून सैन्य बाहेर काढावे तसेच पाकिस्तान व अमेरिकेनेही अफगाणिस्तानमधला हस्तक्षेप थांबवावा. तसेच होता. अफगाणिस्तानमधील बब्राक कमालच्या सत्तेला राजनैतिक मान्यता दिली. यातून रशिया-भारत यांचे सबंध दुरावणार नाहीत याची खबरदारी घेण्यात आली होती. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी यांनी भारताच्या पंतप्रधान पदाची धुरा आपल्या हाती घेतली त्यांनीही भारत-रशिया सबंध दृढ करण्याचा नेटाने प्रयत्न केला.

**आपली प्रगती तपासा.**

१. भारत रशिया सबंध कसे होते त्याची माहिती तपासा.

## १५.५ सारांश

भारत आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या घटकांचा विचार करतांना आपण सर्वप्रथम भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विचारप्रणालीचा अभ्यास केला ज्यामध्ये आपण भारताने अलिप्तता, शांतता, परस्पर सहकार्य, अंतर्गत सार्वभौमत्व, वसाहतवादाला विरोध,

वंशवादाला विरोध, अनाक्रमणतत्वाचा अवलंब, लष्करी करार व लष्करीकरणाला विरोध आदी तत्वांचा अवलंब कसा केला याची माहिती पाहिली. त्याच बरोबर जागतिक राजकारणातील महासत्ता म्हणून कार्यरत असणाऱ्या अमेरिकेबरोबर भारतचे सबंध हे आपापल्या विचारप्रणालीला अनुसरून परस्पर विरोधाभासी कसे होते, चीनमध्ये राष्ट्रीय सरकार बदलून साम्यवादी विचार प्रणालीचे सरकार आल्यानंतर अमेरिकेच्या मनात भारताबद्दल द्वेषभाव कसा निर्माण झाला, कोरियन प्रश्नावरून भारतानी केलेली मध्यस्ती अमेरिकेला क आवडली नाही, काश्मीर प्रश्नावरून अमेरिकेने भारताला कशा पद्धतीने अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला, गोवा विलीनीकरण प्रश्नात अमेरिकेने पोर्तुगालला का मदत केली नंतर भारत अमेरिका संबंधात बदल कसे झाले आदी घटकांची माहिती पहिला. या सर्व घटसकांवरून असे स्पष्ट होते की अमेरिकेने भारताला सहकार्य करण्याऐवजी सतत कोंडीत पकडण्यासाठी प्रयत्न केला. भारत रशिया संबंधाचा विचार करता या दोन्ही राष्ट्रांचे सबंध भारताला सलोख्याचे होते. भारताला अन्नधान्य तुटवडा होता तेंव्हा केलेली मदत, रशियाने भारताला काश्मीर प्रसंगी केलेली मदत, रशियाने भारताला गोवा प्रश्नावर केलेली मदत, तसेच भारतावर चीनने जेंव्हा आक्रमण केले तेंव्हा रशियाने भरता बाबतची घेतलेली भूमिका, सुएझ कालवा प्रश्न प्रसंगी भारत रशियाने संयुक्तपणे केलेला निषेध, पाकिस्तानला जेंव्हा मदत सुरू केली तेंव्हा दोन राष्ट्रांमध्ये निर्माण झालेली कटुता, भारताला दोन भारत-पाक युद्धामध्ये रशियाने केलेली मदत, आणि पुढेही या दोन राष्ट्रांमध्ये दृढ झालेले कायमस्वरूपी सबंध. या सर्व घडामोडींचा अभ्यास या घटकांमध्ये आपण केला आहे. या दोन्हीं बड्या सत्तांबरोबर भारताने सहसंबंध प्रस्तापित करतांना दाखविलेला दूरदृष्टीपणा निश्चितच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपयुक्त व महत्वपूर्ण होता.

## १५.६ प्रश्न

१. भारत-अमेरिका सहसंबंधाचा आढावा घ्या.

२. भारत-रशिया सहसंबंधाचा आढावा घ्या.

## १५.७ संदर्भ


१. डॉ.एन.एस.तांबोळी, व्ही.पी.पवार - आधुनिक भारत.

२. कठारे अनिल - आधुनिक भारताचा इतिहास.

३. डॉ मधुकर पाटील, डॉ. सुनील अमृतकर - समकालीन भारत.

४. डॉ.सुमन वैद्य - आधुनिक भारत.

५. डॉ.एन.एस.तांबोळी - आधुनिक जग.

६. के.सागर - आधुनिक भारताचा इतिहास.


*****